# ''साधना साप्ताहिक : वाङ्मयीन अभ्यास (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०)''

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
साहित्य आणि ललितकला विद्याशाखांतर्गत
मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीकरिता सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

सुवर्णा दत्तात्रय खोडदे
**PRN 13613007841**

मार्गदर्शक

डॉ. बाबासाहेब शेंडगे

श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि
भारतीयविद्या अध्ययन केंद्र


नोव्हेंबर २०२१

# प्रतिज्ञापत्र

मी **सुवर्णा दत्तात्रय खोडदे** प्रतिज्ञापूर्वक प्रमाणित करते, की **''साधना साप्ताहिक : वाङ्मयीन अभ्यास (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०)''** या विषयावरील शोधप्रबंध मी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या 'साहित्य आणि ललितकला विद्याशाखांतर्गत मराठी' या विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर केलेला आहे. हे संशोधन स्वतंत्र आणि नवे असून, आवश्यक तेथे संदर्भनिर्देश केलेले आहेत. यापूर्वी हा शोधप्रबंध कोणत्याही विद्यापीठात अन्य कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : पुणे

**सुवर्णा दत्तात्रय खोडदे**
संशोधक

दिनांक: /११/२०२१

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते, की **सुवर्णा दत्तात्रय खोडदे** यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या साहित्य आणि ललितकला विद्याशाखांतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) या पदवीसाठी सादर केलेला **''साधना साप्ताहिक : वाङ्‌मयीन अभ्यास (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०)''** या विषयावरील शोधप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. प्रस्तुत संशोधन स्वतंत्र आणि नवे असून, यापूर्वी ते कोणत्याही पदवीसाठी, कोणत्याही विद्यापीठात सादर केलेले नाही. सदर शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

ठिकाण : पुणे

**डॉ. बाबासाहेब शेंडगे**
मार्गदर्शक

दिनांक : /११/२०२१

# ऋणनिर्देश

१५ ऑगस्ट २००८ रोजी 'साधना' साप्ताहिकास ६० वर्षे पूर्ण झाली त्या निमित्ताने 'साधना'चे हीरकमहोत्सवी ८ पुस्तकांचे प्रकाशन 'साधना प्रकाशना'च्या वतीने करण्यात आले. सानेगुरुजी अर्थात पांडुरंग सदाशिव साने यांनी सुरू केलेल्या साधनाला साठ वर्षे पूर्ण झाली अशी बातमी ऐकली. आपणही 'साप्ताहिक साधना'वर संशोधन करावे, असे मनोमन वाटू लागले. हे वाटणेच अभ्यासविषयाकडे अधिकाधिक आकर्षित करू लागले.

खरे तर माझे एम.फिल.चे संशोधन 'सदानंद देशमुखांचे कथाविश्व' या विषयावर होते. पण पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी मला समाजप्रबोधन करणाऱ्या 'साधना साप्ताहिक' या विषयाची निवड करावी असे वाटत होते. त्या दृष्टीने संशोधनविषयाची शोधाशोध सुरू झाली. ''साधना साप्ताहिक : वाङ्मयीन अभ्यास (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०)'' हा विषय संशोधनासाठी निवडला. शैक्षणिक वर्ष २०१३–१४ मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठात पीएच.डी. संशोधनासाठी समितीसमोर हा विषय मांडला तेव्हा तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. कल्याण काळे, डॉ. द. दि. पुंडे, अधिष्ठाता डॉ. श्रीपाद भट यांनी विषयाचे कौतुक केले. एवढा ताकदीचा विषय आपण संशोधनासाठी निवडला, याचे त्यांना आश्चर्य वाटले. आपण या विषयात चांगले संशोधन करून साधना साप्ताहिकाचा वाङ्मयीन अभ्यास करावा, असा आपुलकीचा व वडीलकीचा सल्ला दिला आणि ''साधना साप्ताहिक : वाङ्मयीन अभ्यास (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०)'' हा विषय संशोधनासाठी निश्चित झाला.

सन २००८ ते २०१३ या कालखंडात मी साधना साप्ताहिकाच्या अभ्यासाच्या विचाराने 'साधना' साप्ताहिकाशी संबंधित माहिती संकलित केली. तेव्हा 'साधना' प्रकाशनाच्या कार्यालयाला भेट दिली. साधनाच्या हीरकमहोत्सवी आठ पुस्तकांचा संच हाताशी आला. या पुस्तकांचे वाचन करताना संशोधनविषयाची दिशा मिळाली. त्याप्रमाणे अभ्यासाला सुरुवात केली. १५ ऑगस्ट २०१३ रोजी साधना साप्ताहिकाचा ६५ वा वर्धापनदिन साजरा होणार होता, त्या अगोदर डॉ. विनोद शिरसाठ यांची भेट घेतली व त्यांना मी ''साधना साप्ताहिक : वाङ्मयीन अभ्यास (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०)'' या विषयावर संशोधन करत आहे. हे सांगितल्यावर त्यांनी साप्ताहिकाचे सर्व डिजिटल अंक क्षणाचाही विलंब न लावता उपलब्ध करून दिले.

संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक साहित्य हाती मिळताच खऱ्या अर्थाने अभ्यासास सुरुवात झाली. पण 'साधना' साप्ताहिकाचे हे सर्व जुने अंक डिजिटल असल्यामुळे प्रिंट करावे लागले. कारण संशोधनाच्या सुरुवातीचा टप्पा म्हणजे वाचन, वर्गीकरण करणे हा होय. पण डिजिटल स्वरूपातील अंकामुळे वाचनात अडचण निर्माण झाली. अक्षरांचा टाइप, पान उघडण्यास होणारा विलंब, यामुळे संशोधनकार्यास बराच कालावधी लागला. पण वाचनाने माणूस बहुश्रुत होतो याची जाणीव 'साधना' साप्ताहिकाचे अंक वाचन करत असताना होऊ लागली.

'साधना' साप्ताहिक सानेगुरुजी यांनी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर एक वर्षाने म्हणजे १५ ऑगस्ट १९४८ ला सुरू केले. समाजवादी विचारांचा समाज निर्माण व्हावा हा त्यांचा उद्देश यातून दिसून येतो. म्हणूनच 'साधना' साप्ताहिकात समाजवादाविषयी अनेक लेखांचे लेखन झालेले दिसून येते. तसेच सर्वोदय मार्गांचाही विचार झालेला दिसून येतो. महात्मा गांधी, विनोबा भावे, रवींद्रनाथ टागोर आदींच्या विचारांचा प्रभाव सानेगुरुजींवर दिसून येतो.

सानेगुरुजींनी 'साधना' साप्ताहिक का सुरू केले, समाजवादी विचारांनी प्रभावित झालेल्या सानेगुरुजींना समाजाकडून असणाऱ्या अपेक्षा, रवींद्रनाथ टागोरांच्या 'साधना' कादंबरीच्या विचाराने प्रभावित होऊन सुरू केलेल्या साप्ताहिकास 'साधना' हे नामकरण, 'साधना' साप्ताहिकाचा मुंबई–पुणे प्रवास, साधनाचे संपादक, त्यांची वैचारिक प्रगल्भता, त्यांचा दृष्टिकोन, केवळ समाजवादी विचारांचे मुखपत्र म्हणून साधना साप्ताहिकाची जडणघडण झालेली नसून यातून स्थानिक ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध विषयांना दिलेले स्थान, 'प्रांतभारती–आंतरभारती' यांसारख्या उपक्रमातून भारतातील विविध भाषांतील अक्षरलेणी मराठी भाषिक माणसांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न त्या त्या भाषेतील महत्त्वाच्या साहित्यिकांचे साहित्य व त्यांचा मराठीतील अनुवाद साधनातून प्रकाशित झाला.

बालकांसाठी, विशेष म्हणजे साधनेच्या कथा, मुलांच्या मेळाव्यात, कथा, सुंदर पत्रे या सदरांतून बालमानसशास्त्राचा अभ्यास व त्यांच्या विचारांना चालना देणाऱ्या छोट्या नीतिपर उपदेश कथा, हे 'साधना' साप्ताहिकाचे विशेष होय.

आंतरराष्ट्रीय स्तराचा विचार करता युद्धोत्तर युरोपमध्ये घडणाऱ्या घडामोडी, प्रवासवर्णन, स्वीडनमधील कामगार चळवळ, मुसोलिनी, कोरियातील युद्ध, युरोपची प्रवासपत्रे यातून

आंतरराष्ट्रीय स्तरावर घडणाऱ्या घडामोडींना स्थान दिले गेले. त्यातून आपणास त्यांच्या दूरदृष्टीचे दर्शन घडते.

या हेतूने ''साधना साप्ताहिक : वाङ्मयीन अभ्यास (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०)'' हा विषय संशोधनासाठी निवडला. अभ्यास वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने माझी संपूर्ण शैक्षणिक जबाबदारी कै. डॉ. जालिंदर भोसले (इतिहास विभागप्रमुख, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे–४) यांनी पूर्ण केली. त्यांनी माझ्याबाबत पाहिलेले एक स्वप्न म्हणजे पीएच.डी. ही पदवी संपादन करावी हे होते. त्यांच्या स्वप्नांना पूर्णत्वास नेणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे. मनोधैर्य वाढविण्यास आत्मविश्वास ही महत्त्वाची बाब असते. हे जाणून त्यांनी माझ्यातील संशोधक अभ्यासकास वारंवार जागृत करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या आशीर्वादानेच मी हे संशोधनाचे शिवधनुष्य पेलले आहे.

डॉ. अलका भोपटकर (मराठी विभागप्रमुख, मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौड रोड, पुणे–३८) यांनी मला संशोधन करताना विषयाची मांडणी, अभ्यासाची दिशा व मनोबल वाढविण्यासाठी सातत्याने प्रोत्साहन देऊन माझ्याकडून संशोधन कार्य करून घेतले. माझी मैत्रीण डॉ. शारदा कदम (मराठी विभाग, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत) हिची भेट हा निव्वळ योगायोग नसून, ती एक पर्वणीच होय. तिच्यामुळेही मला संशोधनात काय करावे, काय करू नये, याचे मार्गदर्शन सातत्याने मिळाले. वारंवार होणारे विचारांचे आदानप्रदान, विषयाशी संबंधित चर्चा, कधी कधी तिच्या परिचयाच्या व्यक्तींच्या गाठीभेटी यातून विषय मांडणीला एक दिशा मिळत गेली. संशोधन पूर्णत्वाच्या दृष्टीने मार्गदर्शन मिळाले. प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे (इतिहास विभागप्रमुख, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत), प्रा. डॉ. ल. भा. राजमाने, औरंगाबाद यांचे साधना साप्ताहिक व सानेगुरुजींची साधनाबद्दलची भूमिका यांचा उपयोग वाङ्मयीन अभ्यासाच्या कसोट्या समजण्यास उपयुक्त ठरले. राष्ट्रसेवा दलाच्या भारत जोडो युवा अकादमी, किनवटचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे, डॉ. विश्वास मोरे (उपसंपादक, लोकमत) यांचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळाले.

माझी आई सुमन, वडील दत्तात्रय यांनी देखील आम्ही मुली आहोत म्हणून कधीही आमच्या शिक्षणाच्या बाबतीत माघार घेतली नाही. म्हणून आज आम्ही तिन्ही भावंडे उच्चविद्याविभूषित आहोत. म्हणून मला माझ्या आई–वडिलांचा नेहमीच आदर वाटतो.

दीपाली खोडदे, यशोदीप खोडदे, प्रा. सीमा भोसले, सुजित भोसले, स्नेहा भोसले, उषा माने, विष्णू माने, सचिन माने व संजीवनी कदम यांनी माझा उत्साह वाढवून मला संशोधनकार्यात मदत केली. पल्लवी माने, आर्यन माने, शर्वरी माने, उज्ज्वला कदम, प्रा. केशव काकडे, हर्ष काकडे, विश्वजित काकडे, तसेच साधना साप्ताहिकातील निवडक लेखांची झेरॉक्स काढण्यासाठी सदैव तत्पर असणारे श्री. विजय जाधव यांच्यामुळेच संशोधनकार्यास खऱ्या अर्थाने गती मिळाली.

आयुष्य म्हणजे सुखदुःखाची छाया–पडछाया, माझ्या आयुष्यातही हे प्रसंग निर्माण झाले. त्यामुळे संशोधनकार्य थोडे मंदावले. पण पती प्रा. श्रीकांत माने यांनी मला सातत्याने प्रोत्साहन दिले. म्हणूनच मी संशोधनकार्य पूर्णत्वास नेऊ शकले.

'बहुजन हिताय बहुजन सुखाय' ब्रीद असणाऱ्या पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सेवेत मी गेली १६ वर्षे अध्यापन कार्य करीत आहे. या निमित्ताने संस्थेच्या मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौड रोड, पुणे, वाघिरे महाविद्यालय, सासवड, प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी, बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी, पुणे येथील प्राचार्य, सहकारी प्राध्यापक, प्रशासकीय सेवकवर्ग व ग्रंथपाल यांच्या सहकार्यामुळेच मी हे संशोधनकार्य करू शकले. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. अजितदादा पवार, पुणे जिल्हा शिक्षण मंडळातील सर्व पदाधिकारी यांचेदेखील वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. त्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करणे, हे मी माझे कर्तव्य समजते.

माझे मार्गदर्शक डॉ. भास्कर शेळके (प्राचार्य, अगस्ती कला, वाणिज्य आणि दादासाहेब रूपवते, विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि. अहमदनगर), माझे सहकारी डॉ. शोभा तितर, डॉ. अपर्णा साबणे, डॉ. वसंत गावडे, डॉ. महादेव बागूल, डॉ. गणेश चौधरी, प्रा. अमृता इनामदार, प्रा. विद्या पाठारे, प्रा. डॉ. नंदा राशीनकर, प्रा. डॉ. माया माईनकर, प्रा. सावित्री जाधव, प्रा. जितेंद्र वडशिंगकर, प्रा. डॉ. संगीता घोडके, प्रा. डॉ. अर्जुन डोके, प्रा. डॉ. योगेश खोल्लम, प्रा. कल्याणी शितोळे, सौ. मीनाक्षी मिसाळ, प्रा. लक्ष्मण उकिर्डे, ग्रंथपाल विठ्ठल नाईकवडी, 'साधना' साप्ताहिक कार्यालयातील डॉ. विनोद शिरसाठ, श्री. सुदाम सानप व त्यांचे सर्व सहकारी, जयकर ग्रंथालयातील ग्रंथपाल व त्यांचे सहकारी, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ग्रंथपाल व त्यांचे सहकारी, पुणे मराठी ग्रंथालयाचे, ग्रंथपाल व त्यांचे सहकारी, मएसोच्या आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ. वंदना शेलार व त्यांचे सर्व सहकारी यांचेही मी ऋण व्यक्त करते.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पीएच.डी. संशोधनकार्य पूर्णत्वास नेण्यासाठी मला सातत्याने प्रोत्साहन देणारे माझे मार्गदर्शक डॉ. बाबासाहेब शेंडगे यांनीही मला वेळोवेळी मार्गदर्शन केले. यातून अभ्यासाची दिशा मिळाली. मी माझे संशोधनाचे कार्य पूर्ण करू शकले. त्यांच्या ऋणात राहणेच मी पसंत करीन.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे येथील संस्कृत विभागप्रमुख डॉ. अंबरिश खरे व माजी अधिष्ठाता डॉ. श्रीपाद भट यांचे वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन लाभले. सहामाही प्रगती अहवाल, प्रबंधाची रूपरेषा समजण्यास त्यामुळे मदत झाली. विद्यार्थ्यांनी वेळेत संशोधन पूर्ण करावे, ही त्यांची मनोमन इच्छा! त्यांच्या प्रोत्साहनामुळेच मी माझे संशोधन पूर्ण करू शकले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे पीएच.डी. विभागातील सर्व सहकारी, ग्रंथपाल यांचेही आभार मानते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, प्राचार्य डॉ. बाळकृष्ण झावरे, प्राचार्य डॉ. मनोहर चासकर, माजी प्राचार्य डॉ. लतेश निकम, प्राचार्य डॉ. तानाजी साळवे, माजी प्राचार्य डॉ. रघुनाथ मिसाळ, माजी प्राचार्य डॉ. शिवराज कुकाले यांचेही वेळोवेळी मोलाचे सहकार्य लाभले. या सर्वांचेही आभार मानते.

संशोधनाचे मुद्रण आणि त्याचे वाचन करणे ही मोठी जबाबदारी असते. श्री. संभाजी जाधव यांनी वेळेत मुद्रणाची आणि मुद्रितशोधक श्री. अभिजित सोनवणे यांनी मुद्रितशोधनाची जबाबदारी वेळेत पार पाडली. यांचेही मी आभार मानते.

ज्यांचा नजरचुकीने येथे नामोल्लेख करावयाचा राहून गेला अशा, अशा सर्व ज्ञात–अज्ञातांचे ऋण मी व्यक्त करते.

**सुवर्णा खोडदे**
संशोधक

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| संशोधकाचे प्रतिज्ञापत्र | | i |
| मार्गदर्शकांचे प्रमाणपत्र | | ii |
| ऋणनिर्देश | | iii-vii |
| **प्रकरण १ : प्रस्तावना** | | **०१–१८** |
| १.१ | प्रास्ताविक | ०१ |
| १.२ | संशोधन कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६० निवडीचे प्रयोजन | ०१ |
| १.३ | संशोधनाचे महत्त्व | ०३ |
| १.४ | संशोधनाची उद्दिष्टे | ०३ |
| १.५ | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | ०४ |
| १.६ | संशोधनाची गृहीतके | ०४ |
| १.७ | प्रकरणनिहाय मांडणी | ०५ |
| १.८ | वाङ्मयीन नियतकालिक : संकल्पना व स्वरूप | ०५ |
| १.९ | नियतकालिक संज्ञा | ०६ |
| १.१० | वाङ्मयीन नियतकालिकांची उद्दिष्टे | ०७ |
| १.११ | वाङ्मयीन नियतकालिकांचे महत्त्व | ०८ |
| १.१२ | वाङ्मयीन नियतकालिकांचे कार्य | ०८ |
| १.१३ | 'दर्पण ते साधना' एक आढावा | ०९ |
| | संदर्भ टीपा | १८ |
| **प्रकरण २ : पूर्वसंशोधनाचा आढावा** | | **१९–२१** |
| २.१ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | १९ |

| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २.२ | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई | २१ |
| २.३ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २१ |
| **प्रकरण ३ : संशोधन पद्धती** | | **२२–२६** |
| ३.१ | ग्रंथालयीन संशोधन पद्धती | २३ |
| ३.२ | ऐतिहासिक संशोधन पद्धती | २४ |
| ३.३ | विश्लेषणात्मक संशोधन पद्धती | २४ |
| | संदर्भ टीपा | २६ |
| **प्रकरण ४ : माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन** | | **२७–३६५** |
| **अ)** | **साधना साप्ताहिकातील संपादक आणि संपादन** | **२७–६७** |
| ४.१ | प्रास्ताविक | २७ |
| ४.२ | ‘साधना’ साप्ताहिकाचा उदय आणि वाटचाल | २८ |
| ४.३ | संपादकीय/अग्रलेख संकल्पना व स्वरूप | ३२ |
| ४.४ | ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळातील संपादक आणि संपादकीय | ३३ |
| ४.५ | ‘साधना’ साप्ताहिकातील संपादकीय/अग्रलेख | ३८ |
| ४.६ | ‘साधना’ साप्ताहिकातील अग्रलेखाची भाषा | ५६ |
| ४.७ | ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडातील संपादकांची भूमिका | ५७ |
| ४.८ | ‘साधना’ साप्ताहिकाची यशस्वी वाटचाल | ६२ |
| ४.९ | ‘साधना’ साप्ताहिकाचे स्वरूप | ६४ |
| | संदर्भ टीपा | ६६ |
| **ब)** | **‘साधना’ साप्ताहिकाचे स्वरूप आणि अंतरंग** | **६८–८६** |
| ४.१० | प्रास्ताविक | ६८ |

| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४.११ | ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडातील 'साधना'चे संपादक | ६८ |
| ४.१२ | ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडातील 'साधना'चे स्वरूप | ७० |
| ४.१३ | 'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झालेले लेखन | ७१ |
| ४.१३.१ | वैचारिक लेखन | ७१ |
| ४.१३.२ | कविता | ७२ |
| ४.१३.३ | कथालेखन | ७२ |
| ४.१३.४ | ललित निबंध/ललित लेख | ७५ |
| ४.१३.५ | साहित्य समीक्षा/स्वरूप | ७६ |
| ४.१३.६ | रसग्रहण/पुस्तक परीक्षण/ पुस्तक परिचय/समीक्षा | ७८ |
| ४.१३.७ | चरित्र/व्यक्तिचित्र लेखन | ८० |
| ४.१३.८ | प्रवासवर्णन | ८२ |
| ४.१३.९ | पत्रलेखन | ८३ |
| ४.१३.१० | विश्वभारती–आंतरभारती | ८३ |
| ४.१४ | 'साधना' साप्ताहिकाचा आकार व पृष्ठसंख्या, मूल्य व प्रकाशन स्थळ | ८४ |
| | संदर्भ टीपा | ८६ |
| **क)** | **'साधना' साप्ताहिकातील वैचारिक लेखन** | **८७–१३६** |
| ४.१५ | प्रास्ताविक | ८७ |
| ४.१६ | वैचारिक साहित्य संकल्पना स्वरूप | ८९ |
| ४.१७ | वैचारिक साहित्य – प्रेरणा | ९३ |
| ४.१८ | वैचारिक साहित्य परंपरा | ९५ |
| ४.१९ | वैचारिक साहित्याचे वेगळेपण | ९७ |

| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४.२० | ‘साधना’ साप्ताहिकातील वैचारिक साहित्य | ९९ |
| ४.२०.१ | ‘साधना’ साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले शैक्षणिक लेख | १०० |
| ४.२०.२ | ‘साधना’ साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले स्त्रीविषयक लेख | १०८ |
| ४.२०.३ | ‘साधना’ साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले सामाजिक लेख | ११९ |
| ४.२०.४ | ‘साधना’ साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले धार्मिक लेख | १२७ |
| | संदर्भ टीपा | १३४ |
| **ड)** | **‘साधना’ साप्ताहिकातील ललितलेखन** | **१३७–१९८** |
| ४.२१ | प्रास्ताविक | १३७ |
| ४.२२ | ललित गद्य : संकल्पना | १३८ |
| ४.२३ | ललित गद्य : स्वरूप वैशिष्ट्ये | १४० |
| ४.२४ | ललित गद्य : लेखन परंपरा | १४० |
| ४.२५ | ‘साधना’ साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले ललित निबंध | १४० |
| ४.२६ | ‘साधना’ साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले चरित्र | १६० |
| ४.२७ | ‘साधना’ साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले प्रवासवर्णन | १८४ |
| | संदर्भ टीपा | १९५ |
| **इ)** | **‘साधना’ साप्ताहिकातील इतर वाङ्मय प्रकारांचा अभ्यास** | **१९९–३५३** |
| ४.२८ | प्रास्ताविक | १९९ |
| ४.२९ | कविता | २०१ |
| ४.३० | कथा | २२१ |
| ४.३१ | कादंबरी | २९० |
| ४.३२ | नाटक | २९३ |

| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४.३३ | ‘साधना’ साप्ताहिकातून प्रकाशित झालेले पत्रलेखन | २९६ |
| ४.३४ | आंतरभारती – प्रांतभारती | ३१० |
| ४.३४.१ | आंतरभारतीची आजची स्थिती | ३१३ |
| ४.३४.२ | आंतरभारती या सदराखाली प्रकाशित झालेले साहित्य | ३१४ |
| ४.३५ | ‘साधना’ साप्ताहिकातून प्रकाशित झालेले समीक्षण/परीक्षण | ३२२ |
| ४.३६ | ‘साधना’तून प्रकाशित झालेली इतर पुस्तकांची समीक्षा/परिचय | ३४० |
| ४.३७ | साधना : साप्ताहिकातील इतर लेखन | ३४४ |
| ४.३८ | चित्रपट समीक्षा | ३४६ |
| | संदर्भ टीपा | ३४८ |
| **ई)** | **‘साधना’ : दिवाळी अंक व विशेषांक** | **३५४–३६५** |
| ४.३९ | ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळामध्ये प्रकाशित झालेले विशेषांक | ३५६ |
| ४.४० | ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळामध्ये साधना साप्ताहिकात प्रकाशित झालेले विशेषांक | ३५६ |
| ४.४१ | ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालावधीत प्रकाशित झालेले दिवाळी अंक | ३६० |
| ४.४२ | ‘साधना’ दिवाळी अंकाचे महत्त्व व वेगळेपण | ३६३ |
| | संदर्भ टीपा | ३६५ |
| **प्रकरण ५ : उपसंहार** | | **३६६–३७९** |
| **संदर्भ सूची** | | **३८०–३८४** |
| **परिशिष्टे** | | **३८५–३९८** |
| **निष्कर्ष आणि शिफारशी** | | **३९९–४०५** |

# प्रकरण १

# प्रस्तावना

## १.१ प्रास्ताविक :

''साधना साप्ताहिक : वाङ्मयीन अभ्यास (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०)'' असा संशोधनाचा विषय असून, समाजाच्या जडणघडणीत वाङ्मयीन नियतकालिकांचा मोठा वाटा आहे. तसे पाहता प्रसारमाध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले जाते. कारण प्रसारमाध्यमांनी सुरुवातीपासून ते आजतागायत मानवाच्या उन्नतीत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. आदिमानवापासून ते आजच्या प्रगतिशील मानवाच्या यशस्वी वाटचालीचा इतिहास माध्यमांनी जतन केला. पुढच्या पिढ्यांच्या दर्जेदार जगण्यासाठी हा ठेवा सातत्याने हस्तांतरण करत असताना मानवाची वैचारिकता, त्याची भावनिकता, त्याची सांस्कृतिकता आणि अभिव्यक्तीचे एक सकस आणि सक्षम माध्यम म्हणून आपण प्रसारमाध्यमांकडे पाहत असतो. या प्रसारमाध्यमातील नियतकालिक हे महत्त्वाचे माध्यम मानले जाते. तसे पाहता इंग्रजांच्या आगमनानंतर इंग्रजी नियतकालिकांच्या आधारावर मराठी नियतकालिकांचा उदय झाला आणि स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून ते आजतागायत ही नियतकालिके वाचकांच्या अभिरुचीचे महत्त्वाचे माध्यम बनले आहे. या नियतकालिकांनी समाजजीवनात सांस्कृतिक बैठक निर्माण केलेली दिसते. वाचकांचा सांस्कृतिक दृष्टिकोन विकसित करण्यापासून ते सुसंस्कृत माणूस घडविण्याच्या प्रक्रियेत नियतकालिके महत्त्वाची मानली जातात. याच भूमिकेतून प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

## १.२ संशोधन कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६० निवडीचे प्रयोजन :

''साधना साप्ताहिक : वाङ्मयीन अभ्यास (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०)'' हा प्रस्तुत संशोधनाचा विषय असून, सानेगुरुजींनी 'साधना' साप्ताहिकाची सुरुवातच १५ ऑगस्ट १९४८ला केली असून आजतागायत 'साधना' साप्ताहिकाचा प्रवास अखंडपणे चालू आहे. 'साधना' साप्ताहिक हे मराठी भाषेतील प्रदीर्घकाळ चालत असलेले महत्त्वाचे साप्ताहिक म्हणूनही या साप्ताहिकाकडे पाहिले जाते. स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा आढावा घेताना 'साधना'च्या कार्याला नाकारता येणार नाही. 'साधना'चा वाचकही समाजातला जाणकार आहे.

किंबहुना बुद्धिजीवी आहे. 'साधना'ने गेल्या अनेक वर्षांपासून वाचकांच्या मनाची मशागत तर केलीच त्याचबरोबर तत्कालीन परिस्थितीच्या प्रश्नांवरही सडेतोडपणे मत मांडले. लेखक, वाचकांच्या पिढ्या 'साधना'ने तयार केल्या. मराठी साहित्याचा वाचक, लेखक, समीक्षक तयार करण्यात 'साधना'ने मोलाची कामगिरी केली. 'साधना' साप्ताहिकामधून सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा सर्वच विषयांबरोबर त्या काळातील महत्त्वाचे प्रश्न, समस्या, अनेक घटना, घडामोडींचा परामर्श घेतला आहे. म्हणून 'साधना'तील प्रत्येक विषय हा संशोधनाचा विषय होईल इतका महत्त्वाचा आहे.

संशोधिकेला विषय निवडत असताना 'साधना'च्या वाङ्मयीन कार्याचा अभ्यास अधिक महत्त्वाचा वाटला. 'साधना' हे समाजवादी विचारांचे मुखपत्र म्हटलं जातं. पण 'साधना'ने मराठी साहित्यासंबंधी अत्यंत मोलाची कामगिरी बजावलेली आहे आणि हा प्रवास आजतागायत सुरू आहे. 'साधना'ने दर्जेदार साहित्य प्रकाशित करत वाचकवर्ग तयार केला. नव्याने लिहू पाहणाऱ्या लेखकांना आत्मविश्वास दिला. मराठी वाङ्मयात नंतरच्या काळात महत्त्वाचे लेखक, कवी, नाटककार, कादंबरीकार म्हणून उदयाला आलेले सुरुवातीला 'साधना' साप्ताहिकामध्ये लिहीत होते. उदा. दुर्गाबाई भागवत, इंदिरा संत, प्रेमा कंटक, मालतीबाई बेडेकर, आनंदीबाई शिर्के, प्रा. शांता शेळके, वसंत बापट, माणिक गोडघाटे (कवी ग्रेस), तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मधू लिमये, सोपानदेव चौधरी, कुसुमावती देशपांडे, वसंत कुंभोजकर, वामन चोरघडे, रा. चिं. ढेरे, राजा मंगळवेढेकर इत्यादी लेखकांचा यात समावेश करता येईल.

'साधना' साप्ताहिकाने सातत्याने महत्त्वाच्या चळवळी, घटना घडामोडींवर प्रकाश टाकून समाजपरिवर्तन केले. अनेक चळवळींना वैचारिक खाद्य पुरवलं. अनेक आंदोलनात सहभाग नोंदवला. या सर्वच घटना घडामोडीचे संघर्ष 'साधना' साप्ताहिकामध्ये येतात. महाराष्ट्राच्या एकूणच वाटचालीत संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भाषावार प्रांतरचना होऊन दिनांक १ मे १९६०ला स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. 'साधना'च्या वाटचालीत हा महत्त्वाचा टप्पा आहे. असे संशोधिकेला वाटत असून संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी म्हणूनच 'साधना'च्या सुरुवातीपासून ऑगस्ट १९४८ ते मे १९६० हा कालखंड प्रस्तुत संशोधनासाठी निवडला असून संशोधनाच्या निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी 'निवडक' 'साधना' साप्ताहिकाचा अभ्यास केला आहे.

'साधना' साप्ताहिकात भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून घडलेल्या विविध घटना घडामोडींचे प्रतिबिंब उमटले आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम, भूदान चळवळ, 'साधना'च्या सुरुवातीच्या काळापासूनच भाषावार प्रांतरचना व संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर 'साधना' साप्ताहिकातून विचार प्रकट केले.

## १.३ संशोधनाचे महत्त्व :

दिनांक १५ ऑगस्ट १९४८ ला पांडुरंग सदाशिव साने यांनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. दिनांक १५ ऑगस्ट १९४८ ते १० जून १९५० या कालखंडात ते स्वत: संपादक होते. सानेगुरुजींच्या मृत्यूनंतर 'साधना'ची जबाबदारी शं. द. जावडेकर व पु. ह. पटवर्धन यांच्यावर सोपवली गेली. त्यांची १० जून १९५० ते १९५५ पर्यंत आचार्य जावडेकर व त्यांच्या मृत्यूनंतर १९५६ पर्यंत पु. ह. पटवर्धन संपादक होते. परंतु आपापसांतील काही हेवेदावे यामुळे संपादनाची जबाबदारी १९५६ ते १९८२ पर्यंत यदुनाथ थत्ते यांच्यावर आली. त्यांच्यानंतर ग. प्र. प्रधान १९९८ पर्यंत काम पाहत होते. सन २०१३ पर्यंत डॉ. नरेंद्र दाभोलकर संपादक होते. आता डॉ. विनोद शिरसाठ संपादक आहेत.

'साधना'ला समाजवादी चळवळीचे मुखपत्र म्हणतात. सन २०२० मध्ये या साप्ताहिकाला ७२ वर्षे पूर्ण झाली. ''साधना'' हे मराठी भाषेतील प्रदीर्घ काळ चाललेले साप्ताहिक आहे. 'साधना'चे तीन हजारांपेक्षा जास्त अंक प्रकाशित झाले आहेत. शिवाय दिवाळी अंकही प्रसिद्ध झाले आहेत. या सर्वांमधून सातत्याने मनोरंजनाबरोबर प्रबोधन करून, शिक्षणाचा प्रसार व महत्त्व पटवून दिले. राजकीय, सामाजिक, धार्मिक सुधारणांच्या बाबतीत जनजागृती करणे, विविध साहित्य प्रकारांचे प्रकाशन करणे, नवोदित आणि दर्जेदार साहित्य वाचकांपर्यंत पोहोचवणे, वाचकांची अभिरुची वृद्धिंगत करण्यासाठी विविध वाङ्मय प्रकारांचे परीक्षण, प्रकाशित करणे आदींचा सखोल अभ्यास आणि संशोधनाची आवश्यकता असल्यामुळे प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व स्पष्ट होते.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. 'साधना' साप्ताहिक हे मराठी भाषेतील दीर्घकाळ चालणारे महत्त्वाचे साप्ताहिक आहे. म्हणूनच या साप्ताहिकाचा वाङ्मयीन अभ्यास करणे.

२. वाङ्मयीन अभिरुची वृद्धिंगत करण्याच्या संदर्भात 'साधना' साप्ताहिकाने केलेल्या कामगिरीचा आढावा घेणे.

३. 'साधना' साप्ताहिकामध्ये प्रसिद्ध झालेल्या वैचारिक, प्रबोधनात्मक साहित्याचा शोध घेणे.

४. ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालावधीत 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेल्या विविध वाङ्मय प्रकारांचा अभ्यास करणे.

५. 'साधना' साप्ताहिकाचे मराठी वाङ्मयातील योगदान आणि महत्त्व अधोरेखित करणे.

## १.५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

''साधना साप्ताहिक : वाङ्मयीन अभ्यास (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०)'' ही या संशोधनाची कालमर्यादा आहे. या कालावधीत प्रकाशित झालेल्या वाङ्मय प्रकारांची स्वतंत्र मांडणी करणे, ही या संशोधनाची मर्यादा आहे. प्रस्तुत कालखंडात 'साधना' या नियतकालिकाचा वाङ्मयीन अभ्यास ही व्याप्ती आहे. प्रस्तुत कालखंडात प्रसिद्ध झालेल्या विविध आशय-विषयांच्या लेखाचा, लेखकांचा, मान्यवर व अतिथी संपादकांच्या लेखनाचा अभ्यास, मूल्यमापन करणे ही मर्यादा आहे. संशोधनाच्या निष्कर्षाप्रत तटस्थपणे पोहोचण्यासाठी संशोधन कालखंडातील निवडक साप्ताहिकांचाच अभ्यास केला आहे.

## १.६ संशोधनाची गृहीतके :

संशोधन हे त्या त्या गृहीत बाबींवर आधारित असते. कोणत्याही विषयाची काही गृहीत पार्श्वभूमी असते. प्रस्तुत संशोधन विषयाची गृहीतके पुढीलप्रमाणे आहेत.

१. 'साधना' साप्ताहिकाने मराठी वाङ्मयाच्या वाङ्मयीन कार्यात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

२. 'साधना' साप्ताहिकाचे वैचारिक वाङ्मयनिर्मितीत महत्त्वाचे योगदान आहे.

३. 'साधना' साप्ताहिकाने मराठी लेखकांची सक्षम परंपरा निर्माण केली आहे.

४. 'साधना' साप्ताहिकाच्या अभ्यासामुळे सामाजिक ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या आहेत.

## १.७ प्रकरणनिहाय मांडणी :

प्रस्तुत अभ्यासविषयाची मांडणी पुढीलप्रमाणे असणार आहे.

१) प्रकरण १ : प्रस्तावना हे आहे. या प्रकरणातून संशोधन आणि नियतकालिकांच्या संदर्भातील सैद्धांतिक बाबींची मांडणी केली जाणार आहे.

२) प्रकरण २ : पूर्वसंशोधनाचा आढावा हे आहे. यामध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आणि इतर विद्यापीठांमध्ये 'साधना' साप्ताहिकावर झालेल्या संशोधनाचा आढावा घेतला जाणार आहे.

३) प्रकरण ३ : संशोधन पद्धती असून, या प्रकरणामध्ये संशोधन पद्धतीविषयी मांडणी आहे. या प्रकरणात साहित्याच्या संशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध संशोधन पद्धतींचा आढावा घेतला जाणार आहे.

४) प्रकरण ४ : माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन हे आहे. प्रस्तुत प्रकरणाची विभागणी सहा उपघटकांच्या आधारे करण्यात आली आहे. यामध्ये

अ) 'साधना' साप्ताहिकातील संपादक आणि संपादन

ब) 'साधना' साप्ताहिकाचे स्वरूप व अंतरंग

क) 'साधना' साप्ताहिकातील वैचारिक लेखन

ड) 'साधना' साप्ताहिकातील ललित लेखन

इ) 'साधना' साप्ताहिकातील इतर वाङ्मय प्रकारांचा अभ्यास

ई) 'साधना' दिवाळी अंक व विशेषांक

आदी उपघटकांच्या सहाय्याने विचार केला जाणार आहे.

५) प्रकरण ५ : हे उपसंहाराचे असून, यामध्ये प्रकरणनिहाय धावता आढावा घेऊन निरीक्षणे व निष्कर्ष यांची मांडणी केलेली आहे.

६) परिशिष्ट

## १.८ वाङ्मयीन नियतकालिक संकल्पना व स्वरूप :

इंग्रज भारतात आले. त्यांनी मुद्रण सुरू केले आणि मुद्रणातून अनेक बाबी उदयाला आल्या. छपाई तंत्रज्ञानाच्या निर्मितीमुळे मुद्रणाचा उदय झाला आणि इंग्रजी साहित्याच्या धर्तीवर साहित्य प्रकार मराठीमध्ये उदयाला आले. साहजिकच प्राचीन व मध्ययुगीन काळातील बंदिस्त

असलेले बहुजनांचे लेखन या काळात मुक्त झाले. शिक्षणाच्या प्रसारातून व्यवस्थेला प्रश्न विचारणारी पिढी उदयाला आली. इंग्रजीच्या प्रभावातून मराठी नियतकालिकांचा उदय झाला.

## १.९ नियतकालिक संज्ञा :

'नियतकालिक' ही संज्ञा अधिक स्पष्ट होण्यासाठी 'विश्वकोश खंड ८'मधील विवेचन उपयोगी पडते. ''जे प्रकाशन एकाच शीर्षकाच्या किमान एका आठवड्याच्या किंवा त्याहून अधिक कालावधीने सामान्यत: नियमितपणे प्रसिद्ध होते. ज्या अनेक लेखकांचे विविध विषयांचे लेख किंवा प्रकाशन विशिष्ट विषयाला वाहिलेले असल्यास त्या एकाच विषयावरचे साहित्य संकलित केलेले असते.''[१] ते नियतकालिक ही नियतकालिकाची व्याख्या आहे. उपरोक्त संदर्भावरून 'नियतकालिक' या संकल्पनेवर अधिक प्रकाश पडतो. या संदर्भात डॉ. अ. ना. कुलकर्णी 'मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास' या ग्रंथात म्हणतात. ''नियतकालिक म्हणजे ठरावीक अंतराने उपलब्ध केले जाणारे वाङ्मय. त्यात तत्कालीन महत्त्वाचे तपशील असतात व काही चिरस्थायी महत्त्वाचे विषयही आलेले असतात. लौकिक घटना आणि त्यावरील भाष्य, काही स्फुट, जीवनविचार, व्यवहारोपयोगी शास्त्रे आणि विद्या यांची माहिती इत्यादींनी या नियतकालिकातील जागा व्यापलेली असते. असाही मजकूर त्या संख्येने ठरावीक वेळी आपल्या वाचकांना सादर करता येतो हे नियतकालिकाचे मुख्य काम असते.''[२] उपरोक्त संदर्भावरून 'नियतकालिक' ही संकल्पना अधिक स्पष्ट होते. साहित्य आणि नियतकालिक ह्या दोन्हीही बाबी सकृद्दर्शनी जरी वेगळ्या वाटल्या, तरी त्या परस्परपूरक आहेत. या दोन्हीही गोष्टी इंग्रजांच्या आगमनानंतर उदयाला आल्या आहेत. वाङ्मय आणि नियतकालिकांनी समाजाच्या जडणघडणीत मोलाची भर घातलेली दिसून येते. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात साहित्य आणि नियतकालिके महत्त्वाची भूमिका बजावतात. लोकशाहीचा चौथा खांब असे वृत्तपत्राला म्हणतात. नियतकालिकही त्याचा एक भाग आहे. या संदर्भात डॉ. हरिश्चंद्र निर्मळे म्हणतात, ''नियतकालिकांनी वाङ्मयीन आकलन आणि अभिरुची वृद्धिंगत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. वाङ्मयीनदृष्ट्या एकाच वेळी विविध प्रकारचे कार्य नियतकालिक करते.''[३] लेखकाला व्यासपीठ निर्माण करून देण्याचे काम नियतकालिक करत असते. मराठी साहित्याच्या जडणघडणीत नियतकालिकांची भूमिका महत्त्वाची आहे. कथा, कविता, नाटक, चरित्र–आत्मचरित्र, निबंध असे विविध साहित्यप्रकार प्रसिद्ध करून रंजनाबरोबरच प्रबोधनाच्या

क्षेत्रातही नियतकालिकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सामाजिक चळवळींचा पाया भक्कम करण्याचे महत्त्वाचे कार्य नियतकालिकांनी केलेले दिसून येते. साठोत्तरी काळात विविध वाङ्मय प्रवाहांना आणि चळवळींना बळ देण्याचे काम नियतकालिकांनी केलेले आहे. मराठी नियतकालिकांच्या कार्यासंदर्भात डॉ. नंदा आपटे म्हणतात, ''सर्वच नियतकालिकांचा उद्देश एकंदरीत प्रबोधन, उद्बोधन आणि बोधवाद हाच होता आणि साहित्यापेक्षाही जीवनाच्या इतर क्षेत्रांना त्यांनी अधिक महत्त्व दिलेले दिसते. जीवनाच्या अनेक अंगांपैकी एक अंग इतकेच महत्त्व या नियतकालिकांमधील साहित्यविचाराला दिसते. तरीही एकूण बहुसंख्य नियतकालिकांनी साहित्यसमीक्षेला आपल्या नियतकालिकांमध्ये जागा राखून ठेवली होती, हे लक्षणीय आहे. त्यातून साहित्यसमीक्षेला ठोस, भरघोस असे रूप प्रारंभीच्या काळात आलेले नसले, तरी ही हळूहळू समीक्षेची पायवाट तयार होत गेली. हे महत्त्वाचे आहे.''[४] एकूणच नियतकालिकांनी साहित्य संवर्धनातील अनेक जबाबदाऱ्या नेटाने पार पाडल्याने एकूणच साहित्याच्या जडणघडणीत आणि अभिरुचीसंदर्भात नियतकालिकांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. सुरुवातीच्या काळात अनुकरणातून आणि इंग्रजी भाषेच्या, साहित्याच्या धर्तीवर प्रकाशित होणारी नियतकालिके नंतरच्या काळात मात्र स्वतंत्र चेहरा आणि वाटचाल निर्मितीत यशस्वी झालेली दिसतात. समाजजागृती व साहित्यसंवर्धनाची जबाबदारी नियतकालिके अविरतपणे पेलताना दिसतात. वाचकांच्या दृष्टीने नियतकालिकाला महत्त्व प्राप्त झालेले दिसते. एकेका वाङ्मय प्रकारावर सुरुवातीच्या काळात नियतकालिके प्रकाशित होऊ लागली. उदा. 'कवितारती' या नियतकालिकामधून वाचकांच्या अभिरुची वृद्धीत महत्त्वाची भर पडत गेली. लेखकांना, कवींना नकळत प्रोत्साहन मिळत गेले आणि लिहिणाऱ्यांच्या, विचारवंतांच्या पिढ्या निर्माण होऊ लागल्या. महाराष्ट्रात समाजसुधारकांची, विचारवंतांची, लेखकांची, कवींची सशक्त परंपरा निर्मितीत नियतकालिकांचे महत्त्वाचे योगदान आहे.

## १.१० वाङ्मयीन नियतकालिकांची उद्दिष्टे :

इंग्रजीच्या धर्तीवर मराठी भाषांमध्ये नियतकालिकांचा उदय झाला. मुद्रणकलेचे अपत्य म्हणून आपण नियतकालिकांकडे पाहतो. सुरुवातीला अनुकरणातून उदयाला आलेल्या नियतकालिकांची उद्दिष्टे नंतरच्या काळात स्पष्ट होऊ लागली.

१. सामाजिक जाणीव जागृतीबरोबरच मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने अभिरुची वृद्धिंगत करणे.

२. दर्जेदार मराठी साहित्याला प्रकाशित करणे.

३. नवोदित लेखकांचे साहित्य प्रकाशित करणे. लेखक–कवींचा आत्मविश्वास वाढविणे. विचार, चिंतन, मनन करणारी पिढी तयार करणे.

४. वाङ्मयीन आकलनाच्या आणि अभिरुचीच्या संदर्भाने अभ्यासकांमध्ये चर्चा घडवून आणणे.

## १.११ वाङ्मयीन नियतकालिकांचे महत्त्व :

वाङ्मयीन नियतकालिकांनी मराठी साहित्य क्षेत्रातील वाङ्मय निर्मितीसाठीची सांस्कृतिक पार्श्वभूमी तयार केली. यामुळे लेखकांच्या, कवींच्या, समीक्षकांच्या पिढ्या मराठी साहित्य प्रांतात निर्माण होऊ शकल्या. सुरुवातीच्या काळात शिक्षणापासून मैलोन् मैल दूर असलेला माणूस लिहिण्या–वाचण्याच्या प्रांतात येऊन आपले विचार लेखनाचे धाडस करू शकला, हे नियतकालिकांचे महत्त्व मान्यच करावे लागेल.

## १.१२ वाङ्मयीन नियतकालिकांचे कार्य :

- वाङ्मयीन नियतकालिकांचे कार्य चौफेर असलेले दिसते.
- दर्जेदार मराठी साहित्याचे प्रकाशन करणे.
- मनोरंजनातून समाजप्रबोधन आणि नैतिकमूल्यांची रुजवणूक करणे.
- सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.
- मातृभाषेतून लेखनास प्रोत्साहन देणे आणि मातृभाषेची अस्मिता रुजवणे.
- विविध वाङ्मय प्रकारांचे प्रकाशन करणे. त्या त्या वाङ्मय प्रकारांची वैशिष्ट्ये आणि वेगळेपण वाचकांसमोर ठेवणे.
- वाचकांची, लेखकांची, विचारवंतांची पिढी तयार करणे. नवोदितांना प्रोत्साहन आणि प्रेरणा देणे आदी. यातून वाङ्मयीन नियतकालिकांचे कार्य स्पष्ट होते. या कार्यातूनच वाङ्मयीन अभिरुची निर्माण होण्यास मोलाची मदत झालेली दिसते.

## १.१३ 'दर्पण ते साधना' एक आढावा :

आधुनिक काळात वृत्तपत्र, नियतकालिके यांचे महत्त्व अधिक वाढलेले आहे. मुद्रणकलेचे उगमस्थान आशिया खंडातील चीन राष्ट्र असले तरीही मुद्रण कलेचा व वृत्तपत्र संस्थेची प्रगती युरोपियन राष्ट्रांमध्ये झाली. गटेनबर्ग येणे जर्मनीतील मेंझ या लहानशा गावात इ.स. १४४० मध्ये आपला छोटा छापखाना सुरू केला. पुढे इंग्लंड, अमेरिका फ्रान्स या राष्ट्रांमध्ये मुद्रणकलेचा विकास आणि विस्तार झाला. भारतात मुद्रणकलेचा उदय कोचीनमध्ये झाला. येथे पोर्तुगीज मिशनऱ्यांनी १५७७ मध्ये पहिला छापखाना सुरू केला. त्यानंतर १५७८ मध्ये तिनवेल्ली येथे दुसऱ्या छापखान्याची नोंद आहे, तर पोर्तुगिजांनी मुंबईतील साष्टी बेटाजवळ रोयोल यागावात जेजुईट सोसायटीमध्ये टॉमस स्टीफन यांनी इ.स. १६१६ मध्ये छापखाना सुरू केला. हिंदुस्थानातील मुद्रणकलेच्या इतिहासात सिरामपूर (बंगाल)चा उल्लेख आढळतो. डॉ. विल्यम कॅरे यांनी हिंदी भाषेच्या टाइप प्रथम काढला. देशी भाषांमधून अनेक ग्रंथ रचना व व्याकरणकोशांची निर्मितीला खऱ्या अर्थाने मुद्रणकलेमुळे शक्य झाली. म्हणून डॉक्टर विल्यम कॅरे यांचे मुद्रणकलेतील योगदान महत्त्वाचे आहे.

समाजपरिवर्तनामध्ये विविध नियतकालिके, साप्ताहिके, मासिके व निबंध वाङ्मय यांचे महत्त्वाचे योगदान आहे. जेम्स ऑगस्ट हिकी याने इ.स. १७८० मध्ये 'बेंगॉल गॅझेट' हे इंग्रजी मासिक सुरू केले. हे भारतातील पहिले वृत्तपत्र होय. 'समाचार दर्पण' हे बंगाली साप्ताहिक देशी भाषेतील पहिले वृत्तपत्र होते. महाराष्ट्राचा विचार करता बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३२ रोजी 'दर्पण' हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. दिग्दर्शन हे मराठी भाषेतील पहिले मासिक सुरू करण्याचा मानही त्यांच्याकडे जातो. यानंतरच्या काळात मराठी नियतकालिकांची लाटच निर्माण झाली. विविध ज्ञानविस्तार, ज्ञानोदय, समाजप्रबोधन पत्रिका, प्रतिभा, करमणूक, मनोरंजन, अभिरुची, सत्यकथा, प्रतिष्ठान, अनुष्टुभ इत्यादी नियतकालिके समाजप्रबोधनासाठी निघत होती. अशाच ध्येयाने भारावलेले ध्येयवादी पत्रकारितेचे महाराष्ट्रातील साप्ताहिक म्हणजे 'साधना' होय. विषमता आणि भेदभाव मिटवण्यासाठी सानेगुरुजींनी 'साधना' या साप्ताहिकाची सुरुवात केली. भूदान चळवळ, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, आंतरभारतीची संकल्पना ते विविध साहित्य प्रकारांना, नवोदित साहित्यिकांना 'साधना' साप्ताहिकाने व्यासपीठ मिळवून दिले. अशा या ध्येयवादी 'साधना' साप्ताहिकाचे मराठी साहित्यातील योगदान अभ्यासणे गरजेचे

वाटते. कारण 'साधना' साप्ताहिकाने दीर्घ काळ समाजप्रबोधनासाठी सामाजिक व वाङ्मयीन योगदान दिले आहे.

## स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी नियतकालिकांचे स्वरूप :

पेशवाईचा अस्त होऊन इंग्रजी राजवट भारतात प्रस्थापित झाली. शिक्षणाने भारतीयांचा पाश्चात्त्य संस्कृतीशी घनिष्ठ संबंध आला. इंग्रजी सत्ता व संस्कृतीच्या प्रभावाने सनातन समाजव्यवस्था व भारतीय परंपरागत कल्पनांना नव्या पाश्चात्त्य कल्पनांनी धक्का दिला. इंग्रजी विद्या शिकलेला नवा सुशिक्षित वर्ग संख्येने वाढू लागला, त्यांचा पाश्चात्त्य विश्वासी अधिक परिचय होऊ लागला. या अवस्थेतून तो बाहेर पडण्याचा प्रयत्न करू लागला व आपल्या समाजाच्या पुनरुज्जीवनाचा विचार करू लागला. या सुशिक्षित मध्यमवर्गीय पिढीने सामाजिक पुनरुत्थानासाठी आणि राजकीय हक्कांसाठी प्रारंभीच्या कालखंडात जे मार्ग व साधने शोधून काढली त्यातून आधुनिक महाराष्ट्रात वृत्तपत्रीय प्रबोधन व नियताकलिकाची चळवळ उदयाला आली.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील नियतकालिकांचे स्वरूप पाहता सुरुवातीच्या काळातील नियतकालिके ही वृत्तान्त अथवा बातमी देणारी नव्हती, त्याचे स्वरूप ज्ञानप्रसार, समाजप्रबोधन, उद्‌बोधन, लोकप्रबोधन, मनोरंजन, संशोधन, क्रीडाप्रेमी, लहान मुले, स्त्रिया, श्रमिक, वाङ्मयीन, समीक्षात्मक, वैचारिक ग्रंथप्रसार, प्रौढ नवसाक्षर इत्यादी हेतू नियतकालिकांमागे होता. स्वातंत्र्यपूर्व काळातील नियतकालिकांचे स्वरूप आजच्या एवढे समृद्ध नव्हते. भारतात इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीला श्रीरामपूर (बंगाल) येथे डॉ. विल्यम कॅरी यांनी इ.स. १८१८ मध्ये 'समाज दर्पण' नावाचे पहिले बंगाली साप्ताहिक आणि 'दिग्दर्शक' नावाचे बंगाली मासिक सुरू केले. महाराष्ट्रात त्यानंतर १४ वर्षांनी म्हणजेच इ.स. १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी पहिले मराठी वृत्तपत्र 'दर्पण' संपादित केले. सुरुवातीला ६ जानेवारी १८३२ ते एप्रिल १८३२ पर्यंत पाक्षिक असून एप्रिल १९३२ ते जून १९४० पर्यंत हे साप्ताहिक स्वरूपात प्रकाशित झाले. इ.स. १८४० ला 'दिग्दर्शन' नावाच्या पहिल्या मराठी मासिकाचे संपादन राघोबा जनार्धन वसईकर यांनी केले. या संदर्भात प्रा. गं. बा. सरदार म्हणतात– ''एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी ज्या काही थोर पुरुषांनी आपली शक्ती, सर्वस्व वेचले त्यात बाळशास्त्री जांभेकर हे अग्रणी होत. या काळातील

प्रत्येक सामाजिक, धार्मिक किंवा शैक्षणिक उपक्रमांशी त्यांचा थोडाबहुत संबंध आल्यावाचून राहिला नाही.''[५] भाऊ महाजन यांनी १८४० मध्ये मुंबई येथून 'प्रभाकर' हे साप्ताहिक सुरू केले. ''प्रभाकरमधून पाश्चात्त्य शिक्षणाचे नवविचार देऊन ज्ञानसंपन्न जागृत समाजनिर्मितीचा प्रयत्न केला. 'प्रभाकर'मधून लोकहितवादींनी आपली शतपत्रे प्रसिद्धी केली.''[६] याच समकालीन 'ज्ञानचंद्रोदय' हे पांडुरंग बापू जोशी पावस्कर यांनी सुरू केलेले मासिक प्राचीन कवींच्या काव्यसंपदेचा शोध घेण्याचे कार्य बजावत होते. इ.स. १८४४ मध्ये 'उपदेशचंद्रिका' हे मोरभट्ट दांडेकर यांनी मासिक सुरू केले. समाजप्रबोधनाच्या हेतूने 'ज्ञानप्रकाश' साप्ताहिक इ.स. १८४९ मध्ये कृष्णाजी रानडे यांनी पुणे येथे सुरू केले. इ.स. १८५० ते १८६९ या कालखंडात मराठी भाषा साहित्याच्या सेवेसाठी मराठीत 'ज्ञानप्रसारक' हे मासिक सुरू केले. समाज जागृतीसाठी इ.स. १८५३ मध्ये 'धूमकेतू' हे साप्ताहिक सुरू केले. 'ज्ञानदर्शन' या त्रैमासिकाचा पहिला अंक इ.स. १८५४ साली ज्ञान, विज्ञानप्रसाराचे उद्दिष्ट ठेवून भाऊ महाजन यांच्या संपादकत्वाखाली निघाला. 'निबंधमाला' हे मासिक विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी इ.स. १८५४ मध्ये पुणे येथून सुरू केले. स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म या तीन गुणांची माहिती या मासिकातून दिली. तत्कालीन शिक्षण शास्त्राची चर्चा करण्यासाठी इ.स. १८६१ मध्ये कृष्णाजी चिपळूणकरांनी 'शाला पत्रक' मासिक सुरू केले. ''इ.स. १८६२ मध्ये 'इंदुप्रकाश' हे वृत्तपत्र विष्णुशास्त्री पंडित यांनी सुरू केले. यातून विधवा विवाह, स्त्री–शिक्षण व सामाजिक सुधारणांच्या हेतूने हे वृत्तपत्र ६२ वर्षे चालविले.''[७] स्वातंत्र्यपूर्व कालखंडात विश्वनाथ नारायण मंडलिक यांचे वृत्तपत्रातील योगदान महत्त्वाचे आहे. ४ जानेवारी १८६४मध्ये 'नेटिव्ह ओपिनियन' हे वृत्तपत्र इंग्रजीत सुरू केले. १ जुलै १८६६ पासून ते इंग्रजी व मराठीत सुरू केले. यामधून राजकीय–सामाजिक नैतिक विचार समाजापुढे मांडण्याचे काम या वृत्तपत्राने केले. इ.स. १८६६ मध्ये 'अरुणोदय' हे वृत्तपत्र ठाणे येथून काशिनाथ विष्णू फडके यांनी काढले. या वृत्तपत्राने सर्वप्रथम बातमीदार अर्थात वार्ताहर नेमण्याची प्रथा सुरू केली. ब्रिटिश सरकारला विरोध करण्याचे कार्य या वृत्तपत्राने केले, तर ऐतिहासिक जागृतीच्या दृष्टीने 'विविध ज्ञानविस्तार' इ.स. १८६७ मध्ये सुरू करण्यात आले. १० ऑक्टोबर १८७१ पासून 'दंभहारक' मासिक प्रसिद्ध झाले. याच दरम्यान पुणे येथून 'ज्ञानसंग्रह' हे महत्त्वाचे मासिक निघत होते. इ.स. १८७४ पासून मराठी साहित्यात मोठी क्रांती झाली. विविध वाङ्मय प्रकार उदयास आले.

विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, आगरकर, नरसिंह केळकर इत्यादींनी आधुनिक मराठी वाङ्मयाचे महत्त्वाचे पहिले लेखन नियतकालिकांमधून केलेले आहे. 'निबंधमाला' या मासिकातून मोठ्या प्रमाणात ललित वाङ्मय व साहित्यविचार आणि ज्ञानभाषेचा प्रसार केला. 'निबंधमाला' या मासिकाने नवयुग निर्मितीला पोषक अशा अनेक घटना महाराष्ट्रात घडवून आणल्या. स्वाभिमानी राष्ट्रवादाचा पुरस्कार या मासिकाने केला. नियतकालिकातून प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मय इतिहासाबद्दल व. दि. कुलकर्णी म्हणतात– ''ऐतिहासिक कागदपत्रे आणि इतिहास यांचा जो स्वरूप संबंध आहे. तोच नियतकालिके व वाङ्मयाचा इतिहास यांचा आहे.''[८] हरिभाऊ आपटे यांचे 'करमणूक' हे साप्ताहिक इ.स. १८९०मध्ये सुरू झाले. त्यातून कादंबऱ्या, उद्‌बोधक चरित्र, लेख, बोधकथा, टीका, स्फुट इत्यादी छापू लागले. करमणुकीने मनोरंजनाबरोबर वाचकांच्या ज्ञानात भर टाकण्याचा आटोकाट प्रयत्न झाला.

नियतकालिकांच्या दृष्टीने २० व्या शतकाचा पूर्वार्ध महत्त्वाचा आहे. या काळात राष्ट्रीय चळवळींनी जोर धरला होता. वाङ्मय प्रसिद्धीला चालना मिळाली होती. या काळात जवळजवळ पाचशेपेक्षा अधिक मासिके निघत होती. १९२५ च्या दरम्यान 'रत्नाकर' मासिकाचे मराठी वाङ्मय क्षेत्रात बहुमोल योगदान आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील मराठी नियतकालिकांचा हेतू ग्रंथप्रसारासह वैचारिक चिंतनशीलता, ग्रामीण दलित साहित्याला व चळवळींना पाठबळ, राष्ट्रीय एकात्मता, समाजप्रबोधन, गुलामगिरीची जाणीव करून देण्यासाठी नियतकालिकांनी महत्त्वाची कामगिरी केली.

## 'साधना' समकालीन साप्ताहिके :

अनंत हरी गद्रे यांनी २९ मार्च १९२२ रोजी 'मौज' साप्ताहिक सुरू केले. नवीन वळणाचे, लोकांची करमणूक करणे, नाटक मंडळींचा वृत्तान्त देणे, विनोदी लेख, चित्रे, राजकीय व्यंगचित्रे इत्यादींविषय या नियतकालिकाने हाताळले. वि. पु. भागवत यांच्या कारकिर्दीत मौजचे स्वरूप अधिक प्रगल्भ झाले. 'मौज' हे केवळ रंजनावर भर देणारे साप्ताहिक ही प्रतिमा दूर करून एक दर्जेदार साप्ताहिक म्हणून 'मौज'ला प्रतिष्ठा प्राप्त झाली. छपाईच्या वाढत्या खर्चामुळे ३१ जुलै १९६० रोजी जवळ जवळ ४० वर्षे साहित्य सेवा करून हे साप्ताहिक बंद करण्यात आले. मौजने दिवाळी अंक सुरू केला हे मौजचे वेगळेपण होय.

'विविध वृत्त' हे रा. का. तटणीस यांनी २४ डिसेंबर १९२४ रोजी 'विविध वृत्त' चा नमुना अंक काढला. जानेवारी १९२५ पासून या साप्ताहिकाचे नियमित प्रकाशनाला सुरुवात झाली. या साप्ताहिकातून राजकारण व समाजकारणातील अनेक प्रश्न मांडले. राजकीयदृष्ट्या तटणीस हे प्रागतिक पक्षाचे होते. राजकीय स्वरूपाचे साप्ताहिक अशी ओळख या साप्ताहिकाची होती. इंदुप्रकाशच्या नंतर प्रागतिक पक्षाचे मुखपत्र म्हणून लोक विविध वृत्त या साप्ताहिकाकडे पाहत होते. हे साप्ताहिक १८ सप्टेंबर १९६० रोजी बंद करण्यात आले.

मोतीराम गजानन रांगणेकर यांनी ५ एप्रिल १९२८ रोजी 'तुतारी' साप्ताहिकाची सुरुवात केली. नव्या धर्तीवर निघालेले विलायतेतील टीट बिट्सप्रमाणे महाराष्ट्रीयन वाचकांचे मनोरंजन करणारे व अनेक प्रकारची निरनिराळी माहिती पुरवणारे सुंदर, मनोरंजक साप्ताहिक अशी या साप्ताहिकाने ओळख निर्माण केली. या साप्ताहिकात साहित्याबरोबर संगीत, क्रिकेट, नाटक, सिनेमा या विषयांवर लेखन प्रकाशित केले. हे साप्ताहिक सर्वसामान्य वाचकांना आकर्षित करणारे असल्यामुळे ते अल्पावधीतच लोकप्रिय झाले. १९३१ साली हे साप्ताहिक बंद करण्यात आले.

मोतीराम गजानन रांगणेकर यांनी ३१ जानेवारी १९३१ रोजी 'वसुंधरा' हे साप्ताहिक सुरू केले. हे साप्ताहिक प्रत्येक शनिवारी प्रसिद्ध होत होते. या साप्ताहिकातून शनिवार दुपारपर्यंतच्या बातम्या वाचनास मिळतील. त्याचबरोबर स्वभाव चित्रणे, शेलापागोटे, साप्ताहिक समालोचन, स्थळ, काळ व व्यक्ती या विषयांना प्राधान्य या साप्ताहिकात देण्यात आले. या साप्ताहिकात नाटक, चित्रपट, संगीत, क्रिकेट, ललित साहित्य, विनोद या वाचकांना आवडणाऱ्या विषयांवर निरनिराळ्या लोकांकडून लिहून साप्ताहिकात विविधता आणण्याचा प्रयत्न रांगणेकरांनी केला. आर्थिक दिवाळखोरीमुळे 'वसुंधरा' हे साप्ताहिक चालवणे रांगणेकर यांना अशक्य झाले. म्हणून मौजचे मालक पांडोबा भागवत यांच्याकडे हे साप्ताहिक चालवण्याची जबाबदारी देण्यात आली.

मोतीराम गजानन रांगणेकर यांचा चालक व संपादक म्हणून 'चित्रा' या साप्ताहिकाशी संबंध आला. हे साप्ताहिक अनंत काणेकर व मोतीराम गजानन रांगणेकर या दोघांच्या संपादकत्वाखाली निघाले. चित्रा साप्ताहिकाचे स्वरूप भारदस्त व राजकीय वळणाचे होते. अनंत काणेकर हे ललित लेखक होते; पण समाजवादाच्या प्रसारासाठी त्यांना वृत्तपत्र हवे होते.

यामुळे चित्रा साप्ताहिकात राजकारणाला महत्त्वाचे स्थान मिळाले. राजकीय बाजू काणेकरांनी सांभाळायची व चित्रपट, रंगभूमी व इतर मजकुराच्या अंतर्बाह्य संपादनाची बाजू रांगणेकरांनी पाहायची. अशी कामाची वाटणी करण्यात आली. चित्राचा पहिला अंक १५ सप्टेंबर १९३५ रोजी प्रकाशित झाला. चित्रा साप्ताहिकाचे धोरण जहाल समाजवादी होते. या साप्ताहिकात प्रभाकर पाध्ये लेखन करत होते. काणेकरांच्या व रांगणेकरांच्या गैरहजेरीत पाध्ये यांनी संपादनाची जबाबदारी पार पाडली. या साप्ताहिकात राजकारण, साहित्य, कला या विषयांवरील गंभीर व विनोदी लेखनामुळे हे साप्ताहिक लोकप्रिय झाले. पण आर्थिक परिस्थिती अडचणीची असल्यामुळे पुढे हे साप्ताहिक रणछोडदास लोटवाला यांच्याशी बोलणी करून चित्रा या साप्ताहिकाचे प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत रूपांतर करण्यात आले. त्या काळात चित्रा साप्ताहिकाचा खप १८ हजारांवर होता. यावरून या साप्ताहिकाची लोकप्रियता लक्षात येते. १९४८ साली चित्रा हे साप्ताहिक नवभारत या दैनिकात समाविष्ट करण्यात आले.

इतिहास शास्त्र, महाराष्ट्राचा इतिहास व मराठी समाजाचे अभ्यासक त्र्यंबक शंकर शेजवलकर यांच्या संपादकत्वाखाली 'प्रगती' नावाचे साप्ताहिक सुरू झाले. हे साप्ताहिक दर्जेदार होते; पण लोकप्रिय होऊ शकले नाही. या साप्ताहिकाचा पहिला अंक ८ जून १९२९ रोजी प्रसिद्ध झाला. या अंकात भूमिका मांडताना शेजवलकर म्हटले होते की, ''उच्च विचारांचा प्रसार करण्याच्या विचाराने प्रगती घडवून आणण्याचा अशा तऱ्हेचा प्रयत्न महाराष्ट्रात तरी पहिलाच आहे. पहिलाच म्हणण्याचे कारण आज पर्यंत जरी राष्ट्राची प्रगती व्हावी. म्हणून अनेक वृत्तपत्रे निघाली असली, तरी मुख्यतः सुशिक्षितासाठी विचारांच्या पायावर काढलेले असे हेच पत्र आहे.''[९] हे साप्ताहिक विचारप्रवर्तक व दर्जेदार होते. प्रबोधन या हेतूने निर्माण झालेल्या प्रगती पत्राला मात्र लोकाश्रय मिळाला नाही म्हणून १९३२ साली हे साप्ताहिक बंद करण्यात आले.

संजीवनी हे प्र. श्री. कोल्हटकर यांनी सुरू केलेल्या या साप्ताहिकात स्त्रियांच्या प्रश्नांवर सडेतोड चर्चा, स्त्रीची समाजातील बिकट परिस्थिती समाजापुढे मांडणारे, स्त्रियांचे पहिले साप्ताहिक म्हणजे संजीवनी होय. या साप्ताहिकातून लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृती चित्राचे भाग प्रसिद्ध केले.

'प्रतिभा' हे पाक्षिक केवळ वाङ्मयीन स्वरूपाचे नियतकालिक होते. वाङ्मय क्षेत्रातील अस्वस्थेतून प्रतिभा पाक्षिकाचा जन्म झाला. शिक्षणाचा प्रसार व नागरीकरण यामुळे परंपरेची

बंधने शिथिल पडत चालली होती. स्त्रिया अधिक प्रमाणात शिक्षण घेऊन निरनिराळ्या व्यवसाय करू लागल्या होत्या. गांधीजींच्या राष्ट्रीय चळवळीमुळे शहरातील व ग्रामीण जनतेत जागृती होऊ लागली होती. कामगार चळवळ वाढत होती. डाव्या विचारसरणीचे आकर्षण वाढू लागले होते. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळ पूर्णपणे थंडावली नव्हती. उच्च शिक्षणाच्या संस्था स्थिर झाल्यासारख्या होत्या. पाश्चात्त्य वाङ्मय, कला व तत्त्वज्ञान यांचा अभ्यास करून बौद्धिकदृष्ट्या संपन्न अशी पिढी तयार झाली होती. आर्थिक मंदीचा काळ असल्यामुळे आर्थिक संघर्ष तीव्र होता. अशा परिस्थितीत नवनवीन प्रश्न निर्माण होऊ लागले. वाङ्मयाच्या क्षेत्रात नव्या जाणिवा निर्माण होऊ लागल्या. नव्या लेखकांची पिढी उदयाला येऊ लागली. नव्या विचारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रतिभा पाक्षिकाची सुरुवात झाली. २ जानेवारी १९३३ रोजी प्रतिभा पाक्षिकाचा पहिला अंक मुंबईत प्रकाशित झाला. प्रतिभा पाक्षिकाला मराठी वाङ्मयाचे मुखपत्र करण्याची जिद्द बाळगून नवे संपादक हरिभाऊ मोटे कामाला लागले. प्रतिभा पाक्षिकात प्रभाकर पाध्ये यांनी 'पश्चिमेकडील वारे' हे सदर लिहून पाश्चात्त्य देशातील वाङ्मयीन घडामोडींचा स्थूल परामर्श घेतला. आर्थिकदृष्ट्या प्रतिभा हे पाक्षिक फायदेशीर ठरले नाही. म्हणून १९३७ साली पाक्षिक बंद करण्यात आले. पण प्रतिभा पाक्षिकाने महत्त्वपूर्ण वाङ्मयीन कामगिरी केली.

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी 'नवयुग' या साप्ताहिकाचा पहिला अंक २१ जानेवारी १९४० रोजी पुण्यात काढला. त्या वेळी प्र. के. अत्रे हे काँग्रेस पक्षात असल्याने नवयुगचे सुरुवातीचे अधिकृत राजकीय धोरण, काँग्रेसच्या राजकारणाचा पुरस्कार करणारे होते. राजकारण, वाङ्मयीन, सामाजिक आणि सांस्कृतिक विषयावर लेखन नवयुगमध्ये प्रकाशित होत होते. नवयुगला राजकीय स्वरूप आल्याने सहाव्या वर्षापासून राजकीय लेखनाची सूत्रे अत्रे यांनी स्वतःकडे घेतली. नवयुग साप्ताहिकाचे स्वरूप आधीच्या साप्ताहिकापेक्षा वेगळे होते. पुढे राजकारणालाच नवयुगमध्ये प्राधान्य मिळू लागले. त्यामुळे साहित्य, विनोद, टीका यांवरचा भर कमी झाला. हे साप्ताहिक १९६३ पर्यंत चालू राहिले. नंतर 'मराठा' या रविवार साप्ताहिक आवृत्तीत ते विलीन करण्यात आले. पुढे त्याचा वर्षातून एक दिवाळी अंक निघत असे, पण अत्रे यांच्या निधनानंतर 'मराठी' दैनिक बंद पडले व नवयुग नावाचे साप्ताहिक काळाच्या पडद्याआड गेले.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात विविध वृत्त, मौज अशी स्वतंत्रपणे अनेक वर्षे चालू असलेली साप्ताहिके बंद पडली; पण स्वातंत्र्योत्तर काळात नवीन साप्ताहिके सुरू झाली. चित्रपट, नाटक, क्रीडा यांचा परामर्श घेणारे 'रसरंग' नावाचे साप्ताहिक या काळात निघाले याच कालावधीत 'मार्मिक' हे व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांचे साप्ताहिक सुरू झाले. समाजवादी पक्षाचे मुखपत्र 'जनवाणी' हे साप्ताहिक १९४७ च्या सुमारास पुण्यात सुरू झाले. १९५२ च्या अंकातील निवेदनात जनवाणी करांनी म्हटले, ''गेली पाच वर्षे केवळ राजकीय स्वरूपाचे साप्ताहिक चालवून ते मराठीमध्ये लोकप्रिय करावे. असा प्रयत्न आम्ही करून पाहिला; पण तो प्रयत्न यशस्वी होईल असे दिसत नाही. जीवनाची विविधता आज इतकी वाढली आहे की, केवळ राजकीय विषयांना वाहिलेले साप्ताहिक मराठी वाचकांना अपुरे वाटू लागले की काय असे वाटते.''[१०] म्हणून जनवाणी हे साप्ताहिक १२ जून १९५२ रोजी बंद करण्याची घोषणा केली.

विवेक साप्ताहिकाचा पहिला अंक ९ नोव्हेंबर १९४७ साली प्रसिद्ध झाला. या साप्ताहिकाच्या पहिल्या अंकात म्हटले होते की, ''साप्ताहिके ही केवळ वृत्तपत्रे नसतात तर लोकमत व्यक्त करण्याची व बनवण्याची जबाबदारीही त्यांच्यावर असते. स्वतंत्र समाजातील नागरिकांच्या जीवनधारणेला आवश्यक अशा प्रकारचे विचार प्रस्तुत करण्याचे कार्य आम्हाला करावयाचे आहे.''[११] या हेतूने साप्ताहिकाची सुरुवात झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुखपत्र म्हणता येईल असे विवेक हे साप्ताहिके होते. हे साप्ताहिक १ मार्च १९८१ पासून बंद करण्यात आले. कारण या साप्ताहिकालाही आर्थिक बोजा सहन करता येणे शक्य झाले नाही.

१९ व्या शतकात उदयास आलेल्या नियतकालिकांनी विविध वैचारिक प्रवाहांना समाविष्ट करून ज्ञान–विज्ञानाचा प्रसार, मनोरंजन, समाज प्रबोधनाला केंद्रस्थानी ठेवून विशिष्ट विषयासंबंधी चिकित्सक लेखन प्रकाशित केले. समकालीन घटनांच्या संबंधित लेखन करून साहित्य वाढविण्याला चालना देऊन नवविचारांची पिढी घडवली. विशिष्ट हेतू ठेवून सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, ऐतिहासिक व विज्ञान इत्यादी विषयासंबंधी लेखन करून वाचनाची गोडी व वाचनसंस्कृती वाढवली. प्रबोधनाच्या माध्यमातून हक्काची जाणीव करून दिली. 'साधना' साप्ताहिकाने बुद्धिप्रामाण्यवादी विचार मांडला. सानेगुरुजींनी ध्येयवादी दृष्टी ठेवून काढलेले 'साधना' साप्ताहिक भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने सुरू करण्यात आले. या साप्ताहिकापूर्वी प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर यांचे 'प्रगती' नावाचे वैचारिक

साप्ताहिक सुरू करण्यात आले होते. पण तेही फार काळ चालू शकले नाही. मौज, विविध वृत्त, तुतारी, वसुंधरा, चित्रा, संजीवनी, प्रतिभा, विवेक, जनवाणी यांसारखी विशिष्ट हेतूने प्रकाशित होणारी साप्ताहिके 'साधना' समकालीन निघत होती. ही साप्ताहिके आर्थिक बोजा सहन करू शकले नाहीत म्हणून काही ठरावीक कालखंडानंतर बंद करण्यात आली. ही सर्व साप्ताहिके वैयक्तिक मालकीची असल्यामुळे आर्थिकदृष्ट्या डबघाईला येऊन ती बंद करण्यात आली. 'साधना' साप्ताहिक सानेगुरुजी यांनी सुरू केले. साने गुरुजींच्या मृत्यूनंतर या साप्ताहिकाची संपूर्ण जबाबदारी विश्वस्तांनी घेतली. साने गुरुजींचा विचार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध असणाऱ्या संपादकांना प्रदीर्घ काळ 'साधना' साप्ताहिक सुजाण वाचकांच्या हाती देण्यात यश लाभले. 'साधना' साप्ताहिक हे वैचारिक स्वरूपाचे असूनही सुरुवातीच्या काळापासूनच लहान मुलांसाठी वेगळे पान राखून ठेवले. अनेक साहित्यिकांनी विनामूल्य लेखन करून समाजाच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली हेच 'साधना'चे वेगळेपण आहे.

'साधना' साप्ताहिकातून 'साधना'चे दिवाळी अंक, विशेषांक, साप्ताहिकात लहान मुलांसाठी स्वतंत्र जागा सोडणे, बालकुमार विशेषांक, आंतरभारती या सदरातून भारतातील वेगवेगळ्या भाषेतील साहित्य व साहित्यिकांचा परिचय करून दिला विविध चळवळी यांसारखे विषय या साप्ताहिकाने तत्कालीन परिस्थितीत हाताळल्यामुळे 'साधना'चे हे महत्त्वाचे कार्य आणि वेगळेपण निदर्शनास येते.

# संदर्भ टीपा


१. जोशी लक्ष्मणशास्त्री (तर्कतीर्थ), मराठी विश्वकोश खंड, ०८, म. रा. सा. सं. मं. मुंबई, प्र. आ., १९७९, पृ. क्र. ६४७.

२. कुलकर्णी व. दि., मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास, खंड–१, विद्या प्रकाशन, पुणे, प्र. आ., १९८७, पृ. क्र. २०९.

३. निर्मळे हरिश्चंद्र, दलितांची नियतकालिके, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ., १९८७, पृ. क्र. १२४.

४. कानडे रामचंद्र गोविंद, मराठी नियतकालिकांचा इतिहास– १८३२ ते १९३७, कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई–२, प्र. आ., १९३८, पृ. क्र. १६०.

५. सरदार गं. बा., अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका, मॉडर्न बुक डेपो, पुणे–३०, प्र. आ., १९३७, पृ. क्र. २१६.

६. जोग रा. श्री. (संपा.), मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ४, भाग–१, पुणे १९७३, पृ.क्र. १९२.

७. लेले रा. के. व वि. कृ. जोशी, वृत्तपत्रांचा इतिहास, मुंबई १९५१, पृ.क्र. ७६.

८. कुलकर्णी व. दि. (संपा.), मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास, खंड–१, पुणे, प्रथमावृत्ती १९८७, पृ.क्र. ३.

९. लेले रा. के., मराठी वृत्तपत्राचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, द्वि. आ. २००४, पृ.क्र.९४२.

१०. लेले रा. के., मराठी वृत्तपत्राचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, द्वि. आ. २००४, पृ.क्र.१०४०.

११. लेले रा. के., मराठी वृत्तपत्राचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, द्वि. आ. २००४, पृ.क्र.१०४२.

## प्रकरण २

# पूर्वसंशोधनाचा आढावा

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने झालेल्या पूर्वसंशोधनाचा आढावा सदर प्रकरणात घेण्यात आलेला आहे. यासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाबरोबरच इतर विद्यापीठांचा विचार करण्यात आलेला आहे. सदर विषयाचा आढावा घेताना नियतकालिकासंदर्भात संशोधन झालेले आहे. असे असले, तरी प्रस्तुत अभ्यासविषयाच्या दृष्टीने अभ्यास झालेला आढळून येत नाही. ज्या विद्यापीठांमध्ये नियतकालिकांबाबत अभ्यास झाला आहे, त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

## २.१ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे :

- मुळे एस. व्ही. यांनी 'ज्ञानोदयाचे वाङ्यमयीन आणि सांस्कृतिक स्वरूप (१८४२ ते १९२०)' या विषयावर १९७८ मध्ये संशोधन केले.
- कापरे सुधा यांनी 'करमणूक साप्ताहिकाचे वाङ्मयीन कार्य' या विषयावर १९८१ मध्ये संशोधन पूर्ण केले.
- लीला नारायण पुरंदरे यांनी मराठीतील 'मुलांची मासिके (संदर्भ आनंद) : एक अभ्यास : १८५५ ते १९८०' या विषयावर १९८५ मध्ये संशोधन पूर्ण केले.
- सिद्धपाठक मीरा यांनी 'मासिक मनोरंजनाने मराठी ललित वाङ्मयात घातलेली भर' भाग–२ या विषयावर १९८५ मध्ये संशोधन केले.
- श्रीपाल सबनीस यांनी 'बहिष्कृत भारतातील लेख : वाङ्मयीन भाषिक व सामाजिक अभ्यास' या विषयावर १९८७ मध्ये संशोधन पूर्ण केले.
- शिंदे सुनील यांनी 'बालबोधमेवाचे बालसाहित्यविषयक कार्य (१८७३ ते १९१०)' या विषयावर १९९३ मध्ये संशोधन पूर्ण केले.
- पुंडे दत्तात्रय यांनी 'रे. ना. टिळक संपादित बालबोधमेवा मासिकाचे वाङ्मयीन कार्य' या विषयावर १९९५मध्ये संशोधन पूर्ण केले.

- वेदपाठक ललिता यांनी ‘सत्यशोधक मासिकातील कथा समीक्षा (१९४६ ते १९८२)’, विषयावर २००५मध्ये संशोधन केले.
- घोलप ललित रामदास यांनी ‘किशोर मासिकाचे वाङ्मयीन कार्य प्रारंभ ते २०००’ विषयावर २००९मध्ये संशोधन पूर्ण केले.
- ढोणे एकनाथ सयाजी यांनी ‘लोकहितवादांची शतपत्रे : आकलन आणि मूल्यमापन’ या विषयावर २००९मध्ये संशोधन पूर्ण केले.
- मोरे संगीता यांनी ‘प्रतिष्ठान’या नियतकालिकाचा वाङ्मयीन अभ्यास’ या विषयावर २००७ मध्ये संशोधन पूर्ण केले.
- प्रा. गिरिजा प्रसाद यांनी ‘दैनिक केसरी या वृत्तपत्राचे वाङ्मयीन व सांस्कृतिक कार्य : एक चिकित्सक अभ्यास’ या विषयावर २०१० मध्ये संशोधन पूर्ण केले.
- घोडेराव विवेक भागूजी यांनी ‘दैनिक श्रमिक विचार : वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास’ या विषयावरील २०११ मध्ये संशोधन पूर्ण केले.
- कानिटकर आनंद व्यंकटेश यांनी ‘भाषा आणि जीवन या त्रैमासिकाचा अभ्यास १९६३–२००६’ या विषयावरील २०१३ मध्ये संशोधन पूर्ण केले.
- शेवाळे प्रकाश कारभारी यांनी ‘अनुष्टुभ नियतकालिकाचे वाङ्मयीन कार्य’ हे संशोधन २०१५ मध्ये पूर्ण केले.
- गुरव अनंत महादेव यांनी ‘ठाकरे केशव सीताराम यांच्या प्रबोधन या नियतकालिकाचा अभ्यास’ या विषयावरील संशोधन २०१५ मध्ये पूर्ण केले.
- कामत मृणालिनी यांनी ‘अभिरुची’ मासिकाचे कार्य (१९४३–१९५३) पूर्ण केले.
- दुधाळ शुक्राचार्य गोकूळ यांनी संपतराव शिंदे यांच्या ‘विजयी मराठा’ या नियतकालिकाचा अभ्यास केला.

## २.२ श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई :

१) देव सुभजी यांनी ‘A Literary and Social Work of Magazine Stri 1930 to 1960’ या विषयावर १९९० मध्ये संशोधन पूर्ण केले.

२) चव्हाण एस. के. यांनी ‘सत्यकथा मासिकातील स्त्रियांचे कथालेखन’ या विषयावर अभ्यास केला.

## २.३ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर :

१) पटणे प्रतिभा प्रदीप या ‘नवभारतचे मराठी साहित्य समीक्षेतील योगदान’ या विषयावर २००९ मध्ये प्रबंध पूर्ण केला.

साधना साप्ताहिकाच्या अनुषंगाने या सर्व संशोधन विषयाचा विचार करता सदर विषयाबाबत कोणतेही संशोधन अद्यापपर्यंत झालेले आढळून आलेले नाही. यास्तव सदर अभ्यासविषयावर संशोधन होणे गरजेचे आहे.

# प्रकरण ३

# संशोधन पद्धती

विविध विद्याशाखामध्ये होणाऱ्या संशोधनासाठी वेगवेगळ्या संशोधन पद्धतींचा अवलंब केला जातो. संशोधन हे शास्त्राचे असो, सामाजिक विविध विद्याशाखांमध्ये होणाऱ्या संशोधनासाठी वेगवेगळ्या संशोधन पद्धतींचा अवलंब शास्त्राचे असो किंवा वाङ्मयाचे; त्यासाठी विशिष्ट पायऱ्यांचा आधार घेतला जातो. संशोधन पद्धतीची निवड ही महत्त्वाची पायरी आहे असे म्हणता येईल. वेगवेगळ्या विद्याशाखांतील संशोधन पद्धती या विभिन्न आहेत. विद्याशाखागणिक त्यास प्राधान्यक्रम देण्यात येतो. उदा. शास्त्राचा विचार करता प्रयोगात्मक पद्धतीचा, सामाजिक शास्त्रामध्ये क्षेत्रीय अथवा सर्वेक्षण पद्धतीचा वापर तर वाङ्मयाच्या संशोधनाचा विचार करताना ग्रंथालयीन, विश्लेषणात्मक, क्षेत्रीय, ऐतिहासिक संशोधन पद्धतींचा प्रामुख्याने अवलंब केला जाताना दिसतो. या संशोधन पद्धतींविषयी तज्ज्ञांच्या मतांचा विचार करण्यात आलेला आहे. तो पुढीलप्रमाणे–

१) जे. एल. केरलिंग यांच्या मते– ''संशोधन हे एक व्यवस्थित नियंत्रित व अनुभवजन्य असते आणि त्याद्वारे नैसर्गिक घटकांधिष्ठ, संभवनीय संबंधाच्या गृहीतकृत्याचे टीकात्मक परीक्षण केले जाते.''[१]

२) जे. डब्ल्यू. वेस्ट यांच्या मते– ''संशोधन ही एक व्यवस्थित प्रक्रिया होय की, ज्याद्वारे शोध घेतला जातो. आणि संघटित ज्ञानाच्या अंगाचा विकास केला जातो.''[२]

३) वेबस्टरच्या शब्दकोशाप्रमाणे– ''संशोधन म्हणजे तथ्ये वा तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पद्धतशीर केलेले परीक्षण होय.''[३]

४) मोझर या शास्त्रज्ञाच्या मते ''संशोधन म्हणजे सामाजिक घटना व सामाजिक समस्यांच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने केलेले क्रमबद्ध प्रयत्न होय.''[४]

यावरून संशोधनाची संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते. तथ्य, तत्त्वे व पुराव्यांवर आधारित निरंतर व सातत्याने चालू असणारी प्रक्रिया म्हणजे संशोधन. व्यक्तिनिष्ठता व

पूर्वग्रहविरहित प्रक्रियेने येणारे निष्कर्ष संशोधनात मार्गदर्शक असतात. यामुळे संशोधनाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते. संशोधनाने जीवनमान सुधारून ज्ञानाची नवीन दालने उपलब्ध होतात. एकूणच मानवी जीवनमान उंचावण्यास मदत होते. साहित्याच्या क्षेत्रातील संशोधन हा त्यातलाच एक महत्त्वाचा भाग आहे. प्रस्तुत संशोधनविषयाच्या अनुषंगाने म्हणजेच ''साधना साप्ताहिक : वाङ्मयीन अभ्यास'' (कालखंड : ऑगस्ट १९४८ ते मे १९६०) या विषयाच्या संशोधनासाठी पुढील संशोधन पद्धतींचा अवलंब केला आहे.

तसे पाहता वाङ्मयीन संशोधनात भाषिक साहित्य, शास्त्रीय प्रश्नांचे संशोधन, विशिष्ट लेखकाचा अभ्यास, साहित्य, साहित्यिक संशोधन, वाङ्मय प्रकारनिष्ठ संशोधन, वाङ्मय प्रकारातील संशोधन, तौलनिक साहित्य संशोधन यांचा समावेश होतो. साहित्य हे केवळ मनोरंजनासाठी अथवा करमणुकीसाठी नसून, समाजाला ज्ञान देणे, बोध देणे, उद्बोधन करणे, समाजप्रबोधन करणे यासाठी असते. सामान्य माणसाला सुशिक्षित करण्याचे एक समर्थ साधन म्हणजे 'साहित्य' होय. म्हणूनच साहित्याचे संशोधन करताना संशोधन पद्धतीचा अभ्यास आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी खालील संशोधन पद्धतींचा अवलंब आवश्यक आहे.

१) ग्रंथालयीन संशोधन पद्धती

२) ऐतिहासिक संशोधन पद्धती

३) विश्लेषणात्मक संशोधन पद्धती

## ३.१ ग्रंथालयीन संशोधन पद्धती :

''साधना साप्ताहिक : वाङ्मयीन अभ्यास (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०)'' या विषयावरील संशोधनासाठी ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. साहित्याचे संशोधन हे प्रत्यक्ष क्षेत्रीय संशोधनाबरोबरच ग्रंथालयावर अवलंबून असते. आज माहिती–तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालये अद्ययावत झाली असून, त्याला तंत्रज्ञानाची जोड मिळाली आहे. त्यामुळे सर्वच माहिती सहज उपलब्ध होते. यात चरित्रे, आत्मचरित्रे, कथा, कविता, कादंबरी, नाटक, समीक्षा, नियतकालिके, साप्ताहिके इत्यादी बरोबरच पत्र, रोजनिशी आदींचा समावेश होतो. हे सर्व साहित्यप्रकार ग्रंथालयात उपलब्ध असून सर्व संदर्भासह उपलब्ध होते. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी ग्रंथालयीन पद्धतीचा अवलंब केला असून, आवश्यक त्या ठिकाणी

संदर्भाची नोंद घेतली आहे.

## ३.२ ऐतिहासिक संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला असून, साहित्य हा समाजाचा आरसा असतो. काल घडलेली घटना आज गतकाळात जाऊन बसत असते. कोणत्याही घटनेचा इतिहास ही उद्याची पार्श्वभूमी असते. समाजात रोज घडत असलेली स्थित्यंतरे आणि यातून विकसित होत जाणारे मानवी जीवन, त्यामागे असणारे अनेक संदर्भ यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अभ्यास करावा लागतो. प्रस्तुत संशोधन विषयाच्या कालावधीत महाराष्ट्रात अनेक घटना घडल्या. देशाला स्वातंत्र्य मिळाले, तरी भारतातील अनेक प्रांत गुलामगिरीत होते. त्यांचा मुक्तीसाठी संघर्ष सुरू होता. भाषावार प्रांतरचना जरी १९६० मध्ये अस्तित्वात आली होती तरी त्याची सुरुवात याच काळात झाली होती. सानेगुरुजी संवेदनशीलतेने या घटनेकडे पाहत होते. आशावादी विचारांच्या सानेगुरुजींचे ‘साधना’ साप्ताहिक तत्कालीन अनेक घटनांचे संदर्भ देते. ह्या कालखंडातील राजकीय बदल, वैचारिक जडणघडण, सामाजिक स्थित्यंतरे, ऐतिहासिक घटना समजून घेण्यासाठी ‘ऐतिहासिक संशोधन’ पद्धतीचा अवलंब केला आहे.

## ३.३ विश्लेषणात्मक संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या मांडणीसाठी, विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे. संशोधनाच्या मुळापर्यंत पोहोचण्यासाठी अनेक संदर्भाचे दाखले देऊन तटस्थ दृष्टी ठेवून विश्लेषण केले आहे. या काळातील अनेक घटनांचे संदर्भ ‘साधना’त आलेले आहेत. स्वातंत्र्य आंदोलन नुकतेच संपलेले होते. भारत–पाक फाळणी, दुसऱ्या महायुद्धाचे पडसाद जागतिक स्तरावर पडले होते. स्वतंत्र भारताची राज्यघटना, संविधान, १९४५ नंतर मराठी साहित्यात निर्माण झालेले नवे प्रवाह, त्यातील साहित्य व साहित्यिकांची पिढी, सर्वांत महत्त्वाचे म्हणजे महात्मा गांधीजींची हत्या आणि त्यांच्या अहिंसेच्या तत्त्वावर चालणारी पिढी तयार झाली होती. गांधीविचार आपल्या जगण्याचा आधार घेऊन जगणाऱ्यांत सानेगुरुजीही होते. अनेक घटनांचा परिचय ‘साधना’ साप्ताहिकातून होतो. म्हणून विश्लेषणात्मक पद्धतीच्या सहाय्याने संशोधन करून निष्कर्षापर्यंत येण्यास मदत होईल. म्हणून उपरोक्त संशोधन विषयाच्या पूर्णत्वासाठी वरील पद्धतींचा अवलंब केला आहे.

माहितीचे विश्लेषण करत असताना आवश्यकतेनुसार दाखले, संदर्भ देत स्पष्टीकरणावर भर दिलेला असून प्रस्तुत संशोधन कालखंड हा स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा कालखंड असून स्वातंत्र्योत्तर कालखंडातील अनेक घटना घडामोडींचा समावेश यात आहे. याचे स्पष्टीकरण करताना ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करणे आवश्यक होते. त्यासोबतच तटस्थपणे माहितीचे विश्लेषण आणि निष्कर्षाची मांडणी केलेली आहे. मिळवलेल्या माहितीचे विश्लेषण, स्पष्टीकरण आणि त्याची तर्कशुद्ध मांडणी करत असताना आवश्यक तेथे संदर्भ देण्यात आले आहे.

ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडात प्रकाशित झालेल्या विविध साहित्य प्रकारनिहाय वर्गीकरण करून विषयनिहाय व प्रकरणनिहाय निवडक लेखांचा समावेश अभ्यासासाठी केला. त्याप्रमाणे प्रकरण रचना केली. प्रस्तुत कालखंडातील निवडक विशेषांक व दिवाळी अंकांचा आढावा घेतला आहे.

# संदर्भ टीपा


१) खैरनार दिलीप, संशोधन पद्धती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्र. आ., २०००, पृ. क्र. ६७.

२) कांचोळे दा. धों., सामाजिक संशोधन पद्धती, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्र. आ., १९९३, पृ. क्र. १०७.

३) वज्हारे बी. एस., सामाजिक संशोधन पद्धती, पिंपळापुरे पब्लिकेशन, गडचिरोली, प्र. आ., २०११, पृ. क्र. २१२.

४) घाटोळे रा. ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, सातवी आवृत्ती, २०००, पृ. क्र. ५.

# प्रकरण ४

# माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

## प्रस्तावना :

माहितीचे संकलन करत असताना प्रस्तुत संशोधन कालखंडातील 'साधना' साप्ताहिकाचे अंक डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाले. हा स्वातंत्र्यानंतरचा अत्यंत दुर्मीळ व महत्त्वाचा दस्तऐवज आहे. त्याचा अभ्यास होणे गरजेचे वाटले. डिजिटल स्वरूपात उपलब्ध असलेले बरेच अंकही वाचनयोग्य नव्हते, त्यामुळे संकलित केलेल्या माहितीचे अर्थनिर्वचन व विश्लेषण करण्यात अडचणी येत होत्या. 'साधना' साप्ताहिकाच्या निवडक अंकांचा (वाचनयोग्य) अभ्यास प्रस्तुत संशोधनात केलेला आहे. या प्रकरणात एकूण सहा विभाग केलेले आहेत ते खालीलप्रमाणे–

## अ) 'साधना' साप्ताहिकातील संपादक आणि संपादन :

### ४.१ प्रास्ताविक :

इंग्रजी नियतकालिकांच्या धर्तीवर मराठीमध्ये नियतकालिकांचा उदय झाला असला, तरी नंतरच्या काळात मराठी नियतकालिकांनी आपला स्वतंत्र चेहरा आकाराला आणला आणि नियतकालिकांचा प्रचंड विस्तार झाला. हे सर्व मुद्रणाच्या सोयीमुळे होऊ शकले. महाराष्ट्राच्या जडणघडणीत नियतकालिकांचे योगदान महत्त्वाचे आहे. नियतकालिकाने सातत्याने शिक्षण, आरोग्य, स्वातंत्र्य, समता, बंधुता, प्रेम ही मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर दर्जेदार साहित्य प्रकाशित केले. मूल्यसंवर्धनासाठी आणि मूल्यांच्या रुजवणीत नियतकालिकांची भूमिका महत्त्वाची ठरलेली आहे.

या नियतकालिकांनी प्रबोधनाबरोबरच अनेक सामाजिक चळवळींना बळ दिले. मराठी साहित्याला समृद्ध करण्याचा सातत्याने प्रयत्न केला. एवढेच नव्हे, तर कथा, कविता, कादंबरी, नाटक, निबंध, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, पुस्तक परीक्षण या सर्व वाङ्मय प्रकारांना प्रसिद्धी आणि बळ देऊन लोकरुची वाढविण्यात व लेखकांना लिहिण्याचे प्रोत्साहन देण्यात नियतकालिकांचा वाटा महत्त्वाचा आणि मोलाचा ठरला आहे. आज भारतातील प्रत्येक प्रांतातील विविध भाषांमध्ये अनेक दर्जेदार नियतकालिके प्रकाशित होताना दिसतात.

नियतकालिकांच्या एकूणच कार्याचा आढावा घेताना रामचंद्र कानडे म्हणतात– ''नियतकालिकांनी नुसते प्रबोधन वा शैक्षणिकच कार्य केले नाही, तर स्वातंत्र्य चळवळीला पूरक ठरतील असे विचार समाजात पसरवले. रूढी, अंधश्रद्धा, चालीरीतींवर आघात करणारे लेखन दिले. शेतकरी, दलित, अन्यायपीडित समाजाला आधार दिला. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले. समता, बंधुता, न्याय शिकविला. लोकांचे मनोरंजन आणि करमणूकही केली. नियतकालिकांनी समाज गतिशील, प्रभावी आणि विचारी केला. प्रतिगामी बुरसटलेल्या विचारांतून समाजाला बाहेर काढून नव्या जाणिवांच्या जगात आणले.''[१]

यावरून नियतकालिकांच्या एकूणच कार्यावर प्रकाश पडतो. समाजाच्या जडणघडणीतच नव्हे; तर एकूणच मानवी मूल्यांच्या जडणघडणीत नियतकालिकांची भूमिका महत्त्वाची राहिलेली आहे. मूल्य रुजवणूक ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया सातत्याने आणि सर्व स्तरांतून व्हायला हवी. त्यात माध्यमांची जबाबदारी अधिक असते. नियतकालिकांच्या कार्याचा विचार करताना हे स्पष्ट होते, की या नियतकालिकांच्या उदयामागे मनोरंजन, ज्ञान, प्रबोधन हे महत्त्वाचे उद्दिष्ट असले, तरी त्या पाठोपाठ अनेक बाबी नियतकालिकांनी रुजवल्या. परिणामी, सुसंस्कृत माणूस आणि त्याचे पर्यवसान सुसंस्कृत देशात झाले. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील परिस्थितीमध्ये अनेक स्थित्यंतरे झाली होती; पण नियतकालिकांनी अत्यंत जबाबदारीने आपली भूमिका पार पाडलेली दिसते.

## ४.२ 'साधना' साप्ताहिकाचा उदय आणि वाटचाल :

दिनांक १५ ऑगस्ट १९४८ रोजी 'साधना' साप्ताहिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. अथक परिश्रमातून आणि समाजोन्नतीचे ध्येय उराशी बाळगून सानेगुरुजींनी 'साधना'चे प्रकाशन सुरू केले. सुरुवातीचा काळ जिकिरीचा होता. भारताला स्वातंत्र्य मिळून एक वर्ष उलटले होते. महात्मा गांधीजींची हत्या झाली होती. भारतातील काही प्रांत जसे हैदराबाद संस्थान पारतंत्र्यातून स्वातंत्र्यात पाऊल टाकत होते. स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती दिलेले हजारो सैनिक आणि मोठ्या विश्वासाने प्राणाची आहुती देताना आपल्या स्वाधीन केलेला हा देश, इथली माणसे यांना सातत्याने जपायला हवे. नैतिक अध:पतनात आणि स्वार्थात गुरफटलेल्या माणसांना शहाणे करावे. देशप्रेम, नि:स्वार्थ सेवा, त्याग, बलिदान यांची ओळख करून द्यावी. लहान मुले ही निष्पाप असतात. त्यांना केंद्रस्थानी ठेवून हे कार्य सुरू करावे. अशा अनेक

पैलूंचा अभ्यास आणि विचार करून सानेगुरुजींनी 'साधना' साप्ताहिकाचा विचार पक्का केला होता. महात्मा गांधीच्या हत्येनंतर महाराष्ट्रात उद्‌भवलेले जातीयतेचे विक्राळ रूप, जातीयतेला प्रतिजातीयतेने उत्तर देण्याचा काहींनी प्रयत्न केला. पण या सर्वच परिस्थितीत सानेगुरुजींसारख्या महात्मा गांधीजींच्या विचारांचा वारसदार स्वस्थ बसणे शक्य नव्हते. त्यांच्यातला पत्रकार अस्वस्थ झाला. समाजाप्रति, देशाप्रति आपले कर्तव्य आपण निष्ठेने बजवूया, या विचारातून त्यांनी 'कर्तव्य' नावाचे सायंदैनिक सुरू केले. सर्वसाधारणपणे सायंदैनिक गुन्हेगारीच्या बातम्यांना, जाहिरातींना प्राधान्य देतात. त्यात करमणुकीच्या जाहिरातींचा अधिक भरणा असतो. पण सानेगुरुजींच्या या सायंदैनिकात असे काहीच नव्हते. 'स्मरुनि हृदयी ते। कर्तव्य निज चालवू।।' असा शिरोलेख आणि महात्मा गांधींचे चित्र असलेले हे दैनिक; यात बापूजींच्या गोडगोष्टीचे सदर, दैनंदिन जीवनात घडणाऱ्या छोट्या छोट्या घटना, हृदयस्पर्शी गोष्टी आणि प्रेरणा देणाऱ्या बातम्या असत. या सर्वांत एक सूत्र असे ते म्हणजे विचाराला, विवेकाला प्रेरणा देणारे विचार.

'कर्तव्य'च्या पहिल्या अंकाच्या संपादकीयात सानेगुरुजींनी लिहिले– ''आपण सारेच एका अर्थी महात्माजींचे मारेकरी आहोत. माझ्यामध्ये जातीयतेचे लेशभरही विष नाही, असे किती जणांना म्हणता येईल? तुमच्या–आमच्या मनातील जातीयतेची पुंजीभूत मूर्ती म्हणजे गोडसे! गोडसे तुमच्या–आमच्या सर्वांच्या हृदयात आहे. तो दूर करणे हे आता आपले कर्तव्य आहे. 'कर्तव्य' दैनिक या अशा विचारांचा अखंड पाऊस पाडील, जातीयवृत्ती नष्ट करणे आणि लोकशाही समाजवाद आणणे, ही दोन ध्येये माझ्यासमोर आहेत.''[२]

यावरून सानेगुरुजींची 'कर्तव्य' सायं दैनिकामागची भूमिका स्पष्ट होते. जातीयतेचा शत्रू तुमच्या–आमच्यात अजूनही दडलेला आहे. इंग्रजांच्या आक्रमणातही आणि आजही तो तसाच अस्तित्वात आहे. यातूनच अनेक दंगली झाल्या. एवढेच नव्हे. तर याच जातीयतेतून महात्मा गांधीजींचा खून झाला असून, हे जातीयतेचे विचार आपण हद्दपार करणे म्हणजे गोडसेरूपी विचाराला संपवणे होय. हे विचार सामान्यांत पेरण्यासाठी सानेगुरुजींनी 'कर्तव्य' सायंदैनिक सुरू केले होते. परंतु या दैनिकाजवळ ना भांडवल, ना स्वतःचा छापखाना होता. त्यामुळे हे दैनिक अल्पावधीतच बंद पडले. सानेगुरुजींनी आपल्या मित्राच्या 'प्रदीप' मासिकात 'माझी दैवते' ही लेखमाला, व 'मातेची विचारपूस' नावाचे सदरही त्यांनी काही काळ लिहिले. काही

काळानंतर 'प्रदीप'ही बंद पडले आणि सानेगुरुजींमधला पत्रकार अस्वस्थ झाला. स्वतंत्र भारतातील सामान्यांनाही लोकशाहीची जाण असणे आवश्यक आहे. यासाठी लोकशिक्षण आवश्यक आहे. लोकशिक्षणासाठी वृत्तपत्रासारखे दुसरे प्रभावी माध्यम नाही. या विचारातूनच सानेगुरुजींनी 'साधना' साप्ताहिकाचा विचार पक्का केला. यात 'कर्तव्य' दैनिकाचे पुनरुज्जीवन 'साधना'च्या माध्यमातून झाले. दिनांक १५ ऑगस्ट १९४८ रोजी 'साधना' साप्ताहिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. 'साधना'च्या पहिल्या अंकात संपादक सानेगुरुजींनी आपली भूमिका मांडली. ते म्हणतात, ''वैरभाव नि विषमता नष्ट करण्याची थोर 'साधना' आपल्याला करायची आहे. हे 'साधना' साप्ताहिक या ध्येयाने जन्मत आहे. कितीतरी दिवस हे साप्ताहिक निघेल म्हणून मित्र वाट पाहत होते. मध्यंतरी सायंदैनिक 'कर्तव्य' क्षणभर जन्माला आले. ते बंद करून त्याचेच प्रात:दैनिक करण्याची आकांक्षा होती. स्वत:चा छापखाना असल्याशिवाय दैनिक काढणे अशक्य म्हणून त्या खटपटीला लागलो. कसाबसा छापखाना उभा केला. परंतु दैनिक आज नीट सुरू करण्यासाठी शक्ती नाही. तेव्हा सध्या साप्ताहिक ''साधना'' सुरू करून समाधान मानत आहे. जर स्वावलंबी झाले, छापखानाही जरा वाढला, सुरळीत चालू लागला, साधनसामग्री जर वाढली, तर 'कर्तव्य' दैनिक केव्हातरी सुरू करण्याची मला तळमळ तर आहे. तोवर मित्रांनी या साप्ताहिकाला आधार द्यावा, अशी प्रार्थना आहे.''[३]

यावरून सानेगुरुजींनी किती तळमळीने 'साधना' साप्ताहिकाची सुरुवात केली ते स्पष्ट होते. सानेगुरूजींसारख्या पत्रकाराला समाजोन्नती आणि राष्ट्रोन्नती महत्त्वाची वाटते, जो सर्वसामान्यांत लोकशाहीतील समता, बंधुभाव, प्रेम, त्याग अशी मूल्ये रुजवत असतो. त्याच्या मनावर दैनंदिन घटनांचे नकळत बरे–वाईट प्रतिबिंब उमटत असतात. त्यातूनच त्याची अंत:प्रेरणा मजबूत होते. अशाच अंत:प्रेरणेतून 'साधना' आकाराला आलेले आहे. 'साधना'च्या स्वरूपाविषयी आणि अंतरंगाविषयी सानेगुरुजी म्हणतात ''निरनिराळ्या भाषांतील मौल्यवान प्रकार तुम्हाला इथे दिसतील. भारतातील प्रांतबंधूंची येथे प्रेमाने ओळख करून देण्यात येईल. देशातील नि जगातील नाना संस्कृतींचे रंग नि गंध दाखवण्यात येतील. नाना धर्मांतील सुंदरता, उदात्तता यांची भेट होईल. शेतकरी, कामगार यांच्या जगातही आपण वावरू. त्यांचे प्रश्न चर्चू, त्यांची स्थिती समीक्षू, शिक्षणाच्या क्षेत्रातही आपण जाऊ, मुलांच्या संगतीत आपण रमू. ती आपल्याला गोष्टी, गमती सांगतील. आपण त्यांना सांगू, समाजात अनेक अज्ञात माणसे सेवा

करून समाजवृक्षाला ओलावा देत असतात. त्यांच्या हकिकती येथे येत जातील. कधी प्रश्नोत्तररूप चर्चा आढळेल. गंभीर विषयावरचे निबंध येतील. सुंदर गोष्टी वाचायला मिळतील कधी आपण साहित्याच्या मंदिरात दर्शनाला जाऊ, कधी विज्ञानाच्या पराक्रमी कथा ऐकू. कधी निर्मळ समाजवादाचे उपनिषद ऐकू. मनात कितीतरी आहे. जेवढे जमेल तेवढे करीन. गोड करू या.''[४]

वरील संदर्भावरून सानेगुरुजींची 'साधना' साप्ताहिकाविषयीची भूमिका स्पष्ट होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत 'साधना' साप्ताहिक सुरू करताना 'साधना' साप्ताहिक कसे असेल, याबाबत सानेगुरुजी अत्यंत ठाम आणि स्पष्ट दिसतात. त्यांनी 'कर्तव्य' हे सायंदैनिक सुरू केले होते; तर 'प्रदीप'सारख्या वृत्तपत्रात अनेक सदरे लिहिली होती. त्यांच्या विचारांच्या कक्षा अत्यंत स्पष्ट होत्या. वृत्तपत्राविषयी आणि साप्ताहिकाविषयी त्यांची भूमिका स्पष्ट होती. बदलणाऱ्या सामाजिक घटना–घडामोडींचा अत्यंत संवेदनशीलपणे ते अभ्यास करत असत. त्यावरील उपाययोजना काय असतील आणि त्या कशा राबवता येतील, याचाही ते खोलवर विचार आणि चिंतन करत असत. समाजपरिवर्तन ही दीर्घकाळ आणि सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. लहान मुलांवर संस्कार करणे अत्यावश्यक आहे. यासाठी त्यांना सातत्याने वैचारिक खाद्य दिले पाहिजे. त्यांच्यावर त्याग, समर्पण, देशसेवा, देशप्रेम, बंधुभाव, समता, स्वातंत्र्य ही मूल्य रुजवली पाहिजेत. यासाठी 'साधना' साप्ताहिक सातत्याने काम करणार असल्याचे ते सांगतात. एवढेच नव्हे, तर प्रांतभारती आणि आंतरभारतीच्या माध्यमातून माणूस माणसाजवळ येईल. नकळतपणे दोन्हीकडच्या भाषा, साहित्य, संस्कार आणि जीवनपद्धतीचे संप्रेषण होईल. नकळतपणे माणूस माणसाला जोडला जाईल, हा 'साधना' साप्ताहिकाचा हेतू आहे. सानेगुरुजींनी सातत्याने समाजाला काही तरी देण्याचे काम केले. ते म्हणतात– ''मी जीवनाचा नम्र उपासक आहे. सभोवतालचा सारा संसार सुखी नि समृद्ध व्हावा, ज्ञान–विज्ञानसंपन्न नि कलामय व्हावा. सामर्थ्यसंपन्न नि प्रेममय व्हावा हीच मला एक तळमळ आहे. माझे लिहिणे वा बोलणे, माझे विचार वा माझी प्रार्थना या एकाच ध्येयासाठी असतात.''[५]

यावरून सानेगुरुजींची जगण्याची धडपड अनुभवण्यास येते. सभोवतालचा परिसर सुखी व्हावा, यासाठी धडपडणारे त्याचे मन स्पष्ट होतं. या तळमळीतूनच त्यांच्या पत्रकारितेला विविध धुमारे फुटलेले दिसतात जीवनाकडे अत्यंत नम्रपणे पाहणारे आणि कृतज्ञतेने जीवन जगणारा हा

जीवनोपासक बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची कास धरून ही समस्त सृष्टी सुखी करण्याच्या मार्गावर निघालेला प्रचंड आशावादी कार्यकर्ता, पत्रकार, लेखक, संपादक, चरित्रकार, आत्मचरित्रकार सानेगुरुजी होय. त्यांनी अनेक दिवसांच्या चिंतनातून 'साधना' साप्ताहिक सुरू केले. त्यांनी महात्मा गांधीजींच्या विचारांचा आणि कार्याचा एका अर्थाने कृतिशील वारसा पुढे चालविला. महात्मा गांधीजींचे विचार कृतीत आणण्यासाठी प्रबोधनाचे अस्त्र सानेगुरुजींनी प्रभावीपणे वापरले. केवळ संपादकीयच नाही, तर एकूणच साप्ताहिक दर्जेदार कसे होईल याकडे लक्ष दिले. 'साधना' साप्ताहिकाचे संस्थापक व संपादक सानेगुरुजी यांनी आपल्या काळात आणि नंतरच्या काळातही दर्जेदार अग्रलेख प्रकाशित केले. संपादकीय हे त्या त्या साप्ताहिकाचा आणि वृत्तपत्राचा चेहरा असतो. 'साधना'मधून विविध क्षेत्रातले, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय विषयांवरचे अग्रलेख प्रकाशित होऊ लागले. अभ्यासाच्या सोयीसाठी ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडातील 'साधना' साप्ताहिकातील निवडक संपादकीय अग्रलेखांचा आढावा घेतला आहे.

## ४.३ संपादकीय/अग्रलेख संकल्पना व स्वरूप :

इंग्रजांच्या आगमनानंतर आणि मुद्रणाच्या शोधानंतर भारतात प्रसारमाध्यमांचा उदय झाला. सुरुवातीला ज्ञान व मनोरंजनाचे उद्देश समोर ठेवलेल्या प्रसारमाध्यमांनी हळूहळू आपले स्वरूप विस्तृत करण्याचा प्रयत्न केला. लोकजागृती करणे, सामाजिक चळवळींना उत्तेजन देणे, दर्जेदार साहित्य प्रकाशित करणे, नवोदित लेखकांना प्रोत्साहन देणे, स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य आंदोलनाला पुष्टी देणे, बळ देणे, स्वातंत्र्योत्तर काळातही असेच हेतू प्रसारमाध्यमांसमोर होते. स्वातंत्र्य आंदोलन, जागतिक महायुद्ध या साऱ्यातून उदयाला आलेले मानवी मन अनेक उद्दिष्टांनी प्रेरित झालेले होते. या सर्वांमधून प्रसारमाध्यमांच्या द्वारे समाज शहाणा करावा. व्यक्तीचा दर्जा उंचवावा, स्वातंत्र्य-समता-बंधुता-न्याय-त्याग, ही मूल्ये समाजात रुजवावी, अशा अनेक हेतूंनी वृत्तपत्रे व नियतकालिके, साप्ताहिके प्रकाशित होऊ लागली. या सर्वांमध्ये संपादकीय लेखाला किंवा अग्रलेखाला महत्त्वाचे स्थान होते. हे अग्रलेख किंवा संपादकीय त्या त्या नियतकालिकाचा किंवा वृत्तपत्राचा संपादक लिहीत असे. अग्रलेख हे वाचकाला डोळस बनवत असतात. संपादकाची या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका असते. संपादक जेवढा व्यासंगी तेवढे ते नियतकालिक दर्जेदार बनत असते. म्हणूनच या क्षेत्रात संपादकाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. नियतकालिकाचा संपादक हा व्यासंगी, अभ्यासू बहुश्रुतता

असणारा, लेखनकौशल्य अवगत असणारा, नेतृत्वगुण असणारा, खंबीर, संभाषणकौशल्य अवगत असणारा, दूरदृष्टी आणि कल्पकता असणारा, पारखी नजर असणारा ज्याला दिनविशेषाचे महत्त्व आहे, ज्याला वाचकाचा अचूक अंदाज आहे, जो परिस्थितीचा अत्यंत बारकाईने अभ्यास करणारा असतो, अनेक घडामोडींचा अचूक अंदाज व्यक्त करणारा असतो. असा संपादक हा त्या त्या नियतकालिकाचा चेहरा असतो. अग्रलेखाचा अर्थ अधिक स्पष्ट करणारे अभ्यासक डॉ. एम लॉयल स्पेन्सर म्हणतात, ''एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण घटनेचे किंवा घडामोडीचे महत्त्व सामान्य वाचकालाही स्पष्ट होईल. अशा प्रकारे त्या घटनेचे मोजक्या शब्दांत तर्कशुद्ध रीतीने व सहजतेने आनंद देईल, त्या घटनेचे महत्त्व सामान्य वाचकांच्या लक्षात येईल अशा प्रभावी पद्धतीने केलेले विश्लेषण किंवा सादर केलेला मजकूर म्हणजे अग्रलेख होय.''[६] यावरून अग्रलेखाची संकल्पना स्पष्ट होते. अग्रलेख माहिती देतात, मत मांडतात. लोकशिक्षणाची, मार्गदर्शनाची जबाबदारी घेतात आणि आपल्या नि:पक्षपाती लेखनातून समाजाला प्रेरणा देतात. रोजच्या जीवनातल्या बऱ्या–वाईट घटनांवर अग्रलेखाच्या माध्यमातून प्रकाश टाकला जातो. यातील घटनांचे वर्णन अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीने केले जाते.

## ४.४ ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळातील संपादक आणि संपादकीय :

'साधना' साप्ताहिकाला ध्येयवादी संपादकांची प्रदीर्घ अशी परंपरा आहे. मुळात 'साधना' हे कोणा एकाच्या मालकीचे नसून विश्वस्त मंडळाच्या मालकीचे साप्ताहिक आहे. सानेगुरुजींनी भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनाच्या वर्धापनदिनानिमित्त 'साधना'ची सुरुवात केली. भारताला अथक परिश्रमाने अनेकांच्या आहुतीने महत्प्रयासाने स्वातंत्र्य मिळाले होते. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली आंदोलनाचा अंतिम टप्पा पूर्ण झाला होता. इंग्रजांचे १५० वर्षांचे पारतंत्र्य संपुष्टात आले.

मोठ्या विश्वासाने हा देश स्वातंत्र्य आंदोलकांनी, हुतात्म्यांनी पुढच्या पिढीच्या हाती सोपवला. अल्पावधीतच महात्मा गांधींचा खून होणं ही धक्कादायक बाब होती. हा एक संघ देश पुन्हा विषमतेच्या भयानक अशा उंबरठ्यावर उभा होता. त्या विषमतेच्या झळा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत होत्या. या सर्व परिस्थितीत काय चूक काय बरोबर, हे सामान्य माणसांच्या आवाक्याबाहेर होते. यामध्ये तो भरडू लागला व एकसंध स्वतंत्र भारताचे स्वप्न बघू लागला. समाज भयग्रस्त झाला होता. अशा परिस्थितीत मुळातच अत्यंत संवेदनशील असणारे

साने गुरुजी शांत बसणे शक्य नव्हते. महात्मा गांधीजींच्या खुनाचा त्यांच्या मनावर मोठा आघात झाला. या सर्व परिस्थितीत समाजाला शहाणं करणं, हा एकच पर्याय त्यांच्यासमोर होता. या हेतूने त्यांनी 'साधना' साप्ताहिकाची सुरुवात करण्याचे ठरवले. अथक परिश्रमाने त्यांनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. या संदर्भात स्वतः साने गुरुजींनी पहिल्याच अंकात सांगितलेले आहे. 'वैरभाव आणि विषमता नष्ट करण्याची थोर साधना म्हणजे 'साधना' साप्ताहिक होय. याचे स्वरूप सांगताना ते पुढे म्हणतात, की निरनिराळ्या भाषांतील साहित्य, शेतकरी, कामगारांचे जगणे, मुलांचे भावविश्व, निःस्वार्थी सामाजिक काम करणारी माणसे, संस्था, साहित्य, चर्चा, ज्ञान, विज्ञान, साहस कथा इत्यादींची मेजवानी 'साधना'मध्ये असेल. हा 'साधना' साप्ताहिकासंदर्भातला साने गुरुजींचा दृष्टिकोन आजपर्यंत टिकवून असलेला दिसतो.

'साधना'मध्ये काम करणारी सगळीच माणसे आजही विशिष्ट ध्येयाने, स्वयंस्फूर्तीने, तसेच सेवाभावाने काम करणारी आहेत. असे काम करणाऱ्या संपादकांची प्रदीर्घ अशी परंपरा 'साधना'ला लाभलेली असल्याने निश्चितच हे 'साधना'चे बलस्थान म्हणावे लागेल. 'साधना'च्या संपादकांची परंपरा व संपादकीय लेख यातून 'साधना'ने प्रस्तुत कालावधीत केलेल्या कार्याची माहिती समजते.

## संपादक व संपादकीय लेख :

### साने गुरुजी १५ ऑगस्ट १९४८ ते १० जून १९५० :

'साधना' साप्ताहिकाचे संस्थापक साने गुरुजींचे दिनांक ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडात आलेले संपादकीय लेख ''मला माणूस व्हायचं आहे'' पु. ह. पटवर्धन व शं. द. जावडेकर संपादकीय लेख (१० जून १९५५), चारित्र्याचे सामर्थ्य लेखक साने गुरुजी (संपा.) (१६ एप्रिल १९४९), संयुक्त महाराष्ट्राची नवमंगल उभारणी संपा. सानेगुरुजी (३० एप्रिल १९४९), प्रांतभारतीचे माझे स्वप्न (७ मे १९४९), श्री तुकारामांची त्रिशतसांवत्सरिक पुण्यतिथी संपा. सानेगुरुजी (४ मार्च १९५०), पुण्यश्लोक श्री शिवछत्रपतींचे स्मरण संपा. सानेगुरुजी (२२ एप्रिल १९५०), गांधीजींचे दशावतार संपा. सानेगुरुजी (२ ऑक्टोबर १९४८), गुरुजींची विचारसंपदा संपा. पु. ह. पटवर्धन व शं. द. जावडेकर (१ जुलै १९५०, ८ जुलै १९५०, २९ जुलै १९५०), सानेगुरुजी श्रद्धांजली हा 'साधना' साप्ताहिकाचा संपादकीय विशेषांक (१७ जून १९५०) सानेगुरुजींना श्रद्धांजली समर्पित अंक असून या अंकात अनेक

विचारवंतांनी सानेगुरुजींविषयी श्रद्धांजलीपर लेखन केले आहे. यामध्ये रावसाहेब पटवर्धन, एस. एम. जोशी, आचार्य विनोबा भावे, शं. द. जावडेकर, ना. ग. गोरे, मधु लिमये या मान्यवरांचे लेख प्रकाशित झाले आहेत.

**पु. ह. पटवर्धन आणि शं. द. जावडेकर यांचे संयुक्त संपादकीय**

(२४ जून १९५० ते १० डिसेंबर १९५५) :

या दोन संपादकांच्या काळात संयुक्त विषयावर संपादकीय लेखनकार्य केले आहे. गुरुजींची 'साधना' महाराष्ट्राची होवो (२४ जून १९५०) संपादकीय निवेदन प्रसिद्ध करण्यात आले. लोकशाहीच्या रक्षणार्थ जागे रहा (१ जुलै १९५०), मुंबईचा सार्वत्रिक संप (२ सप्टेंबर १९५०), नाशिक येथील काँग्रेस अधिवेशन (१६ सप्टेंबर १९५०), प्रिय महात्माजी (३० सप्टेंबर १९५०), आशियाई आंतरराष्ट्रीय परिषद (७ ऑक्टोबर १९५०), शेवटी पंडित नेहरू वर्किंग कमिटीवर गेलेच! (२१ ऑक्टोबर १९५०), राष्ट्र संघावरील जबाबदारी (२८ ऑक्टोबर १९५०), डॉ. राधाकृष्णन यांचा संदेश (१३ जानेवारी १९५१), हिंदू कोड बिलावरील पार्लटमेंटमधील चर्चा (१० फेब्रुवारी १९५१), निवडणुकीबाबत साधनेची भूमिका (५ जानेवारी १९५२), पुण्यात सुरू झालेला सत्याग्रह (१० फेब्रुवारी १९५२), सिलोनमधील हिंदी रहिवाशांचा प्रश्न (२४ मे १९५२), प्रजा समाजवादी पक्ष (४ ऑक्टोबर १९५२), पंचवार्षिक योजना (१३ डिसेंबर १९५२), लोकशाही आचारविचार (२४ जानेवारी १९५३), सानेगुरुजी (१३ जून १९५३), श्री. अशोक मेहता यांचे मननीय विचार (२० जून १९५३), शिरगणतीचा संदेश (२१ एप्रिल १९५६), महाराष्ट्र पुढील गंभीर समस्या (९ जून १९५६), व्हिएतनाममधील घडामोडी (७ मे १९५५), निवेदन (४ जून १९५५) इत्यादी संपादकीय लेख उपलब्ध झाले असून, विविध विषयावर शं. द. जावडेकर व पु. ह. पटवर्धन यांनी संयुक्त लिखाण करून प्रकाशित केले.

**शं. द. जावडेकर संपादकीय लेख** (२४ जून १९५० ते १० डिसेंबर १९५५):

या काळात लोकशाही, समाजवाद, अर्थशास्त्र, विज्ञान, आध्यात्मिक, पौराणिक इत्यादी विषयांवर लेखन झाले असून, पौराणिक संदर्भावर आधारित व समकालीन वास्तवाला भिडणारे संपादकीय लेखन त्यांनी केले. कलियुगात जाबल गीता (१७ फेब्रुवारी १९५१ ते १० एप्रिल १९५१) या एकाच नावाने अनेक लेख 'साधना' साप्ताहिकात प्रकाशित झाले. ऑगस्ट माहात्म्य

(११ ऑगस्ट १९५१), विश्व घटनेतील ईश्वरी सूत्र (२२ ऑगस्ट १९५१), हिंदी राजकारणातील आजची उणीव (६ ऑक्टोबर १९५१), महाराष्ट्रीय निवडणुकीतील तिरंगी सामना (१ डिसेंबर १९५१), सत्याग्रही मतदारांचे कर्तव्य (१५ डिसेंबर १९५१), नव्या महाराष्ट्राचे आशास्थान (२९ डिसेंबर १९५१), समाजवादाची उभारणी (२२ डिसेंबर १९५१), स्वतंत्र भारताचा भाग्य दिन (२६ जानेवारी १९५२), समाजवादी युवकांशी चर्चा (२ फेब्रुवारी १९५२), जपानी राष्ट्रवादाचे स्वरूप (९ फेब्रुवारी १९५२), प्रजा समाजवादी पक्ष आणि मार्क्स गांधी (१ नोव्हेंबर १९५२ ते १५ नोव्हेंबर १९५२), समाजवाद आणि अराज्यवाद (७ मार्च १९५३ ते २१ मार्च १९५३), स्वराज्य मंदिरातील समाजसुधारणा (९ मे १९५३), समाजवादाचे विचारमंथन (१९ जुलै १९५३ ते २ ऑगस्ट १९५३) मुंबई महाराष्ट्र आणि भारत (१७ एप्रिल १९५४), भारतीय लोकसत्ता (३० ऑक्टोबर १९५४ ते २० नोव्हेंबर १९५४) इत्यादी लेख आचार्य जावडेकर यांचे 'साधना' साप्ताहिकात प्रकाशित झाले.

**पु. ह. पटवर्धन संपादकीय लेखन** (२४ जून १९५० ते १५ ऑगस्ट १९५६) :

आग्नेय आशियातील नेहरूंचा दौरा (१ जुलै १९५०), आपले मेहेर अल्ली (८ जुलै १९५०), कुटुंबनियेजन दिवाळी विशेषांक (२७ ऑक्टोबर १९५१), ध्येयनिष्ठ कर्मयोगी शंकरराव (२९ जानेवारी १९५५), महाराष्ट्राच्या ज्ञानमहर्षींचे निवाण (१७ डिसेंबर १९५५), भारताचा एक आशादीप (१३ ऑक्टोबर १९५६) इ. लेखन प्रकाशित झाले आहे.

**यदुनाथ थत्ते यांचे संपादकीय लेखन** (२५ ऑगस्ट १९५६ ते १७ जानेवारी १९८१) :

यदुनाथ थत्ते हे सानेगुरुजी यांचे शिष्य होते. सानेगुरुजींबरोबर ते स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले होते. सानेगुरुजींनी 'साधना' साप्ताहिक सुरू केल्यावर या साप्ताहिकात वेगवेगळ्या विषयावर ललित व वैचारिक लेखन त्यांनी केले. त्यांच्या संपादकीय लेखातून तत्कालीन सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींचे पडसाद पडलेले दिसून येतात. घाय की गत घायल (२५ ऑगस्ट १९५६), सन सत्तावन्न (५ जानेवारी १९५७), काश्मीर प्रश्न (२ फेब्रुवारी १९५७), समितीची प्रेरणा समतेची हवी (६ एप्रिल १९५७), गाजलेला साहित्य सोहळा (११ मे १९५७), गरिबांनी साखर कमीच खावी (२५ मे १९५७), दहाव्या वर्षात पदार्पण (१५ ऑगस्ट १९५७), केरळचे शिक्षण विधेयक (२४ ऑगस्ट १९५७), आम्ही व्रतधारी आहोत तुमचे काय? (३१ ऑगस्ट १९५७), असमर्थनीय व बेजबाबदार संप

(२१ सप्टेंबर १९५७), निवडणुका आणि जयप्रकाशजी (२ मार्च १९५७), बिनसलेला मामला (१८ जानेवारी १९५८), स्वातंत्र्यानंतरच्या काळातील भारतीय लोकशाहीचे संकल्प उद्दिष्ट व आव्हाने पूर्णत्वाकडे वाटचाल होत नसल्यामुळे लिहिलेला अग्रलेख, राष्ट्रीय संकल्पबाबत अक्षम्य अनास्था (१ फेब्रुवारी १९५८), कामगार संघटनांच्या विविध अडचणींवर आधारित संवेदनशीलतेने दखल घेऊन लिहिलेला संपादकीय अग्रलेख, १ मे कामगार दिनानिमित्त कामगार संघटनेच्या विविध अडचणी विषयाचे विवेचन (३ मे १९५८), मुंबई राज्याचे अंदाजपत्रक अंतरंग व मूल्यमापन (२८ फेब्रुवारी १९५९) आदी विषयांवरील संपादकीय यामधून यदुनाथ थत्ते यांचा दृष्टिकोन दिसून येतो.

**'साधना' साप्ताहिकातील सहसंपादक** :

**वसंत बापट** (२५ ऑगस्ट १९५६ ते ३१ जुलै १९६५) :

विनोबांची भेट (२ जानेवारी १९६०) हा लेख प्रकाशित झाला. यामध्ये आंतरप्रांतीय साहित्य संमेलनात आचार्य विनोबा भावे व वसंत बापट यांच्या झालेल्या भेटीचा वृत्तान्त वाचायला मिळतो. त्यांनी वैचारिक संपादकीय लेखनाबरोबर साहित्यिक लेखन केले आहे.

**दुर्गा भागवत** (२५ ऑगस्ट १९५६ ते ३१ जुलै १९६५) :

दुर्गा भागवत ऑक्टोबर १९५८च्या दरम्यान आयोजित करण्यात आलेली ताश्कंदची आफ्रो–आशियन लेखक परिषद (३० नोव्हेंबर १९५८) पूर्वार्ध, तसेच याच नावाने उत्तरार्ध (६ डिसेंबर १९५८) प्रकाशित झाला आहे. याचा अर्थ दुर्गा भागवत भारताच्या प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिल्या होत्या, तर १५ ऑगस्ट १९५७ च्या बौद्ध धर्माची प्रेरणा व आचार या नावाच्या लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व लाखो दलितांनी केलेल्या धर्मांतराच्या पार्श्वभूमीवर त्यांनी विचार व्यक्त केले आहेत.

**नारायण डोळे** (२५ ऑगस्ट १९५६ ते ३१ जुलै १९६५) :

'साधना' साप्ताहिकामध्ये १९५८ पासून त्यांचे काही वैचारिक लेख आलेले दिसून येतात. त्यांच्या लेखाच्या शीर्षकांची नावे आशय व विषयाचा नेमकेपणा सूचित करतात. संसदीय लोकशाहीकडून खऱ्या जनतंत्रकडे (२२ फेब्रुवारी १९५७), प्रा. हॅरल्ड लास्की व्यक्ती व विचार (२९ मार्च १९५८) हा लेख २४ मार्चला प्रा. लास्कीच्या पुण्यतिथी निमित्ताने

स्मरणांजलीवर आधारित लिहिला होता. फ्रान्सचे पाचवे प्रजासत्ताक (६ सप्टेंबर १९५८), चीनमधील खांदेपालट (२३ मे १९५९) इत्यादी लेख प्रकाशित झाले आहेत.

अशा ध्येयवादी लोकांनी 'साधना' साप्ताहिकाचे जतन व संवर्धन केले. मूल्यांची रुजवणूक आणि जोपासना केली. कोणतेही संघटन नसताना जाती–धर्मनिरपेक्ष समतावादी लोकशाहीची व सत्याग्रही समाजवादाची रुजवणूक करण्याचे फार मोठे कार्य 'साधना'ने अविरत केलेले आहे. अगदी अशीच 'साधना'ची संपादकीय परंपरा आहे. खरेतर लोकशाहीचा अत्यंत महत्त्वाचा किंबहुना चौथा खांब असणारी ही माध्यमे होत. त्यांनी समाजोद्धाराचे फार मोठे कार्य केलेले दिसून येते. कोणतेही संपादकीय हे त्या–त्या वर्तमानपत्राचा, नियतकालिकाचा, साप्ताहिकाचा चेहरा असतो. 'साधना'चे संपादकीयही याला अपवाद नाहीत. तत्कालीन महत्त्वाचे विषय, चालू घडामोडी, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, व्यक्तीविशेष, देशविदेशातील साहित्यिक घडामोडी असे सगळे विषय 'साधना' साप्ताहिकाने यशस्वीपणे हाताळले आहेत. यातून वाचकांची मनोभूमिका तयार करण्याचा सातत्याने 'साधना' साप्ताहिकाने प्रयत्न केला. 'साधना'च्या संपादकांनी महत्त्वाची मोठी भूमिका बजावली.

ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळातील संपादकांनी संपादकीय अग्रलेख लिहिलेले असून, त्या त्या संपादकांच्या दृष्टिकोनातून तत्कालीन संपादकांनी विविध विषयांवर विचार समाजापर्यंत पोहोचवले. यावरून 'साधना' साप्ताहिकातील संपादकांची परंपरा आणि महत्त्व लक्षात येते. या अग्रलेखांची निवड करताना तत्कालीन संपादकांच्या कालखंडातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, व्यक्तिविशेष याप्रमाणे निवड करण्यात आली आहे. या संपादकीय अग्रलेखातील निवडक अग्रलेखांचा समावेश या प्रकरणात केला असून काही महत्त्वपूर्ण अग्रलेखांचा फक्त नामोल्लेख केलेला आहे.

### ४.५ 'साधना' साप्ताहिकातील संपादकीय/अग्रलेख :

दिनांक १५ ऑगस्ट १९४८ रोजी सुरू झालेले 'साधना' साप्ताहिक काही ध्येये आणि उद्दिष्टे घेऊन प्रसिद्ध होत होते. संपादक सानेगुरुजी हे हाडाचे पत्रकार, विचारवंत, कवी, लेखक, आत्मचरित्रकार अशा अनेकविध व्यक्तिमत्त्वाचे होते. 'साधना'पूर्वी त्यांनी काही नियतकालिकांत लेखन केले, तर 'कर्तव्य'सारखे सायंदैनिक प्रकाशित केले होते. या सगळ्या प्रवासात त्यांच्यातला विचारवंत, पत्रकार, लेखक अस्वस्थ होता. महात्मा गांधीजींच्या हत्येनंतर

ही अस्वस्थता अधिकच वाढली आणि समाजात वाढत जाणारा वैरभाव संपायला हवा. जाती जातींत वाढणारी ही दरी, वैरभाव नष्ट व्हायला हवा, यासाठी सातत्याने प्रबोधन करावे लागेल. कारण सामाजिक बदल हे इतके सहज नसतात. ते संथपणे होत असतात. प्रबोधनातून लोकशिक्षण ही प्रदीर्घ काळ चालणारी प्रक्रिया आहे. म्हणूनच बदल हवा असेल, तर व्यवस्थेला सतत धक्के द्यावेच लागतील. या उद्दिष्टाने सानेगुरुजींनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. संस्थापक-संपादक सानेगुरुजींनी आपली 'साधना'मागची भूमिका अनेक वेळा स्पष्ट केली. सानेगुरुजींनी 'साधना'मधील संपादकीय लेखांमध्ये आपल्या भूमिकेशी प्रामाणिक राहून अनेक लेख लिहिले. विविध विषयांवरचे संपादकीय लेख, सानेगुरुजींच्या प्रतिमेची, त्यांच्यातील विचारांच्या खोलीची, समतेची साक्ष पटवून देतात. हाडाचा शिक्षक, सामान्य नागरिक, संपादक, लेखक, आत्मचरित्रकार, कवी, वक्ता, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ता असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू त्यांच्या लेखनात दिसतात. सानेगुरुजींना समाजाचे, बदलणाऱ्या सामाजिक परिस्थितीचे अत्यंत सूक्ष्मपणे ज्ञान होते. बारकावे माहीत होते. बिघडत चालणारी सामाजिक परिस्थिती, जातीधर्मांत वाढत चाललेली तेढ आपण थांबवू शकतो, असा त्यांना विश्वास होता. परंतु महात्मा गांधीजींच्या हत्येनंतर ते एकूणच सर्वच घटनांचा पुनर्विचार करू लागले. ध्येयवादी, प्रचंड आशावादी असणारी ही व्यक्ती ढासळू लागली. हे त्यांच्या लेखनातून दिसते. 'साधना' साप्ताहिकाच्या संपादकीय लेखांचा अभ्यास करताना संशोधन विषयाच्या, कालखंडाची मर्यादा लक्षात घेऊन 'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झालेल्या निवडक संपादकीय/अग्रलेखांचाच अभ्यास करण्यात येणार असून, त्यात दिनांक ऑगस्ट १९४८ ते मे १९६० याच काळातील अग्रलेखांचा, संपादकीयांचा अभ्यास केला आहे.

दिनांक १५ ऑगस्ट १९४८ रोजी 'साधना'चा पहिला अंक प्रकाशित झाला. स्वातंत्र्यानंतर एक वर्षानंतरचा हा काळ पाहता संपादकीय किंवा अग्रलेखाच्या संकल्पना लेखकाला नव्या होत्या. 'साधना'चे संपादन स्वतः सानेगुरुजी करत होते. संपादकीय किंवा अग्रलेखाचे ते स्वतः लेखन करीत असत. सानेगुरुजींनी आपल्या अग्रलेखाच्या माध्यमातून दैनंदिन जीवनात घडणाऱ्या अनेक घटनांवर प्रकाश टाकलेला दिसतो. 'साधना' साप्ताहिकाच्या पहिल्याच अंकामध्ये त्यांनी 'संयुक्त महाराष्ट्र' (१६ ऑगस्ट १९४८), 'हुतात्मा शोयबउल्ला खान' (१२ सप्टेंबर १९४८), 'ही लोकशाही का अहिंसा?' (९ ऑक्टोबर १९४८), 'सुस्वागत

श्री. मेहेरअली’! (२० नोव्हेंबर १९४८), ‘जोतिबा फुले’ (२७ नोव्हेंबर १९४८), ‘इतिहासाच्या वेड्या कल्पनेतून संघ बाहेर पडेल का?’ (१ जानेवारी १९४९), ‘विनोबाजींची पावनवाणी’ (१५ जानेवारी १९४९), ‘ते स्वराज्य कधी येणार?’ (५ फेब्रुवारी १९४९), ‘मुंबईचे मराठी ग्रंथ संग्रहालय’ (१२ फेब्रुवारी १९४९), ‘जयप्रकाश नारायण’ (५ मार्च १९४९), ‘मातृभावाचा अभाव’ (१९ मार्च १९४९), ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर दीर्घायू होवो’ (१६ एप्रिल १९४९), ‘संस्कृतीचा अर्थ’ (३० जुलै १९४९), ‘बापूजींचे अमर विचार’ (१५ ऑगस्ट १९४९) हा अग्रलेख लिहून महात्मा गांधीजींच्या विचारांवर प्रकाश टाकला आहे. नंतर ‘संयुक्त महाराष्ट्र आणि समाजवादी पक्ष’ (१९ नोव्हेंबर १९४९), ‘हृदयशून्य कायद्याचे राज्य’ (११ फेब्रुवारी १९५०), ‘विज्ञानमहर्षी आइनस्टाइन’ (११ मार्च १९५०), ‘म.सा.प. अध्यक्ष– यशवंतांना अभिवादन’ (१३ मे १९५०) असे अनेक दर्जेदार अग्रलेख सानेगुरुजींनी लिहिले. सानेगुरुजींच्या निधनानंतर संपादकीय लिहिण्याची जबाबदारी शं. द. अर्थात शंकर दत्तात्रय जावडेकर व पु. ह. पटवर्धन यांच्याकडे आली. सानेगुरुजींच्या विचारांचे संस्कार या दोन्हीही संपादकांवर झाले होते. सानेगुरुजींच्या हयातीत आपल्या संपादकीयमध्ये त्यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय विषयाला स्पर्श केला. व्यक्तिवेध घेणारे संपादकीय लिहिले. महात्मा फुले यांच्या कार्यावरील संपादकीयात महात्मा फुले यांच्या कार्याविषयी कृतज्ञतेने आपले विचार नोंदवले. एवढेच नव्हे; तर महाकवी गटेसारख्या हरहुन्नरी कवीबद्दल अत्यंत विनम्रतेने लेखन केले. सानेगुरुजींनी दैनंदिन महत्त्वाच्या घटना–घडामोडींवर प्रकाश टाकला. सानेगुरुजी कधीच एखाद्या घटनेकडे वा व्यक्तीकडे झुकत नाहीत. आपली मते ते अत्यंत संयमाने आणि तटस्थपणे मांडतात. सानेगुरुजींची शैलीच वेगळी आहे. संपादकीय लेखामध्येही ते अत्यंत नम्र दिसतात. आपल्या भूमिकेशी प्रामाणिक राहून ‘साधना’ साप्ताहिकातील संपादकीय त्यांनी लिहिले. त्यांना विषयांचे वावडे नव्हते. त्यांची आपली भूमिका होती, मत होते हे सर्व मांडण्याची त्यांची स्वतंत्र शैली होती. पोटतिडकीने ते आपला दृष्टिकोन नोंदवत असत. सानेगुरुजींमधला ध्येयवादी पत्रकार ‘साधना’मध्ये स्पष्ट दिसतो. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेली प्रसारमाध्यमे आज भरकटलेली दिसतात. पत्रकारिता हा एक वसा आहे. लोककल्याणकारी शक्तीने, नकारी शक्तीविरुद्ध उगारलेले शक्तिशाली अस्त्र म्हणजे पत्रकारिता होय. सानेगुरुजींना याची पुरेपूर जाण होती. त्यांच्या विचारांत सुस्पष्टता होती. लोकशिक्षण हे त्यांचे उद्दिष्ट होते. महत्प्रयासाने मिळालेले स्वातंत्र्य

टिकवण्याची येथील प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. यासाठी येथील समाज जागा व्हायला हवा. आपापसांतील जाती-धर्मांतील द्वेषभावना गळून पडायला हवी. आपण सातत्याने यासाठी लेखन करायला हवे. स्वातंत्र्याचा अर्थ प्रत्येकाला समजावून सांगायला हवा, अशा नाना तऱ्हेच्या विचारांनी सानेगुरुजी अस्वस्थ असत. सानेगुरुजींनी सांगितलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ त्यांच्या विचारातील खोली सांगून जातो. ते म्हणतात- ''स्वातंत्र्य म्हणजे सर्वांच्या विकासाला संधी, स्वातंत्र्य म्हणजे सुखसंपन्न होण्याचे साधन, अंतःपर या देशात कोणी दुःखी-कष्टी नकोत, सर्वांना स्वाभिमानाने जगता येऊ दे. ज्ञान-विज्ञानाचा प्रकाश सर्वत्र जाऊ दे, विशाल दृष्टी, व्यापक सहानुभूती यांची अत्यंत आवश्यकता आहे. तरच संस्कृती फुलेल, मानवता फुलेल?''[७]

उपरोक्त संदर्भावरून सानेगुरुजींची स्वातंत्र्याकडे पाहण्याची दृष्टी स्पष्ट होते. 'सर्व वैष्णव जन ते....' महात्मा गांधीजींची भावना, ज्ञानदेवांचे 'पसायदान', बुद्धांचा ही 'सृष्टीतील दुःख दूर करण्यासाठीचा खडतर प्रवास' आणि सानेगुरुजींची धडपड हे सगळे एकाच मार्गाचे प्रवासी होते हे स्पष्ट होते. सृष्टीचे दुःख दूर करण्यासाठी राजपाट, अधिकार, सर्व सुखसंसाराचा त्याग करणारे भगवान गौतम बुद्ध, एका अस्वस्थतेतून समाधीपर्यंत पोहोचणारे ज्ञानदेव, याच मार्गावर चालणारे स्वतःच्या प्राणाची आहुती देऊन मातृभूमीच्या मांगल्याचा यज्ञ साकार करणारे महात्मा गांधीजी आणि त्याच मार्गावर चालणारे सानेगुरुजी होत. त्यांची स्वातंत्र्याकडे पाहण्याची दृष्टी व्यापक आहे. स्वातंत्र्य म्हणजे मानवता, समता, स्वाभिमान असे नानाविध अर्थ ते सांगतात. हे टिकवण्यासाठी ते वाचकांकडून आणि सामान्य माणसांकडून काही अपेक्षा करतात. ते म्हणतात, ''स्वातंत्र्य म्हणजे सर्वांच्या विकासाला संधी, बेघराला घर, सर्वांना अन्नवस्त्र मिळो, सर्वांना जमीन मिळो, श्रमाची प्रतिष्ठा सर्वांना कळो, हे सर्व करायचे असेल, तर सर्वांनी जबाबदारीने वागायला हवे. आपापल्या जबाबदारीची जाणीव सर्वांना व्हायला हवी. माझी भाषा, माझा प्रांत, माझा धर्म, माझी जात हे महत्त्वाचे नसून, सर्वांना समानतेच्या धाग्यात बांधायला हवे.'' असे त्यांचे मत होते. दिनांक १५ ऑगस्ट १९४८ रोजी प्रकाशित झालेल्या 'साधना' साप्ताहिकाच्या पहिल्या अंकातील निवेदनात ते म्हणतात. ''आज १५ ऑगस्ट. स्वातंत्र्याचे बाळ जन्मून एक वर्ष झाले. स्वातंत्र्य बाळाचा हा पहिला वाढदिवस. किती आपत्तीतून हे बाळ वाढत आहे! या बाळासाठी महात्माजींचे प्राणही खर्च पडले. हे बाळ त्रिभुवनमोलाचे आहे. त्याचा सांभाळ व्हावा, ते वाढावे, यासाठी कितीही किंमत द्यावी लागली तरी ती कमीच आहे.

कितीतरी गोष्टी डोळ्यांसमोर येतात. हृदय दु:खी होते. सद्‌गदित होते. डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रू येतात. संमिश्र भावनांचा सिंधू हृदयात उसळतो उचंबळतो; परंतु आवेग आवरून विवेकाने कामाला लागायला हवे. प्राप्त परिस्थितीतील कर्तव्य करायला ज्याने–त्याने आपल्या वृत्ती–प्रवृत्तीप्रमाणे लागले पाहिजे. ज्याची जशी शक्ती तशी त्याने ती वेचावी.''८

यावरून सानेगुरुजींची 'साधना' साप्ताहिकामागची भूमिका तर स्पष्ट होते. पण लोकांचे कर्तव्य सांगताना महत्प्रयासाने मिळालेले स्वातंत्र्य हजारोंच्या त्याग बलिदानाच्या समर्पणाच्या यज्ञामधून उदयाला आले आहे. ते टिकवणे, वाढीस लावणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. यासाठीच 'साधना' साप्ताहिकाची गरज असून, ही 'साधना' अखंड महाराष्ट्राची होईल, असा त्यांना विश्वास वाटतो. सानेगुरुजी कायम 'मी जीवनाचा नम्र उपासक आहे' असे म्हणत. प्रत्येकाच्या जीवनात जे जे मंगल आहे ते ते अधिक मंगल होवो! दु:ख दूर होवो यासाठी धडपडणारा हा जीव प्रसंगी मेणाहून मऊ, प्रसंगी वज्रासम कठोर वाटतो. या पार्श्वभूमीवरील सानेगुरुजींच्या चारित्र्याचे सामर्थ्य (१६ एप्रिल १९४९) या लेखात ते चारित्र्याचे सामर्थ्य विशद करताना राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे उदाहरण सांगून राष्ट्रीय सद्‌गुणांचे प्रतीक म्हणून गौरव करतात, तर ३० एप्रिल १९४९च्या संयुक्त महाराष्ट्राची नवमंगल उभारणी, या लेखात संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे स्वप्न व तत्कालीन काँग्रेसच्या भाषावार प्रांतरचनेच्या धोरणाबद्दल खंत याबद्दल विचार मांडले आहे. दिनांक १० जुलै १९४९च्या 'साधना' साप्ताहिकात प्रकाशित झालेला 'संस्कृतीचा अर्थ' हा संपादकीय लेख आहे. प्रांतभारतीचे माझे स्वप्न ७ मे १९४९ या संपादकीय अग्रलेखात सेवादलाविषयी व समाजवादाविषयीचे विचार मांडले. संत तुकाराम महाराजांच्या त्रिशतसंवत्सारिक पुण्यतिथी (४ मार्च १९५०) च्या अग्रलेखातून संत तुकारामांच्या अभंगांचे दाखले देऊन विद्वत्तापूर्वक लेख लिहिला. यातून ग्यानबा तुकारामांचा जयघोष केला.

'साधना' साप्ताहिकासाठी निधी संकलित करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यासाठी त्यांनी अनेक तडोजोडी केल्या. प्रवासाचे पैसे वाचवून अनेकांकडून देणगी घेऊन, मदत मागून महत्प्रयासाने त्यांनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. त्यामागचा त्यांचा हेतू निरपेक्ष होता. दिनांक २४ जून १९५० च्या ''साधना'' साप्ताहिकाच्या संपादकीयामध्ये संपादक पु. ह. पटवर्धन/शं. द. जावडेकर ''गुरुजींची 'साधना' महाराष्ट्राची होवो!'' असे म्हणतात, ते त्यांच्या म्हणजेच गुरुजींच्या साधनेचा विचार करूनच. गुरुजींचे कार्य पुढच्या पिढ्यांनी जिवंत ठेवायला

हवे. पुढच्या पिढ्या त्यासाठी तशा तयार करायला हव्यात. यासाठी गुरुजींच्या विचारांशिवाय पर्याय नाही. आपल्या लेखात संपादक म्हणतात, ''गुरुजींच्या कार्याची परंपरा जिवंत ठेवण्याच्या उद्देशाने त्यांची मित्रमंडळी नुकतीच मुंबईत जमली होती. गुरुजींच्या अंतिम इच्छांना मूर्त स्वरूप देण्याचा जो निर्णय सर्वानुमते घेण्यात आला, त्या निर्णयास अनुसरून आम्ही दोघांनी 'साधना' साप्ताहिक चालविण्याची जबाबदारी स्वीकारली आहे.''

आजपर्यंत 'साधना' साप्ताहिकातून गुरुजींचे अंत:करण महाराष्ट्रास परिचित होत होते. 'साधना' खऱ्या अर्थाने गुरुजींची 'जीवनसाधना' होती. गुरुजींचे सर्व जीवन त्यातून महाराष्ट्रास प्रतित होत असे. या जीवनास जितकी अंगे होती. ती सर्व साधनेंत प्रतिबिंबित झालेली, तिच्या वाचकांना दिसत असत. गुरुजींचे भौतिक जीवन आता अदृश्य झालें आहे. त्यांनी महाराष्ट्रीयन जनतेच्या आणि विशेषत: त्यांना प्रिय असणाऱ्या तरुणांच्या अंत:करणात जी प्रेरणा निर्माण केली तिच्या रूपानेंच आता त्यांचे कार्य महाराष्ट्रांत चालू शकेल. त्यांच्या जीवनाच्या विविध अंगांपैकी 'साधना' साप्ताहिक आणि 'आंतरभारती' या दोन संस्था चालू ठेवाव्यात, असा त्यांच्या निकटवर्ती मित्रमंडळींनी व सहकाऱ्यांनी निर्णय घेतला आहे. त्यापैकी पहिले काम आम्हा दोघांकडे सोपविले गेले आहे. ही सर्व कामे यापुढे वैयक्तिक स्वरूपाची न राहता महाराष्ट्रातील ज्या ज्या कार्यकर्त्यांना गुरुजींच्या ध्येयासंबंधी व मार्गासंबंधी म्हणजेच 'सत्याग्रही लोकशाही समाजवाद' या साध्यसाधनाबद्दल आत्मीयता वाटत असेल, त्या सर्वांची 'सामूहिक साधना' बनली पाहिजे. असे होईल तरच गुरुजींचे कार्य हे खऱ्या अर्थाने जिवंत राहू शकेल व त्यातून महाराष्ट्राचे संजीवन होऊ शकेल.''[९]

सानेगुरुजींच्या निधनानंतरही 'साधना'ने गुरुजींनी ठरवलेल्या 'साधना'च्या ध्येय आणि उद्दिष्टांची बांधीलकी जपलेली दिसते. समाजोद्धारासाठी ज्या ज्या घटना महत्त्वाच्या आहेत त्याबद्दल 'साधना' साप्ताहिक निर्भीडपणे आपले मत मांडतांना दिसते. मग हे मत मांडताना 'साधना'ची लेखणी वास्तववादाची कास धरते. खरे तर साने गुरुजींवर भावनिक लेखक म्हणून अनेकांनी शिक्कामोर्तब केलेले दिसते. मातृह्रदयी लेखक म्हणूनही त्यांच्याकडे अनेक वेळा पाहिले गेले. पण सानेगुरुजींमधला पत्रकार हा निर्भीड आणि खंबीर दिसतो. त्याला आपल्या लेखणीची क्षमता आणि त्याचा परिणाम समजतो. समाजोद्धारासाठी आणि लोकशिक्षणासाठी तळमळणारा हा पत्रकार आपल्या अभ्यासपूर्ण लेखणीने प्रचलित व्यवस्थेची खबर घेतो. हा वारसा 'साधना'

साप्ताहिक आजही जपताना दिसते. दिनांक ५ जानेवारी १९५२च्या 'साधना' साप्ताहिकाच्या संपादकीयामध्ये निवडणुकीसंबंधी संपादकांनी जे मत मांडले ते आजच्या परिस्थितीसही तंतोतंत जुळणारे आहे. काळाच्या पुढे जाऊन विचार करण्याची 'साधना'ची जबाबदारीची भूमिका दिसते. आपल्या संपादकीयामध्ये 'निवडणुकीबाबत साधनाची भूमिका' या लेखामध्ये संपादक म्हणतात, ''संख्याबळ आणि संपत्ती यांची पूजा सर्वत्र होत असता प्रखर ध्येयवादावर निष्ठा ठेवून कार्य करण्याची वृत्ती असल्याशिवाय नवसमाजनिर्मिती होत नसते. निवडणुकीतील बहुमत व राज्यसत्ता हे साध्य नसून, ते एक साधनच आहे. नवसमाजाचे ध्येय जनतेच्या अंत:करणात जो ठसवील, जनतेत संघटित, स्वावलंबी वृत्ती वाढवील, आबालवृद्धांना देशाच्या पुनर्रचनेसाठी कष्ट करण्याची स्फूर्ती देईल, तोच पक्ष जनतेचे खरेखुरे नेतृत्व करू शकेल. समाजवादी पक्षाने सध्या विधिमंडळातील प्रमुख विरोधी पक्ष म्हणून जनसंघटना करावी. आपल्या कार्यक्रमातून जनतेची आत्मशक्ती जागृत करावी व तिला आत्मप्रत्यय आणून द्यावा. उद्या येणाऱ्या समाजवादी राजवटीसाठी जनमानस तयार करावे. यांतूनच समाजवादी पक्षाचे बळ वाढेल. त्यांच्या हाती राज्यसत्ता येईल.''[१०]

यावरून 'साधना' साप्ताहिकाच्या वैचारिक प्रगल्भतेची जाणीव स्पष्ट होते. लोकशाही व्यवस्था असलेल्या भारतासारख्या बलाढ्य देशातील राजकारणाचे तत्कालीन चित्र आणि आजची परिस्थिती तंतोतंत जुळणारी आहे. राजकारण ही समाजसेवा आहे. सामान्यांसाठी झगडणाऱ्या नि:स्वार्थ ध्येयवादी, बुद्धिजीवी, त्यागी आणि समर्पित भावना घेऊन राजकारणात प्रवेश करावा. पण आजच नव्हे; तर प्राचीन काळापासून राजकारण हा स्वार्थाचा अड्डा बनलेला दिसतो. सर्वसामान्यांच्या जगण्याचा दर्जा उंचावण्याऐवजी आता तर खालावत चालला आहे. संख्याबळासाठी वाटेल ते हा जणू अलिखित नियम बनला आहे. आजही राजकारणात विरोधी पक्ष असून नसल्यासारखा आहे. लोककल्याणकारी योजना कागदावरच राहताहेत. सामान्य माणूस आजही आपल्या अधिकारापासून वंचित आहे. काहींना तर आपल्या हक्क आणि अधिकारांची जाणीवच नाही. अक्षरसाक्षर असलेला माणूस विचारसाक्षर मात्र झाला नाही. माणसाची गुणवत्ता आणि उंची ही त्याच्याकडच्या भौतिक बाबींपेक्षा त्यांच्या विचारांवर आणि आचरणावर अवलंबून असते. हा विचार आता लोप पावताना दिसतो. जाती-धर्मातील द्वेषभावना पराकोटीला पोहोचत आहे. या सर्व पार्श्वभूमीवरच इ. स. १९४८ मध्ये सानेगुरुजींनी

'साधना' साप्ताहिक सुरू केले आणि वर्तमान परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. विषय निवडणुकीचा असो की इतर कोणता 'साधना'मधील अग्रलेख आपली ठाम भूमिका घेताना दिसतात. 'साधना' साप्ताहिकाने तत्कालीन परिस्थितीत महत्त्वाच्या विषयांवर अग्रलेख लिहिले. कधी 'निवडणूक आणि जयप्रकाशजी' (२ मार्च १९५१), 'निवडणूक प्रचार व लोकशिक्षण' (१ डिसेंबर १९५१), 'सिलोनमधील हिंदी रहिवाशांचा प्रश्न (२४ मे १९५२) लेखणीमधून समोर आणला, तर कधी 'मतदारांना आवाहन' (२६ जानेवारी १९५७चा प्रजासत्ताक विशेषांक) व 'तरुणांच्या विधायक शक्तीला आवाहन' (२ मे १९५९) केले. 'साधना' साप्ताहिकातील दिनांक १३ जून १९५३ मधील गुरुजींच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने 'सानेगुरूजी' या अग्रलेखामध्ये पु. ह. पटवर्धन/शं. द. जावडेकर म्हणतात, ''गुरुजी हे महान कलाकार होते. त्यांचे जीवन ही त्यांनी जगाला दिलेली एक अमर कलाकृती! कारुण्य, सद्भावना आणि प्रेम हे या कलाकृतींचे स्थायी भाव आहेत. गुरुजींचे जीवन एक महान समर्पण होते. आषाढांतल्या मेघांसारखे तापलेल्या पृथ्वीवर ते शतधारांनी बरसले. मातीच्या रन्ध्रारन्ध्रातून झिरपत जाऊन त्याने तृषार्त बीजांच्या प्राणांना पोषण दिले. स्वतःचे अस्तित्त्व या क्षणी ते हरवून बसले आणि नव्याने उमलणाऱ्या हिरव्या उन्मेषाच्या रूपाने ते पुन्हा जगू लागले. जीवनाची मृत्यूवर मात होते ती अशीच. 'भोगावरी आम्ही घातला पाषाण, मरणा मरण आणियेलें' असेच गुरुजींचे जीवन होते त्यांच्या जीवनाचा आणि मृत्यूचा हाच अर्थ.'

त्या पुढे जाऊन याच लेखात संपादक लिहितात, ''गुरुजी अनेकांची आई झाले. प्रकृतीनेच ते लोकसेवक होते. १९२४ मध्ये शिक्षकांचे काम सुरू केल्यापासून त्यांच्या लोकसेवेच्या जीवनाला सुरुवात झाली. अनेक वेळा त्यांना कारावास घडला. विद्यार्थी, कामगार, अस्पृश्य, समाजातल्या सर्व थरांतल्या माणसांसाठी त्यांनी आपली काया झिजवली. समाजात सर्वत्र शुचिता नांदावी, आर्थिक दैन्य आणि विषमता नष्ट व्हावी, लोकजीवनात मांगल्य यावे, अशी एकसारखी तळमळ त्यांना लागलेली होती. ही तळमळ केवळ शब्दांतूनच नव्हे, तर त्यांच्या प्रत्येक कृतीतून व्यक्त झाली. त्यांनी जे लिहिले ते जगून दाखविले. संतांचे वाङ्मय आणि जीवन यांतला हा अभेद जगात सर्व संतांच्या जीवनात आढळून येतो. साहित्य हे गुरुजींचे ध्येय नव्हते. सेवा हे ध्येय होते. वाङ्मय हा त्यांच्या सेवायोगाचा एक भाग. 'लेखणीच्या लालित्यापेक्षा झाडूच्या लालित्याचा मी उपासक आहे' असे गुरुजी म्हणाले ते याच अर्थाने

लोकसेवेला मदत व्हावी, गती मिळावी म्हणून, गुरुजींनी साहित्याचा एक साधन म्हणून स्वीकार केला. साहित्याच्या विविध क्षेत्रांत त्यांनी संचार केला. कथा, कादंबरी, नाटक, काव्य, निबंध, अनुवाद, बालवाङ्मय साहित्याचा प्रत्येक प्रकार गुरुजींनी हाताळला. बरेचसे साहित्य तुरुंगातच लिहिले गेले. अखंड कार्यरत राहूनसुद्धा इतके विपुल साहित्य ते कसे लिहू शकले याचे आश्चर्य वाटते. संतांच्या वाणीसारखीच त्यांची वाणी सरळ आणि हृदयाला भिडणारी 'श्यामची आई', 'भारतीय संस्कृती', 'सुंदर पत्रे' ही त्यांची पुस्तके मराठी साहित्याची उज्ज्वल भूषणे आहेत. तंत्राच्या फूटपट्ट्या घेऊन त्यांचे वाङ्मय मापण्याचा प्रयत्न करणे चुकीचे होईल. कला हे आपले जीवनसर्वस्व आहे. असे त्यांनी कधी मानलेच नाही आणि म्हणूनच हरतऱ्हेच्या जीवनाचा अनुभव घेण्याची लकब, साहित्य हेच ज्यांच्या जीवनाचे माध्यम आहे. अशा लेखकांच्या ललितकृतींत आढळते तशी गुरुजींच्या वाक्यांत आढळत नाही हे खरें. तळमळ आणि सेवाभाव हीच त्यांच्या जीवनप्रमाणे त्यांच्या लेखनाचीही वैशिष्ट्ये आहेत.''[११]

यावरून सानेगुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलगडतात. त्यांच्यातला माणूस 'आधी केले मग सांगितले' असा दिसतो. त्यांच्या उक्तीला कृतीची जोड होती.

दिनांक २६ डिसेंबर १९५३मध्ये 'प्रांत पुनर्रचना कमिशनची नेमणूक' या संपादकीय लेखामध्ये संपादक पु. ह. पटवर्धन व शं. द. जावडेकर यांच्याकडून स्वातंत्र्यानंतर प्रांताची भाषावार पुनर्रचना करण्यात यावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत होती. विशेषतः आंध्र, कर्नाटक व संयुक्त महाराष्ट्र या तीन भाषा विभागांचे स्वतंत्र प्रांत स्थापिले जावे, अशी एकसंध मागणी होत होती. ही मागणी तीव्र होत होती. तेव्हा वेगवेगळ्या समित्या किंवा कमिशनऐवजी एकच समिती नेमावी जी नवीन राज्याच्या चतु:सीमा काय असाव्यात, हे ठरवील व त्यानुसार प्रांत पुनर्रचना कमिशनची नेमणूक करण्यात आली. दिनांक ३० जून १९५५ पूर्वी आपला अहवाल सरकारला सादर करावयाचा होता. या वेळी भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले, ''प्रांतची पुनर्रचना करताना भाषा ही एकच कसोटी नसून राज्यकारभाराची सोय–गैरसोय, आर्थिक परिस्थिती, संरक्षण, वगैरे गोष्टींचाही काळजीपूर्वक विचार करण्यात येईल. सध्याचे प्रांत कोणत्याही शास्त्रीय तत्त्वावर आधारलेले नाहीत. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सोयीप्रमाणे व लहरीप्रमाणे कालमानाने ते कायम केले आहेत. स्वातंत्र्यानंतर देशी संस्थाने शेजारच्या प्रांतात विलीन झाली. काही लहान असून, स्वतंत्र राहिली. लोकसंख्या,

क्षेत्रफळ, भाषा, आर्थिक स्थिती यापैकी कोणत्याच दृष्टीने सध्याचे प्रांत सारखे नाहीत. संघराज्याचे घटक प्रमाणबद्ध व शक्यतोवर सारखे होणे आवश्यक आहे. विशेषतः राज्ययंत्रांची कार्यक्षमता व आर्थिक नियोजन या दोन्हीचे दृष्टीने प्रांताची आमूलाग्र पुनर्रचना होणे आवश्यक आहे. या पुनर्रचनेचा विचार करताना एक भाषिकाचे सलग राज्य स्थापण्याचा विशेष प्रयत्न केला जाईल. पण तो मुद्दा कितीही महत्त्वाचा असला, तरी इतरही गोष्टींचा विचार त्याचबरोबर करणे आवश्यक आहे.''[१२]

यावरून प्रांत पुनर्रचना कमिशन व तत्कालीन परिस्थिती समोर येते. भाषावार प्रांतरचना हा मुद्दा जेव्हा समोर आला तेव्हाच समाजमनाचे संदर्भ लक्षात येतात. भाषावार प्रांतरचना ही प्रक्रिया संघर्षमय होती. अनेक वर्षांच्या संघर्षाची फळे म्हणजे स्वतंत्र महाराष्ट्राची निर्मिती होय. दिनांक ११ सप्टेंबर १९५४ रोजी प्रकाशित झालेल्या 'साधना' साप्ताहिकामध्ये 'नवा पुरुषावतार' या संपादकीय लेखामध्ये विनोबाजींच्या नव्या पुरुषावतारावर प्रकाश टाकत, वयाच्या साठीमध्ये पदार्पण करत असलेले विनोबा म्हणजे ज्ञान, कर्म व भक्ती यांचा सुंदर संगम असल्याचे म्हटले आहे.

विनोबांना द्रष्टा पुरुष म्हटले जाते. कारण एकाच वेळी ते व्यक्ती आणि समाजात क्रांती घडवून आणत असत. खरे तर महात्मा गांधींनी अहिंसा मानली आणि त्याला सामाजिक आणि राजनैतिक अर्थ प्राप्त करून दिला. खादी ही गांधीजींची निशाणी होती. पण विनोबा मात्र कधीही प्रतीकांच्या आहारी गेले नाहीत. त्यांचा भर प्रयत्नांवर होता, हे स्पष्ट होते. ते प्रतिभावान तर होतेच, पण ते ज्या शब्दांच्या व्याख्या करतात त्या व्युत्पत्ती शास्त्रज्ञांच्याही, पलीकडच्या असायच्या. त्यांचे चिंतन सखोल होते. ते ध्यानस्थ होते. अशा प्रकारचा विनोबाजींच्या व्यक्तिमत्त्वाचा सूक्ष्मपणे वेध या संपादकीयामधून घेतलेला दिसतो.

स्वतःच्या मताचा अधिकार सांगताना जनता शहाणी झाली पाहिजे. ती प्रजा आहे. स्वतः विचार करू शकत नाही. नेतेमंडळी मोठीमोठी भाषणे देतात आणि प्रजा भावनिक होते. जनता ही लोकशाहीचा मूलाधार आहे. अशा लोकशाही व्यवस्थेत अभिव्यक्तिस्वातंत्र्य असले तरी ते स्वैराचारी कधीच होता कामा नये म्हणूनच १९ मार्च १९५५च्या 'साधना' साप्ताहिकातील अग्रलेखामध्ये 'जपून चाला, जपून बोला' हा अग्रलेख प्रकाशित झाला. या अग्रलेखात संपादकाने आपली भूमिका मांडताना लिहिले की, ''आपल्या देशांतील लोकशाहीची

प्रकृती निकोप राहावी व तिला प्रदीर्घ आयुष्य लाभावे, असे प्रत्येक सुजाण माणसाला वाटते. हे घडावयाचे असेल, तर राजकीय शक्ती प्रमाणाबाहेर केंद्रित किंवा विकेंद्रित होता कामा नये. राजकीय शक्ती प्रमाणाबाहेर केंद्रित झाली, तर तिच्या सपाट्याच्या ओघात देश हुकूमशाहीकडे वाहत जातो किंवा  वेतसवृत्ती धारण करून निस्तेज होत जातो. शक्ती प्रमाणाबाहेर विकेंद्रित झाली, तर अस्थिर जीवनाचा व प्रसंगी अराजकाचा अभिशाप भोगावा लागतो, तेव्हा कोणत्याही एका पक्षाच्या हाती (मग तो उजवा असो की डावा) अमर्याद सत्ता जाणे हे विघातक आहे; आणि राजकीय चिरफळ्या उडून बारा पुरभय्ये आणि तेरा चुली असा प्रकार घडणे अनिष्ट आहे. लोकशाही स्थिर व प्रभावी होण्यासाठी सुसंघटित तत्त्वबद्ध आणि एकाच वेळी प्रतिस्पर्धी व पूरक होऊ शकतील असे जवळजवळ तुल्यबळ पक्ष असणे अतिशय आवश्यक आहे. असे पक्ष ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक व वैचारिक गरजांनुसार निर्माण होतच असतात. पण पक्षांची जोपासना व्हावी असे वातावरण देशांत निर्माण करणे हे विचारवंतांचे आणि सत्ताधाऱ्यांचे कर्तव्य आहे.''[१३]

दिनांक ३ डिसेंबर १९५६ रोजी प्रकाशित झालेल्या 'साधना' साप्ताहिकामध्ये 'आमची राज्यघटना आणि समाजवादी क्रांती' या आचार्य जावडेकरांच्या संपादकीयामध्ये भारताची राज्यघटना अथक परिश्रमाने तयार केलेली असून, ती स्वतंत्र भारताची नवी स्वयंनिर्मित राज्यघटना होय, असे ते सांगतात. राज्यघटना अमलात आणल्यानंतर जनमानससमोरील आव्हाने अनेक असतील. मुळात हजारो वर्षांपासून विषमतेच्या बुरुजावर समाजव्यवस्था उभी आहे. जात, धर्म, पंथ, स्पृश्य–अस्पृश्य अशा अनेक बाबी खोलवर रुजलेल्या आहेत. ही राज्यघटना मात्र समतेवर आधारलेली असून स्वतंत्रता, समानता व बंधुता जपणारी आहे असे सांगत जावडेकर म्हणतात, ''आपल्या राजकीय प्रभुत्वाचा उपयोग सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी हिंदीजन करणार आहे व तिने तसेच करावे. हे योग्य व इष्ट आहे. या राज्यघटनेचा उपयोग या कामी करता आला तर जनता ती राज्यघटना कायम करील आणि तिच्याबद्दलचा जनतेचा आदर वाढत जाऊन, या देशात लोकशाही राज्यघटनेचा उपयोग आपल्या आर्थिक घटनांचा अंत करण्याच्या कामी होऊ शकत नाही, असा अनुभव जनतेला येत गेला तर तिचा म्हणजेच या नव्या राज्यघटनेसंबंधीचा अनादर वाढत जाईल व अखेरीस

आपल्या आर्थिक दास्यास कंटाळलेली हिंदी जनता आर्थिक दास्याबरोबरच या नव्या राज्यघटनेचाही अंत केल्यावाचून राहणार नाही.''[१४]

प्रस्तुत संदर्भावरून २६ जानेवारी १९५० पासून देशाने स्वीकारलेली भारतीय राज्यघटना ही समानता, समानाधिकार प्रस्थापित करत देशातल्या सर्वांत शेवटच्या व्यक्तीलाही मूलभूत अधिकार बहाल करणारी आहे. हजारो वर्षांपासून विषमतेच्या भिंतींत बंदिस्त असणारा भारतीय माणूस या एकाच घटनेने आरपार बदलणार होता. पण हा बदल स्वीकारताना या संदर्भात हिंदी जनता आपणास प्राप्त झालेल्या राजकीय प्रभुत्वाचा उपयोग नेमका कसा करेल? हा प्रश्न निर्माण होत होता. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वरील विवेचन यथार्थ दिसते. घटना समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय मानसिकतेचा सूक्ष्म अभ्यास होता. भारतीय समाजाचे त्यांचे निरीक्षण होते. समाजाचे प्रश्न, समस्या यांचा त्यांनी अत्यंत बारकाईने अभ्यास केला होता. या एकूणच परिस्थितीत त्यांनी जगाच्या आणि काही प्रमुख देशांच्या राज्यघटनाही अभ्यासल्या होत्या.

भारतीय समाजाच्या आजाराचे त्यांचे अचूक असे निरीक्षण अनेक ठिकाणी पाहावयास मिळते. भारतीय समाजव्यवस्था ही अनेक मजली इमारत असून, तिला एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी आणि खाली येण्यासाठी जिनाच नाही. म्हणजे भारतातील ज्ञानव्यवस्था व वास्तव मांडत प्रत्येकाला आपल्या जातीची बंधने काटेकोरपणे पाळत जगावे लागणे आणि भारतीय राज्यघटनेचा स्वीकार केल्यावर त्यातील मूलभूत अधिकारातील समानतेच्या तत्त्वावर जगणे, हे प्रचंड विरोधी आणि आश्वासक होते. हजारो वर्षांच्या गुलामीमधून भारतीय समाज यामुळे एका अर्थाने कात टाकत होता. या काळातली समाजाची संभ्रमावस्था 'साधना'मधून येताना दिसते.

समाज सुस्थित राहण्यासाठी तो विचारी आणि विवेकी असणे आवश्यक आहे. विवेकी समाजनिर्मितीसाठी त्याला संविधान, संस्कृती समजणे गरजेचे असते. तरच त्याला अभिव्यक्तीचा अर्थ समजतो. लोकशाही व्यवस्था जिवंत आणि मजबूत ठेवायची असेल; तर जपून बोलणे आवश्यक असते. राजकीय पक्ष कोणताही असो त्याची एक संस्कृती असते, मूल्ये असतात. ती जपायला हवीत आणि ही सर्वांचीच जबाबदारी आहे. 'मानसिक क्रांतीशिवाय प्रगती नाही' (२० मे १९५०), 'पण हा उपाय कोण करणार' (३ फेब्रुवारी १९५१), 'आपली

उद्दिष्टे पुन्हा स्पष्ट करा' (१२ फेब्रुवारी १९५२), 'लोकशाही आचारविचार' (२४ जानेवारी १९५३), 'लोकशाही आणि गोळीबार' (१८ सप्टेंबर १९५४) असे अनेक अग्रलेख 'साधना'मधून प्रकाशित झाले. दिनांक ३० नोव्हेंबर १९५७ ला 'यशवंतरावांच्या मित्रांना आवरा' हा अग्रलेख प्रकाशित झाला, तर १२ सप्टेंबर १९५९च्या 'साधना' साप्ताहिकामध्ये 'विनोबाजी, महाराष्ट्राच्या क्षेमलाभासाठी या!' या अग्रलेखामध्ये संपादकांनी विनोबाजींच्या यात्रेचा आंतरभारतीशी निकटचा संबंध असून विनोबाजींची यात्रा म्हणजे सानेगुरुजींच्या संकल्पनेतील आंतरभारती होय. विनोबाजींनी आंतरभारतीला एका अर्थी बळ दिले. १९५९ हा काळ संयुक्त महाराष्ट्राच्या तीव्र आंदोलानाचा काळ. सगळीकडे वातावरण ढवळून निघत होते. महाराष्ट्रातील मराठी जनतेविषयी इतर प्रांतीयांमध्ये समज–गैरसमज निर्माण होत होते. विनोबाजींच्या वाणीने, त्यांच्या गीताईने, प्रवचनाने समाज एकत्र येत होता. महात्मा गांधीजींच्या विचारांना पुढे घेऊन जाणारा हा निष्ठावान कार्यकर्ता, अत्यंत विनम्रतेने भूदान चळवळीत उतरला आणि हजारोंची मते परिवर्तित करण्यात यशस्वी झाला. विनोबाजींच्या एका हाकेला लोक प्रचंड प्रतिसाद देऊ लागले. आपल्याकडील जमिनी दान देऊ लागले. सत्य, अहिंसा आणि श्रमदान हे विनोबाजींच्या चळवळीतील महत्त्वाचे भाग होते. बघता बघता विनोबाजींची ही चळवळ महाराष्ट्रभर पोहोचली. या वेळी विनोबांना गुजरात महाराष्ट्राइतकेच जवळचे वाटत होते. विनोबाजींनी या वेळी महाराष्ट्रात यावे. महाराष्ट्राच्या क्षेमलाभासाठी यावे, असे संपादक लिहितात. या लेखामध्ये, ''विनोबाजींच्या आगमनाची या वेळी विशेष गरज आहे. आपल्या अंत:करणातल्या आंतरभारती वृत्तीचा स्पर्श ते तेथील जनतेला घडवतील आणि आपल्या मायाळू फुंकाराने गेल्या तीन वर्षांत झालेल्या कटुतेच्या व्रणांना आराम पाडतील. मराठी जनतेप्रमाणेच गुजराती जनतेचेही विनोबांनी अपार प्रेम संपादन केले आहे. गतवर्षी गुजरातमध्ये जाताना ते म्हणाले होते, ''जो प्रांत महाराष्ट्राइतकाच माझा म्हणवला जाईल तिकडेच मी जात आहे.'' गेल्या तीन वर्षांतील घटनांमुळे मराठी–गुजराती जनतेत जो अकारण दुरावा निर्माण झाला आहे. विनोबाजींच्या आगमनाने नाहीसा होईल, मराठी माणसांची जी अकारण धास्ती अन्य भाषिकांना घालण्यात आली होती. ती विनोबाजी सहज दूर करू शकतील. विनोबाजी, तुमचे अखेरच्या क्षणी विस्मरण होऊ न देणाऱ्या सानेगुरुजींच्या आंतरभारतीच्या कार्याला गतिमान करण्यासाठी तुम्ही इकडे या. संयुक्त महाराष्ट्राचा लढा महाराष्ट्राला एकाकी लढावा

लागला. त्यामुळे अन्य भाषिक व अन्य प्रांतीय लोकांविषयी त्याच्या मनात जी अढी बसली आहे ती तुमच्या वाणीने तुम्ही नाहीशी करू शकाल. संयुक्त महाराष्ट्रातही अखिल भारतीयतेचे जिवंत भान करून देण्याला तुमची वाणीच समर्थ ठरू शकेल. तुम्ही या.

महाराष्ट्र एका शासनाखाली आला तरी त्याचे मन अद्याप भंगलेलेच आहे. विदर्भात राहून तुम्ही अडीच वर्षे महाराष्ट्राची सेवा केली. विदर्भवासीयांच्या मनावर तुमचा, तुमच्या साहित्याचा, कार्याचा केवढा प्रभाव आहे. तुम्ही मराठवाड्याला आणि पश्चिम महाराष्ट्रालाही ओळखता. अनेक दशकांच्या दुराव्यानंतर हे मराठी बांधव आता एकत्र येणार आहेत. त्यांच्या मनातला दुरावा दूर करण्याची शक्ती आजच्या राजकीय नेत्यांत नाही. हा दुरावा दूर करण्याचे सामर्थ्य तुमच्यात आहे. एका भाषेचे सर्व लोक एकत्र येऊन, त्या त्या भाषेत सर्व कारभार चालला पाहिजे, हा तुमच्या पुनर्रचनेसंबंधीचा सिद्धान्त आहे. सर्व मराठी भाषिक एकत्र येण्याच्या मार्गांत जे मानसिक अडथळे येतील ते निवारण करण्यासाठी तुम्ही महाराष्ट्रात या.''[१५]

विनोबाजीचे आणि सानेगुरुजींचे विशेष जिव्हाळ्याचे संबंध होते. सानेगुरुजी हे विनोबाजींचे सत्‌शिष्य. त्यामुळे 'साधना'वर विनोबाजींची सतत मायेचे नजर असायची. महात्मा गांधी, सानेगुरुजी आणि आचार्य विनोबा भावे हे एकाच विचारधारेचे. समाजोद्धारासाठी निष्काम भावाने झपाटलेले, दलितांना पंढरपूरच्या मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह करणारे, उपोषण करणारे. अस्पृश्यता निर्मूलनासाठी झटणारे, समाजोद्धाराच्या विचाराने झपाटून जाऊन कृती करणाऱ्या महाराष्ट्रातील अनेक घटना याची साक्ष देतात. या तीनही विचारवंतांच्या कार्याची एकसुत्री दिसते.

दिनांक ५ सप्टेंबर १९५९ मध्ये प्रकाशित झालेल्या 'साधना' साप्ताहिकामध्ये 'एस. एम. जोशी यांचे विदर्भवासीयांना स्नेहनिमंत्रण' हे संपादकीय प्रकाशित झाले. या संपादकीयमधून एस. एम. जोशी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या शेवटच्या टप्प्यावर प्रस्तुत लेखामधून हितगुज करतात. विदर्भवासीय बंधुभगिनींना ते सांगतात, आपण सारे या भारताचे सुपुत्र आहोत. या उदात्त आणि श्रेष्ठ संस्कृतीचे वारसदार आहोत. सिंधी, पंजाबी, आसामी, मल्याळी, हिंदी, बंगाली, गुजराथी, मराठी, तेलुगू, कानडी, तमीळ इत्यादी सर्व भाषिक ही भारतमातेची लेकरेच आहेत. तरीही प्रत्येकाचे काही वेगळेपण आहे. हे म्हणजे भेदामध्ये अभेदाचा साक्षात्कार आहे. स्वातंत्र्यानंतरच्या या नवसमाजामध्ये आम्हाला आमचे हक्काचे स्थान

प्राप्त व्हावे, ही एकच भावना उरी बाळगून आम्ही संयुक्त महाराष्ट्राचा लढा उभारला आणि ती मंगलघडी आज येत आहे. या वेळी त्याचे आपण सर्वजण आनंदाने स्वागत करूया. विदर्भातल्या बांधवांची आमच्यामुळे मने दुखावली असतील. विदर्भवासीयांची अस्मिता दुखावली गेली असेल. इथल्या जातीय भांडणामुळे विदर्भवासीयांना उबगही आला असेल; परंतु सारा महाराष्ट्र असा मुळीच नाही. हे का झाले त्याची कारणेही शोधायला हवीत. ते पुढे म्हणतात, ''आमच्यामध्ये जातीयवाद आहे, त्याचा संपर्क नको, असे विदर्भातील बांधव म्हणतात. आम्ही आपसांत भांडलो, झगडलो, एकमेकांची घरेही जाळली, पण हे असे का झाले? आजपर्यंत केलेल्या दुष्कर्मांची ती फळे होती. परंतु संयुक्त महाराष्ट्राची मागणी धिक्कारून आमच्यावर जो आघात करण्यात आला, जो घोर अन्याय झाला त्यामुळे आम्हाला जाग आली आहे; आमचे डोळे उघडले आहेत. सारी मानखंडना सहन करून घोर अन्यायाचा प्रतिकार करण्याचे जे दिव्य मराठी माणसांना करावे लागले त्यात आमच्या दुष्कर्मांचे पुष्कळसे हिण जळून गेले आहे. मराठी माउलीची लेकरे म्हणून परस्परांबद्दलची ममता जागृत होऊन आम्हाला सामाजिक समतेच्या उदात्त ध्येयाचा साक्षात्कार झाला आहे. हा केवळ युक्तिवाद नाही, हे अनुभूतीचे बोल आहेत, आमच्यातील सर्व नांदणे नष्ट झाली, असा फुका दावा आम्ही करू इच्छित नाही. तरीपण आम्ही जीव तोडून सांगू इच्छितो, की समतेची नवी व्यापक क्षितिजे आमच्या डोळ्यांपुढे दिसू लागली आहेत. कितीही अडचणी आल्या तरी त्याच दिशेने निर्धारपूर्वक पावले टाकीत राहू, अशी ग्वाही आम्ही देऊ इच्छितो. आम्हाला वाटते की, जुन्या गोष्टी आता आपण विसरल्या पाहिजेत. बापूजी अणे तपस्येने आणि वयाने श्रेष्ठ आहेत. १९३०–३२च्या सत्याग्रह लढ्यात विद्यार्थिदशेत असताना त्यांच्यापासून आम्ही स्फूर्ती घेतलेली आहे. त्यांना शहाणपणा शिकविण्याचा आमचा अधिकार नाही, तरीपण त्यांच्यापाशी प्रेमाचा हट्ट करण्याचा हक्क आम्हाला निश्चितच आहे.''[१६]

प्रस्तुत संदर्भावरून विदर्भवासीयांशी हितगुज करताना एस. एम. जोशी म्हणतात– ''पुण्या मुंबईमधले लोक श्रेष्ठ असे म्हणणे चुकीचे आहे. आमच्यातही काही दोष आहेत. जसे की आमच्यामध्ये जातीयवाद आहे. आमचा संपर्क नको असे विदर्भ बांधव म्हणतात. असे सांगत आम्ही आपसांत भांडलो, घरेही जाळली; पण यामागच्या कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. आता समतेची व्यापक क्षितिजे आम्हाला दिसत आहेत; तर 'हिमालय थिटा झाला' या

संपादकीय लेखामध्ये चिनी फौजांनी भारताच्या उत्तर सीमेवर चोरटेपणाने आक्रमण केल्याची वार्ता आल्यापासून देशात एक प्रकारची रागाची भावना वर येताना दिसते. प्रक्षोभाची लाट निर्माण झालेली दिसते, असे सांगत चीनने सातत्याने छुपे आक्रमण करत भारताच्या उत्तर सीमेला पोखरून टाकले आहे. चीन–भारत यांच्यातील सातत्याने होणारा संघर्ष या लेखामध्ये अधोरेखित केला आहे.

'साधना' साप्ताहिकाने सातत्याने तत्कालीन महत्त्वाच्या घटना घडामोडींवर प्रकाश टाकत त्या त्या घटनांसंदर्भात समाजाचे मन तयार करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तर दिनांक १६ एप्रिल १९६० रोजीच्या 'साधना' साप्ताहिकामध्ये प्रकाशित झालेल्या 'वाटाघाटीचे व्यर्थ गुऱ्हाळ' या संपादकीयामध्ये भारत व चीन युद्धकालीन परिस्थिती आणि तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या भूमिकेविषयीचे विचार आलेले दिसतात. दिनांक १९ एप्रिल १९६०ला चीनचे पंतप्रधान चाऊ-एन–लाय हे भारतात वाटाघाटीसाठी येणार होते. खरेतर त्यांना युद्धकालीन परिस्थितीत भारतात बोलाविणे, ही तत्कालीन भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांची चूक होती, असे सांगत चीन कसा युद्धजन्य परिस्थितीला जबाबदार आहे, या सर्वच बाबींवर प्रस्तुत लेखामध्ये विवेचन आलेले दिसते. एकीकडे चीन–भारत युद्ध सुरू आहे आणि दुसरीकडे भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू चीनच्या पंतप्रधानांना भारतात म्हणजे दिल्लीला वाटाघाटीसाठी बोलावतात, ही बाब खटकणारी आहे. उलट अगोदर आक्रमण थांबवा मग वाटाघाटीचे बघू, असे स्पष्टपणे जर भारताचे पंतप्रधान म्हटले असते तर कदाचित युद्धजन्य परिस्थिती बदलली असती.

पंडित नेहरूंच्या या निर्णयाचे आणि भूमिकेचे एका अर्थाने वाभाडे निघाले, असे सांगत पुढे म्हणतात, ''लोकमताची अक्षम्य उपेक्षा आक्रमण मागे घ्या; मग वाटाघाटी करू, अशी स्पष्ट व बाणेदार भूमिका न स्वीकारता पंडितजींनी चाऊंना दिल्ली भेटीचे निमंत्रण देण्यात मुत्सद्देगिरीच्या दृष्टीने तर घोडचूक केलीच; पण या प्रश्नासंबंधी प्रक्षुब्ध झालेले भारतीय लोकमत त्यांनी ध्यानात घेतले नाही, त्याची कदर बाळगली नाही, असे खेदाने म्हणावे लागते. लोकसभेत काही सभासदांनी या संदर्भात केलेली भाषणे उग्र वाटली, तरी ती प्रामाणिक संतापाची द्योतक होती. आपल्या लाडक्या पंचशील सिद्धान्ताच्या अचूकपणाला आणखी एक संधी देण्याच्या हेतूने पंडितजींनी वाटाघाटीचा हा प्रयोग आरंभिला आहे. पंडितजी त्यांचे

बरेवाईट काहीही समर्थन करोत, पण आक्रमकाला मागे 'हट' म्हणून ठासून न सांगता वाटाघाटीस बोलवण्यात पंडितजींनी राष्ट्रीय सार्वभौमत्वाला धक्का दिला आहे, राष्ट्राच्या अभिमानाला दुखावले आहे. आज भारतीय जनता पंडितजींच्या या भूमिकेशी सहमत नाही. पंडितजींच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाचा लोक आदर करतील, त्यांनी बोलावलेला पाहुणा तो देशाचा पाहुणा अशी सज्जन माणसांची भूमिका लोक स्वीकारतील, पण म्हणून पंडितजींनी चाऊंचे थाटात आगतस्वागत करणे केव्हाही इष्ट होणार नाही.''[१७]

प्रस्तुत संदर्भावरून वाटाघाटीचे हे गुऱ्हाळ व्यर्थ आहे असे सांगत, दिनांक १९ एप्रिलला वाटाघाटी करण्यासाठी येणारे चीनचे पंतप्रधान आणि त्यांना निमंत्रण देणारे भारताचे पंतप्रधान यांच्या भूमिकेविषयी प्रस्तुत संपादकीयामध्ये विचार व्यक्त झालेले आहेत. तिबेटसंबंधीचे नेहरूंचे धोरण १९५१ पासूनच चुकले आहे असे चीन सांगते, यामुळे चीन मग्रुरीने वागताना दिसतो.

दिनांक २७ एप्रिल १९६० रोजी प्रकाशित झालेल्या 'साधना' साप्ताहिकामध्ये 'आता कामाला लागा' हे संपादकीय आले असून, लिहिणे फार झाले. बोलणेही फार झाले, आता कृती करण्याची वेळ आली असून प्रत्येकाने कामाला लागले पाहिजे असे सांगत म्हणतात, ''पहिलें काम : आपल्याला मनाने, हृदयाने निष्ठेने एक व्हायचे आहे. एक झाल्याखेरीज कामे उरकणार नाहीत. बखेडे माजतील, दिरंगाई होईल, विदर्भ–मराठवाडा प्रथमच महाराष्ट्राच्या ऐक्यात सामील होत आहेत. ते अद्याप भौतिकदृष्ट्या मागासलेले आहेत. त्यांच्या अशा काही गरजा अवश्य आहेत. पण मेहेरबानी करून आता भाषा बदला, शब्द बदला, शब्द बदलले म्हणजे वृत्ती बदलेल, दृष्टी बदलेल.

मराठवाडा मागासलेला नाही; महाराष्ट्र मागासलेला आहे. विदर्भात उद्योगधंद्यांचा विकास झाला नाही, ही भाषा खोटी, अभद्र, अमंगल. महाराष्ट्रात उद्योगधंदे नाहीत असे म्हणा. सोलापूर, नगर, पुणे, सातारा या जिल्ह्यांचा पूर्वभाग दुष्काळी आहे, दरिद्री आहे. मराठवाडा तसाच आहे. हा सारा कंगालपणा महाराष्ट्राचा आहे. या गरजा महाराष्ट्राच्या आहेत. आता वेगळेपण विसरा, थोडा उशीर लागेल. पण विसरायला लागा.

आता नकाशे बदला, त्यांच्या आधारे मने बदला, मोकळी करा, निर्मळ करा, मग नकाशे आपोआप बदलतील. महाराष्ट्राच्या शेतीला पाणी पाहिजे ही मुख्य गोष्ट. मग योजना अशी करा, दहा इंचांपेक्षा कमी पाऊस पडतो ते महाराष्ट्रांतले प्रदेश आधी निवडा. त्यांना अग्रस्थान

द्या. त्यांची गरज भागवा. विहिरी खोदा, पाट काढा. वाटेल ते करा; पण तहानलेल्या जमिनीला पाणी पाजा. मग अधिक पावसाचे प्रदेश निवडा आणि त्यांच्यामागे लागा. येथे मराठवाडा, विदर्भ, जुना महाराष्ट्र ही भाषा नाही. कमी आणि जास्त पावसाचे प्रदेश ही भाषा.''[१८]

प्रस्तुत संदर्भावरून संयुक्त महाराष्ट्राचा उदय होत असताना आता कामाला लागायला हवे, असे सांगत आता आरोप-प्रत्यारोप खूप झाले सर्वांनी कामाला लागले पाहिजे. त्याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. असे सांगत आपल्याला आता कामाला लागले पाहिजे. कामे डोंगराएवढी आहेत. अनेक समस्या आपल्याकडे आहेत, सिंचनक्षेत्र वाढले पाहिजे; महाराष्ट्रभर पाणी खेळले पाहिजे. जुनी तीर्थक्षेत्रे निकामी झालीत. त्या जागी नवीन निर्माण करायला हवीत. नवीन कारखाने सुरू करायला हवेत. त्यासाठी स्वत:ला झोकून देऊन कामात व्यस्त झाले पाहिजे. महाराष्ट्र मागासलेला आहे. यासाठी नकाशे बदलायला हवेत आणि माणसांची मनेसुद्धा मोकळी करायला हवीत. इथे मराठवाडा-विदर्भ हा भेद नकोच, असे सांगत महाराष्ट्राच्या एकूणच विकासासाठी पुढे आले पाहिजे. यासाठी प्रत्येकाने पुढे यायला हवे असे सांगतात. आज महाराष्ट्राची वाटचाल पाहता हे विचार आजच्या परिस्थितीतही तंतोतंत जुळणारे दिसतात. आजही महाराष्ट्रात अनेक समस्या आहेत. मूलभूत सुखसोईही अनेक भागात मिळत नाहीत. महाराष्ट्रातील अनेक गावांना आजही रस्ते नाहीत. त्यामुळे शहरापासून लांब असणाऱ्या गावांना अनेक समस्यांचा विळखा आहे. ही गावे महामार्गापासून लांब आहेत. आजही हे सर्व सुरळीत करण्यासाठी कामात गुंतायला हवे. आपला विकास आपणच करायला हवा. तसेच महाराष्ट्राची शिक्षणाची, व्यवसायाची, उद्योगधंद्यांची योजना तयार करताना प्रदेश, जिल्हे वेगळे असा विचार न करता एकसंध विकास योजना तयार कराव्या लागतील. त्या त्या भागाच्या गरजा लक्षात घेऊन विकास आराखडा बनवावा लागेल आणि तो यशस्वीरीत्या राबवावा लागेल. तरच आपल्यापुढील समस्या सुटतील. असे सांगत संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन आता संपले असून, आता कामाला लागा, असे आवाहन या लेखामधून करताना दिसतात.

'साधना' साप्ताहिकाने विचार आणि विवेक पेरण्याच्या कार्यात मोलाची भूमिका बजावली. सानेगुरुजी ते डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि दाभोलकर ते आजतागायत 'साधना' साप्ताहिक अविरतपणे हे कार्य करताना दिसते. समाजशिक्षणाचे महत्त्वाचे कार्य 'साधना' अविरतपणे करत आहे. 'साधना' साप्ताहिकाने आपला दृष्टिकोन कधीही व्यावसायिक ठेवला

नाही. प्रचंड आर्थिक पडझडीच्या काळात अनेक तडजोडी केल्या, पण प्रसारमाध्यमांत निष्ठा महत्त्वाची आहे. आज नेमकी याउलट प्रसारमाध्यमांची वाटचाल दिसते. ''साधना'' साप्ताहिक या कसोटीवर आजही यशस्वी वाटचाल करताना दिसते. दिनांक १५ ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळात 'साधना' साप्ताहिकात अनेक दर्जेदार अग्रलेख प्रकाशित झाले. अनेक विषय या अग्रलेखात मांडले गेले. उदाहरणार्थ– 'ही भाषा लोकशाहीला शोभत नाही' (४ मार्च १९५०), सानेगुरुजींच्या आत्महत्येनंतर म्हणजे १७ जून १९५०च्या 'साधना' साप्ताहिकामध्ये आचार्य जावडेकर लिहितात, ''महाराष्ट्राचे आदर्श गुरुजी गेले!– आचार्य जावडेकर व ही उणीव संघटितपणे भरून काढू या!– एस. एम. जोशी'' यांचे लेख प्रकाशित झाले. यानंतर 'साधना' साप्ताहिकाच्या संपादकपदाची जबाबदारी पु. ह. पटवर्धन व शं. द. जावडेकर यांच्याकडे आली. या काळातही अत्यंत निष्ठेने त्यांनी संपादकपदाची धुरा पार पाडली.

'आशियाई आंतरराष्ट्रीय परिषद' (७ ऑक्टोबर १९५०), 'एव्हरेस्टवर नवी चढाई' (१४ जुलै १९५१), 'अणुशास्त्रांची जागतिक परिषद' (६ ऑगस्ट १९५१), 'लोकशाहीचे लांच्छन' (२७ नोव्हेंबर १९५४), 'एस. एम. जोशी यांचे उपोषण' (२६ मे १९५७), 'करुणांकित विज्ञान' (११ जानेवारी १९५८), 'आम्ही तरी दुसरे काय मागतो' (२२ फेब्रुवारी १९५८), 'एकजूट बाकी सब झूट' (१२ जुलै १९५८), 'कथणी आणि करणी' (१७ मे १९५८), 'सिंह आला पण गड गेला' (१४ फेब्रुवारी १९५९), १७ डिसेंबर १९५५ च्या 'साधना' साप्ताहिकामध्ये शं. द. जावडेकरांच्या निधनानंतर 'महाराष्ट्राच्या ज्ञानमहर्षीचे निर्वाण' हा अग्रलेख प्रकाशित झाला. तत्कालीन परिस्थितीतील महत्त्वाचे विषय 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित होत होते. 'साधना' साप्ताहिकाने सातत्याने वाचकांच्या मनाची जडणघडण केली व अनेक चळवळींना विचारांचे बळ दिले. अशा प्रकारे ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळातील 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेल्या संपादकीयांचा आढावा घेतला आहे.

## ४.६ 'साधना' साप्ताहिकातील अग्रलेखाची भाषा :

कोणत्याही मुद्रित माध्यमात उदा. साप्ताहिक, मासिक, त्रैमासिक, वार्षिक किंवा वृत्तपत्र; त्यातील 'अग्रलेख' हा त्या माध्यमाचा आणि प्रकाराचा चेहरा समजला जातो. वाचकाच्या वैचारिक जाणिवांचे भरण–पोषण करण्याचे कार्य अग्रलेख करत असतो. संपादक हा अग्रलेख लिहीत असतात. समाजजागृती, लोकशिक्षण, राष्ट्रप्रेम, बंधुभाव, एकता, स्वातंत्र्य,

विज्ञानवादी दृष्टिकोनाची रुजवणूक आदी हेतू अग्रलेखाचे असतात. तत्कालीन परिस्थितीतील महत्त्वाच्या घटना घडामोडींवर प्रकाश टाकत संपादक त्या त्या घटनेवर तटस्थपणे अग्रलेखातून विचार मांडत असतो. त्यामुळे वाचकांचे त्या त्या घटनेवर मत तयार होत असतानाही ते तटस्थपणे होत असते. 'साधना' साप्ताहिकही इतर माध्यमांप्रमाणेच काही भूमिका, हेतू निश्चित करून प्रकाशित होत होते. 'साधना'चे संस्थापक-संपादक सानेगुरुजींनी याबद्दल आपली भूमिका स्पष्ट केली होती. समाजाला शहाणे करणे, ढासळत चाललेल्या सामाजिक परिस्थितीला एकजुटीने एकत्र आणून राष्ट्रहित जोपासणे, देशातली अस्पृश्यता, जातीयता इत्यादी बाबी नष्ट करत समानता रुजवणे आदी हेतूने हे साप्ताहिक चालविले होते. 'साधना' साप्ताहिकाने अग्रलेखामध्ये हाताळलेले विषयही समाजहिताचेच आहेत. 'साधना' साप्ताहिकातील अग्रलेखाची भाषाही सडेतोड आहे. साधी-सोपी-सरळ भाषा, विषयाची खोली, वस्तुनिष्ठ मांडणी, राज्य-राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विषय हाताळण्याची कसोटी, विचारांतील सुस्पष्टता अशी अनेकविध वैशिष्ट्ये 'साधना' साप्ताहिकातील अग्रलेखाची दिसतात. ''साधना साप्ताहिकातील अग्रलेखाची भाषा तटस्थ, स्पष्ट, निःसंदिग्ध अशीच आहे. एखादा मुद्दा मांडत असताना वाचकांनाही विचार करायला लावणारी, अंतर्मुख करायला लावणारी ही अग्रलेखाची भाषा आहे. यामधून विचारांबरोबर विवेकाचीही पेरणी होत असलेली दिसते. त्याचबरोबर अग्रलेखाच्या विषयानुरूप भाषा आलेली आहे. तत्कालीन परिस्थितीतील महत्त्वाचे विषय अग्रलेखामध्ये हाताळत वाचकांचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न निष्ठेने केलेला दिसून येतो.

'साधना' साप्ताहिकाचे संस्थापक-संपादक सानेगुरुजी होते. सानेगुरुजींनी ऑगस्ट १९४८ ते १० जून १९५० पर्यंत सातत्याने 'साधना' साप्ताहिकात अग्रलेख लिहिले. त्यांच्या विचारांचे आणि लेखणीचे संस्कार आजही 'साधना'मध्ये दिसतात. हे 'साधना'चे महत्त्वाचे वेगळेपण आहे.

## ४.७ ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडातील संपादकांची भूमिका :

भारतीय स्वातंत्र्य संग्रामात एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे आणि सानेगुरुजी या तिघांनी सन १९३० ते १९४७ या कालखंडात एकत्रित काम केले. सानेगुरुजींच्या निधनानंतर एस. एम. जोशी आणि नानासाहेब गोरे या दोघांनी त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत 'साधना' साप्ताहिकाचे, ट्रस्टचे विश्वस्त व संपादक अशा विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. या दोघांमुळेच

'साधना'च्या संपादकांनी गुरुजींचा वारसा अविरत चालवला. नानासाहेब गोरे व एस. एम. जोशी हे 'साधना'च्या आपत्तीच्या आणि कसोटीच्या प्रसंगात संपादकांच्या समवेत उभे राहिले. सामाजिक न्याय व समता या ध्येयासाठी त्यांनी 'साधना'ला सतत कार्यरत ठेवले.

सानेगुरुजींनी भारतीय स्वातंत्र्याच्या स्वप्नपूर्तीसाठी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. हे साप्ताहिक ७४ वर्षे यशस्वी वाटचाल करत आहे. सानेगुरुजींच्या विचाराने व त्यांच्या आचरणाने, त्यांच्या सहवासातील, त्यांच्या विचारांची प्रेरणा लाभलेल्या संपादकांनी, लेखकांनी आणि वाचकांनी 'साधना' साप्ताहिकाला एका उंचीवर नेऊन ठेवले. या साप्ताहिकाचे वाचक विविध स्तरांतील, क्षेत्रातील असून वैचारिकदृष्ट्या जागृत असल्याने विविध प्रसंगी 'साधना'तून मार्गदर्शन व्हावे. असे त्यांना वाटते. काही घटना प्रसंगाच्या निमित्ताने 'साधना' कोणती भूमिका स्वीकारते किंवा 'साधना'ची काय भूमिका असेल? याकडे मुख्य प्रवाहातील माध्यमांचे बारकाईने लक्ष असते. वैचारिक नियतकालिकाचा प्राण राजकीय भूमिकेत आहे. संपादक हा वाचक आणि लेखक यांच्यातील दुवा असतो. बहुतांशी वाचक व लेखक यांना संपादन प्रक्रियेविषयी फारशी माहिती नसते.

या साप्ताहिकाचे संस्थापक सानेगुरुजींचे दिनांक ११ जून १९५० रोजी निधन झाल्यावर आचार्य जावडेकर व रावसाहेब पटवर्धन हे सहा वर्षे, यदुनाथ थत्ते पंचवीस वर्षे, वसंत बापट व ग. प्र. प्रधान चौदा वर्षे, डॉ. नरेंद्र दाभोलकर पंधरा वर्षे व सन २०१३ पासून विनोद शिरसाठ अशी ध्येयवादी संपादकांची परंपरा 'साधना'ला आहे. 'विषमता व वैरभव नष्ट करण्याची थोर साधना' करण्याच्या ध्येयातून हे साप्ताहिक जन्म घेत आहे. हे वाक्य गुरुजींच्या पहिल्या संपादकीय निवेदनात आहे. भारतीय राज्यघटनेचे प्रतिबिंबही या संपादकीयात दिसते. त्यानंतर संपादक बदलल्यावर अंकाचे स्वरूपात बदल झाला; परंतु भारतीय राज्यघटना व मूल्ये हा 'साधना'चा गाभा कायम राहिला.

संपादकीय भूमिकेचा विचार करताना वाचकांना अस्वस्थ करणाऱ्या लेखनाला 'साधना'त भरपूर संधी द्यायची पण नाउमेद करणारे लेखन शक्यतो टाळण्याचे धोरण 'साधना'च्या सुरुवातीपासून आत्तापर्यंत दृष्टिक्षेप टाकल्यास दिसून येते. 'साधना' हे मुख्यता राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपाचे लेखन प्रसिद्ध करणारे नियतकालिक आहे. सांस्कृतिक प्रकारच्या लेखनात जास्त प्रमाणात साहित्य, काही प्रमाणात कला व क्रीडा या

विषयावरील लेखन आहे. काही अपवाद वगळता हे लेखन वादाचा विषय बनले नाही. पु. ह. पटवर्धन यांनी दिनांक १५ ऑगस्ट १९५६ रोजी 'साधना' ''संदर्भातील निवेदनात 'साधना' साप्ताहिक कोणत्याही राजकीय पक्षाचे मुखपत्र म्हणून चालवू नये, तर लोकशाही सत्याग्रही समाजवादाच्या मूल्यांना वाहिलेले वैचारिक व सांस्कृतिक पत्र असे स्वरूप राहावे.''[१९] असा विचार व्यक्त केला. यावरून पु. ह. पटवर्धन यांची संपादक म्हणून भूमिका लक्षात येते.

सानेगुरुजींनी 'साधना' साप्ताहिक सुरू केल्यापासून यदुनाथ थत्ते यांचा 'साधना'शी ऋणानुबंध होता. सानेगुरुजींच्या इच्छा–आकांक्षांचे आकलन यदुनाथ थत्ते यांना झाले होते. गुरुजींच्या आंतरभारतीचे स्वप्न त्यांनी आत्मसात केले. तशी आत्मसात करणारी मंडळी फार थोडी होती. ते स्वप्न साकार करण्यासाठी ते आपली वाणी आणि लेखणी राबवत होते. यदुनाथ थत्ते म्हणायचे 'आचार्य जावडेकर आणि सानेगुरुजी यांच्यात विलक्षण असे वैचारिक तादात्म्य होते. आचार्य विचारांच्या पातळीवर जे सांगत. ते सानेगुरुजी भाषेच्या पातळीवर समजावीत. आचार्य प्रौढांसाठी लेखनप्रपंच करत होते, तर सानेगुरुजी मुलांच्यात मुलांना वासल्याने घास भरवीत होते.' यावरून 'साधना' साप्ताहिकाचे संपादक थत्ते यांनी आचार्य जावडेकर आणि सानेगुरुजी यांच्या वैचारिक भूमिकेविषयी विचार मांडले आहे.

सानेगुरुजी 'भाकरीपेक्षा या राष्ट्राला आज नवविचारांची अधिक गरज आहे.' असे म्हणत. याच उद्देशाने त्यांनी 'साधना'ची सुरुवात केली. यापूर्वी गुरुजींनी 'विद्यार्थी' मासिक, 'काँग्रेस' साप्ताहिक व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'कर्तव्य' हे दैनिक सुरू केले होते. त्यानंतर दिनांक १५ ऑगस्ट १९४८ ला 'साधना' साप्ताहिक सुरू केले. त्यांनी आपल्या अखेरच्या पत्रात 'लोकशाही समाजवाद हे ध्येय धरा. ते तारील. जातीय व हिंसक लोकशाही, सत्याग्रही दृष्टिकोनातून भारतात रक्तपात न होता समाजवाद येवो. स्वातंत्र्यासह समाजवाद फुलेल. ही अपेक्षा सानेगुरुजी साधनेसंबंधी लिहून ठेवतात, ''मी 'साधना' चालवितो काही विचार जनतेत जावे वाटतात म्हणून; मी ती साहित्यसेवा म्हणून करीत नसून लहानशी जीवनसेवा म्हणून करीत आहे. सभोवतालचा सारा संसार सुखी आणि समृद्ध व्हावा. ज्ञान–विज्ञान संपन्न व कला संपन्न नि प्रेमळ व्हावा. ही एकच तळमळ आहे.'' या गुरुजींनी दाखवलेल्या मार्गाने 'साधना' साप्ताहिकाचे संपादक आचार्य जावडेकर व पु. ह. पटवर्धन यांनी गुरुजींच्या मृत्यूनंतर चालविण्याचा कसोशीने प्रयत्न केला. परंतु गुरुजींइतके यश या संपादकांना मिळाले नाही.

मराठी भाषेतील एक चांगल्या दर्जाचे शैक्षणिक, सांस्कृतिक व माहितीपूर्ण साप्ताहिक अशी ओळख 'साधना'ने कायम ठेवली. या साप्ताहिकातून मसालेदार, मनोरंजन किंवा करमणूक करणारे लेखन प्रसिद्ध होत नाही. ही या साप्ताहिकाची मर्यादा. स्वातंत्र्योत्तर काळातील जीवनाचे कोणतेही क्षेत्र उपेक्षित राहू नये, असा विचार करणारे साहित्य साधनेत येत असते. जीवनाची समग्रता, एकता व अखंडता समोर ठेवून साधनेत लिखाण प्रसिद्ध होते. लोकांना विचार करायला लावणे ही साधनेची भूमिका आहे.

दिनांक १५ ऑगस्ट १९६० रोजी 'स्वातंत्र्यदिन' विशेषांकाच्या मनोगतात देशाच्या स्वातंत्र्य दिनाच्या पहिल्या वर्धापनदिनापासून वैचारिक स्वातंत्र्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणाऱ्या आणि वैचारिक साहित्यातून मराठी मनाची मशागत करणाऱ्या 'साधना' साप्ताहिकाची सुरुवात झाली, असे संपादकीय निवेदनात यदुनाथ थत्ते लिहितात. यावरून साधन वैचारिक नियतकालिक आहे हे लक्षात येते.

आचार्य जावडेकर म्हणतात, ''पत्रकारिता हा केवळ पोट भरण्याचा व्यवसाय नसून त्यामागे ध्येयवादी प्रेरणा आहे. स्वार्थ त्यागपूर्वक देशाची आणि समाजाची सेवा करण्याचे ते अशिधारव्रत आहे.'' टिळक-आगरकर यांच्याप्रमाणे आचार्य जावडेकर पत्रकारिता मानत असत. जावडेकरांनी स्वराज्य, लोकशिक्षण, नवशक्ती, चित्रमय जगत, नवभारत, लोकशक्ती आणि 'साधना' अशा विविध नियतकालिकांतून आपले विचार मांडले होते. लोकमान्य टिळक व गोपाळ गणेश आगरकर यांच्याप्रमाणे सडेतोड विचार मांडणारे संपादक आचार्य जावडेकर होते. त्यांचा गौरव करताना वसंत बापट लिहितात, 'आचार्य जावडेकर यांचे वाङ्मय आणि पत्रकारिता पांडित्यपूर्ण प्रखरतेने भरलेली आहे.' यावरून असे दिसते की, जावडेकरांनी मराठी भाषेमध्ये जाणीवपूर्वक लेखन करून मराठी संस्कृतीच्या पायाभरणीचे कार्य केले. आज भाकरीपेक्षा नवविचारांची गरज समाजाला अधिक आहे. म्हणून मी 'साधना' चालवतो. ती एक जीवनसेवाच आहे, अशी गुरुजींचे धारणा होती. या उद्देशाने 'साधना' कार्यरत आहे. विचारप्रधान, विधायक आणि सुरुची राखण्यासाठी दक्षता बाळगणारे पत्र सानेगुरुजी आणि आचार्य जावडेकर यांच्या अथक परिश्रमातून निर्माण झाले आहे. साहित्याची जीवनाशी बांधीलकी असलीच पाहिजे. असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळेच साधनेतून अशा साहित्याला प्रसिद्धी मिळाली. जे समाजजीवनाच्या सुख-दु:खाशी समरस होते. वाचकांना जे हवे ते

वृत्तपत्रांनी अवश्य द्यावे. पण त्याहीपेक्षा अधिक काही द्यावे. असे गांधीजी म्हणत. मानवी समाजाचे हित साधण्याचे व्रत या साप्ताहिकाने कधी सोडले नाही. साधनेची पत्रकारिता नैतिक व मूल्यप्रधान आहे. यदुनाथ थत्ते यांनी उद्योग, शिक्षण, सांस्कृतिक विषयांबरोबरच वाचक वर्गाला लोकशाही, समाजवाद व देशाची एकात्मता अबाधित राखण्याच्या दृष्टीने जनमत तयार केले. तर आचार्य जावडेकर लोकशाही, सत्याग्रह व समाजवाद या भूमिकेतून लेखन करीत असून ते साहित्याचे रसिक आस्वादक होते. त्यांना साहित्यप्रकाराची व विविध भाषांतील साहित्याची जाण होती. 'साधना' साप्ताहिकाचे संपादक सानेगुरुजी, पु. ह. पटवर्धन, आचार्य जावडेकर, यदुनाथ थत्ते यांच्याबरोबरच वसंत बापट, दुर्गा भागवत, मंगेश पाडगावकर, सदानंद वर्दे, नारायण डोळे यांसारख्या सहसंपादकांच्या आणि साहित्यिकांच्या अभ्यासूवृत्तीमुळे ''साधना'' साप्ताहिकातून कथा, कविता, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, चरित्र, ललितलेखन, विविध भाषांतील साहित्य व साहित्यिकांचा परिचय, वैज्ञानिक दृष्टिकोन याविषयीचे लेखन सन ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडात करण्यात आले.

सानेगुरुजींच्या भूमिकेशी या काळातील संपादकांनी आपली दूरदृष्टी ठेवल्यामुळे साहजिकच 'साधना' साप्ताहिकाने विचार पेरण्याचे काम केले. दिनांक २४ जून १९५० रोजी 'गुरुजींची साधना महाराष्ट्राची होवो!' या संपादकीय लेखातून 'साधना'च्या भविष्याची वार्ता व्यक्त झाली आहे. प्रस्तुत कालखंडात प्रकाशित झालेल्या संपादकीयातून 'आमच्या राजकारणाचे नैतिक अधिष्ठान' (१४ जानेवारी १९४९), 'मानसिक क्रांतीशिवाय प्रगती नाही' (२० मे १९४९), 'समाजवादी पक्ष उद्याची आशा' (२५ जून १९४९), 'संस्कृतीचा अर्थ' (३० जुलै १९४९), 'जाती धर्मनिरपेक्ष भारत' (१ एप्रिल १९५०), 'भारतीय समाजवाद आणि सत्याग्रह' (२३ डिसेंबर १९५०), 'समाजवादाशिवाय तरणोपाय नाही' (१३ जानेवारी १९५१), 'गुरुजींची मनीषा' (११ जून १९५१), 'भारताचा पाचवा स्वातंत्र्यदिन' (११ ऑगस्ट १९५१), 'सार्वत्रिक निवडणुकांचा रागरंग' (२४ नोव्हेंबर १९५१), 'निवडणुकीबाबत साधनाची भूमिका' (९ जानेवारी १९५२), 'साधनेची परंपरा आणि इमान' (१७ मे १९५२), 'उत्तर प्रदेशातील जमीनदारांचा विनाश' (५ जुलै १९५२), 'लोकशाही आचारविचार' (२४ जानेवारी १९५३), 'वृत्तपत्रसृष्टीतील अंदाधुंदी' (२८ मार्च १९५३), 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही' (१३ जून १९५३), 'प्रांत पुनर्रचना कमिशनची नेमणूक' (२६ डिसेंबर १९५३), 'शिक्षणाचे समग्र

नियोजन' (१६ जानेवारी १९५४), 'संयुक्त महाराष्ट्र आणि मुंबई' (२७ फेब्रुवारी १९५४), 'लोकशाही आणि कायदेभंग' (१७ जुलै १९५४), 'आराम हराम हैं' (३१ जुलै १९५४), 'करार नको सहकार हवा' (२५ सप्टेंबर १९५४), 'आवडीची बावडी' (२२ जानेवारी १९५५), 'जगन्नाथाचा रथ धावू लागला' (२ एप्रिल १९५५), 'महाराष्ट्राच्या ज्ञानमहर्षींचे निर्वाण' (१७ डिसेंबर १९५५), 'संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाची नवी दिशा' (१८ फेब्रुवारी १९५६), 'घायल की गत घायल' (२५ ऑगस्ट १९५६), 'मतदारांना आव्हान' (२६ जानेवारी १९५७), 'निवडणूक आणि जयप्रकाशजी' (२ मार्च १९५७), 'भारतीय प्रजासत्ताक चिरायू होवो!' (२४ जानेवारी १९५९), 'आघाडीचा चौघडा ही दुहीची नांदी' (४ एप्रिल १९५९), 'अजून थोडी रात्र आहे जागे रहा' (२९ ऑगस्ट १९५९), 'हिमालय थिटा झाला' (५ सप्टेंबर १९५९), 'लोकशाही समाजवादी चळवळीचे पाव शतक' (७ नोव्हेंबर १९५९), 'न्यायदेवता आणि राजसत्ता' (१९ मार्च १९६०) आदि विषयांवरील संपादकीयांमधून संपादकांची भूमिका लक्षात येते.

## ४.८ 'साधना' साप्ताहिकाची यशस्वी वाटचाल :

सानेगुरुजी 'साधना'संबंधी लिहून ठेवतात, ''मी साधना चालवितो काही विचार जनतेत जावे वाटते म्हणून; मी ती साहित्यसेवा म्हणून करीत नसून लहानशी जीवनसेवा म्हणून करीत आहे. सभोवतालचा सारा संसार सुखी आणि समृद्ध व्हावा ज्ञान-विज्ञान व कला संपन्न नि प्रेमळ व्हावा. ही एकच तळमळ आहे.'' या गुरुजींनी दाखवलेल्या मार्गाने 'साधना' साप्ताहिकाचे संपादक आचार्य जावडेकर आणि पु. ह. पटवर्धन यांनी गुरुजींच्या मृत्यूनंतर चालविण्याचा कसोशीने प्रयत्न केला. परंतु गुरुजींइतके यश या संपादकांना मिळाले नाही. मराठी भाषेतील एक चांगल्या दर्जाचे शैक्षणिक, सांस्कृतिक व माहितीपूर्ण साप्ताहिक अशी ओळख साधनेने निर्माण केली. या साप्ताहिकातून मसालेदार, मनोरंजन किंवा करमणूक करणारे लेखन प्रसिद्ध होत नाही. ही या साप्ताहिकाची मर्यादा. स्वातंत्र्योत्तर काळातील जीवनाचे कोणतेही क्षेत्र उपेक्षित राहू नये. असा विचार करणारे साहित्य साधनेत येत असते. लोकांना विचार करायला लावणे ही साधनेची भूमिका आहे. दिनांक २४ मे १९५२ च्या 'साधना' साप्ताहिकात 'साधनेसाठी संचार' या शीर्षकांतर्गत यदुनाथ थत्ते यांनी सानेगुरुजींच्या मृत्यूनंतर या साप्ताहिकाची वाचक संख्या घटत असल्याचे लक्षात येताच महाराष्ट्रभर फिरून 'साधना'ची वाचक संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न केले. गुरुजींच्या निधनानंतर साधनेचा वाचकवर्ग अनेक

कारणांनी घटला. अर्थात सुरुवातीपासूनच आर्थिकदृष्ट्या 'साधना' तोट्यातच होते. साधनेची ग्राहकसंख्या वाढली नाही तर 'साधना' साप्ताहिक बंद करावे लागेल, असा विचारही साधनेच्या विश्वस्तांनी केला होता. परंतु यदुनाथ थत्ते यांनी प्रवास करून, समाजातील अनेक लोकांना भेटून साधनेची वाचकसंख्या, वर्गणीदार वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. या निमित्ताने पुणे–सोलापूर–कोल्हापूर अशा महाराष्ट्रातल्या विविध भागांत त्यांनी दौरे करून साधनेसाठी वाचकवर्ग वाढविण्याचा प्रयत्न केला. इतकेच नाही तर 'साधना' साप्ताहिकाने महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या भागात 'साधना वाचक संमेलन' आयोजित केले. 'साधना'च्या तत्कालीन संपादकांनी 'साधना'शी संबंधित असणाऱ्या वाचकांच्या 'साधनासंदर्भातल्या अपेक्षा व साधनाची भूमिका' या विषयावर विचारविनिमय या कालखंडात घडवून आणले. इतकेच नाही तर रावसाहेब पटवर्धन, आचार्य जावडेकर, एस. एम. जोशी, मधु लिमये यांचे मार्गदर्शन जोपर्यंत साधनेला आहे तोपर्यंत 'साधना' लोकजागृतीचे काम चालू ठेवेल. साधनेच्या लिखाणाद्वारे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्फूर्ती मिळेल. साधनेचे जीवितकार्य सफल होईल. अशी अपेक्षा १८ सप्टेंबर १९५४च्या ठाणे येथे संपन्न झालेल्या 'साधना' संमेलनाच्या निमित्ताने व्यक्त करण्यात आली. दिनांक ४ जून १९५५ च्या 'साधना' साप्ताहिकात सानेगुरुजींच्या मृत्यूनंतर 'साधना' साप्ताहिक, छापखाना व प्रकाशन यांच्या संचालनाची व्यवस्था करण्यासाठी एक विश्वस्त मंडळ नेमले. साप्ताहिकाचे संपादक, लेखक यांनी 'साधना'वरील प्रेमाखातर विनावेतन काम केले. परंतु 'साधना'ची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस खालावत गेली. म्हणून दिनांक ११ जून १९५५ रोजी झालेल्या बैठकीत 'साधना' दिनांक १५ ऑगस्ट १९५५ पासून बंद करण्याचा निर्णय विश्वस्तांनी घेतला होता. पण दिनांक १५ ऑगस्ट १९५५ पर्यंत आठ ते दहा हजार रुपयांचा निधी साधनेसाठी जमा झाला तरच सध्याच्या संकटातून 'साधना' वाचविता येईल असा विचार मांडला. हे कार्य पुढे चालू ठेवायचे असेल तर ग्राहकसंख्या किमान पंधराशे वाढली पाहिजे. असे निवेदन अण्णासाहेब सहस्रबुद्धे, पु. ह. पटवर्धन व एस. एम. जोशी यांनी साधनेतून प्रकाशित केले. 'साधनेच्या वाचकांशी हितगुज' या शीर्षकाखाली दिनांक १३ मार्च १९५६ रोजी निवेदन देऊन साधनेचा प्रचार व प्रसार व्हावा. यासाठी सहकार्य करण्याचा हेतू या निवेदनातून व्यक्त करण्यात आला. तत्कालीन मराठी भाषकांची साडेतीन कोटी लोकसंख्या असून वाचकसंख्या कमी असल्याचा उल्लेख त्यात आला आहे. या सर्व परिस्थितीचा विचार

करता आपल्या असे निदर्शनास येते की, 'साधना' साप्ताहिकाच्या संपादकांनी सानेगुरुजींच्या निधनानंतर 'साधना' साप्ताहिक अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवत असताना 'साधना'च्या ध्येयधोरणांविषयीची बांधीलकी स्वीकारल्याचे दिसून येते.

दिनांक १५ ऑगस्ट १९४८ला संस्थापक–संपादक सानेगुरुजी यांनी 'साधना' साप्ताहिकाचे साधारणपणे तीन हजार अंक प्रकाशित केले सद्यःस्थितीत १० ते १२ हजार अंक प्रकाशित होतात. याचा अर्थ काळ बदलला पण 'साधना'चा वाचकवर्ग एका विशिष्ट विचारांचा आहे. 'साधना' हे वैचारिक मुखपत्र असल्यामुळे साहजिकच या नियतकालिकातून सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक विषयांबरोबरच येणारे साहित्यविषयक लेखनही वाचकांना अंतर्मुख करणारे आहे. प्रस्तुत संशोधन कालखंडामध्ये या साप्ताहिकात लेखन करणारे जवळपास १२५ पुरुष लेखक व २९ स्त्री लेखिका असल्याचे दिसून आले. साहजिकच त्या काळात स्त्रियांचे लेखन करण्याचे प्रमाण अल्प असल्याचे निदर्शनास आले. प्रस्तुत संशोधन कालखंडामध्ये लेखन करणारे साहित्यिक पुढच्या काळात लोकप्रिय साहित्यिक झाले. भारतातील वेगवेगळ्या भाषांतील साहित्यिकांची व त्यांच्या साहित्याची ओळख आंतरभारतीसारख्या लेखनाच्या माध्यमातून वाचकांना झाली. भूदान चळवळ, सर्वोदय चळवळ व भाषावार प्रांतरचना, गोवा मुक्तिसंग्राम, हैदराबाद मुक्तिसंग्राम यानिमित्ताने आलेले लेखनही वाचकांना विचार करण्यास प्रवृत्त करते. या लेखनातून व्यापक दृष्टिकोन वाचकांसमोर मांडला आहे. या साप्ताहिकात अरविंद देशपांडे, रामचंद्र ढेरे, हे दोघे प्रूफरीडिंग करत होते, तर वसंत बापट, दुर्गा भागवत, मंगेश पाडगावकर या संपादकांना साहित्याविषयीची आवड व जाण होती. साहजिकच 'साधना' साप्ताहिकातून संशोधन कालखंडात दर्जेदार साहित्य प्रकाशित होत होते.

## ४.९ 'साधना' साप्ताहिकाचे स्वरूप :

''साधना केवळ ललित साहित्यासाठी वाहिलेले साप्ताहिक नाही. वाचकांना जीवनाच्या सर्व अंगांचा परिचय करून देऊन त्यांचे स्वत:चे मन सुजाण बनविणे. हे 'साधना'चे जीवितकार्य आहे. साधनेने आपले अंतरंग बदलले नाही. राजकारण, समाजकारण, अर्थशास्त्र, संशोधन, विधायक कार्य यासंबंधीच्या लेखनाऐवजी गल्लाभरू सिनेमांवरील नट्यांच्या छायाचित्रांसह परीक्षणे, साप्ताहिक, मासिक, वार्षिक भविष्य, रेसच्या घोड्यांचे अंदाज, वैयक्तिक शिवीगाळ करणारे लेख इत्यादी साहित्य जर छापले असते, तर कदाचित साधनेचा खप हजारांनी

वाढेलही; पण ते साधनेचे क्षेत्र नव्हे, साधनेची तशी दृष्टी नाही. साधनेचे स्वरूप वैचारिक आहे, सांस्कृतिक आहे. पक्ष अभिनिवेश साधनेला नाही.''[२०] या शब्दात दिनांक १५ ऑगस्ट १९५६ च्या अंकात 'साधना' साप्ताहिकासंदर्भातील विवेचन आले आहे.

या साप्ताहिकात सानेगुरुजींच्या कालखंडात कविता, कथा, क्रमश: नाटक व कादंबरी प्रकाशित करण्यात आली. विश्वभारती–आंतरभारती या शीर्षकाखाली विविध भाषांतील साहित्य व साहित्यिकांची ओळख करून देण्यात आली. धडपडणारी मुले, साधनेच्या कथा व कथा या सदरातून कथा लेखन प्रकाशित झाले. पुढे पु. ह. पटवर्धन व आचार्य जावडेकर संपादक झाल्यावर या लेखनाबरोबरच वाचकांचा पत्रव्यवहार, सानेगुरुजींचा एखादा–दुसरा लेख, पुस्तक परीक्षण, ललित साहित्य, आंतरभारती, समाजाचे अज्ञात आधार ही सदर साधारपणे महिन्यातून एकदा 'साधना'तून प्रकाशित होऊ लागली. याच संपादकांच्या कालखंडात १९५१ पासून 'साधना' दिवाळी अंकाला सुरूवात केली. क्षणतरंग हे नवे सदर सुरू करण्यात आले. पुढील अंकी प्रसिद्ध होणाऱ्या लेखांची अगोदरच्या अंकात माहिती या काळातील संपादकांनी द्यायला सुरुवात केली. या संपादकांच्या काळात अग्रलेखाच्या खाली लेखकाचे नाव देण्याची पद्धत होती, तर यदुनाथ थत्ते संपादक झाल्यावर ही पद्धत बंद झाल्याचे लक्षात येते.

यदुनाथ थत्ते यांच्या संपादकीय कालखंडात सामाजिक बांधीलकीतून अग्रलेखांचे लेखन केले. त्यांनी साने गुरुजींचा वारसा पुढे नेला. त्यांनी 'साधना'ला लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम बनविले. त्यांच्या कालखंडात भुदान व ग्रामदान चळवळींच्या माध्यमातून समाजपरिवर्तन व वैचारिक बदलासाठी प्रयत्न केले. त्यांच्या कालखंडातील बालसाहित्य लिहिणाऱ्या लेखकांमुळे 'साधना'चे अंतरंग अधिक बहरले. महत्त्वाच्या घटनांसंबंधी 'साधना'तून लेखन व्हावे; हा त्यांचा दृष्टिकोन होता. 'साधना'तून कुमारांसाठी लिहिलेले साहित्य नियमित प्रकाशित व्हावे. दरवर्षी सानेगुरुजींच्या पुण्यतिथीस ११ जून रोजी 'साधना कुमार' अंक प्रसिद्ध करण्याचा त्यांनी उपक्रम सुरू केला तर 'साधना'च्या दिवाळी अंकात विविध भारतीय भाषांमधील कथांना स्थान देऊन दिवाळी अंकाचे वाङ्मयीन मूल्य वाढविले.

# संदर्भ टीपा


१. कानडे रामचंद्र गोविंद, मराठी नियतकालिकांचा इतिहास (१८३२–१९३७), कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई, प्र. आ., १९३८, पृ. क्र. २७.

२. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.), हीरकमहोत्सवी निवडक साधना, खंड १, 'साधना'तील सानेगुरुजी, साधना प्रकाशन, पुणे, प्र. आ., जून २००७, पृ. क्र. १६१.

३. कित्ता पृ. क्र. १६२.

४. कित्ता पृ. क्र. १६२–१६३.

५. कित्ता पृ. क्र. १६७.

६. शहा मु. ब. (डॉ.), संपादक : कार्ये आणि जबाबदारी, प्रकाशक : डॉ. राजेंद्र कांकरिया कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्र. आ., २०००, पृ. क्र. ८.

७. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.), हीरकमहोत्सवी निवडक साधना, खंड २, साधनातील निवडक संपादकीय, साधना प्रकाशन, पुणे, प्र. आ., जून २००७, प्रस्तावना, पृ. क्र. १ व २.

८. सानेगुरुजी (संपा.) 'साधना' साप्ताहिक, दिनांक १५ ऑगस्ट १९४८, संपादकीय, पृ. क्र. १–२.

९. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, गुरुजींची साधना महाराष्ट्राची होवो!, दिनांक २४ जून १९५०, संपादकीय पृ. क्र. १.

१०. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, निवडणुकीबाबत साधनेची भूमिका, दिनांक ५ जानेवारी १९५२, पृ. क्र. १.

११. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, सानेगुरुजी, दिनांक १३ जून १९५३, पृ. क्र. १.

१२. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, प्रांत पुनर्रचना कमिशनची नेमणूक, दिनांक २६ डिसेंबर १९५३, पृ. क्र. १.

१३. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), साधना साप्ताहिक, जपून चला–जपून बोला, दिनांक १९ मार्च १९५५, पृ. क्र. १.

१४. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग.(संपा.), हीरकमहोत्सवी निवडक साधना, खंड ०२, ‘साधना’तील निवडक संपादकीय, साधना प्रकाशन, पुणे, प्र. आ., २००७, पृ. क्र. १५.

१५. थत्ते यदुनाथ (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, विनोबाजी– महाराष्ट्राच्या क्षेमलाभासाठी या! दिनांक १२ सप्टेंबर १९५९, संपादकीय, पृ. क्र. १.

१६. थत्ते यदुनाथ (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, विदर्भवासीयांना स्नेहनिमंत्रण– एस. एम. जोशी, दिनांक ५ सप्टेंबर १९५९, पृ. क्र. १.

१७. थत्ते यदुनाथ (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, वाटाघाटीचे व्यर्थ गुऱ्हाळ, दिनांक १६ एप्रिल १९६०, पृ. क्र. १.

१८. थत्ते यदुनाथ (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, आता कामाला लागा– विठ्ठलराव घाटे, दिनांक २७ एप्रिल, १९६०, पृ. क्र. १.

१९. पटवर्धन पु. ह., (संपा.) साधना ‘निवेदन’, साप्ताहिक, दिनांक १५ ऑगस्ट १९५६, पृ.क्र. १.

२०. कित्ता, पृ.क्र. १.

## ब) ‘साधना’ साप्ताहिकाचे स्वरूप आणि अंतरंग :

### ४.१० प्रास्ताविक :

सानेगुरुजींनी ‘साधना’च्या माध्यमातून मराठी माणसाच्या मनावर संस्कार केले. ते म्हणत समाजात परिवर्तन घडवून आणायचे असेल, तर लहान मुलांवर संस्कार केले पाहिजेत. त्यासाठी ‘साधना’ साप्ताहिकामधून त्यांनी मुलांसाठी राखीव जागा ठेवली होती. हे ‘साधना’ साप्ताहिकाच्या कार्याचे वेगळेपण दिसते. कारण ‘साधना’पूर्वी लहान मुलांसाठी काही तरी लिहिणे आणि ते प्रकाशित करणे हे कुणाच्या ध्यानीमनी नव्हते. सानेगुरुजींनी मात्र लहान मुलांसाठी आपल्या साप्ताहिकामधून संस्कार करणाऱ्या कथांच्या लेखनाचे सदर चालविले. यातून साने गुरुजींची समाजपरिवर्तनाची तळमळ व दृष्टी अधोरेखित होते. दिनांक १५ ऑगस्ट १९४८च्या पहिल्याच अंकात सानेगुरुजींनी मुलांसाठी पान राखून ‘साधना’ साप्ताहिकातील बाल विभागाचे बीजारोपण केले. मोठ्यांच्या नियतकालिकात लहानग्यांची लुडबूड नको अशी मानसिकता असणाऱ्या कालखंडात सानेगुरुजींनी बालविभाग सुरू केला. ‘साधना’ साप्ताहिकाच्या पहिल्याच अंकातील संपादकीय भूमिका मांडताना ते म्हणतात, ‘‘आपण मुलांच्या संगतीत रमू. ती आपल्याला गोष्टी–गमती सांगतील, आपण त्यांना सांगू.’’[१]

यावरून असे निदर्शनास येते की, मोठ्या माणसांनी मुलांचे विचार, लेखन, दृष्टिकोन याबद्दल जागृत असावे. त्यांना वाचनाच्या दृष्टीने प्रोत्साहन द्यावे, ही भूमिका लक्षात घ्यावी लागेल. या लेखनात त्यांनी बापूजींच्या गोड गोष्टी, सुंदर पत्रे, सुधास पत्रे, चरित्र, देशभक्तिपर कथा, कविता, मुलांना प्रोत्साहन व देशभक्तीची जाणीव निर्माण होणाऱ्या वीरांच्या कथा ते प्रकाशित करत होते. त्यांच्या या लेखन संस्कारातून पुढे अनेक पिढ्या तयार झाल्या.

### ४.११ ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडातील ‘साधना’चे संपादक :

दिनांक १५ ऑगस्ट १९४८ ला ‘साधना’ साप्ताहिक पांडुरंग सदाशिव साने ऊर्फ सानेगुरुजी यांनी सुरू केले. दिनांक १५ ऑगस्ट १९४८ ते १० जून १९५० या कालावधीत ‘साधना’ साप्ताहिकाचे संस्थापक–संपादक सानेगुरुजी होते. सानेगुरुजींच्या मृत्यूनंतर पु. ह. पटवर्धन आणि शं. द. जावडेकर यांनी २४ जून १९५० ते १० डिसेंबर १९५५ पर्यंत संपादकपदाची धुरा सांभाळली, तर पु. ह. पटवर्धन हे दिनांक १७ डिसेंबर १९५५ ते १५ ऑगस्ट १९५६ पर्यंत ‘साधना’ साप्ताहिकाचे संपादक होते. यदुनाथ थत्ते यांच्या

मार्गदर्शनाखाली वसंत बापट, सदानंद वर्दे, मंगेश पाडगावकर, दुर्गा भागवत, नारायण डोळे यांनी दिनांक २५ ऑगस्ट १९५६ ते ३१ जुलै १९६५ पर्यंत 'साधना' साप्ताहिकाचे संपादक म्हणून काम पाहिले.

दिनांक ११ जून १९५० साली सानेगुरुजींच्या निधनानंतर आचार्य जावडेकर आणि रावसाहेब पटवर्धन या दोघांनी 'साधना' साप्ताहिकाच्या संपादकपदाची धुरा सांभाळली. सानेगुरुजींनी 'साधना' साप्ताहिकावर भावनिक संस्कार केले, तर बुद्धिवादी विचारांचे बाळकडू या दोन संपादकांनी दिले. या दोन संपादकांच्या काळात नियोजनविषयक एक लेखमाला लिहिली. सानेगुरुजींच्या निधनानंतर 'साधना' साप्ताहिकाचे साधना प्रेस, प्रकाशन आणि साप्ताहिक चालविण्यासाठी एक सार्वजनिक विश्वस्त मंडळ निर्माण केले. त्यांच्या अखेरच्या इच्छेनुसार श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे, रावसाहेब पटवर्धन, एस. एम. जोशी, डॉ. पी. व्ही. मंडलिक, श्रीरंग वरेरकर, मधु लिमये, श्री. नारायणराव गोरे यांनी 'साधना' साप्ताहिकाच्या सर्व व्यवहारांची जबाबदारी स्वीकारली. त्यांना आचार्य भागवत व आचार्य जावडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. आचार्य जावडेकरांवर महात्मा गांधी व नेहरूंच्या साम्यवादाचा प्रभाव होता. अशा स्थितीत आचार्य जावडेकर आणि पु. ह. पटवर्धन यांनी संपादक म्हणून काम केले.

यदुनाथ थत्ते यांच्या अंगी निष्ठा, श्रमशीलता व नम्रता हे गुण होते. त्यांच्या नेतृत्वाखाली सहसंपादक म्हणून श्री. वसंत बापट, प्रा. सदानंद वर्दे, कवी मंगेश पाडगावकर, श्रीमती दुर्गा भागवत यांनी पुढे उपसंपादक म्हणून 'साधना' साप्ताहिकाची धुरा सांभाळली.

'साधना' साप्ताहिकात लेखन करणारे लेखक व सहकारी सहाय्यक केवळ मैत्रीखातर लेखन करून आपला अमूल्य वेळ 'साधना' साप्ताहिकास देत होते. साधनेचे विश्वस्त, संपादक मंडळ, राष्ट्र सेवादलातील प्रमुख, कुमार, कुमारी व प्रजा समाजवादी पक्षातील तरुण म्हणजे साधनेचे कुटुंब होते. 'साधना' साप्ताहिकाचे विशेष म्हणजे कोणतेही संघटन नाही तरीही जाती-धर्मनिरपेक्ष समतावादी लोकशाहीचा व सत्याग्रही समाजवादाचा आदर्श मान्य करणारे सहप्रवासी हे 'साधना' साप्ताहिकाचे विशेष होय.

'साधना' साप्ताहिक मुंबईहून पुण्याला स्थलांतर झाल्यावर प्रा. वसंत बापट, प्रा. मंगेश पाडगावकर, प्रा. सदानंद वर्दे यांचे सहाय्य मिळणे अशक्य झाले. पण पुण्यात स्थलांतर

झाल्यावर श्री. नारायण डोळे, श्री. एस. एम. जोशी, भाऊसाहेब रानडे, श्री. अंबिके, श्री. नाना डेंगळे ही मंडळी 'साधना' साप्ताहिकाच्या संपादकांना सर्वतोपरी सहकार्य करीत होती.

## ४.१२ ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडातील साधनेचे स्वरूप :

सानेगुरुजी यांनी १५ ऑगस्ट १९४८ रोजी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. रवींद्रनाथ टागोर यांची 'साधना' कादंबरी सानेगुरुजींच्या वाचनात आली. याच 'साधना' कादंबरीवरून त्यांनी सुरू केलेल्या साप्ताहिकास 'साधना' हे नाव दिले. 'साधना' साप्ताहिकाने सातत्याने सामाजिक चळवळ राबविली. लोकशिक्षणाच्या कार्यातले तत्कालीन परिस्थितीतील महत्त्वाचे नाव म्हणजे 'साधना' साप्ताहिक होय. तसे पाहता 'साधना' साप्ताहिकाला समाजवाद्यांचे मुखपत्र म्हणण्याचा प्रघात दिसतो. परंतु 'साधना' केवळ समाजवाद्यांचे मुखपत्र आहे असे म्हणणे एकांगी स्वरूपाचे ठरेल किंवा अन्यायकारक होईल. कारण 'साधना'ने मूल्य पेरण्याच्या दृष्टीने आणि समाजमन तयार करण्याच्या हेतूने महत्त्वाची कामगिरी बजावलेली दिसते. भारतीय स्वातंत्र्याचा लढा आणि अपार कष्टाने मिळालेले स्वातंत्र्य यासाठी तत्कालीन पिढीने खूप मोठी किंमत चुकविली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मोठ्या आशेने हे लोक सामाजिक परिस्थितीकडे पाहू लागले. स्वातंत्र्याच्या झेंड्याखाली जात, पंथ, धर्म हे सर्व विसरून एकवटलेला समाज स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पुन्हा आपल्या कोशात बंदिस्त व्हायला लागला. पराकोटीची धर्म–भावना उदयाला येऊ लागली. या परिस्थितीचा परिणाम म्हणजे महात्मा गांधी हत्या होय. महात्मा गांधीच्या हत्येने समाजमन खडबडून जागे झाले. त्यातच सानेगुरुजींसारखा अत्यंत संवेदनशील माणूस गप्प राहणे शक्य नव्हते. या सर्व घटना ते उघड्या डोळ्यांनी पाहू लागले आणि खचत चाललेल्या, गोंधळलेल्या, अवघडलेल्या परिस्थितीचा गुंता सोडविण्यासाठी त्यांनी पाऊल उचलले. ढासळणाऱ्या परिस्थितीवर समाजाला शहाणे करणे, हा एकमेव पर्याय त्यांच्यासमोर दिसत होता. यातून त्यांनी 'साधना' साप्ताहिक सुरू करण्याचा निर्णय घेतला. परिस्थिती अत्यंत प्रतिकूल होती; तरीही ते मागे हटले नाहीत. 'साधना' साप्ताहिकातून सातत्याने समाजाला शहाणे करण्याची प्रक्रिया त्यांनी सुरू केली. यात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी लहान मुलांवर लक्ष केंद्रित केले आणि 'साधना' साप्ताहिकातून मुलांच्या मेळाव्यात, साधनेच्या कथा याबरोबरच इतर वाङ्मय प्रकारांचे लेखन होऊ लागले.

## ४.१३ 'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झालेले लेखन :

### ४.१३.१ वैचारिक लेखन :

गांधीजींना जिवंत ठेवायचे आहे (२९ जानेवारी १९४९), शिक्षणशास्त्रवेत्ते रवींद्रनाथ– श. मा. दिवेकर (१२ फेब्रुवारी १९४९), संयुक्त महाराष्ट्र आणि मध्ययुगीन महाराष्ट्राचा अंत– आचार्य जावडेकर (२६ मार्च १९४९), स्वातंत्र्याची दोन वर्षे (३० जुलै १९४९), सरहद्द गांधीजींची भारताला का विस्मृती पडली? (२५ फेब्रुवारी १९५०), जातीयतेचा सुधारणा विरोध आणि धर्म– दिनानाथ नवकर (४ मार्च १९५०), ब्रिटनमधील सामाजिक परिवर्तन बॅर्नाड शॉ यांचे मत (९ सप्टेंबर १९५०), भारताची अन्न समस्या– प्रा. राम जोशी (३० सप्टेंबर १९५०), निर्वासितांचे प्रश्न (७ ऑक्टोबर १९५०), हिंदुस्थान आणि पाकिस्तान– डॉ. राम मनोहर लोहिया (७ ऑक्टोबर १९५०), साध्य साधन विचार आचार्य भागवत (३० डिसेंबर १९५०), तरुण मतदारांना मार्गदर्शन– आचार्य जावडेकर (५ मे १९५१), उच्च शिक्षणाचे माध्यम हिंदी की प्रादेशिक भाषा, भाषेचा विकास थोपवू नका– काकासाहेब कालेलकर (२२ डिसेंबर १९५१), शिक्षणाची शोकांतिका– वसंत बापट (२९ मार्च १९५२), बुद्धाचा धर्म–बहुजन हिताय बहुजन सुखाय (३० मे १९५३), भारतीय मनाची आंतरिक घडण, सेवादल–राष्ट्राची आशा (२६ डिसेंबर १९५३), संन्यास स्त्रीचा धर्म नव्हे पुर्वाध व उत्तरार्ध– शंकरराव देव (२ जानेवारी, ९ जानेवारी १९५४), स्वातंत्र्य संपादन हाच गोमंतकीयांचा धर्म– लक्ष्मणराव सरदेसाई (१ मे १९५४), शिक्षण कशासाठी– श्री जे. कृष्णमूर्ती (१२ जून १९५४), महाकाव्यात इतिहास शोधणारा संशोधक– हेन्री इस्लीमन– वसंत पळशीकर (२ एप्रिल १९५५), मुंबई सरकारतर्फे प्रस्तुत झालेले नवे भूमीविषयी बिल कसेल त्याची जमीन (९ जुलै १९५५), भारतीय भूमीवर चाललेला मानवतेचा लढा (१६ जुलै १९५५), भाषा हाच नवीन राज्यांचा एकमेव निकष नव्हे (१५ ऑक्टोबर १९५५), सत्याग्रही मतदारांचे कर्तव्य (१४ एप्रिल १९५६), शांती निकेतन कालचे आणि आजचे (२८ जून १९५८), द्विभाषिक प्रश्नाबाबत विनोबा– खुशालजी चौधरी (१३ सप्टेंबर १९५८), इस्राईलमधील लोकजीवनाची झलक (१४ फेब्रुवारी १९५९), इ. विषयावर झालेले वैचारिक लेखन विचारप्रवृत्त आणि ज्ञानसंपन्न करणारे आहे.

### ४.१३.२ कविता :

**बा. भ. बोरकर**– शांता दुर्गा (१५ ऑगस्ट १९५४), मोहन जन्मकथा (सांगीतिकी) (१० ऑक्टोबर १९५५), **राजा मंगळवेढेकर**– वाट पुढे गेली (२ जानेवारी १९६०), **द. भि. कुलकर्णी–** आकाशाच्या फांदीवरती (७ मार्च १९५७), **अनिरुद्ध पुनर्वसू–** विरहिणी, पारवा, वाटेवरल्या वाटसरा रे (२ एप्रिल १९५६), **रा. ग. जाधव–** विद्धपारवा, **मनोहर तल्हार–** अहिल्या (२५ एप्रिल १९५९), ग्रीष्मामधली फक्त शुष्कता, माज (१३ डिसेंबर १९५९), उल्का, **अरविंद वामन कुलकर्णी–** स्पर्श (३ जानेवारी १९५१), आणिक, अवचित गेला घुसळून, रेघ, पीस (१८ फेब्रुवारी १९५६), स्वप्न (३ मे १९५८), **सदानंद रेगे–** चेटूक, बेडूक (२१ एप्रिल १९५६), **बाळ सीताराम मर्ढेकर–** वानगीदाखल दोन कविता (२४ मार्च १९५६), **इंदिरा–** किती लुटावे डोळ्यांनी (३ मार्च १९५६), **पद्मा–** किती दिसांपासूनीया (१८ फेब्रुवारी १९५६), **सरिता पदकी–** सुरावट, उंदीरमामा (२६ सप्टेंबर १९५९), **देविदास बागूल–** सरतां धार मृगाची (११ जून १९५५), **सानेगुरुजी–** पत्री (काव्यातून) (११ जून १९५५), **संजीवनी मराठे–** भावपुष्प (२३ मार्च १९५०), फळ पळभर रे (४ जून १९५५), हालता हालता (३१ मार्च १९५८), **विंदा करंदीकर–** हे आइनस्टीन (२३ एप्रिल १९५५), **सोपानदेव चौधरी–** मायबोली माहेर (१५ ऑगस्ट १९४८), तुझेच रूप पाहू दे (१८ सप्टेंबर १९४८), मानवतेची चोरी (१८ ऑगस्ट १९४९), पूज्य बापूजी (३० ऑक्टोबर १९५३), **मंगेश पाडगावकर–** कसे काय अन् कोठे चुकले (१५ ऑगस्ट १९५३), **यशवंत हडप–** राजघाट (४ ऑक्टोबर १९५२), **माणिक गोडघाटे (कवी ग्रेस)–** ओलेती (८ फेब्रुवारी १९५८), उणीव (२९ मार्च १९५८), तुझ्या हट्टासाठी (२१ सप्टेंबर १९५८) इत्यादी कविता ‘साधना’मधून प्रकाशित झालेल्या आहेत.

### ४.१३.३ कथालेखन :

‘साधना’ साप्ताहिकातून कथालेखनाची मालिका सुरू केली होती. त्यात मुलांच्या मेळाव्यात, साधनेच्या कथा, धडपडणारी मुले व इतर कथा या शीर्षकाखाली अशा लेखन आहे. या लेखकांमध्ये **दुर्गा भागवत–** मंत्रीकल्पक (३ जानेवारी १९५३), गोंड लोकांची उत्पत्ती कथा (२ एप्रिल १९५३), भाऊ गोऱ्या हाताची करामत (२ मे १९५३), शेवंतीबाई भाग १ ते ३ (२२ मे ते ३ जून १९५४), कोल्हा आणि न्हावी (१२ व १९ जून १९५४), चुल्लाबोधी (६ ऑगस्ट

१९५५), **ना. ग. गोरे–** गोकूळ अष्टमी (१५ ऑगस्ट १९४९), पाऊस आला (३० जून १९५१), हिरवे सोयरे (५ एप्रिल १९५२), कवडसे (२९ मार्च १९५८), **सानेगुरुजी**– 'धडपडणारी मुले' या शीर्षकाखाली आलेल्या, आहुती (११ फेब्रुवारी १९४९), नवबंधने नवी क्षितिजे (३ व १० सप्टेंबर १९४९), रघुनाथच्या वडिलांचे निधन (१० ऑक्टोबर १९४९), ती रात्र (५ नोव्हेंबर १९४९), यमुचा नवा संसार (३१ डिसेंबर १९४९), कावळा (७ जुलै १९५१), मोरी गाय (२१, २८ जुलै व १७ ऑगस्ट १९५१), शुरू हुआ हे जंग हमारा (१८ ऑगस्ट १९५१), तुरुंगातील साधना (१ सप्टेंबर १९५१), स्वामीचा जीवनसंदेश (१५ सप्टेंबर १९५१), स्वामीचे निर्वाण (२२ सप्टेंबर १९५१), वासुदेवाचे बलिदान (१३ ऑक्टोबर १९५१), नामदेवाची सेवानिवृत्ती (१७ नोव्हेंबर १९५१), धडपड चिरायू होवो (२४ नोव्हेंबर १९५१), **वसंत बापट–** आमुचे भाऊ (२५ डिसेंबर १९४८), शिवदर्शन (३० जून १९५१), **काकासाहेब कालेलकर–** चूल (१९ जुलै १९५२), **मंगेश पाडगावकर–** मिनू (७ मार्च १९५३), सोनेरी केसांची परी (३० एप्रिल १९५५), बाहुल्यांच्या जगात (१४ मे १९५५), हरवलेले दुवे (२४ सप्टेंबर १९५५), बटाला (३१ डिसेंबर १९५५), **महादेवशास्त्री जोशी–** मीनाक्षीची जन्मकथा (२८ मार्च १९५३), **वामन चोरघडे–** संपत्तीदान (१७ जुलै १९५४), **प्रेमाकंटक–** हिमालयातील हाक (७ मे १९५५), **गो. नी. दांडेकर–** विद्यार्थी मित्रा तू कुठे (२१ जानेवारी १९५६), **ललिता भावे–** माझी मीच (२१ जानेवारी १९५६), **शंकर सारडा–** गुलाबकळी (३० मे १९५१), पऱ्यांच्या राज्यात बंडू (२८ जून १९५८), झिपऱ्या आणि रत्नी (२६ मार्च १९६०), **आनंदीबाई शिर्के–** अनुवादित कथा नरवानर (१२ एप्रिल १९५८), **शकुंतला बोरगावकर–** खोडकर चंदू (९ ऑगस्ट १९५८), पऱ्यांची राणी (१८ ऑक्टोबर १९५८), **केशव मेश्राम–** चेतना (१० जानेवारी १९५९), गारवेल (२२ एप्रिल १९५९), छायाबन (२ जानेवारी १९६०), क्षणगंधा (३ मार्च १९६०), **देविदास बागूल–** दूर (१९ फेब्रुवारी १९५५), शैवदूत (३० जुलै १९५५), बोधीवृक्ष (५ एप्रिल १९५८), अहल्योद्धार (२९ ऑगस्ट १९५९), विकत घेतलेली माणसे (३० मे १९५९), **राजा मंगळवेढेकर–** पांघरूण (७ नोव्हेंबर १९५९), **लीलाधर हेगडे–** बंगला (६ सप्टेंबर १९५८) गुंतागुंत (२४ डिसेंबर १९५९) अशा कितीतरी लेखकांच्या कथा 'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झाल्या.

**'मुलांच्या मेळाव्यात'** या सदरात प्रकाशित झालेल्या कथा. **दुर्गा भागवत–** पुष्पवाहन (५ जानेवारी १९५२), तुळशीचे लग्न (१ मार्च १९५२), चंदनराजा (५ एप्रिल १९५२), लेरी फ्रिअर यांच्या दाक्षिणात्य लोककथा आंधळा बहिरा आणि आढाव (२६ जुलै १९५२), गजराबाईला न्याय मिळाला (७ व २१ ऑगस्ट १९५४), घायपाताचा जन्म (२८ ऑगस्ट १९५४), बळी मच्छीराजा (२७ नोव्हेंबर १९५४), राम आणि लक्ष्मण (१८ व २४ डिसेंबर १९५४), ब्राह्मण, वाघ आणि सरन्यायाधीश (८ जानेवारी १९५५), पांडवांची कथा (२५ जून १९५५), सात आयांचा मुलगा (१५ ऑगस्ट १९५६), राजपुत्र वेशांतर (१६ जानेवारी १९६०), **वामन चोरघडे–** अबोलीची कहाणी (१४ फेब्रुवारी १९५३), **यदुनाथ थत्ते–** मुंग्या (अनुवाद) (२१ ऑक्टोबर १९५६), अ–वर्ग–रचना (७ फेब्रुवारी १९५७), **गोपीनाथ तळवलकर–** बालकन जी बारी (३० सप्टेंबर १९५०), **वसंत बापट–** जादूची अंगठी शिरीष (२९ जानेवारी १९५५), **रमा बखले–** काही पक्षी (१९ फेब्रुवारी १९५४), लिओनार्डी–डी–विंची (२५ सप्टेंबर १९५४), बोटी कप्तान (१५ ऑक्टोबर १९५४), नकाशे (११ डिसेंबर १९५४), प्रवासांत (२९ जानेवारी १९५५), मळांच्या गोष्टी (१४ जानेवारी १९५६), माझी लहानपणीची शाळा (१५ फेब्रुवारी १९५८), **लीलाधर हेगडे–** देवाची मुक्ती (१२ मार्च १९५७), न्यायाधीशाचा निवाडा (२१ मार्च १९५९), महर्षी विज्ञान (२६ सप्टेंबर १९५९), थोर चित्रकार (२८ नोव्हेंबर १९५९), **शिरूभाऊ लिमये–** शिस्त आणि सत्य (४ ऑक्टेबर १९५८), **रा. भि. जोशी–** प्रवासवर्णन (५ फेब्रुवारी १९५५), कनकेश्वर (२६ मार्च १९५५), कन्याकुमारी (१४ फेब्रुवारी १९५९), **प्रा. ना. म. जोशी–** डॉ. रॉबर्ट रझ्झामोहन (९ डिसेंबर १९५०), **शंकर सारडा–** कासवदादा झाडावर चढतात (६ डिसेंबर १९५८), मनुताईचा प्रवास (७ मार्च १९५९), **अ. ना. पेडणेकर–** धावपळ (९ ऑक्टोबर १९५४), आगीत राहणारा सरडा (३० ऑक्टोबर १९५४), परिस–पटीस (३० ऑक्टोबर १९५४), कोहुभुराचे कसब (७ मे १९५५), शुरुशुकास (१४ मे १९५५), **देविदास बागूल–** वाघाची शिकार (२१ जुलै १९५६), शिरीषाची फुले (१६ मे १९५९), दोन अद्भुत आणि सुरस रात्री (९ जानेवारी १९६०), आंब्याचा मोहोर (१२ मार्च १९६०), बोलके मांजर (१२ मार्च १९६०), निंबोणीचे झाड (१९ मार्च १९६०), चिमुकला सरदार (९ एप्रिल १९६०) अशा अनेक कथा या लेखन प्रकारात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

### ४.१३.४ ललित निबंध/ ललित लेख :

या प्रकारात **दुर्गा भागवत–** गुलमोहराच्या आठवणी (१२ सप्टेंबर १९५१), वात्सल्याचा आविष्कार (१८ सप्टेंबर १९५१), केवळ पंधरा मिनिटांत (२६ जानेवारी १९५२), पहिले मेघमंडळ (७ जून १९५२), तालबद्ध पौष्प (१४ फेब्रुवारी १९५३), रूपधर फाल्गुन (११ एप्रिल १९५३), वसंत हृदय चैत्र (१८ एप्रिल १९५३), चैत्र सखा वैशाख (२३ मे १९५३), मेघश्याम आषाढ (१८ जुलै १९५३), श्रावणातल्या दुपारी (५ सप्टेंबर १९५३), पद्मावती (३० ऑक्टोबर १९५३), तीतृष्णा (२७ एप्रिल १९६०), **वसंत बापट–** गोमाता चिरडली (१४ ऑक्टोबर १९५०), पशुपक्ष्यांचे अजब जीवन (१० मार्च १९५१), जिथे झांशीवाली विसावली (१ डिसेंबर १९५१), माझे प्राचीन कल्पतरू (३ मे १९५२), आठ दिवसांची कहाणी (१४ जुलै १९५२), **मंगेश पाडगावकर–** आले मेध भरून (२३ जून १९५१), नवे दैवत (२१ जुलै १९५१), सागर सौंदर्य (१ सप्टेंबर १९५१), शून्य मनाच्या घुमटात (१५ डिसेंबर १९५१), अर्धा डझन माणसे (१५ मे १९५२), आराम खुर्ची (१२ जुलै १९५२), संतसंग देई सदा (११ एप्रिल १९५३), माघातला पाऊस (२५ एप्रिल १९५३), इथे शारदा लक्ष्मी होते (४ ऑक्टोबर १९५३), या गंगेमध्ये गगन वितळले (३० ऑक्टोबर १९५५), **गो. नी. दांडेकर–** भटक्याची वाटचाल (२ जून १९५१), तो अमृताचा धनु (२२ मार्च १९५४), धवकला जगदाकार (२० नोव्हेंबर १९५४), नृत्यागार (२९ ऑगस्ट १९५५), **बा. भ. बोरकर–** आणि माणसाचा मुडदा पडला (२६ सप्टेंबर १९५०), माझा मौनवार (७ ऑक्टोबर १९५०), कोकणीची कैफियत (१ मार्च १९५२), शांतात्म्याच्या छायेत (१२ सप्टेंबर १९५३), **कुसुम पटवर्धन–** व्यक्ती आणि वल्ली (२ जानेवारी १९५४), भ्रमंती (२५ जुलै १९५९), आमचे उपास (१९ मार्च १९६०), **पु. ल. देशपांडे–** जीवनाची ओळख (२१ फेब्रुवारी १९५३), कुणाच्या अध्यात न मध्यात (२१ डिसेंबर १९५७), **ग. प्र. प्रधान–** स्वप्नीचे हे धन (२१ डिसेंबर १९५७), **प्रभाकर पाध्ये–** गुरुजींच्या साहित्याची आंतरिक प्रवृत्ती (११ जून १९५१), **अनंत काणेकर–** ही असहायतेची लाट थांबवायची असेल तर (१४ मार्च १९५३), शरीर माध्यम (६ डिसेंबर १९५६), मालतीबाई बेडेकर (बाळूताई खरे) पूल (२९ सप्टेंबर १९५७), **काकासाहेब कालेलकर–** वेडे शहाणपण (२ डिसेंबर १९५०), वर्षागान (५ जुलै १९५२), **सानेगुरुजी–** मानवतेचा नंदादीप (२३ डिसेंबर १९५०), दागिने (१ डिसेंबर १९५१), कृष्ण जन्म म्हणजे काय (२९ ऑगस्ट

१९५४), **गोपीनाथ तळवळकर–** सिद्धार्थ आणि राजहंस (३० जानेवारी १९५४), **श्रीपाद जोशी–** बकरी ईद (१५ सप्टेंबर १९५१), रमजान ईद (२८ जून १९५२), **वि. स. खांडेकर–** नव्या निष्ठा (२६ एप्रिल १९५२), **रोहिणी भाटे–** त्या तिथे पलीकडे (१८ फेब्रुवारी १९५६) इत्यादी ललित लेख प्रकाशित झाले आहेत.

**४.१३.५ साहित्य समीक्षा/स्वरूप :**

१. **नवकाव्य–** वा. रा. कांत– नवकाव्याचे स्वरूप (२३ मे १९५३), **दुर्गा भागवत–** बहिणाबाईंची गाणी (१९ सप्टेंबर १९५३), **वसंत बापट–** माझ्या काव्याची भूमिका (६ मार्च १९५६ आणि १३ मार्च १९५४), काव्यनिर्मितीच्या तीन प्रक्रिया (६ मार्च १९५४), **प्रा. शांता शेळके–** ना. घ. देशपांडे यांची कविता (१८ सप्टेंबर १९५४), **बा. भ. बोरकर–** काव्यनिर्मितीची प्रक्रिया (२४ सप्टेंबर १९५४ आणि १५ फेब्रुवारी १९५८), **प्रा. गो. वि. करंदीकर–** काव्य आणि सामाजिक जाणीव (५ जुलै १९५८), **प्रा. कृ. पा. कुलकर्णी–** व्याकरणातील काव्य (१२ जुलै १९५८), **शंकर सारडा–** शरदचंद्रांची साहित्यदृष्टी (२० सप्टेंबर १९५८), **प्रा. अरविंद कुलकर्णी–** बी कवींची कविता (३० ऑगस्ट १९५८), **रामचंद्र ढेरे–** बहिणाबाईंचे विवेकवैभव (४ जुलै १९५९), **पद्मा गोळे व इंदिरा संत–** काही कवितांची पार्श्वभूमी (११ जुलै १९५९) व (२६ सप्टेंबर १९५९), कविता विवेक– कवि, काव्य आणि भाविक (२१ नोव्हेंबर १९५९, ५ डिसेंबर १९५९ आणि १२ डिसेंबर १९५९), या विषयावर नवकाव्याबद्दलचे लेखन आले आहे.

२. **प्राचीन/मध्ययुगीन/संस्कृत/संत/ख्रिश्चन संत/लोकनाट्य इ.–**
**लोकनाट्य** तमाशाने प्रेक्षकांना खदखदून हसवले (२२ ऑगस्ट १९५३), लोकनाट्य एक उच्च कला प्रकार– डॉ. श्रीराम लागू (२१ एप्रिल १९५६).

३. **प्राचीन/ संस्कृत : गं. त्र्यं. देशपांडे–** कालिदासाची निसर्गवर्णने (१४ नोव्हेंबर १९५३), संस्कृत साहित्य शास्त्रातील सौंदर्य कल्पना (२८ मार्च व ४ एप्रिल १९५९), **गोविंद भट–** सूचक कलेचा सुंदर विलास (१४ नोव्हेंबर १९५३), **प्रा. द. रा. बेंद्रे–** अभिज्ञान शांकुतलातील वात्सल्याचे अधिष्ठान (१४ नोव्हेंबर १९५३), **अरविंद मंगरूळकर–** पुष्पक विहाराचा ऋतुनिर्णय (१४ नोव्हेंबर १९५३), **रामचंद्र**

**ढेरे–** कालिदासाच्या सहवासात (७ जुलै १९५६), या विषयावर यांचे लेखन आले आहे.

४. **मध्ययुगीन संतसाहित्य** : अ. का. प्रियोळकर– सोळाव्या–सतराव्या शतकातील विदेशी पाद्री मराठी का शिकले? (१५ ऑगस्ट १९५४), शक्तीची आराधना व संतांची वेदना (२१ एप्रिल १९५६), रामदासांचे भावजीवन (२३ फेब्रुवारी १९५७), प्रा. रा. शं. वाळिंबे– ज्ञानेश्वरीतील सौंदर्यमूल्ये (९ मार्च १९५७), ज्ञानेश्वरीच्या जन्मस्थानी (२ ऑगस्ट १९५८), संतकवी दासू गणूंचा सत्कार (११ ऑक्टोबर १९५८), मराठी संताच्या समतेचे स्वरूप (३० ऑक्टोबर १९५९), नरेश मंत्री– ज्ञानेश्वरांची भाषाशैली (२८ नोव्हेंबर १९५९) या विषयांवर यांचे लेखन दिसून येते.

५. **लोकसाहित्य/संगीत/नृत्य** : केशवराव भोळे– गोव्यातील संगीत आणि संगीतकार (१५ ऑगस्ट १९५४), कला आणि स्वातंत्र्य (२६ मार्च १९५५), वसंत देसाई– मराठी रंगभूमीची परंपरा व तिचे पुनरुज्जीवन (७ जुलै १९५६), लक्ष्मणशास्त्री– भारतीय नीतिविकास– वेदकालीन नीती (२१ जुलै १९५६), नयना अव्हेरी– भारतीय नृत्य कला (२८ ऑगस्ट १९५६), वा. घो. रामपुरे– लमाणी लोकगीतांतील रासक्रीडा (१ फेब्रुवारी १९५८) आदींचे लेखन आले आहे.

६. **विज्ञान** : डॉ. नरेंद्र नागेंद्र दास– सजीवांतील अद्‌भुतरम्य जीवविद्युत (१२ मार्च १९५५), शीलभद्र– संस्कृती आणि विज्ञान (२० डिसेंबर १९५८) वसंत पळशीकर– विज्ञान आणि जीवनमूल्ये (२५ जानेवारी १९५९) या विषयांवर यांचे लेखन आले आहे.

७. **साहित्य** : रवींद्र पिंगे– जॉर्ज बर्नार्ड शॉ– एक जातिवंत नाटक्या, बर्नार्ड शॉ– एक जीवनदर्शन, शॉ एक लोकविलक्षण विभूती (२८ जुलै १९५६), गो. नी. दांडेकर– पूर्णामायच्या कुशीत (१ डिसेंबर १९५६), प्रा. श्री. के. क्षीरसागर– ग्रीसचा अंधकवी होमर (८ फेब्रुवारी १९५८), नारायण मेनन– केरळचे कवी वळनोळ (२२ मार्च १९५८), ॲड. शंकरराव खरात– अस्पृश्यतेचे माहेरघर–भारतीय खेडी (१२ डिसेंबर १९५८), कन्नड साहित्य चरित्रकार– डॉ. रं. श्री. मुंगळी, गोविंद जोशी,

उमाशंकर जोशी (२१ नोव्हेंबर १९५९), इ. लेखकांची साहित्य समीक्षा आलेली दिसून येते.

**४.१३.६ रसग्रहण/पुस्तक परीक्षण/पुस्तक परिचय/समीक्षा** :

१. **रसग्रहण** : जीवनसरिता– मंगेश पाडगावकर (७ जुलै १९५१), विचारलहरी– वा. म. जोशी (२१ जुलै १९५१), धारानृत्य– वसंत बापट (२१ जुलै १९५१), मायभाषेला भाव कवितेचा शेला– इंदिरा संत यांच्या काव्याचे रसग्रहण– बा. भ. बोरकर (५ मे १९५२), बालकवीची कविता– मंगेश पाडगावकर (१६ मे १९५३), स्वप्नलहरी– माधव ज्यूलियन– प्रा. जगन्नाथ महाजन (२ जानेवारी १९५४), गीत रामायण– ग. दि. माडगूळकर (साहित्य परिचय) (५ एप्रिल १९५८), शिळान– उद्धव शेळके (२५ एप्रिल १९५८) यांची समीक्षा आलेली दिसून येते.

२. **कादंबरी समीक्षा** : रवींद्रनाथ टागोर यांची साधना– साने गुरुजी (भाषांतरित क्रमशः) (२७ मे १९४९ ते २४ सप्टेंबर १९४९), श्री. ना. पेंडसे– गारंबीचा बापू– वसंत दावता (१० मे १९५२), बाराबास– बा. भ. बोरकर (क्रमशः भाषांतरित) (१४ जून १९५२ ते १९ जुलै १९५२ – क्रमशः प्रकाशित), ना. ग. गोरे– चित्रगंदेचे माहेर (३ जानेवारी १९५३), युनिकॉर्न (रूपांतरित)– वा. ना. पेडणेकर (११ जुलै १९५३), शिप्रा– शरदचंद्र मुक्तिबोध– प्रा. वसंत दावता (९ ऑक्टोबर १९५४), करवंदे– दुर्गा भागवत (५ फेब्रुवारी १९५५), लिलीचे फूल– गंगाधर गाडगीळ– माधव अचवल (११ जून १९५५), पडघवली– गो. नी. दांडेकर– दुर्गा भागवत (९ जुलै १९५५), माचीवरला बुधा– गोविंद जोशी (२९ मार्च १९५८), पास्तरनाक– डॉक्टर झिवागो– ज्ञानेश्वर नाडकर्णी (२८ मार्च १९५९), संसार, शितू– अशोक शहाणे (२६ मार्च १९६०) इत्यादी कादंबऱ्यांचे समीक्षा व क्रमशः प्रकाशित झाले आहे.

३. **कथासंग्रह समीक्षा** : नागवेल–वामन चोरघडे (५ फेब्रुवारी १९५८), जांभळाचे दिवस– व्यंकटेश माडगूळकर (८ फेब्रुवारी १९५८), बापाची पेंड– द. मा. मिरासदार, डोळ्यांची निरंजने– प्रफुल्ल दत्त, वाङ्मयाचा चाफा– य. न. केळकर

(२३ ऑगस्ट १९५८), सदानंद रेगे– चांदणे– वसंत पळशीकर (२३ मे १९५९), शंख आणि शिंपले– मंगेश पाडगावकर व काशिनाथ घाणेकर (१० जानेवारी १९५३) आणि (२१ जून १९५८), आम्ही भगीरथाचे पुत्र– शंकर पाटील (२७ फेब्रुवारी १९६०) इत्यादी कथासंग्रहाचे समीक्षण प्रकाशित झाले.

४. **प्रवासवर्णन समीक्षा** : वाटचाल– रा. भि. जोशी (२१ ऑगस्ट १९५४), माझा देश, माझे लोक भाग–२– श्रीपाद जोशी– वि. म. कुलकर्णी (२८ जून १९५८), एक काव्यात्म आणि रसिक प्रवासवर्णन– अगस्तीच्या अंगणात– शंकर सारडा (२ ऑगस्ट १९५८), मुरुड ऐतिहासिक आणि सांस्कृतिक– वामन रामचंद्र गानू (२२ नोव्हेंबर १९५८) इत्यादी प्रवासवर्णने.

५. **आत्मचरित्र/चरित्र समीक्षा** : स्टीफेन स्पेंडर यांचे आत्मवृत्त (४ ऑगस्ट १९५१), गं. दे. खानोलकर चरित्रग्रंथ– माधव ज्यूलियन– वसंत बापट (३० ऑक्टोबर १९५१) गांधीजींची जीवननिष्ठा– प्रा. म. ना. जोशी (२२ ऑगस्ट १९५३), आचार्य अत्रेलिखित– मी कसा झालो वसंत बापट (३० ऑक्टोबर १९५३) इत्यादी.

६. **चित्रपट समीक्षा** : काबुलीवाला– ज्ञानेश्वर नाडकर्णी (१८ जानेवारी १९५८), काबुलीवाला– मूळ कथा व चित्रपट– अशोक शहाणे (१५ फेब्रुवारी १९५८), पोस्टातील मुलगी– जगन्नाथ महाजन (१० जुलै १९५८) इत्यादी.

७. **नाटक समीक्षा** : गंगाधर गाडगीळ यांच्या पाच नाटिका– डॉ. ग्रामोपाध्ये (९ जानेवारी १९५४), पु. ल. देशपांडे– सुंदर मी होणार– समीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी (२४ मे १९५८) यांसारख्या नाटकांच्या समीक्षा दिसून येतात.

८. **विज्ञान समीक्षा** : विज्ञान प्रगती व मानवाचे भवितव्य, इफेक्ट ऑफ सायन्स ऑन सोसायटी– वसंत नारगोळकर (३१ जानेवारी १९५३), अणुशक्तीचे रहस्य– म. य. दळवी (९ एप्रिल १९५५), विज्ञान आणि संस्कृती– शीलभद्र (लेखांक–१) (३ जानेवारी १९५९).

९. **वैचारिक समीक्षा** : नव्या घटनेचे अंतरंग– मधु लिमये (२८ जानेवारी १९५०), विश्वघटनेतील ईश्वरी सूत्र– शं. द. जावडेकर (७ व १५ सप्टेंबर १९५१),

भारतीय लोकसत्ता १,२,३– शं. द. जावडेकर (३० ऑक्टोबर, १३ नोव्हेंबर आणि २० नोव्हेंबर १९५४), समाजवादी समाजरचना, इतिहासाचे चक्र– राम मनोहर लोहिया शं. द. जावडेकर (२ जुलै १९५५), भारत आणि चीन– वसंत नारगोलकर (१७ व २४ जानेवारी १९५९), इंडिया विन्स फ्रीडम– रावसाहेब पटवर्धन (१८ जुलै १९५९), चार्वाक म्हणतात तरी काय– प्रा. श्रीनिवास दीक्षित (२९ ऑगस्ट १९५९), इत्यादी.

१०. **अनुवादित/रूपांतरित** : आनंदपंचम लियाम ओफ्लहर्ट– सदानंद रेगे (१५ ऑगस्ट १९५३), गुपित– मुन्शी प्रेमचंद्र (अनुवाद) प्रा. म. ना. जोशी (२२ ऑगस्ट १९५३).

११. **संतसाहित्य** : मराठी लोकांची संस्कृती– श्री. ना. गो. चाफेकर (१० नोव्हेंबर १९५१), इरावती कर्वे यांचे पुस्तक मराठी संस्कृती काही समस्या– श्रीपाद रामचंद्र टिळेकर (१४ व २१ मार्च १९५३), मऱ्हाटी संस्कृती : काही समस्या– श्री. शं. बा. जोशी लिखित– दि. के. बेडेकर (२७ जुलै व ४ जुलै १९५३), संत महिम्याचे रसभरीत वर्णन– पन्नालाल सुराणा (१३ सप्टेंबर १९५८), दत्त संप्रदायाचा इतिहास– चिं. ग. कर्वे (२१ फेब्रुवारी १९५९), या ग्रंथांचे समीक्षण 'साधना' साप्ताहिकातून आले आहे.

**४.१३.७ चरित्र/व्यक्तिचित्र लेखन** :

१. **शिक्षण क्षेत्र** : शिक्षणाचे शास्त्रवेत्ते रवींद्रनाथ– श. म. दिवेकर (१२ फेब्रुवारी १९४९), प्रा. वा. म. जोशी– मालतीबाई बेडेकर (२२ जुलै १९५०), महात्मा फुले– यदुनाथ थत्ते (२ डिसेंबर १९५०), गोपाळराव आगरकर– विनायक आठल्ये (२१ जून १९५२), महात्मा आगरकर– रामचंद्र ढेरे (१४ जुलै १९५६), महर्षी कर्वे यांचे शतक– सानेगुरुजी (१८ एप्रिल १९५८), प्रा. रा. श्री. जोग– एक माणूस– अरविंद वामन कुलकर्णी (९ एप्रिल १९६०) इत्यादी.

२. **विज्ञान व परदेशी साहित्यिक** : महाकवी गटे (२७ ऑगस्ट १९४९), नोबेलविजेते डॉ. हेडेकी युकावा (२८ एप्रिल १९५०), महर्षी टॉलस्टॉय– यदुनाथ थत्ते (२६ ऑगस्ट १९५०), नोबेल पारितोषिक डॉ. राल्फ जॉनसन बुन्शे (३० सप्टेंबर

१९५०), अन्सर्ट वेव्हीन (२१ एप्रिल १९५१), इमॉन डॉ. व्हॅलेश (२३ जून १९५१), माझे नाव विल्यम सारोयान (२४ ऑगस्ट १९५१), आल्फ्रेड नोबेल– यदुनाथ थत्ते (८ डिसेंबर १९५१), वॉल्ट व्हिटमन– प्रा. ग. प्र. प्रधान व लाझरा पल्ल– अनसूया लिमये (२९ मार्च १९५२) ग्लोरिया– कमलाबाई कामत (२१ जुन १९५८), टॉलस्टॉय एक तडफडणारे व्यक्तिमत्त्व– शंकर सारडा (१४ नोव्हेंबर १९५९), अंतोन चेकॉव्ह– प्रा. अच्युत केशव भागवत (२३ जानेवारी १९६०) इत्यादी लेख.

३. **धार्मिक** : सेंट फ्रान्सिस झेविअरचे गोवे– ना. ग. गोरे (१५ ऑगस्ट १९४८), हजरत महंमद पैगंबर– अहमद बद्रद्दीन मुकादम (१५ जानेवारी १९४९), रमणमहर्षी आणि गांधीजी– वि. न. बरवे (१३ मे १९५०) इत्यादी.

४. **साहित्यिक लेख** : वीर प्रभाकर केळूसकर– कवी शरद मेहता (९ ऑक्टोबर १९४८), महाकवी रवींद्र– जयवंत कुमार (१० डिसेंबर १९४९), स्वर्गीय कवी झवेरचंद मेघाणी– वीरचंदशेट (११ व १८ मार्च १९५०), डॉ. केतकर समाजाला धक्के देणारे महापुरुष– आचार्य भागवत (२२ एप्रिल १९५०), प्रा. वा. म. जोशी– मालतीबाई बेडेकर (२२ जुलै १९५०), दत्तो वामन पोतदार– आचार्य प्र. के. अत्रे (२६ सप्टेंबर १९५०), सौ. बाया कर्वे– प्रा. वा. गो. मायदेव (९ डिसेंबर १९५०), मानवतेचा नंदादीप– सानेगुरुजी (२३ डिसेंबर १९५०), रँग्लर र. पु. परांजपे (१७ फेब्रुवारी १९५१), रे. नारायण वामन टिळक– अशोक टिळक (५ डिसेंबर १९५३), श्री. वि. पु. भागवत– श्री. शं. नवरे (१९ फेब्रुवारी १९५५), आचार्यांच्या सान्निध्यात– प्रा. ग. प्र. प्रधान (१७ डिसेंबर १९५५), खलील जिब्रान कवीचे जीवन आणि कलाविश्व– रामचंद्र ढेरे (७ जानेवारी १९५८), शाहीर सगनभाऊ– रामचंद्र ढेरे (१२ एप्रिल १९५८), मिर्झा गालिब– रवींद्र कपूर (२१ फेब्रुवारी १९५९), बहिणाबाईंचे विवेकवैभव– रामचंद्र ढेरे (४ जुलै १९५९), कन्नड साहित्य चरित्रकार– डॉ. रं. श्री. मुंगळी, गोविंद जोशी (२१ नाव्हेंबर १९५९), प्रा. रा. श्री. जोग : एक माणूस– अरविंद कुलकर्णी (९ एप्रिल १९६०) इत्यादी लेख.

५. **राजकीय/सामाजिक** : गांधीजींचे जीवनदर्शन– ग. ना. जोशी (१० ऑक्टोबर १९४९), भलाईची वतनदार महर्षी सेनापती बापट (११ नोव्हेंबर १९५०), गांधीजींचा जीवनयोग, (१,२,३,४) रा. ना. जोशी, जिथे झांशीवाली विसावली– वसंत बापट (१ डिसेंबर १९५१), श्री. गुलाबचंद नागोरी– शंकर सारडा (२७ जुन १९५४), लोकमान्य टिळकांचे व्यक्तित्वदर्शन– प्रा. ग. प्र. प्रधान व आचार्य भागवत, टिळक यांच्या चरित्रातून (१ ऑगस्ट १९५९), सवाई गंधर्व– प्रा. अरविंद मंगरुळकर (२८ नोव्हेंबर १९५९) इत्यादी.

६. **खेळ/अरण्य** : श्री. सालीम अली जीवनाचे श्रेष्ठ जाणकार– अब्दुल अली (१७ मार्च १९५१), जन्मजात खेळाडू– त्र्यं. र. देवगिरीकर (७ नोव्हेंबर १९५३), प्रसिद्ध क्रिकेटपटू जिमलेकर (९ फेब्रुवारी १९५७) इत्यादी.

**४.१३.८ प्रवासवर्णन :**

१. **देशांतर्गत प्रवासवर्णन** : निरुपम हिमालय– ग. म. मळेकर (९ ऑक्टोबर १९४८), सह्याद्री परिचय (क्रमशः) (३ व २० सप्टेंबर १९५२), भ्रमंतिका– मद्रास परिसर (२० जून १९५३), काश्मीरचे चिरलावण्या– काशीनाथ पोतदार (२० जून १९५३), काश्मीरचे लोकजीवन (४ जुलै १९५३), हा देखील भारत– वसंत बापट (२२ मे १९५४), राजस्थानच्या राखीभूमीत– काशीनाथ पोतदार (क्रमशः) (४, १८ व २८ सप्टेंबर १९५४) चंदीगड एक सौंदर्य वास्तू– मंगेश पाडगावकर (१० डिसेंबर १९५५), फत्तेपूर शिक्री (१६ फेब्रुवारी १९५७), प्रवास– अरविंद कुलकर्णी (२ मार्च १९५७), केरळच्या वाटेवर (११ मे १९५७), या लेखांतून भारतातील विविध ठिकाणांची माहिती आली आहे.

२. **परदेश प्रवासवर्णन** : माझी युरोपची डायरी मधु लिमये (क्रमशः) (४,१२ सप्टेंबर व २० ऑक्टोबर १९४८), उद्योगशील जपान– अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे (३० जून १९५१), डायरीतील पाने– नायगरा– शं. अ. खेर (२५ ऑगस्ट १९५१), नवचीन दर्शन, डॉ. जे. सी. कुमारप्पा (२४ नोव्हेंबर १९५१), काळे पाणी म्हणून ओळखले– अंदमान द्वीप– श्रीकृष्ण कामत (१४ जून १९५२), केंब्रिजचे जीवन– एम. ए. बाकरे (१५ ऑगस्ट १९५३), इटली देशात– प्रा. अच्युत बापट (२८

नोव्हेंबर १९५३), भाऊ लिहितात (क्रमश: १ ते २९) लेखांक (१७ एप्रिल १९५४ ते ११ डिसेंबर १९५४) (रोम, बर्लिन, हॅटिकन सिटी न्यूकॅसिल, लंडन, लीज, पॅरीस, म्युनिक, टिएस्टहून, बेलग्रेड, जेरुसेलम, सायप्रस, बैरुत, इस्तंबूल, हैफा, अंकारा, ग्लासगो, कॅरो) इ. लेख प्रकाशित झालेले आहेत.

**४.१३.९ पत्रलेखन** :

दादासाहेब मावळकरांची प्रवासपत्रे, (क्रमश: ९ नोव्हेंबर १९४८ ते १८ डिसेंबर १९४८), ना. ग. गोरे यांची सुभास पत्रे (१ जानेवारी १९४९), मुशाफिराचा मधुसंचय– मुईनुद्दीन हारीस– १ व २ लेखांक (१ जुलै १९५०), युरोपची प्रवासपत्रे (२,३ क्रमश:) (७ ऑक्टोबर १९५०), सानेगुरुजी सुंदर पत्रे (सुधास पत्रे) एकूण ५१ पत्रे लिहिण्याचा मानस होता. ४१ पत्रांना सानेगुरुजी संपादक असताना 'साधना' साप्ताहिकातून प्रसिद्धी मिळाली.

**४.१३.१० विश्वभारती–आंतरभारती** :

या शीर्षकाखाली केशव मेश्राम यांचे सानेगुरुजींचे चिनी कादंबरी वाङ्मय, आचार्य भागवत यांचे भाषण– आंतरभारतीची वैचारिक बैठक (११ जून १९५१), भारत तीर्थ, आंतरभारतीच्या कामाची रूपरेषा, **आचार्य काकासाहेब कालेलकर–** पायेचलार पथ (लिपिका) रवींद्रमनन– काकासाहेब कालेलकर (क्रमश:) (१४ जुलै १९५१), रवींद्र मनन (१७ मार्च, १४ जुलै, १५ सप्टेंबर आणि १३ ऑक्टोबर १९५१), कानडी वाङ्मयाचा परिचय– गो. श्री. सोहोनी (१३ ऑक्टोबर १९५१), श्रीपाद जोशी, मराठी भाषेत उर्दूचे शब्द (१५ डिसेंबर १९५१), तेलगू काव्यप्रवाह व दृष्टिक्षेप श्री. कामाक्षीराव (२ फेब्रुवारी १९५२), कन्नड वैष्णव संतांचे कार्य (१२ एप्रिल १९५२), भारतीय भाषांची वैशिष्ट्ये (२४ मे १९५२), तेलगू भाषा समितीचे कार्य (१४ जून १९५२), गुजराती साहित्यातील कथाप्रवाह श्री. गुलाबदार बोकूर (१० जानेवारी १९५३), इक्बालदर्शन उर्दू काव्यातील उपवन– श्रीपाद जोशी (२१ ऑगस्ट १९५४), उर्दू काव्यातील संकेत श्री. नारायण केळकर (२ जुलै १९५५), गीतांजलीचे मूलसूत्र (११ जानेवारी १९५८), शंकर सारडा– रशियाचा एक श्रेष्ठ कादंबरीकार– फिओडोर डोस्टोयेव्हस्की (२५ जानेवारी १९५८), रवींद्रनाथाची जीवनदेवता (५ जुलै १९५८), रवींद्रकाव्यांत मेघदूत (२ ऑगस्ट १९५८), अरविंद ताटके– प्रसिद्ध क्रिकेटपटू जिम लेकर, श्रीकांत गोगटे– प्रसिद्ध वंग कवी– श्री. मोहितलाल मुजुमदार (२५ ऑक्टोबर १९५८),

आनंदीबाई शिर्के– गुजरातचे कथा वैभव (२९ नोव्हेंबर १९५८), चिनी वाङ्मय मैंग– महान चिनी कादंबरी– साने गुरुजी (४ जुलै १९५९), वंगकवी सत्येंद्रनाथ दत्त (१६ जानेवारी १९६०), राजा मंगळवेढेकर– आंतरभारतीची कार्य योजना (३० जानेवारी १९६०), इत्यादींची लेखन प्रकाशित झाले आहे.

अशाप्रकारे 'साधना' साप्ताहिकातून विविध साहित्यप्रकारांवर लेखन व साहित्यसमीक्षा, पुस्तक परिचय प्रकाशित करून 'साधना'ने वाचकांना वाङ्मयीन दृष्टीने समृद्ध केले.

## ४.१४ 'साधना' साप्ताहिकाचा आकार व पृष्ठसंख्या, मूल्य व प्रकाशन स्थळ :

दिनांक १५ ऑगस्ट १९४८ ला 'साधना' साप्ताहिक सुरू झाले. तेव्हा 'साधना' साप्ताहिकाच्या पहिल्या अंकाचे संपादक सानेगुरुजी होते. 'साधना'च्या पहिल्या अंकाचे मुद्रक व प्रकाशक– श्रीरंग दत्तात्रय वरेरकर हे होते. साधना प्रेस, आर्थर रोड, हॉस्पिटल, आर्थर रोड मुंबई–१९ येथून प्रकाशित झाले. या पहिल्या अंकाचे मूल्य ३ आणे होते. तर 'साधना' साप्ताहिकाचा आकार ९.५'' बाय ०७'' इंच इतका असून, पृष्ठसंख्या १२ होती. 'साधना' साप्ताहिकाचे प्रस्तुत संशोधन कालखंडात प्रतिवर्षी ५२ अंक प्रकाशित झाले. २७ ऑक्टोबर १९५१पासून 'साधना'चा दिवाळी अंक प्रकाशनाला सुरुवात झाली व त्याची किंमत रु.१.५०/– पैसे होती. 'साधना' विशेषांक, कुमार अंक याची किंमत रु.१/– होती. आजच्या पॉकेट बुकसारखा त्याचा आकार होता. ''जनतेच्या सहकार्यामुळे 'साधना' प्रेस मुंबईहून पुण्यास आणण्याचा निर्णय 'साधना' ट्रस्टचे विश्वस्त अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी घेतला. 'जनवाणी'चे निष्णात संचालक श्री. हरिभाऊ गद्रे यांनी प्रेसची व्यवस्था घेतल्यामुळे साप्ताहिक बंद ठेवण्याचा प्रसंग न येता आगगाडीचा सांधा जुळावा तशी प्रेसची पुण्यात व्यवस्था झाली व दोन महिन्यांच्या अल्पकाळात प्रेस सुरळीतपणे चालू लागला.''[२]

'साधना' साप्ताहिक पुण्यात स्थलांतरित झाल्यावर साधना प्रेस, ३७४, शनिवार पेठ, पुणे–२ या ठिकाणाहून प्रकाशित होऊ लागले. आज 'साधना' साप्ताहिकाचा आकार २४'' □ १८'' इतका असून, वर्षभरात 'साधना'चे ४८ अंक प्रकाशित होतात. ५ विशेषांक, ३ दिवाळी अंक असतात नियमित अंक पृष्ठसंख्या ४४ असून ब्लॅक ॲण्ड व्हाइट छपाईचा असतो. मूल्य २० इतके आहे. विशेषांक बहुरंगी ५२ ते ८० पृष्ठांचा असून किंमत ५० ते ८० रुपये असते. बालकुमार अंक ४४ पानांचा असून मूल्य ४० रुपये, युवा अंक ६० पृष्ठांचा असून मूल्य ५०

रुपये, तर मुख्य दिवाळी अंक २०० पानांचा असून मूल्य १५० रुपये इतके आहे. साप्ताहिक ‘साधना’ ४३१, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० महाराष्ट्र या ठिकाणाहून प्रकाशित होते.

# संदर्भ टीपा


१) सानेगुरुजी (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, संपादकीय, दिनांक १५ ऑगस्ट १९४८, पृ. क्र. १.

२) पटवर्धन पु. ह. (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, वर्धापन विशेषांक, दिनांक १५ ऑगस्ट १९५६, पृ. क्र. १.

## क) ‘साधना’ साप्ताहिकातील वैचारिक लेखन :

### ४.१५ प्रास्ताविक :

भारतीय साहित्याला प्राचीन अशी परंपरा आणि वैविध्यता आहे. प्राचीन ग्रंथपरंपरेचे दालन येथील साहित्य संस्कृतीची साक्ष देते. ईश्वरभक्ती हा प्राचीन साहित्याचा मुख्य भाग आणि प्रेरणा असून, ईश्वर भक्तीच्या असीम ओढीमधून भारतीय तत्त्वज्ञान आणि साहित्य उदयाला आलेले दिसून येते. माणसाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत त्याच्या एकूणच जीवनात आणि आचरणात ईश्वरभक्ती मूळ धरून असल्याने साहजिकच त्याच्या जगण्याच्या इतर सर्व बाबींपेक्षा ईश्वराला वरचे स्थान होते. त्या पाठोपाठ निरनिराळ्या पूजा, व्रतवैकल्य, उपास, तापास यातून साधली जाणारी ईश्वरभक्ती आणि या सर्वांचा शेवट कशात तर मोक्षप्राप्तीत अशा अनेक वर्तुळात अडकलेला माणूस. जात, धर्म, संस्कृती, परंपरा यांचा उदोउदो करायला लागला. प्राचीन धर्मग्रंथांनी याला खतपाणी घातले आणि माणूस ईश्वरभक्तीत लीन झाला. तसे पाहता या देशाचा मूलनिवासी जो दऱ्या–खोऱ्यात, जंगलात गुहेत, राहत होता. झाडाची साल हे त्याचे वस्त्र आणि झाडांची मुळे (कंदमुळे) हे त्याचे अन्न असणारा हा आदिमानव निसर्गात राहू लागला. निसर्गोपासना करू लागला. विजांचा कडकडाट, पाऊस, ऊन, वारा, थंडी याची अनामिक भीती मनात घेऊन यावर विजय मिळविण्याचा प्रयत्न करू लागला. येथील निसर्गाची सेवा हीच त्याची भक्ती होती. शेतीचा, अग्नीचा शोध हा त्याच्या क्रांतीचा विजय होता. हळूहळू समूहाने तो राहू लागला. त्याचे एक वेगळे जग निर्माण होऊन कुटुंबसंस्था आकाराला येत होती आणि आर्यांच्या आक्रमणानंतर हे सर्व बदलत गेले. आर्यांनी आपली भाषा आणि आपण श्रेष्ठ असल्याचे अनेक दाखले येथील आदिमानवाला दिले आणि नकळत आदिमानव दास बनला. आर्यांच्या देवकल्पनेच्या भीतीने का होईना हा आदिमानव जपू लागला. याच काळात चार वेद, अठरा पुराणे, सहा शास्त्रे अशी ग्रंथसंपदा निर्माण होऊ लागली. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि क्षुद्र या वर्णांचा उदय झाला. माणूस माणसात विभागला गेला. वर्णानुसार काम ही संकल्पना रूढ झाली. संस्कृत ही देववाणी बनली आणि ब्राह्मणेतरांना त्यापासून लांब राहावे लागले. अनेक प्रकारचे देव–देवता, उपास–तापास, व्रतवैकल्यांचा उदय होत होता. त्याचे स्तोम माजू लागले. ‘चातुर्वर्ग चिंतामणी’ सारखे ग्रंथ निर्माण होऊ लागले. हे संपूर्ण जग मिथ्य आहे, क्षणभंगूर आहे. या जगात शाश्वत काय असेल तर तो फक्त ‘ब्रह्म’ आहे आणि त्याची उपासना हे प्रत्येक

माणसाचे कर्तव्य आहे, अशा आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा उदय झाला. प्रत्येक माणूस 'मोक्षप्राप्ती' या एकाच ध्येयाने प्रेरित झाला. वर्णव्यवस्था नकळतपणे मजबुत होऊ लागली. स्पृश्य–अस्पृश्यता हा यातलाच एक महत्त्वाचा भाग होता. स्त्री ही सर्वांत शेवटची आणि क्षुद्र गणली जात होती. 'मनुस्मृती'सारखा ग्रंथ प्रमाण मानला जात होता. शोषणाची परंपरा मूळ धरू लागली. धर्मग्रंथांनी या परंपरेला खतपाणी घालण्याचे काम अविरत केले. पण बुद्ध, लोकायतांच्या तत्त्वज्ञानाने या व्यवस्थेला हादरे देण्याचे काम केले. इ. स. बाराव्या शतकातही नव्या तत्त्वज्ञानाने डोके वर काढण्याचा प्रयत्न केला. चातुर्वर्ण्य व्यवस्थेला हादरा देणारे तत्त्वज्ञान आणि तत्त्वज्ञ उदयाला आले. चक्रधर ते संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकारामांपर्यंत आणि आजतागायत ही परंपरा सक्षमपणे समाजात रुजलेली दिसते. विसाव्या शतकात मात्र शोषणाप्रतीच्या शोषितांच्या जाणिवा अधिक जागृत होऊ लागल्या. याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे आणि कार्याचे यश म्हणावे लागेल. सन १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली आणि हजारो वर्षांपासून हिंदू धर्मात जखडलेला क्षुद्र माणूस मुक्त झाला. अन्याय, अत्याचार, विषमता, शोषणाने ग्रासलेल्या समाजाला जगण्याचा नवा मार्ग मिळाला. अस्मिता जागी होणारा हा काळ होता. ज्या हिंदू धर्मात विषमता आहे, असमानता आहे अशा हिंदू धर्माचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्याग केला. बौद्ध धर्मात प्रवेश करून नवी समता निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले. त्यांच्या कार्यामधून प्रेरणा घेऊन समाज एकत्रित येऊ लागला. शिक्षण घेऊ लागला. शिक्षणाशिवाय मुक्तीचा दुसरा मार्ग नाही, असे डॉ. आंबेडकर सांगत असत. त्यांनी दिलेला परिवर्तनवादी विचार, शिक्षणाचे महत्त्व, अस्मितेची जाणीव जागृती; यामधून उदयाला येणारा संघर्ष, यासाठी करावा लागणारा विद्रोह या साऱ्यांची जाणीव गावकुसाबाहेरील समाजाला होऊ लागली. मनुस्मृतीचे दहन, चवदार तळ्याचा सत्याग्रह अशा घटनांमधून सामान्य माणूस आणि त्याचे दु:ख अधोरेखित होते. अनेक नव्या पिढीतील तरुण याचा विचार करू लागले. चिंतन करू लागले. लिहू लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन लिहिणाऱ्यांत कवी नारायण सुर्वे, दया पवार, बाबुराव बागुल, अर्जुन डांगळे, माधव कोंडविलकर, नामदेव ढसाळ, लक्ष्मण माने, शाहीर अमर शेख, उत्तम कांबळे अशा अनेक लेखकांची, विचारवंतांची पिढी उदयाला आली. सामान्य माणूस गावकुसाबाहेरील अस्पृश्य म्हणून ज्यांच्या अनेक पिढ्या अंधारात राहिल्या. अशांना प्रकाशात

आणण्याचे कार्य नेटाने करू लागली. यात दलित, आदिवासी, भटके, विमुक्त, देवदासी, मजूर स्त्रिया यांच्या जीवनात अस्मिता रोवण्याचे कार्य या लेखकांनी केले. शिक्षण हा माणसाच्या मुक्तीचा मार्ग असून, वाचनाने माणूस 'माणूस' बनतो, हे सांगताना अभ्यासक उत्तम कांबळे म्हणतात, ''वाचनाने माणसाची भूकही मिटते आणि त्याला कमी–अधिक पैसेही मिळतात. कारण मठात ज्ञानेश्वरी वाचताना, देवधर्माचे पुस्तक वाचताना जो आर्थिक लाभ होतो ते हे बालमन सांगते.''[१]

यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित होते.

## ४.१६ वैचारिक साहित्य संकल्पना स्वरूप :

वैचारिक साहित्याची परंपरा भारतात दीर्घ काळापासून दिसते. प्राचीन तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारा एक वर्ग, तर त्या तत्त्वज्ञानाला विरोध करणारा प्रति तत्त्वज्ञान मांडणारा चिकित्सा करणारा एक वर्ग या चिकित्सेत वैचारिकतेची बीजे दिसतात. याचे प्रतिबिंब भगवान गौतम बुद्ध, लोकायत यांसारख्या विचारवंतांच्या विचारांमधून स्पष्ट दिसतात. ही प्रेरणा, थेट फुले, शाहू, आंबेडकरापर्यंत येताना दिसते. मानवाच्या गुलामगिरीचा अंत फक्त शिक्षणाने होऊ शकतो. अविद्या ही सर्व दु:खाचे मूळ आहे. जोपर्यंत सामान्य माणूस विद्यार्जन करणार नाही तोपर्यंत त्याला त्याच्या मुक्तीचा मार्ग सापडणार नाही. त्याशिवाय तो गुलामीचा प्रतिकार करणार नाही. शिक्षणाशिवाय त्याला प्रचलित व्यवस्थेतील प्रश्न पडणार नाहीत. जोपर्यंत त्याला प्रश्न पडणार नाहीत तोपर्यंत त्याच्या मनातली विचारप्रक्रिया सुरू होणार नाही. एकदा जर विचार प्रक्रिया सुरू झाली, की तो सभोवतालच्या परिस्थितीचा, प्रश्नांचा, प्रश्न निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा विचार करेल. नुसता विचारच करणार नाही तर या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी धडपडेल हे सर्व शिक्षणाने सहजशक्य होईल. या विचाराने प्रेरित होऊन नव्या समतावादी समाजनिर्मितीची स्वप्न सामान्य माणूस पाहू लागला. दलित, आदिवासी, भटके विमुक्त, मजूर, देवदासी, स्त्रिया आणि वंचितांच्या जीवनातील प्रश्न, समस्या समोर येत होत्या. नवशिक्षित समाज याकडे डोळसपणे पाहत होता. माणूस हा विचारशील प्राणी असून, सभोवतालचे जग जाणून घेण्याची त्याची तीव्र इच्छा असते. हे जग आहे. या जगाच्या अस्तित्त्वाचे प्रश्न, उदयाचे प्रश्न त्याला भेडसावत असतात. या जगाच्या निर्मितीमागे कोणता उद्देश आहे. हे जग कोणी निर्माण केले, अशा प्रश्नांची उत्तरे निरनिराळ्या तत्त्ववेत्त्यांनी विचारवंतांनी निरनिराळ्या

पातळ्यांवर दिलेली दिसतात. ख्रिश्चन, जैन, बौद्ध, हिंदू, मुस्लिम अशा विविध धर्मांनी संप्रदायानी याबाबतचे विचार मांडलेले दिसतात. अनेक संत–महंतांनी याबाबत आपले विचार मांडलेले आहेत. या सर्वांच्या विचारांमधून अनेक मतप्रवाह समोर येतात. या सर्वांच्या मुळाशी विचारप्रक्रिया दिसून येते. भारतीय तत्त्वज्ञानाचा विचार करता धर्म, अर्थ, काम, मोक्ष या पुरुषार्थाचा पुरस्कार करणारे तत्त्वज्ञान. चार्वक मात्र हे खोडून काढतो. त्यांच्या मते 'काम' हेच जीवनाचे प्रथम उद्दिष्ट आहे. यावरून चार्वाकांनी आध्यात्मिक मूल्यांचा स्वीकार न करता भौतिक मूल्यांचा स्वीकार केलेला दिसतो. त्याही पुढे जाऊन ते म्हणतात की, सुख हेच जीवनाचे अंतिम ध्येय आहे. या भिन्न मतप्रवाहाच्या मुळाशी विचारप्रक्रिया आहे. चार्वाकांनी वेदप्रामाण्य नाकारलेले दिसते. त्यांच्या मते सर्व धार्मिकविधी पूजाअर्चा, उपास–तापास, वैदिक विधी ह्या पुरोहित वर्गाने आपल्या (त्यांच्या स्वतःच्या) हितासाठी शोधून काढल्या असून, ईश्वर, आत्मा, पाप, पुण्य, स्वर्ग, नरक इ. गोष्टी अस्तित्वात नाहीत. यामुळे त्यांचा प्रत्यय येत नाही. चार्वाकाचे तत्त्वज्ञान थेटपणे वैदिक तत्त्वज्ञान नाकारते. याच भूमिकेतून नंतर येणारे वैचारिक तत्त्वज्ञान वाटचाल करताना दिसते. या परंपरेत प्राचीन काळी भारतात चार्वाक, लिंगायत, महावीर, गौतम बुद्ध यांसारख्या महापुरुषांनी तसेच आधुनिक काळात महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी अभ्यासकांनी, विचारवंतांनी आपली भूमिका मांडली आणि समाजात मूळ धरून बसलेल्या वर्णव्यवस्थेला, जातीव्यवस्थेला, विज्ञानवादी, तर्कसंगत वास्तव तथा मानवतावादी विचारांनी छेद दिला. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या शोषणाच्या प्रथा परंपरांना छेद दिला. या संदर्भात अभ्यासक डॉ. मनोहर सुरवाडे म्हणतात, ''हिंदू धर्मातील कर्मकांड यज्ञयाग आणि माणसाला गुलाम बनविणाऱ्या ईश्वरी कल्पनेसह अनिष्ट रूढींना नष्ट करण्यासाठी गौतम बुद्धाने धर्मसंघर्ष केला; तर बौद्ध अनुयायांनीही ब्राह्मणी धर्माला विरोध केला. त्यांनी पुरोहितांकडून धर्मकार्य करून घेण्यास नकार दिला. त्यांच्याशी संघर्ष केला.''[२]

उपरोक्त संदर्भावरून हजारो वर्षांपासून माणसाला गुलाम बनविणाऱ्या ईश्वरी कल्पना व अनिष्ट रूढींना नष्ट करणे महत्त्वाचे आहे आणि यासाठी महात्मा गौतमबुद्धाने धर्मसंघर्ष केला असून पर्यायी मांडणी केली. हिंदू धर्मातील वाईट चालीरीतींचे समूळ उच्चाटन केल्याशिवाय सामान्य माणूस मुक्त होणार नाही. त्यासाठी प्रत्येकाने स्वतः होऊन धर्मसंघर्षात उडी घ्यायला

हवी. यासाठी वैचारिक पार्श्वभूमी, तर्कसंगत विचारांची आवश्यकता आहे. वैचारिक साहित्याची सैद्धान्तिक मांडणी अनेकांनी केली असून यात लोकायत, महात्मा गौतम बुद्धापासून ते फुले, शाहू आंबेडकर, सानेगुरूजी, डॉ. दाभोलकर, पानसरे यांच्यापर्यंत ही परंपरा दिसून येते. या वैचारिक परंपरेचा विचार केला असता त्यांच्यामध्ये विचारप्रक्रियेचा एक समान धागा दिसून येतो. यासाठी सातत्याने विचारप्रक्रिया चालू असणे आवश्यक असते. विचार म्हणजे काय, हे सांगताना अभ्यासक ह. श्री. शेणोलीकर म्हणतात की, ''एखाद्या व्यक्तीने विशिष्ट आचरण व्यवस्थेसाठी बुद्धिनिष्ठ केलेला आविष्कार म्हणजे विचार होय. विचाराने विवेकशील समाज प्रगती करतो. विवेक म्हणजे सद्‌विचार, निर्णय घेणे, निवड करणे, हे बुद्धीचे कार्यक्षेत्र आहे. सत्य–असत्य, बरे–वाईट, खरे–खोटे, योग्य–अयोग्य याबाबतचा निर्णय करणारी सद्‌बुद्धी म्हणजे विवेकबुद्धी हे विचार करण्याचे केवळ साधन (इंद्रिय) आहे.''[३]

याचा अर्थ सभोवतालच्या पर्यावरणात माणूस विचार करायला शिकतो. मग सभोवतालचे पर्यावरण त्याला अनेक विषय, अनेक पैलूंचा विचार करायला लावते. त्या विषयी मग त्याच्या मनात सातत्याने विचारचक्र चालू राहते. त्यातून या विषयावर आणि प्रश्नांवर विचाराअंती काही तोडगा निघतो का, पाहत पाहत त्या समस्येच्या निराकरणापर्यंत व्यक्ती पोहचत असते. सभोवतालच्या सृष्टीविषयी इथला माणूस, प्राणी आणि जीव–जंतूचे जगणे कसे सुकर होईल या दृष्टीने सातत्याने प्रयत्न केले गेलेले दिसतात. यातूनच मानवी जीवन सुखी व संपन्न बनत चाललेले दिसते. याच्या मुळाशी विचार प्रक्रियाच आहे. तर विचारप्रक्रियेबद्दल अभ्यासक मे. पु. रेगे म्हणतात, ''एखादा शोध नव्याने लावण्यामागे किंवा करण्यामागे सर्जनशील (क्रिएटिव्ह) विचारप्रक्रिया असते.''[४]

यावरून विचारप्रक्रियेचा अर्थ अधिक स्पष्ट होतो. विचारप्रक्रियेतील सर्जनशीलतेचे महत्त्वही अधोरेखित होत असते. सर्जन म्हणजे नवनिर्माण; पूर्वीपेक्षा वेगळे नवे असे होय. म्हणूनच विचार प्रक्रियेत सर्जनशीलतेला अधिक महत्त्व असते.

माणसाला पृथ्वीवरील सर्वांत बुद्धिमान प्राणी म्हटले जाते. त्याच्याजवळ विचार असतात. त्याला भले–बुरे समजते. आपल्या बुद्धीच्या जोरावर तो विचारांची, प्रश्नांची शहानिशा करतो. समस्येतून मार्ग काढतो. विचारासंदर्भात अभ्यासक शिवाजीराव भोसले म्हणतात,

''विचार ही एक शक्ती आहे. ती स्वतंत्र आहे. स्वनिर्धारित आहे. तिचे नियम तीच ठरवू शकते, पाण्याला स्नान घालावे लागत नाही. वाहता वाहता ते निवळत जाते. विचारांचे तसेच आहे.''[५]

उपरोक्त संदर्भावरून विचार हा माणसाचा नैसर्गिक आणि मूलभूत घटक असून, या विचारामधूनच माणसाला विवेकशील व्यक्ती बनविण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. अंधश्रद्धेतून मुक्तता देते, विज्ञानवादी बनवते. परंतु ही प्रक्रिया सहजासहजी घडत नाही. भारत हा बहुधार्मिक देश आहे. येथे अनेक धर्मांचे लोक राहतात. धर्माचे स्वातंत्र्य असले, तरी प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या धार्मिक विचारांशी जोडलेला असतो. यातून त्यांच्यातली श्रद्धा बळावत जाते. कधी कधी या श्रद्धेचे अंधश्रद्धेमध्ये रूपांतर होते. पण विचाराने–विवेकाने व्यक्तीला त्याच्यातून बाहेर पडता येणे शक्य होते. या संदर्भात अभ्यासक मे. पु. रेगे म्हणतात, ''व्यक्तीच्या वैचारिक जीवनाचा प्रारंभ श्रद्धेपासून होणे अटळ आहे. कारण मुले स्वतंत्रपणे विचार करून स्वत:ची मते घडवू शकतील अशी त्यांची स्थिती नसते. श्रद्धा ही अखेरीस स्वत:च्या सामाजिक परंपरेवरील श्रद्धा असते. वाढणाऱ्या मुलाची आणि अनेक वेळा प्रौढ माणसाची प्रारंभिक श्रद्धास्थाने ही सामाजिक श्रद्धास्थाने असतात. पण वाढणारे मूल स्वतः विचार करू लागल्यावर त्याची वैयक्तिक श्रद्धास्थानेही निर्माण होऊ शकतात.''[६]

यावरून श्रद्धा ही व्यक्तीच्या वैचारिक जीवनाचा प्रारंभ असून, व्यक्ती मोठी होत जाते तसतसा तिच्या श्रद्धेच्या भावना बळकट होत जातात. ती विचाराने जगण्याचा प्रयत्न करते. त्यांच्या जगण्यात स्थैर्य येते. या स्थैर्यासाठी विचाराबरोबर कृतीही आवश्यक असते, या संदर्भात 'आजचा मराठी समाज आणि वैचारिकता' या लेखात अरुण टिकेकर विचारवंतांची लक्षणे सांगतात. ''समाजाच्या सांस्कृतिक, वैचारिक, भावनिक संचिताचं म्हणजे परंपरेचं पूर्ण भान असणारा, सामाजिक न्यायाचा पुरस्कर्ता, या नात्याने अन्यायी परंपरांना प्रत्यक्षपणे, तसेच विचारसृष्टी मोडीत काढणारा, नवविचार प्रस्तुत करणारा, त्याचं स्वागत करणारा, इतरांना विचारदृष्ट्या सक्षम करणारा, प्रवाहपतित न होणारा, प्रत्येक बाबतीत स्वत:ला होणाऱ्या लाभाची मनीषा न धरणारा, समाजाचे विचार विचारस्वातंत्र्य अबाधित राखण्याचा आटोकाट प्रयत्न करणारा, इतरांना त्यासाठी उद्युक्त करणारा, सदैव सत्याची पाठराखण करणारा, एखाद्या महत्त्वाच्या घटनेवर वा दुर्घटनेवर भाष्य करावयास न कचरणारा आणि आपल्या मताची किंमत

द्यावयाची तयारी असणारा समाजातील 'नाही रे'चा प्रतिनिधी अशी काहीशी विचारवंतांची लक्षणं असल्याचे मानता येईल.''[७]

वरील संदर्भावरून हे स्पष्ट होते की, केवळ बुद्धीचा वापर करणारी व्यक्ती म्हणजे विचारवंत नसून, तिच्या अंगी समाजाप्रति असणारी तळमळ, समाजासाठी नि:स्वार्थपणे काही तरी करण्याची उमेद बाळगणारी, त्यासाठी कार्य करणारी, समाजोपयोगी तत्त्वाची, मूल्यांची जोपासना करणारी आपल्या तत्त्वांशी प्रामाणिक राहणारी, त्यासाठी वाटेल ती किंमत मोजणारी, मूलभूत अधिकारांची पायमल्ली होणार नाही, यासाठी कायम दक्ष असणारी व्यक्ती म्हणजेच विचारवंत, विवेकी, बुद्धिमान समजली जावी. या सर्वांच्या मुळाशी विचारप्रक्रिया असते. म्हणूनच विचारवंत समाजाशी, समाजातल्या प्रश्नाशी जोडलेला असतो.

तसे पाहता ''वैचारिकता हा शब्द Liberality (उदारता)''[८] या अर्थाने वापरला गेला असून, त्यासाठी मराठी भाषेत 'उदारमतवाद' या पर्यायी शब्दाचा वापर केला जातो. या विचारामधूनच विचारवंत किंवा अभ्यासक विषयाची सैद्धान्तिक मांडणी करतात. हा वैचारिक साहित्याचा आत्मा होय. म्हणजेच  वैचारिक साहित्याचे स्वरूप अधिक स्पष्ट करताना वैचारिक साहित्य कशाला म्हणावे; तर केवळ पंडित किंवा संशोधकांचे साहित्य नव्हे, तर प्रज्ञावंताचे साहित्य आहे. या प्रकारच्या साहित्यात सुसंगत मांडणी केली जाते. समाज मन घडविणे हा या साहित्याचा हेतू असतो. वैचारिक साहित्य सामाजिक चळवळींना वैचारिक अधिष्ठान देते. त्याचबरोबर सामाजिक चळवळी गतिमान करण्याचे कार्य करते. विचारवंत हे देशाचे वैचारिक आधारस्तंभ असतात. या संदर्भात डॉ. जनार्दन वाघमारे म्हणतात, ''अभिजात विचारवंत आपल्या हाती एखादे समीक्षासूत्र देतो त्याचा आधार घेऊन अनेक प्रश्नांचे विश्लेषण करण्याची दृष्टी आपल्याला मिळते.''[९]

यावरून विचारवंतांचे आणि त्यांच्या कार्याचे महत्त्व लक्षात येते.

## ४.१७ वैचारिक साहित्य–प्रेरणा :

भारतीय वैचारिक साहित्याच्या प्रेरणेचा शोध घेत असताना वैचारिक साहित्याला प्रदीर्घ अशी परंपरा दिसून येते. बुद्ध, लोकायतापासून ते संतसाहित्य व संत साहित्यापासून ते समाजसुधारकांपर्यंत प्रदीर्घ अशी वैचारिक साहित्य परंपरा आढळून येते. मानवी मूल्यातही वैचारिक परंपरा दिसून येते. एखाद्या गोष्टीचे सत्यशोधन करणे, त्यासाठी त्याच्या मुळापर्यंत

जाणे, सत्याच्या शोधासाठी कायम सज्ज असणे असे विविध पैलू वैचारिक साहित्यात दिसतात. या विषयी अभ्यासक सदानंद मोरे म्हणतात, ''आपण स्वीकारलेल्या मूल्यांच्या अनुरोधाने इतरांचे मत परिवर्तन करायचे व त्यांना तद्नुषंगिक कृतीही करायला लावायची ही वैचारिक साहित्याची प्रेरणा होय.''[१०]

यावरून वैचारिक साहित्य केवळ विचार करून थांबत नाही; तर त्याचा संबंध थेट कृतीशी असतो. ही कृती निरपेक्ष, निर्भीड, नि:स्वार्थ असते म्हणूनच विचारवंत नेहमी समाजशिक्षकाची भूमिका सातत्याने पार पाडीत असतात. मराठी वैचारिक गद्याचा पाया इंग्रजांच्या आगमनानंतर वृत्तपत्राने घातला. इंग्रजी Essayचे मराठी भाषांतर 'लघुनिबंध' असे असून 'ललित गद्य' हा शब्द १९५० नंतर मराठी साहित्यात रूढ झाला. एकोणिसाव्या शतकातील विचारवंतांनी इंग्रजी Essay चा घाट स्वीकारला आणि वर्तमान काळातील विषय घेऊन त्यात विचार, भावना, कल्पना यांचे वास्तववादी प्रकटीकरण विचारमंथन व विचार प्रकटीकरण केले. या संदर्भात संपादक नानासाहेब सूर्यवंशी म्हणतात, ''वैचारिक साहित्याची प्रेरणा ही आपल्या विचारसरणीचे स्पष्टीकरण व समर्थन करीत इतरांना पटवून देत, त्यांचे मतपरिवर्तन करून त्यांना आपल्याला अनुकूल करून घेणे हे असते.''[११]

मत परिवर्तनासाठी तर्कशुद्ध वैचारिक मांडणी आवश्यक असून, त्यासाठी सातत्याने विचारवंतांना प्रयत्न करावे लागतात. सैद्धान्तिक मांडणी करावी लागते. इंग्रजांच्या आगमनानंतर भारतात स्थिर राजवट आली. वैचारिक लेखनासाठीचा अवकाश उपलब्ध होऊ लागला. मुद्रणाचा उदय ही तत्कालीन परिस्थितीतील महत्त्वाची घटना असून लेखन, मुद्रणाला आणि प्रकाशनाला गती मिळाली. या काळात नियतकालिकांची कामगिरी वाखाण्याजोगी होती. या संदर्भात सुधाकर शेलार म्हणतात, ''मुद्रणकलेमुळे उदयास आलेल्या नियतकालिकांनी वैचारिक क्रांतीला प्रस्तृत केले. या वैचारिक साहित्याने मराठी विषयाच्या मन्वंतरामध्ये मोठा वाटा उचललेला आहे.''[१२]

भारतातील इंग्रजांचे आगमन क्लेशकारक बाबी आठवून देणारे असले, तरी रेल्वे, मुद्रण यांसारख्या मानवी जीवन सुखावह करणाऱ्या अनेक बाबींचा उदय ऐतिहासिकच म्हणावा लागेल. मुद्रणामुळे तत्कालीन परिस्थितीत वैचारिक लेखकांच्या पिढ्या उदयाला येत होत्या. समाजाला शहाणे करणे, स्वातंत्र्याप्रति जनजागृती करणे आदी वैचारिक साहित्याच्या प्रेरणा दिसतात. अशा

अनेक बाबींचा प्रसार, प्रचार करण्यासाठी या काळात अनेक नियतकालिकांचा उदय होत होता. वैचारिक मन्वंतराचा पाया भक्कम करण्यासाठी या काळात नियतकालिकांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. समाजाची वैचारिक भूक भागवणे, समाजोपयोगी मूल्य रुजविणे, मानवाच्या सद्सद्विवेक बुद्धीचा वापर करायला लावणे. सत्यशोधन करणे, अशी वैचारिक साहित्याचे विविध प्रयोजने दिसतात. वैचारिक साहित्य स्वत:चा शोध घ्यायला लावते. आत्मपरीक्षणाची दृष्टी देते. या संदर्भात अभ्यासक म. ना. वानखडे म्हणतात, ''मनुष्याला स्वत:चा शोध लागेल. आणखी एका गोष्टीमुळे त्याने भरपूर आत्मपरीक्षणात्मक वैचारिक वाङ्मय निर्माण केले पाहिजे. सध्या ते मुळीच अस्तित्वात नाही व त्याची फार गरज आहे. आगरकर, फुले, बाबासाहेब यांच्या लिखाणातून जे एक वैचारिक वातावरण निर्माण झाले. त्यामुळे समाजात बरेच स्थित्यंतर घडून आले आहे.''[१३]

यावरून वैचारिक साहित्याचे हेतू आणि महत्त्व विशद होते. वैचारिक साहित्य म्हणजे केवळ संबोधन नसून, प्रज्ञावंतांचे साहित्य आहे. अभ्यास, चिंतन, संशोधन यांच्याशी निष्ठ असणाऱ्या निष्ठावंतांचे साहित्य असून, वैचारिक साहित्य माणसाला दिशा देण्याचे काम करते. मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास करण्याची क्षमता वैचारिक साहित्यात असते. कारण वैचारिक साहित्याची मांडणी ही सैद्धान्तिक मांडणी असते. त्यामुळे त्यात मानवी मूल्ये महत्त्वाची मानली जातात. वैचारिक साहित्य समाजमन घडवीत असते. कारण वैचारिक साहित्याच्या मुळाशी मानवी कल्याणाचा विचार असतो.

## ४.१८ वैचारिक साहित्य परंपरा :

वैचारिक साहित्याच्या परंपरेचा धांडोळा घेतला असता, पाश्चिमात्य देशात वैचारिक साहित्याची प्रदीर्घ अशी परंपरा दिसून येते. इ. स. पूर्व ४६९–३९९  हा सॉक्रेटिसचा काळ असून, जगातील पहिला सैद्धान्तिक मांडणी करणारा विचारवंत म्हणून सॉक्रेटिसकडे पाहिले जाते, भारतीय वैचारिक साहित्यही संपन्न असल्याचे दिसून येते. वैचारिक साहित्य जरी पाश्चात्त्यांकडून इकडे आले असे म्हटले जात असले; तरी भारतात ही वैचारिक साहित्याची पाळेमुळे रोवलेली दिसतात. मराठी भाषेत वैचारिक साहित्याची प्रदीर्घ अशी परंपरा आहे. साधारणत: अडीच हजार वर्षांपूर्वी प्रथमत: गौतम बुद्धांनी मौलिक विचार मांडून तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात मोठे पाऊल उचलले. ते भारतातील पहिले सैद्धान्तिक मांडणी करणारे तत्त्वज्ञ होत.

गौतम बुद्धानंतर ही परंपरा जोमाने चालू दिसते. वर्धमान महावीर, महात्मा बसवेश्वर, संत कबीर, गुरू नानक, संत तुकाराम इत्यादी; तर आधुनिक काळात राजा राम मोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, दादाभाई नौरोजी, रवींद्रनाथ टागोर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, सानेगुरुजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी. साठोत्तरी कालखंडात वैचारिक लेखनाचे दालन अधिकच समृद्ध झालेले दिसते. या काळापर्यंत वैचारिक लेखनाच्या आणि विचार प्रक्रियेच्या दिशा अधिक स्पष्ट झालेल्या दिसतात. भारतीय स्वातंत्र्याचा लढा, महात्मा गांधीचे अहिंसावादी विचार, लोकमान्य टिळकांचा जहालवाद, दोन महायुद्धे या साऱ्या घटनांनी होरपळलेले मानवी मन तरीही कुठेतरी दबून बसलेली आणि सामान्यांच्या मनात रुजलेली जातव्यवस्था, धर्मव्यवस्था, लिंगभेद यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी वाचा फोडली. गावकुसाबाहेरील माणूस जागा होत होता. आपल्या अस्मितेच्या जागा शोधत होता. सन १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर म्हणजेच वैचारिकतेच्या सैद्धान्तिक मांडणीचा चिकित्सेचा, अभ्यासाचा, चिंतनाचा, संघर्षाचा, संक्रमणाचा काळ होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने भारावलेल्या, विचार करणाऱ्या पिढ्या उदयाला येत होत्या. नवसमतेचे, बंधुभावाचे, वैश्विक विचारांचे तत्त्वज्ञान समाजाला सांगू लागल्यानंतर म. मि. चिटणीस, दया पवार, प्र. ई. सोनकांबळेपासून ते कॉम्रेड शरद पाटील, डॉ. नरेंद्र दाभोलकर, डॉ. आ. ह. साळुंखे, उत्तम कांबळे, डॉ. रावसाहेब कसबे अशा लेखकांची आणि वैचारिक लेखनाची समृद्ध अशी परंपरा महाराष्ट्रात दिसून येते. या वैचारिक लेखनासाठी इंग्रजी भाषा आणि इंग्रजी शासन कारणीभूत आहे. असे सांगताना अभ्यासक दया पवार म्हणतात, ''इंग्रजांनी आपले राज्य चालविण्यासाठी इंग्रजी भाषा व्यवहारात आणली. या भाषेमुळे मात्र काही क्रांतिकारक बदल होऊ लागले. आगरकर, जोतिबा फुले यांसारखे विचारवंत निर्माण झाले. जोतिबा फुले यांनी जातिव्यवस्थेला पहिला हादरा दिला. याच विचारांचा वारसा घेऊन डॉ. आंबेडकर विचाराने तेजोगर्भ पेटता पलिता झाले. साहित्यातही नव्या विचारांचा ओघ येऊ लागला.''[१४]

उपरोक्त संदर्भ वैचारिक साहित्य निर्मितीमागे इंग्रजी भाषा आणि इंग्रजी शासन यांचाही मोलाचा वाटा असून, प्राचीन काळापासून संस्कृत भाषेचे प्राबल्य असल्यामुळे आणि संस्कृत ही अभिजनांची भाषा असून, ती बोलण्याचा अधिकार समाजातील मूठभरांना असल्यामुळे या

देशातील बहुजन माणूस संस्कृतमध्ये बंदिस्त असलेल्या ज्ञानापासून लांब गेला. परंतु इंग्रजांच्या आगमनामुळे आणि त्यापूर्वी मध्ययुगीन संतांनी केलेल्या समाजसुधारणेच्या कार्यामुळे समाज भाषिक अंगाने विकसित होत गेला. अव्वल इंग्रजी काळात तर मराठी ही जनभाषा ज्ञानभाषेच्या मार्गावर चालू लागली. सर्वच तत्त्वज्ञान मराठी भाषेत येऊ लागले आणि वैचारिक साहित्याला बळकटी मिळत गेली. या संदर्भात अभ्यासक डॉ. जनार्दन वाघमारे म्हणतात, ''लोकहितवादींनी महाराष्ट्रात एक वैचारिक जागर घातला. येथील सामाजिक रोगाचे त्यांनी अचूक निदान केले व त्यावर उपाय सुचविले. सामाजिक व वैचारिक क्षेत्रातले ते एक लोकविलक्षण धन्वंतरी होते.''[१५]

यावरून वैचारिक वाङ्मयनिर्मितीच्या काळात नियतकालिकांनी, विचारवंतांनी, अभ्यासकांनी मोलाचे कार्य केले. लोकशिक्षणाच्या ध्येयाने प्रेरित झालेली ही पिढी इंग्रजांच्या आगमनानंतर व मुद्रणकलेच्या उदयानंतर भारतातील हिंदू धर्म तत्त्वज्ञानाची चिकित्सा करू लागली. बाळशास्त्री जांभेकर, बाबा पद्मनजी, लोकहितवादी, महात्मा फुले, कृष्णराव भालेकर, किसन फागू बनसोडे यांनी मोलाची कामगिरी केली.

मराठी वाङ्मयात वैचारिक साहित्य प्रकाशनासाठी नियतकालिकांचा उदय झाला. यात 'दर्पण', 'ज्ञानप्रकाश', 'सुधारक', 'चंद्रोदय', 'मराठा', 'केसरी', 'विविध ज्ञानविस्तार', 'साधना', 'अस्मितादर्श' अशी अनेक नियतकालिके प्रकाशित होऊन लोकशिक्षण व समाजशिक्षणासाठी समर्पित भावनेने कार्य करू लागली.

## ४.१९ वैचारिक साहित्याचे वेगळेपण :

वैचारिक साहित्याची परंपरा भारतीय परंपरेत प्राचीन काळापासून दिसत असली, तरी यात भगवान गौतम बुद्ध, लोकायत यांचा महत्त्वाचा वाटा आहे. भारतीय हिंदू तत्त्वज्ञानापेक्षा वेगळे तत्त्वज्ञान यांनी मांडले. नंतरच्या काळात या परंपरेत अनेकांनी मोलाची भर टाकलेली दिसते. यात अनेक अभ्यासकांचा, त्यांच्या चिंतनाचा महत्त्वाचा भाग असून, या विचारवंतांबरोबरच हे विचार, चिंतन, अभ्यास लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अनेक नियतकालिकांनी, वर्तमानपत्रांनी सातत्याने निष्ठेने वैचारिक साहित्य प्रकाशनाचे कार्य अविरतपणे केले असून, लोकशिक्षणाची धुरा समर्थपणे पेललेली दिसते.

भारत हा हिंदू धार्मिक देश म्हणून आजही कमी–अधिक प्रमाणात ओळखला जातो. भारताला हिंदू धर्मीय देश म्हणून ओळखले जावे, यासाठी अभ्यासकांचे प्रयत्न सातत्याने

दिसतात. यालाही प्राचीन अशी परंपरा असून, संस्कृत येथील वेदवाणी होती. तर चार वर्ण, चार आश्रम, वेद, उपनिषद महाकाव्य यांना हिंदू–धर्मीय तत्त्वज्ञानात महत्त्वाचे स्थान असून या भोवतीच हे तत्त्वज्ञान फिरताना दिसते. परंतु वैचारिक वाङ्‌मयामध्ये मात्र या तत्त्वज्ञानाची चिकित्सा करताना दिसते. या संदर्भात प्रा. गो. पु. देशपांडे म्हणतात, ''ज्या हिंदुत्ववादाला एकेकाळी वैचारिक विश्वात अस्पृश्यासारखे वावरावे लागत होते. त्याची आता वस्तुनिष्ठ चर्चा सुरू झाली. हे आपल्या वैचारिक प्रगल्भतेचे लक्षण आहे.''[१६]

यावरून वैचारिक साहित्य माणसाच्या व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र बदल घडवून आणत असून, वैचारिक प्रगल्भ असणारा समाज निर्माण करू शकते. कालपर्यंत जे तत्त्वज्ञान ऐकण्यासही बंदी होती. आज त्या तत्त्वज्ञानाची चिकित्सा केली जाते, चर्चा केली जाते, मते मांडली जातात. म्हणजेच विवेकाने जगण्याचे भान वैचारिक साहित्यामधून येत असून, माणसाच्या सक्षम, संयम आणि प्रगतशील वाटचालीत वैचारिक साहित्य महत्त्वाची भूमिका बजावत असते. धर्मव्यवस्था समाजाला अज्ञान दारिद्र्य, गुलामगिरी, अन्याय, अत्याचाराने पीडित असा समाज निर्माण करते, तर वैचारिक साहित्य स्वाभिमान, समता, न्याय, प्रगती आणि वैश्विकतेच्या मार्गाने जाते. वैचारिक साहित्यामधून समाजप्रबोधन, समाजपरिवर्तन मोठ्या प्रमाणात होऊन चिकित्सेच्या पातळीवर तटस्थपणे मत मांडते. यासाठी अहिंसक मार्गाचा अवलंब करून जातीयता, प्रांतीयता, असमानता, लिंगभेद, भाषाभेद, प्रांतभेद, अंधश्रद्धा नाकारते. वैचारिक साहित्याचे महत्त्वाचे वेगळेपण हे की, हे साहित्य विज्ञानाची कास धरणारे आहे. वैचारिक साहित्यामध्ये वाङ्‌मयीन समीक्षा, लेख, वैचारिक निबंध, स्फुट लेख, नियतकालिकांतील व वर्तमानपत्रातील अग्रलेख, संशोधनपर लेख इत्यादींचा समावेश होतो.

वैचारिक साहित्याच्या मांडणीसंदर्भात किंवा शैलीसंदर्भातही वेगळेपण लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणजे मत प्रकटीकरणात वस्तुनिष्ठ खंडनमंडण, मूल्यनिष्ठा असते. तर्कशुद्ध विचार प्रकटीकरण, महापुरुषांविषयी आणि राष्ट्राविषयी अपार प्रेम, श्रद्धा, संविधानावर निष्ठा, वंचितांबद्दल–बहुजनांबद्दल कळवळा, वर्तमान परिस्थितीचे अचूक आकलन, विश्लेषण व उपाययोजना इत्यादी दिसून येते.

वैचारिक साहित्य, पाप, पुण्य, देव, पूजा, अर्चना, अंधश्रद्धा, रूढी, प्रथा, परंपरा, धर्म, जात, वर्णव्यवस्था, पुरुषार्थ, आश्रमव्यवस्था इत्यादींना ठामपणे नाकारते. या संदर्भात वि. वा.

शिरवाडकर म्हणतात, ''या ठिकाणचे पहिले वास्तव आणि पहिले दुखणे जातिसंस्था हे आहे आणि त्याच्या अनुरोधाने परिवर्तनाचा विचार व्हायला हवा. नव्या काळातील लढाई जुन्या काळातील शास्त्रांनी अथवा विचारांनी लढणे प्राय: अशक्य असते.''१७

या संदर्भावरून स्पष्ट होते, की प्राचीन काळी धर्मव्यवस्था, जातिव्यवस्था मानवाच्या प्रगतीआड होती. नव्या समाजनिर्मितीसाठी विज्ञानाची कास धरलेला, चिकित्सा वृत्ती असणारा, अभ्यासू माणूस म्हणजेच वैचारिक जाणीव जागृती असणारा होय. याचाच अर्थ वैचारिक साहित्य इतर साहित्यापेक्षा वेगळे आहे.

## ४.२० 'साधना' साप्ताहिकातील वैचारिक साहित्य :

सानेगुरुजींनी 'साधना' (१५ ऑगस्ट १९४८) साप्ताहिक सुरू केले. या पहिल्याच अंकात सानेगुरुजी 'साधना'च्या निर्मितीमागील आपली भूमिका विशद करताना म्हणतात, ''विषमता व वैरभाव नष्ट करण्याची थोर साधना आपणास करावयाची आहे.''

यावरून सानेगुरुजींची 'साधना' साप्ताहिकामागील भूमिका स्पष्ट होते. या देशाचा इतिहास जसा पराक्रमाचा आहे तसाच जात–धर्म व्यवस्थेचा, विषमतेचा आहे. या विषमतेमधून माणूस माणसापासून मैलोन् मैल दूर गेला. वर्णाश्रम, आश्रम व्यवस्थेत सर्वसामान्य माणूस होरपळून निघत होता. या सर्वांचा फायदा इंग्रजी सत्तेला झाला आणि इंग्रजांनी १५० वर्षे भारतावर राज्य केले. पण इंग्रजांच्या आगमनाने शाळा, रेल्वे, मुद्रणकलाही भारतात आल्या आणि येथील सामाजिक परिस्थितीला हादरे बसू लागले. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. महात्मा गांधींची हत्या झाली आणि संघर्षाचा जणू वणवा पेटला. या सर्वच परिस्थितीचे पडसाद सानेगुरुजींच्या मनावर उमटू लागले. ते स्वत:ला महात्मा गांधींचा निष्ठावंत सेवक म्हणवून घेत असत. गांधी हत्येनंतर महाराष्ट्रात जी परिस्थिती उद्भवली ती सानेगुरुजींनी पाहिली. स्वातंत्र्य मिळविले म्हणजे सर्व प्रश्न संपले असे नसून येथील माणूस शहाणा करणे, त्याला वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ करणे मोठे जिकिरीचे काम त्यांना वाटू लागले. ही विषमता दूर करण्याच्या उद्देशाने सानेगुरुजींनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. दिनांक १७ ऑगस्ट २०१९ च्या 'साधना' साप्ताहिकामध्ये संपादकीय लेखात संपादकाने ७१ वर्षांच्या 'साधना'च्या वाटचालीसंदर्भात आढावा घेताना म्हटले आहे, ''साधना साप्ताहिक ७२ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. आतापर्यंतच्या प्रदीर्घ वाटचालीत एक ध्येयवादी व परिवर्तनवादी नियतकालिक

अशीच ओळख 'साधना'ची राहिली आहे. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विषयांवरील विश्लेषणात्मक व चिकित्सक लेखन 'साधना'तून प्रामुख्याने प्रकाशित केले जाते. वैचारिक भूमिकेच्या बाबतीत 'साधना' कायम पुरोगामी राहिली आहे. जात, धर्म, भाषा, प्रांत आणि लिंग या पाचही प्रमुख घटकांच्या बाबतीत समाजाने अधिकाधिक उदारमतवादी, सहिष्णू होत जावे, संकुचितपणा अधिकाधिक कमी होत जावा. या आशयाचा सूर 'साधना'तील लेखनाच्या मध्यवर्ती राहिला आहे आणि सर्व प्रकारच्या उपेक्षित व वंचित घटकांना अधिकाधिक झुकते माप मिळायला हवे. किंबहुना त्यांचे होत असलेले शोषण व त्यांच्यावर होत असलेला अन्याय थांबायला हवा. याबाबत 'साधना' आग्रही राहिली आहे.''[१८]

यावरून 'साधना' साप्ताहिकाची वैचारिक जडणघडण वैचारिक कार्य स्पष्ट होते. 'साधना' साप्ताहिक सातत्याने समाजमनाची वैचारिक मशागत करण्यात अग्रभागी होते आणि आजही आहे. 'साधना' साप्ताहिकाने सातत्याने समाजोपयोगी विविध विषयांवर वैचारिक लेखन प्रकाशित केले. त्याला विषयाचे बंधन नव्हते. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक अशा वेगवेगळ्या विषयांवर 'साधना'ने आपली वैचारिक बाजू सातत्याने मांडली. समाजाचे प्रबोधन केले. 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले वैचारिक लेखन पुढीलप्रमाणे आहे.

### ४.२०.१ 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले शैक्षणिक लेख :

'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेल्या वैचारिक लेखनात शैक्षणिक लेख आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रातील त्या–त्या कालखंडातील आणि तत्कालीन परिस्थितीतील महत्त्वाच्या विषयांवरील शैक्षणिक लेख 'साधना'मधून सातत्याने प्रकाशित झाले. त्यात शिक्षणशास्त्रवेत्ते रवींद्रनाथ– श. मा. दिवेकर (१९ फेब्रुवारी १९४९), भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न (२१ जुलै १९५१), उच्च शिक्षणाचे माध्यम हिंदी की प्रादेशिक भाषा (१५ सप्टेंबर १९५१, शिक्षणात समाजसेवेची सक्ती असावी काय? (२४ नोव्हेंबर १९५१), भाषेचा विकास थोपवू नका– काकासाहेब कालेलकर (२२ डिसेंबर १९५१), शिक्षणाची शोकांतिका– वसंत बापट (२९ मार्च १९५२), शिक्षण कशासाठी– श्री जे. कृष्णमूर्ती (१२ जून १९५४), भाषा हाच नवीन राज्यांचा एकमेव निकष नव्हे (१५ ऑक्टोबर १९५५) आदी अनेक शिक्षण विषयांवरील महत्त्वपूर्ण विषय आणि चर्चा घडवून आणण्याचे काम सातत्याने 'साधना' साप्ताहिकाने केले. शिक्षणशास्त्रवेत्ते

रवींद्रनाथ– श. मा. दिवेकर (१९ फेब्रुवारी १९४९) या लेखामध्ये रवींद्रनाथांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न केला असून, या लेखात रवींद्रनाथ मानवाला निसर्गाशी जोडण्याचा प्रयत्न करतात. ते मुलांना मोकळेपणाचे वातावरण आवश्यक असल्याचे मत नोंदवितात. साधी राहणी म्हणजे सृष्टीशी समरस होण्याची वृत्ती व उच्च विचारसरणी म्हणजे विश्वाशी ऐक्य अनुभवणे असे शिक्षणासंदर्भात सांगतात. भाषेच्या संदर्भाने अनेक विषय चर्चेला आणले. 'साधना' साप्ताहिकाचे भाषेच्या संदर्भातले कार्यही महत्त्वाचे आहे. भाषेच्या संदर्भात 'साधना'ने भाषावार प्रांतरचनेचा प्रश्नही हाताळलेला दिसतो. 'भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न' या लेखामध्ये उपरोक्त विषयावरील तज्ज्ञांची मते वाचकांच्या पुढे ठेवली. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषावार प्रांतरचनेसंदर्भात कोणती भूमिका होती. ती मांडलेली दिसते. ''डॉ. आंबेडकरांचे विचार'' या मथळ्याखाली भाषावार प्रांतरचनेसंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन लेखक मांडताना दिसतात. प्रस्तुत लेखामध्ये आपले विचार सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. ''भाषावार प्रांतरचना झाली तरी सरकारचा कारभार म्हणजे कोर्ट–कचेऱ्यांचे कामकाज वगैरे केंद्रीय सरकारच्या भाषेत म्हणजे हिंदीत चालावे, अशी अट घटनेमध्ये नमूद करण्यात आली. तरच भाषावर प्रांतरचनेचे तत्त्व मी स्वीकारीन. प्रांताची मातृभाषा ही सरकारी भाषा करण्यास माझा आत्यंतिक विरोध आहे'' असे त्यांनी दर कमिशनला सादर केलेल्या आपल्या निवेदनात स्पष्ट म्हटले आहे. भारतीय ऐक्य व संस्कृती यांचा परिपोष व्हावा, अशी ज्यांना तळमळ आहे. त्यांना मातृभाषेच्या मर्यादा कधीच विसरता येणार नाहीत. कॉलेजमधील शिक्षण राष्ट्रभाषेत असावे, असे डॉ. आंबेडकरांचे मत आहे. प्रादेशिक विद्यापीठे अस्तित्वात येत आहेत यात काहीच वावगे नाही. पण या विद्यापीठांची क्रमिक पुस्तके राष्ट्रभाषेतून लिहिली आणि पुढील दहा वर्षांच्या आत इंग्रजीची जागा राष्ट्रभाषेने घ्यावी, अशी कोणत्याही तऱ्हेची तरतूद झालेली दिसत नाही. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात राष्ट्रभाषेच्या विकासासंबंधी एक शब्ददेखील नसावा ही खेदजनक गोष्ट आहे. या सर्व घटनांमुळे एक नवीन प्रांतीय तेढ व कटुता देशात निर्माण होत आहे. भाषावार प्रांतरचनेच्या मार्गातील अडचणीसंबंधीचे मौन धारण करून वा तत्त्वांची नुसती घोषणा करण्याने थोडी लोकप्रियता लाभली, तरी प्रांतीय तेढ–कटुता वाढण्यास मदत होत आहे. याचा काँग्रेस नेत्यांनी विचार करायला हवा.''[१९]

यावरून 'साधना' साप्ताहिकाने भाषावार प्रांतरचना या विषयावरील लेखाच्या माध्यमातून आपले मत व्यक्त केलेले दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर याविषयी आपले मत मांडताना म्हणतात– ''भाषावार प्रांतरचना झाली तरी सरकार, कारभार आणि कोर्ट कचेरीचे कामकाज हिंदीत चालावे, ही अट घटनेत घालून दिलेली आहे. प्रादेशिक भाषा कार्यालयीन पातळीवर तोकडी आहे. म्हणजेच प्रादेशिक भाषेच्या काही मर्यादा आहेत.'' त्यामुळे सरकारी कामकाजाची किंवा कोर्ट कचेरीची भाषा वेगळी– हिंदी ठेवावी– अशी सूचना देतात. 'साधना' साप्ताहिकाने आपल्या वाटचालीमधून भाषावार प्रांतरचनेचे महत्त्व आणि तोटेही अधोरेखित केलेले दिसून येते. 'उच्च शिक्षणाचे माध्यम हिंदी की प्रादेशिक भाषा? (दिनांक १५ सप्टेंबर १९५१)' या विषयावरील लेख प्रकाशित झाला. उस्मानिया विद्यापीठाच्या दीक्षान्त समारोह प्रसंगी भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी या विषयाला स्पर्श केला. ते म्हणाले की, शिक्षणाच्या क्षेत्रातील सक्तीचा अपव्यय टाळायलाच हवा आणि प्रादेशिक भाषेतूनच शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे. याच विषयावर तत्कालीन परिस्थितीत उपरोक्त विषयावर चर्चा, विचारमंथन होत होते. अ. भा. नभोवाणी केंद्राने 'उच्च शिक्षणाचे माध्यम हिंदी की प्रादेशिक भाषा' या विषयावर तीन विद्यापीठांच्या कुलगुरूंची चर्चा घडवून आणली होती. यात मुंबई विद्यापीठाचे तत्कालीन उपकुलगुरू जस्टिस भगवती, गुजरात विद्यापीठाचे श्री. दिबेटिया आणि बडोदा विद्यापीठाच्या श्रीमती हंसा मेहता यांचा समावेश होता. या चर्चेतील प्रश्नोत्तरे 'साधना' साप्ताहिकाने वाचकांपर्यंत पोहोचवली. ''उच्च शिक्षणाचे माध्यम हिंदी की प्रादेशिक भाषा'' या विषयावर झालेल्या मौलिक चर्चेचा अंश दिनांक १५ सप्टेंबर १९५१च्या अंकामध्ये प्रसिद्ध केला. या लेखामध्ये एका प्रश्नाला उत्तर देताना प्रादेशिक आणि भारतीय संस्कृती संदर्भात जस्टिस भगवती व हंसा मेहता यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ''**दिबेटिया : प्रादेशिक वृद्ध राष्ट्रीय संस्कृती** असा वाद भ्रामक व अहितकर आहे. प्रादेशिक संस्कृती राष्ट्रीय संस्कृतीला कधीच वीरश्री असू शकत नाही. राष्ट्रीय संस्कृतीचा तो एक अंश असू शकतो. प्रादेशिक व राष्ट्रीय जीवन परस्परपूरक असते. त्याचप्रमाणे मातृभाषा व राष्ट्रभाषा परस्परपूरक झाल्या पाहिजेत. त्यांच्यामध्ये विरोध किंवा वाद निर्माण होऊ शकत नाही आणि होता कामा नये. त्यांच्यामध्ये विरोध निर्माण झाला; तर आणखी दोहोंचे त्यात अहित आहे. दोहोंचे अवमूल्यन केले जाईल तेव्हा शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न समाधानकारक रीतीने सोडविणे शक्य होईल.

**भगवती** : उच्च शिक्षणाचे माध्यम मातृभाषा म्हणजे प्रादेशिक भाषा करून हा प्रश्न सुटणार नाही. प्रादेशिक भाषा उच्च शिक्षणाचे माध्यम असावे असे माझे मत आहे. प्रादेशिक भाषा अभ्यासाला विश्वविद्यालयातही प्रमुख स्थान असावे. प्रादेशिक भाषेतील लेखक, कलाकृती, भाषांचे संशोधन व संवर्धन प्रत्येक विश्वविद्यालयात व्हावे, पण त्यातील प्रादेशिक भाषा उच्च शिक्षणाचे माध्यम बनविण्याची आवश्यकता नाही.

**हंसा मेहता** : मला वाटते, आपली इंग्रजीची आसक्ती अद्याप गेलेली नाही. उच्च शिक्षणाची भाषा इंग्रजी असावी, असे आपले मत दिसते. मला ही गोष्ट बिलकूल पसंत नाही. इंग्रजी उच्च शिक्षणाचे माध्यम बनवणे घातक आहे असे माझे स्पष्ट मत आहे. गेली १०० वर्षे इंग्रजीचे माहात्म्य आपण वाढविले असल्यामुळे इंग्रजीला रजा देणे आपल्या जीवावर येते. इंग्रजीचे तोडके मोडके ज्ञान म्हणजे विद्या असा आपला ग्रह झाला असल्यामुळे इंग्रजीस फारकत केली, तर काय होईल अशी आपल्याला भीती वाटते. इंग्रजी शिक्षणाने आपण आपल्या देशात राहून परदेशी बनलो आहोत. इंग्रजी शिक्षण कृत्रिम व समाजविन्मुख बनविणारे ठरले आहे. उच्च शिक्षण प्रादेशिक भाषेत दिले, तर राष्ट्रीय ऐक्याची भावना कमजोर होईल असे सांगितले जाते. पण मला तसे वाटत नाही. राष्ट्रीय ऐक्य एका भाषेवरच अवलंबून आहे का? स्वित्झर्लंडसारख्या लहान देशात तीन भाषा बोलल्या जातात. भारतासारख्या खेड्यांच्या देशात अनेक समृद्ध भाषा असणे हे स्वाभाविक आहे. या विविधतेचे, भारतीय ऐक्याचे दर्शन झाले पाहिजे. कृत्रिम व बळजोरीचे ऐक्य काय कामाचे?

**दिबेटिया** : उच्च शिक्षणाचे माध्यम काय असावे अशी आपण चर्चा करतो. त्या वेळी प्रादेशिक किंवा राष्ट्रीय भाषेवरील निष्ठेचा प्रश्न उपस्थित करणे अप्रस्तुत आहे. हा प्रश्न व्यवहाराचा म्हणजे सोयी–गैरसोयी या दृष्टीने सोडविला पाहिजे. शिक्षकांचे सर्वसाधारण मत असे दिसते की, सर्व शिक्षण मातृभाषेतच दिले, तर विद्यार्थ्यांच्या शक्तीचा अपव्ययय होणार नाही. मातृभाषेत अध्ययन करणे विद्यार्थ्यांना सोपे जाते. इंग्रजीतील पारिभाषिक शब्द मातृभाषेत किंवा मातृभाषेत आणले गेले व शिक्षकांचे हिंदी भाषेवर प्रभुत्व असले तर उच्च शिक्षण प्रादेशिक किंवा राष्ट्रभाषेत देणे अडचणीचे वाटणार नाही. यासाठी काही कालमर्यादा निश्चित करावी लागेल. तीन किंवा पाच वर्षांत प्रोफेसरांनी व आचार्यांनी हिंदी भाषा शिकली पाहिजे अशी प्रथम सक्ती करावी लागेल.

**हंसा मेहता :** हाच खरा मुद्दा आहे, प्रोफेसरांना हिंदी भाषा शिकायला किती काळ द्यावा म्हणजे आणखी किती दिवस संक्रमण काळ म्हणून इंग्रजीतूनच शिक्षण चालू ठेवावे.

**दिबेटिया** : मला वाटते की संस्कृत, इतिहास व भूगोल वगैरे विषय आरंभापासूनच प्रादेशिक भाषेमध्ये शिकविता येतील. पण विज्ञान, तत्त्वज्ञान किंवा असे गहन विषय राष्ट्रभाषेतूनच शिकविले जावेत. सर्व भाषांतील पारिभाषिक शब्द व पाठ्यपुस्तके एकाच प्रकारची असली की, विद्यार्थ्यांना एका विद्यापीठातून दुसऱ्या विद्यापीठात जाण्यास अडचण निर्माण होणार नाही. देशातील विश्वविद्यालयांच्या कामात एकसूत्रीपणा राहील.''[२०]

उपरोक्त संदर्भावरून उच्च शिक्षणाचे माध्यम कोणती भाषा असावी. यावर उस्मानिया विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात भाषण करताना राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, की शिक्षण क्षेत्रात सक्तीचा अपव्यय टाळायला हवा. प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षण प्रादेशिक भाषेतच द्यायला हवे. यावरून अनेक मतमतांतरे उदयाला आली. हिंदी ही जर राष्ट्रभाषा असेल, तर प्रादेशिक भाषेत शिक्षण देण्यापेक्षा राष्ट्रभाषेमधून द्यायला हवे असेही विचार यावर येत होते. या मतप्रवाहावरून अ. भा. नभोवाणी केंद्रावरून या संदर्भात एक चर्चा घडवून आणली गेली या चर्चेमध्ये विचारवंताना बोलावून प्रस्तुत विषयावर चर्चा करण्यात अली. यावरून 'साधना' साप्ताहिकाने तत्कालीन परिस्थितीतील महत्त्वाचे प्रश्न सातत्याने हाताळले. 'शिक्षणात समाजसेवा सक्तीची असावी काय? (२४ नोव्हेंबर १९५१)' या लेखामध्ये सरकारने एप्रिल १९४९ मध्ये मुंबई राज्य सरकारने शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसेवक यांची मिळून एक समिती स्थापन केली होती. शिक्षणात समाजसेवा सक्तीची असावी की नसावी यावर विचार, अभ्यास, चिंतन करून समितीने राज्य सरकारकडे आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालाचा परामर्श या लेखामध्ये घेण्यात आला असून, या लेखामधून समाजसेवेची आवश्यकता असल्यामुळे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी समाजसेवा करावी यासाठी त्यांनी कृतिशील कार्यक्रम आखावा. पदवीपूर्वी प्रत्येक विद्यार्थ्यांने समाजसेवा करायला हवी. या लेखात ते लिहितात, ''समाजसेवेची आवश्यकता जाणवते– समाजसेवेची आज फार आवश्यकता आहे. निकडीच्या कामांचे पर्वतप्राय ढीग पडले आहेत. आधुनिक शिक्षणक्रम पुस्तकी व समाजपराङ्मुख आहे. अशी सर्वत्र तक्रार आहे. समाजसेवेला शिक्षणक्रमात प्रमुख स्थान देण्याचा गांधीप्रणीत बेसिक एज्युकेशन पद्धतीचा मुख्य उद्देश होता. तसेच काही प्रयोग

काही ठिकाणी जारी आहेत. राष्ट्र सेवा दलाने सुरू केलेले सानेगुरुजी सेवापथक हा प्रयोग गेले वर्षभर अत्यंत चिकाटीने व श्रद्धेने करीत आहेत. सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारीही अशा तऱ्हेचा उपक्रम करीत आहेत. म्हणजे ऐच्छिक किंवा सक्तीच्या सामुदायिक विधायक कार्याची आवश्यकता व शक्यता समाजाला मोठ्या प्रमाणावर जाणवू लागली आहे.

याच लेखामध्ये पुढे असे म्हटले की, पदवीपूर्वी समाजसेवा केली पाहिजे– अहवालातील पाचव्या प्रकरणाच्या आरंभी असे म्हटले आहे, ''शिक्षणाच्या आरंभापासून बालमनामध्ये समाजाची जाणीव किंवा भावना निर्माण केली पाहिजे व त्यासाठी समाजशिक्षण व शालेय पुस्तकी शिक्षण यांचे योग्य मिश्रण (इंटिग्रेशन) केले पाहिजे. नई तालीम शिक्षणक्रमाच्या आदर्श मान्य करण्यात यावा.'' शेतकी, वैद्यकीय, इंजिनिअरिंगसारख्या धंदे शिक्षणाच्या पदवीधरास सहा महिने तरी खेडेगावात काम करावयास लावून त्यानंतरच पदवी देण्यात यावी. अशी समितीने सूचना केली आहे. समितीच्या अहवालातील ही सूचना आम्हाला सर्वांत अधिक स्वागतार्ह वाटते. सहा महिन्यांऐवजी ही मुदत दोन वर्षे करावी व दुसऱ्या वर्षी त्याला मानधन देण्याची व्यवस्था व्हावी. अशी आमची सूचना आहे. शिक्षणच आमूलाग्र बदलले पाहिजे. शिक्षणक्रमामध्ये समाजसेवेचा अंतर्भाव व्हावा, असे ज्या वेळी आपण म्हणतो त्या वेळी शिक्षणक्रम सुधारावा हे आपले मुख्य उद्दिष्ट असते, हे विसरता कामा नये. समाजसेवा म्हणून केलेल्या विद्यार्थ्यांच्या कार्यातून किती साक्षर होतील किंवा किती नवी रचना होईल हा विचार अप्रस्तुत आहे. शैक्षणिक विषमता निर्माण करणाऱ्या केवळ बौद्धिक स्वरूपाच्या व व्यवहारशून्य शिक्षणाने बुद्धिमान वर्गामध्ये भयंकर आयतेपणा, सुखलोलुपता, परप्रत्यत्व व ऐतखाऊ वृत्ती निर्माण केली आहे. आमूलाग्र बदलणे व विद्यार्थी स्वावलंबी, कुशलहस्त, कष्टाळू व योजक बनवणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे.''[२१]

प्रस्तुत संदर्भावरून शिक्षणात समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित झाले असून, विद्यार्थिदशेत अगदी प्रारंभापासून सामाजिक ज्ञान शिकवणे किती गरजेचे आहे हे तर लक्षात येतेच; पण सामाजिक जाण आणि भान केवळ शिकवून चालणार नाही; तर त्यासाठी कृतिशील सहभाग आवश्यक असतो. यासाठी शिक्षणव्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी सामाजिक कामात योगदान देतील त्यांच्या आचरणात नक्कीच बदल दिसेल. ते सामाजिक परिस्थितीविषयी, प्रश्नांविषयी जागरूक राहतील. यासाठी शिक्षणात समाजसेवा

सक्तीची असावी काय, असा सवाल निर्माण केला गेला. याविषयी रीतसर एका समितीची स्थापना केली आणि समितीने अभ्यासाअंती दिलेल्या अहवालावर चर्चा होण्यासाठी 'साधना'मधून तो अहवाल प्रकाशित केला. 'शिक्षणाची शोकांतिका' (२१ मार्च १९५२) या लेखामध्ये वसंत बापट म्हणतात, ''सन १९५२ मध्ये शालात परीक्षेमध्ये अठ्ठावन हजार विद्यार्थी बसले असून, आजचे शिक्षण हे उत्पादनाच्या दृष्टीने, उदरनिर्वाहाच्या दृष्टीने उद्योगधंद्याच्या दृष्टीने कुचकामी असून श्रमप्रतिष्ठेबद्दल उदासीन दिसते. हे या शिक्षणाचे अपयश आहे. आजचे शिक्षण विद्यार्थ्यांना स्फूर्ती देत नाही. परिणामी त्यांच्यात उत्साहाचे वातावरण निर्माण होत नाही. एक साचलेपणा विद्यार्थ्यांच्या मनात दिसतो. त्यामुळे त्यांना सद्य:स्थितीतील देशाची परिस्थिती दिसत नाही. त्यांच्या महत्त्वकांक्षा अगदीच जुजबी आणि मर्यादित असतात. प्रत्येकाला एका सुरक्षित चौकटीत जगावंसं वाटतं, हे या शिक्षणव्यवस्थेचंच अपयश आहे. शोकांतिका आहे.'' याच लेखामध्ये वसंत बापट म्हणतात, ''विधायक कामासाठी सक्तीने महिना द्या– नोकरी मिळाली की पैसा मिळतो. तेव्हा नोकरी म्हणजेच उत्पादक श्रम अशी आपली व्याख्या आहे. आपल्या राष्ट्राला सध्या उत्पादक श्रमांची आवश्यकता आहे. याचा अर्थ असा आहे की, तरुणांनी बांडगूळवजा जे धंदे आहे त्या धंद्याच्या भरीला न पडता ज्यात संपत्ती निर्माण होते. अशा उद्योगांकडे लक्ष दिले पाहिजे. पंडित नेहरूंनी परवा हीच तक्रार केली आहे. टांकसाळीचे उत्पादन वाढवून देशाचे प्रश्न बिकट होत जातात. आपल्या शिक्षणात या गंभीर प्रश्नांचा विचार क्वचितच केलेला आढळेल आणि पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्यापेक्षा याची सारी जबाबदारी सरकारवर पडते. सरकार नसत्या बाबतीत आपला हेका चालवत असते आणि या जीवन–मरणाच्या प्रश्नांत मात्र कमालीचा थंडपणा धारण करते. परीक्षा संपल्यावर एक महिनाभर तरी विद्यार्थ्यांना सक्तीने विधायक कामांमध्ये सामील केले पाहिजे.''[२२]

याचाच अर्थ शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये साचलेपण येत असेल, तर त्यांच्या स्फूर्तिदायी जगण्यासाठी, त्यांना परीक्षेनंतर एक महिना विधायक कामासाठी सक्तीने बोलवा. त्यांना समाजाच्या, देशाच्या समस्या, समजतील. आपल्या बुद्धीचा व ज्ञानाचा उपयोग ते समाजाच्या विकासासाठी करतील. नकळतपणे श्रमप्रतिष्ठा हे मूल्य रुजवण्यास मदत होईल. श्री जे. कृष्णमूर्ती यांच्या विचारातील शिक्षणाच्या हेतू संदर्भातील 'शिक्षण कशासाठी? (१२ जून १९५४)' या लेखामध्ये त्यांनी, आपल्या मनातील गोंधळ, सुसंवाद जिथे निर्माण होतो, त्याला

शिक्षण म्हटले पाहिजे. सभोवतालचे जग हे कणाकणांनी बदलत असते. हा बदल समजून घेण्याची कुवत म्हणजे शिक्षण होय. परंतु आजचे शिक्षण आपल्याला विचारशून्य बनवीत आहे. आपण आपले, आपल्या सभोवतालचे प्रश्न सोडवू शकत नाही. यामुळे आपल्या अंतर्मनात गोंधळ निर्माण होत आहे. या संदर्भात 'शिक्षण कशासाठी?' या लेखामध्ये श्री. जे. कृष्णमूर्ती म्हणतात, ''आजचे शिक्षण आपल्याला विचारशून्य बनवत आहे. आपल्या मनोधर्माला अनुकूल असा व्यवसाय ते देऊ शकत नाही. ठरवून दिलेल्या परीक्षा आपण पास होतो आणि नशीब चांगले असेल, तर मिळेल ती नोकरी पकडतो. यानंतरचे आपले जीवन म्हणजे केवळ यांत्रिक चाकोरी होऊन बसते. या नोकरीवरच आपली आर्थिक सुरक्षितता अवलंबून असल्यामुळे आपल्या इच्छेविरुद्धही या नोकरीला चिकटून राहणे आपल्याला भाग पडते. या यांत्रिकतेविरुद्ध बंड करून उठावे, काही तरी वेगळे करावे असे आपल्याला मनापासून वाटत असते. परंतु खांद्यावर जबाबदाऱ्यांचे एवढे मोठे ओझे असते की, आपण अगदी जखडले जातो. चिंता आणि भय आपले व्यक्तिमत्त्व पोखरीत असतात. वैफल्याने झाकोळून गेलेले आपले मन मग मदिराक्षी, राजकारण, धर्म यातून सोईस्कर पळवाटा शोधू लागते.

आपल्या इच्छा-आकांक्षा दडपल्या गेल्या की, जीवनातल्या साध्यासुध्या गोष्टींना आपण अवास्तव महत्त्व देतो. यातून मानसिक विकृती निर्माण होतात. जीवनाचा एकात्म आणि साकल्यात्मक असा प्रत्यय आल्याखेरीज आपले कुठलेही प्रश्न सुटणार नाहीत; आपल्या सर्व संबंधातून दुःख आणि विनाश यांचीच निर्मिती होत राहील.

अज्ञान म्हणजे आत्मज्ञानाचा अभाव. वरवरच्या सुधारणांनी या अज्ञानाचे मूळ नष्ट होणार नाही. आपले मन बहुतालच्या परिस्थितीने जखडलेले आहे. एवढेच केवळ कळून भागणार नाही. ही परिस्थिती म्हणजे आपणच आहोत, तिच्यापासून आपण निराळे नाही ही जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे. आपले सारे विचार क्रिया-प्रतिक्रिया आपण ज्या समाजाचे घटक आहोत त्या समाजाने मानलेल्या मूल्यांनी जखडलेल्या, मर्यादित केलेल्या असतात.

माझ्या भोवतालची परिस्थिती ही माझ्याहून वेगळी नाही ही एकात्म प्रतितीच आपल्याला येऊ शकत नाही. कारण आपल्या व्यक्तिमत्त्वातल्या अनेक व्यक्ती आपल्या अहंभोवती फेर धरीत असतात. आपला अहम् या एकाच व्यक्तित्वातल्या अनेक व्यक्तींचा

बनलेला असतो आणि या व्यक्ती हे विभिन्न भासणारे घटक म्हणजे दुसरे तिसरे काही नसून विविध रूपांतून प्रकट होणारी आपली आसक्तीतूनच असत्तीच्या विविध रूपांची गोळा–बेरीज असते. मी आणि माझे, माझी इच्छाशक्ती, मी आणि परिस्थिती किंवा समाज यातले द्वैत या आसक्तीतूनच अपरिहार्यपणे निर्माण होते. आपलं आंतरिक द्वंद्व आणि संघर्ष या द्वैतावरच उभे असतात.

अहम्च्या या साऱ्या प्रक्रिया आपण जागरूकतेने समजून घेणे म्हणजे चिंतन करणे, या चिंतनातून या अहम्केंद्रित द्वैताच्या पलीकडे जाता येते. हेच आत्मज्ञान मनाला जखडणाऱ्या संस्कारांचे आणि मूल्यांचे पाश आत्मज्ञानाशिवाय सुटणे शक्य नाही. या मुक्तीतच सत्य आहे. सृजनशीलता आहे, ईश्वर आहे... सारे काही आहे.''[२३]

उपरोक्त संदर्भावरून शिक्षणाचा हेतू स्पष्ट होत असून, मानवाचे जगणे सुलभ ज्यामुळे होते ते शिक्षण. शिक्षणाने समाज एकसंध व्हायला हवा. विषमता संपायला हवी. निसर्गाचे जतन आणि संवर्धन याची जाण यायला हवी. आपल्या अंतर्मनातला गोंधळ थांबायला हवा. अज्ञान म्हणजे आपल्या आत्मज्ञानाचा अभाव होय. यासाठी वरवरच्या सुधारणा करून चालणार नाही; तर ही बदलाची प्रक्रिया स्वत:पासून करायला हवी. भोवतालची परिस्थिती म्हणजे दुसरे–तिसरे काही नसून आपणच असतो. म्हणूनच ही परिस्थिती बदलायची असेल, तर स्वत: बदलायला हवे आणि याचे ज्ञान शिक्षणामधून यायला हवे.

### ४.२०.२ 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले स्त्रीविषयक लेख :

'साधना' साप्ताहिकाने प्रकाशित केलेले स्त्रीविषयक लेख आणि त्यातून चर्चिले गेलेले स्त्रीप्रश्न आणि वाचकांच्या मनाची त्यातून होत गेलेली मशागत स्त्रीविषयक चळवळीला प्रोत्साहन देत गेली. महाराष्ट्रात स्त्री प्रश्नांविषयी जाणीव जागृती निर्माण करण्यात महत्त्वाचे योगदान दिले. आज पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्राला वैचारिक अधिष्ठान देण्याचे कार्य अनेक विचारवंतांनी आणि नियतकालिकांनी केले. त्यात 'साधना' साप्ताहिक हे एक महत्त्वाचे नियतकालिक होते. यामधून स्त्रीविषयक प्रश्नांवर चर्चा करणारे अनेक लेख प्रकाशित झाले. तसेच महिला जीवन विशेषांकही 'साधना'ने प्रकाशित केलेले दिसून येतात. त्यामधून स्त्री जीवनाविषयीच्या अनेक मूलभूत प्रश्नांविषयी चर्चा करून उपाययोजनांच्या दृष्टीने महत्त्वाचे

पाऊल उचलले. तसे पाहता मुळात मातृसत्ताक असलेला आपला भारत देश नंतरच्या काळात पुरुषप्रधानतेकडे वळला आणि मातृसत्ताक असलेली स्त्री दास्या बनली.

संशोधक, सर्जनशील, कर्तृत्ववान, धैर्यशील, संयमी असणाऱ्या स्त्रीचे केवळ 'रांधा, वाढा, उष्टी काढा'. एवढेच कार्यक्षेत्र पुरुषसत्तेच्या विकृत मनोवृत्तीमधून उदयाला आले. स्त्रीच्या पायात बंधनांच्या बेड्या पडल्या. मूल जन्माला घालणे आणि गुलामासारख काम करणे एवढेच तिचे कार्यक्षेत्र तयार झाले. परंतु हळूहळू या विचारांना धक्के देणारे विचारप्रवाह समाजात तयार होऊ लागले. प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक कालखंडातील दाखले देत देत परिवर्तनाचा मार्ग धरू पाहणारे विचारवंत आणि त्यांचे विचार इंग्रजांच्या आगमनानंतर जोमाने पुढे येऊ लागले. या काळात भारतातील समाजव्यवस्थेतील अनेक बाबींवर विचारमंथन होत होते. नियतकालिकांनी यात मोलाची भूमिका बजावली आणि वैचारिक जडणघडणीत महत्त्वाचा वाटा उचलला. स्त्री प्रश्नांच्या संदर्भात 'साधना' साप्ताहिक आग्रही भूमिका घेताना दिसते. 'साधना' साप्ताहिकामधून 'स्त्री–जीवन' (१८ जून १९४९), 'भारतीय नारीची उत्क्रांती' (३० जुलै १९४९), 'स्त्रीविषयक चळवळीतील पुरुषांची जबाबदारी' (२४ डिसेंबर १९४९), 'महिला चळवळीची नवी दिशा'– दशरथ पाटील (२५ मार्च १९५०), 'आपण आतातरी जाग्या होऊ या'– प्रभा पालेकर (१५ एप्रिल १९५०), 'सौभाग्यकांक्षा सोडा'– दादा धर्माधिकारी (१ ऑगस्ट १९५३), 'स्त्री संघटनेचा पांगुळगाडा'– इंदुमती केळकर (७ नोव्हेंबर १९५३), 'ग्रामीण महिला आणि दुसऱ्या योजनेतील विकासकार्य' (२५ फेब्रुवारी १९५६), 'आगरकर आणि स्त्रीविषयक सुधारणा'– अनसूया लिमये (१४ जुलै १९५६), 'ग्रामीण स्त्रियांतील कार्य'– कुमुद रेगे (१८ एप्रिल १९५८), 'यांना कोणी विसरू शकेल?'– आनंदबाई जोशी (१८ एप्रिल १९५८), 'महाराष्ट्रातील स्त्री दास्यविमोचनाची चळवळ' (१८ एप्रिल १९५८), 'स्त्रिया आणि राजकीय क्षेत्र'– अनसूया लिमये (१८ एप्रिल १९५८) असे स्त्रीविषयक अनेक लेख 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झाले. या लेखांमधून त्यांनी स्त्रियांच्या जीवनातील अनेक प्रश्नांवर सखोल चिंतन, विचारमंथन समाजासमोर ठेवले आणि स्त्रीविषयक चळवळ अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य केले. ''स्त्रीविषयक चळवळीतील पुरुषांची जबाबदारी'' (१४ डिसेंबर १९४९) या लेखामध्ये लेखिका अनसूया लिमये यांनी अत्यंत स्पष्टपणे स्त्री चळवळीत पुरुषांची जबाबदारी व भूमिका मांडताना मत मांडले आहे. त्या म्हणतात, ''स्त्रीने समतेच्या

नावाखाली खोट्या वल्गना करून आपल्यावरील निसर्गाच्या जबाबदाऱ्या टाळणे योग्य नाही. हे जसे खरे तसे स्त्रीच्या केवळ नैसर्गिक जबाबदाऱ्यांनाच महत्त्व देऊन तिच्या महत्त्वाकांक्षा दडपल्या गेल्या तर इलाज नाही, असे पुरुषानेही म्हणणे योग्य नाही. पुरुष वर्गाबरोबर समाजातील ५०% असलेला स्त्रीसमाजही जेव्हा जागृत होईल व परस्पर सहकार्याने जेव्हा ते समाजाच्या प्रश्नांचा विचार करतील त्या वेळी समाजवादाचे सामाजिक स्वरूप काय ते प्रत्यक्षात उतरेल.''[२४]

या संदर्भावरून लेखिकेची चिंतनशील कृती, स्त्री-पुरुष मानसिकतेचे अचूक ज्ञान, वैचारिकता इत्यादी बाबी स्पष्ट होतात. लेखिका समाजवादी कार्यकर्ती, विचारवंत, प्राध्यापक म्हणजे उच्चशिक्षित असून, समाजासाठी काही तरी करण्याची उमेद मनाशी बाळगत मत मांडते. मत मांडतानाही अत्यंत संयमाने, तर्कसंगत, समाजोन्नतीचे विचार सांगत नेमकेपणावर बोट ठेवते. 'आपण आतातरी जाग्या होऊ या' (१५ एप्रिल १९५०) या लेखात लेखिका प्रभा पोलकर यांनी स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्याबरोबरच वैचारिक स्वातंत्र्याची किती गरज आहे, हे सांगत स्त्रिया शिकू लागल्या, नोकरी करू लागल्या. परंतु स्वतंत्र बुद्धीने विचार करणे अजूनही कमी आहे. रूढींना सुधारण्याची वृत्तीही कमी आहे. हे सांगत त्या पुढे म्हणतात. आपल्याला विचारस्वातंत्र्य हवे याची जाण ९० टक्के स्त्रियांना नसतेच मुळी. आपल्या वाडवडिलांनी जे सांगितले, जेवढे सांगितले, जसे सांगितले, तसेच करण्यात त्या धन्यता मानतात. पितृसत्ता त्यांना तसे मानण्यास भाग पाडत असते. परंतु उरलेल्या १० टक्के स्त्रिया जेव्हा धैर्याने, स्वतंत्र बुद्धीने, प्रज्ञेने निर्णय घेण्याचा प्रयत्न करतात तेव्हा पितृसत्ता डोक्यात असलेले स्त्री वा पुरुष त्यांच्या मार्गात अनेक अडचणी निर्माण करतात. त्यांच्या वाडवडिलांना दोष देतात. सामाजिक चालीरीतींचे दाखले देत स्त्रियांनी रूढींचे पालन केले पाहिजे. हा अलिखित नियम लादू पाहतात. रूढींनी या प्रथा-परंपरांनी स्त्रियांचा विकास खुंटवला आहे. त्यांच्या आत्मोन्नतीचे, विकासाचे मार्ग थांबवले आहेत. पण याचे भान आजही स्त्रियांना फारसे दिसत नाही. सन १९५० च्या काळात तर ही स्थिती अधिक भयावह होती. या काळात लेखिका 'आतातरी आपण जाग्या होऊ या' असे म्हणते. याच लेखात लेखिका प्रभा पोलकर म्हणतात, ''पुरुषांप्रमाणे हक्क हवेत तर त्यांच्याप्रमाणे धक्के चपेटेही सोसा- आम्ही स्त्रिया स्वतःचा हा दुबळेपणा झाकण्यासाठी पुरुषांना नावे ठेवतो. पुरुषांनी म्हणे आमची गळचेपी केली. पण आम्ही

का करू दिली? आम्ही आमच्या हक्कांची प्रस्थापना करायला असमर्थ ठरलो म्हणूनच ना? पुरुषांनी स्त्रियांच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन चूल नि मूल करीत घरात राहा, असे सांगितले. पुरुष म्हणे आम्हाला स्वातंत्र्य देत नाहीत! ब्रिटिशांनी हिंदुस्थानला का सुखासुखी स्वातंत्र्य दिले? चले-जाव चळवळी करून ते मिळवावे लागले. स्त्रियांना स्वातंत्र्य हवे असेल, तर ते त्यांनीच मिळविले पाहिजे. जोपर्यंत स्त्रियांमध्ये स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती नाही, रूढी झुगारण्याचे धैर्य नाही तोवर त्या प्रगती करू शकणार नाहीत. आम्हाला समानता हवी. पण गर्दीत एखाद्या पुरुषाचा धक्का लागताच आम्ही डोळे वटारून 'काय तरी मेला मवाली, बाई माणूस दिसत नाही वाटते' असे म्हणायला कमी करीत नाही. एखाद्या व्याख्यानाला वा नाटकाला आम्ही गेलो तर आमच्यासाठी स्वतंत्र जागा हवी असते. रेल्वेत चढल्याबरोबर आम्हाला पुरुषांनी उठून जागा दिली पाहिजे, असा आमचा कटाक्ष असतो व नाही दिली तर 'अगदीच कॉमनसेन्स नाही यांना, स्त्रीदाक्षिण्य शिका म्हणावं जरा' वगैरे आम्ही बोलू लागतो. आमची प्रगती व्हायला हवी असेल, पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळायला हवे असतील; तर त्यांच्या बरोबरीने जगातील टक्के-टोणपेही खायला आपण सिद्ध असले पाहिजे. आगरकर, कर्वे यांसारख्या महापुरुषांनी आमच्यासाठी झगडून आम्हाला हक्क मिळवून द्यावेत, हे लाजिरवाणे आहे.''[२५]

प्रस्तुत संदर्भात लेखिका प्रभा पोलकर अत्यंत वस्तुनिष्ठपणे स्त्रियांच्या मानसिकतेतील विचार मांडतात. स्त्रियांना जसे विचारस्वातंत्र्य असायला हवे. तसेच त्यांना जगत असताना स्वतंत्र बुद्धीने जगता आले पाहिजे. यासाठी त्यांनी स्वतःच आत्मपरीक्षण करायला हवे. आपण स्त्री आहोत म्हणून आपल्याला रेल्वेत कुण्या पुरुषाने उठून जागा द्यावी ही आपली अपेक्षा का? किंवा एखादे नाटक पाहायला गेल्यावर स्वतंत्र 'रो' आपल्याला का असावा लागतो. गर्दीत एखाद्याचा धक्का लागला तर लगेचच 'काय तरी मेला मवाली बाईमाणूस दिसत नाही वाटते' असे म्हणून आपण बाई असल्याचे एक प्रकारचे आरक्षण मागत असतो. मुळात याची गरजच काय? एकीकडे आम्हाला पुरुषांप्रमाणे हक्कही हवेत. पण त्यासाठी संघर्ष करायची आमची मुळीच इच्छा नाही. लेखिका इथे निक्षून सांगतात- पुरुषांप्रमाणे हक्क हवेत तर त्यांच्याप्रमाणे धक्केचपेटीही सोसा. तरच आपली प्रगती शक्य आहे. संघर्षाशिवाय जीवनात काहीच मिळत नाही. पुरुषांच्या बरोबरीने आपण संघर्षासाठी कायम सज्ज असले पाहिजे. धक्के-धपाटे खाल्ले

पाहिजेत. समाज, जग समजून घेण्यासाठी घराबाहेर पडले पाहिजे. उघड्या डोळ्यांनी हा समाज पाहिला पाहिजे. आम्हाला याची गरजच वाटत नाही. आम्हाला पुरुषसत्तेच्या छायेत जगणं म्हणजे एका कम्फर्ट झोनमध्ये जगण्याचा आनंद मिळतो. परंतु हा कम्फर्ट झोन तुमच्या विकासाचे पंख छाटतो. याची जाण आम्हाला नसते. म्हणूनच 'स्त्रियांनो, आपण आतातरी जाग्या होऊ या' असे लेखिका पोटतिडकीने सांगतात. पुढे त्या म्हणतात. देशाच्या बऱ्या–वाइटास आपण स्त्रियाही जबाबदार आहोत. आज आपण स्वत:ला पुढारलेल्या म्हणत असतो कारण पूर्वीच्या काळी फक्त चूल आणि मूल हेच आपले कार्यक्षेत्र होते. पण आज आपण नोकरी करतो. कुटुंबाच्या गरजा आज एकट्याच्या कमाईत भागत नाहीत म्हणून का होईना आपण घराबाहेर पडतो. मग आपण जर कुटुंबाच्या प्रगतीसाठी अर्थार्जन करत असू, तर देशाच्या प्रगतीसाठीही विचार नको का करायला? देशाच्या राजकारणात काय चालले आहे, आपण निवडून दिलेले लोक नीट काम करत आहेत की नाहीत, देशातल्या समस्यांची काय परिस्थिती आहे, याचाही विचार आपण करायला हवा. आपल्यासारख्या स्त्रियांनी राजकारणापासून लांब राहू नये. असे जर झाले; तर देशाच्या बऱ्या–वाइटास आपणही जबाबदार असू, असे लेखिका म्हणतात. लेखिकेने स्त्रियांचे विचारस्वातंत्र्य सांगताना स्त्रियांची स्थिती वर्तविताना स्त्रियांचे तीन वर्ग असतात असे सांगितले. (१) धनिक स्त्रिया ज्यांच्याकडे बरीच जमापुंजी आहे (२) मध्यमवर्गीय महिला (३) शेतकरी–शेतमजूर शेतकरी वर्गातील स्त्रियांना सदैव पोटाची खळगी भरण्याची विवंचना असते. त्यासाठी त्यांना सतत राबावे लागते म्हणून इतर गोष्टींकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नसतो. मध्यमवर्गीय महिला रांधा वाढा, उष्टी काढा यात व्यस्त असतात. पहिल्या वर्गातील धनिक स्त्रियांना बराच वेळ मिळतो. परंतु त्या तो वेळ महिला मंडळे आणि क्लब या स्त्रियांच्या उन्नतीच्या संस्थामध्ये घालवतात. त्यामुळे या अशा संस्थांमध्ये सर्वत्र धनिकांची गर्दी असते. विषय, चर्चाही वेगळीच असते. मग अशा वेळी देशाच्या परिस्थितीचा, समाजाच्या परिस्थितीचा विचार करायला फारसा वेळच इथे मिळत नाही. मग परिस्थिती कशी बदलणार? कशी सुधारणार? ही परिस्थिती सुधारायची असेल, तर सर्वसामान्य स्त्रीला संघटित करायला हवे. त्यांची संघटना बांधायला हवी. त्यांच्या समस्या, स्थिती जाणून समजून घ्यायला हवी. हे करताना मध्यमवर्गीय आणि इतर कामगार स्त्रियांना दुपारच्या भोजनानंतरच्या विश्रांतीच्या वेळी एकत्र आणण्याचे कार्य करायला हवे. या वेळी आपली घरातली कामे शिवण,

टिपण असे सोबत घेऊन २० ते २५ स्त्रियांनी एकत्र बसावे. वर्तमानपत्रे वाचावीत व त्यावर चर्चा करावी. स्वत:बद्दल सांगावे. यामधून विचारांची देवाणघेवाण होईल. एक स्त्री दुसरीला समजून घेईल. यामधून दुरावा नष्ट होईल. पर्यायी संघटना बांधणी होईल आणि विचारप्रवण स्त्रियांच्या संख्येत गुणात्मक वाढ होईल. यासाठी आपण जाग्या होऊ या, असे प्रस्तुत लेखामध्ये लेखिका सांगते.

दादा धर्माधिकारीलिखित 'सौभाग्यकांक्षा सोडा' (१ ऑगस्ट १९५३) या लेखामध्ये स्त्री–जीवनातील समस्यांचा नव्या दृष्टीने विचार मांडला असून, या लेखामधून त्यांनी सौभाग्यकांक्षा सोडा आणि पुरुषनिरपेक्ष जीवनाचा संकल्प करा. हा काळाच्या पुढे जाऊन धाडसाने विचार मांडणारा लेख लिहिला. या लेखामध्ये दादा धर्माधिकारी म्हणतात, स्त्रीला सौभाग्यचिन्ह आहे. पुरुषाला मात्र नाही. बांगडी, मंगळसूत्र, कुंकू यांना ती पवित्र मानते. पती निधनानंतर या सगळ्यांचा त्याग करते, केशवपन करते. पण पुरुष मात्र यातले काहीच करत नाही. म्हणूनच स्त्रीने हे सर्व सोडायला हवं. तिच्या उन्नत भविष्यासाठी, प्रगतीसाठी तिने यामधून मुक्त व्हावं. त्याही पुढे जाऊन ते म्हणतात, स्त्रियांनी मातृत्वाची आकांक्षा आवरायला हवी, कारण पुरुषाची आई झाल्यावाचून जीवनाचे सार्थक नाही. हा विचार स्त्रियांनी सोडायला हवा. कारण जेवढी मातृत्वाची आकांक्षा स्त्रीला असते तेवढीच पुरुषालाही पितृत्वाची आकांक्षा असते असे सांगताना दादा धर्माधिकारी म्हणतात–

''स्त्रियांनी मातृत्वाची आकांक्षा आवरली पाहिजे– दुसरे धक्का देणारे विधान मी करतो स्त्रियांनी मातृत्वाची आकांक्षा आवरली पाहिजे; म्हणजे पुरुषाची आई झाल्यावाचून जीवनाचे सार्थक होत नाही ही भावना सोडा. 'जुगार' नाटक मी वाचले. त्यातील इंदिरा म्हणते, 'आज मुलाचे टेहा ऐकून माझे जीवन सार्थ झाले' मला ते आवडले नाही. 'शारदा' नाटकातील मी निपुत्रिकेच्या नरकवासाचा उल्लेख असाच आहे. स्त्रीला मातृत्वाची आकांक्षा असते तितकीच पुरुषाला पितृत्वाची आकांक्षा असते असे माझे मत आहे. अपत्याकरिता भार्या किंवा अनेक भार्या करण्याचा हक्क पूर्वापार दिसतो. धर्मशास्त्रात तर 'मुलीच मुली होत असल्या, तर पुरुषाने दुसरे लग्न करावे' अशी अनुज्ञा दिली आहे. पुनर्विवाह रूढ असलेल्या जमातीतही स्त्रीने नवरा बदलला असे दिसले नाही. मातृत्वाचा आदर्श हा शारीरिक नाही, सांस्कृतिक आहे असे मी मानतो. पशूचाही जन्म त्याच्या आईच्याच पोटी होतो. पण आईशी त्याचा संबंध येऊच नये

असा निषेध नाही. मानव समाजातच निषेध आहे. कौटुंबिक जीवन हे स्वाभाविक नाही पण सांस्कृतिक आहे. पशूंमध्ये आई, मुलगा, बहीण, भाऊ हा संकेत नाही. मुलगी ही जननी आहे पण ती पुरुषाची माता झाली तर धन्य होईल, असे आपण मानतो. आम्ही मुलीच्या शाळेत व्याख्यानाला गेलो म्हणजे सांगतो– 'वीरमाता बना, कुंती, जिजाई व्हा' मुलांच्या शाळेत त्यांना आम्ही कधी 'गौतम बुद्धाचा बाप हो' म्हणून सांगत नाही. पितृत्वावाचून जीवनाचे सार्थक नाही असे आपण मानीत नाही. ब्रह्मचर्याचे मूल्य पुरुषाप्रमाणे स्त्रीबाबत व्हावे असे मला वाटते. म्हणजे ब्रह्मचारिणी मातेपेक्षा मोठी होईल. विनोबांनी स्त्रियांना विचारले, 'आमचा उद्धार केव्हा होईल?' म्हणजे ते म्हणतात 'तुमच्यातून एखादी शंकराचार्य निर्माण झाली नाही तोपर्यंत तुमचा उद्धार होणार नाही.' स्त्रीचा उद्धार पुरुष करूच शकणार नाही उद्धारकच मारक होतो स्त्रीचा उद्धार करावयाचा तर तिची भूमिका गौण होता कामा नये.''[२६]

वरील संदर्भावरून दादा धर्माधिकारी यांनी मांडलेले तर्कशुद्ध विचार आणि बुद्धिप्रामाण्यवाद विचार करायला लावतो. अंतर्मुख करतो.

असे अत्यंत महत्त्वाचे आणि मूलभूत विचार प्रस्तुत लेखामध्ये दादा धर्माधिकारी यांनी मांडले. नंतरच्या काळात उदयाला आलेल्या स्त्रीवादी चळवळीची वैचारिक पार्श्वभूमी आणि वैचारिक अधिष्ठान या विचारवंतांनी तयार केलेले आहे, असे यामधून दिसते. कारण कोणत्याही चळवळीचा उदय हा अचानक एका रात्रीमधून होत नसून त्यासाठी शतकानुशतकांचे वैचारिक मंथन, सैद्धान्तिक मांडणी आवश्यक असते. कालौघात नकळतपणे संयतपणे ती होत असते. त्यासाठी विविध पातळ्यांवर मत–मतांतरे, चर्चा, विचारविनिमय होत राहिले पाहिजे. याच लेखामध्ये दादा धर्माधिकारी म्हणतात, ''स्त्रीचे जीवन पुरुषाच्या भरवशावर, कमाईवर, कीर्तीवर नको आणि पुरुषाच्या मनातून आक्रमण व स्त्रीच्या मनातून भीती गेली पाहिजे.'' हे सांगताना ते पुढे असे सांगतात–

''पुरूषांच्या मनातून आक्रमण व स्त्रीच्या मनातून भीती गेली पाहिजे– स्त्री दिसली की डोळ्यांवर कातडे ओढणारे ब्रह्मचारी असतात. मी म्हणतो हे खरे ब्रह्मचर्यच नव्हे. आईचे तोंड तो पाहत नाही का? रामायणातला लक्ष्मण मला आवडत नाही. सीतेच्या अंगठ्यावाचून मला काही माहीत नाही असे तो म्हणतो. आई म्हणून तो सीतेकडे का पाहू शकला नाही, पुरुषाला स्त्रीपासून व स्त्रीला पुरुषापासून सावध राहावे लागले तर त्यांचे सहजीवन अशक्य होईल. नर–

मादीव्यतिरिक्त भावना निर्माण झाल्या, तरच त्यांचे सांस्कृतिक सहजीवन शक्य होईल. विनोबांना कोणी सहशिक्षणाबाबत विचारले. विनोबा म्हणाले, ''देवानेच त्याचे उत्तर दिले आहे. आईवाचून बापाचे व बापावाचून आईचे जीवन नाहीच. स्त्रीपुरुषांना एकत्र राहता आले पाहिजे. कुटुंबसंस्था हा सांस्कृतिक समाजाचा घटक मी मानतो. कारण कायदा व सत्तीवाचून पुरुषाचे सहजीवन तेथे शक्य होते. गाडीत बसलेली स्त्री–पुरुष अतिसलगीने वागलेली पाहिली, तर आपल्या नजरा साशंक बनतात. पण ती भाऊ–बहीण आहेत असे कळले की आपली शंका दूर होते. कुटुंब संस्थेने विलक्षण परिवर्तन केले आहे. भाऊ–बहिणीच्या प्रेमात लोक शंका घेत नाहीत, हा कुटुंबसंस्थेचा उपकार आहे. स्त्रीपुरुषांना एकमेकांपासून सावधगिरीची व भीतीची गरज न वाटता बरोबर वागता आले पाहिजे. स्त्री व पुरुष यांना लोणी व निखारा म्हणू नका. मी त्यांना हिंग व कापूर म्हणतो.''[२७]

म्हणजेच उपरोक्त संदर्भावरून रामायणासारख्या ग्रंथांमधूनही स्त्रियांच्या संदर्भातली मनोभूमिका स्पष्ट करताना लेखक सांगतात की, लक्ष्मणाला सीतेसंदर्भात विचारले असताना तो म्हणतो की मला सीतेच्या अंगठ्यावाचून काही माहीत नाही. म्हणजेच आई म्हणूनही तो सीतेकडे पाहू शकला नाही?

कुटुंबसंस्था हा सांस्कृतिक समाजाचा घटक आहे. कारण कायदा व सत्तीवाचून स्त्री–पुरुषाचे सहजीवन शक्य होते. कुटुंबसंस्थेत प्रेम, विश्वास, त्याग, समर्पण ओतप्रोत भरलेले असते. मिती तेथे प्रीती राहू शकणार नाही. कमकुवत अंतःकरणात प्रेम मावणे शक्य नाही. ते दोन समान भूमिकेवरील दोन अंतःकरणात राहू शकते. हे काळाच्याही पुढे जाऊन दादा धर्माधिकारी सांगतात, ''ग्रामीण महिला आणि दुसऱ्या योजनेतील विकास कार्य' (२५ फेब्रुवारी १९५६) हा कृष्णाबाई लिंबकर यांच्या लेखाचा सारांश 'साधना'मधून प्रकाशित झाला आणि पहिली पंचवार्षिक योजना संपून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा कच्चा मसुदा तयार होत असताना ग्रामीण भागातील महिलांची स्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. असे मत लेखिका श्रीमती कृष्णाबाई निंबकर मांडतात. कारण कृष्णाबाई ह्या ग्रामीण महिला संघाच्या महाराष्ट्रातील एक प्रमुख कार्यकर्त्या होत्या. त्यांनी ग्रामीण महिला आणि तिची स्थिती जवळून पाहिली होती. त्या आपल्या लेखामधून केवळ ग्रामीण भागातील महिलांची स्थिती सांगून थांबत नाहीत; तर उपाययोजनासुद्धा सांगतात. त्या म्हणतात, 'विकास योजना आणि अंमलबजावणी आवश्यक

असून, यासाठी समाजातील अनुभवी, अभ्यासू स्त्रियांची आवश्यकता आहे.' यासाठी समाजकल्याण समिती व ग्रामीण स्त्रिया यांच्यात समन्वय निर्माण होणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामीण महिलांचे संघ स्थापन करावे लागतील. त्यांना मुख्य प्रवाहात आणावे लागेल. हा प्रवास निरंतर चालणारा आहे. यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागणार आहेत. हे करण्यासाठी सर्वांत पहिल्यांदा ग्रामीण महिला आणि तिच्या समस्या समजून घेणे आवश्यक आहे. त्या समस्या सांगताना लेखिका म्हणतात, ''ग्रामीण महिलांच्या समस्या (१) स्वतःच्या उन्नतीबद्दलची त्यांची बेफिकिरी (२) भीषण अज्ञान (३) रूढींना चिकटून राहण्याची त्यांची वृत्ती नवीन सुधारणांविषयी अनुदार धोरण, कडक जातिभेद यामुळे स्पर्धेला व म्हणून प्रगतीला अडथळा (४) अतोनात अखंड कष्ट करावे लागत असल्यामुळे विश्रांती नाही. विचार करण्याइतपतही स्वास्थ्य मिळत नाही, विकासकार्यात भाग घेण्याची इच्छा निर्माण होत नाही. (५) शारीरिक श्रम कमी व्हावेत या दृष्टीने त्या विचार करीत नाहीत. त्यामुळे शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करणे दूरच. (६) वाढते कुटुंब व घटणारे उत्पन्न यांचा मेळ बसत नाही. कुटुंबनियोजनाविषयी पूर्ण अज्ञान (७) उत्पादनवाढीसाठी आवश्यक अशा धंद्याच्या संघटनांचा अभाव (८) तांत्रिक ज्ञानाची व काहीशी कौशल्याची उणीव (९) शिक्षण संस्थांचा अभाव (१०) शहरी स्त्रियांना ग्रामीण स्त्रियांची यथार्थ माहिती नसते. त्यांच्यात गैरसमज जास्त असतात. त्यामुळे विकास योजनेत भाग घेण्यास त्या नाखूश असतात. (११) पुरुषांचा स्त्रियांविषयीचा अनुदार दृष्टिकोन. ग्रामीण स्त्रियांचा विचार करताना वर निर्देशिलेल्या ११ प्रश्नांना आपण उत्तरे शोधली पाहिजेत. त्यासाठी ग्रामीण विकास कार्य व समाजकल्याण कार्य या दोन्हींच्या मर्यादा स्पष्ट करून दोन्हींचे कार्य अधिक रेखीव व निश्चित व्हावयास हवे.''[२८]

वरील संदर्भ पाहता आजही ग्रामीण भागातील स्त्रीची परिस्थिती फारशी बदललेली दिसत नाही. आजही ती अनेक समस्यांनी ग्रासलेली दिसते. आज ग्रामीण भागातील स्त्रीच्या शिक्षणाचे प्रमाण वाढलेले असले, तरी सुधारणेच्या दृष्टीने फारसा बदल झालेला दिसत नाही. तिच्या सक्षमीकरणाच्या दिशेने ठोस पावले उचललेली दिसत नाहीत. यासाठी मुळात माणूस म्हणून तिला समजून घेणे, म्हणजेच तिच्या समस्या जाणून घेणे महत्त्वाचे आहे. अशा अनेक स्त्रीविषयक समस्यांना 'साधना' साप्ताहिकाने वाचा फोडण्याचे काम केलेले दिसून येते. एकूणच स्त्री स्वातंत्र्याच्या संकल्पनेपर्यंत पोहोचायचे असेल, तर तिच्या जाणिवांचा विकास व्हायला हवा.

ती विचार साक्षर व्हायला हवी. वैचारिक साक्षरतेशिवाय सक्षमीकरणाच्या दिशेने पाऊल टाकता येणार नाही.

'आगरकर आणि स्त्रीविषयक सुधारणा' (१४ जुलै १९५६) हा अनसूया लिमये यांचा लेख आगरकरांच्या विचारातील स्त्री–सुधारणा मांडत असताना आगरकरांनी केलेला स्त्री–शिक्षणाचा पुरस्कार, आगरकरांचा स्त्रियांचा कळवळा, विवाह संस्थेसंबंधीची मते असे अनेक पैलू मांडले. या लेखात अनसूया लिमये म्हणतात, ''विवाहासंबंधीची मते– आगरकरांच्या दृष्टीतून सामान्यतः स्त्रियांचे कोणतेही प्रश्न सुटलेले नाहीत. बालविवाहावर कडाडून हल्ला करताना त्यांनी सांगितले, 'बालविवाहाचे खंडण म्हणजे स्वयंवराचे मंडण.' आज कायद्याने बालविवाहाची प्रथा बंद झाली आहे आणि अगदी खेड्यातील निरक्षर जनता सोडल्यास लोकांच्या विचारांतही बालविवाहाला स्थान राहिलेले नाही. परंतु 'बालविवाहाचे खंडण म्हणजे स्वयंवराचे मंडण' हे तत्त्व आजच्या घटकेला देखील समाजात किती जण मान्य करतात? शहरातून सुशिक्षित आणि उदारमतवादी दृष्टिकोन असलेल्या काही कुटुंबांतून मुलीला आपला पती निवडण्याचे स्वातंत्र्य मिळत असले, तरी बाकी मुलींसाठी स्थळ सर्रास आई–बापानेच पसंती केलेले असेल हे कटाक्षाने पाहिले जाते आणि स्वतःचा विवाह स्वतः ठरविणाऱ्या कितीतरी युवतींना घरातला तीव्र विरोध सहन करावा लागतो. परंतु पाऊणशे वर्षांपूर्वी लिहिताना आगरकरांनी बेधडकपणे लिहिले, 'जी स्वयंवरे नाहीत त्या सर्वांस आम्ही बालविवाह समजतो.' म्हणजे आगरकरांच्या दृष्टिकोनाप्रमाणे बालविवाह आजमितीसही चालूच आहे असे म्हटले पाहिजे. प्रियराधन आणि वल्लोमापासना या गोष्टींची कल्पनादेखील ज्या वयात मुला–मुलींना नाही. त्या वयात लग्न होणाऱ्या वधुवरांची जितकी कीव आगरकर करतात तितक्या उपहासगर्भ कठोर लेखणीने वडीलमंडळी कौतुकाने करीत असलेल्या गर्भधानासारख्या सोहळ्यावर ते कडाडून हल्ला चढवतात. स्वयंवर, वल्लोमापासना या गोष्टींना नाक मुरडणाऱ्या कर्मठ समाजाचा भेकडपणा आणि दांभिकपणा आगरकरांनी उघड करून दाखविला आहे. इंग्रजी कादंबऱ्या वाचताना ज्या गोष्टींपासून आपल्याला आनंद वाटतो किंवा संस्कृत नाट्य पाहताना माता–पितरांच्या आज्ञेशिवाय कन्वदुहिता शकुंतला प्रियंवदेच्या सल्ल्याने लता मंडपात दुष्यंताची एकांती गाठ घेते व तेथेच त्यांचा गंधर्व विवाह होऊन त्याचा यथोचित परिणामही

घडतो. हा प्रकार ज्या औत्सुक्याने आपण पाहतो व 'वन्स मोअर' देतो, तो आनंद आणि ती उत्सुकता प्रत्यक्ष आपल्यासमोरील जीवनात एकदम पालटते कशी?

**स्त्री शिक्षणाचा पुरस्कार** : आगरकरांनी हाताळलेला दुसरा प्रश्न स्त्री शिक्षणाचा. बडोद्याच्या सयाजी महाराजांनी त्या वेळी मुलांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा कायदा केला होता. सयाजी महाराजांनी तो मुलीं बाबतही लागू करावा हे सांगताना आगरकरांनी 'मुलींना शिक्षणाची आवश्यकता मुलांपेक्षा अधिक आहे. कारण अपत्य संगोपनाची जबाबदारी प्रामुख्याने त्यांच्यावर असते' असे प्रतिपादन केले आहे. सुशिक्षितपणाचा संततीवर परिणाम होतो हे स्पार्टन लोकांच्या उदाहरणावरून त्यांनी दाखविले. धर्मसंस्थांतील शिक्षण स्त्रियांना पूर्ण उपलब्ध ठेवलेले नाही. या गोष्टीचाही उल्लेख करून आगरकर म्हणतात, 'बायबलातील खरे रहस्य पुरुषांप्रमाणे स्त्रियांना कळल्याशिवाय खरी धर्मसुधारणा होणार नाही.' मुलींना प्राथमिक शिक्षण देण्याचे आगरकरांच्या काळात समाजाने एक वेळ मान्य केले असते. परंतु माध्यमिक आणि उच्च शिक्षण स्त्रियांना देणे म्हणजे 'अब्राह्मण्यम्' अशी अवस्था होती. तरीही स्त्रियांना उच्च शिक्षण मिळण्याचाही हक्क आहे, असे आगरकरांनी निर्भीडपणे प्रतिपादिले. मात्र उच्च शिक्षण देताना त्यांच्या विवाह काळात व पद्धतीत फरक करणे आवश्यक आहे, असाही निष्कर्ष आगरकरांनी सांगितला. सासूरवास आणि मुलेबाळे यांच्या चक्रात एकदा मुलगी सापडली, की तिला शिक्षण घेणे अशक्य होते. आगरकर म्हणतात, 'अगोदर हे सासूरवासाचे घोडे मुळीच नाहीसे झाले पाहिजे. लग्न झाल्यावर मुलीने आई–बापाचे घर सोडावे ते एकदम नवऱ्याच्या संसाराचे स्वतंत्र अधिपत्य करावे.' आजमितीसही आगरकरांचे हे स्वप्न फक्त शहरांतून विभक्त कुटुंबपद्धती आल्यामुळे थोडेफार साकार झाले आहे.''[२९]

उपरोक्त संदर्भावरून आगरकरांनी तत्कालीन परिस्थितीत मांडलेले स्त्रीसुधारणेसंदर्भातील विचार आजही किती महत्त्वाचे आहेत हे लक्षात येते. स्त्रियांच्या विवाहाविषयी सांगतांना आगरकर म्हणतात, 'बालविवाहाचे खंडण म्हणजे स्वयंवराचे मंडण' असून पूर्वीचे स्वयंवर म्हणजे विवाहाचे स्वातंत्र्य. म्हणजे जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य होते. पण नंतर मात्र स्त्रीवरील अनेक जाचक बंधनांपैकी विवाहाचे बंधन घालून स्वयंवरातील स्वातंत्र्य संपुष्टात आणले गेले आणि जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य वडीलधाऱ्या मंडळींकडे गेले. यामुळे आगरकर पुढे म्हणतात, जी स्वयंवरे नाहीत त्यांना आम्ही बालविवाह संबोधतो. यावरून

आगरकरांचे विचार स्पष्ट होतात. आगरकरांनी सातत्याने स्त्री प्रश्नांची चर्चा केली. अनेक प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा केला. विवाहासाठी जसे जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य स्त्रीला असावे, तसेच स्त्रीला शिक्षणही असणे आवश्यक आहे. हे सांगताना ते बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांचा दाखला देतात. सयाजीराव महाराजांनी आपल्या कारकिर्दीत मुलांसाठी प्राथमिक शिक्षणसक्तीचे हा कायदा केला होता. त्या वेळी आगरकरांनी तो कायदा मुलींसाठीही लागू करावा. हे सांगताना मुलींचे शिक्षण किती महत्त्वाचे आहे हे सांगितले. ते म्हणाले, मुलींचे शिक्षण हे केवळ तिच्यासाठीच महत्त्वाचे नसून कुटुंबासाठी, समाजासाठीही महत्त्वाचे आहे. कारण बालसंगोपनाची जबाबदारी स्त्रीवर असल्याने तिचे शिक्षण महत्त्वाचे आहे. हे सांगताना ते पुढे म्हणतात, की धर्मसंस्थातील शिक्षणाचे स्वातंत्र्य स्त्रीला ठेवले नाही. बायबलमधील खरे रहस्य पुरुषांप्रमाणे स्त्रियांना कळल्याशिवाय खरी धर्मसुधारणा होणार नाही, हे अत्यंत परखडपणे आगरकर नोंदवतात. अनसूया लिमये यांनी स्त्रीसुधारणेसंबंधी आगरकरांचे विचार आणि दृष्टिकोन मांडताना आगरकरांची स्त्रियांच्या जगण्याकडे पाहण्याची किती सूक्ष्म दृष्टी होती हेही अधोरेखित केले आहे.

यासाठी वाङ्मयीन नियतकालिके आग्रही भूमिका घेताना दिसतात. यात ‘साधना’ साप्ताहिकाचे योगदानही महत्त्वाचे आहे. ‘साधना’ साप्ताहिकामधून असे स्त्रीविषयक अनेक लेख प्रकाशित झालेले दिसतात. यामधून समाजाचा स्त्रीकडे, तिच्या जगण्याकडे, रोजच्या संघर्षाकडे पाहण्याच्या दृष्टिकोन बदलाला वाव मिळाला. स्त्री ही स्त्री नसून ती पहिल्यांदा माणूस असते. या विचारापर्यंत नेण्यासाठी हे वैचारिक मंथन आवश्यक असण्याची जाण ‘साधना’ला नक्कीच आहे.

### ४.२०.३ ‘साधना’ साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले सामाजिक लेख :

‘साधना’ साप्ताहिकाचा जन्मच मुळात समाजाचे ज्ञान जागृत करणे, विकसित करणे या हेतूने झाला आहे. ‘साधना’ साप्ताहिकाचे संस्थापक संपादक सानेगुरुजींना ढासळत चाललेल्या समाजस्थितीवरील उपाययोजना करत असताना समाजाला शहाणे करणे. हाच एकमेव पर्याय समोर दिसत होता. दिनांक १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. परंतु समाज मात्र अनेक कप्प्यांत बंदिस्त होता. जात, धर्म, वंश, प्रथा, परंपरांनी त्याला ग्रासून टाकले होते. त्यातच स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधींची हत्या ३० जानेवारी १९४८ ला झाली आणि पुन्हा एकदा मानवी मन हादरले. महत्प्रयासाने मिळवलेलं स्वातंत्र्य आज खरंच आपण उपभोगत आहोत

का? असा मूलभूत प्रश्न निर्माण व्हायला लागला. या साऱ्या परिस्थितीत सानेगुरूजींसारखी संवेदनशील व्यक्ती स्वस्थ बसणे शक्य नव्हते. समाज शिक्षित करून त्याला विचारप्रवण बनवणे हे इतके सोपं काम नव्हतं. ही प्रक्रिया निरंतर चालणारी होती आणि महात्मा गांधींच्या विचाराचे संस्कार घेऊन मार्गक्रमण करणाऱ्या या धडपडणाऱ्या मुलाने विचार देण्याचा मार्ग स्वीकारला. अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत 'साधना' साप्ताहिक या ध्येयाने सुरू झाले आणि 'साधना' साप्ताहिकामधून सामाजिक लेखांची जणू मालिकाच सुरू झाली. त्यात विविध सामाजिक प्रश्नांवर चर्चा–विचारमंथन होत होते. यात देश, विदेशातील सामाजिक विषय हाताळलेले दिसतात. 'मला माझ्या कलेतून गांधीजींना जिवंत ठेवायचं आहे'– रवि पंडित (२९ जानेवारी १९४९), 'सरहद्द गांधींची भारताला का विस्मृती पडली?' (२५ फेब्रुवारी १९५०), 'जातीयतेचा सुधारणा विरोध आणि धर्म'– दीनानाथ नावकर (४ मार्च १९५०), 'समाजाचे नैतिक मूल्यमापन'– प्रा. म. ना. जोशी (२२ एप्रिल १९५०), 'ब्रिटनमधील सामाजिक परिवर्तन :– बर्नाड शॉ यांचे मत (९ सप्टेंबर १९५०), 'साध्य, साधन, विचार आवश्यकता'– आचार्य भागवत (३० डिसेंबर १९५०), 'याला म्हणतात जबाबदारीची जाणीव' (३ मार्च १९५१, 'तरुण मतदारांना मार्गदर्शन'–आचार्य जावडेकर (५ मे १९५१), 'सत्याग्रही मतदारांचे कर्तव्य'– शं. द. जावडेकर, 'बुद्धाचा धर्म : बहुजन हिताय बहुजन सुखाय' (३० मे १९५३), 'श्रद्धा आणि बुद्धिप्रामाण्यवाद', 'मुंबई सरकारचा सोज्वळ उपक्रम'– यदुनाथ थत्ते (२ जानेवारी १९५४), 'श्रद्धा आणि बुद्धिप्रामाण्यवाद' (११ जून १९५५), 'खेड्यात अद्याप दृढमूल असलेली सामाजिक विषमता नाहीशी कशी होणार?' (२ जुलै १९५५), 'इस्राईलमधील लोकजीवनाची झलक' (१४ फेब्रुवारी १९५६), 'भारतीय मनाची आंतरिक जडणघडण' (१४ एप्रिल १९५६), 'काँग्रेस–समाजवाद : विचार आणि आचार'– मधु दंडवते (१४ फेब्रुवारी १९५९) असे अनेकविध सामाजिक विषय 'साधना' साप्ताहिकाने यशस्वीपणे हाताळले आणि समाजमनाची वैचारिक बैठक तयार करण्याच्या कार्यात महत्त्वाचे योगदान दिले. 'सामाजिक विकासाची पथ्ये'– त्र्यं. शि. भारदे (१५ जुलै १९५३) यांच्या लेखामधून सामाजिक विकास म्हणजे काय, तो कसा साध्य करता येईल, त्यासाठी कोणती पथ्ये पाळावी लागतील, या संदर्भात सखोल चिंतन येते. या वेळी लेखक 'सामाजिक प्रगती आणि विकास म्हणजे काय' हे सांगताना लिहितात की, ''सामाजिक प्रगतीचे स्वरूप–स्वराज्य हस्तगत झाल्याने सामाजिक

विकास हेच आपल्या सर्व कार्याचे, चळवळीचे सूत्र असले पाहिजे याबद्दल दुमत राहिलेले नाही. हा सामाजिक विकास कसा व कधी होणार, हा प्रश्न आता महत्त्वाचा आहे. जर सामाजिक विकास आपणास साधावयाचा आहे तर त्यासंबंधी आपल्या कल्पना सुस्पष्ट पाहिजेत. नाही तर हे सामाजिक विकासाचे कार्य जोर धरू शकणार नाही. आमच्या देशात तर हा प्रश्न फारच गुंतागुंतीचा आहे. इतर देशांत सत्ता हाती आल्यावर त्या–त्या देशांनी झपाट्याने विकास योजनांच्या आधारे आपला उद्देश सफल केला. उत्पादनवाढ, लोकांचे राहणीमान, पूर्ण रोजगार इ. गोष्टींच्या आधारे सामाजिक विकास साध्य होतो. ही गोष्ट अनेक देशांतील विकास योजनांवरून पाहावयास मिळते. लोकांच्या प्राथमिक गरजा भागणे, त्यांच्या उत्पन्नात वाढ होणे, सामाजिक विषमता कमी होणे, श्रम करणाऱ्यास पुरेसा मोबदला मिळणे, लोकांच्या रोजगाराची व्यवस्था होणे, समाजजीवनात आपले काही मानाचे स्थान आहे असा प्रत्यय प्रत्येक व्यक्तीस येणे व या प्रत्ययाच्या जोरावर स्वयंस्फूर्त सहकारी शक्ती एकवटून सर्वांनी समाजजीवनात सहभागी होणे आणि आर्थिक, नैतिक व सांस्कृतिक अशा सर्वांगीण दृष्टीने मानवाची प्रगती होईल, अशी व्यवस्था निर्माण करणे. याला सामाजिक विकास म्हणता येईल.''[३०]

प्रस्तुत संदर्भावरून स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक विकास महत्त्वाचा असून तो कसा व कधी होणार, यावर चर्चा विचार होणे आवश्यक आहे. त्यासंबंधी म्हणजे सामाजिक विकाससंबंधी आपल्या काय कल्पना आहेत. त्या मूर्त रूपात उतरण्यासाठीचे मार्ग कोणकोणते आहेत. त्यासाठी कसे प्रयत्न करायला हवे, यावर विचारविमर्श व्हायला हवा. उत्पादनात वाढ, लोकांच्या राहणीमानाचा स्तर उंचावणे, सर्वांना रोजगार मिळणे. हे सामाजिक विकासाचे काही महत्त्वाचे टप्पे आहेत. प्राथमिक गरजा भागणे, सामाजिक विषमता कमी होणे, कामाचा पूर्ण मोबदला मिळणे, रोजगाराची व्यवस्था होणे. सामाजिक विकासाचे उद्दिष्टे साध्य होण्यासाठी स्वयंस्फूर्तपणे समाजविकासाच्या प्रवासात सहभागी होणे, हे महत्त्वाचे असते. सामाजिक विकास टप्प्याटप्प्याने होणारी आणि दीर्घकालीन चालणारी प्रक्रिया आहे. त्यात सर्वांचा सहभाग महत्त्वाचा असल्याने ही विकासाची प्रक्रिया समजून घेणे महत्त्वाचे आहे, असे लेखक यात नमूद करतात. 'समाजाचे नैतिक मूल्यमापन'– प्रा. ग. ना. जोशी (२२ एप्रिल १९५०), लिखित लेखामध्ये प्रत्येक व्यक्ती ही समाजावर कशी अवलंबून असते हे सांगताना व्यक्ती जन्मापासून ते मृत्यूपर्यंत किंबहुना मृत्यूनंतरही समाजाचा घटक बनलेली असते. माणूस हा समाजशील प्राणी

आहे. त्याला त्याच्या उदरनिर्वाहासाठी समाजावर अवलंबून राहावे लागते. तो एकटा राहू शकत नाही. तो समूहाने राहतो. परिणामी त्याच्या आकाराला येत असलेल्या व्यक्तिमत्त्वात समाजाचे प्रतिबिंब पडलेले असते. ती परिस्थिती व्यक्तीला घडवत असते. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा आधार हा सामाजिक संस्कार व प्रेरणा असतात हे सांगताना प्रा. ग. ना. जोशी म्हणतात, ''व्यक्तिमत्त्वाचा आधार सामाजिक संस्कार व प्रेरणा– व्यक्ती व समाज परस्परावलंबी असतात. व्यक्तीशिवाय समाज बनत नसतो व समाजाशिवाय व्यक्तीस व्यक्तिमत्त्व प्राप्त होत नसते. सामाजिक संस्काराने व प्रेरणाने व्यक्तिमत्त्व लाभत असते व नंतर आपल्या आंतरिक शक्तीनुसार व्यक्ती आपल्या भूमिकेवरून समाजास काही नवीन देत असतात. केवळ व्यक्ती स्वयंपूर्ण नसते. ती समाजाशिवाय जगू शकत नसल्याने समाजाशी ती अविभाज्यपणे जोडलेली असते. व्यक्ती स्वत:ला मर्यादित करता येत नाही. आपल्या गरजा भागविण्यासाठी व्यक्ती बहुतांशी समाजावर अवलंबून असते. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, निर्वाह, मानसिक सहचर्य व सहकार्य, प्रेरणा व निर्बंध या सर्वांसाठी व्यक्तीस समाजावर अवलंबून राहावे लागते. एखाद्या साध्या क्षुल्लक वस्तूच्याही निर्मितीस प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे एखादा समाज जबाबदार असतो.''[३१]

प्रस्तुत संदर्भावरून व्यक्ती आणि समाज हे परस्परावलंबी असून, व्यक्तीशिवाय समाज बनत नसतो, असे लेखक सांगतात. व्यक्ती स्वयंपूर्ण नसते. म्हणूनच ती समाजाशिवाय जगू शकत नाही. कोणत्याही गोष्टीत तिला इतरांची मदत घ्यावी लागते. त्यामुळे तिला समूहाची आवश्यकता असते. जो समाज नीतिवान ती माणसे नीतिवान असेही काही ठिकाणी म्हटले जाते. समाजजीवनात एकता असते. हे समाजजीवन अखंड व प्रवाही असते. 'तरुण मतदारांना मार्गदर्शन' (५ मे १९५१) या शं. द. जावडेकरांच्या लेखामधून लोकशाही, निवडणूक प्रक्रिया, मतदानाचे महत्त्व, लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी सुजाण नागरिक तयार करणे अशा अनेक विषयांवर चर्चा केली. या लेखामध्ये त्यांनी भारतीय प्रजासत्ताकातील पहिली निवडणूक प्रौढ मतदान पद्धतीने होत असताना तरुण मतदारांना मार्गदर्शन केले. ते म्हणतात, निवडणुकीत कोणत्या पक्षाला बहुमत मिळते. यापेक्षा लोकशाही प्रक्रियेतील निवडणूक हा सोहळा कसा पार पडतो. ते अधिक महत्त्वाचे आहे. यात साक्षर, निरक्षर, समंजस आणि अडाणी या सर्वांचा सहभाग असून शांततेत आणि विश्वासाच्या वातावरणात ही निवडणूक पार पडावी यासाठी

प्रस्तुत लेखामधून शं. द. जावडेकर यांनी तरुण मतदारांना मार्गदर्शन केले. यात त्यांनी लोकशाही हा कल्पवृक्ष आहे. असे सांगत ज्या प्रकारचे कायदे सामान्य लोकांच्या जगण्यासाठी आवश्यक असतात. तसे कायदे करून घेणारे उमेदवार निवडणुकीमध्ये उभे करून; सामान्यांना हे पटवून देऊन; त्यांना निवडून आणून त्यांच्या हाती या देशाची सत्ता सोपवून, आपल्या इच्छेप्रमाणे कायदे करून लोकांचे समाधान करता येईल. हाच लोकशाही राज्यपद्धतीचा मूळ हेतू आहे. कारण कोणत्याही सुधारणा घडवून आणण्यासाठी कसल्याही प्रकारच्या अत्याचारी मार्गाचा अवलंब न करता सामोपचाराने, बहुमताने, सर्वानुमते निवडून येऊन ही प्रक्रिया शांततेत पार पाडता येते. हे या प्रक्रियेचे बलस्थान आहे. परंतु असे जरी असले, तरी या लोकशाहीचे शत्रूही आहेत. हेही आपण समजून घ्यायला हवेत. हे सांगताना लेखक म्हणतात, ''लोकशाहीचे शत्रू कोण?– जनतेला आत्मोद्धाराचे शिक्षण देऊन लोकशाही राज्याच्या साधनेनेच तिचा उद्धार होऊ शकतो, अशी निष्ठा आपण ठेवली पाहिजे. प्रस्थापित राज्यतंत्र वाटेल त्या युक्तायुक्त साधनांनी हस्तगत करून त्याच्या सहाय्याने आम्ही जनतेचा उद्धार करणार, असे प्रामाणिकपणाने किंवा अप्रामाणिकपणाने ज्यांना वाटत असेल ते सर्व लोकशाही राज्याचे व जनतेचे शत्रूच होत, असे आपण समजले पाहिजे. जनता अज्ञान आहे; तर तिला सज्ञान बनविले पाहिजे. जनता दुर्बल आहे; तर तिला सबल बनविले पाहिजे. जनता दरिद्री आहे; तर तिला संपन्न बनविले पाहिजे. पण या सर्व गोष्टी लोकशाही पद्धतीने व जनतेच्या संमतीनेच जनतेकडून घडवून आणल्या पाहिजे. ही निष्ठा लोकशाही संस्कृतीच्या पुरस्कर्त्यांच्या अंत:करणात वसत असली पाहिजे. जनतेला भूल पाडून, तिला भ्रष्ट करून अथवा तिला दहशत दाखवून तिचा उद्धार करतो असे म्हणणारे हे लोक वाचक तरी असतात किंवा आत्मवंचक तरी असतात. म्हणून ज्या देशात लोकशाही राज्य स्थापन झालेले नाही त्या देशात ते स्थापन करणे हे जसे आद्यकर्तव्य आहे. तसेच ज्या देशात लोकशाही राज्य स्थापन झाले आहे, त्या देशातील लोकशाही भ्रष्ट बनवून न देता शुद्ध ठेवणे आणि तेथील लोकशाही राज्याच्या आश्रयानेच जनतेला आपले सर्व प्रश्न सोडविण्याचे शिक्षण देणे हे तेथील जबाबदार व्यक्तीचे आद्यकर्तव्य आहे. लोकशाहीचे अधिष्ठान याच्या उलट ज्यांचा सामान्य लोकांना अथवा दलितवर्गाला आपल्या सामर्थ्याने आत्मोद्धार करता येईल.''[३२]

वरील संदर्भावरून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी तिचे बलस्थान आपल्याला समजून घ्यावे लागेल. त्याचप्रमाणे लोकशाही प्रक्रियेतील अडथळे, अडचणी आणि या प्रक्रियेचे शत्रूही आपणास समजून घेणे आवश्यक आहे. मूलभूत साधनांनी जनतेचा उद्धार करू, असे सांगणे म्हणजे एक प्रकारे लोकशाहीला तडा पोहचवणे होय. कारण साधनसंपत्तीने व्यक्तींचा विकास हे लोकशाहीला मारक आहे. अज्ञानांना सज्ञान बनविणे, दारिद्र्य निर्मूलन करणे अशा गोष्टी जनतेच्या संमतीने जनतेकडूनच घडवून आणल्या पाहिजेत. ही निष्ठा लोकशाही पुरस्कर्त्यांनी आपल्या अंत:करणातून जपायला हवी. जनतेला भूल पाडून, भ्रष्ट करू, दहशतीने उद्धार करणे म्हणजे लोकशाहीला संपवणे होय. असे करणारे सगळे लोकशाहीचे शत्रू होत. याचेही भान सर्वांनी ठेवायला हवे, असे लेखक प्रस्तुत लेखामध्ये सांगतात. 'काँग्रेस समाजवाद : विचार आणि आचार' (५ मार्च १९५५) या लेखामध्ये लेखक मधु दंडवते म्हणतात– ''समाजवाद ही केवळ आर्थिक पद्धती नसून, जीवनाची एक उदात्त दृष्टी आहे.'' ते पुढे म्हणतात, ''समाजवाद ही केवळ आर्थिक पद्धती नसून जीवनाची एक उदात्त दृष्टी आहे. नवसमाज निर्माण करण्याचे ते एक विकसित शस्त्र आणि शास्त्र आहे. या नवसमाज शास्त्राचे लचके तोडून त्यातून तथाकथित समाजवादी समाजरचनेचा निर्जीव सांगाडा उभारण्याचा प्रयत्न करणाऱ्यांकडून समाजवादाची उभारणी कदापिही होणार नाही. ज्यांच्या नसानसांतून राष्ट्रवाद भिनला होता. जे राष्ट्रीय भावनेशी समरस झाले होते. तेच राष्ट्रीय स्वातंत्र्य साध्य करू शकले. ज्यांनी समाजवादाचा नि:संकोचपणे स्वीकार केला आहे. समाजवाद ही ज्यांच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाची ज्वलंत प्रेरणा बनली आहे, अशाच शक्ती भारतामध्ये समाजवादाच्या निर्मितीचे साधन बनू शकतील. समाजवादी आर्थिक कार्यक्रमाच्या तपशिलाबाबत मतभेद होऊ शकतील. परिस्थितीनुसार त्यात फरकही होऊ शकेल. तथापि, समाजवादाची काही निरंतर मूल्ये आणि उद्दिष्टे आहेत. सामाजिक न्याय, आर्थिक विषमता, सामाजिक अभिसरण Social Mobility आणि व्यक्तिस्वातंत्र्य ही समाजवादाची शाश्वत मूल्ये आहेत. काँग्रेसचा आजपर्यंतचा कारभार, तिची स्वातंत्र्योत्तर परंपरा, संघटनेचे स्वरूप, प्रस्थापित हितसंबंधांशी झालेल्या संघर्षात काँग्रेसने स्वीकारलेली भूमिका व आवडी अधिवेशनातील निर्णय यांचा मागोवा घेतल्यास वर उल्लेख केलेल्या मूल्यांचा परिपोष करण्याची शक्ती काँग्रेसमध्ये आहे अशी अंधूक आशादेखील करणे योग्य आहे काय?''[३३]

सामाजिक न्याय, आर्थिक समता, सामाजिक अभिसरण आणि व्यक्तिस्वातंत्र्य ही समाजवादाची शाश्वत मूल्ये आहेत. म्हणजेच सर्व समान असणे, विषमता नसणे म्हणजे समाजवाद. तसे पाहता साम्यवादाची पहिली पायरी म्हणजे समाजवाद होय. समाजात विविधता असावी, पण विषमता नसावी ही समाजवादाची अपेक्षा आहे. समाजवाद खऱ्या अर्थाने समाजात समानता रुजवेल. परंतु स्वातंत्र्यपूर्व काँग्रेसचे स्वरूप हे वेगळे होते. त्या काळात काँग्रेस हा मर्यादित अथवा संकुचित पक्ष नव्हता. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या विविध पंथांच्या लोकांची ती एक व्यापक राष्ट्रीय आघाडी होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र ही आघाडी फुटली आणि सर्वच बदल झाले. अशा परिस्थितीत समाजवादाचे मूल्य, हेतू, विचार, आचार, काँग्रेस–समाजवाद पेलू शकेल का, असा विचार येथे लेखक मांडतात. 'काँग्रेस समाजवाद विचार आणि आचार' (५ मार्च १९५५) या लेखामध्ये मधु दंडवते यांनी काँग्रेस समाजवादाची उद्दिष्टे, भूमिका, आचारविचारांवर प्रकाश टाकलेला दिसून येतो. 'खेड्यांत अद्याप दृढमूल असलेली सामाजिक विषमता नाहीशी कशी होणार?' (१ जुलै १९५५) या लेखामध्ये लेखक भाऊसाहेब रानडे म्हणतात, ''पाऊस पडला येत होता, भुरभुर येतच होती. आम्ही तसेच चाललो होतो. गाव दोन फर्लांगावर दिसत होता. दोन बाया डोक्यावर दोन–दोन हंडे घेऊन चिखल तुडवीत अशाही परिस्थितीत येत असलेल्या पाहून आम्हाला आश्चर्य वाटले. ''गावाच्या विरुद्ध दिशेला डोक्यावर हांडे घेऊन कुठे चालला?'' अशी आम्ही पृच्छा केली. त्या म्हणाल्या, 'आम्ही पाणी आणावयास चाललो' 'गावात पिण्याच्या पाण्याची विहीर नाही का?' असे आम्ही विचारले. त्या म्हणाल्या, 'है की आमच्या जाण्याने विहीर बाटतीय!' गेल्या दोन–तीन दिवसांत हा तिसरा अनुभव. या बिकट समस्येने मन अस्वस्थ झाले. यथाकाल गावातील ग्रामपंचायतीचे सरपंच, पोलीस पाटील कारभारी मंडळी यांच्या भेटी झाल्या. तेव्हा जमिनीबाबतची माहिती विचारल्यानंतर पाणी पिण्याच्या विहिरीसंबंधी चौकशी केली. जबाबदार मंडळींकडूनसुद्धा सारवासारवीचीच उत्तरे मिळू लागली. तेव्हा मी म्हटले, 'आपण जरा मोकळ्या मनाने बोलू या. मी काही कोणी अधिकारी नाही, काही नाही. गावचे भले कसे होईल हे तुमच्याशीच बोलून ठरवायचे आहे. आम्हाला जे काही सुचेल ते विनोबांच्या सांगाव्यानुरूप आम्ही तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न करू.' ते वृद्ध कारभारी मात्र सरळपणे म्हणाले, 'आम्ही त्यांना पाणी कसे भरू द्यावे. जनावरे मेलेली ती खातात. मला तुमच्याशी वाद घालायला येणार नाही. पण मी

काय खरे आहे ते सांगितले.' सायंकाळी सभेमध्ये या प्रश्नाचा मी उल्लेख केलाच 'सरकारने कायदा केला, विहिरीवर दगडात अक्षरे कोरून पाट्या लावल्या, पाच–सात वर्षे झाली तरी हरिजनांना पाणी भरण्याची परवानगी देईनात. जमिनीची मालकी सोडण्यासाखा हा काही बिकट प्रश्न नाही. विहीर बोर्डाने बांधलेली आणि ती सर्वांना खुली आहे म्हणून पाटी लावलेली पण तरीही हरिजनांवरील हा अन्याय काही तुम्ही दूर करीत नाही.' गावचे वृद्ध कारभारी या सभेचे अध्यक्ष होते. सभेनंतर सर्वांना चहा आला आणि चहा न पिणाऱ्यांना दूध आले, पण मी नको म्हटले, या गावचे पाणी पिऊ नये, असे मी योजिले होते. पाणी नाही तेव्हा दूध व भोजन नाही हे क्रमानेच आले. रात्री भोजनाला गावातील २०–२५ मंडळी व आमची २०–२५ मंडळी सारी एकत्र जेववयास बसली. तेव्हा मला बोलावणे आल्यावर मी भूक नाही म्हणून सांगितले व वेळ मारून नेली.''[३४]

प्रस्तुत संदर्भावरून भारतातील सामाजिक विषमतेवर बोट ठेवत ही सामाजिक विषमता संपविण्यासाठी अनेक महामानवांनी प्रयत्न केले. त्यात विनोबा भावेंच्या भूदान चळवळीचा महत्त्वाचा वाटा आहे. ज्यांच्याकडे खूप जमीन आहे अशांनी ज्यांना जमीनच नाही अशांना थोडी जमीन दान द्यावी. जेणेकरून या देशात कोणीही भूमिहीन असणार नाही. या उदात्त भावनेमधून विनोबांनी भूदान चळवळ सुरू केली.

'साधना' साप्ताहिकाचा जन्मच मुळात ढासळत चाललेल्या सामाजिक परिस्थितीला वैचारिक बळ देण्यासाठी, तसेच समाजाला शहाणे करण्यासाठीच एक पाऊल 'साधना'च्या रूपाने सानेगुरुजींनी उचलले होते. 'समाजप्रबोधन' हा 'साधना'चा मुख्य हेतू होता. मग देश विदेशातील सामाजिक प्रश्न 'साधना'पासून लांब कसे राहतील.

अशा पद्धतीचे अनेक सामाजिक लेख 'साधना' साप्ताहिकाने प्रकाशित केले. सामान्य वाचकांचा सामाजिक जाणिवांचा विकास होत गेला. समाज सुस्थित, संघटित, एकजिनसी एकसंध ठेवायचा असेल; तर समाजात सातत्याने विचारमंथन होणे गरजेचे असते. त्यासाठी शिक्षणाबरोबरच समाजाची वैचारिक बैठकही मजबूत असणे महत्त्वाचे असते. विचारवंत, लेखक, अभ्यासक आपल्या विचारमंथनामधून समाजाला दिशा देण्याचे कार्य करत असतात. पुरोगामी महाराष्ट्र म्हणून आज जी महाराष्ट्राची ओळख आहे. ती अशाच संत–महंत, विचारवंतांच्या कामगिरीमुळे आहे. हे नाकारून चालणार नाही. विचारप्रक्रिया ही अखंडपणे चालणारी असून,

तिला प्रदीर्घ अशी परंपरा आहे. समाजात सातत्याने वैचारिक मांडणी होत राहणे म्हणजे त्या समाजाच्या प्रगतीचे ते द्योतक असते. विचारवंत जास्त तेवढी समाजाची वैचारिक बाजू भक्कम मानली जाते. नैतिक मूल्य रुजवणुकीत या विचारवंताचा मोठा वाटा असतो. संस्कारक्षम नागरिक बनविण्याच्या प्रक्रियेत ही वैचारिक मांडणी आवश्यक असते. या कार्यात 'साधना' साप्ताहिक कायम अग्रणी असल्याचे दिसते.

### ४.२०.४ 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले धार्मिक लेख :

'साधना' साप्ताहिकाने सातत्याने विविध विषयांवरील साधक–बाधक चर्चेसह लेखन प्रकाशित केले. मुळात समाजविचाराने शिक्षित करणे. हा 'साधना'चा महत्त्वाचा हेतू होता. 'साधना' साप्ताहिकाने सातत्याने सामाजिक, शैक्षणिक, स्त्रीविषयक, सांस्कृतिक, धार्मिक अशा विविध विषयांवरील अभ्यासकांचे विचार प्रकाशित केले. मानवी मन विचारशील बनवणे. देशप्रेम, राष्ट्रहित जोपासणे असे यामागचे सानेगुरुजींचे हेतू होते. साने गुरुजींनी 'साधना' साप्ताहिकामधून अशी सदरे चालविली, लेखमालिका चालविल्या त्यातलाच एक भाग म्हणजे 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले धार्मिक लेख होय.

'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' अशी साधी–सोपी पण विशाल व्यापक धर्माची व्याख्या सांगणारे सानेगुरुजी मानवाच्या सत्य वर्तणुकीवर भर देत होते. महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव साने गुरुजींवर होता. 'शंकराचार्य वा ज्ञानेश्वर नव्या समाजशास्त्राला जन्म देऊ शकले नाहीत' (१ जानेवारी १९४९). हा आचार्य भागवतांचा लेख एकूण महाराष्ट्रातील धार्मिक चळवळीचा आढावा घेत चिकित्सा करताना दिसतो. महाराष्ट्रातील वैदिक परंपरेचा मागोवा घेत असताना त्यांनी महाराष्ट्रातील संत चळवळीच्या कार्यावर प्रकाश टाकला. भगवान गौतम बुद्धानंतर सामान्य माणसांसाठीचा धर्म सांगणारी संत चळवळच म्हणावी लागेल. वैदिक परंपरेत धर्माच्या चौकटीत सामान्य माणूस, बहुजन बसू शकत नव्हता. धर्माने ते निषेधार्ह मानले. हा काळ वैदिक परंपरेचा पगडा असलेला काळ होता. पण बाराव्या शतकापासून बुद्धानंतर धर्माची चौकट सामाजिक विचाराचीही असू शकते. हे सामान्यांसमोर येऊ लागले. सर्वसामान्य माणूस जो अध्यात्मापासून खूप लांब होता. संत चळवळ त्याला सामावून घेऊ लागली. धर्माची व्याख्या नव्याने समोर येऊ लागली. कालपर्यंत चार वर्णांत विभागलेला धर्म आज मात्र ''जे का रंजले गांजले, त्यासी म्हणजे जो आपुले, तोची साधू

ओळखावा, देव तेथेची जाणावा'' इतक्या व्यापकपणे बोलू लागला. नवे समाजशास्त्राच जणू उदयाला येऊ लागले. परंतु आचार्य भागवत हे सांगायला विसरत नाहीत, की शंकराचार्य मात्र हे करू शकले नाहीत. धर्माला पाप–पुण्याच्या स्पृश्य–अस्पृश्याच्या चौकटीत बंदिस्त ठेवून एक प्रकारे समाजाचा विकास खुंटवून टाकला. कारण यांना सामाजिक चळवळीची दृष्टीच नव्हती. म्हणूनच संतांचे समाजशास्त्र शंकराचार्यांपेक्षा अधिक पुरोगामी होते असे ते म्हणतात.

''व्यवहारात ब्राह्मणालाच संन्यासाचा अधिकार म्हणजे मोक्षाचा अधिकार अशी शंकराचार्यांची भूमिका ठरते. ही भूमिका अवैदिकांच्या भूमिकेशी तोलून पाहिली असता संकुचित आणि अहंकारी आहे, हे कबूल केले पाहिजे. वैदिक समाजशास्त्राचा आणि आध्यात्मिक मुक्तीचा शंकराचार्यांनी जोडून दिलेला हा संबंध नंतरच्या सर्व भारतीय संतांनी तोडून टाकला. ही गोष्ट भारतीय समाजशास्त्राच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाची आहे. या संतांनी मुक्तीसाठी वेदाधिकाराची आवश्यकता ठेवली नाही. नामस्मरणाने चित्त शुद्ध होते व चित्तशुद्धी झाल्याने आत्मज्ञानाची प्राप्ती होते. हीच मोक्षावस्था होय, असे संतांचे सांगणे आहे. वैदिक कर्माच्या जागी नामस्मरणाची स्थापना हा संतांचा क्रांतिकारक शोध होय. मात्र तो नाममंत्र मुक्त झालेल्या संतांकडूनच घेतला असता साधकाला चित्तशुद्धीकारक होतो असे संतांनी ठरविले. त्यामुळे वैदिक काळातील ब्राह्मणांचे महत्त्व या संतमार्गाला प्राप्त झाले. तथापि, हा गुरू जातीदृष्ट्या परसंवाद्याचा नसून, आत्मानुभवदृष्ट्या पारखावयाचा असल्यामुळे संतांच्या गुरुपूजेत जातिभावनेला स्थान नाही. या दृष्टीने संतांचा साधन मार्ग हा शंकराचार्यांच्या साधनमार्गापेक्षा अधिक लोकशाही स्वरूपाचा म्हणावा लागतो आणि याच अर्थाने संतांचे समाजशास्त्र शंकराचार्यांच्या समाजशास्त्रापेक्षा अधिक पुरोगामी ठरते.''[३५]

वरील संदर्भावरून साने गुरुजींचा धार्मिक दृष्टिकोन स्पष्ट होतो. वैदिक विचार जर सामान्यांचे जगणे सोपे सहज करणार नसतील, तर ते टाळायला हवे. संतांनी सांगितलेले विचार शंकराचार्यांच्या विचारांपेक्षा निश्चितच पुरोगामी आहेत. ज्यामधून सर्वसामान्य माणसाच्या जगण्याचा विचार अग्रक्रमाने मांडलेला दिसतो. तर 'जातीयतेचा सुधारणा विरोध आणि धर्म' (४ मार्च १९५०) या दीनानाथ तवकर यांच्या लेखामध्ये, सामाजिक सुधारणांचे महत्त्व अधोरेखित करून सामाजिक सुधारणांना विरोध करणारे धर्म रक्षण करू शकतील का? असा सवाल या लेखामधून केला. या लेखामध्ये राजकीय समता आणि सामाजिक व आर्थिक

विषमता, धर्मातीत सरकार हिंदूसाठी सामाजिक सुधारणा करू शकणार नाही काय? हिंदू कायद्याच्या सुधारणेला विरोध आणि संघटनेच्या घोषणा या गोष्टी परस्परविरोधी आहेत, असे सांगत जातीय सुधारणा आणि धर्म या बाबींवर सखोल चिंतन करताना लेखक असे म्हणतात की, भारतातील नवी राज्यघटना समाजवाद्यांनाही मान्य नाही आणि हिंदुत्ववाद्यांनी तर नाकारलेली दिसते. कारण हिंदूचे सर्व कायदे धर्माधिष्ठित आहेत. त्यांचे सर्वच आचारविचार प्राचीन धर्मग्रंथांवर आधारलेले आहेत. राज्यघटना म्हणूनच यांना मान्य नाही. परंतु धर्मनिष्ठ व सांस्कृतिक म्हणविणाऱ्या पंथात खरोखरच काही तात्त्विक बैठक आहे का, याची चिकित्सा करणे आवश्यक आहे. मूर्तिपूजा असावी की नसावी. हे व असे इतर प्रश्न या संदर्भात लेखक पुढे म्हणतात, ''धर्मनिष्ठ व सांस्कृतिक म्हणवणाऱ्या पंथात खरोखरीचे धार्मिक, सांस्कृतिक किंवा तत्त्वज्ञानविषयक असे काहीही नसते असा अनुभव आहे. ईश्वर एक की अनेक नीतीचे अधिष्ठान काय, मूर्तिपूजा असावी नसावी, धर्म परिवर्तनीय की अपरिवर्तनीय, मोक्षाचा मार्ग कोणता अशा प्रकारच्या मुद्द्यांवर काही जातीयवाद्यांचे भांडण चाललेले नाही. या मुद्द्यांसाठी सध्याच्या काळात कोणी एकमेकांचे गळे कापण्यास तयार होणार नाही. राजकीय आणि आर्थिक स्पर्धेतून मात्र रक्ताच्या नद्या वाहतात हा सर्वांचा अनुभव आहे. विशिष्ट जातीचा किंवा धर्माचा असण्यापासून लाभणाऱ्या फायद्यांसाठीचे धर्म आणि संस्कृतीचे निमित्त जातीयवादी घेत असतो. म्हणूनच जात किंवा धर्म यांना धक्का देणाऱ्या सुधारणांना त्याचा विरोध असतो. जनतेत सामाजिक सुधारणांचा प्रसार करणे, अंधश्रद्धा आणि अर्थहीन रूढींचे उच्चाटन करणे, नैतिक आणि सामाजिक जबाबादारीची जाणीव वाढविणे, उच्च–नीच, जातिभेदांना मूठमाती देऊन बंधुभाव वाढविणे, ही जर तथाकथित सांस्कृतिक संघटनांची प्रामाणिक उद्दिष्टे असती, तर त्यांना धर्मांधतेचा, सनातनीपणाचा आणि क्षात्रवृत्तीच्या नावाखाली हिंसावृत्तीचा प्रसार करण्याचे कारणच नव्हते. रचनात्मक कार्य नसेल तेव्हाच धार्मिक व सांस्कृतिक भेदांना अक्षम्य होण्याचे आणि पापाचे स्वरूप दिले जाते. एरवी धर्मभेद उपस्थित व्हावयाचे कारण नाही.''[३६]

या संदर्भावरून धर्म आणि धर्मासंबंधीचे चिकित्सक विचार लेखक मांडतात. धर्म परिवर्तनीय असावा की नाही, मोक्षाचा मार्ग नेमका कोणता असे अनेक प्रश्न निर्माण होतात. खरे तर मानवी जीवन सुखी करणे, हे धर्माचे उद्दिष्ट असायला हवे. सामाजिक सुधारणांचा प्रसार प्रचार करणे, अंधश्रद्धांचे उच्चाटन करणे, विज्ञानवादी दृष्टिकोन रुजवणे, उच्च–नीच भेद,

स्पृश्य–अस्पृश्यता यांचा त्याग करणे, हे सर्व म्हणजे धर्म होय, असाही धर्माला नवा अर्थ प्राप्त व्हायला हवा. परंतु वैदिक परंपरेच्या चौकटीमधून धर्माची संकल्पना मान्य करणाऱ्यांनी राज्यघटनेला विरोध करणे नवे नाही. 'सत्यदर्शन हीच खरी क्रांती' (२१ फेब्रुवारी १९५३) हा श्री. जे. कृष्णमूर्ती यांच्या प्रवचनाचा सारांश 'साधना'ने प्रकाशित केला. कृष्णमूर्तींचे विचार काहींना उपनिषदे व शंकराचार्य यांच्याप्रमाणे अद्वैतवादी वाटतात, तर काहींना ते मानसशास्त्राचे अनुकरण वाटते. कृष्णमूर्ती सातत्याने देश–परदेशात फिरून मानवी जीवन आणि त्यासंबंधीच्या सर्व प्रश्नांची चर्चा करतात. विज्ञान आणि तर्काला धरून बुद्धीच्या आणि विचारांच्या पलीकडे चला, असे पोटतिडकीने ते सांगतात. त्यांनी सातत्याने अंधश्रद्धेला विरोध करत विज्ञानवादी दृष्टिकोन पेरण्याचे कार्य केले. एक प्रतिभावान विचारवंत कृष्णमूर्ती म्हणतात, ''कोणाचाही मुद्दा किंवा मत तुमच्या गळी उतरवयाचे असा माझा हेतू नाही. अशा प्रकारचे मतांतर काय कामाचे? मतांतर म्हणजे खंडणमंडण व अनुकरण. हे तिन्ही मनोव्यापार क्षणभर तरी निश्चिंत व्हावे व आपण निर्विकारपणे नवीनाकडे पाहावे एवढेच माझे मागणे आहे. प्रश्नांची उत्तरे निराळी नाहीत. प्रश्नात त्याचे उत्तर असते. आपण विचार म्हणजे काय हे जर नीट समजू शकलो तर सर्व कूटप्रश्नांची उत्तरे सहज सापडतील. काय विचार करावा व करू नये, हे तुम्हाला सांगायला तुम्ही अज्ञ बाळे का आहात? विचार कसा करावा हाच खरा प्रश्न आहे. या प्रवचनात याच प्रश्नांचा आपण परस्पर सहकार्याने उलगडा करण्याचा प्रयत्न करणार आहोत. विचारांची उकल कशी करावी, त्याचे धागेधोरे कसे हुडकून काढावेत, हे समजावून घेणे बुद्धीचे श्रेष्ठ कार्य आहे. विचाराचे धागेदोरे आपण उलगडू लागलो म्हणजे त्या विचारातला सत्यांश आपल्याला प्रतीत होत जातो. श्रवणामध्ये स्वीकार वा अस्वीकार, आवड वा नावड, आनंद वा दुःख काही एक येता कामा नये. समजावून घेण्यासाठी सर्व प्राण कानांच्या ठिकाणी एकवटून आपण ऐकतो तेव्हाच सांगणारा काय म्हणतो हे आपणाला समजणे शक्य असते. पण आपण ऐकता ऐकताच आवडनिवड स्वीकार–अस्वीकार उरकून टाकतो व त्यामुळे आपल्याला धड श्रवण कधीच घडत नाही. आपण निर्विकारपणे श्रवण करू शकलो तर कदाचित आपल्या व्यक्त मनाच्या खाली लपलेल्या सर्व वृत्तीसही आपण ऐकू शकू व आपल्याला अपरिचित किंवा नवे असे काही प्रतीत होईल.''[३७]

प्रस्तुत संदर्भावरून अत्यंत तर्कनिष्ठ पद्धतीने कृष्णमूर्ती प्रतिपादन करतात. प्रश्नाचे उत्तर वेगळे नसतेच मुळी. ते प्रश्नातच असते. त्यासाठी मुळात विचार म्हणजे काय? ते व्यवस्थित समजून घ्यायला हवे. विचार करणारे इंद्रिय म्हणजे 'मन'. ते सतत अस्थिर असते. त्याला विचार म्हणजे काय, तो कसा करावा, या बाबी समजून घेता आल्या पाहिजे. 'बुद्धाचा धर्म बहुजन हिताय बहुजन सुखाय' (३० मे १९५३) या लेखामध्ये बुद्धांचा उपदेश आणि संतांचा उपदेश भागवतधर्म यांच्यातील साम्य स्पष्ट करताना, ''या दृष्टीने पाहता हिंदुस्थानातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील भागवत धर्मी साधुसंत हे खरे बौद्ध आहेत. परस्त्री, परनिंदा, परधन यांचा विटाळ मानणे व सत्य आचरणे, मद्य–मांसाला स्पर्श न करणे ही साध्या लोकांना त्याने सांगितलेली शिकवणूक म्हणजेच बौद्धांची पंचशीले. दोघांत काडीमात्रही फरक नाही. अष्टांगिक मार्ग हाच संतांनी उपदेशिलेला आहे. ज्ञानापेक्षा आचरणावर संतांचा अधिक भर असतो. 'बोले तैसा चाले' अशी त्यांची अपेक्षा आहे. जन्म–मरणाचे अर्धसत्य ते वारंवार सांगतात. वासना समूळ खणून काढावी म्हणून ते सारखा उपदेश करतात. 'ते भोगावरील विटती। त्यागावरी नुटती अपुलीये सहजस्थिती। सर्वे वर्तती सर्वदा' अवैराकरिता बुद्धाची मोठी ख्याती आहे, तर निरवैर्य होणे हे सर्व साधनांचे मूळ आहे, असे तुकाराम सांगतात. विधवेचे एकुलत्या एका मुलावर जितके प्रेम असते त्या अपरिमाण प्रेमाने सर्वांभूती वागावे, ही मेतासुत्ताची शिकवण संतांनी सांगितली. एवढेच नव्हे; तर प्रत्यक्ष आचरली. तेव्हा आपण खात्रीने म्हणू शकू की बौद्धावताराचे खरे दर्शन या संतांना झाले होते व त्यांनी ते आम्हाला करून दिले. या दर्शनाचे सगुण प्रतीक म्हणून त्यांनी विठ्ठलाचा अतार्थ बौद्ध अवतार कल्पीला.''[३८]

बुद्धांचा धर्म बहुजन हिताय असून, भागवत धर्माच्या विचारात बौद्धधर्मीय आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही, जसे की परस्त्री, परनिंदा, परधन यांचा विटाळ मानणे, सत्याने आचरण करणे, मद्य आणि मांसाला स्पर्श न करणे, ही शिकवण म्हणजे बौद्धधर्माची पंचशील तत्त्वेच आहेत. यांनी ही उपदेशापेक्षा आचरणाला अधिक महत्त्व दिले आहे. आचरणावर भर दिला हे दोन्हीही अनुयायी माणसाच्या जवळ जाऊन त्यांच्या सुखदुःखाचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करतात. सर्वसामान्यांच्या जीवनातील दुःख दूर होऊन; त्याच्या जीवनाचा मार्ग सुखकर व्हावा. यासाठी या दोन्हीही संप्रदायांनी महत्त्वाचे कार्य केले. बहुजन समाजाला

वैचारिक अधिष्ठान देऊन त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवला. कर्मकांडांच्या गर्तेत अडकलेल्या अध्यात्माची चिकित्सा करत सर्वसामान्यांना पर्यायी अध्यात्माचे दालन खुले करून दिले. 'भारतीय मनाच्या आंतरिक घडण' (१४ एप्रिल १९५६) या फ्रान्सिस वॉटसन यांच्या लेखामधून भारतीय मनाची आंतरिक घडणीमध्ये तेथील आध्यात्मिक वातावरण महत्त्वाचे आहे असे सांगतात. फ्रॅन्सिस वॉटसन हे एक ब्रिटिश बातमीदार आणि समीक्षक होते. त्यांनी केलेल्या भाषणात ते म्हणतात, इतर देशांच्या मानाने भारतात आध्यात्मिक प्रवृत्ती अधिक आहे. या देशात विविध जाती, संप्रदाय, धर्म असलेले लोक राहतात. इतर देशांतील नागरिकांच्या तुलनेत भारतातील नागरिक अधिक धर्मप्रवण आहेत. पण ही धर्मप्रवणता सामान्यांच्या जगण्यात आनंद निर्माण करणारी आहे.

कृष्णमूर्ती आणि विनोबा भावे यांची उदाहरणे आहेत. त्यांच्यातली धर्मप्रवणता तर्कशुद्ध, विज्ञानवादी, विवेकी आहे. कारण भारतातील ज्ञानी व तपस्वी म्हटले, की ते ऐहिक जगाचा त्याग करून जनसंपर्कापासून दूर रानावनात तपस्या करतात, अशी आपली समजूत आहे. परंतु हे असे नाही. श्री कृष्णमूर्ती आणि विनोबा भावे हे याचीच उदाहरणे आहेत.

''श्री कृष्णमूर्ती यांचे नाव सर्व जगभर आता परिचित आहे. ते एक थोर विचारवंत व कवी आहेत. त्यांचे उदाहरण मी प्रथम घेतो. कारण योगी व तपस्वी व्यक्तींची कोणतीही बाह्य लक्षणे त्यांच्यात नाहीत. त्यांचा कपडालत्ता, खाणे-पिणे, बोलणे-चालणे, कुठल्याही सर्वसाधारण शहरवासीयांसारखेच असते. एका भव्य वृक्षाखाली बसून प्रवचन करताना मी त्यांना १९३९ साली प्रथम बघितले आणि पुन्हा गेल्या वर्षी पाहिले. त्यांची विचारसरणी व मांडणी मला चित्ताकर्षक वाटते. त्यांच्या विचारांत लवचिकपणा आहे, तर्कशुद्धता आहे, तरल भावना आहे, कोणत्याही ऐहिक वा पारलौकिक आप्त वाक्याचा हवाला देत नाहीत. स्वत:च्या बुद्धीपलीकडे दुसरी कोणतीही सत्ता ते मान्य करीत नाहीत. मल्लखांबावर कसरत करणाऱ्यांचे शरीर जसे मनोज्ञतेने वाकते तसे त्यांचे बौद्धिक विवेचन व तर्कशास्त्र आहे. इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व आहे. कवींप्रमाणे त्यांची भाषा काव्यपूर्ण व अर्थवाही असते.

आचार्य विनोबा यांनी सुरू केलेले भूदान आंदोलन पाहा. अत्यंत कृश शरीराच्या या तपस्वीने १०,००० मैलांवर अविरत पदयात्रा करून तीन वर्षांत जवळजवळ ४ लाख एकर जमीन भूदान म्हणून मिळविली आहे. दुसऱ्या कोणत्याही देशात हे शक्य होईल का? ही

कल्पना तरी कोणाला सुचेल का? आणि सुचली तर तिचा असा गौरव केला जाईल का? कषाय वस्त्र व भस्मचर्चित देह यांचे भारतीय मनाला हजारो वर्षांपासून वेड आहे, पण तेवढ्याने या चमत्काराचे रहस्य उलगडेल का?''[३९]

प्रस्तुत संदर्भात भारतीय मनाची आंतरिक घडण सांगत असताना; लेखकांनी दोन तत्त्वज्ञानी व्यक्तींचा उल्लेख केलेला आहे. अध्यात्म म्हणजे केवळ केसांच्या जटा वाढवून जंगलात जाऊन तपश्चर्या करणे नव्हे; तर समाजाच्या सामान्यांच्या कल्याणासाठी झगडणे, त्यांच्या जगण्यात सुखाचे क्षण आणण्यासाठी धडपडणे, एवढेच नव्हे; तर पर्यायी तत्त्वज्ञान सामान्यांना देऊन अज्ञानींना ज्ञान देणे होय. श्री कृष्णमूर्ती आणि विनोबा भावे यांच्याबद्दल सांगताना लेखक म्हणतो, की कृष्णमूर्ती हे थोर विचारवंत आहेत. त्यांना मी एका भव्य वृक्षाखाली बसून प्रवचन करताना पाहिले आहे. त्यांची विचारसरणी आणि मांडणी कमालीची चित्ताकर्षक आहे. लवचिकपणे आणि तर्कशुद्धपणे ते मांडणी करतात. इंग्रजी भाषेवर त्यांचे कमालीचे प्रभुत्व आहे. तर आचार्य विनोबा भावे यांनी महाराष्ट्रात सुरू केलेली 'भूदान चळवळ' म्हणजे पुढच्या पिढ्यांना दंतकथा वाटावी अशीच आहे. त्यांनी १० हजार मैल अविरत प्रवास करत भूमिहीनांना जमीनदारांनी जमीन दान द्यावी. अशी भूदान चळवळ उभी केली आणि चार लाख एकर जमीन 'भूदान' म्हणून मिळवून भूमिहीनांपर्यंत पोहोचवली. हे काम सामान्य नाही. या आणि अशा अनेक तत्त्वज्ञानींचा देश म्हणून मी भारताकडे पाहतो. त्यांच्या मनाची आंतरिक घडण याला जबाबदार आहे. भारतीयांमध्ये त्याग, समर्पण, प्रेम या गुणांचा अलौकिक असा संगम आहे, असे लेखक नमूद करतात.

साप्ताहिकाचे वैचारिक योगदान पाहत असताना 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले वैचारिक लेखन व  पाहिल्यावर हे स्पष्ट होते. तत्कालीन परिस्थितीतील महत्त्वाच्या घटना-घडामोडींसोबत देश-परदेशातल्या महत्त्वाच्या घटनांमधून 'साधना' सातत्याने विचारमंथन करताना दिसते. 'साधना' साप्ताहिकाचे वैचारिक योगदान अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. व्यक्ती असो वा नियतकालिक त्याची ओळख ही त्याच्या कार्यावरून होत असते आणि या कार्यासाठी त्यामागचे वैचारिक अधिष्ठान महत्त्वाचे असते.

# संदर्भ टीपा


१. त्रिभुवन शैलेश (डॉ.), उत्तम कांबळे यांची आत्मकथने आणि चिकित्सा, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१०, पृ. क्र. ५५.

२. सुरवाडे मनोहर (डॉ.), समकालीन दलित कथा–एक अभ्यास, अन्वय प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, २००८, पृ. क्र. १६.

३. शेणोलीकर ह. श्री., संज्ञाकोश, मराठी विश्वकोश, पुणे, महाराष्ट्र मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ १९९९, खंड १६ वा, मुंबई १९९९, पृ. क्र. ३९५.

४. रेगे मे. पु., विवेकवाद विज्ञान आणि श्रद्धा, शब्दश्री प्रकाशन, पृ. क्र. २२२.

५. भोसले शिवाजीराव, यज्ञप्रश्न, ओम अक्षरब्रह्म प्रकाशन, पृ. क्र. १४६.

६. रेगे मे. पु., विवेकवाद विज्ञान आणि श्रद्धा, शब्दश्री प्रकाशन, पृ. क्र. २२२.

७. दाभोलकर नरेंद्र, 'साधना' साप्ताहिक, वर्ष ६१ वे, अंक ३७, एप्रिल २००९, पृ. क्र. ७ – ८.

८. W3 Dictionary, www.google.com Chi 3806/eng-hi dictionary/ My rg 171016 date- 19/07/2009.

९. वाघमारे जनार्दन, समाज परिवर्तनाच्या दिशा, सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ. क्र. ५६.

१०. मोरे सदानंद, प्रबोधनपर वैचारिक वाङ्मय, य. च. म. मु. विद्यापीठ नाशिक, सहावी आवृत्ती, २००७, पृ. क्र. ४.

११. सूर्यवंशी नानासाहेब, अक्षर वाङ्मय, एप्रिल–मे–जून २०१५, वर्ष पाचवे, अंक चौथा, पृ. क्र. ६७.

१२. शेलार सुधाकर, वैचारिक साहित्याचे संशोधन, शब्दश्री प्रकाशन, पुणे, २६ ऑगस्ट २०१३, पृ. क्र. १५५.

१३. डांगळे अर्जुन, दलित साहित्य : एक अभ्यास, सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, पृ. क्र. ७७.

१४. तत्रैव/कित्ता, पृ. क्र. ९६.

१५. काळे भगवान, महाराष्ट्रातील समाजकारण : कालचे व आजचे, संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज (लेख) पृ. क्र. २८९.
१६. दाभोलकर नरेंद्र (संपा.), 'साधना' साप्ताहिक, दिनांक १९ मार्च २०११, पृ. क्र. २४.
१७. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, संपादकीय, दिनांक १५ ऑगस्ट १९४८, पृ. क्र. २.
१८. शिरसाठ विनोद (संपा.), 'साधना' साप्ताहिक, 'साधना' साप्ताहिकाची वाटचाल, दिनांक १७ ऑगस्ट २०१९, पृ. क्र. १.
१९. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, भाषावार प्रांतरचना– डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दिनांक २१ जुलै १९५५ , पृ. क्र. १०.
२०. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, उच्च शिक्षणाचे माध्यम हिंदी की प्रादेशिक भाषा, दिनांक १५ सप्टेंबर १९५१, पृ. क्र. ९.
२१. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, शिक्षणात समाजसेवा सक्तीची असावी काय? दिनांक २४ नोव्हेंबर १९५१, पृ. क्र. ९.
२२. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, शिक्षणाची शोकांतिका– वसंत बापट, दिनांक २९ मार्च १९५२, पृ. क. ३.
२३. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, शिक्षण कशासाठी? कृष्णमूर्ती श्री. जे., दिनांक १२ जून १९५४, पृ. क्र. २.
२४. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, स्त्रीविषयक चळवळीतील पुरुषांची जबाबदारी– लिमये अनसूया, दिनांक १४ डिसेंबर १९४९, पृ. क्र. १.
२५. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, आपण आतातरी जाग्या होऊ या– प्रज्ञा पोलकर, दिनांक १५ एप्रिल १९५०, पृ. क्र. ३.
२६. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, सौभाग्यकांक्षा सोडा– दादा धर्माधिकारी, दिनांक १ ऑगस्ट १९५३, पृ. क्र. ५.
२७. कित्ता.
२८. पटवर्धन पु. ह. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, ग्रामीण महिला आणि दुसऱ्या योजनेतील विकासकार्य– कृष्णाबाई निंबकर, दिनांक २५ फेब्रुवारी १९५६, पृ. क्र. १०.

२९. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, आगरकर आणि स्त्रीविषयक सुधारणा– अनसूया लिमये, दिनांक १४ जुलै १९५६, पृ. क्र. ७.

३०. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.),'साधना' साप्ताहिक, सामाजिक विकासाची पथ्ये– भारदे त्र्यं. शि., दिनांक २५ जुलै १९४९, पृ. क्र. ६.

३१. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, समाजाचे खरे नैतिक मूल्यमापन– जोशी ग. ना., दिनांक २२ एप्रिल १९५०, पृ. क्र. ६.

३२. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, तरुण मतदारांना मार्गदर्शन– जावडेकर शं. द., दिनांक ५ मे १९५१, पृ. क्र. १०७.

३३. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, काँग्रेस समाजवाद : विचार आणि आचार– दंडवते मधु, दिनांक ०५ मार्च १९५५, पृ. क्र. ५.

३४. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, खेड्यात अद्ययावत दृढमूल असलेली सामाजिक विषमता नाहीशी कशी होणार– भाऊसाहेब रानडे, दिनांक १ जुलै १९५५ , पृ. क्र. ६.

३५. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, शंकराचार्य वा. ज्ञानेश्वर नव्या समाजशास्त्राला जन्म देऊ शकले नाहीत– आचार्य भागवत, दिनांक १ जानेवारी १९४९, पृ. क्र. ५.

३६. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, जातीयतेचा सुधारणांविरोध आणि धर्म– दीनानाथ तवसर, दिनांक ४ मार्च १९५०, पृ. क्र. ५.

३७. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, सामाजिक सत्यदर्शन हीच खरी क्रांती– कृष्णमूर्ती श्री. जे., दिनांक २१ फेब्रुवारी १९५३, पृ. क्र. २.

३८. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, बुद्धाचा धर्म बहुजन हिताय, दिनांक ३० मे १९५३, पृ. क्र. २.

३९. पटवर्धन पु. ह. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, भारतीय मनाची आंतरिक घडण– वॉटसन फ्रॅन्सिस, दिनांक १४ एप्रिल १९५६, पृ. क्र. ३.

## ड) ‘साधना’ साप्ताहिकातील ललित लेखन :

### ४.२१ प्रास्ताविक :

इंग्रजी साहित्यामधून प्रेरणा घेऊन मराठीमध्ये निबंध, नाटक, कथा कादंबरी असे विविध साहित्यप्रकार आले. ‘लघुनिबंध’ हा यातलाच एक प्रकार होय. भारतात इंग्रजी साहित्याबरोबरच मुद्रणाची सुरुवात ही मराठी भाषा व साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाची बाब मानावी लागेल. ना. सी. फडके यांना मराठी भाषेतील लघुनिबंधाचे जनक म्हटले जाते. त्यांनी लघुनिबंधाला ‘गुजगोष्टी’ असे नाव दिलेले दिसते. त्यानंतर वि. स. खांडेकर यांनी १९२७ साली ‘वैनतेय’ या साप्ताहिकामध्ये ‘रानफुले’ नावाचा लघुनिबंध लिहिला. ही मराठी साहित्यातील लघुनिबंध लिखाणाची सुरुवात म्हणावी लागेल. जसजशी इंग्रज राजवट भारतात स्थिरावू लागली. तसतशी भारतीयांची अस्मिता अधिक आक्रमक होऊ लागली. टिळकपर्वाचा अस्त होऊन गांधीपर्वाचा उदय झाला होता. ‘अहिंसा’ हे प्रभावी अस्त्र घेऊन महात्मा गांधींचे अनुयायी स्वातंत्र्यलढ्यात उतरत होते. जागतिक स्तरावर दोन महायुद्धे झाली होती. याचे पडसाद भारतावरही उमटले होते. सन १९४७ मध्ये भारत देश स्वतंत्र झाला. तद्नंतर महात्मा गांधींची हत्या झाली. सन १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्मात प्रवेश करून हजारो वर्षे अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य, अस्पृश्यता यात होरपळत असलेला समाज अस्मितेने जागा होत होता. नवी दिशा शोधत होता. या सर्वच घटनांचा परिणाम मराठी वाङ्मयावर कमी अधिक प्रमाणात का होईना पडत होता. साहित्य म्हणजे जीवनाचा आरसाच असतो. माणूस जे जगतो त्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. लघुनिबंधाचेही असेच झाले. समाजात घडणाऱ्या घटना साहित्यामधून येत होत्या. जसा समाजप्रवाही तसेच त्या समाजाचे साहित्यही प्रवाही असते. अव्वल इंग्रजी कालखंडात मराठी साहित्य आकाराला येत होते. गद्यलेखनाचे निबंध, प्रबोधनपर, गुजगोष्टी, ललितनिबंध, ललितलेखन, ललितगद्य असे अनेक नावे असलेले ललितनिबंध आकाराला आले. आपल्या आठवणी, अनुभव, आजूबाजूला घडणाऱ्या घटना या सर्वांचा समावेश साहित्यात होत होता. त्याला ललित गद्यही अपवाद कसे असेल? सर्वप्रथम ललित गद्य म्हणजे काय, त्यात कोणकोणते घटक असतात, त्याची परंपरा, प्रवाह समजून घेणे आवश्यक असते.

## ४.२२ ललित गद्य : संकल्पना :

ललित गद्यासंदर्भात अनेक अभ्यासकांनी मते मांडली आहेत. कथा, कविता, कादंबरी, नाटक ह्या वाङ्मय प्रकारांपेक्षा ललित गद्य वेगळे आहे. हे प्रथम समजून घ्यावे लागेल. यासाठी ललित गद्याच्या अभ्यासकांनी मांडलेल्या व्याख्यांचा अभ्यास करावा लागेल. ललित गद्याची व्याख्या करताना डॉ. वा. ल. कुलकर्णी म्हणतात, ''लघुनिबंध म्हणजे एका विशिष्ट वृत्तीने केलेले. जीवनानुभवाचे अवलोकन व चिंतन होय.''[१]

अभ्यासक वा. ल. कुलकर्णी यांच्या मते ललित गद्य एका विशिष्ट वृत्तीने लिहिले जाते. त्यात जीवनानुभवाचे अवलोकन आणि निरीक्षण, चिंतन असते. ललित लिहीत असताना लेखक या चौकटीत असतो.

विंदा करंदीकर असे म्हणतात– ''लेखकाच्या आत्मनिष्ठ अनुभवांना केंद्रवर्ती ठेवून लिहिणाऱ्या गद्यलेखनाच्या विविध लवचिक घाटांच्या एकाच काळातील या लेखन प्रकारांना ललित गद्य ही संज्ञा आता रूढ झाली आहे.''[२]

ललित गद्य हे आत्मनिष्ठ अनुभवांनी भरलेले असते. इतर वाङ्मय प्रकारात आत्मनिष्ठ अनुभव नसतात असे नाही; तर आत्मनिष्ठ अनुभवाभोवतीच ललित गद्य गुंफलेले असते. अभ्यासक वि. शं. चौगुले ललित गद्यासंदर्भात म्हणतात, ''समकालीन वास्तवाचे भान विसरायला लावणारे, काव्यमय भावविश्व आत्मनिष्ठ स्मृतिरंजन हे लालित्याचे खरे स्वरूप नव्हे; तर समकालीन जीवनाचे सम्यक संदर्भ जागरूकपणे पाहणारे आणि मांडण्यासाठी समर्पक थेट भाषाशैली वापरणारे लेखन हेच खऱ्या अर्थी ललित गद्य होय.''[३]

ललित गद्य हे काव्यमय असते. भावविश्वता आणि स्मृतिरंजन हे ललित गद्याचे स्वरूप असले, तरी त्यात समकालीन जीवनाचे संदर्भ असतात. ललित गद्याची भाषाही वास्तवाला विसरायला लावणारी, स्वप्नरंजन करणारी असेल, तर ललित गद्याबद्दल अभ्यासक रजनी पाटील म्हणतात, ''ललित निबंधात तर्काला प्राधान्य नसून भावनिकतेला प्राधान्य असते. तो व्यक्तिमत्त्वाचा हुंकार असतो. लालित्यपूर्ण शैलीतून प्रकटलेल्या या निबंधात विषय सापेक्षता आढळते. त्यातील विषय वाचक तर्कपातळीवर नव्हे; तर भावनिक पातळीवर स्वीकारतो. पण जेव्हा एखादा ललित निबंध व्यक्तिमत्त्वाचा हुंकार असूनही त्या विशिष्ट विषयाच्या बाबतीत

चिंतनशील बनतो आणि वाचकाच्या बुद्धीला व तर्काला आव्हान देतो. तेव्हा तो वैचारिक ललितरूप धारण करतो.''[४]

याचाच अर्थ मुक्त चिंतनाचा काव्यात्म आविष्कार म्हणजे ललित गद्य असे म्हणावे लागेल. ललित गद्याच्या मुळाशी 'मी' हा असतोच म्हणजेच ललित निबंध हे लालित्यपूर्ण शैलीमधून प्रकटत असतात. त्यातले विषय भावनिकतेशी जोडलेले असतात. त्यात लेखकाच्या लेखनातील व्यक्तिमत्त्वाचा हुंकार कमी प्रमाणात असतो. विषयसापेक्षता व अनुभवसापेक्षतेला अधिक वाव असतो.

सारांशाने असे म्हणता येईल, की ललित गद्यात लेखकाचे अनुभवी व्यक्तिमत्त्व आणि आत्मनिवेदन शैली असते. त्यात मोकळेपणा असतो. एखादी घटना, कृतीमुळे मनात निर्माण होणारे भावतरंग, बऱ्या-वाईट घटनांचे मनावर उमटणारे पडसाद, विचार, संवेदना, जीवनातला एखादा अनुभव, निसर्गातील विलोभनीय दृश्य या साऱ्यांचा समावेश ललित गद्यामध्ये असतो. एका अर्थाने लेखकाचे अंतरंगच त्यातून प्रकटत असते. या ललित गद्यामध्ये आठवणी व अनुभव, निसर्गातील विविध विषयांवरील लेख, चिंतनशील लेख, साहित्यपर लेख, प्रवासवर्णन लेख यांचा समावेश असतो. ललित गद्यामध्ये व्यक्तिचित्रणपर लेखही असतात. आज ललित गद्याच्या परंपरेचा विचार केला असता ललित गद्याची प्रदीर्घ परंपरा दिसते. लघुनिबंध ते ललित लेखन असा प्रवास दिसतो. या लेखनात 'मी' हा प्रधान असतो. म्हणजेच त्याच्या स्व-तून आलेल्या अनुभवाच्या आत्माविष्काराची ती सचित्र मांडणी असते. ललित लेखनात लेखकाचा स्व-पासून सुरू झालेला प्रवास एकूण समष्टीकडे जाणारा असतो. तो वाचकालाही आपलाच वाटावा एवढी तादात्म्यता त्यात असते. ललित साहित्यासंदर्भात मराठी वाङ्मयकोश खंड ०४ मध्ये सखोल विवेचन आले आहे. ''गद्य ललित साहित्याचा एक प्रकार हा निबंधात्मक असला तरी प्रकृतीने निबंधापेक्षा वेगळा असतो. आत्मपरता अनौपचारिकता हे त्याचे विशेष असले; तरी त्याला चिंतनशीलतेचे आणि वैचारिकतेचे वावडे नाही. हे निबंधात्मक लेखन एखाद्या विषयावर केलेले असते असे म्हणण्यापेक्षा ते एखाद्या अनुभवाच्या निमित्ताने झालेले असते. असे म्हणणे अधिक बरोबर आहे. या बाबतीत त्याचे काहीसे कवितेशी साम्य आहे. एखादा प्रवासानुभव वा निसर्गानुभव, एखाद्या स्थळाचे वा व्यक्तीचे दर्शन, एखादा वाचनानुभव, एखाद्या कलाकृतीचा अनुभव, एखादा संवेदनानुभव, भावानुभव वा विचारानुभव यांचे निमित्त या

लेखनाला पुरते. एखाद्या सुखद हास्यजनक अनुभवाप्रमाणेच हादरून सोडणाऱ्या शोकात्म अनुभवातूनही हे लेखन जन्म घेऊ शकते.''[५]

यावरून ललित गद्य ही संकल्पना स्पष्ट होते. ललित साहित्याची व्याप्तीही स्पष्ट होते.

## ४.२३ ललित गद्य : स्वरूप वैशिष्ट्ये :

इंग्रजांच्या आगमनानंतर इंग्रजी साहित्याच्या धर्तीवर ललित गद्याची निर्मिती मराठी वाङ्मयामध्ये झाली. ललित गद्यालाच निबंध, प्रबोधनपर, गुजगोष्टी, ललित निबंध अशी अनेक नावे आहेत. ललित गद्य हे विशिष्ट हेतूने लिहिले जाते. त्यात लेखकाचे आत्मनिष्ठ अनुभव असतात. काव्यमयता त्याच्यात असते. भावविवशता, स्वप्नरंजनही ललित गद्यात असते. ललित गद्याची भाषा वास्तवाला विसरायला लावणारी असते. ललित निबंधात तर्काला प्राधान्य नसते तर भावनिकतेला प्राधान्य असत.

## ४.२४ ललित गद्य : लेखन परंपरा :

इंग्रजी साहित्याच्या धर्तीवर ललित गद्याचे लेखन मराठी भाषेत सुरू झाले. मराठी भाषेतील ललित गद्याचे जनक म्हणून ना. सी. फडके यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी ललित गद्याला गुजगोष्टी हे नाव दिले. यानंतर वि. स. खांडेकरांनी 'रानफुले' नावाचा लघुनिबंध लिहिलेला दिसतो. १९४५ नंतर लघुनिबंधाची पीछेहाट होताना दिसते. १९६० नंतर मात्र मराठी वाङ्मयाच्या दालनात नवनवीन साहित्यप्रवाह येत होते. याच काळात लघुनिबंध लेखनही जोमाने चालूच होते. या काळात विंदा करंदीकर, दुर्गा भागवत, माधव आचवल, इरावती कर्वे, श्रीनिवास कुलकर्णी आदींचे ललितनिबंध लेखन आढळून येते.

## ४.२५ 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले ललित निबंध :

'साधना' साप्ताहिकामधून सातत्याने विविध विषयांवरील विविध लेखकांचे ललित लेखन प्रकाशित होत होते आणि ही परंपरा आजतागायत दिसते. ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळात दुर्गा भागवत, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, गो. नी. दांडेकर, कुसुम पटवर्धन इत्यादींचे ललित लेखन प्रकाशित झालेले दिसते. 'रूपधर फाल्गुन' (४ एप्रिल १९५३), 'चैत्रसखा वैशाख' (२३ मे १९५३), 'श्रावणातल्या दुपारी' (५ सप्टेंबर १९५३), 'पद्मावती' (३० ऑक्टोबर १९५३), 'ती तृष्णा' (२७ एप्रिल १९६०) असे अनेक ललित निबंध दुर्गाबाई भागवतांनी 'साधना' साप्ताहिकामधून लिहिलेले दिसतात. बा. भ. बोरकर यांचा 'माझा मौनवार'

(७ ऑक्टोबर १९५०) हा ललित लेख वाचकांना एका वेगळ्या जगात घेऊन जातो. अंतर्मुख करतो. इतर प्राण्यांपेक्षा मानवाला बुद्धिमान प्राणी म्हटले जाते. ते त्याच्याजवळ असणाऱ्या बुद्धीमुळे आणि अभिव्यक्ती सामर्थ्यामुळे त्याला बोलता येणे, भाषा येणे हे त्याच्या सर्जनशीलतेचे महत्त्वाचे लक्षण आहे. पण तो बोलता बोलता बडबडायला लागला. त्याच्या अनावश्यक बडबडीने त्याच्यातली शिस्त हरवून टाकली. जसे इतर प्राण्यांना बोलता येत नाही, पण त्याच्यातली शिस्त अबाधित असते. कामावरची निष्ठा, तत्परता अविरत असते. जसे मुंग्यांची, मधमाश्यांची उदाहरणे देताना लेखक म्हणतात– ''एका मोठ्या वृक्षावर मधमाश्यांचे पोळे होते. केवढा तरी वेळ मी त्यांच्या हालचाली पाहत होतो. असंख्य फुलांतून हळुवारपणे नानाविध रस गोळा करायचे. त्यांच्यावर रासायनिक प्रक्रिया करून हवेने ते बिघडणार नाहीत अशी व्यवस्था करायची अशा रीतीने तयार झालेल्या मधाची बिनबोभाट वाटणी करावयाची. तो सुरक्षित ठेवण्यासाठी 'स्काय स्क्रेपर'ना लाजवील असा मेणाचा झुलता ताजमहाल बांधायचा, असा केवढा प्रचंड उद्योग त्यांनी चालविला होता. पण कोठे धांदल नाही, गडबड नाही, गोंधळ नाही, आरडाओरडा नाही. जी गोष्ट माश्यांची तीच मुंग्यांची. मी बसलो होतो तेथून दहा पावलांवरच, मुंग्यांचे वारूळ होते. कुणा तरी माणसांच्या नतद्रष्ट कार्ट्याने ते नुकतेच गमतीसाठी मोडले होते. पण त्या मुंग्यांच्या राज्यात शिव्याशापांना किंवा रडारडीला जागा नव्हती. सगळ्या कशा अगदी शिस्तीत काम करण्यात गर्क होत्या. त्यांची ती नगररचना आणि सामाजिक व्यवहार कसे अगदी सुरळीत चालले होते आणि तेही पुन्हा त्या माश्यांपेक्षा मुकाट्याने.''[६]

प्रस्तुत संदर्भावरुन लेखक जेव्हा एका मोठ्या वृक्षावर मधमाश्यांचे पोळे पाहतात. तेव्हा असंख्य फुलांमधून रस गोळा करणाऱ्या मधमाश्या त्यावर रासायनिक प्रक्रिया करून ते बिघडणार नाहीत, याची व्यवस्था ठेवायचे. त्याची नीट वाटणी ती सुरक्षित ठेवायची. या प्रक्रियेत कुठेच गडबड नाही, गोंधळ नाही, कोणतीही आरडाओरड नाही. मुंग्यांचेही तसेच आहे. शिस्तीत त्यांची वाटचाल चालू असते. आपण कितीही वेळा त्यांची रांग मोडली, तरी पुन्हा त्याच पद्धतीने, त्याच शिस्तीने त्या जात असतात. त्यांना तिथे कुणी शिस्त लावणारा नसतो. माणसाचे मात्र याउलट आहे. निसर्ग मानवाला अशा अनेक बाबींमधून जीवन जगण्याचा मार्ग दाखवत असतो. पण माणसाला मात्र याकडे लक्ष द्यावेसे वाटत नाही. भाषा ही माणसाला मिळालेली मोठी देणगी आहे. परंतु बोलण्याच्या सवयीमुळे माणूस आपली दैनंदिन कामेही नीट

पार पाडू शकत नाही. त्याची अनावश्यक बडबड त्याला तेवढा अवकाश निर्माणच होऊ देत नाही. त्याचे जगणे शिस्तीने पार पडेल. आपल्या कामात आपण मग्न झालो पाहिजे. कितीही अडथळे आले, तरी ते पार करता आले पाहिजे. यासाठी एकाग्रता, कामावरची निष्ठा आवश्यक आहे. माणूस नेमका याविरुद्ध वागताना दिसतो. माणसाच्या मौनात खूप शक्ती आहे. या दृष्टीने 'मौनाचा' विचार करायला हवा. 'बकरीद' (१५ सप्टेंबर १९५१) हा श्रीपाद जोशी यांचा लेख प्रकाशित झाला. या लेखामध्ये लेखक बकरीदचा अर्थ म्हणजे मारण्याचा उत्सव असा सांगतात– इस्लामी देशात या सणाचे अधिक महत्त्व आहे. या दिवशी कुर्बानी म्हणजेच बलिदान द्यावयाचे असते याला म्हणून कुर्बानी ईद असेही नाव आहे. इजिप्त व तुर्कस्थानात या सणाला 'अीद बैराम' असेही म्हणतात. येथे या दिवशी लठ्ठ शेपटाचा मेंढा मारण्याचा प्रघात आहे. याला दुंआ असेही म्हणतात. लेखक या सणाचा अर्थ, महत्त्व व इतिहास सांगतात. सानेगुरुजी यांचा 'दागिने' (१ डिसेंबर १९५१) हा ललित लेख प्रकाशित झाला. या लेखामध्ये सानेगुरुजी दागिने वापरणाऱ्या, दागिन्यांचा सोस असणाऱ्या स्त्रियांना बोलतात. स्त्री म्हटले की दागिने, कपडे यांचा सोस अधिकच. परंतु आपल्या सभोवताली करोडो लोक उपाशी असताना दुःख, हाल अपेष्टांत जगत असताना दागिने वापरणे पाप आहे. आपण दागिन्यांनी सुंदर दिसणार आहोत का? याचा विचार करा. स्त्रियांनो, तुम्ही विचारशील बना. आपल्या लहान लहान कृत्यांनी समाज संपन्न बनत असतो. बिघडत असतो. दागिन्यांचा नाद सोडून द्या. दागिन्यांमुळे आपण सुंदर दिसतो. ही कल्पना मुळी सोडून द्या, असे सांगत प्रस्तुत लेखामध्ये सानेगुरुजी पुढे म्हणतात– ''मोठेपणाच्या खोट्या कल्पना सोडल्या पाहिजेत. खरोखर मोठा कोण याचा विचार करा ईश्वराला आपण मोठा समजतो. का मोठा समजतो? तो रात्रंदिवस चराचरासाठी श्रमत असतो. त्याच्या योजना अनंत काळापासून अखंड चालू आहेत. तो थकत नाही, संतापत नाही, म्हणून तो मोठा. सर्वांवर त्याची मायेची पाखर म्हणून तो मोठा, तो सदैव देत आहे. लोक कसेही वागले; तरी त्याच्या दातृत्वाला सीमा नाही. फळ, फूल, हवा, पाणी, प्रकाश याची तो खैरात करून राहिला आहे. सर्वांच्या कल्याणार्थ झटतो आहे आणि आपण? लग्नात हजारो रुपयांचा आपण चुराडा करतो. देशात कोट्यवधी अन्न, वस्त्रविहीन असताना अशी उधळमाधळ करण्याचा आपल्याला काय अधिकार, आता तरी सावध झाले पाहिजे. लक्ष्मीपूजनाच्या आधी नरकासूर मारावा लागतो. घरातील घाण, अवकळा गेल्याशिवाय खरी संपत्ती येत नाही. मंगल

विचारांचा दीप मनात तेवत नसेल; तर सगळीकडे दिवे लावून काय होणार? हृदयात दया, प्रीती, बंधुभाव यांचा दिवा लागला पाहिजे. 'दिलमा दिवो करो' हृदयात प्रकाश आला पाहिजे. असा प्रकाश येईल तेव्हा खरी दिवाळी आपले राष्ट्र दरिद्री आहे. आपला महाराष्ट्र दरिद्री आहे. मोठमोठाली कामे पैशांवाचून अडून पडली आहेत. राष्ट्राच्या विकास योजनांना पैसा नाही, पण स्त्रिया अजून दागिन्यांतच रमत आहेत. संपत्ती त्यातच अडकवून ठेवीत आहेत. संपत्ती उत्पादक कामात लागली पाहिजे, नाशिकच्या भगिनी सत्यभामाबाई रानडे यांनी पैसा फंडाला स्वदेशी धंद्याच्या निर्मितीसाठी आपल्या सोन्याच्या गोट पाटल्या दिल्या. नरकेसरी अभ्यंकरांनी गांधीजींच्या फंडाला आपली सर्व संपत्ती दिली. या गोष्टी आठवा. राष्ट्राची पुनर्रचना करायची आहे, लोकांच्या पोटात दोन घास सुखाचे जावे म्हणून प्रयत्न करायचा आहे.''[७]

प्रस्तुत संदर्भावरुन सानेगुरुजींनी अत्यंत संयमाने, शांतपणे स्त्रियांना देशाची समाजाची परिस्थिती सांगत स्वतःच्या भौतिक गरजांपेक्षा समाजाचे दुःख समजावून घेणे आवश्यक असून, ही प्रत्येक मनुष्याची जबाबदारी आहे. दागिने वापरण्याची आवड असणाऱ्या महिलांना सानेगुरुजी सांगतात. मोठमोठी कामे जी समाजाच्या हिताची आहेत, ती पैशाअभावी बंद पडत आहेत. पर्यायाने सामान्य माणसाची उपासमार वाढतच जात आहे. आपण ज्या समाजात राहतो तो समाजदुःखात असताना, उपाशी असताना आपण दागिने वापरणे हा गुन्हा आहे. म्हणून ज्याप्रमाणे नाशिकच्या भगिनी सत्यभामाबाई रानडे यांनी त्यांचा पैसा फंडाला, स्वदेशी धंद्याच्या निर्मितीसाठी आपल्या सोन्याच्या पाटल्या दिल्या. यामुळे निश्चितच समाजाची उन्नती होईल. म्हणून सुंदरता त्यांनी आपल्या कार्यामुळे आहे. महिलांनीही अशाच पद्धतीने समाजाच्या उन्नतीच्या कार्यात स्वतःला झोकून द्यावं.

आपले सर्वांचे या देशाप्रति काही देणे आहे, याचे भान ठेवायला हवे. घरदार, दागिने, पैसा–संपत्ती या सर्वांच्या पुढे जाऊन आपण माणूस आहोत आणि माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागले पाहिजे, ही समर्पित भावना ठेवून आचरण केले पाहिजे. सगळ्या भौतिक बाबींपेक्षा आपल्या भरीव जगण्याचे मोल अधिक असते. त्या जगण्याची ओळखही तशीच आहे. महात्मा गांधीजींनी शेवटपर्यंत अंगभर कपडा घातला नाही. सामान्यासाठी, गोरगरिबांसाठी मिठाचा सत्याग्रह केला. आपणही याची जाणीव ठेवायला हवी. त्याग, सेवा, समर्पण ही मूल्ये अंगी बाळगली पाहिजेत. स्त्रियांनो, या दागिन्यांच्या मोहातून बाहेर या आपली शक्ती राष्ट्रहिताला

लावा. देशप्रेम, बंधुता, मानवता ही मूल्ये जोपासा. हीच सौंदर्याची खरी ओळख आहे, असे विचार सानेगुरुजी प्रस्तुत लेखामध्ये मांडतात. त्यातल्याच 'शून्यमनाच्या घुमटात' (१५ डिसेंबर १९५१) हा मंगेश पाडगावकरांचा ललित निबंध प्रकाशित झाला. या ललित निबंधामध्ये लेखक म्हणतात, ''मानवी प्रज्ञा मंगळावर उड्डाण करण्यासाठी धडपडत होती. पण मंगळाचा अधिक्षेप करीत होती. फुलणाऱ्या फुलाचा साऱ्यांना विसर पडला होता. त्या फुलासारखे माणसाला फुलता येत नव्हते. उमलता येत नव्हते. पाण्याच्या गाण्याला डोलून ताल धरता येत नव्हता. वाऱ्याच्या मृदुस्पर्शाने पुलकित होता येत नव्हते. गवताच्या हिरव्या पातीवर मान टाकून निर्झर विश्वासाने जगता येत नव्हते. सुरक्षितता! माणूस माणसाला भीतच होता आणि भीती निर्माण करीत होता. माणूस माणसालाच जिंकण्यासाठी युद्ध करीत होता. चाक फिरत होते आणि तुटलेले पान मनाच्या रित्या अवकाशात भोवळ येईपर्यंत भिरभिरत होते.''[८]

प्रस्तुत ललित निबंधामध्ये मंगेश पाडगावकर लिहितात, की टोकाच्या प्रतिकूल परिस्थितीतही गवतावरचं छोटंसं फूल मात्र मनसोक्त वाऱ्याच्या झुळकेसह डोलत होते. त्याला सभोवतालच्या परिस्थितीची तमा नव्हती. भीती नव्हती. ते फूल शांत होतं. त्याच्या मौनातही जणू उपनिषद ऐकू येतेय ही जाण होत होती. खरे तर लहानशा गवतावरच ते इवलंसं फूल, त्याचं असं कितीसं आयुष्य असणार क्षणभंगूर; पण तरीही ते मनसोक्त डोलत होत. त्याला मंगळावर उड्डाण घेणाऱ्या मानवी प्रज्ञेशी काहीच घेणं देणं नव्हते. कसल्या तरी निर्झर विश्वासाने ते उभं होतं. पण माणसं मात्र माणसाला संपवू पाहत होती. जिंकण्याची ईर्षा, रक्ताचे पाट वाहताना दिसले. प्रस्तुत ललित निबंधामध्ये दुसऱ्या महायुद्धामध्ये अकारण होळपरणारी जनता, प्रचंड प्रमाणातला मानवी संहार, हिरोशिमा–नागासकीवर झालेला हल्ला, यामधून माणूस माणसाला भीत होता. त्याच्यातील विश्वासाचे नाते संपले होते. तसे पाहता माणसाचे जीवनच क्षणभंगूर. या अशा जीवनात त्याचे त्या छोट्याशा फुलासारखे जगणे राहिले नव्हते. जसे ते इवलेसे फूल सभोवतालच्या पर्यावरणात मनसोक्त डोलत होते. फुलत होते. माणूस मात्र स्वार्थापोटी, जिंकण्याच्या ईर्षेने होरपळत चालला आहे. हा निबंध वाचकांना अंतर्मुख करतो. निसर्ग मानवाला जगण्याचे भान देतो. जगण्याची जाण देत असताना क्षुल्लक बाबीमध्ये माणूस अडकतो असे प्रतिपादन लेखक 'शून्य मनाच्या घुमटात' या निबंधामध्ये करतात.

वि. स खांडेकर यांचे ‘मननीय विचार नव्या निष्ठा’ (दिनांक २६ एप्रिल १९५२) हा रवींद्र पिंगे यांनी वि. स. खांडेकरांच्या भाषणाचा वृत्तान्त प्रस्तुत लेखात प्रकाशित केला आहे. प्रस्तुत लेख हा राष्ट्र सेवा दलातर्फे दलसैनिकांसमोर वि. स. खांडेकर यांचे भाषण झाले. त्याचे शब्दांकन रवींद्र पिंगे यांनी केले. या लेखामध्ये वि. स. खांडेकरांनी विद्यार्थ्यांना व दलसैनिकांना तत्कालीन परिस्थितीतील, समाजातील आव्हाने सांगत विद्यार्थ्यांची जबाबदारी किती महत्त्वाची आहे हे सांगितले. इतरांपेक्षा मानवता पेरण्याचे आव्हान अधिक महत्त्वाचे असून, पूर्वी राजकीय क्रांती महत्त्वाची होती. असंख्य तरुण या राजकीय क्रांतीकडे झेपावले. भारत स्वतंत्र झाला, पण प्रश्न मिटले नाही. कारण अनेक जाती–धर्मांत विखुरलेला माणूस एकसंध होणे गरजेचे आहे. विषमतेला फाटा देत समतेचे गाणे गायिले पाहिजे. या कामात तरुणांनी सरसावले पाहिजे. परंतु तरुणांकडे जेव्हा मी पाहतो तेव्हा ते विफलतेकडे गुंतलेले दिसतात. क्षुल्लक गोष्टींत सफलता मानणारे दिसतात. म्हणून विद्यार्थ्यांनी ही क्षुल्लक भावना सोडून देऊन समाजोद्धाराची कास धरा, विफलतेच्या प्रवाहात गुंतू नका. इंग्रज भारतात आले आणि आपण माणसाकडे माणसासारखे पाहू लागलो. त्याच्या व्यथा, विवंचना समजून घेऊ लागलो. अस्पृश्यता, अज्ञान, यात गुंतलेल्या माणसांना समानतेचे जीवन जगता आले पाहिजे, याचा विचार करू लागलो. ही जाणीव निर्माण करणारी अनेक माणसे या देशात होऊन गेली. ती त्यागी आणि ध्येयवेडी होती तसे विवेकानंद, वि. का. राजवाडे, बालकवी या साऱ्यांनी आपले जीवन दारिद्र्यात काढले, पण समाजपरिवर्तनाची दिशा त्यांनी समाजाला दिली. विद्यार्थ्यांनो, ही जबाबदारी आता तुम्ही पार पाडायला हवी, असे सांगत वि. स. खांडेकर म्हणतात, आजही देशात अनेक प्रश्न, समस्या आहेत. कारण आपण खेड्याकडे वळलो पाहिजे. महात्मा गांधीजींच्या म्हणण्याप्रमाणे खरा भारत खेड्यांमध्ये विसावला आहे. भारताला सुंदर बनवायचे असेल तर येथील खेडी सुंदर व्हायला हवीत. तेथील जनतेवर उत्कट प्रेम केले पाहिजे. जनसमूहाशी एकरूप होऊन सर्वसामान्य माणसाच्या दुःखाने अंतःकरणात आर्द्रता निर्माण व्हावी. या सागरातून नेमके काय घ्यायचे, याचे भान विद्यार्थ्यांना यावे. ‘रमजान ईद’ (२८ जून १९५२) हा श्रीपाद जोशी यांचा लेख रमजान ईदसंदर्भात माहिती देतो. या सणाचे महत्त्व सांगत असताना या दिवशी इस्लाम बांधव मोठ्या प्रमाणात दानधर्म करतात. मिष्ठान्नाचे भोजन करतात. आपल्या प्रियजनांना–मित्रांना बोलावून जेवू घालतात. नवे कपडे परिधान करतात. महिनाभराचा उपवास म्हणजे रमजान संपण्याचा हा

काल असतो. या रमजानच्या महिन्यात उपवासाबरोबरच सामुदायिकतेपेक्षा वैयक्तिक चारित्र्यशुद्धी आणि शारीरिक, मानसिक साधना तपश्चर्या इत्यादींवर भर दिलेला असतो. आपल्या प्राप्तीचा एकचतुर्थांश भाग खैरात देतात. (दान करतात) या दिवशी सामुदायिक प्रार्थना करतात. आलिंगन देतात.

इ. स. १९४८ ते १९६० या कालखंडामध्ये 'साधना' साप्ताहिकामध्ये दुर्गाबाई भागवत, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, गो. नी. दांडेकर, कुसुम पटवर्धन अशा अनेक लेखकांचे ललित निबंध प्रकाशित झालेले दिसतात. त्यात 'गोमाता चिरडली' (१० ऑक्टोबर १९५०), 'पशुपक्ष्यांचे अजब जीवन' (१० मार्च १९५१), 'नवे दैवत' (२१ जुलै १९५१), 'वात्सल्याचा आविष्कार' (१ सप्टेंबर १९५१), 'माझे प्राचीन कल्पतरू' (३ मे १९५२), या रांगेमधील 'माघातला पाऊस' (२५ एप्रिल १९५३), 'मेघ:श्याम आषाढ' (१८ जुलै १९५३), 'गगन वितळले' (२९ ऑक्टोबर १९५५), 'अनेकविध नृत्यागार' (२९ ऑक्टोबर १९५५), 'भ्रमंती' (२५ जुलै १९५९) 'आमचे उपास' (१९ मार्च १९६०), या विषयांवर ललित निबंध प्रकाशित झाले.

'तालबद्ध पौष' (१४ फेब्रुवारी १९५३) या ललित निबंधामध्ये दुर्गाबाई भागवत म्हणतात, ''साऱ्या सचेत-अचेतन वस्तूंची हालचाल म्हणजे सृष्टीच्या तळाशी असणाऱ्या अदम्य जीवनस्त्रोताच्या तालावर चालणारे नर्तनच वाटते. या भव्य विश्वात्मक लयबद्धतेची जाणीव पौषात होते. तशी इतर वेळी क्वचितच होते. या जाणिवेची सुरुवात पौषात होते म्हणून ती फार जाणवते. कारण पौष हा निष्पर्णतेचा काळ, पाने टप टप गळतात. ती विशिष्ट लयबद्धतेत. झाडे उघडी पडल्याने पाखरे त्यांचा आसरा सोडतात. जीवनाचा आविष्कार काही काळ अगदी थांबलासा वाटतो. पण ही स्तब्धता हा काही न होण्याचा काळ. जीवनस्त्रोताच्या लयबद्धतेतला सर्वांत महत्त्वाचा काळ दोन सुंदर सुरांमध्ये स्तब्धतेचे अंतर असते हे मध्यतर आहे.''[९]

पौष म्हणजे भव्य विश्वात्मक लयबद्धतेची जाणीव करून देणारा असून, पौषामध्ये झाडे निष्पर्ण होतात, उघडी पडतात. त्यामुळे पाखरांनाही बेघर व्हावे लागते. साऱ्या सृष्टीची हालचाल म्हणजे अदम्य जीवन स्त्रोताच्या तालावर चालणारे नर्तन असे सुंदर वर्णन दुर्गाबाई प्रस्तुत निबंधामध्ये करतात. 'ही असहाय्यतेची लाट थांबवायची असेल तर' (१४ मार्च १९५३) हा सौ. मालतीबाई बेडेकर यांचा लेख प्रकाशित झाला. या लेखामध्ये बेडेकर यांनी तत्कालीन

परिस्थितीवर भाष्य केले. हा काळ जरी १९५३ चा असला; तरी आजही ही परिस्थिती फारशी बदललेली दिसत नाही. ''सध्या भारतीयांमध्ये ही असहाय्यतेची लाट किती प्रचंड प्रमाणावर पसरली आहे. मुळात सद्‌वृत्त असणारे असंख्य भारतीय केवळ असहाय्यतेने दुर्गुणांची कास धरू लागले आहेत. दुर्दैवी जीवनात कार्यकारणभाव नाहीसा झाल्यामुळे, 'करावे तरी काय' या वैतागाने प्रामाणिकपणा त्याग, नि:स्वार्थ, परोपकार, उद्योग या सगळ्यांशी समभाव वैर मांडून बसू लागला आहे. एवढेच नव्हे; तर सद्‌वृत्त स्त्रीने वेश्यावृत्तीचे असहाय्यपणे मंडण करावे. तसे समाजातील कित्येक लोक चांगले भल्या मार्गाने पैसा मिळणारच नाही, जगता येणार नाही. असे म्हणून दुसऱ्याचा अपहार करण्याचे अंगवळण गिरवू लागले आहेत. हा स्वतंत्र भारताला केवढा शाप आहे! हा शाप कोणी दिला? याचा परिणाम काय होणार ही असहाय्यतेची लाट थांबवायची असेल तर नव्हे; ती प्रथम थांबवायलाच हवी आहे. समाजाला स्वत:च्या सामर्थ्याबद्दल विश्वास वाटायला लावणारे काही तरी घडायला हवे आहे. त्याशिवाय समाजाला हा माझा देश असे वाटणार नाही. या माझ्या देशाचा माझ्याशी काही संबंध आहे असे वाटणार नाही. भारताच्या प्रगतीसाठी जे चालले आहे म्हणून म्हणतात त्यात माझे काय? मी भारतीय? तो कसा? माझ्या प्रगतीचे यात काय झाले? त्या प्रगतीचा सुतराम अनुभव मला गेल्या ५-६ वर्षात आला नाही. उलट दररोज मी दुर्दैवाच्या भोवऱ्यात अधिकच खचतो आहे. असे भारतीय प्रगतीचा संबंध मी माझ्याशी लावू कसा? मी हे पुढारी नि हे नेते बोलताहेत तरी काय? हा प्रश्न बहुसंख्य भारतीयांपुढे उभा आहे. यात देशाच्या आर्थिक सामर्थ्याची दिवाळखोरी वाढत आहे हे स्पष्ट आहे. समाजाच्या आत्मीक बलाला आलेली दिवाळखोरी राष्ट्रघातक असते. हे सर्व देशाच्या इतिहासात सांगत नाहीत का?''[१०]

प्रस्तुत संदर्भावरून समाजाची असहाय्यता थांबायला हवी असे सांगत ती थांबवायची असेल, तर समाजातली विषमता दूर झाली पाहिजे. यासाठी कायदे करून चालणार नाही. कारण जे कायदे करतो, त्याची जाण सामान्य माणसाला असणे आवश्यक आहे. यासाठी सामान्यांपर्यंत लोकप्रतिनिधींनी पोहोचणे, जनतेचा विश्वास संपादन केल्यावरच कायदे तयार करणे व जनतेचा कौल घेत घेतच कायद्याची अंमलबजावणी करणे आवश्यक असते. भारतात अनेक धर्मीय लोक राहतात. अनेक जातीपातींनी येथील समाजव्यवस्था बनलेली आहे. समाजामध्ये अनेक रूढी, प्रथा, परंपरा खोलवर रुजलेल्या आहेत. सामाजिक जीवन जगताना

समाजाने घालून दिलेले नियम सामान्य माणूस काटेकोरपणे पाळतांना दिसतो. या साऱ्यामध्ये स्पृश्य–अस्पृश्यतेसारखा सामाजिक रोग हजारो वर्षांपासून समाजात आहे. त्या व्यवस्थेत पिचणारा, पिळणारा माणूस घाण्याच्या बैलाप्रमाणे अखंडपणे पिळवणूक हीच व्यवस्था मानून जगत असतो. व्यवस्थेने लादलेले जिणं जगत असताना त्याला प्रश्नही पडण्याइतका अवकाश हजारो वर्षे मिळाला नाही. त्याची ही मूकपणे चालणारी असहाय्यतेची तगमग अखंडपणे चालू होते. ही तगमग थांबायला हवी असे समाजसुधारकांना, समाजचिंतकांना वाटत होते. सानेगुरुजींनी यासाठी अविरतपणे लढा दिला. 'खरा तो एकची धर्म' सांगत ते समतेचे गीत गात राहिले. महात्मा गांधीजींची हत्या ही तत्कालीन परिस्थितीला हादरवणारी होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात अनेक प्रश्न तोंड वर काढू लागले. या साऱ्या परिस्थितीत असहाय्यपणे तगमगणारा मोठा वर्ग होता. या वर्गाकडे माणूसपणाने पाहणे आवश्यक होते. या सर्व पार्श्वभूमीवर लेखिका प्रस्तुत लेखामध्ये हे विचार मांडते. हे विचार आजही सामाजिक परिस्थितीत तंतोतंत जुळतात. समाजात सामान्य माणूसही तेवढाच महत्त्वाचा आहे, जेवढा एखादा राजकीय पुढारी. पण ही दरी आजही मिटताना दिसत नाही. राज्यकर्ते एखादा निर्णय घेतात. त्यात कॉमनमॅन कुठेच दिसत नाही. ज्यांच्यासाठी एखादा कायदा करायचा त्याचीच माहिती सामान्यांना नसते. मग अनेक वाद–विवाद निर्माण होतात. एकंदरीत भीतीचे वातावरण निर्माण होते. अनेक संभ्रम निर्माण होतात. आजही नागरिकत्व विधेयकाने हीच परिस्थिती निर्माण झालेली दिसत असून एक असहाय्य तगमग निर्माण होताना दिसते. दुर्गाबाई भागवतांचा 'रूपधर फाल्गुन' (४ एप्रिल १९५३) हा ललित निबंध प्रकाशित झाला असून, प्रस्तुत ललित निबंधामध्ये फाल्गुनाचे रूप, रंग वर्णिले आहे. दुर्गाबाई भागवतांची निसर्गाकडे पाहण्याची सूक्ष्म दृष्टी हा निबंध वाचताना स्पष्ट जाणवते. फाल्गुन महिन्याचे वैशिष्ट्य सांगताना लेखिका म्हणते, आत्यंतिक प्रणय व आत्यंतिक शोक हे या महिन्याचे विशेष आहेत. असाच एक ललित निबंध १८ एप्रिल १९५३ च्या साप्ताहिकामध्ये प्रकाशित झाला आहे. 'वसंतहृदय चैत्र' हा ललितनिबंध दुर्गाबाई भागवतांनी लिहिला. या निबंधामध्ये लेखिका दुर्गाबाई भागवत म्हणतात, ''परवाच मी रस्त्यावरून फिरायला चालले होते आणि काही तरी शीतल कोमल माझ्या अंगावर टिपकले. अतिमधुर सुगंध आजूबाजूला दरवळला. मी खाली पाहिले तो सुरंगीची सुंदर केशरी परागांची आणि पांढऱ्या पाकळ्यांची नखाएवढी फुले खाली पडली होती. भराभर ती वेचीत मी वर पाहिले

तो काय त्या झाडाच्या विशाल बुडाला, फांद्यांना ती अतिनाजूक फुले बिलगली होती. इतर फुले लांबवर फुटलेल्या बारीक डहाळ्यांना लागतात तशी ही नाहीत. पुढच्या रस्त्यावर उंदीची झाडे ताजी, टवटवीत होऊन उभी होती. ती या सुरंगीच्या जातीचीच. तशीच सुंदर, सुवासिक फुले येतात. त्यांना संस्कृतात पुन्नाग म्हणतात. पण अजून ती झाडे फुललेली नाहीत.''[११]

प्रस्तुत संदर्भावरून चैत्रातील निसर्गरम्य वातावरणाचे वर्णन लेखिका करते. चैत्रातील अशोकाची झाडे डोक्यापासून पायापर्यंत नटलेली असून, चैत्रात तर मादी अशोक अधिक जोमाने फुलतात. सर्व फुलांमध्ये उग्रगंधी घाणेरी अधिक नटते. फुलांचे गुच्छच गुच्छ डौलदार दिसतात. चैत्रातली पालवी तर कुठेही जा डौलाने उभी दिसते. हे अत्यंत सूक्ष्म वर्णन लेखिका करते. त्यांचे निसर्गवर्णन वाचकांच्या नजरेसमोर जिवंत चित्र उभे करते.

दुर्गा भागवतांचा 'चैत्रसखा वैशाख' (२३ मे १९५३) हा ललित लेख प्रकाशित झाला. या लेखात लेखिकेचा निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, निसर्गाला मानवरूपात पाहण्याचे आणि वाचकांच्या समोर ते चित्र पाहण्याचे कौशल्य स्पष्ट होते. वैशाख येताच चैत्र म्हणून कोमजलेले झाड पालवते. हिरव्यागार कळ्या तांबडी पाने घेऊन डौलाने उभा राहणारा गुलमोहर वाचकांचे लक्ष वेधून घेतो. वैशाख पौर्णिमेत तर साऱ्याच पौर्णिमांचे सौंदर्य सामावलेले असते, हे लेखिका सांगते. पुढे लेखिका म्हणते, ''एवढेच काय तर जे जे वसंताचे आहे त्याला त्याला पूर्णत्व देण्याचे काम वैशाखाचे आहे. दुर्गा भागवत निसर्गाचे रंगरूप इतक्या सहजपणे उलगडतात की जणू मानवी नात्यांची गुंफण. नात्यातला ओलावा, आपलेपणा, जणू निसर्गातही दिसावा. निसर्गाचे वर्णन करताना मानवी वर्तनाचे रंग वाचकांच्या समोर लेखिका साकारतात. प्रस्तुत ललित निबंधामध्ये लेखिका म्हणतात, ''बहाव्याच्या फुलांच्या सौंदर्याची मला अपार आसक्ती आहे. फुलमोगऱ्याची पिवळी फुले धारण करणारी ऑस्ट्रेलियन झाडे चौफेर बहरली आहेत. तसेच कोंबडीच्या अंड्याच्या आकाराची व रंगाची फुले असणारी ऑस्ट्रेलियन झाडेही अनुपम शोभेने नटली आहेत. देशी व ऑस्ट्रेलियन बहाव्याची झाडे आता किती सुंदर दिसतात म्हणून सांगावी? पिवळ्या, गुलाबी फुलांचे प्रचंड घोसच्या घोस झाडांवर लटकताहेत. ज्येष्ठाच्या अखेरपर्यंत हे वैभव कायम राहील, बहाव्याच्या फुलांच्या सौंदर्याची मला अपार आसक्ती वाटते. विशेषत: देशी बहाव्याच्या पिवळ्या जर्द फुलांची चार पाकळ्यांची पिवळी धमक आणि मखमली काया असणारी ती निर्गंध फुले, त्यांच्या त्या टपोऱ्या वाटोळ्या कळ्या, एकेक सुटी पाहिली तरी

मनोरम दिसतात. पण दोन हातांच्या मिठीत मावणार नाहीत इतके जाड आणि ५–७ फूट लांब असे त्यांचे घोस झाडांवरून खाली लोंबताना पाहिले की, निसर्गाच्या पिवळ्या रंगाचा सारा मुलायमपणा त्या झाडावर साकार झाला असे वाटते. मुंबईत ही झाडे पाहून मला पुष्कळ वर्षापूर्वी नाशिकला गोदाकाठी निर्जन कपारीत उगवलेल्या बहाव्याच्या ठेंगण्या–ठुसक्या झाडांच्या अतुलनीय पुष्पवैभवाची सारखी आठवण होते.''[१२]

यावरून लेखिकेची सूक्ष्म निरीक्षण शक्ती आणि वाचकांच्या समोर चित्र उभी करणारी भाषाशैली स्पष्ट होते. प्रस्तुत ललित निबंधामधून चैत्र आणि वसंत ऋतूमधील निसर्गचित्र साकारताना निसर्गातील आल्हाददायी वातावरण पिवळ्या गुलाबी फुलांचे घोस, बहाव्यांची फुलं त्यांचा स्पर्श इत्यादींचे वर्णन केलेले आहे.

'श्रावणातल्या दुपारी' (५ सप्टेंबर १९५३) हा दुर्गा भागवतांचा ललित लेख वाचताना ते चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. आज निसर्गचक्रामध्ये प्रचंड बदल झालेला आहे. निसर्गचक्राचही संतुलन बिघडले की काय, असेही अनेक वेळा वाटते. दुर्गाबाईनी वर्णन केलेली श्रावणातली दुपार आजच्या पिढीला दंतकथा वाटावी इतकी सुंदर, जिवंत आहे. वाचकही मग त्या वातावरणात वास्तवाचे बोट सोडून अलगदपणे शिरतो आणि दुर्गाबाईंच्या अनुभवाचा, निरीक्षणाच्या डोहात मनसोक्त डुंबतो. दुर्गाबाईंची लेखनशैली अत्यंत साधी, सरळ, भाषा, वर्णनेही नेमकी आशय अलगदपणे वाचकांच्या मनात पोहोचतो. प्रस्तुत 'श्रावणातल्या दुपारी' या लेखामध्ये असेच श्रावण महिन्यातील दुपारचे वर्णन आले आहे. त्या म्हणतात, ''आमच्या घरापासून जवळच एक लहान मैदान आहे. तेथे तर रान असे माजले होते, की पुसू नका. सर्वांत उंच एरंडीचं बन. मध्ये खळगा. त्यात पावसाचे पाणी गुडघाभर साचून एक तळेच बनले होते. वाऱ्याच्या झुळकेबरोबर या गढूळ पाण्यावरही लाटांचा नाच सुरू होता. मध्येच दोन–चार बेंडकुळ्यांपैकी एखादी बेडकी डराव–डराव आवाज करी पाण्यात उडी टाकत होती. फिरून वर येत होती. मागाहून बारीक पिले उड्या मारीत होती. बेंडकुळ्यांप्रमाणेच जवळच इमारतीचे काम चालले होते. तिथल्या मजुरांची आठपासून चार वर्षांची दोन–तीन पोरेही पाण्यात कुदत होती. धाकट्याच्या कमरेपर्यंत पाणी होते मऊ मऊ चिखल हातात घेऊन ती खेळत होती. कपडे बाजूच्या दगडावर ठेवून उघडी–नागडी होऊन मनमुराद जलक्रीडा करत होती. उन्हा–पावसाची मजा मनसोक्त लुटत होती. खेळून खेळून ती दमली. पाण्यातून बाहेर आली. आपल्या

कपड्यानींच अंग पुसून ते कपडे त्यांनी अंगात घातले. मोठ्याने एक बेंडकुळी पकडून तिच्या पायाला दोरा बांधून तो तिला ओढू लागला. बेडकीचे गटाणे डोळे भयाने मिच मिच करू लागले. तिचा आवाज आत आत ओढला गेला. बेडकीला मनमुराद नाचवून ओढून शेवटी त्या पोराने आपटून मारले आणि मग तिला दूर भिरकावून दिले. लगेच एका कावळ्याने ते दूर उचलून नेले. मग ती पोरे परत इकडे तिकडे फिर फिर धुंडाळू लागले. तोच त्यांची नजर काही पावसाळी छत्र्यांवर पडली. ही भूछत्रे नेहमीप्रमाणे जमिनीवर उगवली नव्हती. मुचकुंदाच्या झाडाच्या उथळ डोलीत केव्हा तरी त्यांचे बी पडून तिथे ती उगवली होती. इतर छत्र्या पांढऱ्या असतात. काही किंचित गुलाबी तर काही अगदी काळ्या. पण ही छत्रे काही वेगळीच होती अगदी शेवंतीसारख्या पिवळ्या रंगाची. काही नुसती बोंडेच होती; तर काही पूर्ण उमललेली होती. सोनेरी उन्हात ती सोन्याच्या फुलाप्रमाणे दिसत होती. वाऱ्याबरोबर हलली की त्यांच्या खालच्या भागाची जाळी अतिशय नाजूक आणि सुंदर दिसे. नजर ठरणार नाही असेच ते दृश्य होते. त्या मुलांनाही त्या दृश्याने आकर्षित केले. त्यांनी ती सुंदर छत्रे भराभर तोडली, हुंगली, पण त्यांना वास नव्हता. ती त्यांनी आपल्या गालावरून फिरवली त्या शीतल, मृदू स्पर्शाबरोबर त्यांच्या मुद्रेवरही आनंद ओसंडू लागला. पण किती नाजूक ती छत्री! त्यांच्या लांब देठावर मध्यभागी असलेले ते सफेद नाजूक तंतूंचे कडे तर तेव्हाच कोमजले. देठ मोडले शेकडो पाकळ्या एकीत एक गुंफल्या गेल्या.''[१३]

उपरोक्त संदर्भावरून दुर्गाबाई भागवत यांनी श्रावणातली दुपार सांगत असताना श्रावणातल्या रम्य वातावरणाचे जिवंतपणे चित्रण केलेले आहे. वाचकांच्या दृष्टीसमोर ते चित्र जिवंतपणे उभे राहते आणि वाचक त्यात रमून जातो. श्रावणामध्ये उगवणारे भुईछत्र (भुईछत्र्या) खरेतर आरोग्यासाठी लाभदायक असते. पण लेखिका त्याकडे विशिष्ट नजरेने बघते. कावळ्याची छत्री किंवा कुत्र्याची छत्री असे त्यांना ग्रामीण भागात म्हटले जाते. परंतु लेखिकेची मैत्रीण चल आपण ती तोडू! असे म्हणताच खाली वाकून पदरात त्या घेते. तेव्हा लेखिका तिला यांना तुम्ही काय म्हणता, असे विचारताच ती यांना 'अणिये' म्हणतो असे सांगते. ब्राह्मण लोक यांना पाहून नाक मुरडतात. पण याची भाजी म्हणजे मेजवानी असते आणि ते कोकणीत 'अळमी' असे म्हणतात. 'अळंमी' हा अणियेचा अपभ्रंश आहे, असे येथे लेखिका नमूद करते. त्याचबरोबर लेखिकेने घराजवळच्या मैदानामध्ये साचलेल्या पाण्यामध्ये खेळणारी मुले,

पाण्यांवरच्या लाटांचा नाच हे सगळे वातावरण वाचकाला पुन्हा एकदा श्रावणातल्या दुपारी घेऊन जाते.

दुर्गाबाई भागवतांचा 'पद्मावती' (३ ऑक्टोबर १९५३) हा ललित लेख प्रकाशित झाला. यात वाराणशीची राणी 'पद्मावती' हिचा जीवनप्रवास आला आहे. ही कथा लोककथेच्या धाटणीची असून, तिला दंतकथाही म्हणता येईल. लोककथेच्या चौकटीतील ही कथा वाचकांची उत्कंठा ताणून धरते, पुढे काय. ही उत्सुकता कथा संपेपर्यंत वाटत राहते. राजा, त्याच्या इतर राण्या, त्यात पुन्हा दाखल झालेली ही ऋषिकन्या पद्मावती. तिचे आणि राजाचे जगणे, इतर राण्यांना वाटणारा पद्मावतीचा द्वेष, त्यातूनच राजाच्या मनात संधी साधून कालवलेले विष. गरोदर पद्मावती प्रसूत झाल्यानंतर मुलाला नदीपात्रात सोडून देणे. राजाच्या मनातली शंका पक्की होऊन पद्मावती नागीण किंवा चेटकीण वाटणे आणि शेवटी तिला राजगृहाबाहेर राजाने काढून टाकणे, अशी अनेक वळणे ही कथा घेते आणि मानवी स्वभावाचे अनेक कंगोरे वाचकांसमोर ठेवते. माणूस तसा गूढ, अनाकलनीय असला, तरी अशा कथा माणसाला आकार देत असतात. उपदेश करत असतात. काही शिकवण देत असतात. दुर्गाबाईच्या 'पद्मावती'मध्ये मानवी स्वभावाचे अनेक रंग दिसतात. पद्मावतीचे व्यक्तिमत्त्व अनेकार्थाने वाचकांना आकर्षित करते.

बा. भ. बोरकर यांचा 'शांतात्म्याच्या छायेत' (१२ डिसेंबर १९५३) हा ललित निबंध विनोबा भावे यांच्या जीवनकार्य व व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारा आहे. प्रस्तुत लेखामध्ये भूदान चळवळीचे आधारस्तंभ विनोबा भावे यांच्याविषयीच्या आठवणी लेखक सांगतात. विनोबाजींचे प्रत्येक व्याख्यान अत्यंत श्रद्धेने वाचणारे, यथाशक्ती अभ्यासणारे लेखक बा. भ. बोरकर विनोबाजींना एक अग्निहोत्र संबोधतात आणि विनोबाजींना लांबूनच नमस्कार करतात. त्यांची भेट घेण्याचे टाळतात. पण त्यांच्याविषयीचे कुतूहल मात्र लेखकाच्या मनात कायमच होते. विनोबांविषयी शक्य ती माहिती ते सातत्याने मिळवीत असत. जेव्हा त्यांची पहिली भेट सेवाग्रामला सर्वोदयाच्या पहिल्या मेळाव्यात झाली. तो काळ महात्मा गांधींच्या निर्वाणानंतर तसाच होता. महात्माजींच्या वैष्णवजनांची ही पहिली नांदी होती. विनोबाजींच्या भाषणाने मेळाव्याची सुरुवात झाली. विनोबाजी बोलत होते. महात्मा गांधींच्या हत्येने अपरंपार दुःखामध्ये बुडालेल्या कार्यकर्त्यांशी विनोबाजी संवाद साधत होते. तो क्षण भारावलेला होता. सैरभैर

झालेल्या तुटत चाललेल्या मानवी मनाला विनोबाजी सावरत होते. महात्मा गांधीजींच्या पश्चात त्यांचा लढा अविरतपणे आपल्या कृतीमधून आचरणात आणण्याचा संदेश देत होते. या वेळी लेखक म्हणतात ''गांधी हत्येच्या अपरंपार दु:खाने झाकळून हतप्रभ झालेल्या सर्व संतमंडळींसमोर विनोबा हा एकच पुरुष मेरू पर्वतासारखा स्थिर, खंबीर आणि स्वयंप्रभू आहे. त्यांचे भाषण अत्यंत स्फूर्तिदायी, अत्यंत प्रभावी आणि अत्यंत तत्त्वशुद्ध असेच झाले पण बोलताना त्यांनी गांधीजींचा बाप काढला ते मला आवडले नाही. वस्तुत: त्यांचा मुद्दा सोळा आणे खरा होता. बौद्धिक दृष्टीने त्यावर कसलाही अक्षेप घेणे शक्य नव्हते. पण मन मात्र ते स्वीकारायला तयार नव्हते. माझ्या मनात विकल्प आला, की हा ज्ञानात्मतेचा दर्प तर नव्हे? पण त्याच दिवशी रात्री महाराष्ट्रीय कार्यकर्त्यांसमोर त्यांचे एक भाषण झाले. त्याचा ढंग अत्यंत खेळीमेळीचा आणि जिव्हाळ्याचा होता. त्यांनी संदेश दिला की ''प्रेम करायला शिका''[१४]

या वेळी लेखकाला ही जाणीव झाली की, महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर सैरभैर झालेल्या कार्यकर्त्यांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास फुलविण्याचे कार्य विनोबाजी करत होते. सतत विनोबाजींना भेटण्याचे टाळणाऱ्या लेखकाची सेवाग्राममध्ये जेव्हा भेट होते, त्या वेळी ते कार्यकर्त्यासमोर भाषण करत होते. तेव्हा लेखक विनोबाजींना मेरू पर्वताची उपमा देतात. पण भेटीपूर्वी मात्र लेखकाला विनोबाजी म्हणजे अग्निहोत्र वाटायला लागतात.

प्रस्तुत लेखामधून महाराष्ट्राच्या जडणघडणीत विनोबाजींसारख्या निष्ठावान कार्यकर्त्याच्या, विचारवंताच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकताना वाचकांच्या मनासमोर विनोबाजी साकारतात. उभे राहतात. आज पुरोगामी महाराष्ट्र म्हणत असताना या पुरोगामी विचाराची पायाभरणी करणारे अनेक महामानव या भूमीत होऊन गेले. ज्यांनी आपले जीवन लोकसेवेसाठी, विचारांसाठी सर्वसामान्यांच्या जीवनात आनंद, सुख, समाधान निर्माण व्हावे यासाठी वेचले. त्यातलेच विनोबा भावेही आहेत. ज्यांनी स्वातंत्र्यानंतर या देशातली सर्व विषमता नष्ट व्हावी, सामान्यांचा–अतिसामान्यांचा जगण्याचा दर्जा उंच व्हावा यासाठी भूदान चळवळीच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचा एक नवा विचार समाजाला दिला. यासाठी त्यांना अथक परिश्रम घ्यावे लागले. सतत प्रवास करावा लागायचा. कोणाचेही मन या कार्यासाठी वळवणे. हे अत्यंत जिकिरीचे काम ते करत असत. त्यांच्या एका शब्दावर महाराष्ट्रातील हजारो जमीनदारांनी आपल्या जमिनी दान दिल्या. हे अत्यंत महत्त्वाचे कार्य विनोबाजींनी केले.

विनोबाजींकडे पाहून त्यांना अग्निहोत्र संबोधणारे लेखक बा. भ. बोरकर प्रस्तुत लेखामध्ये मात्र मेरू पर्वत संबोधतात. विनोबाजींची सोबत म्हणजे एक शांतात्म्याच्या छायेत असल्याची जाणीव त्यांना इथे होताना दिसते.

कुसुम पटवर्धन यांचा 'व्यक्ती आणि व्यक्ती' (२ जानेवारी १९५४) हा लेख अनेक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारा आहे. प्रत्येक माणूस हा त्याचे स्वत:चे असे वेगळे व्यक्तिमत्त्व, व्यक्ती तेवढ्या प्रकृती. एखादी व्यक्ती त्याचे बोलणे, राहणीमान या साऱ्या बाबी पाहून त्या व्यक्तीचा अंदाज आपण लावू शकत नाही. लेखिका कुसुम पटवर्धन आपल्या लेखामध्ये आपल्या आयुष्यात ओळखीच्या व्यक्तीची ओझरती चित्रे प्रस्तुत लेखामध्ये उभी करतात. एखादी व्यक्ती आपल्या अंदाजापेक्षा एकदम निराळी असते. आपल्या अंदाजांना धक्के देते. काही काही माणसे आपल्या अंत:करणावर ठसा उमटवतात. त्याचा संदेश आपल्या जीवनाला आकार देत असतो. अशा अनेक व्यक्ती आपल्या आजूबाजूला असतात. कधी कधी जिथे आपली अपेक्षा असते, काही चांगल्या बाबींची, तिथे तिथे बऱ्याचदा हाती माती लागते. समाजात अशा बऱ्या–वाईट व्यक्ती असतात. अशा चांगल्या माणसांमुळे समाजात संस्कार पेरले जातात. अशाच संस्कार पेरणाऱ्या मधुबाईंबद्दल लेखिका सांगतात, ''मधुबाई गव्हाळ कांतीच्या, घाऱ्या वेधक डोळ्यांच्या, पांढरे स्वच्छ पातळ नेसलेल्या, अनवाणी आणि हातात खादी पिशवी अशा. मधुबाई आयुष्यभर सामाजिक कामासाठी झटत राहिल्या. खरे तर मधुबाई असहाय्य, विधवा होत्या. तो काळ तर सामाजिकदृष्ट्या अडचणींचा होता. पण त्यांच्याकडे पाहून त्या असहाय्य होत्या असे कोणालाच वाटत नव्हते. त्यातच त्यांचा दीर त्यांना फार छळत असे. घरात माणसेही खूप होती. घर छोटे होते. कामेही खूप करावी लागायची. पण त्या कधीही चिडल्या, कंटाळल्या असे झाले नाही. त्यांचे लहाणपण क्रांतिकारकांच्या गटाबरोबर गेले होते. सावरकर गटातील काही धागेदोरे त्यांच्यापर्यंत होते. असे त्यांच्या ऐकिवात होते. मधुबाई कधीच स्वत:ची स्तुती करत नव्हत्या किंवा गतकाळातील कोणत्याच गोष्टीत त्या रमत नव्हत्या. त्यांना शिक्षण मिळाले नाही, ही एकच खंत बोचत होती.

राष्ट्रीय वृत्तीची अनेक कार्ये त्यांनी पाहिली होती. राष्ट्रकार्यासाठी त्या निधी उभारीत होत्या. सामाजिक चळवळींसाठी पैसा लागतो. तो लोकसहभागातून उभारावा लागतो. सामाजिक कार्यकर्त्यांनी यासाठी पुढे सरसावले पाहिजे. ही भीक नसून सामाजिक काम आहे.

या जाणिवेने त्या काम करत असत. मधुबाई केव्हाही कोणत्याही वेळी फंड गोळा करायला जात असत. जे दिले ते आनंदाने घेत असत. नाही दिले तरी गोड बोलून घरादाराची चौकशी करून त्या येत असत. कधीच त्यांच्या मनात तक्रारीचा सूर उमटत नव्हता. दान द्या किंवा पांढरपेशी कंजूषपणा दाखवा. त्या माणुसकीचा वर्षावच करत होत्या.''

अशीच आणखी एक आठवण लेखिका सांगतात. त्याच्या लहानपणीचे एक हिंदी शिकवणारे मास्तर. मुलांनी हिंदी शिकावी म्हणून आग्रही असणारे. लेखिकेसह पाच-सहा मुले त्यांच्याकडे हिंदी शिकत होती. मास्तर खादीचे कपडे वापरत. वर करड्या रंगाचा कोट, खादीची टोपी असा पोशाख असे. त्यांचे हिंदी विषयावर प्रभुत्व होते. सन १९४२ च्या चळवळीच्या काळात लेखिका बऱ्याच दिवसानंतर गावी आल्यावर त्यांची आणि मास्तरांची भेट होते. ते खादीवाले जुने हिंदीचे प्रचारक अशी त्यांना मास्तरांची ओळख होती. ते चळवळीत लेखिकेला मदत करतील अशी आशा वाटते. पण जेव्हा लेखिका त्यांना भेटते तेव्हा लेखिकेला धक्का बसतो. लेखिका म्हणते- ''मला धक्काच बसला. चळवळीत तुरुंग लांबच पण कोणतेच धोक्याचे काम करायलाही त्यांची तयारी नव्हती अन् कारण काय विचित्र? भीती हे नव्हे तर, हिंदी प्रचार बंद पडेल म्हणून! मी तेव्हा लेक्चरबाजी घरीच शिकले होते. तेव्हा ''प्रत्येक चळवळीचे अंतिम उद्दिष्ट स्वातंत्र्य हे तुम्ही दृष्टीआड करता आहा. तुम्ही 'साधना'लाच साध्य मानीत आहा आणि प्रत्यक्ष वेळ आल्यावर अंगचोरपणा करीत आहा'' अशा अर्थी बरेच भाषण मी त्यांना ऐकविले. पण ते रागावले नाहीत, थोडे हसून मला ते म्हणाले, की हिंदी प्रचार हेच काम करायचे मी ठरविले आहे. याच माझ्या मर्यादा आहेत. जास्त माझ्याच्याने झेपणार नाही, माझी ती वृत्ती नाही'' त्यांना लाखोली वाहतच मी घरी आले, कारण क्रांतीचा जोर माझ्या अंगात मुरला होता. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी माझी, त्यांची पुन्हा गाठ पडली, चळवळीचा आणि माझाही जोर ओसरला होता. धकाधकीच्या आयुष्याचा ओझरता स्पर्शच मला झाला होता आणि मनाशी हे कबूल करणेच भाग होते, की हे फार कठीण आहे. मी त्यातून बाजूला सरकून आयुष्याचा धोपट मार्ग केव्हाच स्वीकारला होता. मास्तर भेटल्यावर मला मागील प्रसंग आठवला. अजूनही त्यांच्या अंगात तेच कपडे होते. चेहऱ्यावर तेच मार्दव होते, शरीर आणखी कृश झाले होते. मला भेटताच त्यांची गोड हिंदी मला सहज झेपावत माझ्याकडे आली. उर्दू काव्य शिकण्याचा त्यांनी मला आग्रह केला आणि मीही उर्दूवर पुन्हा भाळले. पुन्हा त्यांच्या हिंदी

प्रचाराच्या वातावरणात मी वावरू लागले, आज सर्व जिल्ह्यांत त्यांनी हिंदी शिकवलेली माणसे पसरली होती. सर्व प्रांतात हिंदीसाठी आमचा जिल्हा पुढार होता.''[१५]

वरील संदर्भावरून लेखिकेचे शिक्षक जेव्हा लेखिकेला सांगतात मी फक्त हिंदी भाषेची चळवळ चालविण्याचे ठरवले असून तेच माझे अंतिम उद्दिष्ट आहे. ते शांतपणे बोलत होते. कुसुम हिंदी प्रचार हेच काम मी ठरवलं असून हीच माझी मर्यादा आहे. यापेक्षा जास्त मला झेपवणार नाही आणि ती माझी वृत्तीही नाही. लेखिकेला हे जरा विचित्र वाटते. कारण चळवळीसाठी तुरुंगातही जाणारे कार्यकर्ते आजूला बाजूला असताना सुरक्षित अवकाशात राहून सामाजिक काम करू पाहणारे मास्तर लेखिकेला पचणारे नव्हते. अनेक वर्षांनंतर लेखिकेची मास्तरांशी भेट होते. एकेकाळी चळवळीच्या कामाची झिंग घेऊन जगणारी ही सामाजिक कार्यकर्ती या वेळी मात्र बरीच शांत झाली होती. चळवळीचा जोर ओसरलेला दिसत होता. रोजच्या धकाधकीच्या आयुष्याचा स्पर्शही झाला होता. चळवळीत राहून काम करणे हे कठीण आहे, याची जाणीव होऊन थोडेसे बाजूला सरकून धोपटमार्गी जीवन जगणे लेखिकेने सुरू केले होते. अशा परिस्थितीत लेखिका जेव्हा मास्तरांना भेटते. तिला मागचा अनेक वर्षांपूर्वीचा प्रसंग आठवतो. अजूनही मास्तरांच्या अंगावर तेच कपडे होते. चेहऱ्यावरही तेच मार्दव होते. शरीर जरा आणखी कृश झाले होते. लेखिकेला भेटताच, त्यांनी तेवढ्याच गोड आवाजात उर्दू काव्य शिकविण्याचा आग्रह केला. लेखिकाही त्या कामात वावरू लागली. त्या प्रांतामध्ये पुष्कळ हिंदी प्रचारक मास्तरांनी तयार केले होते. लेखिकेचा जिल्हा हिंदीसाठी पुढारलेला होता. दर वेळेस मास्तरांचा कुणीतरी विद्यार्थी पहिला येत असे. आजही मास्तर हिंदीच्या असंख्य शिकवण्या घेत होते. त्यामधून फारसे अर्थार्जन होत नव्हते. कमी गरजांत राहण्याची त्यांची साधना होती. हिंदीची सेवा यापलीकडे मला झेपवणार नाही. हे अगदी नम्रपणे त्यांनी लेखिकेला अनेक वर्षांपूर्वी सांगितले होते. त्यांच्यात कसलाच अवडंबर नव्हता. अत्यंत साधेपणाने, संयमाने, संथपणे ते आपले काम अविरतपणे करत होते. फार कमी म्हणजे अत्यल्प आणि मर्यादित गरजा होत्या. एकीकडे त्यांच्या चळवळींची ऊर्मी घेऊन वावरणारे असंख्य कार्यकर्ते कामापेक्षा बडेजाव जास्त असणारे, मिरवणारे, प्रसिद्धीसाठी हपापलेले आणि दुसरीकडे मात्र अविरत झटणारे, कसलीही अपेक्षा न करता आपले काम करणारे मास्तरांसारखे कार्यकर्ते लेखिका साकारते आणि वाचकही अंतर्मुख होतो.

देविदास बागूल यांचा 'अहल्योद्धार' (२९ ऑगस्ट १९५९) हा ललित लेख प्रकाशित झाला आहे. या लेखात सहा ऋतूंपैकी वर्षा ऋतूतील चराचर सृष्टीतील बदलाचे वर्णन आलेले आहे. या लेखात वर्षा ऋतूच्या वर्णनात निसर्गदर्शनाचे अनेक अवतार आहेत असे म्हटले आहे. पचेंद्रियांपैकी प्रत्येकाला आव्हान करण्याचे सामर्थ्य निसर्गाच्या सहा अवतारांपैकी फक्त वर्षा अवतारातच आहे, असे लेखकाला वाटते. प्रत्येक ऋतूचे काही तरी वेगवेगळे लक्षण असते. त्या–त्या काळात त्या ऋतूचे महत्त्व असते. कारण वर्षाऋतूची नावीन्यता आणि सुंदरता, सौंदर्यात्मकता यांचे महत्त्व असल्यामुळे आपण त्याला श्रेष्ठ ठरवीत असतो.

वर्षा ऋतूत वातावरणात ग्रीष्माने शुष्क झालेली इंद्रिये पुन्हा रसरसून हिरवी होतात. प्रेमळ माणसाच्या सहवासात संकोच गळून पडावा, त्याप्रमाणे आतील विषण्ण वृत्ती गळून पडते आणि वर्षा ऋतूच्या हिरवळीने दाही दिशा मोहक होतात. जणू काही त्या हिरवळीच्या रूपाने भूमीचे मेणाहुनी मऊ असलेले अंतरंगच प्रकट होते. ग्रीष्म ऋतूत हेच वातावरण किती रूक्ष आणि भकास वाटत होते.

वर्षा ऋतूचा स्पर्श होताच तिचा अहल्योद्धार होतो आणि का भूमीचे मार्दव। सांगे कोंबाची लवलव। या ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे तिच्यातली मृदुता प्रकटते आणि ऋतूचा पुन्हा एकदा प्रत्यय येतो. या लेखातील ऋतूचे नाते माणसाच्या मनाशी किती जवळ आहे, हे सांगितलेले आहे. याचेच वर्णन करताना ते लिहितात,

''मात्र वर्षा ऋतूशिवाय इतर ऋतू पचेंद्रियांपैकी कोणत्या तरी एकाच इंद्रियाला सौंदर्य विश्वाच्या एका पैलूंचे दर्शन घडवितात. शरदांतील रूपसौंदर्याचा सोहळा, हेमंतातील स्पर्शसुखाची अनुभूती, वसंतातील परिमलाचा आल्हाद इत्यादी पृथक् पृथक् सौंदर्यदर्शनाने त्या त्या इंद्रियाद्वारा मनाची सौंदर्यतृष्णा काही अंशीच तृप्त होते. परंतु वर्षाऋतू मात्र एकटाच सर्व इंद्रियांचे एक समयावच्छेदेंकरून समाधान करतो. वर्षाऋतूंतील निसर्गदर्शनाने डोळ्याला रूपाची खाण उघडलेली दिसते. कर्णाला नादब्रह्माची चाहूल ऐकू येते. त्वचेला स्पर्शसुखाची भेट होते आणि घ्राणेंद्रियाला परिमलाचा वेध लागतो. रसनेला नवी गोडी लागते, सगळ्या पंचेद्रियांतच प्राणतत्त्व उमलते.

परवा जेव्हा चाळीसगाव स्टेशनवरून वर्षाकालीन पहिलावहिला सूर्योदय पाहिला तेव्हा ग्रीष्माने एक झालेली इंद्रिये पुन्हा रसरसून हिरवी झाली. प्रेमळ माणसाच्या सहवासात संकोच

गळून पडावा, त्याप्रमाणे 'आंतील विषणावृत्ती' गळून पडल्या. पूर्वेकडील क्षितिजालगत प्रकाश ब्रह्माच्या आत्मविष्कारांत होत होता. त्या आत्माविष्कारांत नवघर जलार्द्र मेघ न्हाऊन निघाले. तें अरुणकालीन प्रकाशफूलही निळसर जलदांच्या सहवासांत खुदकन् हसले, त्या हास्यांत त्या प्रकाशफुलांचे सप्तरंगी अंतरंग प्रकट झाले. त्याचे पडसाद मेघांच्या मुखावरही उमटले आणि अंतरिक्षात सप्तवर्णाचे एक संवादी संमेलन भरलें.''[१६]

हा लेख वाचताना दुर्गा भागवत यांच्या 'ऋतुचक्र' या ललित गद्यलेखनाची आठवण होते. हा लेख ललित्याकडे झुकलेला आहे. वर्षा ऋतू आणि निसर्ग यांच्यातील सहसंबंधाचे महत्त्व हा लेख जसा सांगतो, तशीच तो मानवी सहजीवनाचे महत्त्वही सांगून जातो. माणूस हा समाजशील प्राणी आहे. सभोवतालच्या पर्यावरणाचा एक घटक बनून तोही जगत असतो. त्याचे या सभोवतालच्या परिस्थितीचे एक निरीक्षण असते. आकलन असते. त्यातल्या त्यात तो जर कवी, लेखक असला, तर त्याची या सर्व बाबींकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी असते. तो त्याच्या सौंदर्यबुद्धीने परिसराचे निरीक्षण करत असतो. मुळातच प्रतिभावंत असणाऱ्या लेखकाला सौंदर्यदृष्टी असते. त्यामुळे निसर्गातील सौदर्य त्याला भुरळ पाडत असते. निसर्ग सौंदर्य अचूकपणे टिपण्याचे सामर्थ्य या प्रतिभावंतामध्ये असते. त्याच्यातल्या चिंतनशील, रसिक, उत्साही, काव्यात्म सौंदर्यवेधी वृत्तीला एक वेगळीच झळाळी प्राप्त होऊन त्याचे निरीक्षण वाचकाच्या अंतःकरणापर्यंत पोहोचून वाचकाची अभिरुची वृद्धिंगत करत असते. 'साधना' साप्ताहिकामधून असे अनेक ललित लेख प्रकाशित झालेले दिसतात.

'ती तृष्णा' (२७ एप्रिल १९६०) या ललित लेखामध्ये दुर्गाबाई भागवतांनी स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन केले आहे. मध्ययुगीन स्त्रिया असो की इतर त्यांना विशिष्ट एका चौकटीत बंदिस्त जीवन जगावे लागायचे. बौद्धकालीन स्त्रिया सोडल्या, तर इतर स्त्रियांच्या वाट्याला आलेले जीवन बकालपणे ती जगू लागली. तिच्या आशा मंदावल्या. ती अकाली प्रौढ झाली. बालजीवन तिच्या वाट्यालाच आले नाही. बालवयातच ती माता बनली आणि भोगयंत्र बनून जन्मतील तेवढी मुलं जन्माला घालणे. त्यांचे संगोपन करणे. या चक्रात ती पुरती अडकते. या साऱ्या परिस्थितीत सगळे अंधःकारमय आणि धूसर दिसत असताना केवळ एक दोनच आशादायी किरणे दिसतात. त्यात जनाबाई आणि मुक्ताबाई ह्या जरी विरक्त स्त्रिया असल्या, तरी जनाबाई नामदेवाच्या आणि मुक्ताबाई ज्ञानेश्वराच्या छायेत दिसते. थोडासा काळ पुढे

आला की जिजाबाई आणि अहल्याबाई दिसतात. भारताच्या कर्तबगार महान स्त्रियांची परंपरा सांगतांना दुर्गाबाईंनी राणी लक्ष्मीबाईचाही दाखला दिला आहे. लक्ष्मीबाईंचा रणवेश त्या सांगतात. आधुनिक काळात रमाबाई रानडे, डॉ. आनंदीबाई जोशींसारख्या स्त्रिया उदयाला आल्या. त्यांनीही अपमान, विवंचना सोसली; परंतु पुरोगामित्वाची जिद्द सोडली नाही. अहल्याबाई ते आनंदीबाईपर्यंतचा कर्तबगार पुरोगामी स्त्रियांचा प्रवास हा कष्टाचा, संघर्षाचा, संयमाचा होता. पराक्रमाच्या, संयमाच्या, पुरोगामी विचारांच्या तृष्णेचा होता. म्हणूनच भारतातील इतर प्रांतांपेक्षा इंग्लंडच्या स्त्रिया अधिक शिकल्या आणि नकळत त्यांच्यामध्ये पुरुषांच्या बरोबरीने कर्तबगारी आली. स्त्रियांमधील स्वतंत्र प्रज्ञा विकसित होण्यास वाव मिळाला आणि पुरोगामी विचार अधिक मजबूत होण्यास सुरुवात झाली.

दुर्गाबाई आपल्या ‘ती तृष्णा’ (२७ एप्रिल १९६०) या ललित लेखामध्ये स्त्रियांचा संघर्ष सांगत असताना, समाज मानसिकता महापराक्रमी अहिल्याबाईंची स्त्री म्हणून झालेली मानसिक कोंडी आणि त्यांचा ‘ताठ’ बाणा सांगताना लिहितात,

‘‘आपल्या जनतेचे हित राणी म्हणून तिने पाहिले. सरकारी तिजोरीला धक्का न लावता खासगीतून आपली धर्मकृत्ये उरकली. परलोकीचे पुण्य माझ्या एकटीचे. पण त्या स्वार्थापोटीही प्रजेचे धन जायला नको, अशी दक्षता तिने घेतली. पतीचे प्रेम नाही. मुलाचे नाही. मुलीचा संसार उद्‌ध्वस्त. महादजी शिंदेसारखे शेजारीही कधीमधी मोलाचा सल्ला मानीत नाहीत. प्रसंगी सेनापती ही स्त्री म्हणून अवहेलना करतो. हे सारे पाहिले तरीही अहल्याबाईंची तृष्णा डळमळली नाही. शिंदे ओशाळले, सेनापती मावळले. तिच्या शहाणपणापुढे अखेर सारे सारे लवले. एवढी मानी आणि कुटिल ठरलेली आनंदीबाई पेशवे पण राघोबादादाला इंग्रजांनी सुरतेस नजरकैदेत ठेवले तेव्हा अपमान आणि दारिद्र्य यांनी पिचलेली ही पेशवीण फक्त अहल्याबाईंजवळ आपले दुःख ओकली. ज्या राघोबाने अहल्याबाईंवर स्वारी करण्याचा डाव मांडला होता, तिच्याकडेही औषध पाण्याकरिता, चोळी बांगडीकरिता विनम्र होऊन गेली. बहीण म्हणून गेली आणि तिचे दुःख पाहून अहल्याबाईंच्या मनात वेदना उसळल्या. ‘मी भावजय, तुम्ही नणंद, मानाने महेश्वर दरबारी आपले अहेव लेणे घेऊन जा.’ हा निरोप तिने तिला पाठविला. महाराष्ट्राच्या इतिहासातला हा क्षण मला फार फार निर्माणक्षम वाटतो, पण पडत्या वैभवाच्या काळी आलेल्या

या क्षणावर इतिहासाने जरतार बसवलेली नाही. अहल्याबाई गेली पण अखिल भारतीय पुण्याईचे फळ महाराष्ट्राच्या पदरी टाकून गेली.''[१७]

'एक राणी म्हणून अहल्याबाईंनी सातत्याने आपल्या जनतेचे हित जोपासले. सरकारी तिजोरीतील पैसा हा जनतेचा आहे याचे भान ठेवले. त्यांनी अखंडपणे झुंज दिली. पतीचे प्रेम नाही, मुलांचेही नाही. मुलीचा संसार उद्ध्वस्त झालेला. अशाही परिस्थितीत त्यांनी सामान्य जनतेचे हित जोपासले. अहल्याबाई एक स्त्री म्हणून सेनापतीही अवहेलना करत असे. पण एक मानी स्त्री अहल्याबाईने या साऱ्यांवर मात करत आपली वाटचाल सुरू ठेवली. राघोबादादाने अहिल्याबाईंवर स्वारी करण्याचा डाव रचला; पण पुन्हा काही काळानंतर इंग्रजांनी राघोबादादाला सुरतेला नजरकैदेत ठेवले. तेव्हा राघोबादादाची पत्नी आनंदीबाई अहल्याबाईजवळ आपले मन मोकळे करते. तेव्हा अहल्याबाई त्यांना भावजय म्हणून त्यांच्या चोळीबांगडी आणि औषधपाण्याची सोय करतात. अशी उदात्त अंत:करणाची, बुद्धिमान अहल्याबाई महाराष्ट्राच्या इतिहासातील पराक्रमाचे, औदार्याचे प्रतीक म्हणून आपण अहल्याबाईंकडे पाहतो.

अशा प्रकारे ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळात 'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झालेल्या ललित लेखांचा आढावा घेतला असून या लेखांतून निसर्गवर्णन चित्रमयशैली निसर्गातील बदल सामाजिक विषमता, देशप्रेम, बंधुता, मानवता ही मूल्यांची जोपासना, इ. विषयीचे निरीक्षण या लेखातून व्यक्त झाले आहे.

## ४.२६ 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले चरित्र :

मराठी वाङ्मयातील कथा, कविता, नाटक, कादंबरी इत्यादी वाङ्मय प्रकारांसारखाच चरित्र हा वाङ्मय प्रकारही महत्त्वाचा मानला जातो. उपरोक्त स्थित वाङ्मय प्रकाराप्रमाणे चरित्र वाङ्मयदेखील इंग्रजांच्या आगमनानंतर आणि इंग्रजी साहित्याच्या धर्तीवर मराठीमध्ये आलेले आहे. मराठी वाङ्मयात चरित्र वाङ्मयाचे दालन समृद्ध आहे. चरित्र आणि आत्मचरित्र असे सकृद्दर्शनी सारखेच वाटणारे; पण वेगळे असणारे वाङ्मय प्रकार मराठी वाङ्मयामध्ये दिसून येतात. या दोन्ही वाङ्मयतला महत्त्वाचा फरक हा, की आत्मचरित्रात स्वत:च्या आयुष्याची कहाणी लेखक स्वत:च लिहीत असतो. पण चरित्र वाङ्मयात मात्र आपली कहाणी दुसरा कुणीतरी लिहीत असतो. खरे तर इतरांच्या आयुष्याला जाणून घेणे, हा मानवी स्वभावच आहे.

एखादी व्यक्ती आपल्या जीवनात कशी जगते हे समजून घेण्यासाठी दोन्हीही म्हणजे चरित्र आणि आत्मचरित्र वाङ्मय प्रकार आवश्यक आहेत. व्यक्तीच्या जीवनात प्रेरणा निर्माण करणारे वाङ्मय प्रकार म्हणूनही याकडे पाहावे लागेल. साहित्य हा जीवनाचा आरसा आहे असे म्हणतात. मानवी जीवनात जे जे आहे, त्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. मानवी जीवनाला साहित्य आकार देत असते. संस्कार देत असते. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी अनेक प्रेरणादायी व्यक्तीच्या चरित्राचा अभ्यास आवश्यक असतो. चरित्र साहित्य प्रकाशात व्यक्तीची जीवनकथाच असते. चरित्रातही व्यक्तीची जीवनकथाच असते. मराठी वाङ्मयकोश खंड–४ मध्ये चरित्रासंबंधी विवेचन आले आहे. त्यात ''मराठी साहित्याला चरित्रात्मक लेखनाची दीर्घ परंपरा आहे. महानुभाव पंथीयांच्या चरित्रात्मक लेखनामागे पंथ आणि भक्ती या दोन महत्त्वाच्या प्रेरणा होत्या. तत्कालीन पौराणिक संकेताचा अवतार कल्पनांचा चरित्रात्मक लेखनावर प्रभाव पडलेला दिसून येतो. चरित्र विषय झालेल्या व्यक्तीविषयीच्या आख्यायिका, दंतकथा, आठवणी इत्यादींचा चरित्रात्मक लेखनाची साधने म्हणून उपयोग केलेला आढळतो. पंथप्रवर्तक, संत भक्त, ऐतिहासिक व्यक्ती यांच्याकडे सामान्यतः एक अलौकिक व्यक्ती म्हणून पाहण्याची चरित्रकारांची भूमिका होती. पंथीय विचारसरणीचा, भक्तिमार्गाचा, तत्कालीन जीवनमूल्यांचा प्रसार करण्याचे, तसेच ईश्वरभक्तीचे एक साधन आणि आपल्या भक्तिभावनेचा आविष्कार करण्याचे एक माध्यम म्हणून चरित्रात्मक लेखनाकडे पाहिले जात होते. ही चरित्रे गद्य किंवा पद्य स्वरूपात आहेत. महिंद्र भटाचे लीळाचरित्र (चक्रधराचे चरित्र) नामदेवाची आदि–समाधी आणि तीर्थावळी ही अभंगात्मक प्रकरणे (ज्ञानेश्वराचे चरित्र), सरस्वती गंगाधराचे गुरुचरित्र (श्रीपाद वल्लभांचे चरित्र), महिपती ताहराबादकरांचे भक्तविजय संतविजय यांसारखे ओवीबद्ध चरित्रलेखन (नामदेव, कबीर, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादींचीचरित्रे) कृष्णाजी अनंत सभासदाची सभासद बखर (शिवाजी महाराजांचे चरित्र) यांसारख्या काही ठळक चरित्रात्मक लेखनाचा या संदर्भात निर्देश करता येईल''[१८]

उपरोक्त संदर्भावरून चरित्र वाङ्मयाची संकल्पना स्पष्ट होते. मराठी साहित्यात चरित्रवाङ्मयाची प्रदीर्घ परंपरा आहे. ही चरित्रे पद्यात्मक आढळून येतात. आधुनिक काळात मात्र गद्यातही लिहिले गेले. इंग्रजी साहित्यामधून चरित्रांकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट झाला आणि विविध क्षेत्रांतील व्यक्तींचे जीवन आणि त्यांचे कर्तृत्व, सामाजिक, राजकीय विचारप्रवाह

समजून घेणे, राष्ट्रीय भावना जोपासण्यासाठी, गतेतिहासाविषयीचे कुतूहल समजून घेण्यासाठी अशा चरित्रलेखनामागच्या विविध प्रेरणाही स्पष्ट होतात. आठवणी, पत्रलेखन, डायरी इत्यादींचा चरित्रलेखनाचे साधन म्हणून उपयोग केला गेला. चरित्रकार आपल्या हेतूनुसार चरित्रकाराच्या जीवनातील घटना, घडामोडी निवडत असतो आणि त्याचा अन्वयार्थ लावून सत्यशोधनाचा प्रयत्न करतो. यात व्यक्तीचे बाह्यस्वरूप आणि त्याचे अंत:स्वरूप असते. ज्यात व्यक्तीचा स्वभाव, शरीरयष्टी, विचारप्रक्रिया, स्वभाव–विशेष, त्याचा दृष्टिकोन, अनुभवविश्व, कर्तृत्व, त्याच्या जीवनातील चढ–उतार, सुख–दु:ख, त्याचे नातेसंबंध इत्यादींचा समावेश असतो. यावरून चरित्रकाराचे व्यक्तिमत्त्व वाचकाच्या मनावर कोरल्या जाते. नकळत वाचकांवर संस्कार करते, प्रेरणा देते, लढण्याचे बळ देऊन विविध अनुभव वाचकाला प्रेरणा देतात.

'लास्कीच्या जीवनाचे चिकित्सक मूल्यमापन' (१ एप्रिल १९५०) या मधु लिमये यांच्या लेखात प्रा. हेरॉल्ड लास्की यांचे बालपण, शिक्षण, राजकारण, जहालवादी विचारांकडून मार्क्सवादी विचारांकडे झालेले वैचारिक स्थित्यंतर, तर वक्तृत्वाची कला अवगत नसताना आपल्या अभ्यासपूर्ण व्यक्तिमत्त्वामुळे वयाच्या तेराव्या वर्षी चर्चिल साहेबांच्या निवडणुकीत प्रचार केला. तेव्हा चर्चिल लिबरल होते. लहान लास्कीने तेव्हा भाकीत केले, चर्चिल मुख्य प्रधान होतील. १९२० साली लास्की अमेरिकेतून आले तेव्हा मार्क्सिस्ट समाजवादी बनले. अमेरिकी लोकशाही, राज्यशास्त्राचे व्याकरण ही त्यांची महत्त्वाची ग्रंथसंपदा असून, मासिके, वृत्तपत्रातून त्यांनी सातत्याने लेखन केले. त्यांचे शासनासंबंधीचे विचार, ''शासनसंस्था, म्हणजेच सर्व काही हा जो फॅसिस्टांना स्फूर्ती देणारा विचार त्यांच्याविरुद्ध लास्कीने बाजू मांडली आहे. कायद्याला मानलेच पाहिजे या तत्त्वाला विरोध करून केवळ सरकारने केला म्हणून का तो मानला पाहिजे? लास्कीची स्वातंत्र्याची कल्पना अराजकवादाची आहे. ती कम्युनिष्टना व फॅसिस्टांना दोघांनाही नापसंत आहे. याबाबतीत लास्की गांधीजींच्या जवळ येतात. सुसंस्कृत सद्सदविवेकबुद्धीने प्रेरणा दिलेल्या संकल्पानुसार वागणे म्हणजे स्वातंत्र्य असे तो म्हणतो. शासन संस्था परमोच्च सत्ता नव्हे तर व्यक्तीची सद्सदविवेकबुद्धी होय.''[१९]

उपरोक्त संदर्भान्वये लास्की हा शासकीय यंत्रणेपेक्षा व्यक्तीच्या सद्सदविवेकबुद्धीला चालना देणारा विचारवंत होता, हे लक्षात येते.

'प्रा. वा. म. जोशी– माणुसकीचे धडे देणारा शिक्षक' (२२ जुलै १९५०) या मालतीबाई बेडेकर यांच्या लेखात आश्रम हरिणी, इंदू काळे व सरला भोळे, सुशीलेचा देव या तत्त्वचिंतनात्मक कादंबऱ्या लिहिणाऱ्या वा. म. जोशी यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकलेला आहे. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी पुण्यात स्थापन केलेल्या महिला महाविद्यालयात तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि इंग्रजी, मराठी साहित्य शिकविणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंची ओळख 'माणुसकीने धडे देणारा थोर शिक्षक' प्रा. वा. म. जोशी यांच्या या लेखात मालतीबाई बेडेकर यांनी करून दिली. पुस्तकी शिक्षणापेक्षा तात्यांच्या व्यक्तिमत्त्वाने जे शिकविले ते आयुष्याच्या वळणावर उपयुक्त ठरले. त्यांना आम्ही 'तात्या' म्हणत असे. तात्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे साधी राहणी, जिज्ञासू वृत्ती, निःस्पृह प्रेमळपणा, निरागसता, दांभिकतेचा अभाव, हृद्य व्यक्ती, तत्त्वज्ञानी व उच्च पातळीचा लेखक अशी मालतीबाई बेडेकर यांनी या लेखातून ओळख करून दिली आहे. खरे तर महर्षी कर्वे यांनी सुरू केलेल्या हिंगण्याच्या आश्रमात राहून विद्यार्थ्यांना भरभरून ज्ञान देणाऱ्या वा. म. जोशींच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू बारा वर्षांच्या मालतीबाईंना भावले. त्यांनी वर्गापेक्षा वर्गाबाहेर अनुभवलेल्या तात्यांचा अनुभव त्या सांगतात. त्या म्हणतात– आश्रमात आल्या गेलेल्या सर्वांची चौकशी करणारे, त्यांच्याशी प्रेमाने बोलणारे तात्या या लेखात भेटतात. अवखळ मालतीबाईंना मार्मिक शब्दांत मुलींनी कसे वागावे, चालावे याचे धडे देतात, या प्रसंगी ते म्हणतात, ''खडूवर उभा रहा मी बारा वर्षांची असेन. मला कुठेही एका ठिकाणाहून दुसरीकडे जाताना पळत जायची सवय होती. त्यामुळे कित्येकदा अनर्थ होत. एकदा मी बोर्डिंगच्या व्हरांड्यावरून शाळेच्या व्हरांड्यावर पळत गेले. वर्ग चालू होते, धावताना मोठा आवाज होत होता. मी धापा टाकीत वर्गांत गेले. तात्यांनी माझ्याकडे पाहिले. मी परवानगी विचारली, त्याप्रमाणे मला आत येण्यास त्यांनी परवानगी दिली. माझ्या धापा चालूच होत्या. त्यांनी मला 'उभ्या रहा' म्हणून फर्मावले– अगदी लहान मुलींनाही तात्या 'आहो जाहो' म्हणत. निदान माझ्या आठवणींत तरी मी उभी राहिले. तेव्हां त्यांनी एक खडू फळ्याच्या स्टँडमागे उभा ठेवण्यास मला सांगितले. मला काही कळले नाही, पण मी त्याप्रमाणे खडू फळ्याच्या थोड्यामागे उभा ठेवला. ते म्हणाले ''आता त्या खडूवर उभ्या रहा.'' त्यांनी कठोर आवाजातच मला सांगितले. ''खडू फुटता कामा नये, आडवा पडता कामा नये.'' मला प्रश्नच पडला, शेवटी मी हताश होऊन गंगा–यमुनांत वाहू लागले. तेव्हा ते म्हणाले ''अहो, हलक्या पायांनी

पळायला शिकायला हवं तुम्ही. रडतां काय, एक पळू तरी नका नाहीतर अलगद पायांनी धावा.''

प्रस्तुत लेखामध्ये मार्मिक बोलणारे वा. म. जोशी जसे दिसतात. तसेच निरागस व्यक्तिमत्त्वाचे दर्शनही आपणास घडते. त्यांच्या साहित्याला पारितोषिक मिळाल्यानंतर लहान मुलाप्रमाणे आनंद व्यक्त करणारे. या प्रसंगी आपली पत्नी असती तरी या उद्‌गाराने त्यांच्यातील कुटुंबवत्सल, प्रेमळ, व्यक्तिमत्त्वाचे दर्शनही घडते. या प्रसंगी त्या लिहितात, ''निरागसता तात्यांच्या वृत्तीचा साधेपणा किंबहुना मुलासारखा निरागसपणा हाही आम्ही अनुभवला आहे. नीतिशास्त्रप्रवेशाला बक्षीस मिळाले तेव्हा तात्यांनी आम्हाला वर्गात ही गोष्ट कशी सांगितली ते अजूनही मला आठवते. त्या दिवशी वर्गावर आले तेव्हा तात्या विशेष खुशीत होते. ते कोकिळकूजन कविता शिकवू लागले. ''कोकिळेच्या कूजनाने कवीला कसा आनंद झाला?'' असा प्रश्न विचारून स्वतःच हसू लागले आणि म्हणाले ''मला झालाय तसा.'' आम्ही उत्सुकतेने ऐकू लागलो. ''अहो, आज माझ्या नीतिशास्त्रप्रवेशाबद्दल मला पारितोषक मिळालं आहे. चला, बरं झालं.'' म्हणून थोडंसं चोरटं पण लहान मुलांना साजेलसं हसू ते हसले आणि म्हणाले ''अहो, बरं वाटतं. तुम्हालापण बक्षीस मिळालं म्हणजे वाटतं, तसंच आम्हाला.''

त्यानंतर रागिणीबद्दलही कित्येक वेळा निरागसपणे ते बोलत. पण त्यांच्या बोलण्यात कधीही आढ्यता किंवा मीच काय तो 'निर्वीर्य मूर्वीतलम्' करणारा साहित्यिक असा गर्व दिसला नाही. अगदी घरच्या माणसांना आपण आपले कौतुक जितक्या सद्‌भावनेने व सहजपणे सांगतो तसेच ते सांगत.

गोव्याच्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांना निवडलें, तेव्हाही आम्ही याच वृत्तीचा अनुभव घेतला. गोव्याला तात्यांची मिरवणूक काढली होती. मोठीच मिरवणूक होती ती. आम्ही तात्यांचे कौतुक पाहायला गेलो होतो. त्या मिरवणुकीतही तात्यांच्या कपड्यांचा साधेपणा उठून दिसत होता. तात्यांची द्विधा वृत्तीही त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. जणू एका डोळ्याने ते हसत होते आणि एका डोळ्याने रडत होते. त्या वेळी तात्यांच्या जवळच आम्ही होतो. ते गहिवरून म्हणाले ''आज 'ही' हवी होती. उगीचच वाटतं आपलं. अहो आपलं कौतुक होत असताना अत्यंत जवळचे माणूसच पहिल्यांदा आठवतं आपल्याला.'' अस म्हणून ते हसले! मनमोकळेपणाने आनंद, दुःख व्यक्त करण्यात त्यांच्या साध्या वृत्तीचाच विशेष प्रत्यय येत होता.

मृत पत्नीच्या आठवणीने तात्या गहिवरले नि पुन: क्षणात हसून बोलले; पण त्या रडण्या–हसण्याने आम्हा सर्वांची अवस्था मोठी चमत्कारिक झाली. तात्यांनी आपले दु:ख आमच्याजवळ बोलून दाखवल्यामुळे आम्हाला तात्यांच्याबद्दल वाटत असलेली पितृतुल्य भावना आणखीच बळावली. ते आम्हाला जवळचे वाटू लागले.''[२०] उपरोक्त संदर्भावरून वा. म. जोशी यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे बारकावे लेखिकेने टिपले आहेत.

नवशक्तीकार प्रभाकर पाध्ये यांनी 'सानेगुरुजी आणि वामन मल्हार' (१५ ऑगस्ट १९५०) हा तुलनात्मक लेख लिहून वामन मल्हार आणि सानेगुरुजी यांच्या जीवनातील काही महत्त्वाच्या घडामोडींशी व साहित्याशी संबंधित माहिती या लेखात अधोरेखित केली. प्रभाकर पाध्ये म्हणतात, ''वामन मल्हार आणि सानेगुरुजी यांनी जन्मभर सौजन्याची उपासना केली. हे त्यांच्या जीवनातले एक साम्यस्थळ मला दिसते. सौजन्य हे वामनरावांचे थोर ध्येय होते; तर सानेगुरुजी हे साक्षात सौजन्य मूर्तीच होते.''[२१] या दोघांनाही फुलांचे आणि मुलांचे वेड होते, दोघांच्याही वागण्यातून समाजाबद्दल तळमळ व्यक्त झाली आहे. वामनराव हे विचारवंत होते. गुरुजींच्या वागण्यात सामाजिक व्यवस्थेचे तत्त्वज्ञान आहे. दोघांच्याही जीवनात प्रेम हे सूत्र होते. आईच्या सहवासामुळे गुरुजींच्या आयुष्याला वेगळे वळण मिळाले होते. परमेश्वर भेदभाव मानत नाही तर आपण का? हा विचार त्यांच्या आईने त्यांना शिकविले. त्याच्या साहित्यातून समाजाच्या प्रति असणारी भावना व्यक्त होते. वामनराव विद्वान विचारवंत होते, तर गुरुजी भावकवी होते. गुरुजींच्या गोष्टीरूप वाङ्मयातून व सुंदर पत्रांतून आपल्याला निसर्ग, मानवी जीवनातील प्रगती आणि मांगल्याच्या अनेक प्रश्नांचा विचार दिसून येतो. जगन्नाथ पंडित, वामन, वर्डस्वर्थ, बेंद्रे या कवींचा परिचय व पैगंबर, बुद्ध, श्रीकृष्ण यांच्या कथा येतात. असे जरी असले तरीही गुरुजींच्या वागण्यातून व वाङ्मयातून आपल्याला निष्ठा या गुणांचा समावेश झालेला दिसून येतो. म्हणूनच १९२० नंतरच्या साहित्यातील निष्ठा या गुणाचे गुरुजींनी पुनरुज्जीवन घडवून आणले.

महर्षी टॉलस्टॉय यांच्या 'जीवनाचा वेध व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन' (२६ ऑगस्ट १९५०) या चरित्रातून टॉलस्टॉय व रस्कीन यांच्या विचारांचा खोल ठसा महात्मा गांधीजींच्या जीवनावर होता. म्हणूनच महात्मा गांधीनी आफ्रिकेतील आपल्या आश्रमाला 'टॉलस्टॉय' यांचे नाव दिले. टॉलस्टॉयचा जीवनसिद्धान्त रशियात आणणे शक्य झाले नाही.

पण महात्मा गांधीजींनी त्यांचा विचार आचरणात आणला. याचा विशेष आनंद टॉलस्टॉयला होतो. टॉलस्टॉय हा एका जमीनदाराचा मुलगा. आईच्या निधनानंतर त्यांच्या आत्याने त्याचा सांभाळ केला. ते विद्वान होते. त्यांना पाच भाषा अवगत होत्या. ''मनुष्यजीवनाचे मोल तो किती त्यागी व किती प्रेमळ बनला यावरच ठरते. मी हे वैराग्यांफकिरांपासून शिकलो–'' असे टॉलस्टॉय म्हणतात. शालेय जीवनात त्यांना विशेष रस नव्हता. पण त्यांनी घरी बसून कायदा, वैद्यक, भाषा, शेती, विज्ञान, इतिहास, भूगोल, गायन, गणित, चित्रकला इ. विषयांचा अभ्यास केला. त्यांच्यावर रुसोच्या विचारांचा प्रभाव असून वडिलांच्या मृत्यूनंतर इस्टेटीची व्यवस्था टॉलस्टॉयवर आली. त्याने 'कंटेंपररी' हे मासिक सुरू केले. फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मन या ठिकाणच्या प्रवासातून त्यांना सत्य परिस्थितीची जाणीव झाली. पण देशाच्या विकासात शिक्षण महत्त्वाचे आहे, हे लक्षात घेऊन आजची परिस्थिती बदलावयाची तर शिक्षण बदलले पाहिजे, असे त्यांचे मत होते. या संदर्भात ते लिहितात, ''फ्रान्समध्ये क्रांती झाली होती. तेथे लोकांना गिलोटीनवर घालून मारीत. परंतु त्याविरुद्ध बोलण्याची कोणाची प्रज्ञा नव्हती. टॉलस्टॉय यांनी ते यंत्र पाहून म्हणाले, ''हे आसुरी कृत्य संस्कृतीला संमत होऊ शकत नाही.'' फ्रान्समधून ते स्वित्झर्लंडमध्ये गेले. तेथल्या सृष्टिसौंदर्याने ते मोहून गेले. एका ठिकाणी त्यांना एक सतार वाजविणारा भिकारी भेटला. तो जणू आपले सर्वस्व ओतून सतार वाजवी. टॉलस्टॉयच्या मनात आले ''आपल्या संपत्तीपैकी एक कोट्यांश हिस्सा भिकाऱ्याला देणारा दानी खरा सुसंस्कृत की लोकरंजनासाठी आपले सर्वस्व देणारा भिकारी अधिक सुसंस्कृत? आपणाकडून कोणी काही नेल्यास पर्वा न करणे हा स्वार्थत्याग नव्हे. दुसऱ्यासाठी श्रम करीत राहून, दुसऱ्यांच्या गरजा कशा पार पाडता येतील, याचा विचार करणे हा खरा स्वार्थत्याग.'' टॉलस्टॉय पुढे जर्मनीत गेले. तेथल्या शिक्षण संस्थांचा व विद्यार्थिजीवनाचा त्यांनी अभ्यास केला. राजस्तुती, छडीचे फटके, घोकंपट्टी आणि पक्षपात झाल्यासारखी मुले म्हणजे शाळा. असे त्या वेळच्या शाळांचे स्वरूप असे. टॉलस्टॉयना असे आढळून आले, की आजची परिस्थिती बदलावयाची तर शिक्षण बदलले पाहिजे. ते शिक्षणाबद्दल विचार करू लागले, युरोपच्या प्रवासांतून परतल्यावर त्यांनी आपल्या शिक्षणविषयक विचारांचा प्रचार करण्यासाठी ''यासयाना'' म्हणून मासिक सुरू केले. गावातली बंद पडलेली शाळा त्यांनी सुरू केली. ते म्हणतात ''सृष्टीत जी विषमता दिसते ती मोडून टाकण्याची इच्छा मानवांत आहे. या इच्छाशक्तीला अनुसरून जे मानसिक कार्यांचे वळण

लावावयाचे त्यांचे नाव शिक्षण, मुलांना स्वत: विचार करावयास लावून त्यांची विचारशक्ती जागृत करणे इतकेच शिक्षकांचे कार्य आहे. अर्ध्या कच्च्या भाराभर गोष्टी विद्यार्थ्यांच्या डोक्यात कोंबणे हे शिक्षण नव्हे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हवे. मार चुकविणे, बक्षिसे मिळविणे, चढाओढ करणे, चरितार्थ चालविणे हा शिक्षणाचा उद्देश नाही.'' परीक्षांबद्दल ते म्हणतात ''परीक्षा म्हणजे परीक्षकांचा अरेरावपणा आणि विद्यार्थ्यांमध्ये फसवाफसवीच्या दुर्गुणांचे बीजारोपण करणे.'' उपरोक्त संदर्भावरून टॉलस्टॉय यांचे शिक्षणाच्या विचार आणि तत्कालीन शिक्षणपद्धती, परीक्षापद्धतीच्या विषयावर ते चर्चा करत. याच लेखात ते पुढे लिहितात–

शिक्षणविषयक विचार–टॉलस्टॉय यांची शिक्षणाबद्दलची सर्वच मते क्रांतिकारक होती. आजच्या शिक्षणशास्त्राने त्यापैकी पुष्कळशी मान्यही केली आहेत. शिक्षणाची खरी जागा कोणती हे सांगताना ते म्हणतात, ''मुलगा घरी प्रसन्न, खेळकर, आनंदी असतो. पण शाळेत दुर्मुखलेला दिसतो. ब्राह्मणशक्ती जागी करणे हे शिक्षणाचे कार्य आहे. कारण ग्रहणशक्ती जागी असेल तरच तो ज्ञानसंपादन करू शकेल, शाळेत मुलांचे हसणे, खेळणे, त्यांची आनंदी वृत्ती घालविणे ही घोडचूक आहे. खिन्न, उदासीन विद्यार्थी ज्ञान ग्रहण काय करणार? मुलांच्या मनावर बाह्य दडपण नसेल. त्यांची मने मोकळी असतील. तरच ते ज्ञानग्रहण करू शकतील. शाळागृह म्हणजे मुलांच्या छळाची जागा. हे त्यांचे स्वरूप बदलल्यावाचून खरे शिक्षण कोठले? असे ते म्हणत. पुढे आपले विचार मांडताना ते म्हणतात, ''मुलांची आनंदी वृत्ती सतत टिकेल असे वातावरण नेहमी शाळेत असले पाहिजे.'' टॉलस्टॉयना वसतिगृह असलेल्या शाळा आवडत., शिक्षण मुलाच्या जन्मापासून सुरू होते. असे सतत चालणारे जे शिक्षण त्याकडे बेफिकिरीने दुर्लक्ष करून ५–६ तास विद्यार्थ्यांला एके ठिकाणी डांबून ठेवणाऱ्या घरांना ते शाळा म्हणावयाला तयार नसत. शिक्षण ठोकळेबाज नसावे असे त्यांना वाटे. जीवन नित्यप्रवाही असल्याने शिक्षणाचे नित्यप्रयोग चालले पाहिजेत, असे त्यांना वाटे. टॉलस्टॉय हे विचार आपल्या मासिकांतून प्रसृत करीत होते, त्याचबरोबर त्यांनी आपले विचार प्रत्यक्ष अमलात आणण्यासाठी शाळा काढली. त्यांच्या शाळेची विद्यार्थ्यांना फार गोडी लागली. मुलांना बसण्याचे स्वातंत्र्य तेथे असे. यामुळे त्याची एकाग्रता अधिक असल्याचे त्यांना आढळून आले. शेतकामाच्या वेळी ते मुलांना सुट्टी देत, मुलांबरोबर सहली काढीत, खेळ खेळत. मुलांना नव्या तऱ्हेने व्याकरण

शिकवीत, मुलांचे हस्ताक्षर सुधारण्याचे त्यांचे प्रयोग चालत. इतिहास गोष्टी रूपाने ते शिकवीत.''[२२]

उपरोक्त संदर्भावरून आपण शिक्षणाची पद्धती बदलली पाहिजे. शिक्षणात प्रयोगशीलता आणून सकारात्मक बदल घडवून आणावेत, असे त्यांना वाटते. शिक्षण ही अखंड प्रक्रिया असून, त्यांची आवड उपजत जर जोपासली, तर नक्कीच बदल घडतील. यावर त्यांचा विश्वास होता. याप्रसंगी आपणास रवींद्रनाथ टागोर यांच्या निसर्गाच्या सान्निध्यातील शांतिनिकेतनची नक्कीच आठवण येते. टॉलस्टॉय व रवींद्रनाथ टागोर यांच्या विचारांतील शिक्षणपद्धती समाजपरिवर्तनासाठी आवश्यक आहे असे वाटते.

तर 'गुरुजींच्या मृत्यूने निर्माण केलेला प्रश्न' (९ सप्टेंबर १९५०) या विषयावर प्रभाकर पाध्ये यांनी लेखात सानेगुरुजींच्या आत्मदानाने महाराष्ट्रात वैचारिक मंथन सुरू झाले. वास्तविक हे घडणे स्वाभाविकच आहे. याबद्दल अनेक वृत्तपत्रात लेख प्रकाशित झाले. नवशक्तीचे संपादक प्रभाकर पाध्ये यांनी या विषयावर विवेचन करून सानेगुरुजींचे आत्मदान व त्या संदर्भामध्ये विविध जाणकरांचे, अभ्यासकांच्या मतांच्या अनुषंगाने केलेले विवेचन आले आहे. यातून त्यांची भाषा, या प्रश्नांचा आढावा घेण्याची शैली वाचकांना अंतर्मुख करते.

'भलाईचे वतनदार–महर्षी सेनापती बापट' (११ नोव्हेंबर १९५०) यांच्या जीवनावर यदुनाथ थत्ते प्रकाश टाकतात. सामाजिक, आर्थिक, राजकीय अन्यायाला विरोध करणारे सेनापती बापट वेळ प्रसंगी समाजासाठी शासकीय यंत्रणेला जाब विचारतात, जनसमूहाबरोबर किंवा एकट्यानेच समाजसेवेचे व्रत घेतलेले निष्पाप, निरागस, प्रेमळ, प्रसंगी आक्रमक स्वरूप धारण करणारे सेनापती बापट यांचे व्यक्तिचरित्र यदुनाथ थत्ते यांनी स्वानुभवातून मांडले आहे. सन १९४७ साली नगर जिल्ह्यात दुष्काळ पडलेला होता. कर्जत, श्रीगोंदे येथे दुष्काळी काम सुरू होते. पारनेर तालुक्यात दुष्काळ पडतो. तेव्हा जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून दुष्काळी कामाची सुरुवात करतात. कोणीही रोजगार हमीच्या कामावर येत नाही. त्याप्रसंगी सेनापती स्वतःपासून कामाला सुरुवात करतात. स्त्री–पुरुष समानता हे तत्त्व ते स्वतःच्या जीवनात आचरणात आणतात. या संदर्भात ते आपल्या सुविद्य पत्नीला लिहिलेल्या पत्रात लिहितात. अज्ञातवासात असताना त्यांनी आपल्या पत्नीला व मित्राला लिहिलेले पत्र म्हणता येईल. त्यांनी आपल्या पत्नीला विवाह करण्याची परवानगी दिली होती व मित्राला त्याबद्दल कळविले होते.

दुसऱ्याचा विचार जो आपल्या इतक्याच सहृदयतेने करतो तो सर्वांत सुसंस्कृत होय ही दृष्टी सेनापतींच्या ठायी आहे व हेच त्यांचे वैशिष्ट्य.[२३]

या ठिकाणी महात्मा फुले यांच्या विचारांची आठवण होते. इतकेच नाही तर सदैव दीनदलितांच्या सेवेसाठी झटणारे सेनापती या लेखात आपल्या भेटीला येतात. हैदराबाद सत्याग्रह, कामगारांचा संप, भंग्यांचा संप, मुळशी सत्याग्रहाचे नेतृत्व करणारे सेनापती आहेत. सानेगुरुजींना मदत करणाऱ्या यदुनाथ थत्ते यांना सेनापती म्हणाले, ''तू आलास. फार चांगले झाले. गुरुजींना मदत होईल. पण पुन्हा पळून जाऊ नकोस. प्रोफेसर आपल्याला नको आहेत, तू तिकडे जाऊ नकोस. आपल्याला ॲक्शनिस्ट–कृतिवीर हवे आहेत.'' यातून त्यांचा जीवनाकडे व चळवळींकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिसून येतो.

शशिकांत कडकीआ यांनी 'मानवतेचा नंदादीप : सानेगुरुजी' (२३ डिसेंबर १९५०) या चरित्रात कवी, कथाकार, कीर्तनकार, व्याख्याता, तत्त्वज्ञानी, भक्त, सैनिक, सेवक, कार्यकर्ता अशा विविध भूमिका जगणाऱ्या सानेगुरुजींच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. शिरूभाऊ लिमये, नानासाहेब गोरे व सानेगुरुजी यांच्या सहवासात सानेगुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाच्या भावलेल्या क्षणांचे चित्रण आणि अस्वस्थता यावरून लक्षात येते ते लिहितात,

''सानेगुरुजीदेखील अशाच प्रकारच्या उदात्त भावनेचा उद्रेक आणि अस्वस्थता घेऊन जन्मले असे वाटे. त्यांच्या अंतरंगाचे ते एक अविभाज्य अंग होते. जगात कुठेही अन्याय होवो त्याचा त्यांच्यावर इतका पटकन परिणाम होत असे की, त्या आवेशात कित्येक वेळी ते उपवासाचा व आत्महत्येचा विचार करून जवळच्या लोकांना व्याकूळ करीत. थेट नाशिकपासून मी हे पाहत आलो आहे. मनुष्य मनुष्यावर अन्याय करतो. ही कल्पनाच त्यांना असह्य वाटे. अन्यायी सत्तेच्या राज्यात सज्जन मनुष्याच्या योग्य एकमात्र जागा म्हणजे जेल असे थोरो म्हणे. त्याचप्रमाणे गुरुजीही असेच मानीत असावेत की जगात अन्यायाचे कायमचे निवारण शक्य नाही; सज्जन माणसाने दुष्टतेविरुद्ध झगडत झगडत, लढत लढत, अखेर मेलेच पाहिजे. मनुष्यावर मनुष्याकडून होणाऱ्या अन्यायाला असलेला आपला विरोध दाखविण्याचे एक प्रामाणिक साधन म्हणजे मरून जाणे असा ध्वनी त्यांच्या लिहिण्या–बोलण्यांतून कित्येक वेळी निघे. अशाप्रकारे ही नियतीची अनिद्रा तुसांत धुमसणाऱ्या अग्निप्रमाणे त्यांना जाळीत होती.

शेवटी ह्या अनिद्रेतून सुटका करून घेण्यासाठी चिरनिद्रेचे औषध नियतीने त्यांच्या हाती दिले.''[२४]

उपरोक्त संदर्भावरून समाजातील अन्याय त्यांना असह्य झाला होता. अन्यायाला प्रतिकार करण्यापेक्षा ते जीवन संपविण्याचा विचार करतात. सानेगुरुजींनी आत्महत्या का केली, याचे उत्तर या लेखात सापडते. पण सानेगुरुजी मातृप्रेमी, संवेदनशीलही होते याचे चित्रण 'शिशीफूल तोडू नये. जगाला परिमल द्यावा, क्षणिक जीवनातील सुगंध आणि सौंदर्य यांचे दर्शन घ्यावे. यासाठी फुलाचा जन्म असतो. क्षणजीवी परंतु समर्थ आणि स्वतंत्र' यातून मानवी जीवनातील क्षणभंगूरतादेखील ते व्यक्त करतात. या लेखातून आपल्याला सानेगुरुजींच्या ठायी नम्रता, निरंहकारी वृत्ती, सेवावृत्ती, त्यागी व स्त्री–स्वभावातील कोमलता, संवेदनशील व्यक्तिमत्त्वाचे अनेक पदर लेखकाने उलगडून दाखविले आहेत.

'गुरुजींच्या साहित्याची आंतरिक प्रवृत्ती' हा लेख प्रभाकर पाध्ये यांचा दिनांक ११ जून १९५१ च्या 'साधना' साप्ताहिकात आहे. या लेखात ते गुरुजींच्या साहित्यात समग्र जीवनदर्शन नसून फक्त सत्त्वशील व साधक जीवनावर भर असल्याने ते गांधीवादी वाङ्मय झाले आहे. पण त्यामुळे त्यांच्यात दोष आणि उणिवा निर्माण झाल्या आहेत. ते एकांगी बनले आहे. जीवनाचे अर्धसत्य त्यांनी सांगितले आहे, अशी टीका पाध्ये यांनी केली आहे. गुरुजींच्या साहित्यात प्रेम, सेवा, सहकार्य ही शिकवण दिसते. गांधीवादामागील प्रेरणा व गुरुजींच्या साहित्याची प्रेरणा एकच आहे. पण ही प्रेरणा त्यांना आईकडून मिळाली आहे. गांधीजींकडून नाही, असे स्पष्ट मत प्रभाकर पाध्ये यांनी मांडले आहे.

तर शं. द. जावडेकर अर्थशास्त्रज्ञ म्हणून 'लॉर्ड केन्स यांचे चरित्र आणि कार्य' (१ मार्च १९५२) या लेखात व्यक्तिवादी संस्कृती व अर्थशास्त्राचा पुरस्कार करणाऱ्या प्रागतिक पक्षाच्या लॉर्ड केन्स यांनी पहिल्या महायुद्धापूर्वीच्या काळात बुद्धिवादाने न सुटणाऱ्या समस्या मानवी संस्कृतीपुढे निर्माण झाल्या आहेत. हे सांगून उत्पादनवाढीची जबाबदारी सरकारने आपल्या शिरावर घेऊन नियंत्रण व नियोजन करण्याची गरज लॉर्ड केन्स यांनी व्यक्त केली.

आचार्य स. ज. भागवत यांनी 'आचार्य दादा धर्माधिकारी : व्यक्ती व विचार' (१४ फेब्रुवारी १९५३) या विषयावरील लेखामध्ये आचार्य दादा धर्माधिकारी यांचा परिचय करून दिला. महाराष्ट्रीय लोकांना 'साधना', मौज, सत्यकथा या नियतकालिकांतून आचार्य दादा

धर्माधिकारी यांचा परिचय झालेला असून, 'आपल्या गणराज्याची घडण' ही आचार्य धर्माधिकारी यांची राजकीय पत्रे, तर श्री. श्रीपाद जोशी यांनी संपादित केलेल्या 'स्नेहाचे झरे' या पुस्तकात दादांची काही खासगी पत्रे आहेत. या संग्रहात दादांनी जे निवेदन जोडले आहे, त्यात बालपणापासून पत्रलेखनाचा छंद कसा जडला याची माहिती दिली आहे. मुळातच हिंदी भाषिक असणारे दादा धर्माधिकारी मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवितात. गांधीजींच्या असहकारितेच्या चळवळीत ते दाखल होतात. नागपूर राष्ट्रीय पाठशाळेत शिक्षणाचे कार्य करतात. श्री. जमनालाल बजाज यांच्या आग्रहावरून ते वर्ध्याला येतात आणि गांधी सेवासंघाच्या 'सर्वोदय' या हिंदी मासिकाचे ते संपादक होतात. आचार्य दादा धर्माधिकारी यांच्यासंदर्भात आचार्य स. ज. भागवत लिहितात, ''अहंकारी नेतृत्व सामाजिक जीवनाचा अंती विनाश करणारे असले, तरी सामाजिक समस्या सोडविण्याचे चिंतन करणाऱ्या प्रतिभाशाली विचारकांची समाजाला नेहमीच गरज असते. त्यासाठी निरपेक्ष प्रेम एवढी एकच गोष्ट सत्यशोधनाला पुरी पडत नाही. सामाजिक जीवनाशी उत्कटतेने समरस होण्याची आणखी एक शक्ती आवश्यक असते. निरपेक्ष मानवप्रेम आणि अखिल मानवजीवनाशी प्रत्यक्ष समरस बनण्याची पात्रता या दोन्ही शक्तींनी समक्ष असलेला पुरुषच जीवनात नवीन नवीन सत्यांचा साक्षात्कार घेऊ शकतो. अशा पुरुषाच्या साक्षात्कारातून जीवनाला अभिनव विचार प्राप्त होतात. महात्मा गांधी हे या कोटीतील पुरुष होते. आजच्या समाजात विनोबाजींनी काही अंशी असे कार्य चालविले आहे. दादा या कोटीतील पुरुष नव्हेत; आणि दादांना त्याची चांगली जाणीवही आहे.''[२५]

उपरोक्त संदर्भावरून दादा धर्माधिकारी यांच्या विचाराची समाजाला आवश्यकता आहे. त्यांचे समाजावर निरपेक्ष प्रेम असून सामाजिक भान होते याची जाणीव करून दिली आहे.

'वीर बापूराव गायधनी' (२१ एप्रिल १९५३) हा चरित्रात्मक लेख रामचंद्र ढेरे यांनी लिहिला आहे. या लेखात वीर बापूराव गायधनींचे जीवन स्फूर्तिदायी असून, एक सामान्य माणूस परहिताच्या तळमळीने केवढा पुरुषार्थ गाजवतो आणि अखेर आपल्या सर्वस्वाचा होम करतो. हे आपल्याला वीर बापूरावांच्या या चरित्रात पाहावयास मिळते. त्यांचा जन्म १९०१ साली नाशिकमध्ये एका धार्मिक वृत्तीच्या ब्राह्मण घराण्यात झाला. त्याचे मूळ नाव पुरुषोत्तम केशव गायधनी, तालमीत व्यायाम करणे आणि पोहणे हा त्यांचा छंद होता. बापूरावांना

दुसऱ्यांना सहाय्य करणे, संकटात सापडलेल्यांना वाचवणे यांत आनंद वाटे. त्यांचा संस्कृत भाषा व धर्मग्रंथांचा अभ्यास होता. साधुसंतांची वृत्ती त्यांच्या ठायी असून दुःखाचे व संकटाचे निवारण करणे, हाच त्यांचा धर्म बनला होता. त्यांच्या वडिलांच्या निधनानंतर संसाराची जबाबदारी बापूरावांवर पडली. त्यांची आई पार्वतीबाई धीराची व सहनशील होती. त्यांच्या आईचे योगदान त्यांच्या प्रापंचिक जीवनात होते.

बापूराव स्वयंसेवक होते. टिळकांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधींनी सुरू केलेल्या चळवळीत बापूरावांनी नाशिक येथे खादी प्रसाराचे काम अंगावर घेतले. खादी विक्रीचे पहिले केंद्र नाशिकमध्ये त्यांचे घर बनले. बापूराव खादी विकू लागले. समाजात, देशाच्या हितासाठी कोणत्याही कार्यात ते स्वयंसेवक होते. समाजाबद्दलची निष्ठा, तत्परता त्यांच्यापाशी होती. स्वराज्याच्या चळवळीत महात्माजींच्या आदेशानुसार बापूरावांनी परदेशी कापड व साखर यांचा त्याग करण्याचे व्रत स्वेच्छेने पत्करले होते.

संकटकाळी धावून आणि संकटात सापडलेल्याना वाचवीत अशा वेळी त्यांच्या मनात जनावर की माणूस, शत्रू की मित्र, हिंदू की मुसलमान अशा भेदभावांची कल्पनाही उद्‌भवत नसे. त्रिंबक दरवाजाला लागलेल्या प्रचंड आगीत घुसून अनेकांचे प्राण आणि सामान आगीतून वाचवले. इतरांच्या मुखावर उजळणाऱ्या आनंदात त्यांनी स्वतःचे सुख अनुभवले.

त्यांच्या जीवनातला अखेरचा प्रसंग तर अत्यंत रोमांचकारी असा होता. नाशिकमध्ये एका दुमजली घराला आग लागली. तळमजल्यात गुरे बांधलेली होती आणि तेथे गवताचा साठा होता. तळमजल्याच्या माजघरात व माडीवरही माणसे झोपलेली होती. गवताच्या साठ्यामुळे आग भडकली. घरातील माणसे आरडाओरडा करीत बाहेर पडली. परंतु दुसऱ्या मजल्यावर दोन मुले व एक म्हातारी अडकली. पण वर अडकलेल्यांना काढण्यासाठी कोणी तयार होत नव्हते. बापूराव तिथे आले आणि आगीत घुसले. बापूरावांनी भयभीत झालेल्या मुलांना आधी त्या आगीतून बाहेर काढले. पुन्हा म्हातारीस बाहेर काढले. आग वाढतच होती. बापूराव पुन्हा आत घुसले, आत जाऊ नका म्हणून माणसे ओरडू लागली. परंतु गाईचा करुण हंबरडा स्वस्थ राहू देईना. गाईंची दावी सोडवू लागले. या सर्व प्रयत्नांत बापूरावांच्या हाताची, पायांची, पाठीची, तोंडाची कातडी होरपळून जाऊ लागली. त्यांना स्वतःची पर्वाच राहिलेली नव्हती, गाईंना सोडवून ते बाहेर पडले होते. तेव्हा त्यांचे सर्व अंग जळून काळे ठिक्कर पडले होते. बाहेर येताच

ते बेशुद्ध पडले होते. लगेच त्यांना हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. त्यांचे बंधू डॉ. गायधनी यांनी ड्रेसिंग केले. ड्रेसिंगसाठी १० वार कापड लागले. बापूराव अशा अवस्थेत सात दिवस होते.

दिनांक ११ एप्रिल १९३१ या दिवशी दुपारी १२ च्या सुमारास हा वीरपुरूष मरण पावला. एवढे दिव्यमरण पत्करणाऱ्या या वीराचा गौरव करताना महात्माजींनी 'यंग इंडिया'त लिहिले, ''वीर बापूराव गायधनी आपल्या दिव्य मरणाने चिरंजीव झाले आहेत.'' दर वर्षी बापूरावांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्यासारखे परजीवित रक्षणासाठी स्वतःचे प्राण धोक्यात घालणारे जे कोणी साहसी वीर असतील त्यांचा गौरव करण्याची प्रथा सुरू केली.

तर राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांची भारतीय गणराज्याचे पहिले राष्ट्रपती म्हणून नेमणूक करण्यात आली. राजेंद्रप्रसाद हे भारतातील सर्वोच्च पदावर विराजमान असले, तरी त्यांचा वाढदिवस अत्यंत साध्या पद्धतीने साजरा करीत होते. त्यांना कोणत्याच कार्याचा मोठेपणा आवडत नसे. त्यांच्या अंगी अनेक सद्‌गुण होते. पण त्यातील सर्वांत मोठा गुण म्हणजे सरळपणा आणि नम्रता हा होय.

राजेंद्रप्रसादांचे पूर्ण नाव काय आहे हेसुद्धा आपल्यापैकी अनेकांना माहिती नाही. त्यांचे नाव राजेंद्रप्रसाद आहे आणि आडनाव श्रीवास्तव आहे. कोणी तरी एकदा राजेंद्रप्रसादांचे वर्णन करण्यास सांगितले सौ. सरोजिनी नायडू म्हणाल्या, ''जर तुम्ही मला सोन्याचा टाक मधाच्या शाईत बुडवून द्याल, तरच मला राजेंद्रप्रसादांचे यथायोग्य वर्णन करता येईल. ते स्वभावाने मृदू असून त्यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक आहे. ''

त्याचा दिनांक ३ डिसेंबर १८८४ ला बिहार येथे जन्म झाला. त्यांचे शिक्षण बी. ए., एलएल. एम. झाले होते. भारत प्रजासत्ताक झाल्यानंतर १९५० मध्ये भारताचे पहिले राष्ट्राध्यक्ष होण्याचा मानही त्यांनाच मिळाला. अगदी एकमताने त्यांची निवड राष्ट्राध्यक्षपदासाठी झाली. राजेंद्रप्रसादांचे वाचन प्रगाढ होते. ते अत्यंत अभ्यासू होते. त्यांनी १४ ग्रंथ लिहिले होते. त्यातली विशेष प्रसिद्ध पुस्तके म्हणजे 'इंडिया डिव्हायडेड' व 'बापू के कदमों में' हे होते. त्यांचे जीवन संथ, निर्मळ व परिपूर्ण असे होते. त्यांचे जीवन नगाऱ्यासारखे नसून ते सनईसारखे मृदू, मधुर होते. त्यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर काही काळ प्राध्यापकी, वकिलीनंतर देशसेवा व्रत अंगीकारले होते. दुष्काळग्रस्त भागातील लोकांना त्यांनी मदत केली होती. त्यामुळे देशभर प्रसिद्धी मिळाली. पुढे काँग्रेसमध्ये प्रवेश करून भारताचे राष्ट्राध्यक्ष झाले. त्यांचे प्रभावशाली

नेतृत्व होते. प्रस्तुत चरित्रात लेखक राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद श्रीवास्तव यांच्या शैक्षणिक, व्यावसायिक व काँग्रेस पक्षातील सहभाग यांच्याविषयी माहिती असून, ते भारताच्या राष्ट्रपती पदावर विराजमान होण्यास त्यांच्या कारकिर्दीचा मोठा भाग होता हे स्पष्ट करतात.

'रे. नारायण वामन टिळक' (५ डिसेंबर १९५३) यांच्या जीवनाचा वेध अशोक टिळक यांनी घेतला असून, एक कवी म्हणून रे. नारायण वामन टिळक यांची जडणघडण, कौटुंबिक वातावरण, शिक्षण, धर्मांतर आणि बालकांसाठी कविता लिहिणारे फुलामुलांचे कवी अशी ओळख आपल्याला या लेखातून होते. त्यांच्या जडणघडणीत आजोबा आणि आई यांच्या विचारांचा प्रभाव होता. जुन्या विचारांना सोडून नवीन विचार स्वीकारण्याची दृष्टी या लेखात दिसून येते. वडिलांचे नावडते, पण आईचे मुलावर निरातिशय प्रेम. त्यांची आई साक्षर होती. त्या कविता लिहीत. वडिलांना हे मुळीच पटत नव्हते. त्यांच्या आईच्या कवितेच्या दोनच ओळी उपलब्ध आहेत. त्यावरून जानकीबाईंच्या (अर्थात टिळकांच्या आईच्या) प्रतिभेची ओळख आपल्याला होते. त्या लिहितात,

''ही चिंधीची अल्प बाहुली प्रताप हीचा महा
बालपणापासूनी मुलींना शिकवी संसार हा''

मुलाचा लाड करते म्हणून वामनराव पत्नीचा छळ करीत. काव्याची गोडी टिळकांना आईमुळेच लागली. आईच्या अपघाती मृत्यूने ते घर सोडून नाशकाला निघून गेले. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी इंग्रजी डिक्शनरीचे पाठांतर केले, तर वक्तृत्त्व अंगी बाणण्यासाठी वर्क, मिल या थोर विचारवंतांची भाषणे मुखोद्गत करून शेवटी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविले. त्यांनी १८९६ ते १९१० या कालावधीत 'बालबोधमेवा' या मासिकातून बालसाहित्य लेखन केले. खरे तर सानेगुरुजींसारखेच ते मुलांना गोष्टी सांगून त्यांचे प्रबोधन करीत. या संदर्भात ते लिहितात, ''सोमवारी धुणे धुते, मंगळवारी वाळवीते' अशा गीतांतून सामान्य ज्ञानाचे धडे मुलांना त्यांनी दिलेले आढळतात. मुलांचे 'बाहुल्या-साउल्यांशी' खेळ, त्यांच्या पोरकट आवडीनिवडी, खेळण्या-बागडण्याची हौस, सर्वसामान्य गोष्टीतही चमत्कार वाटण्याइतकी बालीश जिज्ञासा, हे सारे टिळकांच्या काव्यप्रतिमेचे एक विहार स्थळ तर आहेच; शिवाय तो त्यांच्या जीवनाचाही एक महत्त्वाचा भाग आहे. ''बाळकांस मजजवळ येऊ द्या. त्यांस मना करू नका, कारण स्वर्गाचें राज्य आशांचे आहे'' असे शिष्यास बजावणाऱ्या ख्रिस्ताचा सच्चा चेला

मुलांपासून फटकून वागूच शकणार नाही! पू. सानेगुरुजींप्रमाणेच टिळकांचे मुलांवर निरातिशय प्रेम असे. त्यांना गोष्टी सांगण्यात व इतर प्रकारे रमविण्यात त्यांना स्वर्गसुख वाटे. त्यांच्या जवळपास वावरलेली–आता अर्थात म्हातारी झालेली–मुले अजून आहेत आणि अजूनहि ती मोठ्या आत्मीयतेने त्यांच्या आठवणी सांगत असतात.

बाळबोधमेव्यांतून टिळकांनी मुलांसाठी गद्यलेखनही बरेच केले आहे. तसेच त्याचे कविस्नेही दत्त, केशवसुत, अनंततनय, आनंदीरमण व पुढे बालकवी यांच्याकडूनही त्यांनी शिशुकाव्ये आग्रहाने लिहून घेतली आहेत.

बालोद्यानांतील कविता आता कदाचित थोडीफार शिळी, ओल्ड फॅशन्ड वाटेलही; पण ती अर्ध्या शतकामागे लिहिली गेली आहे हे लक्षात घेता तिचे कौतुकच वाटेल, आणि टिळकांची 'फुलामुलाचं कवी' ही पदवी यथार्थ असण्याची खात्री पटेल.''[२६]

उद्याचा सक्षम, सर्वांगीण, विकासशील नागरिक घडवायचा असेल, तर त्याचे वैचारिक भरणपोषण बालपणापासून झाले पाहिजे. जन्मणाऱ्या प्रत्येक मुलात काही तरी गुणवैशिष्ट्ये असतात. त्याचा विकास मुक्तपणे झाला पाहिजे. यासाठी त्याच्या खोड्या, खेळ, त्याचे खेळणे–बागडणे, समजून घ्यायला हवे, ही जाणीव टिळकांना पुरेपूर दिसते. संस्कार पेरण्याचे, रुजविण्याचे वय लक्षात घेत टिळक आपल्या कवितेतून हे विचार मांडताना दिसतात. पुढे याचे प्रतिबिंब/हा धागा साने गुरुजींपर्यंत आलेला दिसतो. सानेगुरुजींनी यापुढे पाऊल टाकत लहान मुलांना केंद्रस्थानी मानून संस्कार करत. त्यांच्यात देशप्रेम, देशभक्ती, त्याग, समर्पण, समता, स्वातंत्र्य, बंधुभाव ही मूल्ये रुजविण्यासाठी आपल्या 'साधना' साप्ताहिकातून मुलांसाठी विशेष लेखमाला चालविली. त्याचबरोबर बालविशेषांकही प्रसिद्ध केले. ते म्हणत असत, ढासळत चाललेल्या समाज परिस्थितीला जर बदलावयाचे असेल, तर लहान मुलांवर संस्कार करणे गरजेचे आहे. आजचे मूल हे उद्याच्या देशाचा सक्षम नागरिक असतो. मोठ्या माणसाला काही सांगणे, त्याला ते पटणे आणि यानुसार त्याचे आचरण होणे. ही अवघड प्रक्रिया असते. पण त्या तुलनेत हे सोपे असते. याची जाण ठेवत सानेगुरुजींनी अखंडपणे अनेक शाळांना भेटी दिल्या. रे. ना. वा. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वातही हे पैलू दिसतात.

उपरोक्त संदर्भावरून असे निदर्शनास येते, की टिळकांचा दृष्टिकोन, त्यांची कोमल वृत्ती, एकूणच त्यांना आयुष्यात मातृप्रेम फार काळ मिळाले नाही. पण त्यांनी आपली शैशव

वृत्ती जोपासलेली दिसते. रे. ना. वा. टिळकांना आपण फुलामुलांचे कवी म्हणतो कारण टिळकांच्या कवितेत लहान मुलांचे विश्व आलेले दिसते. मुलांच्या मौजमज्जा, खेळणी, बालखेळ या विषयावर प्रकाश टाकत टिळक त्यांच्या बालमानसिकतेकडे वळतात. त्यांचे कौटुंबिक पर्यावरण तसे पोषक होते. वडिलांचा आईसोबतचा वावर, या कवीला अंतर्मुख करीत होता. यामधून हा कवी अलिप्त होत होता. त्याचे स्वत:चे चिंतन चालू असायचे. लहान–मुलांचे भावविश्व एवढं महत्त्वाचं असतं ही जाणीवच त्या काळी फारशी नव्हती. त्या काळात त्यांनी केलेले हे काम महत्त्वाचे आहे.

दिनांक १० एप्रिल १९५४ च्या 'साधना' साप्ताहिकात शं. द. जावडेकर यांनी रामभाऊ रुईकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या जहालवादी भूमिकेविषयीची मांडणी केली आहे. रामभाऊंचे कौटुंबिक जीवन, शैक्षणिक वाटचाल व देशहितासाठी सातत्याने प्रयत्न करणारे व्यक्तिमत्त्व रेखाटले आहे. जहालवादी भूमिकेकडून समाजवादी विचाराकडे त्यांची झालेली वाटचाल या लेखात अधोरेखित केली आहे.

'लिओनार्डो दा विंची' (२५ सप्टेंबर १९५४) हा रमा बखले यांचा चरित्रात्मक लेख आला आहे. ह्या चरित्रात्मक लेखात नवी कलावृत्ती, नवा संदेश नि नवे सौंदर्य असून या कलाकृतींना समजून घेणे, त्यांचा परिचय करून देणे, हे सामान्य माणसाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे. पाश्चात्त्य राष्ट्रांत अनेक चित्रकार होऊन गेले. लिओनार्डो दा विंची यापैकी चित्रकारांत अनन्यसाधारण आहे.

शिल्पकला, तत्त्वज्ञान, संगीत, प्राणिशास्त्र, खगोलशास्त्र व चित्रकला या सर्व शास्त्रात पारंगत होते. लिओनार्डोने निर्मिलेल्या कृतीपैकी फारच थोड्या कृती आज शिल्लक राहिलेल्या आहेत. लेखिका या चित्रकाराविषयी अत्यंत संवेदनशील मनाने त्यांच्याविषयीची माहिती देतात. या अद्वितीय माणसाची कृती, कीर्ती अजूनही जगात उरली आहे. लिओनार्डोचा जन्म फ्लॉरन्स शहराजवळ 'विंची' या गावी झाला. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंतचे शिक्षण वडिलांकडे झाले. अठराव्या वर्षापासून तो एका चित्रकाराच्या हाताखाली काम शिकू लागला. दोन वर्षातच लिओनार्डोने खूप प्रगती केली आणि विज्ञानाचा अभ्यास करून प्रावीण्य मिळविले. स्वत: संगीत रचून, स्वत:च तयार केलेल्या वाद्यांवर ते वाजविण्यात त्यांनी कौशल्य प्राप्त केले. ग्रह नक्षत्रांचा त्याने वेध घेतला, अंकगणित, भूमितीचा व तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला.

या चरित्रातून ज्ञान–विज्ञानाचे उपभोक्ते असणाऱ्या लिओनार्डोची प्रशंसा केली आहे. जगातील प्रख्यात अशा विद्वानाबद्दल लिहिताना त्या म्हणतात, ''त्या काळी जर छापण्याची कला अवगत असती तर लिओनार्डोच्या पुस्तकाचे वाचनालय बनले असते.'' असे इतिहासकार म्हणतात.

लिओनार्डोने जी चित्रे काढली, त्या सर्व चित्रांत 'मोनालिसा' हे चित्र सर्वांत सुंदर चित्र ठरले आहे. या चित्राने सर्व जग वेडे झाले. 'मोनालिसा' ही फ्लॉरन्समधील एका श्रीमंत गृहस्थाची बायको होती. ती चित्रात रंगविल्याप्रमाणे खरोखरच सुंदर होती.

मोनालिसाचे चित्र काढावयास लिओनार्डोला जवळजवळ चार वर्षे लागली. कुशल चित्रकाराने निर्माण केलेली ही हसतमुख कृती पाहून आज शतकानुशतके अनेक लोक वेडे झाले आहेत. जनतेची मने वेधून घेणाऱ्या चित्राचे अप्रतिमत्व त्या चित्रात प्रकट होणाऱ्या सौंदर्यातच असले पाहिजे. त्याशिवाय लिओनार्डोची ती कृती अमर समजली जाणे शक्य नाही.

या चित्रकाराच्या 'मोनालिसा' या चित्रावर लोकांनी प्रेम केले. या सुंदर चित्राचे व चित्रकाराचे इतिहासात नाव अजरामर झाले. यातून आपणास कलेवर प्रेम केले पाहिजे. हा दृष्टिकोन विकसित होतो.

श्री. शं. नवरे यांनी मौज साप्ताहिकाचे संपादक श्री. वि. पु. भागवत (१९ फेब्रुवारी १९५५) यांच्यातील माणसाचे, माणुसकीचे दर्शन घडवले. आज्ञाधारक, वृत्तपत्रातील व्यवस्थापक व कामगार यांच्यातील सौहार्दाचे चित्रण करताना संवेदनशील, हळवे पण प्रसंगी कठोर असणारे श्री. वि. पु. भागवत आपल्याला या लेखात भेटतात. 'मौज' आणि 'सत्यकथा' मासिकाचे बारा वर्षे संपादक व मुद्रक ह्या दोन्ही भूमिका त्यांनी निभावल्या. त्यांचे चुलते पांडोबा भागवत 'मौज'चे सर्वेसर्वा होते. त्यांच्या निधनानंतर १९३८ साली 'मौज'ची जबाबदारी वि. पु. भागवत यांनी स्वीकारली. अत्यंत लहान वयात आलेली जबाबदारी त्यांनी अत्यंत निष्ठेने सांभाळली. वि. पु. भागवतांनी बी.एस्सी. झाल्यावर प्रकाशन क्षेत्रात पदार्पण केले आणि अत्यंत शिताफीने भाऊबंदकी आड न आणता त्यांनी 'मौज'ला सुगीचे दिवस आणले. मौजने महाराष्ट्रात आपले नाव अजरामर केले. मालक व कामगार यांच्यातील संबंधाचे चित्रण करताना ते लिहितात, ''मुद्रण व्यवसायातील कामगारांच्या वेतनासंबंधी मुंबई सरकारने समिती नेमली आहे. त्या संबंधी मालकांची बाजू मांडली नाही? हॉटेल मालकांनी नाही का लागलीच विरोधाचे

निशाण उभारले. विष्णुपंत म्हणाले, ''आम्ही लोकांनी काळाचा प्रवाह ओळखण्यास शिकले पाहिजे. कामगारांना त्यांच्या श्रमाचा योग्य वाटा मिळालाच पाहिजे. तो तसा आम्ही देऊ तर आम्हालाही आमचा वाटा मिळाल्यावाचून राहणार नाही'' यातून कामगारांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळण्यासाठी आग्रही असणारे भागवत दिसून येतात. याच लेखात नवरे पुढे लिहितात, ''मौज' कार्यालयातील कामगार–मालक संबंध हे याचे उदाहरण होय. कार्यालयात शिरले म्हणजे मालक कोण आणि कामगार कोण, हे सांगणे कठीण जाते. इतके सर्वत्र खेळीमेळीचे वातावरण पाहावयास सापडते. कामगारांना कालाची मर्यादा तरी आहे पण मालकांना नाही. म्हणून भागवत बंधूंचा मुक्काम सकाळपासून रात्री ११–१२ वाजेपर्यंत छापखान्यातच असतो. तो स्वस्थपणाने नव्हे, तर प्रेसची विविध कामे करीत पडेल ते काम करण्याची प्रत्येकात धमक आहे. कोणी आजारी पडला, वेळेवर आला नाही, रजेवर गेला तर विष्णुपंत सांगतात– ''हरकत नाही 'मौज'चा अंक वेळेवर निघाल्यावाचून राहणार नाही. मी येथे आहेच बसलेला.'' मौजच्या कामगारांनी विष्णुपंतांचा, त्यांना मुद्रण परिषदेचे अध्यक्षपद लाभल्याबद्दल सत्कार केला. तेव्हा विष्णुपंताचे डोळे पाण्याने भरून आले. त्यांच्या तोंडातून शब्द बाहेर पडेना. अस्फुटपणे सद्‌गदित कंठाने ते म्हणाले, ''कामगारांचे हित आमच्या डोळ्यांसमोर आहे. आम्ही त्यांना विसरणार नाही. आमच्या उत्कर्षात त्यांचाही वाटा आहे.''[२७] उपरोक्त संदर्भातून वि. पु. भागवत यांच्यातील हळवा, संवेदनशील, माणुसकी जपणार संपादक आपणास भेटतो.

'सजीव व जीवरहित यांचे संबंध' या विषयावर अध्यक्षपदावरून डॉ. देवेंद्र मोहन बोस यांनी दिलेल्या व्याख्यानाचे विवेचन श्री. का. झी. पाटील यांनी केले आहे. डॉ. देवेंद्र मोहन बोस यांनी पदार्थविज्ञान विषयात एम. ए. पदवी मिळविली. गुलाम देशांतला एक शास्त्रज्ञ, पाश्चात्त्य राष्ट्रातील संशोधकांना जीवशास्त्र व इतर शास्त्र यांचे संबंध निश्चित करणारे संशोधन व चुंबक शास्त्रातही मौलिक संशोधन करून अचंबित करतात.

रामचंद्र ढेरेलिखित 'महात्मा आगरकर' (१४ जुलै १९५६) च्या अंकात गोपाळ गणेश आगरकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त लिहिलेल्या लेखात जिज्ञासू, सत्यनिष्ठ, वैयक्तिक वेदनेचा व दारिद्र्याचा, सामाजिक पातळीवरून घेतलेला वेध, विषमतेचे पोषण करणारी अंधश्रद्धा न जोपासता बुद्धिप्रामाण्यवादी, विचार अंगीकारणारे, सरकारी नोकरीचा त्याग करून

शिक्षकीपेशा स्वीकारणारे, समाजपरिवर्तनास सदैव तत्पर असणारे, पण पुण्यासारख्या शहरात या बुद्धिप्रामाण्यवादी महात्म्याची जिवंतपणी प्रेतयात्रा निघाली. अशा आगरकरांची तुलना रामचंद्र ढेरे भगवान बुद्धाशी करताना लिहितात, ''अज्ञेयवाद, आत्मप्रत्ययी दृष्टीतून दुःखनिरोधाचा वास्तव विचार, निरपेक्ष आणि निवैर मनोवृत्ती मृत्युंजयी, निर्भयता आणि मानवतेला व्यापून उरणारी करुणा याबाबतीत त्यांचे बुद्धाशी साम्य आहे. कसल्याही विरोधाची तमा न बाळगता त्यांनी स्वतःला घडलेल्या सत्यदर्शनाचे स्वरूप समाजापुढे मांडले. सत्यनिष्ठेपायी त्यांनी टिळकांसारख्या जिवाभावाच्या मित्राचा रोष पत्करला. पण सत्याच्या बाबतीत 'तडजोड' पत्करली नाही.''[२८] तर आगरकरांच्या प्रामाणिकपणाविषयी संशय व्यक्त केला म्हणून त्यांनी 'वाक्यविचार' या ग्रंथाला होळकरांनी न्यू इंग्लिश स्कूलला दिलेल्या देणगीतील चारशे रुपये आगरकरांना देण्याचे कळविले होते. तेव्हा टिळकांच्या मनात वशिलेबाजीची शंका आली. या प्रसंगी आगरकरांनी देणगी संस्थेला परत केली. यातून त्यांचा प्रामाणिकपणा दिसून येतो. आपल्या कृतीने त्यांनी समाजमनात त्यांच्या प्रतिमेला एका उंचीवर घेऊन गेले.

सेवा दलाचे सेनापती– 'ना. ग. गोरे' (२४ डिसेंबर १९५६) यांच्याविषयी वसंत बापट यांनी 'सेवा दल विशेषांकात' ना. ग. गोरे यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला आहे. ना. ग. गोरे यांचे बालपण अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गेले. पण आगरकरांसारख्या समाज सुधारकांप्रमाणे पैशाची अपेक्षा न ठेवता सेवाभावी वृत्तीने सेवा दलाची सेवा केली. हुशार, सत्त्वशील, अन्यायाशी झुंजणारे आणि फटकळ स्वभावाचे ना. ग. गोरे हे लेखक आहेत. ना. ग. गोरे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू त्यांचे बालमित्र श्री. गोपीनाथ तळवळकर यांच्या शब्दांत, ''त्यांच्या चेहऱ्यावर व वागण्यात त्या स्थितीतही औदासीन्य अगर मैंदपणा कधीच नसे. शाळेत त्यांच्या हुशारीचा लौकिक चांगला होता. त्यांना नादारी होती. पण त्यामुळे त्यांनी लाचारीचा मुखवटा कधीच घातला नाही. तळवळकरांच्या जवळ अण्णांच्या तेजस्वी बाण्याच्या कितीतरी स्मृती आहेत. ब्रिटिश राजघराण्यातली एखादी व्यक्ती आपले बूट या देशाच्या धुळीत ठेवती झाली की, त्या वेळच्या सरकारला आनंद होई. अशाच एका प्रसंगी शाळेत मुलांना बिल्ले वाटले. एसेम तडक वर्गाबाहेर गेले व गुलामीचे ते निशाण त्यांनी कचऱ्याच्या पेटीत टाकले. ताबडतोब सर्व मुलांची फौज उठली आणि त्यांनी या स्वयंभू सेनापतीचे अनुकरण केले.''[२९]

यातून त्यांना सेनापती का म्हटले जात होते. याची वाचकांना कल्पना येईल. या लेखात अन्याय, गुलामगिरीला थारा न देणारे, स्वतंत्र विचाराचे ना. ग. गोरे आपल्याला दिसून येतात. परकीय गुलामगिरीला त्यांनी आपल्या कृतीतून विरोध दर्शविला. यातून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांची संवेदनशीलता निदर्शनास येते.

रामचंद्र ढेरे यांचा 'शाहीर सगनभाऊ' (१५ एप्रिल १९५८) या लेखातून सगानभाऊचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. यातून शाहीर, लावणीकार, जातीने मुसलमान व व्यवसायाने शिकलगार असणाऱ्या सगनभाऊंना पारंपरिक व्यवसायात रस नव्हता. त्यांनी दुसऱ्या बाजीरावाच्या जीवनावर लावण्या रचल्या. होनाजी बाळा यांच्याशी जुगलबंदी होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू लोकसाहित्याचे अभ्यासक रामचंद्र ढेरे यांनी 'शाहीर सगनभाऊ' या लेखातून उलगडले आहेत. पेशवाईच्या काळात दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत स्वत:चा फड उभा करणारा सगनभाऊ आपल्या कवनात राम गोंधळ्याचे नाव आपल्याबरोबर जोडतो. या संदर्भात ते लिहितात, ''भाऊ सगन गुणिजन गाती रामजी चाल गाई नखऱ्याची ' असा उल्लेख येतो. गुणांची पारख असणारा सगनभाऊ लक्षात राहतो. तर 'जडण मोत्याची आणि घडण कलावंताची' अशी कवने रचणाऱ्या होना गवळ्याशी उघड उघड शत्रुत्व स्वीकारणारे सगनभाऊ आहेत. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, पंढरीचा पांडुरंग यांचे गुणगान गाणारे, मराठ्यांच्या गौरवाची परंपरा जशी पहिली तशी ऱ्हासाचे दु:खही त्यांनी पचविले. या शाहिराने शरीराच्या सौंदर्यापेक्षा मनाचे सौंदर्य अधिक टिपले आहे. प्रेमाची प्रतारणा न करता आजूबाजूच्या भूलभुलावणीला बळी पडू नये, असे सांगणारी प्रेमिका. ह्या प्रेमिकेची भावस्थिती पाण्याविना तडफडणाऱ्या मासोळीसारखी झाली आहे. 'चंद्राचि चांदणी शितळ का उष्ण प्राणपती ते सांगा मजप्रती' यावर त्यांचे उत्तर 'आपण शितळ असल्यास प्रभा चंद्राचि शितळ दिसती' या शब्दांत व्यक्त केली आहे. तर पेशवाईच्या वाताहतीची खंत व्यक्त करताना ते लिहितात. ''राजा कुणीकडे प्रजा कुणीकडे, काय अशी आग पांखडली? अन्न विसरलो पाणि विसरलो, वाळवंटि जशी मासोळी पडली. तसेच काय हो बहुभंवत्या फौज भयभीत झाल्या आभाळांत जरिपटक्याचा हत्ती अमुचा सतत गाळांत.''[३०]

उपरोक्त संदर्भावरून संवेदनशील, धाडसी, स्त्री–मनाची हळुवारता टिपणारे शाहीर म्हणून सगनभाऊंची ओळख रामचंद्र ढेरे करून देतात.

रामचंद्र ढेरे यांनी 'बहिणाबाईंचे विवेक–वैभव' (४ जुलै १९५९) या लेखातून प्रापंचिक जीवन व पारमार्थिक जीवनाचा मेळ साधला आहे. संत तुकारामांच्या समकालीन जीवन जगणाऱ्या बहिणाबाईंचे चरित्र रेखाटले आहे. बहिणाबाईंचा जन्म १६२८ रोजी वेरुळजवळच्या देवगावी ब्राह्मण कुटुंबात झाला. वयाच्या चौथ्या–पाचव्या वर्षी त्यांचे तीस वर्षांच्या बिजवराशी लग्न झाले. वयाच्या आठव्या–नवव्या वर्षी अचानक आलेल्या संकटांमुळे आई–वडील व पती यांच्याबरोबर गावोगावचा प्रवास करत कोल्हापूर या ठिकाणी हिरंभट ब्राह्मणाच्या ओसरीवर त्या आश्रयास आल्या. कोल्हापुरात जयराम स्वामींच्या सान्निध्यात तुकारामांचे अभंग आठवू लागल्या. हिरंभटाला मिळालेली गाय व वासरू त्यांनी रत्नाकर पाठकास अर्थात बहिणाबाईंच्या यजमानास दिली. गाईच्या वासराला बहिणाबाईंचा लळा लागला. ते वासरू त्यांच्याबरोबर कीर्तनासही येऊ लागले. हे तत्कालीन लोकांना रुचेना. वासराला समाजाने मारले, तर लोकांनी नवऱ्याचे कान भरले म्हणून नवऱ्याने बहिणाबाईला मारले व खोलीत बंद केले. या प्रसंगी गोठ्यातल्या गायी–वासराने अन्न–पाण्याचा त्याग केला. पशूंची सहृदयता पाहून रत्नाकर पाठकाने बहिणाबाईला मोकळे केले. बहिणाबाईंना स्वप्नात तुकारामचे दर्शन होते. त्यांची तुकोबांविषयीची ओढ त्यांच्या काव्यात दिसून येते. पण पतीच्या पुरुषी अहंकाराला हा व्यभिचार वाटतो. या प्रसंगाचे चित्रण बहिणाबाई अभंगात करतात,

''कैंचा शुद्र तुकास्वप्नींचे दर्शनी?
बिघडली पत्नी करू काय?
कैंचा जयराम? कैंचा पांडुरंग?
माझा झाला भंग आश्रमाचा?
पाषाण विठ्ठल–स्वप्नांतील तुका।
प्रत्यक्ष कां सुखा अंतरावे?''[३१]

ईश्वर उपासनेसाठी स्त्री–पुरुष हा भेद मानणारी तत्कालीन सामाजिक परिस्थिती. हा भेद नाकारत ईश्वराची उपासना करणारी संत कवयित्री बहिणाबाई जेव्हा पतीही ईश्वर उपासनेला विरोध करतो, समाजनिंदा करतो अशा परिस्थितीत त्यांच्या मन:स्थितीचे चित्रण प्रस्तुत अभंगातून आले आहे.

यदुनाथ थत्ते यांनी ‘आल्फ्रेड नोबेल’ (८ डिसेंबर १९५९) यांच्याविषयी माहितीपूर्ण लेख लिहिला. आल्फ्रेड नोबेल यांचे संशोधन समस्त मानवी जातीसाठी उपयुक्त आहे. तांत्रिकदृष्ट्या शाळेत फारसे न गेलेले पण आपल्या बौद्धिक क्षमतेच्या जोरावर ऐन तारुण्यात त्याने नायट्रोग्लिसरिनचा स्फोटक म्हणून शोध लावला. आल्फ्रेडला स्फोटक द्रव्यांच्या अभ्यासाची गोडी होती. त्याने नायट्रोग्लिसरिनवर प्रयोग करून पाऱ्याची टोपी बसवून इच्छित ठिकाणी स्फोट घडवून आणला. इ.स. १८६२ मध्ये त्यांनी नायट्रोग्लिसरिनचा पाण्याखालीही स्फोट होऊ शकतो, हे सिद्ध केले. या संशोधनावर त्यांनी अधिक प्रयोग केले. त्यांच्या या संशोधनाचे प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी ते अमेरिकेला गेले तेव्हा त्यांना हॉटेलमध्ये राहण्यास जागा मिळाली नाही. ही या संशोधकाची शोकांतिका होय. या संशोधकाने मात्र ‘दि पेटंट ब्रेसिलर’ या नावाचे नाटक लिहिले. पेटंट प्रकरणावर लिहिलेले व ब्रिटिशांवर अत्यंत कडक ताशेरे ओढलेले हे नाटक होय. ‘‘त्यांनी आपले संशोधन मानव कल्याणासाठी उपयोगात आणावे म्हणून संशोधनाला जगभर मानवतेच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या देशांत ३५५ पेटंट मिळविली. त्यांची रॉकेट प्रोजेक्टाइल्स व हवाई टॉरपेडो तयार करण्याची कल्पना होती. पण त्याने स्फोटक द्रव्यानंतर वेगवेगळ्या वस्तूंचे संयोग करून कृत्रिम रबर व रेशीम बनविण्याचा प्रयत्न केला.’’

याच लेखातून ते पुढे लिहितात, ‘‘आल्फ्रेड नोबेल विज्ञानसंशोधक व प्रयोगी असले तरी त्यांचे विज्ञान मानवतेने स्निग्ध झाले होते. स्वत: ते विश्वाचे नागरिक होते. उद्योगधंद्यांच्या निमित्ताने नाना राष्ट्रांशी त्यांचा संबंध आला. संकुचित राष्ट्रीय भावनेचे चटके त्यांना बसले. आपल्या वडिलांचा व भावाचा स्फोटक द्रव्यांच्या संशोधनापायी झालेला मृत्यू त्यांनी पाहिला. त्यांच्या जीवनावर ह्या सर्व गोष्टींचे ठसे उमटले व त्यांचे जीवनतत्त्वज्ञानही तयार होत गेले. जडवाद व विज्ञान यामुळे मानवाबद्दल तुच्छताबुद्धी निर्माण न होता आल्फ्रेड नोबेल यांच्यामध्ये मानवी जीवनाबद्दल एक प्रकारची आस्था निर्माण झाली. मेलेल्यांचे संगमरवरी पुतळे उभारण्यापेक्षा जित्यांना मदत करणे, ते महत्त्वाचे मानीत. त्यांनी कोट्यवधी रुपये मिळविले. त्या काळांतील युरोपमधील सर्वांत श्रीमंत मनुष्य अशी त्यांची ख्याती होती. पण पैशाने सुखे मिळवता आली तरी प्रेम मिळत नाही, ही गोष्ट त्यांना प्रतीत झाली. या विश्वात आपल्या भोवती माणसाचा मेळावा असला तरी आपण एकले आहोत ही जाणीव नोबेल यांना अत्यंत

तीव्र होती. सन १८८९पर्यंत त्यांची आई जिवंत होती. त्यांच्या विसाव्याचे तेच एक काय ते स्थान होते. ते स्वतः निष्ठेने आईची सेवा करीत. मातृसेवेचा व मातृभक्तीचा आदर्श या दृष्टीने त्यांनी विवाह केला नाही. मानवाविषयी त्यांना अपार प्रेम वाटे. त्यांना भिकारी आणि भिकारणी यांचीही पत्रे येत असत. येणाऱ्या प्रत्येकाला मुक्त हाताने ते मदत करीत, कोणाला विन्मुख पाठवीत नसत. पुढेपुढे त्यांच्याकडे मदत मागणाऱ्या पत्रांची संख्या इतकी वाढली, की आवक रकमेपेक्षा हा खर्च अधिक होत असे व मग भांडवलातील रक्कम कमी करून ती खर्चावी लागे. विज्ञानावर त्यांची फार श्रद्धा होती. ते म्हणत– ''विज्ञान मानवाला शहाणे व सुखी करील.''[३२]

उपरोक्त संदर्भानुसार आल्फ्रेड नोबेल यांचे संशोधन, परिश्रम, मानवतावादी दृष्टिकोन, युद्ध व शांतता प्रस्थापित करण्यासाठी संशोधनाचा उपयोग व्हावा हा त्यांचा हेतू होता. पण वडील आणि भावाच्या मृत्यूनंतर आईच्या देखभालीसाठी ते अविवाहित राहिले. कोट्यवधींची संपत्ती असणारा हा माणूस आपली संपत्ती दान करतो. १० नोव्हेंबर १८९६ ला आल्फ्रेड नोबेल यांचा इटली येथे मृत्यू झाला. महान संशोधक, कारखानदार, धनिक असूनही त्यांनी आपली सर्व संपत्ती आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी दान दिली. यातून त्यांनी पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र, मानसशास्त्र, साहित्य व शांतता या पाच गोष्टींसाठी बक्षिसे दिली. जात, धर्म, राष्ट्र, वर्ग, वर्ण याचा विचार करू नये. या सर्व विवेचनावरून आपणास रा. ग. जाधव यांनी आपली सर्व संपत्ती ध्येयवादी 'साधना' साप्ताहिकास देऊन आपली साधना पूर्णत्वास नेली. आल्फ्रेड नोबेल व रा. ग. जाधव यांच्या विचारांत साम्य आहे, हेच यावरून लक्षात येते.

ठाणे या ठिकाणी नियोजित मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष 'प्रा. रा. श्री. जोग – एक माणूस' (९ एप्रिल १९६०) ह्या अरविंद वामन कुलकर्णी लिखित लेखात रा. श्री. जोग यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू रेखाटले असून मितभाषी, अबोल, संयमी असणारे पण कधी कधी सूचक आणि खोचक बोलणारे, आपल्या विषयात ज्ञानी असणारे जोग सर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होतात. या प्रासंगिक लेखातूनच श्री. जोग यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय साहित्य अभ्यासकांना करून दिला आहे.

अशा प्रकारे 'साधना' साप्ताहिकातून ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालावधीत प्रकाशित झालेल्या चरित्रांमधून समाजातील विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाने मानाचे स्थान मिळविणाऱ्या सर्वसामान्य व्यक्तीपासून ते असामान्यत्व प्राप्त करणाऱ्या लेखांच्या वैज्ञानिकांच्या

चरित्रांचा आढावा घेऊन तत्कालीन पिढीला आदर्शाचे बाळकडू दिले आहे. हे सर्व चरित्रलेख, आपणास विज्ञानवादी दृष्टिकोन, मानवतावादांचे बाळकडू, संयमी जीवन व समाजोन्नतीसाठी चंदनाप्रमाणे देह झिजवून कार्य करण्याचे नैतिक व मानसिक बळ देतात.

## ४.२७ 'साधना' साप्ताहिकांमधून प्रकाशित झालेले प्रवासवर्णन :

मराठी वाङ्मयात प्रवासवर्णन हा एक महत्त्वाचा वाङ्मयप्रकार असून, जे जे प्रत्यक्ष पाहिले अनुभवले ते लिहिणे म्हणजे प्रवासवर्णन होय, असे मोघमपणे म्हणता येते. प्रवासवर्णनात स्वानुभावाला महत्त्व असते. लिहिणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वानुसार त्याची निवेदनपद्धती असते. प्रवासवर्णन हा वाङ्मय प्रकारसुद्धा इंग्रजी धर्तीवर मराठीत आला. प्रवासवर्णनाच्या हेतूनुसार त्याचे स्वरूप बदलत गेले. निरनिराळ्या प्रदेशांतील निसर्ग, समाज, साहित्य इत्यादीवर प्रवासवर्णनात चर्चा केलेली असते. प्रवासवर्णन वाचताना आपण त्या स्थळाला भेट देत असल्याचा भास निर्माण होतो. कारण त्यात अनुभवाचे तादाम्य दिसते. या संदर्भात 'मराठी वाङ्मयकोश खंड चार' यात ''प्रवासवर्णनात स्वानुभावाला प्राधान्य असल्याने लेखकाच्या व्यक्तिमत्त्वानुसार निवेदनाची पद्धती ठरते. प्रवासवर्णनाच्या प्रथमपुरुषी निवेदन पद्धतीत काही वेळा प्रयोग करून निवेदनाला पात्राचा दैनंदिनीचा बातमीपत्राचा आकार दिला जाणे शक्य असते. काही प्रवासवर्णनांत पत्रात्मक निवेदनपद्धती स्वीकारली गेली आहे. उदा. पंडिता रमाबाईंचे इंग्लंडचा प्रवास (१८८३) हे प्रवासवर्णन, काही प्रवासवर्णनांत दैनंदिनीचे रूप स्वीकारले आहे. उदा. अनंत काणेकरांचे धुक्यातून लाल ताऱ्याकडे हे प्रवासवर्णन. काही वेळा संभाषणाची धाटणी स्वीकारून प्रवासवर्णन लिहिले गेले आहे. उदा. जगन्नाथ विठोबा सत्री यांचे गोकर्ण महाबळेश्वर यात्रेप्रकरणी वृत्तान्त (१८६६) हे प्रवासवर्णन किंवा काही वेळा बातमीपत्राच्या स्वरूपातही प्रवासवर्णने लिहिली गेली आहेत. उदा. न. चिं. केळकर व श्री. रा. टिळेकर यांची प्रवासवर्णने''[३३]

यावरून प्रवासवर्णन ह्या वाङ्मय प्रकाराचे वेगळेपण स्पष्ट होते. प्रवासवर्णनामध्ये केवळ स्थळांची वस्तुनिष्ठ वर्णने आणि त्याचा इतिहास अभिप्रेत नसतो, तर प्रवासवर्णनकाराच्या प्रवासातील अनुभवकथन असते. या अनुभवांचा पुन:पुन्हा शोध घ्यावा लागतो. त्याचबरोबर प्रवासातील गावे, भू–प्रदेश, महत्त्वाची स्थळे यांचा निर्देश केला जातो. व्यक्तिपरत्वे हा अनुभव वेगळा असण्याचा संभव असतो. लेखकाची निरीक्षणक्षमता व वर्णनक्षमता यास अधिक महत्त्व

असते. प्रत्येक गावाचा, शहराचा, त्यातील महत्त्वाच्या स्थळांचा एक इतिहास असतो. या सर्वांना प्रवासवर्णनात उजाळा मिळतो. 'साधना' साप्ताहिकामध्ये अनेक प्रवासवर्णने प्रकाशित झालेली दिसतात. त्यातील काही पुढीलप्रमाणे आहेत.

'मुशाफिराचा मधुसंचय' (१ जुलै १९५०) हे मुईनुद्दीन हारीस यांचे प्रवासवर्णन प्रकाशित झाले. त्यांनी ब्रिटिश माहिती खात्याच्या निमंत्रणामुळे इंग्लंड, ब्रिटन, लंडन, फ्रान्स, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रिया, युगोस्लोव्हिया व इटली या युरोपियन देशांचा प्रवास केला. एकूण अठरा आठवड्यांच्या प्रवासात पाहिलेल्या देशाची माहिती, प्रवासादरम्यानच्या महत्त्वाच्या घटना, त्यातून मनावर झालेले संस्कार व अनुभव 'साधना' साप्ताहिकामधून वाचकांपर्यंत पोहोचवले. त्यांनी इंग्लंडमधील पार्लमेंटच्या निवडणुका आणि तेथील परिस्थिती प्रवासवर्णनाच्या माध्यमातून ते वाचकांच्या समोर ठेवतात. तेथील सरकार निवडणुकीची व्यवस्था कशी करते. हे पाहताना आपल्या देशातही प्रौढ मतदान पद्धतीप्रमाणे पहिली निवडणूक होणार असल्याने त्या निःपक्षपातीपणाने कशा होतील, यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी श्री. सुकुमार सेन हेही या दौऱ्यावर होते. ब्रिटनमधील निवडणुकीच्या पद्धतीनुसार आपल्या देशासाठी काय करता येईल, यावर विचार करताना ते म्हणतात,

''इंग्लंडमधील सारी प्रजा साक्षर आहे व तेथील प्रजेचे राजकीय शिक्षण व जागृती फार पुढे गेली असल्यामुळे त्या देशाचे उदाहरण सर्वस्वी आपणास लागू पडणार नाही अशी शंका येणे असंभवनीय नाही. पण इंग्लंडच्या निवडणूक पद्धतीच्या व तेथील राजकीय पक्षाच्या या संबंधीच्या कार्यपद्धतीच्या निरीक्षणानंतर माझे असे ठाम मत बनले आहे की, जरी आपल्याकडील मतदारांची बहुसंख्या निरक्षर असली व सर्वसाधारणपणे लोकांचे राजकीय ज्ञान अपुरे असले तरीदेखील आपल्याला निवडणुकांच्या बाबतीत इंग्लंडचे अनुकरण करता येईल किंबहुना तसे केले तरच आपल्या बऱ्याच उणिवा अल्पकाळात भरून काढता येतील व जनतेच्या राजकीय शिक्षणाची मजल झपाट्याने गाठता येईल.

निवडणुकीसंबंधी सर्वांत अधिक महत्त्वाची बाब म्हणजे, निवडणुका हे केवळ बहुमत मिळवून राज्य कारभार हाती घेण्याचे अथवा आपल्या पक्षाच्या आणि विचाराच्या काही व्यक्तींना कायदेमंडळात प्रवेश मिळवून देण्याचे साधन नसून खऱ्या लोकशिक्षणाची ती एक बहुमोल संधी आहे, ही भावना राजकीय पक्षांच्या ठायी उत्पन्न होणे ही आहे. इंग्लंडमधील निवडणुकांचा प्रचार

पाहिला म्हणजे तेथील सर्व पक्ष या भावनेने काम करीत आहेत अशी खात्री पटते. ज्यांना पार्लमेंटमध्ये बहुमत मिळण्याची शक्यता आहे असे मजूर अथवा कॉन्झर्वेटिव्ह पक्ष जितक्या तीव्रतेने काम करतात व लोकमत आपल्याला अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न करतात तितक्याच तीव्रतेने लिबरल व कम्युनिस्टांसारखे छोटे पक्षही झटत असतात. पक्ष छोटा असो अथवा मोठा असो निवडणुकीच्या बाबतींत त्यांची कार्यपद्धत जवळजवळ एकच असते.''[३४]

प्रस्तुत संदर्भावरून प्रवासवर्णनकार म्हणतात, की निवडणूक हे केवळ बहुमत मिळवून राज्य कारभार हाती घेण्याचे अथवा आपल्या विचारांच्या काहींना कायदेमंडळात घेणे नसून ती लोकशिक्षणाची ती एक बहुमोल संधी आहे. युरोपात निवडणुकांच्या वेळी ज्या सभा भरविल्या जातात. त्यात लांब व भावनाप्रधान भाषणे न झोडता एक दोनच वक्त्यांनी विषयाला धरून मुद्देसूद भाषणे केली. याच सभेत श्रोत्यांना प्रश्न विचारण्यासाठी वेळ दिला जातो. त्या वेळी शांतपणे, अत्यंत अभ्यासपूर्ण उत्तरे दिली जातात. सभेमध्ये शेवटी एक पिशवी फिरवून ज्या पक्षाची सभा असेल त्या पक्षाच्या कार्यासाठी पैसे गोळा करण्याचीही पद्धत होती. लेखक म्हणतात, ही प्रथा आपल्याकडेही पडायला हवी म्हणजे सभा ठरविण्याचा खर्च श्रोत्यांकडून मिळू शकेल. हे भारतीयांसाठीचा सद्यःस्थितीत अगदीच विरुद्ध टोकाचे वातावरण प्रस्तुत प्रवासवर्णनामधून पाहावयास मिळते. 'प्रवास' (२ मार्च १९५०) हे अरविंद वामन कुलकर्णी यांचे प्रवासवर्णन प्रकाशित झाले आहे. या प्रवासवर्णनात प्रवासाला निघण्याची घाई, अस्वस्थता, बॅगा भरणे इत्यादींचे वर्णन आले असून प्रवासाची पूर्वतयारी आणि प्रवासातील विचारांची घालमेल रेखाटलेली आहे. 'केरळच्या वाटेवर' (११ मे १९५०) हे सर्वोदय संमेलन १९५० साली शंकराचार्यांच्या जन्मगावी म्हणजे कालाडी येथे भरलेले होते. या संमेलनासाठी साधनेने खास प्रतिनिधी पाठवला होता. त्या प्रतिनिधीने केरळच्या वाटेवर त्या त्या प्रदेशाचे चित्रण केलेले आहे. या चित्रणात त्यांनी विनोबाजींचे आगमन, स्वागत आणि तेथील परिसराचे चित्रण केलेले आहे. 'उद्योगशील जपान' (२० जून १९५१) हा अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्या प्रवासवर्णनावर प्रकाशित झाले. यांच्या जपानमधील आठवणी पत्ररूपाने प्रकाशित झाल्या आहेत. या पत्रात्मक प्रवासवर्णनात ते म्हणतात,

''काल सकाळी टोकियोहून निघून मी 'हमामात्सु' येथे आलो. येथे पूर्वी आलेली पाच मित्रमंडळी राहत आहेत. स्वतंत्र घर केले आहे. स्वयंपाक व इतर व्यवस्था करण्यासाठी स्वतंत्र

बाई कामाला आहे. श्री. प्राणलालभाई यांच्याकडे १५–२० वर्षे ती काम करीत असल्यामुळे आपणाला पाहिजे तसे जेवण रोज मिळू शकत होते. हमामात्सु गावाची वस्ती १ लाख ८० हजार आहे. उहान लहान कारखाने, उद्योगधंदे येथे घरोघर आहेत. महिना पंधरा दिवस येथे राहून आजूबाजूला हिंडण्याचे आम्ही ठरविले आहे. स्टेशन वॅगन येथेच खरेदी केली आहे. त्यामुळे हिंडण्या–फिरण्याचे काम फारच सोयीचे झाले आहे.

चार–दोन दिवस या लोकांच्यात हिंडल्यानंतर एक गोष्ट चटकन लक्षात येते, ती ही की, हे राष्ट्र अफाट उद्योगी आहे. प्रत्येक मनुष्य १२–१४ तास उत्पादक काम करतो. कारखान्यात ९ तास काम करतो व शिवाय घरी ३–४ तास तरी लहान–मोठा उद्योग करीत असतो. शिक्षण सक्तीचे आहे. ९९% लोक शिकलेले आहेत. गोड बोलणे, एकमेकांना मदत करणे, सतत उत्पादक काम करण्यात आनंद मानणे, आपले काम कमी झाले तर लाज वाटणे, हाताचे कौशल्य कल्पनेबाहेर वाढविणे, कामात तल्लीन होऊ जाणे, हा येथे सर्वसाधारण स्वभावधर्म बनला आहे. त्यांच्या या राष्ट्रीय गुणांचे कौतुक करावे तितके थोडे आहे. लोक अतिशय बुद्धिमान आहेत, सर्व मालाला सध्या मंदी आलेली आहे. पूर्वी जी वस्तू एखादा छोटा कारखानदार बनवीत असे तिची मागणी कमी झाल्याबरोबर दुसरे काहीतरी तो बनवू लागतो. त्याला नवीन नवीन सुचत राहते. एकमेकांना मदत करण्याची वृत्तीही ते राखतात. त्यामुळे त्यांचे कारखाने सतत वाढत आहेत. लढाईपूर्वीइतके उत्पादन आजच त्यांचे झालेले आहे व ते सतत वाढत आहेत. पाण्यासारखी वीज ते वापरू शकतात, त्यामुळे विजेवर चालणारी लहान–मोठी यंत्रे ते सतत बनवत राहतात व त्यांच्याकडून काम घेत असतात.''[३५]

प्रस्तुत संदर्भावरून अण्णासाहेब सहस्रबुद्धे जपानच्या एकूण परिस्थितीवर प्रकाश टाकताना म्हणतात– जपान हे राष्ट्र अफाट उद्योगी आहे. प्रत्येक मनुष्य १२ ते १४ तास काम करतो. त्यात कारखान्यात नऊ तास आणि घरात ३–४ तास तो कामात व्यस्त असतो. जपानमध्ये ९९% लोक साक्षर आहेत. गोड बोलणे, एकमेकांना मदत करणे, सतत उत्पादक कामात व्यस्त राहणे, कामात आनंद मानणे आणि महत्त्वाचे म्हणजे आपले काम कमी झाले तर त्याची लाज वाटणे, हे अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण ते येथे नोंदवतात. ते कौशल्यविकासात अग्रेसर आहेत. हा त्यांचा स्वभाव धर्म आहे. हे भारतीयांसाठी आजही प्रेरणादायी आहे. म्हणूनच जपानला उगवत्या सूर्याचा देश म्हटले जाते. ही वृत्ती आज भारतीयांत येणे आवश्यक आहे. या

अण्णासाहेबांच्या विवेचनावरून त्यांची सूक्ष्मदृष्टी स्पष्ट होते. 'नायगरा' (२५ ऑगस्ट १९५१) हा शं. अ. खेर यांच्या प्रवासवर्णनपर लेखात नायगरा येथील प्रचंड धबधबा वाचकांना भेटतो. लेखक शं. अ. खेर हे पाश्चात्त्य विद्याविभूषित होते. केंब्रिज विद्यापीठातून पदवी घेऊन आल्यावर न्यू पूना कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. बऱ्याच कालावधीनंतर ते पुन्हा अमेरिकेची सफर करून आले. त्या वेळी 'नायगरा' येथील धबधबा पाहून जे विचारतरंग उमटले ते प्रस्तुत लेखामध्ये आले आहेत. ते म्हणतात, ''निसर्गाच्या ह्या भव्य कलाकृतीकडे, परमेश्वराच्या ह्या चैतन्यमय रूपांकडे कितीही वेळ पाहिले तरी समाधान होत नाही, डोळे निवत नाहीत. मोठाल्या पाच सरोवरांतून निघणारे हे पंचप्रवाह एकत्र येऊन, जणू सारे जग पादाक्रान्त करण्याचा निश्चय करून हातात हात घालून पुढे सरसावत आहेत असे वाटते. एकजुटीने केलेल्या या प्रयत्नांना कोण प्रतिबंध घालणार? कोण अडवणार? केवढेही विघ्न आले तरी ते या एकजुटीपुढे किती टिकणार? ह्या भव्यतेपुढे त्यांचा काय पाड? खोल दरी, भयाण कडा, पुढे कसलाही आधार नाही. तोल सुटला की खाली पडताच टिकऱ्या टिकऱ्या उडाव्या असे निसर्गाचे रौद्र रूप. पण सहज निर्भयतेने त्या सर्वांवर मात करून जीवनाचा हा प्रवाह अखंड पुढे चाललेलाच आहे. जीवनाची अक्षुण्णताच जणू तो दाखवीत आहे. पाणी खाली पडते ते एवढ्या वेगाने की खालच्या खडकांवर सारखे उशी घेऊन ते पुन्हा सोत्साह वर उसळते. कॅनडाच्या बाजूला पडणाऱ्या पाण्याचे दृश्य अधिकच मनोहर दिसते. असे वाटते की खाली पडणाऱ्या पाण्याचे ढग बनून ते पुन्हा आमच्या अमरत्वाची साक्ष देण्याला वर येत असावे. हे अनुपमेय दृश्य पाहून जीवाची, चैतन्याची, परमेश्वराची क्षणभर ओळख पटल्यासारखे वाटते.''[३६]

प्रस्तुत संदर्भावरून लेखक शं. अ. खेर अमेरिकेतील 'नायगरा' या प्रचंड धबधब्याबद्दल व्यक्त होतात. नायगरा पाहून माझ्या डोळ्यांचे पारणे फिटले, असे म्हणत केवढा मोठा हा पाण्याचा प्रवाह किती प्रचंड त्याचा वेग, केवढा आवाज, अनादी काळापासून हा धबधबा असाच कोसळतो.

महात्मा गांधीनी म्हटल्याप्रमाणे बिंदू आपला अहम् विसरून दुसऱ्यांशी तद्रूप झाला की, सिंधू बनतो आणि मग त्या जीवन शक्तीला अडविण्याची हिंमत कोणातच नाही. खरेतर हा धबधबा जगण्याचा मूलमंत्र देतो. पावसाची सारी भूमी सरली तरीही त्याची दिशा बदलत नाही. त्याच शिस्तीत सदा सर्वकाळ पुढेपुढे हा जणू कृतिनिश्चयच म्हणावा लागेल. प्रवाहाच्या या

गतीला रोखण्याची ताकद कोणत्याच दऱ्याखोऱ्यांत नाही. हा चैतन्याचा चिरंजीव प्रवास असाच युगे युगे अखंड राहिला. अशा प्रकारचे नायगरा धबधब्याचे वर्णन येथे लेखक करतात.

डॉ. जे. सी. कुमारप्पा यांच्या दृष्टीतून 'नवचीन दर्शन' (२४ नोव्हेंबर १९५१) हा चीनची ओळख करून देणारा प्रवासवर्णनपर लेख प्रकाशित झाला. या प्रवासवर्णनात त्यांनी चीनमधील कमालीची स्वच्छता आणि समानतेच्या वर्तणुकीवर प्रकाश टाकला. आपला देश स्वच्छ ठेवण्यासाठी तेथील प्रत्येक माणूस कमालीची दक्षता घेतो. हे सांगत आपण सारे सारखेच आहोत. ही भावना यांच्यात रुजलेली दिसते. कोणत्याही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी या भावना महत्त्वाच्या असतात. चीनमध्ये सर्वत्र साधेपणा आहे हे सांगत तेथील लोकांचे राहणीमान सारखेच होते. कोणी श्रीमंत वा गरीब नाही. तेथील जमिनीचा त्यांनी पुरेपूर उपयोग केला. तेथील समारंभातही कमालीची शिस्त होती ते म्हणतात. १ ऑक्टोबरच्या पेलिंकाच्या समारंभाचे उदाहरण देत त्या दिवशी सुमारे दहा लाख लोकांनी माओला अभिवादन केले. कसलीही गर्दी नाही, गोंधळ नाही. त्या दृष्टीने भारतीय बेशिस्त वागतात. चीन आपल्या देशाच्या कितीतरी पुढे गेला आहे. कारण त्याच्यासमोर एक ध्येय आणि त्या ध्येयपूर्तीसाठी ते कमालीची धडपड करतात. डॉ. जे. सी. कुमारप्पा म्हणतात–

''दोन मंत्र्यांची चर्चा– दोन मंत्र्यांशी बोलण्याची संधी मला मिळाली. त्यांना दरमहा सुमारे ४५० रुपये मिळत असत. आमच्या मदतीसाठी जे स्वयंसेवक होते त्यांनाही ह्या रकमेच्या १/३ रक्कम मिळत होती. चीनचे नेते सामान्य जनतेप्रमाणें आपले जीवन कसे घालवितात याची ह्यावरून कल्पना येईल. आपल्याकडे १९३०–३२ मध्ये जो उत्साह होता, जी भावना होती तीच भावना आणि तोच उत्साह आज येथल्या जनतेंत आढळतो. आपल्याला वाटते त्याप्रमाणे येथें रशियाचे संपूर्ण आधिपत्य दिसत नाही. रशियाच्या साम्यवादाचा पाया मोठ्या प्रमाणावरचे यांत्रिक उत्पादन आणि राष्ट्रीयकरण हा आहे. पण चीनला मर्यादित प्रमाणांत खासगी मालकी हक्क आणि उत्पादनाचे विकेंद्रीकरण मान्य असल्याचे दिसते. जमिनीबाबतच्या व्यवस्थेत सुधारणा आणि शेतीच्या पद्धतीचा विकास करण्याची चीनची इच्छा दिसते. हा या दोघांत मूलभूत फरक असल्यानें चीनला रशियाचे अंधानुकरण करून भागणार नाही. आपल्या स्वालडोहच्या प्रयोगांत ज्या पद्धतीने आपण वेतन ठरवितो. तशाच काहीशा पद्धतीने येथेही वेतन मुक्रर करण्यात येते. येथे नोकरांना घरदार, कपडे आणि अन्न मोफत दिले जाते आणि वर

खर्चासाठी महिन्याकाठी १०-१५ रुपये रोख दिले जातात. माझी पद्धत अधिक शास्त्रशुद्ध म्हणावी लागेल. कारण त्याचा पाया प्रत्येकाला पूर्ण पोषक आहार मिळालाच पाहिजे हा आहे. पण दोन्हीतलें साम्य पटकन ध्यानात आल्यावाचून राहत नाही.''[३७]

लेखक प्रस्तुत संदर्भामध्ये म्हणतात- मला चीनमध्ये दोन मंत्र्यांशी बोलण्याची संधी मिळाली. त्यांना दरमहा ४५० रुपये मिळत होते. चीनचे नेते सामान्य जनतेप्रमाणे आपले जीवन जगत होते. चीनमध्ये अत्यंत वास्तववादी दृष्टिकोनातून समस्यांकडे पाहण्याची आणि सोडविण्याची दृष्टी होती. त्यांनी रशियाचे अंधानुकरण न करता रशियाकडून योग्य ते धडे घेतलेले दिसतात. महत्त्वाचे म्हणजे चीनमध्ये जमीन समाईक संपत्ती मानली जात नाही. आज चीनने जी नेत्रदीपक प्रगती केली. तीत वरील बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

दिनांक २० जून आणि ४ जुलै १९५३ या कालावधीत 'साधना' साप्ताहिकामध्ये प्रकाशित झालेले 'काश्मीरचे चिरलावण्य' आणि 'काश्मीरचे विविध दर्शन' हे काशिनाथ पोतदार यांचे प्रवासवर्णन वाचकांना काश्मीर दर्शन घडविते. ते म्हणतात- काश्मिरी लोकांच्या जीवनात येथील फुलांनी केवढी क्रांती केली आहे. जिकडे पाहावे तिकडे फुलांचा सडा पडलेला. घरात, हॉटेलात, रस्त्यांच्या दोन्ही बाजूंनी फुलेच फुले. स्त्रियांच्या केसात आणि पुरुषांच्या कोटावर फुलेच फुले. फुला-फळांच्या मोसमावरून त्यांना ऋतू समजतो. निसर्गाच्या कुशीत हिंदोळे घेत ते जगत असतात. या संदर्भात ते लिहितात, ''श्रीनगरच्या अलीकडे पाप्पुरजवळ तर केशराची लाल-पिवळी शेते लागतात आणि कुठपर्यंत? वाटतं क्षितिजाजवळ सूर्याच्या सोनेरी किरणांशी ती भिडली आहेत. या विविधरंगी फुलांनी वेडा होणार नाही असा माणूसच विरळा. प्रत्येक फुलाचे स्वतंत्र सौंदर्य आहे. पण रस्त्यावर आपल्या पांढऱ्या शुभ्र पुष्प-राशींच्या चवऱ्या ढाळणाऱ्या किंकर वृक्षाने मला जितके मोहून टाकले तितके दुसऱ्या कशानेही नाही. बकुळीच्या फुलांसारखी लहान पण त्याहूनही अधिक नाजूक अन् अधिक शुभ्र अशी ही फुले नितांत मधुर सुवासाने भरलेली असतात. त्यांच्या इवल्याशा फिकट निळ्या पेल्यात काठोकाठ मध भरलेला असतो की काय न कळे. बरे ही फुले बकुळीप्रमाणे एकेकटी नसतात. मोत्यांच्या लडीप्रमाणें त्यांच्या लांबच्या लांब नि असंख्य मोहक सरी पाहिल्या की वाटतें त्या नुसत्या पाहत रहाव्या. एकादा हावरा माणूसहि या झाडाजवळ आला तरी तो एकहि लड खिशांत न घालतां नुसताच स्तब्ध उभा राहील; सुवासानें धुंद होईल. पुष्कळशा स्त्रिया आपल्या वेणीत अथवा

मोकळ्या केसांत (इकडे अंबाडा दिसत नाही. या लडी खोतात, गुलाबांसाठी तर काश्मिर प्रसिद्धच आहे. या गुलाबांतसुद्धा किती प्रकार नि किती रंग? कित्येक ठिकाणी तर त्यांच्या बागाच्या बागा फुललेल्या असतात. ''[३८]

उपरोक्त संदर्भात काश्मीरच्या सौंदर्याचे वर्णन आले असून, वाचकालाही काश्मीरला पोहोचल्याचा आभास होतो. एवढे जिवंत वर्णन लेखकाने केले आहे. तर 'काश्मीरचे विविध दर्शन' या लेखामध्ये लेखक काशिनाथ पोतदार म्हणतात, ''काश्मीरमधील नद्यांना उन्हाळ्यात चांगले पूर येतात. जून–जुलै–ऑगस्टमध्ये काश्मीरमधील झेलम नदी तर नागिणीसारखी धावते.'' श्रीनगरसंदर्भात लेखक सांगतात, की 'हे श्रीनगर शहर सम्राट अशोकाने किंवा दुसऱ्या प्रसेंनजिताने वसविले असा तिकडे तर्क आहे. त्यानंतर ललितादित्य मुक्तीपीड हा राजा राज्य करीत होता. तो मद्यपी होता. पुढे झैन उल याने त्याच्या कारकिर्दीमध्ये हिंदूंचा छळ थांबविला. त्यांची मंदिरे दुरुस्त केली. पुढे मोगलांच्या कारकिर्दीत काश्मीरवर सम्राट अकबर, जहांगीर आणि शहाजहान यांचे विशेष प्रेम होते. जहांगीरच्या अभिजात रसिकतेचे आजही अनेक संदर्भ इथे पाहावयास मिळतात. काश्मीरच्या उल्लोल सरोवराबद्दलही लेखक सांगतात. हे सरोवर एकवीस मैल लांबीचे असून प्रचंड लाटांसाठी प्रसिद्ध आहे. संध्याकाळ झाली की या सरोवराचे अंत:करण जणू उचंबळून येते. तर १५ ऑगस्ट १९५३ च्या 'साधना' साप्ताहिकामध्ये प्रकाशित झालेला 'केंब्रिजचे जीवन' हा प्रवासवर्णनपर लेख लेखक एम. ए. बाकरे यांचा असून त्यांनी केंब्रिजच्या जीवनावर प्रकाश टाकला. ते म्हणतात– भारतातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महाविद्यालय म्हणजे मित्राच्या भेटीची जागा, तिथे गप्पा, गोष्टी, मज्जा असा दृष्टिकोन असतो. परंतु केंब्रिज विद्यापीठातील विद्यार्थी मात्र याउलट दिसतात. विद्यार्थी जीवनाचा केंद्रबिंदू म्हणजे महाविद्यालय आहे. इकडची मुले (विद्यार्थी) हे वसतिगृहामध्ये राहतात. त्यांना तिथे एक किंवा दोन खोल्या असतात. एका मोठ्या हॉलमध्ये त्यांच्या जेवणाची सोय केलेली असते. केंद्रिय पद्धतीने येथे अभ्यासक्रम चालविला जातो. तेथील अध्यापकांना रोज वर्गात हजर राहणे बंधनकारक नाही. वर्षामधून सलग साठ दिवस हजर असे तीन वेळा मग हजेरीपटाची गरज नाही. महत्त्वाचे म्हणजे केंब्रिजचे विद्यार्थी सर्व विषयांत पारंगत असतात. येथील प्रत्येक विद्यार्थी कोणता ना कोणता खेळ खेळत असतो. येथील विद्यार्थ्यांना पूर्ण स्वातंत्र्य उपभोगता येते. विद्यार्थ्यांमध्ये मूर्तिपूजक नाहीत. त्यांना शिक्षकांबद्दल आदर आहे, पण ते शिक्षकांची अवास्तव

स्तुती करत नाहीत. केंब्रिजच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीच आकर्षण नाही. ते सर्वांगीण विकास महत्त्वाचा मानतात. दिनांक २८ नोव्हेंबर १९५३ मध्ये प्रकाशित झालेल्या 'साधना' साप्ताहिकामध्ये 'इटली देशांत' हा अच्युत आपटे यांचा प्रवासवर्णनपर लेख प्रकाशित झाला. या लेखात ते लिहितात,

''रोम अगदी जुन्या पद्धतीचे शहर आहे. लहान रस्ते, गर्दी, ट्रॅम्स, बसेस, प्रवासी; पण तेथे पॅरिसचा प्रशस्तपणा नाही. उलट इटालियन जनतेच्या दारिद्र्याचा प्रभाव वरचेवर जाणवतो. लोक सौजन्यपूर्ण व मऊ मनाचे, विशेषत: इटलीमध्ये जसजसे दक्षिणेकडे जावे तसतसे दारिद्र्य जाणवते. नदीचे खोरं म्हणजे पोलोनापासून उत्तरेचा सर्व भाग–ट्यूरीनं, मिलान व पूर्वेला व्हेनिसपर्यंत शेती व उद्योगधंदे यांनी चांगला समृद्ध आहे. उत्तरेच्या भागात जे खाणे दररोजच्या जेवणाचा भाग असते– म्हणजे Noodles किंवा spoghetti जाड शेवयासारख्या, गोल किंवा चपट्या असतात. त्या शिजवून त्यांना लोणी किंवा किसलेले चीज व टोमॅटोचे किंवा दुसरें कसले तरी सॉस घालतात. ते दक्षिणेकडे चैन समजली जाते.

रोमचे स्टेशन सोडले तर नवीन झालेले असे पाहण्यासारखे नाही. ते स्टेशन मात्र साधे, सुटसुटीत व सुंदर आहे. गर्दी व गोंधळ मुळीच नसतो. किंबहुना सर्व इटलीभर स्टेशने अशीच चांगली आहेत. रोममध्ये बघावयाच्या गोष्टीचे दोन प्रकार आहेत: २००० वर्षांपूर्वीचे रोमन अवशेष किंवा त्या सुमाराचे ख्रिस्ती धर्माच्या आरंभकालचे अवशेष. दुसरा प्रकार Renaissance व त्यानंतर एक दोन शतकांमधील कला, इमारती वगैरे, गेल्या २००–२५० वर्षांतील पाहण्यासारखे असे विशेष नाही. त्या अवधीत इटली, ऑस्ट्रेलियन साम्राज्याचा भाग होता. १८७० साली गॅरी बाल्डीने सेव्हाय घराण्यातील राजातर्फे इटली स्वतंत्र व एकमेव घडवला. तोपर्यंत इटली हा अनेक लहान–मोठ्या संस्थानांचा बनलेला आहे.''[३९]

प्रस्तुत संदर्भामध्ये अच्युत आपटे म्हणतात– रोम हे शहर अगदीच जुन्या पद्धतीचे आहे. रस्ते लहान, गर्दी, प्रवासी, खासगी वाहने, यामुळे रस्ते तुडुंब भरलेले. इथले लोक मात्र प्रेमळ, मऊ मनाचे सौजन्य बाळगणारे. पण प्रचंड दारिद्र्यात जगणारे इकडे हॉटेलशिवाय खासगी किंवा घरीही भाड्याने खोल्या मिळतात. येथे रोमन साम्राज्याचे अवशेष भग्नावस्थेत आहेत. 'राजस्थानच्या राखी भूमीत' या काशिनाथ पोतदार, (लेखांक– एक, दोन, तीन, चार) हा

देखील भारतच– वसंत बापट, हैफाहून भाऊ लिहितात– इत्यादी प्रवासवर्णनपर लेख प्रकाशित झालेले आहेत.

दिनांक २९ जानेवारी १९५५ रोजी रमा बखले यांचा 'प्रवासवर्णन' हा लेख प्रकाशित झालेला आहे. या प्रवासात त्यांनी घेतलेला आनंद, अनुभव सांगितले आहेत. प्रवासात अनेक गोष्टींचे ज्ञान मिळते. निसर्गाचाही आनंद मिळतो. प्रवासात प्रत्येक जण वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव घेत असतो. हे ज्ञान व अनुभव प्रवासात जर आपण डोळे उघडे ठेवून बघितले तरच पूर्ण आनंद, समाधान मिळू शकेल.

निसर्गात जेवढी शक्ती आहे तशी शक्ती कशातच नाही. त्या शक्तीचे दर्शन मानव आनंदरूपी डोळ्यांनी पाहू शकतो. मानवासारखे अनेक हजारो मैल प्रवास करतात. मग ज्याला बुद्धीचे सर्वस्व प्राप्त झाले आहे. त्याला ज्ञान मिळवण्याची आवड आहे. तो प्रवास आनंदाने करतो. अवतीभोवतीचे आपण एक ना अनेक गोष्टी आठवणीत ठेवतो; पण दूरच्या प्रवासानंतर जर कोणी विचारले की, तिथला प्रदेश कसा काय आहे, तर त्याचे उत्तर फारच थोड्या लोकांना देता येते.

कारण प्रवासात अवतीभोवती पाहण्यासारखे, ज्ञान वाढविण्यास मदत करणारे, विचारांना चालना देणारे काही असते याची त्यांना जाणीवच नसते. लेखिका म्हणते– प्रवासात मानवी जीवनाचा जो अनुभव येतो व जे ज्ञान मिळते. तितकेच किंबहुना अधिक ज्ञान निसर्गाचे, भूरचनेचे वास्तुशास्त्राचे व इतर अनेक गोष्टींचेही मिळते. परंतु ते ज्ञान व अनुभव प्रवासात जर आपण डोळे उघडे ठेवले तरच मिळेल. नाहीतर आपल्या बरोबरच्या ट्रंका, वळकट्याप्रमाणे आपणही फक्त धक्केबुक्के खाऊन स्वस्थानी परत येऊ. या लेखातून लेखिका प्रवासातील निसर्ग, भौगोलिक, पर्यावरण, जनजीवन यांचा आस्वाद घेण्याचा सल्ला देते. फक्त तो प्रवास उघड्या डोळ्यांनी करणे त्यांना अपेक्षित आहे.

दिनांक १० डिसेंबर १९५५ च्या 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेला 'चंडीगड एक सौंदर्यवास्तू' हा मंगेश पाडगावकरांचा लेख, चंडीगडच्या प्रवासात टिपलेल्या विविध अनुभवांवरील आहे. या लेखामध्ये मंगेश पाडगावकर म्हणतात, नवभारतात जेथे जेथे नवनिर्मितीची कामे चालू आहेत. ती आजच्या तरुणांची तीर्थक्षेत्रे बनली आहेत. राष्ट्ररचनेच्या महान कार्याचे या ठिकाणी जवळून दर्शन घडते. पंजाबची राजधानी चंडीगड ही या नव्या

तीर्थक्षेत्रातील काशी. योजनाबद्ध शहररचना आणि कलात्मक वास्तुनिर्मिती या दृष्टीनी चंडीगड हा एक नवा आदर्श प्रयोग आहे. सांकेतिकता आणि अवास्तव कल्पना यांना इथे अजिबात वाव नाही. या संदर्भात लेखक मंगेश पाडगावकर म्हणतात– ''चंडीगडची तीस चौकोनी विभागांत मांडणी करून यातल्या २४ विभागांत लोकांना राहण्यासाठी सार्वजनिक क्रीडांगणे, बागा यांच्यासाठी असून बाकीच्या विभागात कारखाने, सरकारी कचेऱ्या दुकाने यांच्यासाठी जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. घर आणि बाजार यांच्यात एक विशिष्ट अंतर कटाक्षाने राखण्यात आले आहे. प्रत्येक विभागाचे क्षेत्रफळ अंदाजे २५० एकर आहे. साधारणतः पंधरा हजार लोक राहू शकतील इतकीच घरे यात घेऊ शकतात. सुखसोई आणि इतर सर्व साधने यांच्या दृष्टीने प्रत्येक विभाग स्वयंपूर्ण आहे. या शहरातले रस्तेही असेच वैशिष्ट्यपूर्ण आहेत.''[४०]

प्रस्तुत संदर्भावरून चंडीगड हे योजनाबद्ध रचना असलेले शहर असून तेथील वास्तुनिर्मितीचा आदर्श सर्वपरिचित आहे. यासाठी मा. ला. कुर्भुजिये या विख्यात कलावंताच्या दृष्टीमधून या शहराची रचना ठरविण्यात आली. ज्या माऊंट व्ह्यू या हॉटेलमध्ये लेखकाला थांबवण्याची व्यवस्था केली होती. ते हॉटेल अद्ययावत सर्व सोयीसुविधायुक्त असे होते. त्या हॉटेलाभोवती मऊ लुसलुशीत हिरवळ होती. त्या हिरवळीवर लाल, हिरव्या रंगाच्या वेताच्या खुर्च्या व टेबले होती. त्या हॉटेलामध्ये मद्यगृहाची सोयही होती. अशा प्रकारचे विविध अनुभव व आठवणी येथे नोंदवतो. अत्यंत सूक्ष्म दृष्टी, सखोल चिंतन आणि निःसंदिग्ध मांडणी यामुळे वाचकाला चंडीगड प्रत्यक्ष फिरत असल्याची जाणीव होते.

अशा प्रकारचे अनेक प्रवासवर्णनपर लेख ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळात 'साधना' साप्ताहिकामधून आलेले आहेत. या प्रवासलेखातून भारत व भारताबाहेर प्रवासाचे अनुभव, तेथील निसर्ग, वास्तुकला, निसर्गसौंदर्य, त्यांचे पुराणत्व, ऐतिहासिक महत्त्व, तेथील लोकजीवनाचे अनुभव, सांस्कृतिक दस्तऐवज वाचकांना अंतर्मुख करतात.

# संदर्भ टीपा


१. कुलकर्णी वा. ल., साहित्य आणि समीक्षा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ., १९६३, पृ. क्र. १४१.

२. करंदीकर विंदा., परंपरा आणि नवता, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ., १९६७, पृ. क्र. १३४.

३. चौघुले वि. शं., लघुनिबंध ते मुक्त गद्य, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्र. आ., २००२, पृ. क्र. १७.

४. पाटील मृणालिनी, (संपा.), समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह, विजय प्रकाशन, नागपूर, प्र. आ., १९८५, पृ. क्र. १९७.

५. राजाध्यक्ष विजया (संपा.), समन्वय, मराठी वाङ्मयकोश, खंड चौथा समीक्षा संज्ञा, प्रकाशक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र. आ., २००२, पृ. क्र. १९७.

६. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, माझा मौनवार– बा. भ. बोरकर, दिनांक ७ ऑक्टोबर १९५०, पृ. क्र. ५.

७. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, दागिने– सानेगुरुजी, दिनांक १ डिसेंबर १९५१, पृ. क्र. ५.

८. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, शून्य मनाच्या घुमटात– मंगेश पाडगावकर, दिनांक १५ डिसेंबर १९५१, पृ. क्र. ५.

९. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, तालबद्ध पौष– दुर्गा भागवत, दिनांक १४ फेब्रुवारी १९५३, पृ. क्र. ७.

१०. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, ही असहाय्यतेची लाट थांबावयाची असेल, तर– मालतीबाई बेडेकर, दिनांक १४ मार्च १९५३, पृ. क्र. ५.

११. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, रूपधर फाल्गुन– दुर्गा भागवत, दिनांक ४ एप्रिल १९५३, पृ. क्र. ५.

१२. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, चैत्र सखा– दुर्गा भागवत, दिनांक २३ मे सप्टेंबर १९५३, पृ. क्र. ५.

१३. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, श्रावणातल्या दुपारी– दुर्गा भागवत, दिनांक ५ सप्टेंबर १९५३, पृ. क्र. ५.

१४. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, शांतात्मेच्या छायेत– बा. भ. बोरकर, दिनांक १२ डिसेंबर १९५३, पृ. क्र. ५.

१५. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, व्यक्ती आणि व्यक्ती– कुसुम पटवर्धन, दिनांक २ जानेवारी १९५४, पृ. क्र. ३.

१६. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, अहल्योद्धार– बागूल देविदास, दिनांक २१ ऑगस्ट १९५९, पृ. क्र. ७.

१७. थत्ते यदुनाथ (संपा), 'साधना' साप्ताहिक, ती तृष्णा– दुर्गाबाई भागवत, दिनांक २७ एप्रिल १९६०, पृ. क्र. ८.

१८. राजाध्यक्ष विजया (संपा.) समन्वयक, मराठी वाङ्मयकोश खंड–४, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई–२, प्र. आ., २००२, पृ. क्र. ११७–११८.

१९. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, लास्कीच्या जीवनाचे चिकित्सक मूल्यमापन– मधु लिमये, दिनांक १ एप्रिल, १९५०, पृ. क्र. ३.

२०. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, माणुसकीचे धडे देणार थोर शिक्षक वा. म. जोशी – मालतीबाई बेडेकर, दिनांक २२ जुलै १९५०, पृ. क्र. ६.

२१. पु. ह. पटवर्धन, शं. द. जावडेकर (संपा.), सानेगुरुजी आणि वामन मल्हार– प्रभाकर पाध्ये, दिनांक १५ ऑगस्ट १९५०, पृ. क . ६.

२२. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, महर्षि टॉलस्टॉय यांच्या जीवनाचा वेध व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, दिनांक २६ ऑगस्ट १९५०, पृ. क्र. ६.

२३. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, भलाईचे वतनदार सेनापती बापट– यदुनाथ थत्ते, दिनांक ११ नोव्हेंबर, १९५०, पृ. क्र. १०.

२४. पटवर्धन पु. ह. , जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मानवतेचा नंदादीप : सानेगुरुजी– शशिकांत कडकीआ, २३ डिसेंबर १९५०, पृ. क्र. १०.

२५. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, आचार्य दादा धर्माधिकारी : व्यक्ती आणि विचार– आचार्य स. ज. भागवत, दिनांक १४ फेब्रुवारी १९५३, पृ. क्र. ११.

२६. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, रे. नारायण वामन टिळक– अशोक टिळक, दिनांक ५ डिसेंबर १९५३, पृ. क्र. ५.

२७. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, श्री. भागवत वि. पु.– नवरे शं. ना., दिनांक २३ डिसेंबर १९५०, पृ. क्र. १०.

२८. पटवर्धन पु. ह. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, महात्मा आगरकर, रामचंद्र ढेरे, दिनांक १४ जुलै १९५६, पृ. क्र. ४.

२९. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, सेवा दलाचे सेनापती– वसंत बापट, दिनांक २४ डिसेंबर १९५६, पृ. क्र. ८.

३०. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, शाहीर सगनभाऊ– रामचंद्र ढेरे, दिनांक १५ एप्रिल १९५८, पृ. क्र. ६.

३१. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, बहिणाबाईंचे विवेक वैभव– रामचंद्र ढेरे, दिनांक ४ जुलै १९५९, पृ. क्र. ६.

३२. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, आल्फ्रेड नोबेल– यदुनाथ थत्ते, दिनांक ८ डिसेंबर १९५९, पृ. क्र. ९.

३३. राजाध्यक्ष विजया (समन्वयक संपा.), मराठी वाङ्मयकोश, खंड–४, संज्ञा– समीक्षा, समन्वयक–संपादक, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र. आ., २००२, पृ. क्र. २२६.

३४. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुशाफिरांचा मधुसंचय–मुईनोद्दीन हारिस, दिनांक १ जुलै १९५०, पृ. क्र. १.

३५. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, उद्योगशील जपान– अण्णासाहेब सहस्रबुद्धे, दिनांक ३० जून १९५१, पृ. क्र. ४.

३६. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, नायगरा– शं. अ. खेर, दिनांक २५ ऑगस्ट १९५१, पृ. क्र. ५.

३७. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, नवचीन दर्शन– डॉ. जे. सी. कुमारप्पा, दिनांक २४ नोव्हेंबर १९५१, पृ. क्र. ७.

३८. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, काश्मिरचे चिरलावण्य– काशिनाथ पोतदार, दिनांक २० जून १९५३, पृ. क्र. ६.

३९. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, इटली देशात– प्रा. अच्युत आपटे, दिनांक २४ नोव्हेंबर १९५३, पृ. क्र. ७.

४०. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, चंडीगड एक सौंदर्यवास्तू– मंगेश पाडगावकर, दिनांक १० डिसेंबर १९५५, पृ. क्र. ७.

## इ) 'साधना' साप्ताहिकातील इतर वाङ्मय प्रकारांचा अभ्यास :

### ४.२८ प्रास्ताविक :

'भाकरीपेक्षा या राष्ट्राला आज नवविचारांची अधिक गरज आहे' असे सानेगुरुजी म्हणत. या विचारातून १५ ऑगस्ट १९४८ रोजी सुरू केलेल्या 'साधना' साप्ताहिकाच्या स्वरूपाविषयी पहिल्या अंकातील निवेदनात निरनिराळ्या भाषांतील मौल्यवान प्रकारांची ओळख करून देणार असल्याचे मत ते व्यक्त करतात. या पहिल्याच अंकात कविता, प्रांतभारती व मुलांसाठी स्वतंत्र पानाचा उल्लेख आढळतो. 'साधना' साप्ताहिकाची त्रिसूत्री लोकशाही, सत्याग्रही, समाजवाद ही असून, 'साधना'च्या या ध्येयधोरणानुसार लेखन करताना वैचारिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय समकालीन प्रश्नांबरोबरच वाङ्मयीन जडणघडण करणार असल्याचे मत ते व्यक्त करतात. 'कृतज्ञता निवेदन' (१५ ऑगस्ट १९४९) या शीर्षकाखाली 'साधना' साप्ताहिकातून कविता, साखळकर गुरुजींची पत्रे, साने गुरुजींची सुंदर पत्रे, ना. ग. गोरे यांची शुभास पत्रे, तर आंतरभारती शीर्षकाखाली कन्नड साहित्याचा परिचय व कादंबरी साहित्याचा परिचय करून दिला आहे. दुर्गा भागवत, ना. ग. गोरे, जयवंत दळवी यांसारख्या लेखकांच्या काही कथा या कालखंडात प्रकाशित झालेल्या होत्या. 'थोरांची स्मरणे' या सदरात चरित्र वाङ्मयाचा परिचय करून देण्यात आला, तर 'साधना'च्या पाच वर्षे पूर्तीनिमित्त आलेल्या निवेदनात संपादक पटवर्धन पु. ह. व आचार्य जावडेकर म्हणतात– 'लोकांना काय हवे, याचाच केवळ विचार न करता लोकांना काय दिले पाहिजे, याचा विचार 'साधना'ने केला.' याचाच अर्थ 'साधना'ने लोकशिक्षणाचे कार्य सातत्याने करण्याचा प्रयत्न केला. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात 'साधना'ची भूमिका महत्त्वाची आहे. सामाजिक प्रश्न, ग्रंथ परिचय, थोरांची ओळख, कविता, लघुनिबंध यांसारख्या विषयांतून सामाजिक व वाङ्मयीन परिवर्तन हा हेतू स्पष्ट होतो. ग्रंथ परिचयाबरोबरच साने गुरुजींचे अप्रकाशित लेखन या काळात 'साधना'ने प्रकाशित केले. दुर्गा भागवत, मंगेश पाडगावकर यांच्या लेखनातून निसर्गातील बदल रेखाटले. मुस्लिम समाजातील विविध सणांची माहिती देणारे लेख प्रकाशित करून सामाजिक दायित्व सिद्ध केले. 'आंतरभारती' या सदरातून उर्दू, कन्नड, तमीळ, बंगाली, चिनी, गुजराती वाङ्मयाचा परिचय करून देण्यात आला, तर मुलांसाठी कथालेखन करणारे लेखनही या

काळात प्रकाशित होत होते. 'सह्याद्री व मराठी संस्कृती' यांसारख्या ग्रंथांचा परिचय करून महाराष्ट्रीयन जीवनसमृद्ध व सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न या काळात केला गेला.

सन १९५६ नंतर 'साधना'तून पुन्हा कविता लेखन होऊ लागले. याच काळात 'साधना' साप्ताहिक मुंबईहून पुण्याला स्थलांतरित झाले. गो. नी. दांडेकर, आरती प्रभू इत्यादी साहित्यिकांनी 'साधना'तून ग्रंथांचा, पुस्तकांचा परिचय करून दिला. 'साधना'त अनेक प्रकाशकांनी दर्जेदार पुस्तके पुस्तक परीक्षणासाठी पाठविली. ललित साहित्य साधनेतून कमी प्रमाणात प्रकाशित होत असले, तरी दर्जेदार व वैशिष्ट्यपूर्ण होते. या साप्ताहिकातून सिनेमा व नाटकांवर परीक्षणे लिहिली गेली. 'नवमंगल प्रभात' हे सानेगुरुजींनी लिहिलेले बंगाली नाटकाचे भाषांतर 'साधना'ने क्रमशः प्रकाशित केले, तर रवींद्रनाथ टागोर यांच्या 'साधना' या कादंबरीचे सानेगुरुजींनी भाषांतर केले होते. ते 'साधना'तून क्रमशः प्रकाशित झाले होते. 'बाराबास' ही रूपांतरित कादंबरी बा. भ. बोरकरांनी 'साधना'तून प्रसिद्धीस दिली. 'आंतरभारती' या सदरातून देश–विदेशातील लेखन व साहित्यिकांचा, त्यांच्या काव्यांचा परिचय करून देण्यात आला. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे 'साधना' साप्ताहिकाने 'कथा' या साहित्यप्रकाराला विशेष महत्त्व दिले. याचाच एक भाग म्हणजे 'मुलांच्या मेळाव्यात, धडपडणारी मुले', 'साधनेच्या कथा' या शीर्षकाखाली अनेक लेखकांच्या कथा प्रकाशित करून वाचकांसाठी मेजवानी दिली. कवी कालिदासाच्या मेघदूत काव्याने अनेक लेखकांना स्फूर्ती दिली. मंगेश पाडगावकरांची प्रवासवर्णने प्रवासात आलेल्या अनुभवांवर आधारित असून 'साधना'त क्रमशः प्रसिद्ध झाली होती.

'साधना'चे स्वरूप शैक्षणिक, सांस्कृतिक, वैचारिक असून वाङ्मयाच्या दृष्टीने 'साधना'तून प्रकाशित झालेले साहित्य हे 'साधना'च्या वाङ्मयीन वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावते. याच उद्देशाने 'साधना साप्ताहिकातून प्रकाशित झालेले इतर वाङ्मय प्रकार' या प्रकरणात कविता, कथा, नाटक, कादंबरी, सुंदर पत्रे, आंतरभारती, 'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झालेल्या कवितेसंदर्भातल्या भूमिका, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, प्रवासवर्णन, आत्मचरित्र, चित्रपट यांच्या समीक्षांबरोबरच इतर लेखनाचाही आढावा घेतला आहे. ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडात 'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झालेल्या विविध साहित्यप्रकारांचा अभ्यास केला. अभ्यासाच्या सोयीसाठी काही निवडक लेखकांचा साहित्य प्रकारनिहाय आढावा या प्रकरणांत आढावा घेतला आहे.

## ४.२९ कविता :

मराठी वाङ्मयात कवितेला प्रदीर्घ अशी परंपरा असून, मराठी वाङ्मय प्रकारातील प्राचीन आणि लोकप्रिय वाङ्मय प्रकार म्हणूनही कवितेकडे पाहिले जाते. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. जीवनाचे, जगण्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. प्राचीन काळातील अनेक संदर्भ याउलट दिसतात. साहित्याची निर्मिती ही फक्त ईश्वरोपासनेसाठीच केली जायची. भक्ती, पूजा, उपासना म्हणून हे लिहिले वा गायिले जायचे. परंतु इंग्रजांच्या आगमनानंतर साहित्यनिर्मितीचे हेतूच बदलले. ईश्वराभोवती असणारी साहित्यनिर्मिती मानवकेंद्री झाली. मराठी साहित्यात केशवसुतांनी पहिल्यांदा अशा प्रकारच्या कविता लिहिल्या. त्यापूर्वीचा काळ साहित्यलेखनासाठी बंदिस्त असल्याचे अनेक दाखले आहेत. पुण्य मिळविण्यासाठी, स्वर्गात जाण्यासाठी, व्यक्तीसाठी असे अनेक हेतू साहित्यलेखनामागे दिसतात. तत्कालीन लोकांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच वेगळा होता. 'जगन् मिथ्या ब्रह्म सत्य' असे सुपरिचित वाक्य तत्कालीन काळातले असून, जग ब्रह्माच्या भोवती फिरताना दिसते.

जात, धर्म, वंश, उच्च–नीच, स्पृश्य–अस्पृश्य यात गुंतलेल्या समाजाला अनेक विचारप्रवाहांनी धक्के देण्याचे काम केले. महानुभाव, संत चळवळ, शिवकाळ यामधून विविध विचार व तत्त्वज्ञान सामान्यांभोवती फेर धरू लागले. हजारो पिढ्यांपासून कर्मकांडात गुंतलेल्या मानवी मनाची घुसमट इंग्रज काळात होताना दिसते. इ. स. १८१८ मध्ये पेशवाईचा अंत झाला आणि युनियन जॅक भारतात फडकू लागला. 'यथा राजा तथा प्रजा' या उक्तीप्रमाणे समाजजीवन ढवळून निघाले. इंग्रजांनी स्थापन केलेल्या ईस्ट इंडिया कंपनीमध्ये काम करणारा कामगार अक्षरओळख नसणारा होता. साहजिकच कामकाजात अडचणी निर्माण होत होत्या. किमान पातळीवरच्या शिक्षणाची गरज इंग्रज अधिकाऱ्यांनाही वाटू लागली. त्यामधून मिशनरींच्या शाळा सुरू होत होत्या. महाराष्ट्रात महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे कार्य हाती घेतलेले होते. त्यासाठी त्यांचा अखंड संघर्ष चालू होता. इंग्रजी शाळेत शिकलेली पहिली पिढी समाजात वावरू लागली व इंग्रजी साहित्य वाचू लागली. भाषांतराची चळवळ त्यांना प्रोत्साहन देत होती. या कालखंडात अनेक इंग्रजी ग्रंथांचा अनुवाद मराठीमध्ये झाले. इंग्रजी ग्रंथाचे चांगल्यात चांगले भाषांतर करणाराला इंग्रज सरकार बक्षीस देत होते. त्या वेळी अनेक इंग्रजी ग्रंथांचे भाषांतर होत होते. या काळाला मराठी वाङ्मयाच्या इतिहासामध्ये 'भाषांतरयुग' असे

म्हणतात. बक्षिसासाठी का होईना पण अनेक इंग्रजी ग्रंथाचे वाचन भारतीय/महाराष्ट्रीय माणूस करू लागला. भारतीय विषम सामाजिक परिस्थितीची तुलना करत समानतेच्या मंगल भविष्याचा विचार त्यांच्या मनात आकार घेऊ लागला. नकळत भविष्यातील समानतेच्या तत्त्वाचा किंवा लढा उभारणाऱ्यांची पार्श्वभूमी तयार होऊ लागली. केशवसुत हे मिशनऱ्यांच्या शाळेतले पहिल्या पिढीचे कवी त्यांनी कवितेला सामान्य माणसाचा चेहरा दिला. अध्यात्माच्या आवारात बंदिस्त असलेली कविता सामाजिक आशय घेऊन पुढे येऊ लागली. केशवसुतांच्या कवितेचे शीर्षकच एवढे बोलके होते, की त्यात नवता सामावल्याचा विश्वास येतो. उदा. स्फूर्ती कवितेचे प्रयोजन, आम्ही कोण, प्रतिज्ञा, नवा शिपाई, तुतारी, गोफण केली छान, हरपले श्रेय, म्हातारी, निर्वासित चिनी मुलास इत्यादी. केशवसुतांनी सामाजिक आशय सांगणारी, सामाजिक कविता, निसर्गकविता, प्रेमविषयक कविता अशा विविध आशय सांगणाऱ्या आणि सामान्य माणूसकेंद्रित कविता लिहिल्या आणि एकूणच साहित्यविश्वाचे अंतरंग ढवळून निघाले. यानंतर रे. नारायण वा. टिळक, कवी विनायक, गोविंदाग्रज, बालकवी यांच्या कविता येताना दिसतात. रविकिरण मंडळाने तर कविता गाण्याचे प्रयोग करत कवितेला प्रतिष्ठा निर्माण करून देण्याचा प्रयत्न केला. एकूणच आशय, विषय आणि अभिव्यक्तीच्या प्रांतात आमूलाग्र बदल असलेली मराठी कविता व्यापक बनत होती. कविता लिहिणाऱ्या पिढ्या उदयाला येत होत्या. फक्त कवितेच्याच नव्हे; तर एकूणच मराठी वाङ्मयातील सर्वच वाङ्मय प्रकारामध्ये आमूलाग्र बदल झाला. कथा, कादंबरीचे क्षेत्रही विस्तारले गेले. फक्त कविता या वाङ्मयप्रकाराचाच विचार करावयाचा झाल्यास रविकिरण मंडळाच्या कवितेनंतरच्या काळात राजकारणात लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला. जहालवादी विचारांची घोडदौड थांबली. महात्मा गांधी नावाचा मवाळवादी चेहरा उदयाला आला होता. अत्यंत साधी राहणी, प्रचंड बुद्धिमान असणारा, अहिंसा व सत्याग्रह यावर ठाम असणारा हा चेहरा ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला अहिंसा सत्याग्रहाचे मजबूत शस्त्र दिले. त्यांनी पुकारलेल्या असहकार आंदोलनात संपूर्ण देश एकवटलेला पाहून इंग्रज सरकार हतबल होत होते. यातच जगाने दोन महायुद्धांचा सामना केला. भारतासह सबंध देशाने याचे भयावह आणि रौद्ररूप अनुभवले. शतकानुशतके आध्यात्मिक, तत्त्वज्ञानात, पाप–पुण्य, स्पृश्य–अस्पृशता, पुनर्जन्म यावर आधारलेल्या तत्त्वज्ञानाची चौकट तोडत माणूस हा मुंगीपेक्षाही क्षुद्र आहे. या प्रचंड निसर्गात त्याचं अस्तित्व क्षणभंगूर आहे, याची

जाणीव झाली. मर्ढेकरांच्या 'मी एक मुंगी तू एक मुंगी' किंवा 'पिपात मेले ओल्या उंदीर' ह्या कविता उदाहरणादाखल घेता येतील. या सर्व परिस्थितीत मानवी मन खडबडून जागे झाले. एकीकडे स्वातंत्र्यलढा शेवटच्या टप्प्यात होता. दिनांक १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. दीडशे वर्षाच्या पारतंत्र्यामधून स्वतंत्र झाल्याचा आनंदोत्सव साजरा होत होता. अनेक प्रश्न निर्माण होत होते. या सर्वच परिस्थितीचे प्रतिबिंब साहित्यात उतरत होते. अल्पावधीतच महात्मा गांधींची हत्या ३० जानेवारी १९४८ला झाली आणि देश खडबडून जागा झाला. दंगली पेटल्या. अनेकांची घरे आणि अनेक गावे बेचिराख होत होती. माणूस माणसाचा वैरी झाला होता. आपले सगळे आयुष्य अहिंसेच्या मार्गाने लढणारा हा योद्धा; त्याचा शेवट हिंसेने झाला आणि देशात हिंसेचा हाहाकार माजला. इकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने सामाजिक विचारांचा, समतेचा, मानवतेचा चेहरा उदयाला आला होता. त्यांच्या नेतृत्वात गावकुसाबाहेर दडपलेला, हजारो वर्षांपासून अस्पृश्यतेच्या अंधकारात चाचपडणारा माणूस ज्याचे माणूसपण या संस्कृतीने नाकारले होते, तो पेटून उठला होता. जागृत झाला होता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात रस्त्यावर उतरून संघर्ष करू लागला. याचे प्रतिबिंब मराठी साहित्यात पडत होते. या एकूणच परिस्थितीचा खोलवर विचार करणारी आणि महात्मा गांधींच्या विचारांचे संस्कार झालेली तत्कालीन पिढी जिने स्वातंत्र्यासाठी खूप मोठी किंमत चुकविली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा सुजलाम् सुफलाम् भारत यांच्या नजरेसमोर होता. पण प्राप्त परिस्थिती मात्र वेगळी होती. अनेक विचारप्रवाह निर्माण होत होते. स्वातंत्र्य लढ्याच्या झेंड्याखाली एकवटलेला समाज स्वातंत्र्यानंतर मात्र पुन्हा आपापसात मतभेद निर्माण करू लागला. याची परिणती महात्मा गांधींच्या हत्येने झाली. क्षणार्धात देश हिंसाचारात ओढला गेला. या एकूणच परिस्थितीचा अंतर्मुख होऊन विचार करणारे अनेक लोक निर्माण होत होते. समाजाला शहाणे करणे. ही या परिस्थितीवरील उपाययोजना होय. हा विचार करून अनेकांनी अनेक मार्गांनी आपली वाटचाल सुरू केली. त्यात सानेगुरुजींनी 'साधना' साप्ताहिकाची सुरुवात केली. तत्कालीन परिस्थितीचा आढावा घेत. समाज मानसिकता बदलविण्याचे काम सुरू केले. हा काही साधा, सरळ मार्ग नव्हता. अनेक संकटांमधून 'साधना'ची वाटचाल सुरू होती.

'साधना' साप्ताहिकाचे संस्थापक–संपादक सानगुरुजी महात्मा गांधींच्या हत्येनंतर हादरले. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव होता. महात्मा गांधींच्या हत्येनंतर

महाराष्ट्रात उद्भवलेल्या परिस्थितीनेही ते हतबल झाले. स्वातंत्र्यानंतर एका उदात्त ध्येयाने झपाटून काम करणारी ही पिढी ह्या घटनांनी विचलित झाली. यावर उपाययोजना करण्याच्या हेतूने त्यांनी 'साधना' साप्ताहिकाची सुरुवात केली. त्यामधून सातत्याने त्यांनी समाजाला शहाणे करण्याच्या हेतूने लेखन प्रकाशित केले. त्यात तत्कालीन प्रश्न, समस्यांबरोबर स्थानिक, राज्य, राष्ट्रीय पातळीवरील प्रश्न चर्चिले. सामाजिक ऐक्य, स्वातंत्र्य, समता, राष्ट्रीय एकात्मता, त्याग, समर्पण ह्या मूल्यांची पेरणी करणारे लेखन 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित होत होते. समाज शिकवण ही प्रदीर्घ काळ चालणारी बाब असते. संस्कार हे मोठ्यांपेक्षा छोट्यांवर लवकर पेरले जाऊ शकतात, ही बाब सानेगुरुजींच्या लक्षात येणार नाही असे कसे होईल. मातृहृदयी सानेगुरुजींच्या मनावर आईचे खोलवर रुजलेले संस्कार आणि यातून उदयाला आलेले सानेगुरुजींचे व्यक्तिमत्त्व, या साऱ्या बाबींचे प्रतिबिंब साने गुरुजींच्या साहित्यावर उमटलेले दिसते. सानेगुरुजींनी लहान मुलांना केंद्रबिंदू मानून 'साधना' साप्ताहिकामधून लहान मुलांसाठी, त्यांच्यावर संस्कार करण्यासाठी, निरनिराळी सदरे, लेखमाला चालवली. त्यात 'मुलांच्या मेळ्यात', साधनेच्या कथा यांचा उल्लेख करावा लागेल. 'साधना' साप्ताहिकाचे हे वाङ्मयीन कार्यही नाकारून चालणार नाही. 'साधना'ने सन १९४८ ते १९६० या कालखंडामध्ये अनेक नवोदित लेखकांना, कवींना लिहिते केले. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला. फक्त कवितेच्या बाबतीत विचार केला, तर मंगेश पाडगावकर, वसंत बापट, राजा मंगळवेढेकर, संजीवनी यानंतरच्या काळातल्या लोकप्रिय लेखक–कवींनी सुरुवातीला 'साधना'मधून लिहिण्यास सुरूवात केली. 'साधना' साप्ताहिक अल्पावधीत लोकप्रिय झाले. आजही 'साधना' साप्ताहिक त्याच जोमाने वाचकांना भेटते. ते त्यातील भूमिका, विचार, प्रवाह व वाङ्मयीन भागांमुळेच. आज 'साधना' साप्ताहिकाचा विशिष्ट असा वाचक वर्ग आहे. 'साधना' साप्ताहिकाने अनेक वर्षांपासून समाजात विचार रुजविण्याबरोबरच वाङ्मयीन अभिरुची वृद्धिंगत करण्याचे कार्य केले असून, यासाठी 'साधना'ने दर्जेदार कथा, कविता, कादंबरी, नाटक, ग्रंथपरीक्षण, समीक्षण प्रकाशित केले. हे 'साधना'चे वाङ्मयीन अभिरुची जडणघडणीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कार्य केले. त्याचबरोबर नवोदित लेखक–कवींना लिहिण्यास प्रोत्साहन देत नवोदितांचे लेखन प्रकाशित केले. प्रस्तुत भागामध्ये 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेल्या कवितांचा अभ्यास केला आहे.

'साधना' साप्ताहिकामधून अनेक कवींच्या कविता प्रकाशित झालेल्या दिसतात. त्यात मंगेश पाडगांवकर, वसंत बापट, राजा मंगळवेढेकर, सरिता पत्की, अरविंद मंगरूळकर, अरविंद कुलकर्णी, शंकर सारडा, बा. भ. बोरकर, गोपीनाथ तळवळकर, संजीवनी मराठे, देविदास बागुल इत्यादींच्या कविता प्रकाशित झाल्या. त्यातील काही निवडक कवितांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

कवी यशवंत हडप यांची 'राजघाट' (४ ऑक्टोबर १९५२) ही कविता महात्मा गांधींच्या हत्येनंतर समाजाला विसर पडलेल्या मानसिकतेचा वेध घेते. कवी म्हणतो– महात्मा गांधींच्या प्रत्येक पुण्यतिथीला त्यांची राजघाटावर यमुनेच्या तीरावर असलेल्या समाधिस्थळी लोकांची गर्दी होते. जणू श्राद्धाचा सोहळा असावा तसा. त्यांच्या अनुयायांचा मेळा जमतो. तिथे महात्मा गांधींचे आवडते ''वैष्णव जन तो तेणे काहिए जे पीड परायी जाने रे! परदु:खे उपकार करे तोये । मन अभिमान ना आने रे!'' हे वैष्णव धर्माचे भजन अखंड गायले जाते. बघता बघता वारकऱ्यांची मांदियाळी महात्मा गांधींच्या आठवणींच्या पताका घेऊन जमते. गर्दी होते. फुलांचा ढीग जमा होतो. काहींना आश्रू अनावर होतात पण...

''संगमरवरी समाधी खालती
विषण्ण हांसते वैष्णवाचे मन
एकच लयीत अखंड चालते
यमुनामाईचे अनादी गायन''[१]

या कवितेत महात्मा गांधीजींची अस्वस्थता आहे. त्याचं रडणं आहे. गांधीजींना अपेक्षित असणारी अहिंसा, ग्रामीण जीवनाचा विकास, सत्य या सर्वांचे समाजाला काही घेणे–देणे उरले नाही. नीरव रात्रीत जग झोपलेलं आहे. यमुनासुद्धा उन्मत्तपणे वाहते आहे. उसळून वाहते आहे. अशा वेळेस नदीकाठची ही महात्मा गांधींची एकटी समाधी फुलांनी झाकलेली आहे. भजन गात, महात्मा गांधींच्या आठवणी अनुयायी आळवतात. आपापल्या घरी निघून जातात. उरते ती एकली समाधी. भयाण स्मशान. दर वर्षी असे लोक येतात. फुलांचा ढीग साचतो. महात्मा गांधींच्या आठवणीच्या निमित्ताने त्यांच्या संजीवन समाधीवर फुलांचा वर्षाव होतो. या स्मरण यात्रेत हे मायावी स्मरण वाटावे असे. हे दु:खही मायावी आहे. त्या संगमरवरी समाधीखाली वैष्णव मन मात्र विषण्णपणे हसते. आयुष्यभर ज्यांनी वैष्णवधर्माची पताका घेतली. त्यांच्या

हत्येनंतर त्यांचे अनुयायीच जाती–धर्मात, उच्च–नीचतेत, स्पृश्य–अस्पृश्यतेत गुंतलेले आहेत. हे सर्व ही यमुना नदी विषण्णपणे पाहते. कारण ती भूतकाळाची वर्तमानाची साक्षी आहे.

'हरवले मन' (१९ एप्रिल १९५२) ही मंगेश पाडगावकर याची कविता जिवंत हाडामांसाचा संवेदनांचा भाव–भावनांचा माणूस हळूहळू यंत्र बनत जात आहे. हे सांगत माणसाने आज प्रचंड क्रांती केली. त्याच्या बुद्धीच्या जोरावर त्याने अनेक नवे शोध लावले. कोण्या एकेकाळी स्वप्नातही न पाहिले ते आज प्रत्यक्ष होताना दिसत आहे. त्याच्या बुद्धीचा हा पराक्रम आहे. ह्या गगनाला भिडणाऱ्या इमारती, भव्य प्रासाद त्यांच्या कौशल्याची साक्ष देतात. मानवाने केलेल्या प्रगतीचे मोजमापही आज नीट करता येत नाही. जसे,

''कळ दाबताच आता
अवतरतो प्रकाश
मध निर्मुण कृत्रिम
आम्ही पाडितो पाऊस''[२]

एवढ्या प्रगतीमध्ये माणूस मात्र हरवत चालला आहे. त्याच हरवणं त्याला त्याच्या कोशात बंदिस्त करत आहे. मुळात अत्यंत संवेदनशील असणारा माणूस आज यंत्र बनलाय. त्याला आता आजूबाजूला फुलणाऱ्या वसंताची जाणही नाही. त्याच्या जीवनातला वसंत जणू हरवला आहे. त्याला आता कोसळणाऱ्या पावसात भिजावसं वाटत नाही. कसल्या तरी विचित्र स्पर्धेत हा माणूस पळत सुटला आहे. त्याची हाव खूप मोठी झाली आहे. जग जिंकण्याच्या हव्यासात त्याला त्याच्या छपरात, कौलारात आकाश दिसेनासे झाले आहे. त्याला त्याचेच घर आता लहानसे वाटायला लागले, आपलीच माणसं परकी वाटायला लागलीत. गाव, घर, माणसे यापासून तो तुटत चालला आहे. त्याच्या जीवनातले पराक्रम त्यामागे धावता धावता तो हरवून बसला आहे. बेगडी निसर्गात वावरताना सभोवताचा खराखुरा निसर्ग मात्र तो हरवून बसला आहे.

कवी मंगेश पाडगावकर यांच्या अनेक कविता 'साधना' साप्ताहिकामध्ये प्रकाशित झाल्या. त्यातली 'कसे काय अन् कोठे चुकले' (१५ ऑगस्ट १९५३) ही निसर्गकविता होय. निसर्गाचे अगाध रूप आपल्या मुठीत सामावून पाहणाऱ्या मानवरूपी क्षुद्र जीवाला विज्ञानाच्या आधारे सर्व शक्ती आपल्या मुठीत सामावल्या आहेत, असा आविर्भाव आणत उसणे अवसान

घेऊन उन्मत्तपणे फिरणाऱ्या वृत्तीला प्रस्तुत कवितेमधून निसर्गाची अगाध शक्ती सर्व ग्रंथ पुराणांपेक्षाही वेगळी आहे. असे सांगत कवी पाडगावकर म्हणतात,

''मी शास्त्रेही कोळुनि प्यायलो,

असे मुखोद्‌गत पुराण–गीता

ईश्वर आहे अथवा नाही

बसुन करिता चर्चा आता.''[३]

प्रस्तुत कवितेमध्ये कवी पुढे म्हणतो, मी विज्ञान जाणतो, इतिहास वाचतो, खगोलशास्त्र, भूगोल तर माझ्या जिव्हेवर नाचतो. एवढेच नव्हे तर या जगाचे तत्त्वज्ञान, येथील समाजरचना, येथील व्यवस्था यातही मी पारंगत आहे, अर्थशास्त्र, परमार्थशास्त्रही नेहमी माझ्या संगतीत असतात. एवढे सगळे सभोवताली असतानाही या निसर्गाची अगाध शक्ती मला अंतर्मुख करते. येथे कवी तल्लीन होतो. केशवसुतांच्या झपूर्झासारखा वास्तव विसरून जातो. पण जेव्हा वास्तवात येतो. तेव्हा ह्या भावना विरून जातात.

'साप्ताहिकामध्ये 'आइनस्टाइन' (२३ एप्रिल १९५५) ही विंदा करंदीकर यांची कविता प्रकाशित झाली. या कवितेमधून अल्बर्ट आइनस्टाइन यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला असून १८ एप्रिल १९५५ रोजी आइनस्टाइनचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर दिनांक २३ एप्रिल १९५५च्या 'साधना' साप्ताहिकात आइनस्टाइनच्या एकूण कार्याचा आढावा घेतला. या वेळी कवी विंदा करंदीकर यांची ही कविता याच अंकामध्ये प्रकाशित झाली. या कवितेमध्ये कवी म्हणतात,

''हे आइनस्टाइन

तू आहेस

चैतन्यसृष्टीचा

आमच्या जगातील

एकमेव उपासक

तुझी दृष्टी

आहे स्थिरावली

अंतिम सत्यावर

आहे तुझीच

अदृष्टाला स्पष्ट करणारी

प्रगाढ प्रज्ञा.''४

थोर शास्त्रज्ञ आइनस्टाइन ज्यांनी सापेक्षतावादाचा सिद्धान्त मांडला. ते भौतिकशास्त्राचे अभ्यासक होते. इ. स. १९२१ मध्ये त्यांना नोबेल पुरस्काराने सन्मानित केले गेले. त्यांनी विज्ञानाची निरपेक्ष सेवा केली. धंदेवाईक वैज्ञानिकापेक्षा मानवाच्या प्रगतीची चिंता वाहणारा खरा शास्त्रज्ञ असतो, असे आइनस्टाइन म्हणत असे. ज्याची विशिष्ट अशी भूमिका होती. ज्याने सापेक्षतावादासोबतच अणू आणि ऊर्जा यांचा शोध लावला. आइनस्टाइनचे तत्त्वज्ञान जगाला नवा मार्ग दाखवत होते.

प्रस्तुत कवितेमध्ये कवी म्हणतो, हे आइनस्टाइन तू चैतन्यसृष्टीचा उपासक आहेस. जो जगाकडे मानवतावादी दृष्टिकोनातून पाहतो. आइनस्टाइनला महात्मा गांधींबद्दल विशेष जिव्हाळा होता. तो म्हणतो– महात्मा गांधींनी दाखविलेला मार्ग अवलंबण्याशिवाय जगाला तरणोपाय नाही. यावरूनच आइनस्टाइन किती लोकशाहीवादी होते, याची साक्ष पटते. या जगाचा तू एकमेव उपासक आहेस, कारण तुझी दृष्टी ही या जगाच्या अंतिम सत्यावर स्थिरावलेली आहे. जगाची निर्मिती कशी झाली. येथपासून ते पाप–पुण्य, जन्म–पुनर्जन्म, मोक्ष, स्वर्ग–नरक यामध्ये सामान्य माणसाला गुरफटून टाकणारे तत्त्वज्ञान या जगात हजारो वर्षांपासून अस्तित्वात असून, एका झंझावातासारखा अंतिम सत्याचा विचार घेऊन तू पुढे आलास आणि येथील बंदिस्त चौकटी मोडल्यास अनेक प्रश्न निर्माण होत होते.

हे विश्व एक महान गूढ आहे. ते आपल्याला सतत आवाहन करीत असते. त्याची ही सतत चाललेली लीला पाहून जो मनुष्य नतमस्तक होत नाही, ज्याला प्रश्न पडत नाही तो जिवंत असेल असे वाटत नाही. तो असे स्पष्टपणे म्हणायचा. या कवितेमध्ये कवी पुढे म्हणतो,

''हे आईनस्टाईन!

कोण, काय, कसे, कोठे, कधी किती–

असे सात संमंध''५

हे संमंध म्हणजेच भूत जे हे भूत एकदा मानेवर बसलेली, उतरत नसते. या संदर्भात डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणतात, ''कोण, काय, कसे, कोठे, किती, का ही तशी प्रश्नात्मक

सर्वनामे, शब्दांनी साऱ्या ज्ञान–विज्ञान विकासाचा पाया घातला. आपल्या भाषेत शब्दांचे अस्तित्व नसते, तर आपण अद्याप अष्मयुगात असतो. माणसाला प्रश्न पडणे वा प्रश्नात माणूस पडणे. यात समस्त मानवजातीचा विकास सामावलेला आहे. कोण हा प्रश्न कोहमपासून आला? माणूस विचार करायला लागला म्हणजे काय तर स्वत:ला प्रश्न केला की, मी कोण? शोध घेता घेता त्याच्या लक्षात आले की, कालपटलाच्या अनंत प्रवासात मी म्हणणारा अहंकारी मनुष्य क:पदार्थ असतो. आकाशगंगेत असंख्य तारे असतात. तशी पृथ्वीतलावर असंख्य माणसे. त्यातला एक तू. तुला अमर व्हायचं तर मनुष्याचा महात्मा, तज्ज्ञ, वैज्ञानिक, साहित्यिक, कवी, कलाकार व्हायला हवा नाही तर तू सामान्यातील एक, काय प्रश्नाने साऱ्या जगाचे प्रश्न उलगडलेस. काय हवं काय नको, या विधिनिषेध विवेकाने जंगली माणसाला सभ्य सुसंस्कृत बनवलंस. नीती, आदर्श, संस्कार, सभ्यता, संस्कृती या साऱ्या संकल्पनांचा उदय काय? या प्रश्नातून झालेला आहे. कसे आणि कुठे तसे गौण प्रश्न. त्यांनीही स्थल–काल माहात्म्य अधोरेखित केले आहे. ते शब्द नसले, तर पृथ्वीचा शोध लागला नसता.''[६]

प्रस्तुत संदर्भावरून आइनस्टाइनने मांडलेल्या सात संमंधाचा अर्थ स्पष्ट होतो. पृथ्वीवर घडणाऱ्या कोणत्याही घटनेमागे काही तरी कार्यकारणभाव असतो. ही बाब या सात संमंधावरून स्पष्ट होते. यासाठी वैज्ञानिकांनी कायम सजग राहिले पाहिजे यावर आइनस्टाइनचा कटाक्ष होता. वैज्ञानिकाने आपली स्वतंत्र प्रज्ञा जागृत ठेवायला हवी. त्यांनी सरकारचे दास बनता कामा नये. आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवायला हवे. याचे भान इथल्या प्रत्येक नागरिकाला असणे आवश्यक आहे. सभोवताली घडणाऱ्या घटनांविषयी प्रश्न पडायला हवे आणि या प्रश्नांना भिडण्यासाठी शास्त्रज्ञांची प्रज्ञा स्वतंत्र असायला हवी.

कवी बा. सी. मर्ढेकर (२४ मार्च १९५६) यांच्या दोन कविता प्रकाशित झाल्या. नुकतेच मर्ढेकरांचे निधन झाले होते. मराठी नवकाव्याचे जनक म्हणून मर्ढेकरांकडे पाहिले जाते. त्यांनी आपल्या कवितांमधून तत्कालीन वास्तव मांडताना परंपरेच्या बुरख्याआड दडलेल्या तत्त्वज्ञानाचे पोस्टमार्टम केले. दोन जागतिक महायुद्धे उघड्या डोळ्यांनी पाहणारा भारतीय माणूस, किडे–मुंग्या मरावी तशी माणसे मरत होती. एकीकडे हजारो वर्षांचे वेद, उपनिषद, महाग्रंथांवर आधारलेले तत्त्वज्ञान आणि दुसरीकडे अणुबॉम्बमुळे उद्ध्वस्ताच्या उंबरठ्यावर असलेले जग अन् या परिस्थितीत भारतीय माणूस जागा होत होता काय? नेमका शाश्वत

सत्याचा अंतर्मुख होऊन विचार करू लागला. अशा परिस्थितीत बा. सी. मर्ढेकरांसारखा संवेदनशील कवी स्वस्थ बसणे शक्य नाही. त्यांनी अनेक कविता लिहिल्या. त्यांच्या कविता विविध विषयांवर बोट ठेवतात. परखड वास्तव मांडणारी कविता एकीकडे, तर अत्यंत संवेदनशील घटना नोंदविणारी दुसरीकडे. 'पोरसवदा होतीस तू' या कवितमेमध्ये कवी म्हणतात–

''पोरसवदा होतीस
काल–परवापावितो
थांब उद्याचे माऊली
तीर्थ पायाचे घेईतो''७

प्रस्तुत 'पोरसवदा होतीस तू' या कवितेमध्ये मर्ढेकरांचा स्त्रीकडे पाहण्याचा, विचार चिंतनाचा व्यापक पट स्पष्ट होतो. जन्मणारी प्रत्येक मुलगी ही बघता बघता वयात येते. मोठी होते. पायात एक प्रकारचा स्वच्छंद वारा असतो. परवा–परवापर्यंत पोर असलेली ही छोटीशी मुलगी. हसणारी, बागडणारी, मनसोक्त उड्या मारणारी अन् एके दिवशी पोट टपोरल्यागत होतं. जणू फुलण्यासाठी आतुर झालेली मोगऱ्याची कळी व्हावी तशी आणि तिच्या कुशीमधून नवा जीव बाहेर येतो. ही साखळी युगानुयुगे अशीच चालू आहे. तिचे हे नवनिर्माण सृजनाचे आगार आहे. मरणयातना सोसत नवा जीव जन्माला घालणारी ही कालची छोटीशी पोंरसवदा पोर आज माउली होते. अशा संयमी, त्यागी समर्पित जीवाला मर्ढेकर 'थांब उद्याचे माउली तीर्थ पायाचे घेईतो' अशी कृतज्ञता व्यक्त करतात. शतकानुशतके माणूस म्हणून नाकारलेली स्त्री कायम निंदेची, चेष्टेची, अपमानाची धनी राहिली. अशा स्त्रीबद्दल कवी बा. सी. मर्ढेकर मात्र अत्यंत विनम्रतेने नतमस्तक होतात. तिला आराध्य देवतेचा दर्जा देत तिच्या पायी तीर्थ आहे. जाणिवेने प्रणाम करतात. मर्ढेकरांनी नव्या आशयाच्या प्रतिमा आणल्या. पारंपरिक भाषा टाळून तिला नवे आणि अर्थपूर्ण रूप दिले. मर्ढेकर हे भाषाप्रभू होते. त्यांना दुसरे केशवसुत म्हणतात. ते अनुभूतीशी प्रामाणिक होते. त्यांनी अत्यंत पारदर्शीपणे कविता लिहिल्या. यांत्रिकता, मुर्दाडपणा, मठ्ठपणा, दांभिकता, संवेदनाशून्य भाव आणि वैषयिकता याचे संदर्भ मर्ढेकरांच्या कवितेमध्ये दिसून येतात.

कवी सदानंद रेगे यांची 'चेंटूक' (२१ एप्रिल १९५६) ही कविता खरे तर चेटूक हे कोकण परिसरातले लोकतत्त्व आहे. 'चेटुक' म्हणजे जादूटोणा करणे होय. प्रेम होणे म्हणजेही जादूटोणाच होय.

प्रतिमेच्या भाषेत ही संपूर्ण कविता बोलते. 'गुलमोहर' हे काही झाड नाही; तर प्रत्येकाच्या मनामध्ये एक गुलमोहर असतो. त्याच्या आतमध्ये खोल–खोल एक गुहा असते. सदानंद रेगे किंवा आरती प्रभू यांना संज्ञाप्रवाही कवी म्हटले जाते. मानसशास्त्रीयदृष्ट्या मनाच्या ज्या काही वेगवेगळ्या अवस्था आहेत, त्या वेगवेगळ्या प्रतिमांमधून यांनी हे प्रतीक उलगडून दाखवलेले आहे. प्रस्तुत कवितेमध्ये कवी सदानंद रेगे म्हणतात–

''गुलमोहराच्या गुहेच घर उघडावं
तशी तू समुद्रातून वर आलीस
अन् माझ्‌या पापणीवर आकाश उमललं
चंद्राने फेडले फुलांच्या पाकळ्याआड
तुझे लाटांचे वस्त्र जेव्हा
पुळाणीवरच्या ओल्या अंधारात मात्र
शोधित होती एक चांदणी
हरवलेल्या डोलकाठीवरची रानचिमणी''[८]

फुलांच्या घरामधून तुझे येणं किंवा तुझे समुद्रातून अलगद वर येणे. माझ्या अंत:करणातले एक फुल आहे. त्या घराचे म्हणजे प्रत्येकाच्या मनातल्या गुहेचे तू दार उघडलेस आणि माझ्या पापणीवर आकाश उमलले. खरे तर आकाश हे मुठीमध्ये सामावत नाही. म्हणजे तिचे अलगद समुद्रातून वर येणे याचा आनंदच इतका आहे, की पापणीवर आकाश उमलावे म्हणजे सर्वस्व मिळाल्याचा हा आनंद आहे.

चंद्राने फेडलेले फुलांच्या लाटाच्या आड तुझे वस्त्र आणि तिचे समुद्रातून वर येणे म्हणजे ती जलकन्या आहे, जलपरी आहे किंवा मत्स्यकन्या आहे. मराठी कवितेमध्ये चंद्राला प्रियकर म्हणतात आणि हा चंद्र जेव्हा तिला पाहतो. या ठिकाणी चंद्र, चांदणी, लाटांवरचे वस्त्र, नक्षत्रांचे रान, झुरणारी उडत राहणारी रानचिमणी या वेगवेगळ्या प्रतिमा एकाच स्त्रीसाठी आहेत किंवा एकाच स्त्रीसाठी नाहीत. त्यांच्या अंत:करणातली जी प्रेयसी जिने गुलमोहराच्या गुहेचे दार

उघडले. ती समुद्रामधून वर आली तेव्हा त्याचा शोध घेणारी एक चांदणी दुसरीच आहे. इथे वाचकाला विचार करावा लागतो. अत्यंत सुंदर, तरल, भावस्पर्शी प्रेमाची उत्कटता सौंदर्याचे तरल वर्णन इत्यादी वैशिष्ट्ये या कवितेची नोंदवता येतील. अत्युच्च प्रेमाची उत्कटता कवितेच्या आशयामधून व्यक्त होते.

कवी चंद्रकांत कुलकर्णी यांची 'भोवळ' (१६ जून १९५६) ही कविता प्रकाशित झाली. ही तरल प्रेमभावना व्यक्त करणारी कविता आहे. प्रस्तुत कवितेमध्ये कवी म्हणतो–

''बघशिल जर का

वळुन जराशी

झुरेल तारा

झुरेल वारा

झुरेल पिवळे बांबूचे मन दगडालाही

फुटेल भाषा''[९]

कवी आपल्या प्रेयसीला म्हणतो, तू जर वळून पाहिलंस. तर हा ताराही झुरेल, तुझ्यात केवढी क्षमता आहे. हा वाराही झुरेल; एवढेच नाहीतर या पिवळ्या बांबूच्या मनातही तरंग उठतील. तू या सृष्टीतील एक सुंदर जिवंत शिल्प आहेस. तू जर थोडेसे वळून पाहिलेस ना तर हा तारा, वारा, बांबूच नाहीतर निर्जीव पाषाणालाही भाषा फुटेल. तोही शब्दबद्ध होईल, बोलू लागेल. ही कविता निसर्ग परिवेशामधून येते. मानवी भावभावनांचे आरोपण कवी येथे करतो. म्हणजे तू जर वळून पाहिलेस तर माझ मन जे पाषाणासारखे आहे. त्यालाही शब्द फुटतील आणि माळावरल्या निळ्या फुलांची.... साळीच्या अंगावर महिरप. म्हणजे कवी पुढे जाऊन म्हणतो कदाचित तो पाहिले पण बोलणार नाही. इथे साळ येते ती अत्यंत नाजूक लुसलुसत्या कांती, नक्षीदार अशी. ती बोलणार नाही पण मुकेपणाने जाईल. हे सर्व कधी घडेल तर ती जेव्हा वळून पाहील तेव्हा आणि या तिच्या वळून पाहण्याच्या जादूने माझ्या मनास भोवळ येईल. ही भोवळ, ही नशा तिच्या अस्तित्वाची, वळून पाहण्याची असेल, असे या कवितेमध्ये कवी बोलतो.

'साधना' साप्ताहिकमध्ये कवी माणिक गोडघाटे यांची 'उणीव' (२९ मार्च १९५८) ही कविता प्रकाशित झाली. या वेळी त्यांनी स्वतःचे टोपणनाव 'ग्रेस' हे लावले नव्हते. तसे ग्रेसांना

दुर्बोध कवी म्हटले जाते. मराठी कविता वाङ्मयामध्ये ग्रेसांच्या कवितेचे महत्त्व आगळेवेगळे आहे. प्रस्तुत 'उणीव' ह्या कवितेमध्ये कवी म्हणतो–

''आता लिहिताना काही जरा वेगळे वाटते
माझ्या लेखणीची ओळ तीळ–तीळाने तुटते
आणि दाटतो हुंदका वेळ अवेळ पाहिना
डोके फोडुनी वैरीण रात्र सताड जागते
शब्द अनाथ दिसती रेघ हळुच ओढावी
टिंब ठेवुनिया अंती गीत अपुरे वाटते.''[१०]

प्रस्तुत कविता उणीव, उणीव म्हणजे 'कमतरता' काही तरी क़मतरता आहे. जेव्हा कवीला कविता सुचते तेव्हा काही तरी घडले असते, कुठेतरी काही तरी नक्की घडलेले असते. इथेही या कवीच्या आयुष्यात काही तरी घडलेय. ज्यामुळे या कवीच्या आयुष्यात एक प्रकारची उणीव निर्माण झाली आहे. कवी म्हणतो आता लिहिताना काही जरा वेगळे वाटते... म्हणजे काही तरी घडलेय... त्यामुळे कवीला वाटते की जे काही घडलेय ते आपण आता लिहूही शकत नाही. कधी–कधी असाही क्षण येतो की, आपण निःशब्द होतो. खूप काही असते पण बोलताच येत नाही. यामागे नक्की काही तरी घडलेले असते. असेच काहीसे या कवीच्याही बाबतीत घडले आहे. त्याचा परिणाम त्याच्या लेखणीवर झाला आणि म्हणूनच आता लिहिताना काही जरा वेगळे वाटते. म्हणजे त्याच्या (कवीच्या) लेखनाच्या संदर्भात कुणीतरी काही तरी उणीव काढलेली आहे. पुढे कवी म्हणतो. आता हुंदकाही दाटतोय, वेळ–अवेळीही तो पाहिना. म्हणजे कवीच्या आयुष्यातील खूप मोठी गोष्ट हरवली आहे. काही तरी कमतरता, उणीव निर्माण झाली आहे. ज्यामुळे हे दुःख कधीही उफाळून येत आहे. हे दुःख त्याच्या मनावर स्वार झाले आहे आणि डोळे फोडून वैरीण रात्र सताड जागते. या रात्रीला कवी एका व्यक्तीचा संदर्भ देतो. रात्र सताड जागते म्हणजे हा रात्रभर झोपत नाही. म्हणजे असं काही तरी घडलंय ज्यामुळे त्याला केव्हाही हुंदका येतो आहे आणि रात्रीही झोप येत नाही. पुढे कवी म्हणतो, शब्द अनाथ दिसतो. म्हणजे (कवी) जे काही लिहितोय त्याला काहीच अर्थ नाही असे त्यालाच वाटते. शब्द अनाथ म्हणजे; शब्दाला काही तरी अर्थ असतो. कुठला तरी संदर्भ असतो, सारांश असतो. पण इथे तर कवी म्हणतो शब्द अनाथ आहे आणि अशा वेळी रेघ हळूच ओढावी. तरीही हा शब्द अनाथ

आहे. पुढे कवी म्हणतो– टिंब ठेवुनिया अंति म्हणजे वाक्य पूर्ण झाल्यावर आपण अंती टिंब ठेवतो; पूर्णविराम देतो. तरीही गीत अपुरे वाटते. म्हणजे हा कवी गाण लिहितोय. तो गद्य म्हणजे कथा किंवा कादंबरी लिहीत नाही. माणूस गाणे केव्हा लिहितो जेव्हा काही तरी संवेदना मनात जागृत होते. म्हणजे त्याचे मन कुठल्या तरी तरल संवेदनांनी तुटलेलं आहे आणि त्या तुटलेल्या संवेदनांची ही कविता आहे. म्हणजे त्याच्या तरलतेला कुणीतरी छेडलेय त्याचीच ही कविता आहे. नवकवींच्या दुसऱ्या पिढीतील कवी म्हणून कवी ग्रेस यांची ओळख असून त्यांनी १९५५ पासून सत्यकथा व छंद या नियतकालिकात लेखनाला सुरुवात केली. 'साधना' साप्ताहिकात त्यांच्या 'तुझ्या हट्टासाठी' (२७ सप्टेंबर १९५८), 'ओलेती' (८ फेब्रुवारी १९५८) व 'उणीव' (२९ मार्च १९५८) रोजी प्रकाशित झालेल्या तीन कविता उपलब्ध आहेत.

'उल्का' (१२ जुलै १९५८) ही 'मनोहर तल्हार' याची कविता–

''उत्तर! मी देऊ काय?

तू असती ध्रुवतारा

उल्का मी झालें रें

ढळल्यावर तोल जरा''[११]

प्रस्तुत कवितेमध्ये कवी मनोहर तल्हार प्रेमभावनेचे सुंदर चित्रण करतात. तारे अढळ असतात. ध्रुवतारा तर अढळ, अचल असतो. अगदी शांत, स्थितप्रज्ञ. अशा ध्रुवावर उल्केच प्रेम जडलेय. ती या प्रेमामध्ये खोल–खोल जाते. उल्का ढळणारी असते बावरणारी. तिचा तोल कधीही जाऊ शकतो. या कवितेतील चंचल अशी त्या उल्केसमान प्रेयसी. ध्रुवताऱ्यासम अचल अढळ अशा प्रियकराच्या प्रेमात पडली. या प्रेमामध्ये ती खोल खोल बुडत जाते. तिला या चंचलतेची जाणीव आहे. आपण कोसळू, ढळू, पण ज्याच्यावर प्रेम केलाय तो मात्र अढळ आहे. तो सावरून घेईल.

कवी समर सेन यांची 'विरह' (३ जानेवारी १९५९) ही कविता प्रकाशित झाली. या कवितेत ती किंवा तो त्याची किंवा तिची वाट पाहतोय आणि बाजूला रातराणीचे झाड आहे. मध्येच काही तरी हलल्यासारखे, शहारल्यासारखे वाटते. त्या स्तब्ध गर्तेत खिडकीमधून डोंगर दिसतो,

''अजूनही आलेला नाहीस

सावळी संध्या मात्र उतरली आहे.

मावळतीचे करुण आकाश

सुगंध भारावलेली हवा आणि

पानांची कुंद कुजबुज''[१२]

पुढे कवी म्हणतो, त्या अंधारात डोंगर जाणवतो. एका गंभीर वातावरणात काही तरी सूचना असल्याची जाण होते. तो म्हणजे तू अजूनही आलेला नाहीस त्याची तीव्र अनाम ओढ असलेली ती त्याची वाट पाहत आहे. सावळी संध्या मात्र अधिक अधिक गडद होत चाललीय. अंधार पडू लागला आहे. ही हवा सुगंधाने भरलीय. पानांचीही कुंद कुजबुज सुरू झालीय. तू मात्र आला नाहीस. झाडांची पाने थरथरतायत. तुझी आठवण असह्य करत आहे.

कवी अरविंद कुलकर्णी यांची 'स्पर्श' (३ जानेवारी १९५९) ही कविता प्रकाशित झाली. या कवितेमध्ये कवी म्हणतो–

''मी तुला सहज विचारले

तशी तू एका क्षणात पालटून गेलीस

आणि काकुळतीन जडावलेली

दोन बुबळं माझ्या डोळ्यांत रुतवत

ओढल्या आवाजानं खोल म्हणालीस

''ते सारं खरं आहे रे

पण तो सारा मूर्खपण होता

कधींच ओसरला आहे तो''[१३]

प्रस्तुत कवितेमध्ये 'तो' आणि 'ती' दोघे अनेक दिवसांनी भेटतात. ख्यालीखुशाली विचारत काही आठवणींना स्पर्श करतात. तो म्हणतो, मी तुला सहज विचारलं तर तू क्षणार्धात पालटलीस आणि 'तो' सारा मूर्खपणा होता हे सांगत. तो कधीच ओसरूनही गेल्याचे सांगत होतीस. माणसाच्या जीवनातले कदाचित हे मृगजळ असावे. कस्तुरी आपल्याच जवळ असताना दाही दिशांना फिरणारे हरिण तशीच या कवितेतील 'ती' कुणीतरी आपलेसे वाटावे, त्याच्या खांद्यावर विश्वासाने डोके ठेवावे. तेवढ्यातच तो बाजूला होतो. आपलाच कपाळमोक्ष व्हावा, हे

नवीन नाही. पण या धावण्यात, पळण्यात कधी कधी काही तरी आपले हक्काचे निसटत जाते. बरेच अंतर पार केल्यावर या आपल्या हक्काच्या निसटत गेलेल्या क्षणांना भिडण्याची वेळ यावी आणि आपले तेव्हाचे पळणे किती मूर्खपणाचे होते. हे तितकेच विश्वासाने कबूल करावे. त्या पळण्याची, धावण्याची स्मृतीसुद्धा नकोशी वाटावी आणि आपलेच हक्काचे ते सुटलेले जग परत आपल्याला सांभाळण्यासाठी हात पसरावे. जणू आभाळाला कवेत घेण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती संचारावी आणि आपल्याच प्रामाणिकतेचे एक एक संदर्भ आपणच द्यावे. आपल्याच उघड्या डोळ्यांदेखत आपल्यावर झालेले खोलवरचे घाव दाखवत आपला असहाय्य प्रामाणिकपणा अगतिकतेने दाखवत. तू पूर्ण विश्वास ठेव, मी जे सांगते, ते या मातीइतकेच खरे आहे. मी कोरी आहे अस्पर्शिता; तो मात्र साशंक.

कवी समर सेन यांच्या 'झोप' आणि 'विरह' (३ जानेवारी १९५९) ह्या कविता प्रकाशित झाल्या. 'झोप' ही कविता प्रत्येक माणूस कोणत्या ना कोणत्या चिंतेत जगत असतो. कधी ते समजते तर कधी ते समजतही नाही. कधी कधी तर तसे स्वप्नही पडायला लागतात. स्वप्न वेगळे असते आणि वास्तव वेगळे असते. जाग आल्यावर वेगळेच जग असते. कवितेमध्ये कवीला वादळ्या रात्री काळसर झोपेत संकटाचा काळजीचा ताण–तणावाचा अविश्रांत आवाज येत राहतो. अंत:करणात कशाचे तरी काहूर उठलेले आहे. ते भीतीचे, चिंतेचे, कशाचेही असू शकते. अशा वेळी जर झोप लागली, तर स्वप्नातही काळरात्रच. कुठे तरी ट्रेनचा आवाज, मध्येच पक्ष्यांचे फडफडणे, मांजरीचा आवाज. या साऱ्या भयाण वातावरणात आदिमानव कुणीतरी भटकतो आहे. अशा वेळी दऱ्याखोऱ्यांत साप आपला हरवलेला मणी शोधतो आहे.

''साप हुडकतो आहे
आपला हरवलेला मणी
दोन्ही डोळ्यांचे पलिते घेऊन
हे हे स्वप्न विरतं
वादळ्या रात्री काळसर झोपेत''[१४]

सापाचे भयानक डोळे तो नागमणी शोधतो हे स्वप्न विरत सकाळी जेव्हा जाग येते, तेव्हा मात्र सर्वत्र प्रकाश विखुरलेला. जणू प्रकाशाच्या कुंकवाचा सडा पडावा. रात्र काळीशार पण दिवस मात्र प्रकाश देणार.

'पलीकडली वाट उमलते' (३ मे १९५९) ही मंगेश पाडगांवकरांची कविता प्रेम, विरह, काळजी, वैफल्य ह्या भावनांना घेऊन जगणाऱ्या प्रियकराच्या मनाचे विश्लेषण करणारी आहे. कवी प्रस्तुत कवितेमध्ये म्हणतो. माझ्याभोवती गडद अंधार आहे. हा अंधार सकाळ होताच विरणार आहे. माझ्या जीवनातला अंधार तूच संपवू शकशील. या गडद अंधारात या गोभुवनाला पुरून उरणारा प्रकाश घेऊन येतेस. कवी म्हणतो,

''हा गंध तुझ्या किमयेचा
वाऱ्यातून वाहत येतो
हा रंग तुझ्या प्रीतीचा
पाकळ्यात दडुनी हसतो
रे अद्‌भुत सारे सारे
वेदनेत सांत्वन फुलते
अन् धुक्यातून भवतीच्या
पलिकडली वाट उमलते''[१५]

प्रस्तुत कवितेमध्ये कवी म्हणतो, या अंधारमय काळजी, वैफल्यात गुरफटलेल्या मनाला तू माझ्यासाठी एकच प्रकाश आहेस. मला या परिस्थितीत तुझ्या प्रेमाची, तुझी आठवण येते आणि माझ्या मनात प्रकाशाचे तेजःपुंज येतात. जीवनात ग्रीष्म तावूनसुलाखून येतो, तसाच अचानक मेघही भरून येतो. असंच तुझे प्रेमही माझ्या मनात येते. माझ्या या नैराश्याने भरलेल्या जीवनात तुझ्या प्रेमाचे दर्शन घडणे. मला पुन्हा जगायला भाग पाडते. तुझे प्रेम माझ्या आयुष्यातला उन्हाळा रखरख संपवून टाकते आणि हिरवळ येते. तू माझ्यासाठी आनंद, सुख आणि प्रेरणा आहेस. या अंधकारमय जीवनात आशेचा किरण आहेस.

कवी लक्ष्मीकांत तांबोळी यांची 'पंख फुटण्याआधीच' (२३ मे १९५९) ही कविता प्रकाशित झाली. या कवितेमध्ये कवी म्हणतो–

''पंख फुटण्याआधीच
दिली अनंताशी झुंज
केली आभाळाशी मस्ती
रक्ताळली जरी चोंच''[१६]

पंख फुटण्याआधीच म्हणजे समज येण्याआधीच, भल्या–बुऱ्याची समज येण्याआधीच मी अनंताशी म्हणजे सर्व शक्तिमान असणाऱ्या शक्तीशी झुंज दिली आहे. एवढेच नाही तर मी आभाळाशी मस्ती केली म्हणजे माझ्यासारख्या एका सामान्यानी परिस्थितीशी झगडताना थेट आभाळाला भिडावे, हे सोपे नाही. सोपे नसतच मुळी.

यात माझी चोच रक्ताळली. जणू एखाद्या पक्ष्याला आरशात आपले प्रतिबिंब दिसावे; पण ते दुसरे कुणी तरी आहे. याच्या भासाने त्याने आपल्याच प्रतिबिंबाला आपल्याच चोचीने मारावं. हा मारा इतका जास्त असेल की, त्याची चोच रक्तबंबाळ व्हावी. एवढेच नाही, तर ही रक्तबंबाळ झालेली चोच मनातली ती खोलवर झालेली वेदना जिचा आरंभापूर्वीच अंत झाला. जणू एखादे स्वप्न पाहण्यापूर्वीच निद्रानाश व्हावा आणि हे स्वप्न भंगण्याचे दु:ख घेऊन कित्येक वेळा ठेचाळलो. या वेदनेला उराशी बाळगत सैरावैरा पळत सुटलो. पण आता हे काही नकोसे झाले. शब्दही नकोत. आता सगळीच कवाडे बंद व्हायला हवीत. या वेदनेची तगमग जीवाची असहाय्य जणू श्वासाचे व्यर्थ गाठोडे व्हावेत. ही कविता वेदनेचे संदर्भ देते. जीवनाच्या एका वळणावर उमलू पाहणारे एखादे नाते उमलण्यापूर्वीच कोमजत सुकते; शेवटी संपते. ही वेदना घेऊन जगणारे या वेदनेमध्ये असहाय्य तगमगणारे मन आणि त्याचे चित्रण आलेले आहे.

मराठी वाङ्मयातील कविता हा वाङ्मयप्रकार प्राचीन असून, वाचकप्रिय असा आहे. मराठी वाङ्मयाची अभिरुची वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने कवितेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मराठी काव्यामध्ये अनेक स्थित्यंतरे झालेली दिसतात. मुळात भक्तिभावामधून निर्माण झालेले पद्यवाङ्मयाचा ईश्वरोपासना हा मुख्य उद्देश होता. अनेक शतके हा प्रवास सुरू होता. वेद, उपनिषद, रामायण, महाभारत यांसारख्या ग्रंथांमधून होत असलेला हा पद्यलेखनाचा प्रवास ईश्वरोपासना, मोक्षप्राप्ती, पुण्यसंचय अशा उद्देशाने उदयाला येत होते. इ. स. १२ व्या शतकामध्ये मराठी वाङ्मयातील पद्यरचनेत बदल होताना दिसतात. पारंपरिक चौकटीला हादरे देत नव्या दमाचे लेखन येत होते. महानुभाव संप्रदायाचे साहित्य, त्याच काळातील वारकरी संप्रदायाची रचना, त्यात संतमेळाव्याची अभंगवाणी, ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, तुकारामांचे अभंग, संत जनाबाई, मुक्ताबाई यांची अभंगरचना, आपल्या अभंगाच्या माध्यमातून व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या अनेक रचना या काळात येत होत्या. त्यातून पद्यरचनेच्या प्राचीन चौकटीला हादरे बसू लागले. नव्याचे स्वागत होणे हे एवढ्या लवकर शक्य नव्हते. या लेखनावर टीकाही होत

होत्या. शिवकाळात परिस्थिती आशादायी होती, पण पेशवाईमध्ये पुन्हा पाप–पुण्यावर अधिक लक्ष केंद्रित झाले आणि पुन्हा एकदा लेखनाच्या दृष्टीने नव्याने विचारप्रवाह येत गेले. याला कारण म्हणजे इंग्रजांचे भारतात आगमन होय. पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजांचे पाय भारतामध्ये अधिक बळकटपणे रोवले जात होते. सर्वांसाठी शाळा, रेल्वे, कारखाने इत्यादींचा उदय होत होता. अनेक जातींमध्ये विखुरलेला, समाज स्पृश्य–अस्पृश्यतेत बंदिस्त झालेल्या भारतीय समाजमनावर धर्मग्रंथांनी हजारो वर्षांपासून पकड निर्माण केली होती. इंग्रजांच्या आगमनामुळे या सर्व तत्त्वज्ञानाला धक्के बसू लागले. त्यातच इंग्रजी साहित्याच्या अनुवादाचा काळ आला. याला मराठी वाङ्मयाच्या इतिहासामध्ये 'भाषांतर युग' असे म्हणतात. या काळात अनेक दर्जेदार इंग्रजी पुस्तकांचे मराठीमध्ये भाषांतरित होत होती. कथा, कविता, कादंबरी, नाटक हे वाङ्मय प्रकार पहिल्यांदाच येथे वाचले जाऊ लागले. नकळपणे हे वाचक तुलना करू लागले. भारतीय तत्त्वज्ञान आणि त्यात भरडला जाणारा येथील सामान्य माणूस. त्या धर्तीवर पाश्चात्त्य माणूस आणि त्याच्या जगण्यातले तत्त्वज्ञान यांचा अभ्यास आणि तुलना होत होती. काय सत्य, काय असत्य यावरही चर्चा होत होती. साहित्यात सामान्य माणूस असावा की नसावा ह्याही चर्चा होत होत्या. साहित्यलेखन हे केवळ ईश्वरभक्तीसाठीच करायचे की सामान्य माणसाचे जगणे समृद्ध करण्यासाठी करायचे, हाही प्रश्न येथील अभ्यासकांना पडायला लागला. यामधून पहिल्यांदा सन १८१८ ते १९२० या काळात सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून कथा, कविता, कादंबरी लिहिली जाऊ लागली. कवितेच्या बाबतीत बोलायचे झाले, तर केशवसुत यांनी मराठी कवितेचा आत्मा बदलला. सामान्य माणूस, त्याच्या जीवनातला संघर्ष, सुख–दुःख या साऱ्यांचे चित्रण त्यांच्या कवितेत होत होते. त्याचबरोबर निसर्ग, प्रेम, सामाजिक प्रश्न व सामान्य माणूस त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू बनवला. हे केशवसुताचे कार्य महत्त्वाचे मानावेच लागेल. त्याच काळात किंबहुना त्यापूर्वी महाराष्ट्रात सावित्रीबाई फुले यांनीही काव्यलेखन केलेले आढळून येते. सावित्रीबाईंच्या कविताही तत्कालीन परिस्थितीवर बोट ठेवतात. महाराष्ट्राची तत्कालीन परिस्थिती, निरक्षरता, भेदाभेद, जातिव्यवस्था इत्यादींवर कवितेच्या माध्यमातून विचार व्यक्त होतात. या नंतरच्या काळात मराठी कवितेची भरभराट होताना दिसते. केशवसुतांच्या नंतर रविकिरण मंडळाने कवितेच्या प्रांतामध्ये अनेक प्रयोग केले. कविता गायनापासून ते लिखाणापर्यंत या काळातली कविता अधिक समृद्ध होताना दिसते. यानंतर नवकाव्याचा काळ

येतो. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाजात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब त्यात उमटत असते. कवितेतही असे तत्कालीन संदर्भ आलेले दिसतात.

साहित्यलेखन हे एक प्रकारचे (काहीअंशी) इतिहासलेखनही असते. समाज स्थित्यंतराचे अनेक संदर्भ साहित्यात आढळतात. मराठी कवितेच्या प्रवासाचा धांडोळा घेतला असता महाराष्ट्राच्या जडणघडणीचा इतिहास त्यातून दिसतो. सानेगुरुजींनी १५ ऑगस्ट १९४८ रोजी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. खरे तर यामागे त्यांची स्पष्ट अशी भूमिका होती. त्यांनी ती 'साधना'च्या पहिल्याच अंकामध्ये नोंदवली होती. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारताने स्वातंत्र्याचा गड जिंकला खरा; पण त्यानंतर भारतासमोर अनेक प्रश्न 'आ' वासून उभे होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पुन्हा समाज जातीपातींच्या कोशात बंदिस्त होत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली गावकुसाबाहेरचा माणूस एकत्र येत होता. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ असावा. इथपर्यंत अनेक बाजूंनी वंचितासाठी लढा उभारला जाऊ लागला. स्वतंत्र भारताचे उद्याचे संपन्न स्वप्न पाहणारे कार्यकर्ते स्वतःला झोकून देऊन अहोरात्र कामाला लागले होते. अशातच ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींची हत्या करण्यात आली आणि सबंध देश खाडकन् जागा झाला. दीडशे वर्षांचे पारतंत्र्य झुगारून अथक परिश्रमाने मिळवलेले स्वातंत्र्य यासाठी लाखोंनी दिलेले बलिदान आणि मोठ्या विश्वासाने पुढच्या पिढ्यांच्या हाती सोपवलेले हे स्वातंत्र्य. पण अवघ्या साडेपाच महिन्यांत झालेली महात्मा गांधींची हत्या आणि या हत्येनंतर उठलेला प्रचंड द्वेषाचा वणवा. गावेच्या गावे जाळली गेली. माणूस माणसापासून कोसो दूर गेला. या साऱ्या घटनांचा परिणाम मातृहृदयी सानेगुरुजींवर झाला. तेही व्यथित झाले, अंतर्मुख झाले. यामधून समाजाला शहाणे करणे हा एकच मार्ग त्यांना दिसत होता. ही प्रक्रिया खूप अवघड आहे, दूरगामी आहे याचेही भान सानेगुरुजींना होते. या सर्व बाबी लक्षात घेऊन त्यांनी 'साधना' साप्ताहिकाची सुरुवात १५ ऑगस्ट १९४८च्या स्वातंत्र्य दिवसाच्या पहिल्या वर्धापन दिनाच्या औचित्याने केली. 'साधना' साप्ताहिकामधून तत्कालीन महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होत होती. या बरोबरच वाचकांची अभिरुची वृद्धिंगत करणारे लेखनही मोठ्या प्रमाणात प्रकाशित होत होते. कवितेच्या बाबतीत बोलायचे झाल्यास 'साधना' साप्ताहिकाने १९४८ ते १९६० या काळात अनेक दर्जेदार कविता प्रकाशित केल्या. जगदीश खेबूडकर, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, संजीवनी, माणिक गोडघाटे, आरती प्रभू या सर्वांच्या काव्यलेखनाचा हा सुरुवातीचा

काळ. या काळामध्ये या नवोदितांचे काव्यलेखन 'साधना'मधून प्रकाशित होत होते. यामधून नवोदितांना लिहिण्याचे बळ मिळत होते, तर वाचकांनाही नवे वाचल्याचा आनंद मिळत होता. वाङ्मयीनदृष्ट्या वाचकांची अभिरुची वृद्धिंगत करण्याचे काम 'साधना' साप्ताहिकाने अविरतपणे केले आहे. नव्हे ते आजतागायत सुरू आहे.

## ४.३० कथा :

**प्रस्तावना** :

१९ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत बालवाङ्मय स्वतंत्रपणे लिहिले नव्हते. रामायण, महाभारत, कालखंडात प्राणी कथा, कल्पित कथा, अद्‌भुत कथा, लोककथा, बुद्ध जातक कथा, जैन कथा, पंचतंत्र, हितोपदेश अशा कथांची भर पडून भारतीय वाङ्मय समृद्ध झाले. सर्वसामान्य लोकांना मनोरंजनातून नीती शिक्षण देण्याचा या कथांचा हेतू होता.

मुलांचे कोवळे मन भावनाशील व संस्कारक्षम असल्यामुळे यातील बऱ्याच कथा मुलांना अधिक उपयुक्त होत्या. स्त्रियांनी मोठ्या कौशल्याने निवडक कथा मौखिक परंपरेने मुलांपर्यंत पोहोचल्यावर मराठी साहित्यात बालवाङ्मयाची भर मुद्रणकलेच्या शोधानंतर युरोपातून भारतात येणारे ख्रिस्ती धर्मप्रसारक बायबलचे व ख्रिस्ताचे उपदेशपर साहित्य भारतीय भाषांत छापण्यासाठी मुद्रणालय काढू लागले. ख्रिस्ती धर्माची माहिती लोकांच्या मातृभाषेतून सांगणे अधिक परिणामकारक ठरणारे होते. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धातले लिखित बालसाहित्य बाल्यावस्थेत होते. सोपी सुटसुटीत भाषा, कुतूहल, औत्सुक्य वाढवणारी मांडणी, मनोरंजक व विचारप्रवर्तक प्रसंग, कथा खुलवण्याची हातोटी यामुळे भरीव कार्य केले होते. पण लिखित बालसाहित्याची भाषा बोजड, शैलीचा अभाव, अवघड कथावस्तू असे दोष दिसत असले, तरीही बालसाहित्याच्या प्रगतीचे प्रयत्न या काळात चालू होते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील नारायण वामन टिळक, पंडित महादेवशास्त्री जोशी, गोपीनाथ तळवळकर, वामन चोरघडे, के. नारखेडे, सानेगुरुजी मालतीबाई दांडेकर, भा. रा. भागवत, संजीवनी मराठे आदी बालसाहित्यिकांनी या कालावधीत लेखन करून काव्य व गद्य विभाग आकर्षक व संपन्न केला. या लेखकांनी स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील बालसाहित्यात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी बालसाहित्याने सोपी व मनोवेधक

भाषा वापरली. मुलांच्या वयानुरूप विषयाची निवड व कल्पना याबाबतीत विकास घडवून आणला.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्योत्तर काळात लेखन करणाऱ्या साहित्यिकांमध्ये काही लेखक स्वातंत्र्यपूर्व काळातही लिहीत होते. त्यापैकी सानेगुरुजीचे साहित्य स्वातंत्र्योत्तर काळात विशेष लक्षवेधी ठरले. त्यांच्या लेखनात ओघवती भाषा, सहजसोप्या भाषेने व शैलीने इतर लेखकांच्या लेखनावर ठसा उमटवला. भा. रा. भागवत स्वातंत्र्यपूर्व काळापासून लिहीत असले तरी त्यांच्या 'फास्टर फेणे'च्या कादंबऱ्यामुळे भागवत हे मुलांचे लाडके लेखक बनले. मालतीबाई दांडेकर यांनी स्वातंत्र्योत्तर काळात अनेक कथा–कादंबरी, नाटुकल्यानी मराठी साहित्यात मोलाची भर घातली. या काळात वामन चोरघडे, गोपीनाथ तळवलकर, गो. नी. दांडेकर, महादेवशास्त्री जोशी, श्री. बा. रानडे, दुर्गा भागवत, देविदास बागूल हे लिखाण करीत होते. पौराणिक ऐतिहासिक, सामाजिक, लोककथा, साहसाच्या व शौर्याच्या छोट्या–मोठ्या कथा, स्वातंत्र्योत्तर काळात लिहून मुलांना आनंद दिला. भारतीय संस्कृतीची ओळख करून दिली.

स्वातंत्र्योत्तर काळात बालसाहित्य स्पर्धा सुरू झाल्या. राज्य पुरस्कार देण्यात येऊ लागले. नव्या–जुन्या बऱ्याच साहित्यिकांनी वेळोवेळी भाग घेऊन स्वकल्पित सुंदर पुस्तके लिहिली. यामध्ये प्रामुख्याने लीलाधर हेगडे, भा. रा. भागवत, लीलावती भागवत, विंदा करंदीकर यांसारख्या लेखकांचा नामोल्लेख करता येईल. सरकारी स्पर्धेचे फायदे म्हणजे बालसाहित्याच्या मजकुराची व सुंदर चित्रांची दर्जेदार पुस्तके निर्माण झाली. बरेच नवे लेखक उदयाला आले. १९६५ पर्यंत मुलांचे व त्यांच्या पालकांचे लक्ष बालसाहित्याच्या पुस्तकाकडे आकर्षित झाले. पुस्तकाचा मजकूर टाइप, आकार, सजावट, सौंदर्यदृष्टी व मुलांचे वय लक्षात घेऊन बरेच बदल करण्यात आले.

१९५७ मध्ये दिल्लीत नॅशनल बुक ट्रस्ट ही संस्था स्थापन झाली. नेहरू बाल पुस्तकालय दिल्लीत स्थापन करण्यात आले. या संस्थांनी मोठी रंगीत चित्रांची, ठळक टाइपांची, चित्तवेधक पुस्तके काढून बालसाहित्याचे आकर्षण निर्माण केले. नॅशनल बुक ट्रस्टच्या विविध पुस्तकात प्राण्यांची, पक्ष्यांची माहिती, वेगवेगळ्या भाषांतील काही गमतीदार लोककथा, परदेशी कथांचे अनुवाद व काही स्वतंत्र कथा असे साहित्य निर्माण केले.

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रीमच्या परिकथा, अँडरसनच्या परिकथा अनुवादित करून मराठी साहित्यात मोलाची भर घातली. स्वातंत्र्योत्तर गद्य बालसाहित्यात जुन्या आणि नव्या लेखकांनी भर घातली. यात प्रामुख्याने यदुनाथ थत्ते, सरोजिनी बाबर, शैलजा राजे, सरिता पदकी, शांता शेळके, वि. म. कुलकर्णी, ग. ल. ठोकळ, राजा मंगळवेढेकर, रा. वी. सोवनी, वि. स. सुखटणकर, शकुंतला बोरगावकर, विजया वाड अशी कितीतरी नावे देता येतील. यापैकी काहींचे लेखन अनुवाद, रूपांतर स्वरूपाचे तर काहींचे स्वतंत्र आहे.

पौराणिक अद्‌भुत व परिकथा, भारतीय व परदेशी लोककथा, भारताच्या ऐतिहासिक कथा, शौर्य व साहस कथा, विज्ञान कथा, चरित्रे, सामाजिक कथा अशी विविधता स्वातंत्र्योत्तर काळातील बालकथा साहित्यात दिसून येते. स्वातंत्र्योत्तर काळातील कथा लेखकांनी मनोरंजक वर्णन, चित्तवेधक प्रसंग, छोटी–छोटी वाक्ये, सोपी भाषा आणि आकर्षक शैली यांचा सुरेख साहित्यिक साज चढवून मराठी बालसाहित्य लक्षवेधी व दर्जेदार केले.

स्वातंत्र्यपूर्वीची शालापत्रक, आनंद, मुलांचे मासिक ही बालसाहित्याची सेवा करणारी मासिके होत. स्वातंत्र्योत्तर काळात बिरेंद्र आयडिया यांनी १९४७ 'कुमार' मासिक काढले. भा. रा. भागवतांनी १९५१ मध्ये 'बालमित्र' मासिक काढले. ही दोन्ही मासिके आर्थिक तोट्यामुळे पुढे बंद करण्यात आली. याशिवाय कुमार– वि. वा. शिरवाडकर, अमरेंद्र गाडगीळ– गोकूळ मासिक, मराठी पाठ्यपुस्तक मंडळातर्फे किशोर हे रंगीबिरंगी चित्रांचे, बऱ्याच मजकुराचे मासिक सुरू झाले. आनंद, कुमार, मुलांचे मासिक आणि किशोर या मासिकांनी मनोरंजनातून संस्कृती संवर्धनाला हातभार लावला. काही मोठ्यांची मासिके दिवाळीसाठी मुलांकरिता पुरवण्या काढतात. एकंदरीत स्वातंत्र्योत्तर बालसाहित्याच्या विविध शाखांत आधीपेक्षा अधिक कल्पनारम्य, सोपे शैलीदार विचारप्रवर्तक ज्ञान, विज्ञानाभिमुख व मनोरंजनपर विपुल लेखन या काळात झाले.

या पार्श्वभूमीवर १५ ऑगस्ट १९४८ला सानेगुरूजींनी सुरू केलेल्या 'साधना' साप्ताहिकातून मुलांसाठी प्रकाशित झालेल्या मुलांच्या मेळाव्यात, साधनेच्या कथा व इतर कथा या सदराखाली ना. ग. गोरे, दुर्गा भागवत, सानेगुरुजी, वसंत बापट, राधाबाई आपटे, काकासाहेब कालेलकर, मंगेश पाडगावकर, महादेवशास्त्री जोशी, वामन चोरघडे, प्रेमा कंटक, सुधा नरवणे, गो. नी. दांडेकर, ललिता भावे, शंकर सारडा, आनंदीबाई शिर्के, शकुंतला

बोरगावकर, केशव मेश्राम, देविदास बागूल, राजा मंगळवेढेकर, लीलाधर हेगडे, कुसुमावती देशपांडे, रमा बखले, यदुनाथ थत्ते, शिरूभाऊ लिमये, रा. भी. जोशी, दि. के. बेडेकर, भा. रा. भागवत, विद्या आनंद नारळीकर, मधुकर केचे, कमल मराठे, अशोक शहाणे आदी लेखकांच्या कथांचा प्रकाशित झाल्या होत्या. त्यातील निवडक लेखकांच्या कथांचा आढावा घेण्यात आला.

**१. पिंपळाचे दिवे मालवले :**

'पिंपळाचे दिवे मालवले' (७ ऑगस्ट १९४८) ही कथा 'मुलांच्या मेळाव्यात' या सदरात फासेपारध्याची एक सुंदर लोककथा दुर्गा भागवत यांनी लिहिली आहे.

या कथेत वड आणि पिंपळ या झाडांना कसे महत्त्व प्राप्त झाले याची गोष्ट आहे. वड आणि पिंपळवृक्षाची आजही स्त्रिया तेवढ्याच श्रद्धेने पूजा करतात.

एके दिवशी विंध्य पर्वतावर दोघी बहिणींचे रूप घेऊन देवता (देवकन्या) उतरल्या यांनी वडाचे आणि पिंपळाचे रूप धारण केले. दोघी रात्रंदिवसा वेगवेगळी रूपे घेऊन हिंडून रात्री आपल्या निवासस्थानी वृक्षात एकरूप होत. माणसांची सुखदु:खे कशी असतात, हे त्यांना पाहावयाचे असते. तहान आणि भूक कशी असते, ते अनुभवायचे होते. शारीरिक वेदना आणि उपभोग म्हणजे काय, हेही त्यांना पाहायचे होते. त्या सगळीकडे फिरू लागल्या. तहानेने त्याचा घसा कोरडा पडू लागला. एके ठिकाणी साचलेले पाणी बघून त्यांना बरे वाटले. माणसांनी पाण्याची व्यवस्था विहिरी खोदून केल्या. घरोघरी दगडाच्या भांड्यात, मातीच्या कुंभात पाणी साठवून माणसाने तहानेची तृप्ती करून घेतली आहे. परंतु देवतांना असे करता येत नाही. मग ही दोन झाडे माणसांना पाणी मागू लागले. तहानेचे सुखदु:ख समजले. मग माणसे त्या झाडांना नैवेद्य दाखवू लागले. इतर देवतांना बलिदान करत, तसे या झाडांना मांसाहाराचा नैवेद्य दाखवू लागले. मग त्यांना याचेही सुख कळू लागेल. पुढे निष्पाप व खोडियाल मातेपुढे नरबळीची गर्दी होऊ लागली. माणसांच्या नवसाला पावत होते. हळूहळू नरबळी वाढू लागले. भक्तांनाही बळी पुरविणे कठीण होऊ लागले. त्यांना तरुण रक्त आवडत असे. परंतु यामुळे गावातील तरुणांची संख्या कमी होऊ लागली. एकदा एका घरी मुलगा आजारी पडला. त्याच्या घरचे सगळे तरुण वडील, काका, मोठे भाऊ सारे देवीला बळी गेले होते. शेवटी हा वंशाचा दिवा राहिला होता. हा आजारी पडला म्हणून त्याचे आजोबा देवीला नवस करतात. परंतु बळी देण्यास कोणी तयार होत नाही. मग देवतांना गहू व गुळाचा नैवेद्य दाखवून प्रसन्न करूयात म्हणून म्हाताऱ्याने

युक्तीनेच हा नैवेद्य केला. अशाने काही तरी देवीचा कोप होईल म्हणून कोणीच म्हाताऱ्याच्या गोष्टीचा स्वीकार केला नाही.

शेवटी म्हातारा म्हणतो, खोडियाल माते, पिंपळमाते, आजवर तुमच्या दयेने आम्ही सुखात आहोत. तुमच्या पूजेत आम्ही काही कमी पडू दिले नाही. पण आता मातांनो घरात पुरुष तरुण कोणीच राहिले नाही. माझं लेकरू आजारी आहे. त्याला वाचवा. गहू आणि गुळाच्या नैवेद्याचा स्वीकार करा. कोप होऊ देऊ नका. आमच्या समस्त गावकऱ्यांवर दया करा. असे म्हणून म्हातारा देवीला विनवण्या करतो. शेवटी या कथेत देवताही हेच गोड मानून घेतात. सगळ्यांवर कृपादृष्टीचा वर्षाव करतात सुखी राहण्याचा आशीर्वाद देतात.

आजही स्त्रिया वडाला आणि पिंपळाला पुजतात. स्त्रीचे सौभाग्य टिकून राहावे. मूलंबाळ व्हावे म्हणून नवस करतात पूजा करून शिऱ्याचा नैवेद्य करतात, अशी ही कथा आहे. या कथेतून नरबळी प्रथेविषयी माहिती आलेली असूनही काळाप्रमाणे या प्रथेत झालेला बदलही लेखिका या कथेतून अधोरेखित करते.

२. **बळी** :

'बळी' (४ सप्टेंबर १९४९) ही दुर्गा भागवत यांची कथा नरबळीच्या प्रथेविषयी माहिती देते. या कथेत एका गावात राजा, मुलगी राजकन्या आणि सावकाराचा मुलगा कुमार या व्यक्तिरेखा आल्या आहेत. राजकन्या व कुमारचा या दोघांचे एकमेकांवर प्रेम आहे. ते लहानपणापासून एकत्र शिकलेले, त्याच्या घनिष्ठ मैत्रीचे प्रेमात रूपांतर होते. त्यांच्या लग्नाची बातमी राजाच्या कानावर जाते. राजा राजकन्येला राजवाड्यातून बाहेर जाऊ देत नाही. एके दिवशी राजकन्या त्यांच्या बागेतल्या घोडीला विचारते. तू मला मदत करशील? ती घोडी म्हणते, हो मी मदत करेन.

कुमार राजवाड्याच्या बाहेर थांबलेला असतो आणि राजकन्या घोडीला घेऊन राजवाड्यातून बाहेर पडते. दोघे मिळून खूप दूर जातात. एके ठिकाणी म्हातारीच्या घरी मुक्काम करतात. ती म्हातारी चोरांची आई असते. तिला सात मुले असतात. सहा मुलांनी प्रवाशांना लुटून त्यांच्या बायका पळवल्या आणि त्यांच्याशी लग्न केले होते. म्हातारीला सात नंबरच्या मुलासाठी ही राजकन्या आवडते. कुमार घोडीवर गेल्यानंतर हे दरोडेखोर जाऊन कुमारला

मारून टाकतात आणि राजकन्येला धाकट्याशी लग्न कर म्हणतात. पण ती नकार देते. धाकटा मुलगासुद्धा भावांना विनवतो मला लग्न करायचे नाही. तिला सोडा.

सगळे कुमारला, राजकन्येला तिथेच सोडून जातात. राजकन्या कुमारला घट्ट मिठी मारून खूप रडत असते. रात्रभर ती कुमारच्या प्रेताला कवटाळून शोक करीत असते. तिचे रडणे परमेश्वराच्या कानी जाते. परमेश्वर आपल्या विधी आणि विधाता यांना तिच्या रडण्याचे कारण विचारून या. विधी आदेश देतात तेव्हा विधाता खाली येतो. तिथे घडलेला प्रसंग पाहून परमेश्वराला कळवतात.

विधी आणि विधाता येऊन तिला भीती घालतात. पण ती अजिबात कोणालाही घाबरत नाही. ती कुमारला सोडून कुठेच जात नाही. राजकन्या या विधात्याला नवऱ्याला जीवनदान देण्यास विणवते. विधी आणि विधात्याने कुमारला जिवंत केले आणि ते दोघेही क्षणातच नाहीसे झाले. राजकन्येचा आनंद गगनात मावेना. ते दोघे पुढे चालत चालत एका गावात आले आणि तिथे काम शोधू लागले. त्यांना एका राजधानीत तलाव खोदण्याचे काम मिळाले. कुमार तिथे कामाला जाऊ लागला. तलाव खूप खणला तरी त्याला पाणी लागेना. त्या वेळी राजाने दैवी उपाय केले. तलावाला पाणी लागले नाही म्हणून शेवटी कुमारचा बळी दिला जातो. मग तलाव पाण्याने भरला जातो.

राजा तलावाला पाणी लागल्याच्या खुशीत गाव जेवण देतो याचा गावभर आनंद साजरा केला जातो. पण, दुसरीकडे पाणी लागण्यासाठी कुमार बळी गेल्यामुळे शेवटी राजकन्या ही तलावात आपले जीवन संपवते. या कथेतून 'जल है तो कल है' या उक्तीप्रमाणे ''पाणी मानवी जीवनात किती महत्त्वाचे आहे' हेच ही कथा सूचित करते. पण त्यासाठी बळी देण्याच्या प्रथेचा समाजमनावरील प्रभाव आजही दिसून येतो.

### ३. **बालकन–जी–बारी :**

'मुलांच्या मेळाव्यात' या सदरात 'बालकन– जी– बारी' (३० सप्टेंबर १९५०) हा गोपीनाथ तळवळकर यांचा लेख प्रकाशित झाला आहे. या लेखात 'बालकन–जी–बारी' या सिंधी शब्दाचा अर्थ मुलांचे उद्यान व बालवाडी आहे. या संस्थेविषयी लेखकाने माहिती सर्वांपर्यंत पोहोचवली आहे. बालकन जी बारी ही शिशू जीवनातील आनंद व विकासासाठी

धडपडणारी संस्था आहे. या लेखात मुलांच्या सर्वांगीण विकासाबरोबर विविध भागातील मुलांना शिक्षण आणि मनोरंजन या गोष्टींची आवश्यकता आहे.

निसर्गत: मुले आनंदी व निष्पाप असतात आणि त्यांची मने फुलासारखी असतात. हे मुलांचे एक विशेष आहे. हे वैशिष्ट्य तसेच ठेवून त्यांचा विकास करणे, हे कार्य या संस्थेने केले आहे. बालवाडीचे स्वप्न पाहिलेले भोजराज म्हणजेच मुलांचे आवडते दादा. दादा नेहमी हसतमुख असतात. ते आपल्या प्रेमळ आणि विनोदी नेत्रांनी बालसृष्टीकडे पाहत असतात. ते 'गुलिस्तान' नावाच्या बंगल्यात राहतात. तेच बालकन–जी–बारीचे केंद्र होय.

'शिक्षण आणि मनोरंजन' हे या संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. या संस्थेत जातिभेद नाही. आपल्या भारतमातेचे एकमेव भावबंधन या संस्थेत प्रमाण मानले जाते. या संस्थेने आजवर कितीतरी बालक संमेलने भरविली आहेत. या संमेलनात आपल्या भारत वर्षाचे विविधरंगी रमणीय चित्रच नेहमी दिसते. या संस्थेत कुठलीच सक्ती नाही. मुले जमली की आपला कार्यक्रम म्हणून सर्व जण ठरवतील तोच खरा.

या बालवाडीच्या एखाद्या संमेलनात गेलो की, विविध पोषाखांनी नटलेली ती बालसृष्टी मोहक दिसते. पुढे लेखक लिहितात, या संस्थेचे संवर्धन श्रीमती पर्वतीदेवी गिडवाणी यांनी फार ममतेने केले आहे. या संस्थेच्या सल्लागारांत कैलासवासी गिजूबाई बधेका यांच्यासारखे गुजरातीतले बालवाङ्मय सम्राट होते. गांधीजी, डॉ. राजेंद्रप्रसाद, पंडित नेहरू, राजगोपालचारी, बाळासाहेब खेर इ. नेत्यांचा आशीर्वाद, कौतुक व सहकार्य या संस्थेला मिळाला होते.

या संस्थेचा उद्देश बालकांच्या जीवनात आनंद व विकासाची संधी मिळावी. प्रांतभेद, जातिभेद, भाषाभेद, वर्गभेद या साऱ्या भेदांच्या कृत्रिम भिंती मोडून टाकाव्यात, अशा दृष्टिकोनातून त्यांचे प्रयत्न चालतात. अशी ही एक संस्था आहे आणि त्याचे कार्यही समाजासाठी पोषक आहे.

## ४. तुळशीचे लग्न :

'तुळशीचे लग्न' (१ मार्च १९५१) ही दुर्गा भागवत यांची कथा मुलांना आणि स्त्रियांना आवडण्यासारखी असून ही कुणबी लोककथा आहे. या कथेतील त्रिवेणीबाई व राघोपंत हे गरीब ब्राह्मण जोडपे अत्यंत कष्टाने दिवस काढत असते. खूप वर्षांनी त्यांना एक मुलगी होते. काळी–सावळी ही मुलगी बापाला जड होते. तिचा सांभाळ तो करू शकत नाही म्हणून तिला तो

जंगलात सोडतो. तिथे तिला विठोबा भेटतो. विठोबा तिला सगळी मदत करतो. विठोबा तिला घरदार देतो. तिला मांजर देतो. तिच्याशी लग्न करण्याचे तो आश्वासन देतो. रुक्मिणीला भेटायला गेल्यावर, विठोबा खूप दिवसांनी आला म्हणून रुक्मिणी रुसते. मग विठोबा झालेली घटना सांगतो. मला एक मुलगी भेटली. मी तिला मदत केली. ती खूप गोड मुलगी आहे. तिचे नाव तुळशी. रुक्मिणीचा राग काही शांत होईना. रुक्मिणीला विठोबाराया समजावतात, ती दुसऱ्यासारखी नाही. खरोखरच ती अनाथ आहे. दहा वर्षांचीच पोरगी. तिला घरच्यांनी घराबाहेर काढले. असेच अनेक दिवसांमागून दिवस गेले. पण विठोबाला रुक्मिणी तुळशीला भेटायला जाऊ देत नाही. रुक्मिणीला विठोबा विनवतो. अगं, मी तुळशीला भेटून परत येईन म्हणून सांगितले. ती वाट बघत असेल. यावर रुक्मिणी म्हणते, की मी जाईन तिची भेट घ्यायला. तुम्ही नका. या कथेत भक्ती आणि प्रेम याबरोबच राग, अविश्वास ही मानवी स्वभावाचे दर्शन घडते.

पुढे तुळशीला भेटायला रुक्मिणी जाते. तुळशीच्या दाराशी जाऊन ओरडते. तुळशी काही दार उघडत नाही. तिला विठोबाची भेट घेऊन आल्याचे सांगते. विठोबाने तुझ्यासाठी भेट पाठवली. परंतु ती रुक्मिणीला दार उघडत नाही. तुळशी घरातून म्हणते जी काही माझ्यासाठी भेट घेऊन आलात. ते तिथे बाहेर खुंटीला अडकून ठेवा. असे म्हटल्यावर रुक्मिणीला राग येतो. ती तिथेच पिशवी बाहेर खुंटीला अडकवते. रुक्मिणी तुळशीवरच्या द्वेषाने तिला भेट न आणता पिशवीत साप घेऊन येते. सकाळी दार उघडून बघते. तर त्या पिशवीतील साप मांजराला चावतो आणि मांजर मरते. तिला त्याचे खूप दुःख होते. तुळशी अबोल होते. पुढे विठ्ठल तुळशीच्या भेटीला येतो. पण तुळशी बोलत नाही. तुळशीला घेऊन विठोबा पंढरपूरला निघतो. वाटेत राघोपंताच्या घरी थांबतो. तुळशी तिथेही काही बोलत नाही. कोणाला ओळखले हेही सांगत नाही. तिथे घरातील वस्तूची चोरी होते. त्याचा आरोप तुळशीवर होतो. परंतु विठोबाने चोरी केल्याचे सांगितले.

पुढे विठ्ठल तुळशीशी लग्न करण्याचा निर्णय घेतो. तुळशीला ही गोष्ट मान्य नसते. तुळशी स्वत: धरणीत समाविष्ट होते. त्यामधून तुळशीची निर्मिती झाली म्हणून प्रत्येक घराच्या दारापुढे तुळशीचे झाड लावतात. तुळशीची निर्मिती झाल्यापासून विठ्ठलाच्या गळ्यात तुळशीच्या

मंजिरी घातल्या जातात. तसे तिचे लग्न झाल्याशिवाय कोणतेच लग्न होत नाही. अशी ही विठ्ठल रुक्मिणी आणि तुळशीची कथा आहे.

''खरंच राग आलेला दिसतो आहे तुला. हे बघ तुळशी, आपण लवकरच लग्न करू. रुक्मिणीने तुला बांगड्या, चोळ्या, साड्या आणि मंगळसूत्र पाठवले आहे. पंढरपूरला येणार ना?'' तरी तुळशी काही बोलेना.

दोन दिवस झाले. चार झाले. दहा झाले, तरी तुळशीचा अबोला सुटेना. विठोबाचे तोंड सुकले. ''बोल, तुळशी बोल. रागाचं बोल. लोभाचं बोल, काही तरी बोल'' तो विनवू लागला. पण कठपुतळीसारखी तुळशी गप्पच राहिली. तुळशीला प्रसन्न करायला काय उपाय करावा म्हणून विठोबा विचार करूं लागला. ''तुळशी, दोन गाव पलीकडे देवळांत खेळ आहे. येतेस पाहायला? जरा मजा येईल सोंग पाहताना, चल.''

विठोबाबरोबर तुळशी निघाली. राघोपंताच्या गावी आली. विठोबाने मुद्दामच तुळशीने बोलावे म्हणून ते घर मुक्कामाला पसंत केले. पण तुळशीने ओळखीचे काही चिन्ह दाखवले नाही.''[१७]

उपरोक्त कथेत तुळशीचा हार विठ्ठलाच्या गळ्यात घालण्याची प्रथा सांगितली असून, निस्सीम प्रेमाची आठवण करून देणारी कथा असून, तुळशीला प्रत्येक घरात मानाचे स्थान का मिळाले ही माहिती मिळते.

### ५. **पुष्पवाहन :**

'पुष्पवाहन' (५ जानेवारी १९५२) ही दुर्गा भागवत यांची कथा आहे. आपल्या जीवनाचे नानाविध दर्शन घडविणाऱ्या प्राचीन पुराणात पुष्कळ कथा आहेत. 'पद्म' पुराणातली ही पुष्पवाहनांची कथा असून दुर्गा भागवत यांनी नव्या स्वरूपात मुलांसाठी लिहिली आहे. या कथेचा नायक बकुळ एक हुशार मुलगा होता. तो घरातली आणि बाहेरची, शेतातली सगळी कामे नेटाने करीत असे. सगळी कामे झाल्यावर तो गावाबाहेरच्या नदीकाठच्या एका दगडावर बसून तासन् तास आकाशाकडे बघत असे.

सगळे जण बकुळला खूप हसत होते, त्याची टिंगल करीत असे. बकुळला विचारले तू आकाशात काय पाहतोस? बकुळ म्हणाला– मला एक कमळ दिसते. त्या कमळाला एक सोन्याचा देठ दिसतो. त्या कमळावर मला राजा–राणी बसलेली दिसतात. अशी नेहमी तो

बडबड करीत असे. त्याच्या वडिलांना त्याचा राग येतो. बऱ्याच वेळा त्याच्या वडिलांनी बकुळचे कान पिरगाळून, मारून त्याला घरी नेले, तरी तो शांतपणे सर्व सहन करीत होता. बकुळ रोज मार खात असे. पण बकुळ राजा–राणीशिवाय काही पाहू शकत नव्हता. बोलू शकत नव्हता. तो उपाशी राहत होता. त्याच्या आईला चिंता वाटायची. बकुळचे पुढे कसे होईल, हा विचार आईला सतावीत होता.

''शुक्राची चांदणी लखलखत होती. बकुळ तिच्याकडे पाहत होता. वर पाहत होता. ते निळे जांभळे कमळ त्याला सकाळी दिसत नव्हते. संध्याकाळीही ते भिरभिरत गेले नव्हते. कालच बकुळकडे पाहून राजा हसला होता. त्याने हात वर करून 'ये ये'सुद्धा म्हटले होते त्याला. बकुळला वाटले होते की राजा आज खाली उतरून येणार खास आणि आपल्याला कमळावर बसवून घेऊन जाणार. मग घरातल्या साऱ्या माणसांना दिसले असते की खरेचं ते सुंदर निळे कमळ आहे म्हणून त्यात अंगठ्याएवढा राजा आहे म्हणून रोज तो साऱ्यांना दाखवी. ते पहा कमळ. ती पहा राजा–राणी. पण कुणालाच ती कधी दिसली नव्हती. सारी हंसत, वेडावीत. वडील रागावत. आई आसवे ढाळी. बकुळ गप्प बसे. त्या नवलपरीच्या देखाव्याच्या आनंदात तो अगदी बुडून जाई. आजूबाजूचे काही काही त्याला समजत नसे.''[१८]

एके दिवशी बकुळ आकाशाकडे शांतपणे पाहू लागला. शुक्राची चांदणी लखलखत होती. ते निळे–जांभळे कमळ त्याला सकाळी दिसले नव्हते. संध्याकाळीही ते दिसले नव्हते. कालच बकुळकडे पाहून राजा हसला होता. त्याला तिकडे ये म्हणून बोलावत होता. पण आज त्याला काही दिसेना. त्याची आई बकुळला बोलविण्यासाठी आली. तेव्हा बकुळ हताश होऊन पाहत होता. आईने बकुळची हनुवटी धरून त्याच्या डोळ्यांत पाहिले आणि ती दचकून मागे फिरली. तिच्या डोळ्यांतून आसवे टप टप गळू लागली. मुलाच्या डोळ्यात तिने आज अश्रू पाहिले. जे त्याने आकाशात पाहिले तेच तिने बकुळच्या स्वप्नाळू डोळ्यांत पाहिले. आपणही बकुळसारखे भ्रमिष्ट झालो का, असे तिला वाटले. छोट्या मुलाची ती वेडी आई आहे. तिने हे कोणालाच सांगितले नाही. मुलांचे सुख–दुःख कळणारी फक्त ती आईच असते. तीच या जगात सर्वांत जवळची समजून घेणारी असते. आई बकुळाला काहीच न बोलता घरातल्या कामांना लागते.

बकुळला संध्याकाळी कमळ दिसले नाही. खरेच का राजाराणी रागावले असतील असे भावंडांना, मित्रांना वाटू लागले. असे बोलल्यापासून वडिलांनी पण शिक्षा बंद केली. त्याला पूर्ण

जेवण मिळू लागले. सर्व काही चांगले घडू लागले. या कथेत आपल्या परीने जगणाऱ्या बकुळच्या व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंचे लेखिकेने चित्रण केले आहे. यात बकुळच्या मानसिकतेचे विश्लेषण केले असून, ही कथा बालमनोविश्वाचे चित्रण करणारी आहे.

६. **चंदन राजा** :

'चंदनराजा' (५ एप्रिल १९५२) ही मेरी फ्रिअर यांच्या The Old Deccan Days या पुस्तकातील एका लोककथेचे हे भाषांतर श्रीमती दुर्गाबाई भागवत यांनी मुलांसाठी केले आहे.

या कथेतील राजकन्या व सात भावांची ही कथा असून, त्यातील सहा भावजयी तिचा छळ करीत. तिला सातवी भावजय प्रेमाने वागवीत. शेवटी राजकन्येला त्रास होतो. राजकन्या घराबाहेर पडते. अतिशय खिन्न मनाने राजकन्या एका जंगलातून दुसऱ्या जंगलात हिंडत होती. धाकट्या भावजयीने बांधून दिलेली शिदोरीही संपत आली होती. ती खूप थकून गेली. कुठे जावे ते तिला कळेना. अन्न कुठे मिळेल हेही तिला कळेना. दूरदूरपर्यंत तिला खेडेगावातील झोपडीपण दिसत नव्हती. ती खूप दमून एका तळ्याच्या काठावर बसली. तिला जंगलात राक्षसाच्या झोपडीतील कुत्रा व मांजर भेटले.

पुढे जंगलात फिरताना ती चंदन राजाच्या सान्निध्यात येते. त्याचा प्राण चंदनहारात होता. एका यक्षिणीशी त्याने लग्न करणसाठी त्याला पळवून आणले. चंदन राजा मृत झाला. रात्रीच्या वेळीही यक्षिणी येताच चंदन जिवंत व्हायचा. पुढे राजकन्या चंदन राजाला भेटते. ती राजाला सगळी हकिगत सांगते. मी एक गरीब मुलगी आहे. मी एकटीच आहे. थंडीने आणि भुकेने माझा प्राण जाईल.

तिने सांगितलेली सर्व हकिगत राजपुत्राने ऐकून घेतली. त्याची मायाळू नजर पाहून राजकन्येला धीर आला. तिला घरातून कसे हाकलून दिले याचा वृत्तान्त ती राजपुत्राला सांगते. तिचे सगळे म्हणणे राजपुत्राला पटले. राजपुत्र तिला म्हणाला– हे राजकन्ये, तू भिऊ नकोस, मी तुझा सांभाळ करीन. ज्याच्याविषयी तू इतकं ऐकलं आहेस. तोच मी चंदन राजा. मी दररोज दिवसा मरतो व रात्री थोडा वेळ जिवंत होतो. तिने आश्चर्याने विचारले, तुम्ही या निर्जन समाधीत राहता ते तुमच्या माणसांना माहीत नाही का? कोणालाच माहीत नाही. माझी सगळी व्यवस्था पाहणाऱ्या ब्राह्मणाला माहीत आहे. मी या शापातून एक दिवस मुक्तही होईन. तोपर्यंत

गुप्तताच पाळली पाहिजे. त्याने ब्राह्मणाला सांगितले. उद्यापासून समाधीत दोन माणसांचे जेवण करून ठेवीत जा.

पुढे राजा शापातून मुक्त होतो. राजकन्येसोबत त्याचा विवाह होतो. 'चंदन राजा' या कथेत २४ तास जिवंत नसतो म्हणून राजकन्या दु:खानेच खचते. राजकन्या नकळत चंदन राजाच्या प्रेमात पडते. पुढे त्या दोघांचा विवाह होतो. या कथेतून अडचणीमध्ये सापडलेल्या व्यक्तीला नि:स्वार्थपणे मदत केली पाहिजे, हा संदेश लेखिका देते.

**७. संपत्ती दान :**

'संपत्ती दान' (१७ जुलै १९५४) ही प्रा. वामन चोरघडे यांची कथा प्रकाशित झाली आहे. या कथेत दानाचे महत्त्व सांगितले. प्रजापतीला तीन मुले असतात. प्रजापती आपल्या मुलांना 'द' हे अक्षर देतात. 'द' या अक्षराचा अर्थ विचारतात. 'द' म्हणजे दमन म्हणजे देव असा होतो. 'द' म्हणजे दान– म्हणजे मनुष्य असा होतो. 'द' म्हणजे दया. दानव असा अर्थ लावला जातो.

दानाचे महत्त्व कथेत लेखकांनी सांगितलेले आहे. 'दान' या शब्दाचे महत्त्व आणि दान करणारे किती श्रेष्ठ असतात आणि दान का करावे, दान कशासाठी करावे आणि कोणी द्यावे, याचे स्पष्टीकरण या कथेत केलेले आहे.

लेखक म्हणतात, मानवाला दानाची दीक्षा का मिळाली असेल? जुन्या काळातीलच कल्पना घेऊन जर विचार केला असेल तर, गरजेच्या वस्तू निर्माण करण्याची प्रवृत्ती फक्त मानवातच आहे. ती देवातही नाही आणि असुरातही नाही असे म्हणतात. माणूस हा स्वत:च्या कष्टावर, संपत्तीवर जगत असल्याने त्याला त्या संपत्तीचा दुहेरी लोभ असतो. या संदर्भात ते लिहितात,

''मानवाला दानाची दीक्षा का मिळाली असेल बरं? जुनीच कल्पना येऊन विचार केला, तर गरजेच्या वस्तू निर्माण करण्याची प्रवृत्ती फक्त मानवातच आहे; ती देवांनाही नाही आणि असुरांतही नाही. देव स्वकष्टार्जित वस्तूंवर जगत नाहीत, ते यज्ञभुज आहेत. असुर अपहरणाने जगतात. मानव स्वकष्टार्जित संपत्तीवर जगत असल्याने त्याला त्या संपत्तीचा दुहेरी लोभ असतो; एक तर ती त्याने मिळविलेली असते म्हणून ममत्व व दुसरे तिच्यायोगे त्याच्या गरजा भागतात म्हणून लोभ. मानवेतर पश्वादी योनीत लोभ नाही. ते संग्रहही करीत नाहीत.

मोह–लोभही षड्‌रिपूंचा ससेमिरा त्यांच्या पाठीशी नसतो. लोभ संगमूलक, काममूलक, क्रोधमूलक असतो. अत्यंत उपयोगी वस्तूंचा म्हणजे संपत्तीचा संग्रह करणे ही अस्वाभाविक किंवा वाईट गोष्ट नाही; तथापि, प्रमाणाबाहेर केल्यानंतर कोणतीहि गोष्ट तारक न होता, मारक होते, गुणांचे पर्यवसान प्रमाणोल्लंघनाने वैगुण्यात होते. गरजेहून अधिक, प्रमाणाहून जास्त केलेला वस्तुसंग्रह, संपत्तिसंग्रह मानवाला अहितकारक होणारच, म्हणून त्याग करावयाचा.''[१९]

उपरोक्त संदर्भावरून अत्यंत उपयोगी वस्तूंचा म्हणजे संपत्तीचा संग्रह करणे, ही अस्वाभाविक किंवा वाईट गोष्ट नाही. परंतु गरजेहून अधिक प्रमाणाहून जास्त केलेला वस्तुसंग्रह, संपत्तिसंग्रह मानवाला अहितकारक होणारच म्हणून त्याग करावयाचा असतो, अशी त्यागाबद्दलची भावना लेखक व्यक्त करतो.

पुढे लेखक असेही सांगतात, दान का करायचे? दान मानवाला विहित आहे. दान केले तर पुण्य लाभते. पुण्याने मोक्ष मिळतो. ऐहिक आणि पारलौकिक जीवन जोडले जाते. दानाच्या कल्पनेचा सामाजिक, ऐहिक व्यावहारिक रीतीनेच विचार केला पाहिजे व तो करण्याच्या अगोदर दान म्हणजे काय आणि यज्ञ म्हणजे काय, याचा अर्थ समजून घेणे गरजेचे आहे. असे या कथेत सांगतात.

दानाचा अर्थ सांगताना म्हणतात– यज्ञ म्हणजे त्याग करणे, फलाशेचे विष न कालविता मीपणाचा भाव सोडून केलेला वस्तुत्याग होय. वस्तूचा निर्लेप त्याग म्हणजे यज्ञ, यज्ञाची भावना सौंदर्यात्मक पद्धतीने आणि मोक्षाचा अर्थ समजावून सांगितले आहे.

या कथेतून लेखक वामन चोरघडे हे संपत्तिदानाचे महत्त्व सांगताना वस्तुसंचयाची असलेली आवड मानव जोपासतो. पण दान करणे ही मानवाची रीत असल्याचे नमूद करतात. ही कथा वाचत असताना विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीचा त्यांच्यावर प्रभाव असल्याचे जाणवते.

### ८. गजराबाईला न्याय मिळाला :

दुर्गा भागवत यांची 'गजराबाईला न्याय मिळाला' (७ ऑगस्ट १९५४) ही कथा मेरी किनर यांच्या कथेचा अनुवाद आहे. एक राजा व बारा राणी यांची ही कथा आहे. पण राजाला मूलबाळ नव्हते. नवस केले, पूजा केली. काही केले तरी त्यांना मूलबाळ झाले नाही. एकदा राजा प्रधानाबरोबर राज्याची पाहणी करत होते. प्रधान चतुर होते. ते बागेत फिरत होते. त्या

बागेत एक वांग्याचे झाड होते. त्या वांग्याच्या झाडाला एकशे एक वांगी होती. हे कसे काय? म्हणून राजा प्रधानाला विचारतो. प्रधान म्हणतो, हे खरेच नवलच आहे. या झाडाचा अर्थ असा आहे की, जो कोणी ही बागायत करणाऱ्याच्या मुलीशी लग्न करील त्याला एकशे एक मुले होतील. शंभर मुलगे आणि एकच मुलगी.

पुढे राजा त्या सुंदर मुलीशी लग्न करतो. ती एका माळ्याची मुलगी असते. राजा तिला राजवाड्यात घेऊन येतो. परंतु राणींना हे आवडत नाही. कारण ती माळ्याची मुलगी असते. म्हणून गजराबाईला मानहानी सहन करावी लागते. तिचा महालात खूप  छळ करू लागले. हे सगळे पाहून राजाने गजराबाईला वेगळा महाल बांधून दिला. गजराबाई आनंदाने राहू लागली.

पुढे काही दिवस लोटले. गजराबाईला शंभर मुलगे व एक मुलगी झाली. सगळी मुले कशी सुंदर होती. मोठ्या राण्यांना हे कळले, तेव्हा त्या आपसांत म्हणाल्या ''आता गजरीचा तोरा सगळ्यांत वरचढ झाला. आपण तिची मुलं मारून टाकूं आणि महाराजांना सांगू की ती चेटकीण आहे म्हणून. मग त्यांचं तिच्यावरचं मन उडेल आणि आपल्याबरोबर ते पहिल्यासारखं हसून खेळून राहतील. मग त्या गजराबाईच्या वाड्यात आल्या. त्यांना आलेल्या पाहताच गजराबाईने घंटा वाजवली. पण राजा आला नाही. त्याला वाटले पहिल्यासारखे उगीच असेल, अखेर ती बिचारी त्या दुष्ट राण्यांच्या तावडीत सापडली.

सुईण गजराबाईच्या बाळंतपणाला आली होती, ती ह्या बारा राण्यांची दासीच होती. त्यांच्यासारखीच दुष्ट होती. राण्यांनी तिला विचारले, ''का गं? या पोरांना तुला मारून टाकता येईल का? तेव्हा सुईण 'हो' म्हणते. या प्रसंगाचे वर्णन करताना ''त्यात काय कठीण आहे?'' ती म्हणाली. ''त्यांना उकिरड्यावर फेकून देते म्हणजे उंदीर, घुशी, कावळे, गिधाडे त्यांचा एका रात्रीत निकाल लावतील.'' 'तसंच कर तर' त्या राण्या म्हणाल्या. मग त्या सुईणीने ती एकशे एक मुले घेतली आणि उकिरड्यावर घुशीच्या बिळाजवळ फेकून दिली.''[२०] यातून द्वेषभावना माणसाला कोणत्या पातळीवर पोहोचविते हे लक्षात येते.

एके दिवशी राजाचे कपडे धुण्यासाठी धोबी विहिरीवर जातो. तेव्हा धोब्याच्या मुलीला या मुलांचा आवाज कानी येतो. मुलगी आपल्या वडिलांना सांगते. मग ही गोष्ट राजाला समजते. विहिरीच्या पायऱ्याच्या खालच्या बाजूला मुलांना घुशीने लपवून ठेवलेले असते. ही सर्व मुले नंतर बाहेर येतात. राजाला झालेला वृत्तान्त सांगतात. राजा घुशीचे आभार मानतो आणि पुढे

गजराबाईला कैदेतून सोडवले जाते. म्हणून गजराबाईला शेवटी या कथेत न्याय मिळतो. मानवी जीवनात प्राण्यांना अत्यंत महत्त्व आहे, हे या ठिकाणी समजते. प्राणी आणि मानवाचे संबंध किती जवळचे असतात, हे या कथेतून सांगितले आहे. त्याचबरोबर प्रेम व आपुलकी कथा वाचताना लक्षात येते. या कथेतून चांगल्या वागण्याचे फळही चांगलेच मिळते हा संदेश दिला आहे.

### ९. **सिद्धिकूर** :

दुर्गा भागवत यांची 'सिद्धिकूर' (२ ऑक्टोबर १९५४) ही (बंजारी कथा) कथा प्रकाशित झाली. या कथेत दोन सख्खे भाऊ आहेत. एक भाऊ खूप श्रीमंत आणि दुसरा गरीब असतो. सिद्धिकूर हा मोठा असून तो गरीब आहे, तर धाकट्याला आपल्या श्रीमंतीचा मोठा गर्व असतो. हा गोरगरिबांना लुटत असे, लुबाडून खात असे. पण आपला भाऊ दरिद्री आहे, त्याला आपण मदत करावी असे कधीच त्याला वाटत नसे. एकदा धाकट्याने पूर्ण गावाला मोठी मेजवानी दिली. श्रीमंतीचे प्रदर्शन करीत तो फिरत होता. परंतु आपल्या भावाला त्याने बोलावले नाही. याचे सिद्धिकूरला फार वाईट वाटत होते. आपल्या स्वत:चा त्याला राग आला होता. या दरिद्रीपणात जगण्याची त्याला इच्छा उरली नाही. तो परिस्थितीला कंटाळून आयुष्य संपविण्याचा विचार करू लागला. त्याच वेळी त्याला जंगलात गेल्यावर झाडाच्या डोलीत डाकिणी भेटतात. तेथे त्याला पिशवी, हातोडा मिळतो, पिशवी आणि हातोड्याच्या चमत्काराने तो श्रीमंत होतो.

''आपला भाऊ दरिद्री आहे, त्याला आपण मदत करावी, हा विचार त्याला कुठून सुचणार? एकदा धाकट्या भावाने एक मोठी मेजवानी दिली, सारे गाव त्याने जेवायला बोलावले. पक्वान्ने केली. यथेच्छ आग्रह करून साऱ्यांना खाऊ  घातले. मोठ्या डौलात आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करीत तो पंगतीमधून फिरत राहिला. सारे पाहुणे त्याच्या आदरातिथ्याचं कौतुक करीत घरी परतले. पण या साऱ्या समारंभात सिद्धिकूरने आपल्या भावाचे घर मुद्दाम वगळले होते. सारे गाव जेवून गेले तरी आपला हात आपल्या सख्ख्या भावाच्या घरी उष्टावला नाही, याची खंत सिद्धिकूरला वाटते. कधी नव्हे इतका आपल्या दरिद्रीपणाचा त्याला वीट, वैताग आला. दु:ख अनावर झाले. आपल्याला धन मिळायची आशा नाही, तर हा दरिद्री देह तरी कशाला ठेवू. असा विचार त्याच्या मनात आला. आत्महत्या

करण्यासाठी तो जंगलात गेला. तिथे एक वडाचे मोठे झाड होते. त्याच्या शेकडो पारंब्याखाली लोंबल्या होत्या. झाडाला मोठी दोरी होती याच पारंब्यांचा गळफास लावावा म्हणून सिद्धिकूर त्या झाडाजवळ जाऊ लागला. इतक्यात मोठमोठ्याने हसत, गात डाकिणीचा थवा त्या झाडावर उतरला. सिद्धिकूर त्यांना पाहून एका झाडाआड भयाने लपला. त्यांचे अक्राळविक्राळ रूप पाहून त्याचा मरणाचा विचार कुठल्या कुठे पळाला. जीव वाचवायचा कसा हीच काय ती एक गोष्ट त्याच्या पुढे उभी होती. पण त्या डाकिणींनी त्यांच्याकडे पाहिलेही नाही. त्या झाडाच्या डोलीतून त्यांनी एक पिशवी व एक हातोडा काढला. मग त्या हातोड्याने त्यांनी पिशवीवर फटके लगावण्यास सुरुवात केली आणि काय नवल? पहिल्या फटक्याला त्या पिशवीतून सुंदर-सुंदर खाद्यपेये बाहेर पडली. दुसऱ्या फटक्याला दागिने, आणि कपड्यांचे ढीग बाहेर पडले.''[२१]

सिद्धिकूर श्रीमंत झाल्याचे धाकट्या भावाला पाहवत नाही. त्याला सिद्धिकूरच्या संपत्तीचा मोह होतो. हा अतिशय स्वार्थी आणि लोभी असतो. सिद्धिकूरला भाऊ विचारतो की, तू इतका श्रीमंत कसा झालास? सिद्धिकूर भावाला सगळा वृत्तान्त सांगतो. जंगलात एका झाडाच्या डोलीत मला पिशवी आणि हातोडा मिळाला. त्याच्या चमत्काराने मी श्रीमंत झालो. धाकटा भाऊ हे सर्व ऐकून त्या झाडाजवळ पिशवी-हातोडा घेण्यासाठी जातो. पण त्याला डाकिणी विद्रूप करून सोडतात. त्याच्या नाकावर मारून मारून त्याच्यावर नऊ गाठी बनतात. तो खूप दुःखी कष्टी होऊन झालेला वृतान्त सिद्धिकूरला सांगतो. माझ्या या गाठी सोडव म्हणतो.

सिद्धिकूर हा निःस्वार्थी असतो. भावाला लगेच मदत करतो. सिद्धिकूरला भाऊ म्हणतो या गाठी सोडव. माझी अर्धी संपत्ती तुला देतो. असे म्हटल्यावर सिद्धिकूर अजिबात याकडे लक्ष देत नाही आणि हातोड्याने त्याच्या नऊ गाठी तोडतो. शेवटची गाठ तोडण्यापूर्वी धाकट्या भावाची बायको सिद्धिकूरला म्हणते, ही शेवटची गाठ मी तोडते. ती हातोड्याने त्याच्या नाकावर मारते, त्यातच त्याचा मृत्यू होतो. स्वतःच्या नवऱ्याला ती मारून टाकते. कारण सिद्धिकूरला अर्धी संपत्ती द्यावी लागेल. सिद्धिकूरला याचे खूप दुःख होते. अरे मला तुमच्या संपत्तीची काय गरज आहे. म्हणून तू त्याला मारलेस. तू माझ्या भावाचा घात केलास म्हणून भावासाठी शोक करतो.

या कथेतून दुर्गाबाईंनी ‘अति तेथे माती’ होते, या उक्तीप्रमाणे धाकट्या भावाला संपत्तीचा अतिलोभ झाल्यामुळे माणुसकी सोडून तो वागतो. त्यालाच स्वतःची माती करून घ्यावी लागते. सिद्धिकूर हा निःस्वार्थी असतो. चांगूलपणाचे फळ चांगलेच मिळते. ही कथा सामाजिक जाणीव व नातेसंबंधाचे चित्रण व्यापक करते.

**१०. मच्छीराज :**

दुर्गा भागवत यांची ‘मच्छीराज’ (२७ नोव्हेंबर १९५४) ही कथा प्रकाशित झाली आहे. ही कथा दुर्गाबाई भागवतांची एक ‘अद्‌भुत कथा’ आहे. एक होता राजा, त्या राजाला मूलबाळ नव्हते. खूप नवस करतात; पण त्यांना मूलबाळ होत नाही. एकदा राणीच्या स्वयंपाक खोलीत मासे आणतात. या माशातील एकच मासा जिवंत दिसतो. ते मोलकरणीच्या लक्षात येते. ती मोलकरीण भांड्यात त्या माशाला सोडते. राणी त्या माशाला पाहते. तिलापण तो मासा खूप आवडतो. ती त्याला पुन्हा मोठ्या भांड्यात ठेवते. तेही भांडे त्याला पुरेना. राणी माशासाठी एक मोठे टाके बांधायला लावते. त्या माशाला म्हणजे मच्छीराजाला त्यात ठेवते. सगळे लोक त्याला मासा समजायचे; पण तो एक राजा होता. त्याला देवाने शाप दिला आणि तो मासा बनला.

राणी माशाला आपल्या मुलासारखे समजायची. एके दिवशी मासा ‘राणीमाते, मला फार एकटे वाटते माझे लग्न करून दे,’ अशी विनवणी करतो आणि मच्छीराजाला लग्नासाठी राणी नवरी शोधावयास सुरुवात करते. पण मच्छीराजाला कोण पोरगी देणार. राणी हार मानत नाही. राणी मोहरांनी भरलेली थैली देऊन सेवकांना नवरी शोधून आणायला सांगते.

‘‘पण इतक्यात त्यांना एक साधू दिसला त्याची बायको सावत्र मुलीला कंटाळली होती. आपल्या मुलीच्या मार्गातील सावत्र मुलीचा काटा काढावयाचा तिचा बेत होता. ही आयतीच सोन्यासारखी संधी चालून आल्यावर ती पुढे झाली आणि म्हणाली ‘‘द्या ती थैली मला. माझी ही मुलगी आहे. ती मच्छीराजासाठी घेऊन जा.’’ तिला वाटले की माशाने गिळली की सुटलो आपण ह्या मुलीच्या कचाट्यातून. मग ती थैली घेऊन मागे आली आणि सावत्र लेकीला म्हणाली, ‘‘नदीवर जा. अंग धू. कपडे चांगले स्वच्छ धू आणि नेस. म्हणजे राणीच्या घरी या माणसाबरोबर जाताना घाणेरडी दिसणार नाहीस.’’ बोलणे ऐकून उदास मुद्रेने ती मुलगी निमूटपणे नदीवर गेली. सुटकेचा मार्गच तिला दिसेना. बाप बाहेरगावी गेलेला. कोण तिची कड घेणार? नदीकाठी जाऊन ती लुगडे धुऊ लागली. तिला रडे आवरेना. तिचे अश्रू जोरात वाहू

लागले. ती टिपे टप टप गळून नदीकाठच्या एका नागाच्या बिळांत पडली. सात फणांचा नाग होता त्यात. नाग मोठा शहाणा होता. अंगावर पाणी पडताच त्याने वर पाहिले, तो एक मुलगी रडते आहे. नागाने बिळाबाहेर डोके काढले आणि म्हणाला, 'मुली, मुली, तू का रडतेस?'

'महाराज' ती मुलगी म्हणाली, ''मी दुःखी कष्टी आहें. माझे वडील परगावी गेले आहेत. माझ्या सावत्र आईने मला मच्छीराजाला विकून टाकलं आहे. मच्छीराजाशी लग्न लागलं की मला तो खाऊन टाकील.''[२२]

एका साधूची पत्नी आपल्या सावत्र मुलीला मच्छीराजाला देण्यास तयार होते. मोहऱ्याची थैली घेऊन तिला लग्नासाठी पाठवते. ती मुलगी एके दिवशी नदीवर कपडे धूत असताना, ती शोक करते. तिचे डोळ्यातील अश्रू एका नागाच्या तोंडात जातात मग तो देवरूपी नाग मुलीला वरदान देतो. तिला खडे देतो म्हणजे या तीन दगडाने मच्छीराजाला मारल्यावर तो राजा बनतो. त्याच्या शापातून मुक्त होतो. तो माणूस बनतो. त्याच राजकुमाराशी या मुलीचे लग्न होते. ती त्याची राणी बनते. ही कथा दुर्गाबाई भागवतांची अद्‌भुत रम्य स्वरूपाची असून यातून ही निपुत्रिक, शाप, शापातून मुक्ती, माणसाने, प्राण्यांच्या स्वरूपात वावरणे यांसारख्या घटना बालमनाला आकर्षित करते. ही एक संस्कारक्षम कथा आहे.

### ११. राम आणि लक्ष्मण :

दुर्गा भागवत यांची 'राम आणि लक्ष्मण' (१८ डिसेंबर १९५४) ही कथा प्रकाशित झाली आहे. ही कथा राम-लक्ष्मणाची मैत्री व प्रेमसंबंध सांगणारी लोककथा आहे. या कथेत 'चंद्रराजा' नावाचा एक राजा व राजदरबारातील प्रधान अगदी जवळचे मित्र होते. दोघांचेही एकमेकांवर खूप प्रेम, विश्वास होता. परंतु दोघांनाही बरीच वर्षे संतती सुख मिळाले नाही.

या कथेतील राजाला आणि प्रधानाला एकाच दिवशी पुत्ररत्न प्राप्त होते. राजा आपल्या मुलाचे नाव 'राम' आणि प्रधान 'लक्ष्मण' असे ठेवतात. हे दोघेही बरोबरच वाढले. राम लक्ष्मण एकमेकांशिवाय घटकाभरही राहू शकत नव्हते. या दोघांची जवळीकता राणीला अजिबात आवडायची नाही. राम राजपुत्र होता. रामने त्याच्या इभ्रतीला शोभेल अशा मित्रासोबत राहावे, खेळावे, इतर राजांच्या मुलांच्या संगतीतच असावे. असे राणीला वाटते. राणी एके दिवशी राजाला म्हणाली- रामाची अशी प्रधानाच्या मुलासोबतची मैत्री मला पटत नाही. तुम्ही रामला लक्ष्मणापासून दूर ठेवा. राजाला हे पटले नाही. राजा म्हणतो- राम-लक्ष्मण हे दोघे मित्र

आहेत. मी आणि प्रधानही चांगले मित्र आहोत. आमचे वडील आणि प्रधानांचे वडीलही चांगले जवळचे मित्र होते.

पुढे राणीने राम व लक्ष्मणामध्ये वितुष्ट आणण्यासाठी म्हाताऱ्या कलावंतिणीला पिशवीभर मोहरा देऊन वितुष्ट निर्माण केले. राम व लक्ष्मणात कटुता निर्माण होते. ती इतकी होते की, राम आपल्या पित्याला, लक्ष्मणाला ठार मारून त्याचे डोळे आणायला सांगतो.

राजाला राजपुत्राचे हे बोलणे ऐकून फार वाईट वाटते. राजा लक्ष्मणाऐवजी हरणाचे डोळे देतो. रामाचा राग शांत होतो. या कथेत 'मैत्रीचे महत्त्व' सांगितले आहे. पण मैत्रीत दुरावा निर्माण झाल्यावर माणसाचे मन किती दुष्टपणाने वागते. हा दुष्टपणा चांगला नाही. रागाच्या भरात आणि गैरसमजाने झालेली चूक किती महागात पडते, हे या कथेत दाखवून दिले आहे. या कथेतून मैत्रीपूर्ण संबंध व वैरभाव नष्ट करण्याची शिकवण दिली आहे. या संदर्भात लेखिका म्हणते–

''उलगडा केला असता, किती मूर्ख मी. त्याला मारलं. मलाही मरणाचीच शिक्षा योग्य आहे. असे मनात येऊन राम वडिलांकडे गेला आणि म्हणाला, ''माझ्या लक्ष्मणाला कुठे अग्नी दिला ती जागा मला दाखवा. मीपण तिथेंच जाऊन प्राण देतो.''

''का रे बुवा?'' राजाने विचारले.

राम म्हणाला, ''तुम्ही कशाला त्याचा वध केलात? तो गेला आणि माझ्या जीवनातला सगळा आनंद नाहीसा झाला. मीपण त्यांच्याबरोबर आता जातो.''

मुलाला खरोखरच पश्चात्ताप झाला आहे, असे पाहून चंद्रराजा म्हणाला, ''हत् मूर्खा! अरे, तुझ्या लहरीकरिता जर लक्ष्मणासारख्या गुणी मुलाचा जीव मी घेतला असता तर मग बघायलाच नको होते. मी तसं केलं नाही म्हणून अगोदर माझे आभार मान पाहू. ते डोळे हरणाचे होते.''[२३]

ही कथा नातेसंबंध, मैत्री व प्रेम यांच्या माध्यमातून नैतिकतेची शिकवण देते.

**१२. 'जादूची अंगठी'** :

'मुलांच्या मेळाव्यात' या सदरात 'जादूची अंगठी' (२९ जानेवारी १९५५) शिरीष वसंत बापट यांची कथा प्रकाशित झालेली आहे.

या कथेतील दामूची देवावर अफाट श्रद्धा, विश्वास आहे. देव दामूला एक जादूची अंगठी देतो. त्याचा वापर कसा करावा, हेही दामूला देवाने सांगितलेले असते. दामू आपल्या कल्पनाविश्वात अगदी दंगलेला असतो. तो दररोज देवळात जाई, देवाची भक्ती करीत असे. त्याचे वडील अत्यंत गरीब होते. ते खोपटात राहत असत. एके दिवशी दामूच्या स्वप्नात देव येतो. देवाने दामूला काय पाहिजे ते माग असे म्हटल्यावर दामू एक जादूची अंगठी मागतो. जादूच्या अंगठीने दामूचे वडील श्रीमंत होतात. दामू सगळ्या गोष्टी करू लागला. त्याच्या आवडीच्या गोष्टींचा आनंद घेऊ लागला. तरी दामूची देवावरची श्रद्धा, भक्ती कमी झाली नाही. दामू अंगठीच्या मदतीने मजा करीत असे. दामू मुंगी होऊन साखर खाऊ लागला, प्रवास करू लागला, हव्या त्या गोष्टी करू लागला. एके दिवशी देवाने दामूच्या स्वप्नात येऊन त्याला जागे केले. तुला अंगठी दिली ती नुसती मजा करायला नाही, तर ती चांगल्या उपयोगासाठी दिली आहे. या पुढे दामू जादूच्या अंगठीचा चांगला वापर करू लागला. दामूने खूप पैसे जमवले आणि गरिबांना दानधर्म करू लागला. तेव्हा देव दामूवर संतुष्ट झाला.

या कथेतून दामूच्या खरेपणाची गोष्ट आणि भक्तीची फलश्रुती सांगितलेली आहे. आपल्याला जे मिळाले आहे, त्यातून दानधर्म करावा हा विचार या कथेत सांगितला असून, ही कथा पौराणिक, धार्मिक ग्रंथाच्या वाचनाने फलश्रुती मिळते, याची आठवण करून देणारी आहे.

**१३. सुदामा :**

दुर्गाबाई भागवत यांची ही कथा ही 'श्रीकृष्ण आणि सुदामा' (५ मार्च १९५५) यांच्या मित्रप्रेमाची ख्याती आणि शिक्षणाचे महत्त्व सांगणारी आहे. ही कथा वाचत असताना कथेतील चित्रे अगदी डोळ्यांसमोर उभी राहतात. जणू आपण त्यांना अनुभवतो असेच काहीसे वाटते. 'मुलांच्या मेळाव्यातील' ही कथा अतिशय उच्च कोटीची आहे. भारतातील सर्व मानवाला ह्या कथेचे महत्त्व माहीत आहे.

सुदामा आणि कृष्ण सांदीपनी ऋषींकडे शिक्षण घेण्यासाठी गेले होते. गुरुकुलातील त्या वातावरणात कृष्ण–सुदामाची मैत्री होते. श्रीकृष्ण नाना गमतीजमती करत आपल्या मित्रांना खुलवत. श्रीकृष्ण सर्वांचा आवडता झाला. या गुरुकुलातील काळ खूप पटकन गेला. ते विद्याविनय संपन्न होऊन घरी निघाले. सर्वांच्या डोळ्यांतून अश्रू येऊ लागले. जड अंत:करणाने

सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला. तो सुखाचा, बालपणाचा काळ संपला होता आणि आता जीवनातील एका वेगळ्या टप्प्यावर ते आले होते.

सुदामा आणि श्रीकृष्णात इवलेसेही साम्य नव्हते. परंतु त्यांची एकमेकांशी घट्ट मैत्री झाली होती. सुदामा आणि श्रीकृष्णाने एकमेकांना मिठ्या मारल्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत होत्या.

सांदीपनी गुरुजींनी दिलेली विद्या आत्मविकासाची होती. ती स्वतःची घरे भरायची नव्हती. श्रीकृष्ण आपल्या कारभारात मग्न झाले. सुदामाही गरिबीचे जीवन जगत होता. त्याच्या पत्नीला त्यांचा नेहमी राग येत होता. सुदामा सतत श्रीकृष्णाच्या आठवणी काढत असे. कृष्णाची आठवण झाली की सुदामाच्या चेहऱ्यावर आनंद असे. श्रीकृष्णाचे सारखे सारखे गुणगान ऐकून बायको वैतागली होती. सुदामदेव मात्र कृष्णाच्या आठवणीत सारी दुनिया विसरत असे. पत्नी म्हणते– तुम्ही रोज क्षणाक्षणाला आठवण काढता. तो श्रीकृष्ण तुमची कधी आठवण करतो का? एकदा तरी आपल्याकडे आले का? यावर सुदामा म्हणतो, त्याला किती कामे असतात. त्याच्यावर खूप जबाबदाऱ्या आहेत. मग तो कसा येईल?

मनात सद्भाव असला म्हणजे मनुष्य दुसऱ्यांच्या अडचणींचा विचार करतो. सद्भाव नाहीसा झाला की, प्रत्येक बारीकसारीक गोष्टींचा वेगळा अर्थ माणूस काढू लागतो.

पत्नी म्हणते, मग तुम्ही का जात नाही भेटायला. तो आपल्या अडचणी समजून घेऊन निवारण करील. या विचाराने सुदाम्याचे मन श्रीकृष्णाकडे धाव घेऊ लागले. तो श्रीकृष्ण भेटीसाठी निघाला. कृष्णाच्या भेटीला सुदामदेव तर आसुसलेले होते. आता आपण श्रीकृष्णाला भेटणार, या विचाराने सुदामाचे मन आनंदित झाले. शेवटी श्रीकृष्णाकडे जायचा दिवस उगवला. जाताना मित्रासाठी काही तरी न्यावे असे सुदामाला वाटत होते. इतक्या दिवसांनी मी श्रीकृष्ण भेटीला जात आहे आणि रिकाम्या हाताने कसा जाऊ, हा प्रश्न सुदामाला पडला. सुदामाने पत्नीला घरातले काही तरी बांधून देण्यास सांगितले. त्यांच्या घरी अठराविश्व दारिद्र्य होते. ते गरिबीत जीवन जगत होते. दुसऱ्यांना देण्यास त्यांच्याकडे काय बरे असणार? पत्नी म्हणते, तो द्वारकेचा राजा आहे, त्याला काय कमी आहे. आपल्याकडे काहीच नाही. तुम्ही काय घेऊन जाता पत्नीला वाटायचे, आपले दारिद्र्य ओळखून कृष्णाने आपल्याला काही तरी देऊन दारिद्र्य

दूर करावे. तुम्हीच कृष्णासाठी काही तरी न्यायचा विचार करता. तरीही सुदामाने कृष्णासाठी थोडे पोहे फाटक्या फडक्यात बांधून नेले.

सुदामा द्वारकेत श्रीकृष्णाच्या महालाबाहेर उभा राहतो. कृष्णाला सुदामा आल्याचे समजते. श्रीकृष्ण देहभान विसरून धावत येतो आणि सुदामाला पाहून कृष्णाच्या डोळ्यांत अश्रू येतात. कारण खूप वर्षांनंतर सुदामाची भेट होते आणि सुदामाची अवस्था पाहून खूप वाईट वाटते. तो अनवाणी चालत आला होता. कृष्णाने जाऊन त्याला एकदम मिठी मारली. दोघे एकमेकांना पाहत होते. बालपणीच्या सगळ्या आठवणी डोळ्यांसमोर तरळत होत्या. श्रीकृष्णांनी सुदाम्याला महालात आणून सुवर्णमंचकावर बसवले. त्यांना आग्रहाने जेवू घातले, त्याला मृदू शय्येवर झोपवून स्वतः हाताने वारा घातला. सुदामा कृष्णाच्या प्रेमाने तृप्त झाला होता.

पुढे विश्रांतीनंतर ते दोघे बोलत बसले. सगळ्या आठवणींना उजाळा देतात. सांदीपनी आश्रमातल्या अनेक आठवणी काढतात. ते बोलण्यात कितीतरी वेळ रमले. या दोघांचा प्रेमळ वार्तालाप महालातील इतर मंडळी उत्सुकतेने पाहत होती. त्यांच्या मैत्रीचे माधुर्य सगळेच चाखत होते. दोघांची मैत्री अभूतपूर्व अशी आहे, या संदर्भात त्या लिहितात, ''मनात सद्भाव असला म्हणजे मनुष्य दुसऱ्यांच्या अडचणींचा विचार करतो आणि खूप सूट देतो. तो सद्भाव नाहीसा झाला की प्रत्येक बारीक गोष्टींचा वेगळा अर्थ माणूस करू लागतो.''[२४]

या कथेतून दुर्गा भागवत म्हणतात, अजोड मैत्रीचे उदाहरण म्हणजे श्रीकृष्ण–सुदामा होय. मैत्रीमध्ये गरिबी–श्रीमंती येता कामा नये. फक्त प्रेम जिव्हाळा, विश्वास आणि निःस्वार्थी वृत्ती असावी. प्रस्तुत कथेमधून लेखिकेला संस्कारक्षम वयाच्या मुलांवर हेच संस्कार रुजवायचे होते.

## १४. **सोनेरी मुंगूस** :

'मुलांच्या मेळाव्यात' या सदरात 'सोनेरी मुंगूस' (१२ मार्च १९५५) ही एक अद्भुत कथा प्रकाशित झालेली आहे. या कथेत सोनेरी मुंगूस त्याच्या शरीरावरील केस सोनेरी कसे झाले हे सांगतो. अर्ध्या अंगावरचे केस सोनेरी होतात, तर राहिलेल्या शरीरावरील केस सोनेरी व्हावे, या विचाराने तो फिरतो आहे. पण त्याला यश मिळत नाही.

या कथेतील धर्मराजाने भारत विजेता म्हणून अश्वमेध यज्ञ करायचे ठरविले. या अश्वमेध यज्ञासाठी सगळ्या देशांतील राजांना बोलविले. यज्ञात दानधर्म मिळेल या आशेने गरीब

लोक हस्तिनापुरात आले होते. अश्वमेध यज्ञ करणे ही राजांच्या जीवनातील परमोच्च सिद्धी मानली जात असे. तेथील वातावरण प्रसन्न होते. हा यज्ञ चालू असताना अचानक एक मुंगूस तिथे येऊन लुडबुड करू लागला. अनेकांचे लक्ष तिकडे गेले. तो मुंगूसही मोठा चमत्कारिक होता. त्याचे अर्धे अंग सोनेरी होते आणि अर्धे अंग साधे होते. ते तिथे लोळत होते. हे दृश्य पाहून मोठा विस्मय तेथे उपस्थित असणाऱ्यांना वाटला.

एकाने हे सर्व पाहून मुंगसाला विचारले, ''अरे हे काय करत आहेस? तू इथे कोणाच्या पायाखाली येशील आणि तुला इजा होईल आणि यज्ञात विक्षेप पडेल. तू इथून जा.'' मुंगूस म्हणतो– या मागे एक मोठी गोष्ट आहे. असे बोलत लोळू लागले. तूप आणि उडालेले पीठ यामुळे त्याचे अंग विद्रूप झाले होते. तो ब्राह्मण म्हणाला, ''आता तुझे लोळणे पुरे कर आणि इथून जा.'' मुंगसाला वाईट वाटले आणि तो सांगू लागला– माझे इतके सुंदर शरीर असून मला असे लोळताना पाहून तुम्हाला किळस येते. मी इथे फार आशेने आलो होतो, पण माझ्या पदरी निराशाच पडली.

फार फार वर्षापूर्वी कुरुक्षेत्री एका कुटुंबातील कर्ता पुरुष राहत होता. तो ज्ञानदानाचे पवित्र कार्य निरलसपणे करीत असे. त्याची पत्नी गृहस्थधर्म सांभाळून गरीब–दुबळ्यांची सेवा करीत असे. त्याला एक मुलगा होता आणि सूनही होती. तीही मनोभावे मदत करत असे. समाजसेवा करीत असल्यामुळे संपत्ती मिळविण्याला वेळ उरत नव्हता. मग ते शेतात, खळ्यावर राहिलेले धान्य वेचून, समाधानाने उदरनिर्वाह करीत होते. त्यांनी दानभिक्षा घेतली नाही. एकदा त्यांनी देवांना नैवेद्य दाखवून आपण जेवायला बसले. पण ते घास घेणार एवढ्यात त्यांच्या समोर एक क्षत्रिय येऊन उभा राहिला. तोच कुटुंबकर्त्याने उभा राहून अतिथींचे स्वागत केले. त्यांना कुशलता, समाचार विचारून घेतले आणि अन्न ग्रहण करण्याची विनंती केली. यजमानाने आपल्या वाट्याचे अन्न अतिथीच्या पुढे ठेवले. अतिथी मिटक्या मारत जेवण करू लागला. तेवढ्यात पत्नीने आपलेही जेवण अतिथीला वाढले. अतिथीचा संतोष ही परममंगल घटना आहे. तो गृहस्थधर्म आहे. मुलाने आणि सुनेनेही जेवण दिले. स्वतः उपाशी राहून त्यांनी अतिथींना पोट भरून जेवण दिले. तेव्हा मुंगूस तिथेच होता. ते पुण्यपावन दृश्य पाहून जीवन सार्थक झाले असे वाटले आणि मी तिथे राहिलेल्या पिठात आनंदाने लोळू लागलो. तेव्हा अर्धे शरीर पिठाने माखले. तेच सोनेरी झाले. सद्भावाने केलेले काम, त्याचा स्पर्श होणाऱ्यांच्या

जीवनात असे सोने फुलते. पुढे माझे अर्धे शरीर सोने व्हावे म्हणून मी लोळत आहे. पण अजूनही माझे राहिलेले शरीर पूर्णपणे सोने झाले नाही. मुंगूस धर्मराजाने केलेल्या अश्वमेध यज्ञाच्या प्रसंगी उपस्थित राजांना त्यांच्या सोनेरी केसांची अशी माहिती देतो. प्रस्तुत कथा ही धार्मिक कार्याच्या माध्यमातून समाज उन्नती घडवून आणणारी आहे. 'अतिथी देवो भव' ही उक्ती या कथेतून सांगितली आहे.

चांगल्या व्यक्तीच्या सहवासाने माणसाच्या जीवनाचे सोने होते. म्हणून माणसाने सद्‌वर्तन करणाऱ्यांच्या संगतीत राहिले पाहिजे, असे ही कथा सांगते.

**१५. हिमालयाची हाक** :

'हिमालयाची हाक' (७ मे १९५५) ही प्रेमा कंटक यांची कथा प्रकाशित झाली आहे. बालपणातील हिमालयाबद्दलचे विचार मनात किती खोलपर्यंत रुजलेले आहेत ते सांगितले असून, त्यांच्या बालपणाच्या मनाला हिमालयाबद्दल ओढ असून हिमालय हा प्रचंड भिंतीसारखा उभा आहे, असे त्यांना वाटते. हिमालय हा हिमाने झाकलेला असतो. म्हणून त्याला हिमालय असे नाव पडले आहे, असे त्यांच्या गुरुजनांनी सांगितले आहे.

हिमालयाबद्दल पुढे लेखिका सांगते, कथा पुराणामध्ये हिमालयाविषयी ऐकले होते. हिमालयाच्या उदरात सतीने अवतार घेतला आणि तपश्चर्या करून शिवाला वरले आहे. त्याला कैलास असे म्हणतात. हिमालयात अर्जुनाने सुद्धा तपश्चर्या केली आणि शेवटी श्री शंकराचार्य, समर्थ रामदास स्वामी, स्वामी विवेकानंद आदी महान साधू-पुरुषांनी तेथेच वास्तव्य करून ज्ञान व सिद्धी प्राप्त करून घेतली. पुराणे कथा वाचून हिमालयाच्या निर्मळ व भव्य सौंदर्याबद्दल एक रमणीय वातावरण मनावर उमटलेले दिसून येते.

लेखिका प्रेमा कंटक म्हणतात- हिमालयाबद्दलची ओढ प्रत्येक हिंदूला आहे. हिमालयाबद्दलची प्रेमळ भावना सगळ्यांच्या मनात आहे. तशीच माझ्याही मनाला हिमालयाची ओढ आहे. हिमालयात राहण्यास जावे असे त्यांना नेहमी वाटते. हिमालयात जाण्याचे लेखिकेचे स्वप्न पूर्ण झाले नाही. जसे जसे तारुण्यात येऊ लागली तेव्हा मनात, देशात शांतता नांदावी, गुलामीतून मुक्त व्हावे, अशी भावना मनात रुजू लागली.

लेखिकेवर महात्मा गांधीजींचा प्रभाव होता. लेखिका म्हणते, आपणही स्वातंत्र्यासाठी सत्याग्रह करावा, युद्ध लढावे. त्यात आपणही सहभाग घ्यावा, या उद्देशाने मी त्यांच्या आश्रमात

गेले होते. महात्माजींनी शिकवले की, युद्ध हे सत्याग्रहाचे एक अंग आहे आणि मानवाचे जीवन पूर्णपणे सत्याग्रही बनले पाहिजे. सत्याग्रही झाल्यानंतरच आत्म्याची आणि समाजाची शुद्धी होते.

महात्माजींचे विचार खूप महान होते. त्यांचा प्रभाव एवढा महान होता की, त्यांच्यासमोर इतर माणसे लहान वाटू लागली. या विचारात असतानाही हिमालयाचे विस्मरण झाले नव्हते. हिमालयास बघावयाचे असेल तर खूप आत गेले पाहिजे, असे त्यांना वाटायचे आणि ती इच्छा अतृप्त राहिली.

त्याच काळात आचार्य कालेलकरांची 'हिमालयाचा प्रवास' व 'लोकमाता' ही पुस्तके वाचली. म्हणून हिमालय पाहण्याची ओढ मनात कायम घर करून राहिली. हिमालयाचे सौंदर्य लेखिका स्पष्टपणे रेखाटताना लिहितात–

''हिमालयाच्या पोटी सतीनें अवतार घेऊन, तपश्चर्या करून शिवाला वरलें; हिमालयाच्या शिखरावर एका उंच शिखरावर शिव–पार्वतीचा दास असतों; त्यास कैलास म्हणतात. गंगा हिमालयावरच प्रथम अवतीर्ण झाली! भगवान शंकराने तिला तेथेच आपल्या मस्तकावर धारण केले. अर्जुन पाशुपतास्त्राच्या प्राप्तीसाठी तपश्चर्या करण्यात तेथेच गेला होता. शेवटी शेवटी श्रीशंकराचार्य, समर्थ रामदासस्वामी, स्वामी विवेकानंद आदी महान साधु पुरुषांनी तेथेच वास्तव्य करून ज्ञान व सिद्धी यांची प्राप्ती करून घेतली. इत्यादी कथा ऐकून व वाचून हिमालयाच्या निर्मल व मुख्य सौंदर्याबद्दल, तेथील पवित्र वातावरणाबद्दल व तेथे राहून तपाचरण करणाऱ्या ऋषिमुनींबद्दल एक रमणीय पण अस्पष्ट चित्र मनावर उमटले होते. सामान्यपणे सर्व हिंदूंच्या मनात जी भावना मूर्त वा अमूर्त रूपात राहते, ती माझ्याही मनात प्रादुर्भूत झाली. 'आपणही त्याच्या दर्शनास व शक्य तर आश्रयास गेले पाहिजे!''[२५]

उपरोक्त संदर्भानुसार आपणास हिमालयाचे महत्त्व, शिवपार्वताचे निवासस्थान तेथील तपोभूमीबद्दलचे आकर्षण, सौंदर्य व वातावरणाचे चित्र लेखिकेच्या मनावर उमटले आहे. पण हिमालय पाहण्याची इच्छा पूर्ण झाली नाही.

**१६. शैशवदूत :**

देविदास बागूल यांची 'शैशवदूत' (३० जुलै १९५५) ही कथा प्रसिद्ध झाली आहे. या कथेत पावसाला 'शैशवदूत' असे म्हटले असून, पावसाचे महत्त्व अधोरेखित करून कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलाच्या मनातील शैशववृत्ती या कथेत प्रकट झाली आहे.

आभाळात ढग दाटून आले. पाऊस जोराचा पडू लागला. मी त्या वेळेला कॉलेजात प्राध्यापकाचे कंटाळवाणे भाषण ऐकत होतो. पावसाचा जोर पाहून शाळकरी जीवन आठवले. आता सुटी मिळणार अशी आशा वाटून मनात उत्सुकता वाढू लागली. मुलांची चुळबुळ सुरू झाली. तास सुटला. परंतु सुटी काही जाहीर होईना. पावसाकरिता सुटी द्यायला कॉलेज म्हणजे शाळा नाही असे समजताच मी हिरमुसलो. ज्याला हवी आहे. तो तास बुडवून सुटी घेऊ शकतो.

बालपणात पावसाचे महत्त्व अधिक वाटते. पावसाच्या पाण्याच्या प्रवाहात बालपणी कागदाच्या होड्या करून सोडू लागलो. अंगणातून वाहणाऱ्या पाण्यात उभे राहून पायाला गुदगुल्या करवून घेतल्या. या साऱ्या खेळात अंगाचा कण ना कण ‘जीवनमय’ झाला. त्या वेळी मन कसे आनंदाने काठोकाठ भरले होते. म्हणजेच वर्षभर हरवलेले शैशव पुन्हा एकदा भेटले होते. वर्षा ऋतूने शैशवाची भेट घडवून दिली होती. लेखकाने शैशवाची ओढ कायम मनात असते, हे या कथेत नोंदविले आहे. या कथेत पावसाच्या पाण्याचे सौंदर्यात्मक पद्धतीने वर्णन केलेले आहे. पावसाच्या पाण्याने पुराचे रूप धारण केलेले आहे. हे या कथेत सांगितलेले आहे.

पुराचे पाणी माणसाला नदीवर घेऊन जाते. पूर आणि इंद्रधनुष्य म्हणताच हातातले काम बाजूला ठेवून प्रत्येकाला त्या पुराचे अथवा इंद्रधनुष्याचे दृश्य बघण्याचा ‘विधायक मोह’ होतो, असे लेखक म्हणतात. पुराच्या पाण्याची ओढ प्रत्येकालाच असते. गावात पूर आलेला समजताच नदीकाठी जत्रा भरते. माणसांची एकच गर्दी होते आणि पुरात बाजारी आकर्षण नसूनही माणसे तासन् तास पुराच्या धावत्या पाण्याकडे पाहत असतात. या पुराकडे बघून माणूस स्वत:लाही विसरून जातो आणि प्रत्येकाच्या तोंडून ‘काय हो, केवढा मोठा पूर हा!’ असे निर्धास्तपणे म्हणतात.

खरे तर पाण्याचे महत्त्व जन्माला येतानाच माणसाला असते. कारण गर्भाशयात वाढणारे बाळ हे पाण्यातच असते. तशी पाण्याची ओढ माणसाला आयुष्यभर असते. कारण पाणी म्हणजे जीवन, जीवनाबद्दल आसक्ती या कथेत नमूद केली आहे. या कथेत वयाच्या कोणत्याही टप्प्यावर बालसुलभ भावना जिवंत असतात हे दिसून येते.

## १७. आपल्या भोवतालचे विश्व :

'मुलांच्या मेळाव्यात' (१७ सप्टेंबर १९५५) या सदरात 'आपल्या भोवतालचे विश्व' या अ. वि. दातार यांच्या या लेखात सूर्यमाला–पृथ्वीवरील रात्र आणि दिवस, सूर्यापासून मिळणारी ऊर्जा आणि या ऊर्जेचा वापर मानवाला कशा रीतीने करता आला हे सांगितले आहे. या लेखात वैज्ञानिक दृष्टिकोन आहे. श्री. दातार हे कोडाईकॅनाल येथील सौर वेधशाळेत संशोधन करीत होते. त्यांनी बालवाचकांना पृथ्वी आणि तारे यांची उद्‌बोधक माहिती सांगितली आहे.

या पृथ्वीतलावर आपण राहतो. आपली दररोजची दिनचर्या चालू असते. सकाळ, संध्याकाळ, रात्र; पुन्हा सकाळ हे कालचक्र चालूच राहते. पण आपण कधी पृथ्वी आणि आकाशाचा इतक्या गांभीर्याने विचार करतच नाही. लेखकाने ही माहिती सोप्या भाषेत आपल्यापर्यंत पोहोचविली आहे. पृथ्वीचा व्यास ८००० मैल आहे आणि आपली जमीन २०० मैल आहे. दुधावर साय येते अन् त्या सायीवर मुंग्या धावतात. त्या बिचाऱ्यांना कल्पनादेखील नसते की, पायाखाली उकळते दूध आहे. तशीच आपली स्थिती आहे.

पृथ्वी स्वतःभोवती फिरता फिरता सूर्याभोवतीही फिरत असते. आपण २४ तासांत २५००० मैल फिरतो. वास्तविक सूर्यापासून आपण ९ कोटी २५ लक्ष मैल दूर आहोत. गुरुत्वाकर्षणामुळे पृथ्वी सूर्याभोवती फिरते. सूर्य हा आपला जीवनदाता आहे. सूर्याचा आकार फार मोठा आहे. सूर्य इतकी उष्णता रोज बाहेर टाकूनही सूर्य लाखो वर्षे तसाच टिकून आहे. हायड्रोजन बॉम्बच्या क्रियेने निर्माण होत असते तशीच जवळपास त्याच प्रकारची क्रिया सूर्यावर होते. जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ आइनस्टाइन म्हणाला की, तुम्ही एक गुंजभर वस्तूंचा संपूर्ण नाश केलात तर इतकी शक्ती निर्माण होईल की, आपला दैनंदिन वापरातला टॉर्च सतत ६००० वर्षे जळत ठेवता येईल. इवल्याशा वस्तुमानात एवढी प्रचंड शक्ती लपलेली असते.

आपल्या पृथ्वीचा अगदी पोटचा गोळा म्हणजे चंद्र होय. आकाशात दूरवर पसरलेले तारे त्या प्रत्येक ताऱ्याला स्वतःचे व्यक्तिमत्त्व आहे. एक विशेष आहे. हर्षल या गृहस्थाने प्रथम ताऱ्यांचा सखोल अभ्यास केला होता. चर्चमध्ये पेटे वाजवणारा एक साधा माणूस. पण स्वतःच त्याने दुर्बिण बनवली व रात्री तासन् तास तो ताऱ्यांशी मसलत करू लागला. त्याने खूप माहिती गोळा करून खगोलशास्त्रात भर पाडली.

प्रस्तुत कथेत आकाशगंगेविषयीची माहिती आली असून खगोलशास्त्राच्या अभ्यासाची गोडी निर्माण होण्यास याचा नक्कीच फायदा होईल.

**१८. जादूचा शंख :**

'मुलांच्या मेळाव्यात' या सदरात 'जादूचा शंख' ((१० डिसेंबर १९५५)) ही सौ. कुसुमताई पटवर्धन यांची उत्तर प्रदेशातील एक मनोरंजक लोककथा प्रकाशित झालेली आहे. या कथेत एका गावात गुंडोपंत हा गरीब ब्राह्मण राहत होता. त्याची पत्नी सीताबाई व मुलगा पुंड्या. गुंडोपंत गावात भिक्षा मागून दररोज शंकराच्या देवळात जाऊन नेमाने नैवेद्य दाखवीत असे. सीताबाई बिचारी गरीब आणि कष्टाळू असून आहे त्या परिस्थितीत समाधानी होती. दुष्काळात या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली.

एक दिवस गुंडोपंत गावभर हिंडले आणि रिकाम्या झोळीने शंकराच्या देवळात गेले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. हात जोडून ते म्हणाले, ''परमेश्वरा, आता अजून किती हाल सोसायला लावतो. एकदा या कष्टातून सोडव. पुढे शंकरदेव प्रसन्न झाले. शंख फुंकला, तर त्याला हवे ते मिळणार; पण समोरच्या व्यक्तीला त्याच्या दुप्पट मिळेल. म्हणून गुंडोपंत बैचैन झाले. तपस्या मी केली आणि दुप्पट फळ शेजाऱ्याला कसे म्हणून गुंडोपंताना नकोसे वाटू लागले.

घरी गेल्यावर शंख बाजूला ठेवला. शंख कशाचा म्हणून सीताबाईने विचारल्यावर काही तरी अभद्र बोलून ते तो बाजूला ठेवतात. पुंड्याच्या नजरेत हा शंख येतो तो वाजवतो. त्याला शंकर देव हवे ते अन्न देतात. या कथेतून स्वत:चा चांगला विचार करताना इतरांचाही चांगला विचार करावा. आपल्याबरोबर दुसऱ्याचेही चांगले व्हावे. ही वृत्ती माणसात असावी. या कथेतून कठीण परिस्थितीत फक्त स्वत:च्या फायद्याचा विचार न करता सर्वांना त्याचा लाभ मिळावा, हा दृष्टिकोन दिसून येतो.

**१९. चार वेडे :**

'मुलांच्या मेळाव्यात' या सदरात 'चार वेडे' (३१ डिसेंबर १९५५) ही शंकर भिका सावंत यांची कथा प्रसिद्ध झाली आहे. या कथेतील चार वेडे फार उनाडक्या करत होते. त्यांना त्यांचे आई-वडील कंटाळले होते. त्यांनी चौघांनाही घराबाहेर काढले. त्या चौघांनी दूर गावी जायचे ठरविले. त्यांना जाताना एक नदी लागली. तिथे ते एकमेकांना मोजतात तर तिघेच

आहेत असे वाटते. कारण ते चौघे मोजत असताना स्वत:ला धरत नाहीत. आपल्यातला एक नदीत हरवला, म्हणून नदीकाठची वाळू उकरतात. तिथून गावचा पाटील जात असताना या चार वेड्यांना पाहतो. पाटील विचारतो, का असे वाळू उकरता. त्यावर ते म्हणतात, आमच्या चौघांपैकी एक या नदीत हरवला आहे. मग, पाटील यांना चौघे असल्याचे सांगतो. त्यांना आपल्याकडे कामाला ठेवतो. एका वेड्याला म्हातारीची काळजी घ्यायला सांगतो. एकाला शेत नांगरणी करायला सांगतो. दोघांना गाडी बैल देऊन गवत आणायला सांगतो.

पुढे पाटील नोकरांनी काय काय करून ठेवले हे पाहण्यास जातात. तर काय आश्चर्य! आपापले काम सर्व जण सांगतात, एक म्हातारी मेली म्हणून रडतो. कारण म्हातारीला मारल्यामुळे ती बिचारी मरते, तिला अंत्यविधीला नेत असताना ती रस्त्यातच पडते. मग वेडे दुसऱ्या म्हातारीला धरून जाळतात. परत येताना त्यांना ती म्हातारी रस्त्यात दिसते. तिलाही जाळतात. दुसरा शेत चौफेर नांगरतो आणि त्या नांगराला कुऱ्हाडाने तोडून सरपण करून आणतो आणि दोघे वेडे गाडी बैलांनी गवत आणताना बैल सोडून देऊन गाडीला गवतासकट जाळून टाकतात.

पाटलांना कळते की हे चार वेडे आहेत. म्हणून चौघांना खूप चोप देतो. मग ते घरी परत येतात आणि आपआपल्या घरी सुखाने राहू लागतात. आई–बापाला या वेड्यांचे आश्चर्य वाटते की, ते सुधारले म्हणून. ते सर्व जण कामे करून आनंदात राहू लागले.

या चार वेड्यांना पाटील सन्मार्गाला लावतो. एखाद्या वेड्या व्यक्तीला एखाद्या कृतीतून सन्मार्गाचे धडे शिकविणे होय. हेच खरे तर वडीलधाऱ्याचे काम आहे.

प्रस्तुत कथा ही मोठ्यांना (पालकांना) संदेश देते. मुलांच्या चुकांकडे डोळसपणे पाहायला हवं! त्यांच्या प्रेमाखातर त्यांच्यातल्या दुर्गुणांकडे डोळेझाक न करता वेळीच त्यांना खडसावले पाहिजे. तरच त्यातून उद्याचा चांगला नागरिक घडेल.

## २०. नव्या वर्षाचे स्वागत :

'मुलांच्या मेळाव्यात' या सदरात 'नव्या वर्षाचे स्वागत' (३१ डिसेंबर १९५५) ही शंकर सारडा यांची कथा प्रकाशित झालेली असून या कथेतून वेगवेगळ्या देशांत नववर्षाचे स्वागत कसे करतात आणि आपल्या देशात कसे करतात, याचे कथन केलेले आहे. शिवाय नववर्षाचे स्वागत केव्हापासून सुरू झाले आहे, याचा विचार कथेत आला आहे. नवीन वर्ष कुठलेही

असले, तरी साऱ्या लोकांत नव्या वर्षाच्या स्वागताची उत्सुकता मात्र शिगेला पोहचलेली आहे. १९५५ चे वर्ष आज संपले. उद्यापासून १९५६ साल सुरू होणार. इंग्रजी कालगणनेनुसार जरी हे वर्ष ५६ असले तरी सगळीकडे हेच चालू नसेल. अरबस्थानात १९७६ वे वर्ष सुरू होईल. इजिप्तमध्ये १६७३ वे सुरू होईल. ज्यू लोकांच्या दिनदर्शिकेत हे ५६१७ वे वर्ष असेल आणि जपानमध्ये मात्र ३१ वे सुरू होईल.

या नव्या वर्षाचे स्वागत करताना सगळे आनंदात असतात. अमाप उत्साहाने बेहोष होतात आणि नव्या वर्षाच्या शुभकामनांनी मस्त होतात. बाली बेटाचे लोक नूतनवर्षाचे स्वागत करताना परमेश्वराला खाद्यपदार्थांचा नैवेद्य दाखवितात. काही दिवस नैवेद्य देवापुढे ठेवल्यावर मग खाद्यपदार्थांचा इष्टमित्रांसह आस्वाद घेतात. बाकी हे लोक इतर लोकांपेक्षा भाग्यवान आहेत. आपले वर्ष ३६५ दिवसांचे, तर त्यांचे फक्त २१० दिवसांचे! त्यामुळे इतर लोकांपेक्षा आनंदाची लयलूट लवकर मिळते.

भारतात मात्र नववर्षाच्या दिनाची बरीच विविधता आहे. कारण आपल्याकडे निरनिराळी पंचांगे प्रचलित आहेत. शीख लोकांना नववर्षदिन म्हणजे धार्मिक महत्त्वाचा पवित्र दिवस वाटतो. ते 'ग्रंथसाहिब.' तर आसामातल्या जंगली प्रदेशात नववर्षाच्या स्वागताच्या तयारीत हत्तीला रंगरंगोटी करून सजवतात.

जपानमध्ये नव्या वर्षाच्या स्वागताचा सोहळा पुरेपूर आठवडावर चालतो. नववर्षदिनाच्या मध्यरात्रीलाच या सोहळ्याला आरंभ होतो. १०८ वेळा देवळात घंटानाद होतो.

आपल्या महाराष्ट्रात गुढीपाडव्यालाही अशीच मज्जा असते. लता-पल्लवांनी घरेदारे शृंगारणे, गुढ्या तोरणे उभारणे, पुरणपोळ्यावर यथेच्छ ताव मारणे इ. कामात पूर्ण दिवस गडबडीत जातो. काही शतकांपूर्वी, युरोपांत या नववर्षादिनाला वेगळेच महत्त्व होते. पहिली एलिझाबेथ या दिवशी मिळणाऱ्या देणग्या गोळा करून वर्षाचा वरखर्च भागवीत असे.

फ्रान्स १५६४ सालानंतर १ जानेवारी हा नववर्षदिन म्हणून साजरा करू लागला. त्यापूर्वी त्यांचा वर्षारंभ २५ मार्चला व्हायचा. या देशात पुरुष भेट देत असत. दुरावलेल्या मात्या-पित्यांना प्रथम अशी पत्रे पाठविण्याची कल्पना युद्धभूमीवर गेलेल्या सैनिकांनी मध्ययुगात सुरू केली, तर सध्याच्या भेटकार्डाची कल्पना १८४३ मध्ये निघाली.

नव्या वर्षाच्या स्वागताच्या! अशा काही पद्धती आहेत जगाच्या पाठीवर आपण कुठेही गेलो, तरी तो प्रदेश विकसित असो, मागासलेला असो, तेथील रहिवासी गौरवर्णीय असोत वा कृष्णवर्णीय असोत, श्रीमंत असो वा गरीब असोत; नव्या वर्षाच्या आगमनाची उत्सुकता मात्र सगळीकडे सारखीच. त्यामुळे मोठी गर्दी असते. त्या दिवशी सगळे बाहेर मज्जा करण्यासाठी पडतात. या कथेतून विविध देशांतील नववर्षाची सुरुवात, कालावधी, साजरा करण्याची पद्धती या विषयावर माहिती आलेली आहे. त्याचबरोबर आनंद साजरा करण्याची माणसाची भूमिकाही दिसून येते. ही कथा मुलांना ज्ञानाचे स्रोत सांगणारी आहे.

**२१. फुले आणि मुले** :

'फुले आणि मुले' (७ जुलै १९५६) ही रमा बखले यांची कथा असून, फुलांसारखीच रंगविलेली आहे. दुर्गा भागवत यांच्या 'ऋतुचक्र' या पुस्तकातील लेखांसारखा हा लेख वाटतो. त्या म्हणतात, फुले म्हटली की मुलांची आठवण होतेच. मुले ही फुलांसारखीच असतात असे सर्वांना वाटते. कवी मुलांना फुलांची उपमा देतात. त्यांचा हट्ट करणे, रडणे, खोड्या करणे पाहून ही संकटे वाटतात. मोठी माणसे मुलांना फुलासारखे समजतात. याची मुलांना जाणीव नसते.

लेखिकेने म्हटल्याप्रमाणे मुले ही निष्पाप फुलांसारखीच असतात. खरोखरच फुलांना निर्माण करणारा परमेश्वर किती थोर आणि सहृदय असतो. फुले ही सगळ्या झाडांना, वेलींना शोभा आणतात. परमेश्वराच्या शिरावर पडून ती पावन होतात. ते मानवाचे शरीर सौंदर्य खुलवतात. फुले ही मानवालाच नाही तर देवादिकांनाही अत्यंत प्रिय आहेत. खरे तर फुले ही सर्वांनाच प्रिय असतात. कारण ती म्हणतात 'माझ्याचसाठी फुललो न मी हे' फुले उमलतात ती स्वत:साठी नव्हे, तर दुसऱ्यांसाठी.

फुलांमध्ये असलेल्या गुणधर्मांनी मनुष्याचे जीवन समृद्ध होते. फुले आहेत म्हणून वनस्पती, फळे व नि रंग, सुगंध, मध, गुलकंद आहे, असे लेखिका म्हणते. आपल्या जीवनात आपण फुलांच्या नेहमी सहवासात येतो. पण लेखिकेने किती सुंदर पद्धतीने फुलांचे विश्लेषण केले आहे. त्यांचा निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच निराळा आहे. मानवाच्या जीवनाशी अत्यंत निगडित असलेली फुले मानवाला निर्मळतेचा संदेश देतात.

फुलांची सुंदरता रमा बखले यांनी सौंदर्यात्मक पद्धतीने इथे रेखाटलेली आहे. फुलांची ओढ कायम मानवाला असते. अनेक फुलांची नावे इथे सांगितली आहेत. ही सर्व फुले आपल्या नजरेसमोर येऊन उभी राहतात.

निरनिराळ्या ऋतूंत निरनिराळ्या प्रकारची फुले येतात. तरी वसंत ऋतूत फुलांचे वैभव अधिक असते. सुगंधाने वातावरण भरून जाते. शेवटी लेखिका म्हणते, जर आपण अंगणात फुलझाडांची जोपासना केली, तर आपल्या सगळ्या आवडीच्या फुलांचा सुगंध आपणाला मिळू शकतो. आपल्या मुलांनाही या फुलांची माहिती मिळेल. यातून मुलांना आनंद मिळेल आणि रंगीत, सुगंधित निसर्गाच्या सान्निध्यात त्यांच्या सहवासात त्यांचा नक्कीच मनोविकास होईल.

'पुष्पसंगे मातीस वास लागे' फुलांच्या सहवासात माती सुगंधित होते, तर मुले का होणार नाहीत, असे लेखिका म्हणते. फुलाप्रमाणेच मुलांचे मन संवेदनक्षम असते त्यांच्यावर संस्कार लवकर होतात. म्हणूनच फुलांच्या सहवासात जर मुले राहिली तर खरोखरच फुलांचे गुण मुलांत उतरून ती सुगंधमय होतील. संसारवेलीवरची ती खरी फुले आहेत आणि मोठ्या माणसांना ती अधिक प्रिय वाटतील.

मुलांचा आणि फुलांचा अजोड संबंध आहे. ही कथा ललित्याकडे झुकलेली दिसते. यातून मुलांची व फुलांची तुलना केली आहे. मुले आणि फुले ही निरागस असून, निसर्गातील वेलीवर आलेली फुले व मानवी उत्पत्तीची पुठांची अवस्था म्हणजे मूल होय.

**२२. घायपाताचा जन्म** :

'घायपातचा जन्म' (२८ ऑगस्ट १९५६) ही दुर्गा भागवत यांची 'संताळ कथा' असा उल्लेख येतो. या कथेत सात भाऊ आणि एक बहीण असते. त्यांच्या घराला एक छोटेसे अंगण असते. त्या अंगणात ती भाजीपाला लावते. अंगणातला भाजीपाला तोडून ती भाजी चिरत असते, भाजी चिरताना तिचे बोट कापले जाते. भाजीत खूप रक्त जाते. सर्व भाजीत रक्त होते. ती भाजी तशीच शिजवते आणि भावांना जेवण वाढते. सगळे भाऊ आनंदाने जेवण करतात. ते बहिणीला भाजीबद्दल विचारतात, आज भाजी खूप चविष्ट झाली आहे, त्यात आज काय टाकलेस? ती बोट कापलेले सांगते, माझ्या बोटाचे रक्त भाजीत पडले. सगळे भाऊ नंतर विचारात पडले की, रक्त इतके गोड तर तिचे मांस किती चविष्ट असेल, या विचाराने ते बहिणीचा खून करण्याचा बेत ठरवतात.

दुसऱ्या दिवशी बहिणीला शेतात घेऊन जातात आणि तेथे तिच्यावर वार करतात. सहा भाऊ तिला मारतात. पण धाकट्या भावाला तिची माया येते. तो मारत नाही. ती मरण पावते तिचे तुकडे करून तिची शेतातच भाजी करून खातात. परंतु धाकटा भाऊ खात नाही. तिचे मांस एका बाजूला टाकतो.

त्या मुलीच्या मांसातून एक कळकीचा सुंदर कोंब निघतो. तो वाढू लागतो. तिथून एक तरुण जात असताना या झाडाकडे लक्ष जाते. तो विचार करतो. मला सारंगी करायला हा वेळू चांगला आहे. तो तोडून सारंगी बनवतो. त्यातून बहीण–भावाची बहीण असा आवाज निघतो. खरोखरच ती मुलगी सारंगीत बसलेली होती. तो सारंगीला खूप जपायचा.

एकदा सांरगीतून मुलगी बाहेर आली. तो तरुण त्या मुलीचे रूप बघून थक्क झाला. तिची करुण कहाणी ऐकून त्याला वाईट वाटले. त्याने तिच्याशी लग्न केले. तिला आपल्या घरी घेऊन गेला. तिचे पाय घराला लागताच घराची भरभराट होऊ लागली. लवकरच ते कुटुंब श्रीमंत झाले. पुढे काही वर्षांनी भावांची खूप वाईट परिस्थिती होते. त्यांच्या घरी अठराविश्व दारिद्य्र येऊन भीक मागण्याची वेळ येते. ते भीक मागत मागत बहिणीच्या घरी येतात. ते तिला ओळखत नाहीत. पण बहीण मात्र भावाला ओळखते. त्यांचा पाहुणचार करते. शेवटी ती भावांना तिची ओळख पटवून देते. सगळ्या भावांना राग येतो. ती सांगते, मला धाकट्या भावाने वाचवले आहे. त्यांना तिचा राग येतो. ते तिथेच जमिनीला पाय मारतात. तिथे मोठा खड्डा होतो. तिला त्या खड्ड्यात लोटतात. शेवटी बहीण त्यांचे केस ओढते व तिथे आजूबाजूला घायपाताचा जन्म होतो. घायपाताची निर्मिती कशी झाली, हे या कथेत सांगतात. लोक त्यांच्या केसांसारख्या तंतूंनी दोऱ्या वळायला कसे शिकले. घायपातापासून दोऱ्या बनविण्याचा व्यवसाय ग्रामीण भागात केला जातो. पण घायपाताचा संबंध बहीण–भावाच्या नातेसंबंधाशी लेखिकेने जोडून या कथेला भावनिकतेची जोड दिली आहे.

**२३. बिचारी राजकन्या! :**

'मुलांच्या मेळाव्यात' हॅन्स अँडरसनची परिकथा 'बिचारी राजकन्या!' (२९ जून १९५७) या कथेचा स्वैर अनुवाद शंकर सारडा यांनी केला आहे.

एक होता राजपुत्र. तो लग्न करण्याचा विचार करत होता. राजपुत्राला कोणताही राजा आपली राजकन्या द्यायला तयार असतो. हे राजपुत्राला माहिती होते. तरी राजपुत्राला

सम्राटाच्या राजकन्येशीच लग्न करावयाचे होते. पण ती हो म्हणेल का, असा प्रश्न राजपुत्राला पडतो.

राजपुत्राच्या बागेत गुलाबाचे झाड होते. त्याला एकच फूल यायचं, पण ते खूप मोठे यायचे. तेही पाच वर्षांतून एकदाच ते फूल उमलायचे. त्याचा गंध खूप सुवासिक होता. सुगंध घेणाऱ्याला साऱ्या काळजीचा आणि साऱ्या श्रमांचा विसर पडायचा. एक कोकिळाही होती. ती मंजुळ गाणी म्हणायची. या दोन वस्तू राजपुत्राला खूप आवडायच्या. त्या दोन वस्तू चांदीच्या पेटीत ठेवून राजकन्येला भेटवस्तू म्हणून त्याने पाठवल्या.

सम्राटाने या दोन वस्तू राजकन्येच्या महालात पाठविल्या. राजकन्या त्या दोन वस्तू पाहून आनंदित होते. पण तिला गुलाबाचे फूल खरोखर आहे का? याचे काही तिला खरे वाटत नाही आणि सुंदर गाणे गाणाऱ्या कोकिळेलाही सोडून द्यायला ती सांगते. तिला त्याचे तितकेसे महत्त्व वाटत नाही. एकदा राजपुत्र राजकन्येच्या राजवाड्यात गायी राखण्याचे काम करतो. राजपुत्र एक भांडे तयार करतो. त्या भांड्याच्या भोवती लहान लहान घंटा बांधतो. ते भांडे चुलीवर ठेवले की साऱ्या घंटा वाजू लागायच्या अन् गाणे म्हणायच्या आणि गावातील प्रत्येक घरातील त्या त्या दिवशी पदार्थ झाला असेल त्याचा वास यायचा.

राजकन्या दासीला पाठविते. त्या भांड्याची किंमत काय आहे. ते घेऊन ये. पण राजपुत्र दासीला सांगतो, राजकन्येचे दहा मुके पाहिजेत. मग हे भांडे मिळेल. राजपुत्राने अजून एक सुंदर असा खुळखुळा बनवला असतो. तो फिरवला की, त्यातून सात सूर बाहेर पडत. जगाच्या आरंभापासून निघालेले सूर त्या खुळखुळ्यातून बाहेर पडत.

राजकन्येच्या कानावर सूर पडताच तिला ते अलौकिक असल्याचे दिसते. ती दासीला पाठविते, त्याचे किती पैसे होतात ते विचारून ये. तो राजपुत्र राजकन्येचे शंभर मुके मागतोय. दासी परत येऊन राजकन्येला सांगते. तो राजपुत्र निश्चयाने म्हणतो, शंभर मुके देऊन हा खुळखुळा घेऊन जा.

पुढे राजपुत्र राजकन्येला विवाहास नकार देतो. कारण तिला वस्तूंची किंमत ठेवता येत नाही. राजकन्येला तो वेगवेगळ्या वस्तू बनवून आकर्षित करतो. पण जेव्हा राजकन्येला गुराख्याचे खरे रूप समजते. ती त्याच्याशी लग्नाचा विचार करते. पण राजपुत्र राजकन्येला

नाकारतो. कारण ज्यांच्या ठिकाणी गुणांची कदर केली जात नाही अशा व्यक्ती आयुष्यात येऊन कधीही उपयोगाचे नाही.

प्रस्तुत कथा ही लहान मुलांवर संस्कार करणारी असून, माणसाने श्रमाचे मूल्य जाणायला हवे. तरच त्याला आपल्या सभोवतालच्या वस्तूंची कदर करता येते. ज्याला वस्तूंची किंमत करता येत नाही, त्या जपता येत नाहीत, अशांना माणसांना जपता येत नाही. श्रमाचे संस्कार (श्रमप्रतिष्ठा) सांगत ते जपण्याचे संस्कार नकळतपणे ही कथा करते.

**२४. माती!**

दामोदर सीताराम देसाई यांची काळ्या आईचे महत्त्व सांगणारी 'मती' (२१ सप्टेंबर १९५७) ही कथा आहे. या कथेतून मातीविषयीचे प्रेम व्यक्त केलेले आहे. लेखक म्हणतो, या कथेतील आजोबांना मातीविषयी नितांत प्रेम आहे. बालपणी शाळेत शिकत असताना, वर्षाआडची उन्हाळ्याची सुटी मी माझ्या आजोळी काढीत असे. परंतु आता गावाकडे जाताना या मातीचा त्रास होतो. गावाकडे जाताना आजोबांना यायचे कळवलेले असताना, आजोबा फाट्यापर्यंत कोणाला तरी पाठवितात. गाडीवरून येताना माझे नीटनेटके स्वच्छ कपडे एकदम बाद व्हायचे. वाटायचं नको हा धुळकट प्रवास. नको हे आजोळी येणं आणि नको हा मातीचा प्रसाद!

तरीही आजोळी जायला आवडते. मनात आजोबांना कधी भेटू असे होते. आजोळाला लुटायला मिळणाऱ्या बाकीच्या सुखांची लालसा नसती तर हा मातीचा मारा मी कधीदेखील सहन केला नसता. गावी आल्यावर आजोबा विचारत असत. 'काय रे बाबा, नीट सुखरूप आलास ना? प्रवासात दगदग नाही ना झाली?' 'काही नाही. आजोबा पण धुळीचाच त्रास होतो. बाकी कशाचीही तक्रार नाही.' मग आजोबा हसून म्हणतात. 'अरे बाबा ही धूळ आहे म्हणूनच तर आम्ही शेतकरी जिवंत आहोत. मातीला नाव ठेवून कसं निभेल?'

या वेळीच नाही; तर इतर वेळीही आजोबांना मातीविषयी काही बोललेले अजिबात आवडायचे नाही.

मातीविषयी आजोबांच्या अंतःकरणात इतका ओलावा का? हे मला बालवयात समजायचंच नाही आणि ते आज मला आकलन झालंय. परंतु मातीचे महत्त्व मलासुद्धा आहे. हे

सांगण्यासाठी आज आजोबा राहिले नाहीत. ज्या मातीशी त्यांना आत्यंतिक ओढ होती त्या मातीशीच ते आता एकरूप होऊन गेले आहेत. मातीशी मिसळून गेले आहेत.

तरीही आजोबांच्या सगळ्या आठवणी नेहमी डोळ्यांत तरळताना दिसतात. लेखक पुढे म्हणतात– आजोबा सकाळी उठल्यानंतर संस्कृत श्लोक म्हणायचे. आजोबांना एकदा विचारले, हा श्लोक का बरे म्हणतात. यावर आजोबा सांगायचे, 'अरे बाबा उठल्याबरोबर मी या मातीला वंदन करतो. आपला पाय कुणालाही जरी चुकून लागला तर आपण पाया पडतो. नमस्कार करतो ना? आणि या मातीला तर आपण दिवसभर वावरताना पायाखाली तुडवतो. तेव्हा मी तिची उठतानाच क्षमा मागून ठेवतो.' यावर तुमचे काही तरीच असते आजोबा, असे म्हटल्यावर आजोबा म्हणतात, 'याच मातीतून आपण जन्माला आलो. या मातीवरच आपण जगतो आहोत. अन् अखेरीस या मातीलाच मिळायचं आहे बरं आपल्याला.' असे आजोबांनी सांगितलेलं पटलंयसुद्धा.

''जमीन विकायची!''

आणि तो जोरात खेकसला. संतापामुळे त्याचा आवाज चिरकल्याशिवाय अन् कापल्याशिवाय राहिला नाही.

''दुष्ट आळसट लेकाचे! जमीन विकतात?''

त्यांचा एकदम तोल गेला, खरंच तो खालीच कोसळायचा, पण त्यांनी त्याला सावरलं, मुसमुसून तो हुंदके द्यायला लागला.

मुलांनी त्याचं सांत्वन केलं, समजुतीच्या शब्दांत ते म्हणाले, ''छे...छे आम्ही जमीन कधीच विकणार नाही.''

''ही काळी आई विकायची पाळी आली म्हणजे संपलं बरं घराणं. याच मातींतून आपण आलो आणि इथंच परत जायचं आहे बरं आपल्याला. ही माती राखलीत तर जगाल, तगाल... तुमची जमीन तुमच्यापासून कोणीदेखील हिसकावून घेऊ शकणार नाही!''

म्हाताऱ्याच्या डोळ्यांतून ओघळलेले थोडेसे अश्रू त्यांच्या गालावर सुकले. त्यांनी तिथं आपल्या खारट खुणा तशाच ठेवल्या, त्यानं खाली वाकून मूठभर माती हातात घेतली आणि तो पुटपुटला, ''तुम्ही जर ही जमीन विकली तर अंतच ओढवला!''[२६]

लेखक या कथेत मातीचे मोल सांगतात. चीनमधील माणूस असो की, भारतातील माणूस त्याला मातीचे मोल आहे. चीनमधला वांगसुंग काय अन् व्यंकटेश माडगूळकरांच्या माणदेशी माणसातले अप्पा काय? हे एकाच मातीत जन्माला आलेले आहेत. मातीचे मोल सांगतात. या कथेत भारतीय समाज हा कृषिप्रधान समाज असून तो मातीचे महत्त्व जाणून आहे. त्यामुळेच हा समाज जिवंत आहे. या समाजाला जिवंत ठेवायचे असेल. तर मातीला जपलं पाहिजे. ती आपल्याला जगवेल हा संदेश कथेतून दिला आहे.

## २५. **'वाघोबा आणि हरिण'** :

'मुलांच्या मेळाव्यात' या सदरात 'वाघोबा आणि हरिण' (४ जानेवारी १९५८) ही फ्रेंच कांगोतील लोककथा. श्री. रा. टिकेकर यांनी अनुवादित करून 'साधना'च्या वाचकांना उपलब्ध करून दिली आहे. या कथेत वाघाची आणि हरणाची शर्यत लागलेली असते. दोघे लपंडाव खेळतात. वाघ म्हणतो– मी लपल्यावर कोणाला दिसणार नाही. हरिण म्हणते मी तुला शोधून काढणार. मग दोघांची शर्यत लागते. वाघोबा लपतो. मग हरिण लगेच शोधून काढते. पण हरिण लपल्यावर ते वाघाला सापडतच नाही. यावर ही कथा पूर्ण आधारित आहे. वाघाला या कथेत चार बायका असतात. त्या बायकांचे एकमेकींशी पटत नाही. त्यांना वेगवेगळी घरे बांधून दिलेली असतात. एक कुत्र्याचे पिलू प्रत्येकीच्या घरी जाते. पण सगळ्या त्याला हाकलून लावतात. पिलू मरते आणि त्या कुत्र्यापासून सुंदर देखणी राजकन्या निघते. राजा तिला लग्न करण्यासाठी विनवणी करतो. ते हरिण लग्न करण्यास तयार होते पण एक अट घालते. त्या चार बायकांना मारून टाक म्हणते. वाघ बायकांना मारतो. वाघाचे हिंस्र अवयव ती काढण्यास सांगते. नख, डोळे, दात, कान हे सगळे काढल्यावर वाघ दीनदुबळा होऊन मरायला टेकतो. तेव्हा सुंदर स्त्री हरणाचे रूप घेते. हरिण वाघोबाला आपले खरे रूप दाखवून देते.

''इतक्यात ती राजकन्या नाहीशी झाली. तिच्याऐवजी ते हरिण तिथं उभं राहिलं आणि म्हणालं, ''मी तुला हुडकून काढलं, तेव्हा तुला फार वाईट वाटलं. मला तू हुडकत होतास, पण मी सांपडलो नाही. तुझ्या मनातून मला ठार करायचं होतं. पण मी पहा तुला कसं युक्तीनं मारलं ते. असं म्हणून हरिण वाघाकडे पाहत राहिलं. तेव्हापासून वाघ नेहमी हरिणाला मारण्यास टपलेला असतो. हरिणाचं आणि वाघाचं वैर असं सुरू झालं.''[२७]

या कथेत वाघ आणि हरिण यांच्या कथेच्या माध्यमातून समाजातील दुष्ट प्रवृत्तीचा ऱ्हास कसा घडवून आणला जातो, हे दाखविलेले आहे. लेखकाने मानवजातीला चांगला दृष्टिकोन ठेवून जीवन कसे जगावे, याचा धडा शिकविलेला आहे. लेखकाने प्राण्यांमार्फत एक सुंदर कथा रंगविलेली आहे.

या कथेतून वाघाच्या दुष्ट प्रवृत्तीचा नाश हरणाने केला. हरिण आपल्या युक्तीने वाघाला नामशेष करते. प्रस्तुत कथा ही वाघ आणि हरणामधील शतकानुशतकांचे वैर कसे सुरू झाले हे सांगते. आपण इतरांना विनाकारण त्रास दिला तर तो आपल्यालाच होतो. जसे, इतरांसाठी खड्डा खोदाल तर तो खोदल्यावर आपणच त्या खड्ड्यात पडतो. हा संदेश कथेतून दिला असून, विनाकारण कुणालाही त्रास देऊ नये. आपल्यापेक्षा जे कमजोर असतात त्यांना तर त्रास देऊ नये. संवेदनशीलता जपावी. ही मूल्ये ही कथा सांगते.

**२६. 'माझी लहानपणीची शाळा'** :

'माझी लहानपणींची शाळा' (१५ फेब्रुवारी १९५८) या रमा बखले यांच्या कथेत लेखिकेने शाळेबद्दलच्या आठवणींना उजाळा दिलेला आहे. प्रत्येकाजवळ शाळेच्या कमी-जास्त प्रमाणात का होईना आठवणी असतात. लहानपणीची आपली शाळा म्हणजे विद्येचे मंदिर आहे. तिथे झालेले मनावरचे संस्कार पुढे आयुष्यभर उपयोगी पडतात. शाळेची आठवण झाली, की वाटते आजच्या सारखी आमची शाळा असती, तर किती छान झाले असते. खरंच आधी शिक्षण कसे असावे, शाळा कशा असाव्यात, याचा विचार जास्त कोणी करीत नसे. जिथे जागा सापडेल तिथे शाळा भरत. जेवढे आवश्यक असेल तेवढेच शिकवीत.

पुढे त्या म्हणतात- आमचे मास्तर तर अगदी कडकच होते. मुलांना शिक्षा करणे हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असे ते वागत. नेमलेला अभ्यास ते मुलांकडून करवून घेत असत. 'अभ्यास न करणाऱ्या मुलांना ते 'फवाऱ्यावरचा गुड' म्हणत. शनिवारची अर्धा दिवस शाळा असे. त्या वेळी पाटीवर पाढे लिहून न्यावे लागत असत. मुले उभी राहून बे एके बे पासून चाळीसपर्यंत पाढे म्हणत. यात घोकंमपट्टी तर होतीच, पण स्मरणशक्ती मात्र बळकट होती. आम्हाला मराठी, भूगोल नि गणित हे मुख्य विषय शिकवले जात. ड्रॉइङ्ग मधूनमधून शिकवीत. त्या वेळचा पाठ झालेला भूगोल तर अजूनही डोक्यात घट्ट बसलेला आहे. संध्याकाळचे चार

वाजले की, घरी कधी जाते असे वाटे. शाळा सुटली की, 'शाळा सुटली पाटी फुटली, हरी रे हरी मण भर तुरी' असे ओरडत, धावत घरी जात. परत उद्या शाळेत येण्याची ओढ नव्हती.'

लेखिका म्हणते– आजच्यासारख्या शाळेत रंगविलेल्या भिंती, छान छान पुस्तके किंवा पाहण्यासारखे चित्र शाळेत असते, तर मुलांना परत येण्याची उत्सुकता लागली असती.

लेखिकेने शाळेबद्दलच्या सुंदर आठवणी इथे व्यक्त केल्या आहेत. त्यांची कथा वाचताना प्रत्येकाच्या मनातली शाळेबद्दलची ओढ जिवंत होते. शाळा ही आयुष्यभराची जगण्याची शिदोरी आहे. शाळेच्या कोणकोणत्या आठवणी ठेवायच्या आणि कोणत्या लिहायच्या असे म्हणतात. आपण ज्या शाळेतून बाहेर पडतो त्या शाळेबद्दल नेहमीच प्रेम राहील.

त्या पुढे असे लिहितात– शाळेतच आपल्या मनावर विद्येचा पहिला संस्कार झालेला असतो. साक्षर होण्याची संधी प्रथम तिथेच मिळते. विद्येचे कण कसे गोळा करावेत, याचे बाळकडू आपल्या लहानपणाच्या शाळेतच मिळते. गुरू, विद्यार्थी, शाळासोबती या शब्दांची जाणीव प्रथम त्याच शाळेत होते. असे असताना या शाळेला खरेच कोणी विसरू शकत नाही.

प्रत्येकाच्या मनाच्या कोपऱ्यात ही शाळा घर करून असते. अजूनही त्या शाळेची आठवण येते. त्या शाळेत माझ्या मनावर चांगले संस्कार करण्याचा प्रयत्न केला, हे आठवून आनंद वाटतो. अशा प्रकारे रमा बखले यांनी लहानपणीच्या शाळेच्या असंख्य आठवणी या कथेतून आपल्यापर्यंत पोहोचविल्या आहेत. ते वाचून आपणालाही आपल्या बालपणातील शाळेच्या आठवणीने तेवढाच आनंद होतो.

खरेच आजची शाळा आणि आपली शाळा यात खूप तफावत आहे. त्या काळात काहीच सुविधा नव्हत्या, तरीही कित्येक विद्वान मंडळींनी शाळेतून बाळकडू घेतलेले आहे. विद्या ही बुद्धीला दुधासारखीच पोषक आहे. ती आपल्याला ज्या शाळेत मिळेल त्या शाळेबद्दल प्रेम वाटल्याशिवाय राहणार नाही. खरे तर 'शाळा' ही प्रत्येकाच्या भावविश्वाचा एक अविभाज्य घटक आहे. या शाळेतून वैज्ञानिक दृष्टिकोन, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर होत असतात.

### २७. **'ऐक, भूमिमाते तुझी कहाणी!'** :

मुलांच्या मेळाव्यांत 'ऐक, भूमिमाते तुझी कहाणी!' (२६ मार्च १९५८) ही सौ. कमल मराठे यांची कथा प्रकाशित झाली आहे.

या कथेत लेखिकेने भूदानाविषयी मुलांचे प्रबोधन व्हावे. मुलांच्या मनात भूमीविषयी, दानाविषयी सकारात्मक भावना निर्माण व्हावी, या हेतूने ही कथा आली असून भूमाता, आपली आई आहे, त्याचे वर्णन ह्या कथेत आहे.

या कथेत निसर्गाचे चित्रण केलेले दिसते. भूमातेसोबतच पाणी, वारा व पाऊस या सगळ्यांचे मानवाच्या जीवनात खूप महत्त्व आहे. काळ्या आईच्या कुशीत आख्खी मानव जात सामावलेली आहे.

स्वच्छ शुभ्र फेसाळणाऱ्या लाटांतून वर आलेली हिमांगी माता! खटपट नगरांत तिची योजना झाली. ऊबदार पांघरुणाने लपेटून घ्यावे. सहा महिने झोपावे, सहा महिने उठावे, बरे वाटेल तेव्हा मुलांना न्हाऊमाखू घालावे, नाही तर तसेच सोडून द्यावे. आपले जीवन आनंदाने कंठावे. समग्र मानवजातीला देवाने निसर्गाचे वरदान दिलेले आहे.

कोणतेच बंधन न पाळता परमात्मा प्रसन्न झाला. देवाने दृष्टान्त दिला. इच्छित वराची विचारणा झाली. शांतता पाहिजे. परमेश्वराने मानव जातीला संदेश दिलेला आहे. ज्ञान मिळवा, विज्ञान मिळवा, पण सगळ्याला करुणेची जोड द्या. या कथेतून भूदानाचे महत्त्व सांगणारे, चांगला संदेश देणारे एक बाबा येतात.

''गावोगाव बाबा चालत, एकच गोष्ट लोकांना सांगत, माझा शांततेचा वसा आहे, बघा साधासुधा. दूर्वा नको, पाने नकोत. तीळ नकोत, तांदूळ नकोत. फुले नकोत, पत्री नको. पळाचे बंधन नाही, घटकेचे बंध नाही. कुठल्याही क्षणी, कुठल्याही ठिकाणी, कसेही त्याचे उद्यापन करावे. बोटव्याची खीर नको. तांदळाचे घावन नको. फक्त दानाची इच्छा हवी. ज्याच्यापाशी जास्त असेल त्याने द्यावे. समय दान करावे, संपत्तिदान करावे. श्रमदान करावे. भूमिदान करावे. सलोखा करावा. स्नेह वाढवावा. दान घ्यावे. मान घ्यावा. प्रीतीने नाते जोडावे. नात्याने गाव जोडावे. हाच माझा वसा. सुवर्णाचा कसा. तेजदार पाणी प्यावे, अंगभर मेहनत करावी. भूमातेची पूजा करावी. हा वसा घेईल तो जन्मभर सुखी होईल. शांतता मिळवेल. उत्कर्ष पावेल. ह्याने माणूस उतत नाही, मातत नाही. एकदा घेतलेला वसा टाकत नाही.

तेव्हा तुम्ही–आम्ही हा वसा घ्यावा. नातवंडापतवंडांपर्यंत पोचवावा. युगानुयुगे ह्याचा महिमा गावा.''[२८]

प्रस्तुत कथेतून लेखिकेने समाजाला संदेश दिलेला आहे. अतिवैभवाने माणूस सुस्त होतो, आळशी होतो. अतिबुद्धिमत्तेने माणूस मातततो. स्वत:सोबतच दुसऱ्याला नाशाप्रत नेतो. तेव्हा काहीही अतिवाईट होऊ शकते. दानाने सर्व काही चांगले होते. या युगात श्रमदान, भूमिदान, समयदान हेच श्रेष्ठ प्रतीचे आहे. याने समाजात शांतता नांदते. हा विचार संवेदनशीलता व राष्ट्रीय एकात्मता वाढीस पूरक आहे. हे या कथेतून सांगितले आहे.

प्रस्तुत कथेमधून लहान मुलांना दानाचे महत्त्व सांगत भूदान, श्रमदान, समयदान हे श्रेष्ठ दान असून, ज्याला जे जमेल त्याने नि:स्वार्थ बुद्धीने दान केले पाहिजे, हा संस्कार ही कथा पेरते.

**२८. आजीची गोष्ट** :

'मुलांच्या मेळाव्यात' या सदरात 'आजीची गोष्ट' (२६ एप्रिल १९५८) ही दिवाकर यांची कथा प्रकाशित झाली आहे.

या कथेत लेखकाने आजीच्या आजारपणातील काही गोष्टीचा उल्लेख केलेला आहे. आजीच्या चांगल्या स्वभावाबद्दल सांगितले आहे. आजीचा स्वभाव अडचणीत कुरकुर करीत बसण्याचा नसून, आजारपणातही ती स्वत:चे दु:ख न सांगता आनंदी जीवन जगणारी होती.

आजी कोणालाही आपल्या आजारपणाबद्दल काहीच सांगत नसे, पण ती दुसऱ्यांची सारखी काळजी करायची. तशी ती माझी खरोखरची आजी नव्हती. पण तिला माझ्या आईबद्दल फार माया होती. लेखकाच्या भेटीने ती स्वत:ची दु:ख विसरून जायची. माझ्या आईच्या तब्येतीची मोठी आस्थेने चौकशी करायची. कारण माझ्या आईला मधुमेह होता.

आजीचे जीवन अगदी सुखासमाधानात गेले होते. तिला काळजी कशी ती ठाऊकच नव्हती. मुलगा नि जावई दोघेही चांगल्या हुद्यावर नोकरीस होते. पण आता आजीचे वय झाले होते. आजोबा पूर्वी सैन्यात डॉक्टर होते. ते आजीचा इलाज घरीच करत असत.

या कथेत आजी आणि आजोबांच्या जीवनातील घडामोडींचा वृत्तान्त असून मुलाची तार आल्यानंतर आजोबांना प्रश्न पडतो. तिकडे जावई आजारी आणि इकडे आजीपण आजारी. दोघांकडेही आपल्याला लक्ष द्यावे लागेल? आजी इथे तर जावई बंगलोरला मग काय करावे? आजीने शेवटी मार्ग सुचविला– तुम्ही जा. ती आजोबांना बंगलोरला पाठवते.

एके दिवशी आजी खुर्चीवर बसणार तोच तिच्या खोडकर नातवाने खुर्ची मागे ओढली. आजी खाली जमिनीवर पडली. तिच्या कंबरेचे हाड मोडले. तिला दवाखान्यात हलवावे लागले. आजीच्या तब्येतीत सुधारणा झाली नाही. आजीची प्रकृती सुधारली नव्हती. कधी यात सुधारणा होईल, असेही वाटत नव्हते. आजीला खूप यातना होत असतील; पण ती कधीच तिचा त्रास दाखवत नव्हती. ती नेहमी हसतमुख राहत असे आणि स्वत:ला त्रास होत असतानाही माझ्या आईच्या मधुमेहाची चौकशी करत होती.

आजीला पलंगावर बघून तिला खूप दु:ख होत होते. आजीबद्दल खूप जवळीक वाटत होती.

''म्हणजे आजीची प्रकृती सुधारली नव्हती. कधी सुधारणारही नव्हती. तिला खूप यातना होत असल्याच पाहिजेत, पण ती त्या दाखवीत नव्हती. उलट ती तर एकसारखी हसतमुखच होती. तशा त्या दुखण्यात देखील मी तिला कधी रागावलेली, किरकिरत असलेली बघितले नाही आणि स्वत: वेदनांनी हैराण झालेली ही बाई माझ्या आईच्या क्षुल्लक मधुमेहाची चौकशी करत होती!

म्हणूनच मला वाटले की, आतापर्यंत इतकी जवळची वाटणारी आजी आज एकदम क्षितिजाएवढी मोठी झाली आहे. ह्या पलंगावर ती मावत नाही आहे. दोन्ही डोळ्यांनी मी तिला पूर्णपणें पाहू शकत नाही. माझ्या डोळ्यांत तिचा एवढा अफाट विस्तार मावत नाही आहे.''[२९]

प्रस्तुत कथेमधून लेखक सांगतात की छोट्या छोट्या गोष्टींवर रडत राहणे ही मानसिकता लोकांची दिसते. परंतु अशीही काही माणसे समाजात असतात जी स्वत:चे दु:ख, त्रास बाजूला ठेवून त्याची यत्किंचितही जाणीव इतरांना न होऊ देता. (दुसऱ्यांची) समोरच्यांची काळजी घेतात. यावरून बोध दिला गेला आहे की, माणसाने आपले दु:ख बाजूला ठेवून इतरांची काळजी घेतली पाहिजे.

### २९. पऱ्यांच्या राज्यात बंडू :

एक मजेदार परिकथा 'पऱ्यांच्या राज्यात बंडू' (२८ जून १९५८) ही 'साधना' साप्ताहिकात शंकर रा. सारडा यांची कथा प्रकाशित झाली आहे. या बालकथेत 'बंडू' आणि 'शीला' या दोन्ही भावा–बहिणीचे भावविश्व रेखाटलेले आहे. ही पराक्रमाची माहिती सांगणारी कथा आहे. या कथेत महाबळेश्वराचे वर्णन आहे. बंडूला महाबळेश्वर हे ठिकाण आवडलेले

असते. बंडू म्हणतो, काय ती थंडगार हवा किती गर्द हिरवीगार झाडी! आणि जांभळाला तर तोडच नाही. रुचिर जांभळावर बंडू अगदी खूश झाला.

त्या विल्सन पॉईंटवर तर काही झाडं इतकी लहान होती की खुशाल झोपून जांभळं खावीत. त्या दिवशी तो असाच जांभळे काढायच्या मोहिमेवर निघाला. विल्सन पॉईंटवर दुसऱ्या चबुतऱ्याजवळून खाली गेल्यावर जांभळाची बरीच झाडे होती. एका झाडावरून जरी जांभळे काढली असती, तरी त्याच्या चड्डीचे, शर्टचे सारे खिसे भरून रूमालही भरला असता. पण त्या झाडांच्या गर्दीत मध्येच असलेल्या एका मोठ्या काळ्याकभिन्न फत्तराने त्याचे लक्ष वेधून घेतले. बंडूला वाटले हा दरवाजा जादूचा तर नसेल ना? पऱ्यांच्या गोष्टीत असतो तसा!

लेखकाने बाल कल्पनेचे विश्लेषण केले असून, त्यांच्या काल्पनिक वृत्तीला तोड नसते. बंडू त्या दरवाजाजवळ जातो. नेहमीसारखाच दरवाजा होता तो. पण लाल रंगाचा. उंचीला मात्र कमी. बाहेरून त्याला कडी नव्हती त्याने तो उघडण्यासाठी आत ढकलला. पण तो उघडला नाही. त्याने आजूबाजूला निरखून बघितले. त्याला एक कागद चिकटवलेला दिसतो. त्यावर काही तरी लिहिलेले होते. बंडूने ते वाचले, मंगळवारी मध्यरात्री हा दरवाजा उघडतो.

बंडू बहिणीला म्हणतो, बघ मी कसा पराक्रम दाखवतो ते. शिवाजीने बाराव्या वर्षी तोरणा सर केला. अकराव्या वर्षीच पऱ्यांच्या राज्यात पराक्रम गाजविणार, आपली छाती फुगवीत बंडू म्हणाला.

शीला म्हणते ''बंडू दादा मीही येते तुझ्याबरोबर''

मी तुला मदत करते. बंडू लगेच म्हणतो, ''तू अन् मला मदत करणार! नऊ-दहा वर्षांची तू. अन् मला मदत करशील. अगं, मला कसलीही भीती नाही शिवत मनाला. आम्ही त्या निर्भय शिवाजीचे मर्द मावळे आहोत. समजलीस का?'' शीला बंडूला म्हणते, 'बरं बरं तू जा.' आपण नाही तरी आपल्या भावाने मोठ्ठा पराक्रम करावा. अशी तिची इच्छा होती. बंडू म्हणतो- बघ, तुझा भाऊ कसा पराक्रम गाजवतो ते!

मंगळवारी रात्रीच्या सुमारास तो बाहेर पडला आणि बहिणीला म्हणतो- दार उघडेच ठेव. शीला भावाला म्हणते, ''बघ घाबरू नकोस हं. देवाचे नाव घे पाहिजे तर मनात, तिने बंडूच्या खांद्यावर हात ठेवून म्हटले. बंडू म्हणतो- अगं हट्ट! मी घाबरतो होय. पऱ्यांच्या राज्यात

निघालेल्या माणसाला कसली डर वाटणार! बघ तर खरं आणि शेवटी म्हणतो, पण दार उघडं ठेवून बस बरं का!''

ही बालपणातील पराक्रमाची कथा असून मनात कितीही भीती असली, तरी पराक्रमाच्या गोष्टी करणारा बंडू आणि त्याला साथ देणारी बहीण या कथेत दिसून येतात. या कथेतून धाडसी वृत्तीचे दर्शन घडते. तसेच संस्कारक्षम वयाच्या मुलांना आपणही वीर पुरुषासारखा पराक्रम करावा, ही इच्छा निर्माण होते.

**३०. कर्णाचे गाऱ्हाणे :**

खुशाल जी. चौधरी यांची 'कर्णाचे गऱ्हाणे' (५ जुलै १९५८) ही कथा प्रकाशित झाली आहे. शिक्षणाने समाज सुधारतो. माणूस अज्ञानाकडून ज्ञानाकडे वाटचाल करतो. शिक्षणाने राष्ट्राचा, देशाचा, जगाचा विकास होतो. ही संकल्पना पुढे ठेवून शिक्षण क्षेत्राचा पूर्ण विकास झालेला आहे. ही स्वप्ने, हा विचार संपुष्टात येत आहे. एवढेच नव्हे; तर सारे समाजजीवन येथे बिघडले आहे. सामाजिक परिस्थिती गंभीर बनली आहे. याची कल्पना येते. शिक्षण हा मूलस्रोत आहे. तो तरी निदान बिघडणार नाही ही दक्षता घेणे. ही देशाची पहिली निकड आहे. पण असे होत नाही. शिक्षणाने समाज क्षेत्रावर आपला प्रभाव पाडावा. पण नेमके याच्या उलट होते. वेगवेगळ्या दुष्टप्रवृत्ती शिक्षण क्षेत्रातही घुसल्यासारख्या दिसतात.

लेखक या कथेतून शिक्षणाचे महत्त्व व दुरुपयोग यांचे चित्रण करतात. शिक्षणाने माणूस घडतो. परंतु माणूस राजकारण, जातीयवाद, पैसा व सत्ता यांच्या आहारी गेला आहे. लोकशाही आणि समाजवादाच्या घोषणा सतत केल्या जात असताना राजकीय पक्ष जातीवाद आणि पैसा यांच्या जाळ्यात फसताना पुष्कळ वेळा दिसतात.

अनेक ठिकाणी समाजाच्या हितासाठी जमवलेल्या पैशांचा अपहार झालेला आढळतो. पैशाच्या जोडीला आता सत्तेचाही क्रम लागला आहे. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. तोपर्यंत फारसे बिघडले नव्हते, पण आता सगळेच शहाणपण चिकटू लागले आहे.

यशाची हाव शिक्षण क्षेत्रात आज अंमल गाजवताना दिसते. मोठमोठ्या शिक्षणसंस्था उभारण्याचा हव्यास लागलेली माणसे झपाटल्यागत वाटेल त्या साधनांचा वापर करतात. यशाचा हव्यास पुष्कळ वेळा मूळ कार्याला हानी पोहचवतो.

अनेकांनी शाळा, कॉलेज काढलेली आहेत, अजून निघत आहेत. पाश्चिमात्य संस्कृतीकडे आपल्या युवा पिढीची वाटचाल आहे. पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण करून विद्यार्थी आपले मार्ग बदलत आहेत. राहण्या–वागण्याच्या पद्धती बदलून टाकत आहेत.

शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांच्या भाग्यवान वर्गात आपला समावेश व्हावा, यासाठी तरुण पिढ्यांची एकसारखी धडपड चालली आहे. त्यांच्या गरजेचा गैरफायदा उठवण्यासाठी संस्थाचालकही टपलेले आहेत. ह्या वर्गात तरुणांना समाविष्ट करून घेण्यासाठी खोट्या संस्था उभारल्या आहेत व त्यांच्या जाहिराती वृत्तपत्रांतून झळकाताना दिसतात. आज शिक्षणाचा बाजार झालेला दिसून येतो.

लेखक म्हणतात– आपला देश फुलेंचा, गांधीजींचा आहे. ''साधनशूचितेचे माहात्म्य जगाला बाहू उभारून सांगणाऱ्या गांधीजींचा हा देश आहे. भौतिक सुखसमृद्धीपेक्षा मानवता अधिक उच्च मानणाऱ्या साधुसंतांचा वारसा या देशाला लाभला आहे. आधिभौतिक संपन्नतेतून निर्माण झालेल्या जगभराच्या समस्यांना आध्यात्मिकतेची उत्तरे सांगून दु:खहरण करणाऱ्या ऋषींची ही भूमी आहे?''[३०] असे लेखक कर्णाचे गाऱ्हाणे या कथेतून आपले मत व्यक्त करतात.

आजच्या युगात शिक्षण क्षेत्र हे राजकारणाचा अड्डा झाले असून पैसा, सत्ता, संपत्ती यापेक्षाही वैचारिक संपत्ती अधिक महत्त्वाची आहे, हेच या कथेतून निदर्शनास येते.

## ३१. खोडकर चंदू :

'खोडकर चंदू' (९ ऑगस्ट १९५८) ही शकुंतला बोरगावकर यांची कथा प्रकाशित झालेली आहे. या कथेतील शैला ही सदैव हसतमुख, दुसऱ्याला नेहमी मदत करणारी, कोणतीही गोष्ट आनंदाने करणारी लहान वयाची जरी असली, तरी तिचे विचार प्रगल्भ आहेत. दुसऱ्याबद्दल प्रेम, सहानुभूती ती नेहमी दाखवते. या कथेत आई आणि शैला यांचा संवाद आलेला आहे.

शैलाला मावशीच्या घरी शोभनेच्या भातुकलीला जायचे असते. ती मनापासून तयारी करते. तिथे तिच्या खूप मैत्रिणी येतात. तिथे तिला खूप खेळ व मज्जा करायची असते. म्हणून ती मावशीकडे जाण्यासाठीची घाई करते. शैलाची आई शैलाला छानसा लाल फ्रॉक व केसांत रिबन बांधून देते. तसेच एक मोत्यांची माळ मावशीच्या मुलीसाठी (शोभनेसाठी) घेऊन देते.

शैला आज एकटी जाणार असते म्हणून तिची आई तिला सांभाळून जाण्यास सांगते. या कथेतील चंदू हा अत्यंत खोडकर आहे. तो नेहमी मित्र-मैत्रिणींच्या खोड्या करत असतो.

चंदूला सगळे जण वाईट समजतात. तो मुलांना अजिबात आवडत नाही. शैलाची सुद्धा खोडी काढतो. ती मावशीच्या घरी निघालेली असताना तिची गाठ चंदूशी पडते. ती त्याला काहीच न बोलता शांतपणे पुढे जात असते, अचानक चंदू तिच्या हातातील मोत्यांचा हार पळवतो तिच्या डोक्यातील रिबन ओढून काढतो. मोत्यांचा हार तुटून मोती सगळे रस्त्यावर सांडतात आणि शैला रडायला लागते आणि चंदू मात्र उड्या मारत असतो. पुढे मात्र चंदूला दुखापत होते याचे वर्णन करताना ते लिहितात-

''शैलू त्याच्या मदतीला धावली. तिने त्याला नीट खाली बसविले त्याचे हात, पाय नीट पुसले गुडघ्याला तर चांगलेच लागले होते. रक्त येत होते. शैलूने आपल्या लाल फ्रॉकच्या खिशातून रुमाल काढला आणि त्याच्या गुडघ्याला बांधला.

चंदू अगदी लाजून गेला. तो म्हणाला, ''शैलू, मी तुझी खोडी केली; पण तू मात्र मला पट्टी बांधलीस!''

''चंदू, तूं फार खोडकर आहेस. तू आता घरी जा, पण चंदू, माझी रिबन कुठाय रे!''

''अग ती कुठं तरी उडून गेली-''

''बरं, मग आता ते मोती गोळा करायला तरी जरा मदत करतोस का?- माझी रिबिन गेली, आता काय करू रे? मी चालले होते मावशीकडे भातुकलीला. रिबिनीशिवाय सगळे केस विस्कटून जातील आणि मावशी म्हणेल- किती केस विस्कटलेत शैलूं! रिबिन नाही का लावायची?''[३१]

चंदू उड्या मारताना एका खांबावर जाऊन आढळतो. त्याच्या डोक्याला मार लागतो तो धाडकन खाली पडल्यावर पायाला पण मार लागतो. शैला लगेच त्याच्या जवळ येऊन त्याला मदत करते आणि ती त्याचे हात-पाय नीट पुसून देते. त्याच्या गुडघ्याला मार लागलेल्या ठिकाणी तिचा हातरुमाल बांधते. चंदू शैलाला म्हणतो, 'शैला, मी तुझी खोडी केली पण तू मात्र मला पट्टी बांधलीस? यावर लगेच शैला म्हणते, चंदू तू खूप खोडकर आहेस. असा तू वागू नकोस माझी रिबन तू कुठे टाकलीस आणि माझ्या हारातले मोती रस्त्यावर सांडलेत.

चंदू लगेच शैलाची मदत करतो. सगळे मोती गोळा करून देतो. पण मोती ठेवण्यास कागद किंवा पिशवी काही नसते, तेव्हा तो आपल्या मामाने वाढदिवसाला दिलेली पेटी शैलाला मोती ठेवण्यास देतो आणि त्या पेटीला गुंडाळलेली रिबन तिचे केस बांधण्यास देतो.

शैलाला खूप आनंद झाला. चंदू, तू खूप चांगला आहेस रे! मला तू फार आवडतोस आता चंदूसुद्धा शैलाच्या विचाराने प्रभावित होतो. तो कोणालाच त्रास देत नाही. शैलाच्या प्रेमाच्या वागण्याने चंदूमध्ये बदल होतात. चांगल्या विचाराच्या माणसाच्या सहवासाने चंदूचे विचार बदलतात. चंदूच्या वागण्यातही बदल होतो. चंदू व शैला चांगले मित्र होतात.

व्यक्ती वाईट नसते. अवतीभोवतीच्या परिस्थितीप्रमाणे माणूस वागत असतो. दुसऱ्याला दु:ख व्हावे हा त्याचा दृष्टिकोन नसतो; पण परिस्थिती बदलली, की माणसातील माणूसपणा, विवेकी दृष्टिकोन जागृत होतो हेही कथा सांगते.

### ३२. **दुष्ट शेतकरी** :

'मुलांच्या मेळाव्यात' या सदरात 'दुष्ट शेतकरी' (२३ ऑगस्ट १९५८) ही कथा सुनंदा पतके यांनी लिहिली आहे. या कथेत चांगूलपणाचे फळ कसे मिळते, याचे चित्रण केलेले आहे. एक शेतकरी उभ्या पिकांत कोणताही पक्षी येणार नाही, याची काळजी घेत होता. तो लोभी तसेच दुष्टही होता. तो आपल्या शेताची कसोशीने राखण करी. केव्हाही पक्ष्यांना सुद्धा एकही दाणा मिळत नसे.

एक चिमणी मात्र त्याचा डोळा चुकवून रोज दाणे वेचायला त्याच्या शेतात यायची. एके दिवशी चिमणी आपल्या कामातच होती. म्हणजे आनंदाने दाणे वेचीत होती. तेवढ्यात शेतकरी तिला पकडतो. शिक्षा करण्यासाठी तो चिमणीला राजाकडे नेत असतो. ती चिमणी शेतकऱ्याला खूप विनवण्या करते. मला सोड म्हणून माझ्या थोड्याशा दाणे वेचण्याने तुझे काय बरे नुकसान होणार, असे म्हणून मला सोड असे विनवते.

परंतु शेतकरी तिला सोडत नाही. पुढे तो एका उंटाला भेटतो. चिमणी उंटवाल्याला सारी हकिगत सांगते. मला सोडव म्हणून विनवते. माझी पिले वाट पाहत असतील. माझ्यावाचून फार फार रडतील. उंटवाल्याला तिची दया येते. शेतकऱ्याला म्हणतो– हिला बिचारीला सोडून दे. तुझे भले होईल. परंतु तो निर्दयी शेतकरी म्हणू लागला. हिने माझ्या शेतातील दाणे चोरले

आहेत. हिला मी नाही सोडणार. उंटवाला खूप विणवणी करतो, पण त्याचाही परिणाम शेतकऱ्यावर होत नाही.

या कथेत चिमण्यांचा आणि माणसांचा संवाद आलेला आहे. प्राणीसुद्धा माणसांशी किती चांगल्या पद्धतीने वागतात. हे येथे दिसून येते. ही कथा वाचताना पंचतंत्रातील गोष्टींची आठवण येते.

शेवटी शेतकरी राजाकडे जातो. चिमणीने माझे सर्व शेत नष्ट केले. त्याची तक्रार ऐकून राजा चिमणीला म्हणाला– यांच्या शेतातले दाणे चोरले का? नाही महाराज मी नाही चोरले. शेतातले थोडेच दाणे वेचले. मी फक्त माझ्या पिल्लांना व मला आवश्यक तेवढेच दाणे टिपले. शेतकरी लगेच म्हणतो, नाही खोटे आहे. चिमणीने सर्व शेत उजाड केले आहे.

हे ऐकून राजाला कल्पना आली. राजाला चिमणीच्या खरेपणाची जाणीव झाली. राजा यावर शेतकऱ्याला म्हणाला– प्रथम आपण शेत पाहूया. जसे तू म्हणतोस तसे असेल तर चिमणीला शिक्षा करू. हे ऐकून शेतकरी घाबरला. तो खोटे बोलत होता. शेत पाहून राजाला समजले. शेतात दाण्यांनी भरगच्च भरलेली कणसे शेताची शोभा वाढवीत होती.

''खरे म्हणजे ही सारी करामत उंटवाल्याची होती. कारण त्याने साक्षात अन्नदेवाचे रूप घेतले होते व तो वाटेवर उभा होता. त्याला चिमणीची सुटका करावयाची होती. शेतातील तो नयनरम्य देखावा पाहून राजास त्या दुष्ट शेतकऱ्याचा फार राग आला. तो लगेच म्हणाला, ''तू दुष्ट आहेस. तू मनुष्य असूनही मानवी जीवन जगायला नालायक आहेस.''[३२] चिमणीचा प्रामाणिकपणा पाहून राजा तिला शेत बक्षीस देतो.

प्रस्तुत कथेतून लेखिकेने दुष्ट प्रवृत्तीचा एक दिवस पराजय होतो तर सत् प्रवृत्तीचा, चांगल्या वागणुकीचा विजय होतो. यामध्ये माणुसकीचा, माणूसपणाचा धडा शिकवलेला आहे. ही कथा वाचकांना पंचतंत्रातील गोष्टींची आठवण करून देते.

### ३३. शिस्त आणि सत्य :

'मुलांच्या मेळाव्यात' या सदरात 'शिस्त आणि सत्य' (४ ऑक्टोबर १९५८) ही श्री. शिरूभाऊ लिमये यांच्या तोंडून ऐकलेली गांधीजीची आठवण सांगितली आहे.

सन १९३०–३२ साली महात्मा गांधीजी तुरुंगात असताना घडलेला प्रसंग शिरूभाऊ लिमये यांनी सांगितला आहे. सत्याग्रहींनी तुरुंगांचे नियम पाळावेत, अशी गांधीजींची आज्ञा

होती. जेलचे अधिकारी आणि सत्याग्रही यांच्यात वरचेवर कुरबुरी होत. गांधीजींच्या भेटीला आठवड्याला दोन–दोन सत्याग्रही पाठवायचे, हेही अधिकाऱ्याने ठरविले. गांधीजी त्यांच्याशी अर्धा तास बोलत असत. त्यांच्या अडीअडचणी समजून घेत. तक्रारी समजून घेत असत. त्यांतून कसा मार्ग काढायचा ते सांगत. सत्याग्रहींची गांधीजींशी चांगली ओळख होत असे.

काही अधिकारी सत्याग्रहींना त्रास देत शरणागती पत्करायला लावत. त्यांच्या दुबळेपणाचा फायदा घेत असत. सत्याग्रही तुरुंगाच्या आत शिरताच अधिकारी सत्याग्रहीच्या मानगुटीला पकडून जोरात गचांडी मारत, तितक्यातच सत्याग्रहीचे डोके दरवाजावर जाऊन धडकत असे आणि त्याला तिरीमिरी येई. सत्याग्रहीला डोक्यावरची टोपी काढायला लावत. तिथे प्रत्येक कैद्याला रोज ३५ पौंड दळावे लागे! काही सत्याग्रही स्वत:चे काम पूर्ण करून, इतरांनाही मदत करत असत. अशी परिस्थिती तुरुंगात होती.

शिरूभाऊ लिमये गांधीजींच्या भेटीला गेले. गांधीजींनी भेटीला बोलावणे हा मोठा सन्मान समजला जाई. गांधी टोपी म्हणून आज्ञा करून गचांडी मारणारा, दळण्याचे काम सांगणाऱ्या अधिकाऱ्याची माहिती गांधीजींना शिरूभाऊ सांगतात आणि विचारतात–

'तुम्ही म्हणता तुरुंगातही आपण शिस्त पाळली पाहिजे. अधिकाऱ्यांच्या आज्ञा पाळाव्यात पण अशा प्रसंगी काय करावे? शिस्त म्हणजे अपमानाने मान वाकवणे का? अन्याय सहन करणे असे आहे का?' शिरुभाऊंनी गांधीजींना विचारले.

यावर गांधीजी म्हणतात, ''अशा आज्ञा पाळण्यापूर्वी तुम्ही त्यांना दहा वेळा गोळ्या घातल्या; तरी ते एक वेळ क्षम्य म्हणता येईल. 'गांधीजींना अधिकाऱ्यांच्या बोलण्याचा राग येतो, चीड येते. ते म्हणतात, शिस्त म्हणजे अपमानजनक हुकमापुढे मान वाकवणे नव्हे किंवा अन्याय सहन करणे नव्हे; तर शिस्त म्हणजे जीवनविकासासाठी स्वेच्छेने पाळायचे नियम. माणुसकीचा, सत्याग्रही शक्तीचा त्यातून विकास झाला पाहिजे. शिस्त अंत:करणाच्या वृत्तीत असते. तुरुंगाचे नियम पाळावेत, पण अन्याय हुकूम मानणे आणि लाचारी पत्करणे म्हणजे काही शिस्त नव्हे.''[३३]

तुरुंगातही गांधीजींनी शिस्तीचे धडे दिलेले आहेत. शिरूभाऊंनी या लेखात तुरुंगात असतानाही गांधीजींनी शिस्तीचे महत्त्व, विचार, धडे दिले आहेत, तो प्रसंग सर्वांपुढे ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. अशा प्रकारे छोट्या छोट्या प्रसंगांतून मूल्यशिक्षण देता येते.

त्यांच्याशी मनमोकळ्या गोष्टी करता येतात. देशातल्या हजारो, लाखो लोकांना, सामान्य माणसांना त्यांनी आपल्या वर्तनातून स्वयंशिस्तीचे महत्त्व पटवून दिले.

### ३४. नमी नि कमी :

'नमी नि कमी' (११ ऑक्टोबर १९५८) ही रमा बखले या कथेत दोन बहिणींचे भावविश्व रेखाटलेले आहे. या कथेची विशेषतः म्हणजे दोन्ही बहिणींचे कल्पनाविश्व अगदी वेगवेगळे असते. एक बहीण हुशार चंचल, चपळ, प्रेमळ, संपूर्ण काम करणारी आणि दुसरी मात्र अगदी विरुद्ध. आळशी, सारखं टवाळक्या, कामचुकारपणा करणारी अशा विरोधाभासाचे चित्रण या कथेत आले आहे.

''एका बहिणीचे नाव 'नमी' आणि दुसरीचे 'कमी' होते. नमी रोड होती. ती आईला घरकामात खूप मदत करीत असे. कमी मात्र सारखी टवाळक्या करत असे. कोणतेच काम करत नव्हती, तरी आईचे प्रेम कमी वरच होते, असे नमीला वाटत होते. त्यांच्या अंगणातल्या बागेत विहीर होती आणि तेथे आंब्यांचे झाड होते. कमी कैऱ्या पाडून खात असे; परंतु नमीला मात्र कैऱ्यांचे लोणचे घालावे वाटत होते.''

''नमी घरातले झाडणे, सारवणे, स्वयंपाकपाणी, धुणंभांडी करी नि बागेत पण कामास जाई. त्यांच्या अंगणातल्या बागेत एक विहीर होती. त्या विहिरीजवळ एक लहानसे डेरेदार आंब्याचे झाड होते. वसंत ऋतूत त्या झाडाला हिरव्यागार कैऱ्या लागल्या. त्या पाहून कमीच्या तोंडाला पाणी सुटले. ती रोज कैऱ्या पाडी नि एकटीच लपून खात बसे. कैऱ्या मोठ्या मोठ्या होताच त्यांचे लोणचे घालायचे नमीने ठरवले नि एक टोपली नि विळी घेऊन झाडाच्या सावलीत कैऱ्यांच्या फोडी करीत बसली. चिरता चिरता तिच्या हाताला विळी लागली नि रक्त वाहू लागले, सारी विळी रक्ताने माखली, म्हणून ती धुण्याकरता नमी विहिरीवर गेली व पोहऱ्याने पाणी काढून विळी धुऊ लागली. इतक्यात, तिच्या हातातून विळी निसटली नि विहिरीत पडली. विळी बुडाशी जाताच नमी घाबरून गेली. ती वर काढायला नमीला जवळपास कोणी दिसेना तिला रडू येऊ लागले ती तशीच घाबरत, रडत आईकडे गेली. विळी विहिरीत पडल्याचे तिने सांगताच आई नमीला खूप रागावली नि विळी जशी पाडलीस तशी वर काढून आण म्हणून तिने नमीला सांगितलें.''[३४]

ही कथा इथपर्यंत खूप साधी वाटते; पण तशी ती एक वेगळ्या पातळीवरचे विचार करायला लावणारी आहे. इथून एक वेगळे वळण या कथेला मिळालेले आहे. नमीची स्वप्नांची दुनिया एक निराळीच असते. नमीला पऱ्यांची राणी भेटल्यासारखी ही कथा रंगलेली आहे. नमी विळीसाठी विहिरीत उडी मारते. विहिरीत ती उडी मारल्यावर तिचे वेगळे असे भावविश्व निर्माण होते. तिला पाण्यात तळाशी गेल्यावर एक सुंदर हिरवीगार बाग दिसते. बागेत एक सशाचे पिलू दिसते. सशाचे पिलू तिला बोलते. मला पाण्याबाहेर काढ नाही तर माझा जीव जाईल. नमी सशाला पाण्याबाहेर काढते.

या कथेत ससा नमीला म्हणतो मला पाण्याबाहेर काढ. ती काढते. तिचे भावविश्व एका वेगळ्या प्रकारचे आहे, असे या कथेत दिसते. ती सशाला पाण्याबाहेर काढून पुढे चालत असताना तिला पेरूने भरलेले झाड दिसते. त्याला खूप पेरू लागलेले असतात. त्याचा भार हलके करण्यासाठी झाड विनवतो. नमी झाड हलवून त्याचा भार हलके करते. झाड अगदी आनंदी होते. नमीला पुढे एक घर दिसते. तिला तिथे म्हातारी दिसते. म्हातारीची सगळी कामे नमी करू लागते. म्हातारीची नमीने सेवा केली. म्हातारी नमीवर खूश होते आणि माझ्या कामाचे बक्षीस तुला मी देते असे म्हणते.

नमीला घरी जाण्यासाठी म्हातारी कुंपणापर्यंत सोडायला येते. कुंपणाचे दार उघडले. नमी दार ओलांडून जाऊ लागली. तेव्हा तिच्यावर सोन्याचा वर्षाव झाला. सोन्याचे कण तिच्या केसांत अडकले. नमीला घरी आल्याचे जाणवले. तिला पाहताच तिच्या विहिरीजवळच्या झाडावरचा पोपट आनंदी होऊन, 'नमी आली, नमी आली. बागेची राणी आणि सोन्याची राणी आली' असे म्हणतो.

आईने तिला प्रेमाने जवळ घेतले. नमी खूप सुंदर दिसू लागली. तिचे नाव 'हेमा' असे ठेवले. तेव्हापासून तिची आई तिच्यावर खूप प्रेम करू लागली.

हेमाने सगळी हकिगत कमीला सांगितली. कमीला वाटू लागले, आपणपण असेच काही तरी केले पाहिजे. म्हणजे आपल्यालाही सोने मिळेल, नावही बदलेल. कमी एक दिवस नमीसारखे करण्यासाठी बागेत जाते. कैऱ्या काढते, कैऱ्या कापते. कापताना मुद्दामहून ती बोट कापून घेते. विहिरीवर जाऊन विळी विहिरीत पडत नाही; तर ती विहिरीत फेकून देते. म्हणजे तिला नमीसारखे करावे वाटते. पण असे काहीच होत नाही. कारण कमीच्या अंगी आळशीपणा

असतो. ती प्रामाणिक नसते. प्रेमळपणा, समजूतदारपणा तिच्या अंगी नसतो. ती विहिरीत उडी मारून सगळे काही करते. शेवटी म्हातारीकडे पण जाते. पण तिला कामाच्या कंटाळपणामुळे म्हातारी खूश होत नाही. कमी परत आल्यावर तिच्या अंगावर सोनं पडत नाही, तर कोळशाच्या वर्षाव होतो. म्हणजे तिला तिच्या आळशीपणाचे बक्षीस मिळते. ही कथा गांधीजींनी सांगितलेल्या श्रमप्रतिष्ठा या मूल्याची आठवण करून देणारी आहे.

## ३५. पऱ्यांची राणी!

'पऱ्यांची राणी' (१८ ऑक्टोबर १९५८) ही शकुंतला बोरगावकर यांच्या कथेतल्या मिनीला पऱ्यांची राणी व्हावे वाटते. परीसारखा ड्रेस घालून मिरवावे असे वाटते. तिच्या आईची परिस्थिती जरी हलाखीची असली, तरी मनाशी एक आशा धरून ती जगत असते. लेखिकेने 'पऱ्यांची राणी' या कथेतून मिनीला कसे परी व्हावेसे वाटते. या छोट्याशा मिनीचे बालमन या कथेतून प्रकट झाले आहे.

थोरामोठ्यांना भुरळ पडावी अशी मिनीची मन:स्थिती असते. तिचा स्वभाव, मोकळेपणा आणि मोठ्यांचा विचार करून हट्ट न करणारी, आई–वडिलांचा विचार करणारी, आलेल्या परिस्थितीतून वेगळे जग निर्माण करण्याची क्षमता उरी बाळगणारी आहे.

श्रीमंत असलेला, मोठ्या बंगल्यात राहणाऱ्या अनिलचा आज वाढदिवस म्हणून मिनी फार खुशीत असते. आपले सारे मित्र–मैत्रिणी वाढदिवसाच्या ठिकाणी मज्जा करणार आहेत. गोड गोड मिठाई खायला मिळणार आहे. खेळायला भेटणार आहे. आणखी एक मज्जा म्हणजे सगळे जण फॅन्सी ड्रेस घालणार आहेत. अनिल तर शिवाजी होणार आहे. चंदू गवळी बनणार आहे. विमला मारवाडी पोषाख करणार आहे. समोरचा नंदू पोलीस होणार आहे. हे सर्व जण आपापल्या ऐपतीने ड्रेस घालणार आहेत. नली नावाची मैत्रीण तर झाशीच्या राणीसारखी तलवार घेऊन येणार आहे आणि मिनीपुढे मोठा प्रश्न उभा राहिला. आपणास कोणासारखा पोषाख करायचा. परिस्थितीची जाणीव असलेली मिनी आईजवळ हट्ट करायची तर सोयच नाही.

मिनीचे बाबा आणि आई नेहमी कामात व्यस्त. तरीही मिनी आईला विचारते. ''आई गं, मला पऱ्यांचा फ्रॉक शिवतेस का गं? निळ्या निळ्या झालरीचा! म्हणजे मी पऱ्यांची राणी बनेन

आणि अनिलच्या वाढदिवसाला जाईन.'' 'मिने, मी नाही फ्रॉक शिवू शकत गं. तू तुझा निळा परकर–पोलका घाल आणि जा.'

हा आईचा आणि मुलीचा संवाद आहे. या संवादातून त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीची जाणीव होते. तिच्या आईची होणारी ओढाताण आणि मिनीच्या बालमनाची समजदार वृत्ती दिसून येते. मिनीला वाढदिवसाला जाण्याचा मोह आवरत नाही.

मिनी जुनेच परकर, पोलका घालून बाहेर पडते. पण जाता जाता रस्त्यातच परकरात पाय अडकून खाली पडते. तिचा धक्का म्हाताऱ्या आजीला लागून तिचा परकर फाटला. आजीची पैशाची पिशवी खाली पडली. मिनीला रडू आवरेना. आता वाढदिवसाला कसे जायचे, हा प्रश्न पडला. आजीबाईने तिला शांत केले. स्वतःचे पैसे गोळा करून घेतले आणि तिला विचारले, ''बाळ तू कुठे चाललीस? कुठे राहतीस?'' मी मित्राच्या वाढदिवसाला चालले आता मी कशी जाणार? म्हणून रडू लागली. तेव्हा आजी मिनीला स्वतःच्या घरी नेते. त्या दोघींमधील संवाद–

''आजी हा फ्रॉक कुणाचा?''

''अगं पोरी, माझीपण तुझ्यासारखी एक गोडशी नात होती. ती बिचारी गेली देवाच्या घरी. तिचा हा फ्रॉक, बरे चल.'' डोळे पुसत पुसतच आजी उठल्या. त्यांनी मिनीला फ्रॉक नेसवला. निळ्या रिबिनी बांधल्या.... निळे डूल घातले आणि पाठीवरून हात फिरवून त्यांनी तिला अनिलकडे पाठवले.

मिनी किती सुंदर दिसत होती. तिचा फ्रॉक सगळ्यांना आवडला. मिठाई वाटली. मग गाणी म्हटली, मग अनिल शिवाजीसारखा तलवार उपसून आला. विमला मारवाडणीसारखी ठुमकत ठुमकत आली. सगळ्यांचे पोषाख छान होते. मिनी आली नाचत नाचत परीसारखी! फ्रॉकची निळी झालर डोलत होती. निळ्या रिबिनी नाचत होत्या. सगळ्या जणी 'पऱ्यांची राणी, पऱ्यांची राणी' म्हणू लागल्या. मिनीला खूप आनंद झाला. मग तिने एक छानसा नाच केला. अनिलचे बाबा इतके खूश झाले की, त्यांनी तिला एक बाहुली बक्षीस दिली!

मिनी मनाशी म्हणाली– मला पऱ्यांची राणीच भेटली म्हणायची! आणि तिनेच मला पऱ्यांचा फ्रॉक दिला! म्हणून तर मी वाढदिवसाला गेले आणि बक्षीस पटकावले! आणि मग आईला सारी गंमत जंमत सांगण्यासाठी मिनी भरभर चालू लागली![३५]

सामान्य कुटुंबातील मुलीला आपल्या मित्राच्या वाढदिवसाला छान कपडे घालून आणण्याची इच्छा होती. पण कौटुंबिक परिस्थितीमुळे तिला शक्य झाले नाही. पण इच्छा असेल तेथे मार्ग नक्कीच असतात. समाजात परोपकारी माणसांमुळे कोणत्याही अडचणींवर मात करता येते. या कथेत लेखिकेने बालमनाचे रूप एक वेगळ्या स्तरावर नेऊन ठेवले आहे.

### ३६. **कबुतरांचे घरटे** :

'कबुतरांचे घरटे' (१८ ऑक्टोबर १९५८) ही कथा आहे खगेंद्रनाथ मित्र यांची. या कथेत पिलांना जन्म देण्यासाठी घरटे कसे बांधावे, ते बांधण्यासाठी शेवटी सगळ्या चिमण्या पाखरांना बोलावून त्यांनी घरटे कसे बांधलेले आहे, हे वर्णन या कथेत आहे.

कबुतरांना चांगले घरटे बांधता येत नाही. म्हणून दर हंगामात त्यांची चार-पाच अंडी घरट्यातून खाली पडतात आणि फुटून जातात. जर कधी चुकून अंडी फुटली नाही तर उंदीर, घूस यापैकी कोणाच्या तरी भक्ष्यस्थानी ती पडतात. कबुतरी ते बघून रडते, ओरडते. 'गुटरगूं गुटरगूं' असे म्हणतात. कबुतरांचे घरटे कोणी पाहिले नाही. तुळ्या-छपरे झाडांच्या फांद्या यांच्या आधाराने व आडोशाने घरटी बांधतात. ते घरटे तरी कसे म्हणायचे, असा प्रश्न लेखक उपस्थित करून कबुतरांचा बेघरपणा दाखवला आहे. ते बेघर जरी असले, तरी शेवटी सर्वांची मदत घेऊन पिलांसाठी घरटे बांधतात. सगळ्यांच्या मदतीने सर्व काही साध्य होऊ शकते. शेवटी या कथेत कबुतराने सगळीकडे जाऊन सर्व पक्ष्यांना बोलावून आणले. सगळेच पक्षी किलबिल करीत आले आणि त्यांनी एकत्र येऊन कबुतर-कबुतरीकरिता घरटे बांधायला सुरुवात केली.

सगळ्यांची मदत जर असेल तर सुंदर घरटे निर्माण होते. ''एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ'' या उक्तीप्रमाणे आपण मदत केली; तर आपल्याकडून चांगले कार्य घडते. ही जाणीव संस्कारक्षम वयाच्या मुलांवर बिंबवली, तर निश्चित उद्याची पिढी संस्कारशील घडेल, हा आशावाद ही कथा व्यक्त करते.

### ३७. **मंतरलेली पहाट** :

गोविंद देशपांडे यांची 'मंतरलेली पहाट' (१४ फेब्रुवारी १९५९) ही कथा प्रकाशित झालेली आहे. या कथेत पहाट...सकाळ...दुपार....संध्याकाळ...रात्र आणि पहाट... हे एक वर्तुळ आहे. हे आयुष्याचे एक चक्र आहे. मनाचे विश्लेषण करणारी ही कथा आहे. माणूस

जन्माला येतो. जसे आपल्या दिवसाची पहाट होते. तसे जन्मापासून मृत्यूपर्यंत माणसाचे जीवन वाहत जाते. माणसाच्या मृत्यूच्या वेळी त्याला अनंत यातना होतात. किती तरी त्रास सोसावे लागतात.

लेखक म्हणतात– नर्मदेच्या अथांग पात्रावर सहस्त्र तरंग आहेत. माझ्या मनातही असेच तरंग आहेत. मी डोळ्यांच्या शिंपल्यात नर्मदा साठविण्याचा प्रयत्न करीत आहे. आपण मनात सागर साठविण्याचा प्रयत्न करतो. तरी कधी कधी या कल्पनेच्या दुनियेतून बाहेर पडून रोजच्या कामाला लागावे लागते. आपले मन स्थिर राहू शकत नाही. मन चंचल आहे, एकाच वेळी असंख्य विचारांचा भडीमार मेंदूवर होत असतो.

''ताम्रपाषाण युगातील संस्कृतीच्या पोटात शिरलो आहोत. पुन्हा मजुरांचा कोलाहल. ऊन आणि धूळ, माती आणि खड्डे, परंतु ही माती साधी नाही. ती मंत्रगर्भ आहे. या मातीतच इतिहासाचे मंत्र उमलतात.'' या कथेत जीवनाच्या प्रारंभापासून मानवाला अनंत यातना भोगाव्या लागतात, हे सांगितले आहे. जीवन–मरणाच्या चक्रात आपण अडकलेले आहोत.

याची फलश्रुती काय? नर्मदा नदीच्या दर्शनात भारावलेल्या मानवाच्या किती तरी पिढ्या उलटल्या आहेत आणि पुढे उलटतील. हे पाणी वाहत आहे. पुढे वाहतच राहणार आहे. पाण्याच्या प्रवाहासारख्या आपल्या पिढ्यान् पिढ्या या काळाबरोबर वाहत आहेत.

''परंतु याची फलश्रुती काय? नर्मदा–दर्शनानं भारावलेल्या मानवाच्या किती तरी पिढ्या उलटल्या आहेत, उलटतील. हे पाणी वाहत आहे... तशाच ह्या पिढ्या काळावर वाहत आहेत. ह्या वाहण्याला अंत नाही का? आमच्या ह्या शोधाला अंत नाही का? आम्ही गर्वानं ह्या मातीच्या थरांतून इतिहास निर्मावा, गताशांना, गतस्वप्नांना रूप द्यावं आणि पुन्हा काही वर्षांनी आमचीच माती व्हावी!... मघा मी ह्या मातीच्या दर्पोक्तीला हसलो खरा... पण ते काही खरं नाही!

पहाट... सकाळ... दुपार.. संध्याकाळ... रात्र आणि पहाट... हे एक वर्तुळ आहे. असंच ह्या दर्पोक्तीच आहे का? प्रथम ह्या मानवाच्या पराक्रमाच्या ध्वजा आणि नंतर ह्या मातीच्या ध्वजा! पुन्हा मातीला जातील आव्हान देणारे आम्ही... पुन्हा आमची माती! ह्या दुर्पगीतांचा अंतिम चरण लिहिला जाणार आहे का?''[३६]

ही कथा एका वेगळ्या पातळीवर लेखकाने नेऊन ठेवली आहे. आपण सामान्य माणूस असा विचार तरी कधी करणार. खरंच आयुष्य म्हणावं तितकं तरी सोपं नाही. नसतेच जगणं एवढं सोपं. आयुष्याच्या या पाशातून मुक्त होण्याचे मार्गच वेगळे आहेत. या मातीतच जन्म व्हावा आणि पुन्हा काही वर्षांनी आमचीच माती व्हावी! याचाच अर्थ मानवी शरीर हे पंचतत्त्वांनी बनलेले असून ते पुन्हा या पंचतत्त्वात विलीन होते.

पहाट, सकाळ, दुपार, संध्याकाळ, रात्र आणि पहाट हे एक चक्र आहे. प्रथम या मानवाच्या पराक्रमाच्या ध्वजा आणि नंतर ह्या मातीच्या ध्वजा! या मातीच्या ज्योतीला आव्हान देणारे आम्हीच. त्या मरणाऱ्या डोळ्यात जीवनाची आसक्ती ही लुकलुकत होती. या सगळ्या खड्यांतून, मातीतून, भांड्यातून, मद्यांतून हीच आसक्ती प्रकटत आहे. माणसांच्या सर्व धडपडीचे हे जणू मध्यवर्ती सूत्र आहे. माणसांना व्यापून उरलेली ही चेतना, प्रेरणाच नर्मदेच्या पाण्यातून वाहते. जणू ही चेतनाच पहाटेचे रूप घेऊन प्रकटली आहे. असे लेखकाने जीवनाचे मर्म, समजावून सांगितले आहेत. त्यालाच लेखक 'मंतरलेली पहाट' असे म्हणतात.

### ३८. **दोरा आत्याबाईची हकालपट्टी** :

'दोरा आत्याबाईची हकालपट्टी' (२५ एप्रिल १९५९) ही कथा कुकी गणपती यांनी लिहिलेली आहे. या कथेत आई, बाबा, प्रेमा, चंदू आणि त्यांचा कुत्रा असे हे एक आनंदी कुटुंब होते. मोत्या म्हणजे त्यांचा कुत्रा. त्यांच्या घरी पाहुणी म्हणून दोरा आत्याबाई राहायला आल्या. आईची दूरच्या नात्यातली ती दोरा आत्या घरी आली. दोरा आत्याबाई आवडीने सगळ्यांना बोलत असे. 'बोलणे' हा त्यांचा आवडीचा विषयच होता. आत्याबाईंची सारी बडबड निरर्थक असायची. पण सगळ्यांना त्यावर हसावे लागायचे.

त्यांना येऊन दोन आठवडे झाले होते. पण त्या जायचे नाव घेत नव्हत्या. त्यांच्या बडबडीने बाबांचे वर्तमानपत्र वाचणे होईना. आमचा गृहपाठ होत नव्हता. आईला स्वयंपाक करतानाही खूप अडचणी येत. त्या सारख्या बोलत राहायच्या. त्यामुळे सगळे त्यांना वैतागले होते.

एकदा इंदू म्हणाली, दोरा आत्या खरेच का गं गेलेल्या माणसांचे संदेश माणसाला समजतात आणि त्यावरून अदृष्ट कळते. खरे तर दोरा आत्याला पळवून लावण्यासाठी हे सगळं त्यांनी केलेलं असते. आत्या तुम्हाला अनुभव आहे. त्याचा प्रयोग करून पाहू, या यासाठी

इंदूंनी सगळे साहित्य जमवले. उघड्या ठेवलेल्या भांड्यावर दोन बोटे ठेवली, बोटांच्या जोराने भांडे हलू लागले. पण आत्याबाईला वाटले. त्यांच्यात दैवी शक्तीचा संचार झाला. भांड्याने संदेश दिला 'दोरा आत्या इथून निघा.' त्यामुळे त्यांचा चेहरा उतरला होता. दोरा आत्याने सामानाची बांधणी केली आणि निघाली. शेवटी आत्या गावी निघून गेली, कुटुंब आनंदाने राहू लागले.

या कथेत आपण आपल्या नातेवाइकांकडे, पाहुण्यांकडे गेल्यावर त्यांना त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचे सांगून दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या अडचणी, अडथळे यांची माहिती देऊन छोट्या मुलांनी आत्याला त्यांच्या घरी पाठविण्यासाठी केलेल्या क्लृप्त्या सांगितलेल्या आहेत. ही कथा मोठ्यांनी लहानांशी मैत्री करायला हवी. हा संदेशही देते.

### ३९. पृथ्वी प्रदक्षिणा करशील तू ! :

'मुलांच्या मेळाव्यात' (९ मे १९५९) रोजी 'पृथ्वी प्रदक्षिणा करशील तू!' ही के. नारखेडे यांची कथा प्रकाशित झालेली आहे. या कथेतून शाळेत दर वर्षी खेळांचे आयोजन करून मुलींमध्ये निरनिराळ्या शर्यती होत असत. विजयी मुलींना उत्तेजनाकरिता वेगवेगळी बक्षिसे दिली जात.  अशीच ही कथा शर्यत जिंकणाऱ्या मुलीची आहे. 'सुली' नावाची मुलगी दर वर्षी शर्यत जिंकत असे. मात्र या वर्षीच्या शर्यतीत ती भाग घेऊ शकली नाही. कारण तिचा पाय लचकला होता. पायाला इजा झाल्यामुळे तिला शर्यतीत भाग घेणे अशक्य झाले होते.

शाळेत अडचणीतून धावायची शर्यंत लावली होती. या वर्षी ती शर्यत निराळ्याच पद्धतीने घ्यायचे ठरविले होते. शर्यत अशी होती की, शाळेत इमारत व पटांगण याभोवती चारी बाजूंनी भिंत घातलेली होती. धावत जाऊन शाळेला फेरी मारणाऱ्या मुलींत जी मुलगी पहिली येईल. तिला बक्षीस मिळणार होते.

'सुली'ला या शर्यतीत भाग घेता आला नाही. तिला याचे फार वाईट वाटू लागले. मग तिने एक युक्ती लढवली. शाळेत बाईंनी अहिल्येच्या लग्नाची कथा सांगितली होती. अहिल्येच्या बापानं 'पण' ठरविला होता. जो पृथ्वीला प्रथम प्रदक्षिणा घालून येईल त्याच्याबरोबर अहिल्याचे लग्न होईल, असे बाईंनी सांगितले. तिच्या लक्षात आले आणि तिने त्याचा वापर केला. मॅडमला म्हणाली, माझा नंबर पहिला आलाय. बाईंनी तो कसा म्हणून विचारला.

''काय गं, हा गोष्टींचा का तास आहे?''

''ऐका तर खरं बाई जरा, इंद्र आला तशी अहिल्येचं लग्न गौतमाबरोबर झालेलं त्याला दिसून आले! गाईला प्रदक्षिणा घालणं म्हणजे पृथ्वीला प्रदक्षिणा घालणं! गौतमानं एका गाईला प्रदक्षिणा घालून पण जिंकला होता; म्हणून त्याचं अहिल्येबरोबर लग्न झालं होतं.''

''हो पण इथे काय संबंध त्याचा! तुला काय सांगायचं आहे?''

''आपल्या शाळेंत शालागृहाचा नकाशा आहे ना? त्याला फेरी घालून मी पाहिल्यानं येथे आले आहे. मी तो भिंतीवरून काढला त्याला फेरी घातली व पहिल्याने इथे आल्ये!''

''अस्सं! अशी फेरी घातली होय तूं? फार हुशार आहेस! पृथ्वीलाही प्रदक्षिणा घालून शर्यत जिंकलीस तू!'' मोठ्या बाई काहीशा उपरोधानं म्हणाल्या.

''द्या मग मला बक्षीस!''

''हे घे! '' बाईंनी आपला चिमुकला रेशमी हातरुमाल सुलीच्या हातावर ठेवला अन् हळूच तिचा गालगुचा घेतला.''[३७]

लहान मुलांवर संस्कार करणारी ही कथा आहे. प्रस्तुत कथेमधून शक्तीपेक्षा युक्ती महान हा संदेश दिला आहे.

**४०. महर्षि विज्ञान** :

'महर्षि विज्ञान' (२० सप्टेंबर १९५९) या लीलाधर हेगडे यांच्या कथेतून महर्षि विज्ञानाने आपल्याला मिळालेल्या शक्तीचा उपयोग जनकल्याणासाठी केला पाहिजे असा संदेश देतात. ज्ञानाचा नेहमी विजय होतो आणि अज्ञानाचा विनाश होतो. हे या कथेतून निदर्शनास येते. एका नगरात महर्षि विज्ञान होते. त्यांचे ज्ञान अगाध होते. ईश्वरावर त्यांची फार मोठी श्रद्धा होती. त्यांच्या साधनेत ते नेहमी दंग असत. त्यांचे रोज चिंतन चाले. निसर्गातील शक्तीला आपण समजून घ्यावे. म्हणून ते ईश्वराला शरण जातात.

एके दिवशी खरोखरच देवांनी महर्षिला दर्शन दिले. देवांनी त्यांना दिव्य दृष्टी दिली. आता जे काही तुम्ही पाहत आहात तो सर्व सृष्टीचा या विश्वाचा एक अतिशय बारीक कण आहे. हा खूप सूक्ष्म आहे. तो जगातील कोणत्याही प्राण्याला दिसणे शक्य नाही. तुम्हाला दिसण्याचे सामर्थ्य देतो आहे. वाटेल ते तुम्ही मागा. तुम्हाला ते मिळेल. इतकी प्रचंड शक्ती त्यात आहे. आज मला विश्वदर्शन घडले. दिव्य शक्ती देवाने दिली. पण याचा मला काय उपयोग? मी तर वैरागी. ईश्वराची आराधना करणे, त्यांच्या चिंतनात दंग राहणे हाच माझा

परम आनंद. आपल्याला ही शक्ती मिळाली. तो ही गोष्ट राजाला सांगतो कारण तो पालनकर्ता आहे. राजा म्हणाला– महर्षि आपल्याच पुण्याईने ही गोष्ट आपल्याला प्राप्त झाली. आता आपल्या राज्यातले दारिद्य, रोगराई हटवून टाका. पण याचा प्रत्यय मला आला पाहिजे. या राज्यात काय करून दाखवाल. या राज्यात दिव्यांचा लखलखाट करून दाखवा. काय आश्चर्य की, दिव्याचा लखलखाट झाला. सर्वांनी आनंद साजरा केला.

मग पुढे राजा वेगवेगळी कामे सांगू लागला आणि विज्ञान ते पार पाडू लागले. राजा हळूहळू अहंपणा दाखवू लागला. मग तो शेजारच्या राजांना शरण येण्यास सांगत होता. न आल्यास तुमचा नायनाट करू, असे त्यांना धमकावत होता. काही राजे शरण आले. काही राजे आम्ही येत नाही म्हणून सांगितले. आमचा नायनाट केला तरी चालेल. मग राजाने महर्षिंना या राजांचा नाश करायला सांगितले. पण महर्षि राजाला म्हणाले, ''आपल्याला ही दिव्य शक्ती सर्व जगाला सुखी करण्यासाठी मिळाली. चांगले काम करण्यास आपण वेळीच शिकले पाहिजे. नाहीतर एक दिवस आपलाही नाश होईल.'' पण हे राजा काही केल्या ऐकत नाही. तो सुनावतो, की माझी आज्ञा तुम्हाला मानावीच लागेल.

महर्षिंनी राजाला खूप समजावले तरीही राजा ऐकत नाही. महर्षि म्हणतात, मी इतकी सिद्धी मिळविली, आता तुमचापण नाश करू शकतो. पण मी ते करणार नाही आणि मिळालेल्या दिव्य शक्तीने आपण सुखी होऊया, दुसऱ्यांना सुखी करूया.

महर्षिंना तुरुंगात डांबण्यात आले. तरीही महर्षि म्हणतात– आज्ञाभंग केल्यामुळे देहान्त प्रायश्चित्त द्या. पण मी लोकांचा नाश करणार नाही. सगळी प्रजा महर्षिंना मिळालेल्या शक्तीचा उपयोग सर्व जगासाठी झाला पाहिजे असे म्हणत होती. सगळी प्रजा महर्षिंच्या मागे होती. तेव्हा कुठे राजाचे डोळे उघडले. राजा म्हणतो– महर्षी विज्ञान, आज तुमचा विजय झाला आहे. तुम्ही सर्व लोकांच्या भल्यासाठी तुरुंगात देह कष्टविला. तुम्ही सर्व जगाला सुखी करा, नेहमी चांगल्या विचारांचाच विजय होतो. या कथेत कोणतीही व्यक्ती सर्वगुणसंपन्न नसते. पण त्याने इतरांकडील चांगल्या गुणांचा स्वीकार करून समाजोन्नतीसाठी झगडले पाहिजे; मग तो राजा असो की सर्वसामान्य व्यक्ती.

## ४१. बापूजी आणि आकाश :

'मुलांच्या मेळाव्यात' (३ ऑक्टोबर १९५९) या सदरात बापूजी आणि आकाश ही कथा प्रकाशित झालेली आहे. या कथेत बापूजींना आकाश खूप प्रिय होते. ते आकाशाचे निरीक्षण करीत असे, आपल्या डोक्यावरच्या ह्या विशाल आकाशाची गोडी त्यांना उशिराच लागली. येरवडा तुरुंगात असताना बापूजी तुरुंगातच शतपावली करीत. खुल्या मैदानातच फिरायला त्यांना आवडत होते. त्यांच्याबरोबर काकासाहेब कालेलकरसुद्धा फिरत होते. बापूजी काकासाहेबांना म्हणायचे, मला तर आकाशाच्या दर्शनाने खेड्यातील नैसर्गिक वातावरणात गेल्यासारखे वाटते.

बापूजी जेव्हा आफ्रिकेत होते. तेव्हा त्यांच्या 'किचन' नावाच्या मित्राला आकाशाचे खूप वेड होते. त्याने बापूजींना आकाशाकडे बघण्याचे वेड लावले. आकाशाच्या रात्रीच्या सौंदर्याने त्यांचे अंतकरण आनंदाने नाचू लागले. बापूजी किचन या मित्राकडून आकाश वाचायला शिकले. त्यांना आकाशाची गोडी वाटू लागली. बापूजी नकाशाच्या आधारे आकाशात तारे पाहत होते. रोहिणी, कृत्तिका, अनुराधा, ज्येष्ठा ही नक्षत्रे तर ते चांगलेच ओळखत. बापूजी वल्लभभाईंना नकाशे काढून ठेवायला सांगत. 'इलस्ट्रेटड विकली' या साप्ताहिकात नक्षत्र दर्शनाचे नकाशे येत असत. आकाशाच्या सौंदर्याविषयी बापूजी म्हणत खरेच आकाशाच्या दर्शनाने दृष्टी किती विशाल होते.

पुढे ते म्हणतात– सानेगुरुजींनी आपली बुद्धी कशी व्हावी, ह्याचे वर्णन करताना देखील आकाशाच्या गुणांचा गौरव केलेला आहे, ते म्हणतात, ''विशाल अंबरासम सदैव हो मती मम। आपले मन विशाल करून आकाशाकडे पाहा खूप आनंद मिळेल. आश्विन महिन्यातल्या पहिले चंद्रदर्शन किती आनंददायी असते. श्रावणबाळाची गोष्ट आपल्या सगळ्यांना माहीत आहे. माता–पित्यांची कावड घेऊन तो नदीवर येतो. त्याचे नाव दिलेले श्रावण नक्षत्रही तुम्हाला या महिन्यात पाहावयास मिळते. 'श्रवण' नक्षत्र हे आकाशाच्या मध्यभागी येईल. मधोमध एक ठळक तारा आणि दोन्ही बाजूंना थोडे लहान तारे एका ओळीत दिसतात. निसर्गाचे देणे किती अप्रतिम आहे. मानवाच्या प्रत्येक गोष्टीशी जुळवणूक करून देणारे आकाश, तारे किती जवळचे आहेत. तसे मृग नक्षत्रही पाहू शकतो.

पुढे ते म्हणतात, वर्षा ऋतूने पसरून ठेवलेल्या गालिच्यावर पाठ टेकून पडा आणि वर आकाशाकडे कौतुकाने पाहा. अनंत आकार तुम्हाला खुणावू लागतील. अपार आनंद होईल. या आनंदात आपण सर्व सामील होऊयात आणि आपले बापूजी म्हणतात– त्याप्रमाणे आपली दृष्टी विशाल बनवूया. बापूजींना वाचनातून मिळालेला आनंद, बारकावे व निरीक्षणाचे महत्त्व या कथेत सांगितले. या कथेतून बापूजींनी मुलांना आकाशगंगेविषयीची आवड, नक्षत्र त्याचे स्थान व त्यांचे महत्त्व विशद केले आहे.

**४२. थोर चित्रकार! :**

लीलाधर हेगडे यांची 'थोर चित्रकार!' (२१ व २८ नोव्हेंबर १९५९) ही कथा असून, या कथेचे दोन भाग आहेत. मोहाचे जाळे आणि सत्त्वपरीक्षा यातून थोर चित्रकार आपणास या कथेत भेटतात.

या कथेतील व्यापारी व चित्रप्रवीण यांच्यातील संवाद आलेला आहे. व्यापारी आपल्या मालाची विक्री व्हावी, म्हणून चित्रप्रवीणाकडून स्वार्थी हेतूने चित्र काढून घेतो.

चित्रप्रवीणाची कीर्ती नगरीतील मोठमोठ्या श्रीमंत व व्यापाऱ्यांच्या कानावर पडली. सगळे त्याचे प्रदर्शन पाहण्यास येऊ लागले. एके दिवशी व्यापारी चित्रप्रवीणाला जेवणाचे निमंत्रण देतो. चित्रप्रवीण निमंत्रण स्वीकारतो. व्यापाऱ्याने चित्रप्रवीणाचे आदरातिथ्य केले. जेवणास पंचपक्वान्ने केली. जेवण करतेवेळी हिऱ्याच्या व्यापाऱ्याने चित्रप्रवीणाला सांगितले की, माझे एक असे चित्र काढा. मी विकतो ते जवाहिर फार उच्च दर्जाचे आहे. चित्र पाहून नगरातील सर्व लोक माझ्याकडे खरेदीला येतील. मोहाने माणूस कोणतेही दृष्कर्म करतो. मला जाहिरात काढून द्या मी तुम्हाला लागतील तेवढे पैसे देईन. परंतु चित्रप्रवीणाने, माझ्याने ही गोष्ट होणार नाही. कारण मी जे चित्र काढून दिले, त्यावर लोकांनी विश्वास ठेवला आणि तुम्ही खरे म्हणून खोटेच हिरे–मोती विकले, तर तुमच्या पापात मीही भागीदार नाही का होणार? मी ते पाप करणार नाही. मी चित्र काढू शकत नाही, असे म्हटल्यावर व्यापारी मनातच चिडतो. पैशाने कोणतीही गोष्ट विकत घेता येत नाही, हे व्यापाऱ्याला चांगलेच समजले.

लेखकाचा या कथेमागचा उद्देश अतिशय चांगला आहे. पैशांसाठी कला विकता येत नाही आणि कलेला कोणीच विकत घेऊ नये, असा उपदेश कथेतून मिळतो. तर याच कथेत पुढे राजा चित्रप्रवीणाची सत्त्वपरीक्षा घेण्याचे ठरवितो. कारण व्यापाऱ्याने झालेली गोष्ट राजाला

सांगितली होती. चित्रप्रवीणाची कीर्ती राजाच्या कानावर आधीच गेली होती. राजाला व्यापाऱ्याची हकीगत ऐकून वाटले. खरंच हा चित्रप्रवीण इतका उद्धट कसा? राजा चिडला. राजाने दूताला चित्रप्रवीणाला निमंत्रण देण्यास सांगितले. चित्रप्रवीण राजदरबारात आला. चित्रप्रवीणाने राजास नम्रपणे विचारले– काय आज्ञा आहे महाराज? यावर महाराज म्हणाले, ''तुम्ही फार मोठे चित्रकार आहात. तुमची कीर्ती आमच्या कानावर आली आहे. माझी इच्छा आहे की, तुम्ही माझे चित्र काढावे.''

चित्रप्रवीण राजास म्हणाले, कोणीतरी चित्र काढायला सांगावे अन् मी काढावे असे अजून तरी कधी झाले नाही. मला चित्र काढण्यास सांगू नका म्हणून विनंती केली. यावर राजा चिडतो. म्हणतो– ज्यांनी माझ्या आज्ञेचे पालन केले नाही. मी त्यांना तुरुंगात पाठवीन. नाहीतर त्याचा शिरच्छेद करीन. केवळ हातात सत्ता आहे म्हणून चित्र काढण्यास भाग पाडत आहात. असा विचार करून चित्रप्रवीण म्हणाला, ''महाराज, मी आपले चित्र काढण्यास तयार आहे.' हे ऐकून दरबारातल्या लोकांना आश्चर्य वाटले. चित्रप्रवीणाने राजाचे चित्र काढले. चित्र पूर्ण झाले म्हणून सांगितले. चित्रप्रवीणाने राजाचे राक्षसासारखे चित्र काढले. दुष्टकर्म्याने ते चित्र पाहिले आणि तो रागाने लाल झाला. या दोन्ही प्रसंगांतून चित्रप्रवीणाने आपल्या कलेचा मान राखलेला दिसून येतो. तो व्यापाऱ्याला व राजाला केवळ पैसा व सत्ता आहे म्हणून कला विकत नाही. चित्रप्रवीण आपल्या गुरूच्या उपदेशाचे पालन करतो हे दिसून येते. यातून चित्रकाराची बुद्धी, भावना व कृती यांचा समन्वय दिसून येतो.

**४३. गुंतागुंत :**

'गुंतागुंत' (२४ डिसेंबर १९५९) ही लीलाधर हेगडे यांची कथा आहे. ही दलितांच्या संघर्षाची कथा आहे. आपल्या हिंदू संस्कृतीत गाईला माता समजले जाते. गोमाता ही सर्व देवतांमध्ये सर्वश्रेष्ठ दैवत मानले जाते. अशा या गाईला मेल्यानंतर ओढायला कोणी येत नाही. लेखक या कथेत सांगतात– जनावरं मेल्यानंतर माणसांचे कशाप्रकारे हाल होतात ते ओढून नेण्यासाठी कोणी येत नाही. रघू गांगलच्या घरी गाय मेलेली असते. तिला ओढून नेण्यासाठी रघूला किती आटापिटा करावा लागतो, हे या कथेत दिसून येते.

या कथेत एकीकडे गांधीजींवर अविश्वास दाखवितात आणि गांधीजीनी धर्म बुडवला! असे रघूचे वडील बोलतात. हरिजनांबद्दल बोलताना म्हणतात– पायातली चप्पल पायात ठेवावी.

आता ही गाय कोण ओढणार? तुमचे गांधी ओढणार काय? असे प्रश्न रघूचे वडील रघूला आणि त्याच्या मित्राला बोलून दाखवितात. पुढे असेही म्हणतात, चातुर्वर्ण्य स्थापन करणारे आमचे पूर्वज काय गाढव होते. अरे, आमच्या पूर्वजांनी चातुर्वर्ण्याची युक्ती काढली म्हणून आपला धर्म, संस्कृती टिकली.

मेलेली गाय गोठ्यातून कशी हलवायची, हा आता मुख्य मुद्दा होता. रघूने महारवाड्यात गेल्यावर मेलेली गाय ओढ्याला तुम्ही का येत नाही, असं म्हटल्यावर तो महारवाड्यातला थोडी समज असलेला इसम म्हणाला, ''आमच्या जातीचा ठराव झालाय, जनावर ओढायची न्हाईत. आम्ही येणार नाही.'' तो निर्धाराने म्हणाला. यावरून दलित समाज आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित होता, हे दिसून येते. या कथेत दलित विद्रोहाचे स्वरूप दिसून येते.

इतके दिवस आम्ही ही कामे केली. त्याचं काय फळ मिळालं? आमची उपेक्षाच झालेली आहे. आता बाबासाहेबांनी सांगितलंय की, मरा पण हे काम करू नका. तो निर्धाराने म्हणाला आणि तो विरोध करणारा म्हणतो, आम्ही हरिजन नाही, आम्ही महार आहोत. महार म्हणजे महान असा अर्थ होतो. 'र' नसून 'न' आहे. म्हणजे आम्ही महानच आहोत असे सांगून ठामपणे ते नकार देतात.

या कथेत लेखकाने दलित विद्रोहाची भूमिका मांडलेली आहे. सवर्ण व दलित यांतील संघर्ष असून मेलेले ढोर ओढण्यास 'नकार' देणारी ही कथा आहे.

दलितांच्या नकारांची जरी कथा असली, तरी रघू गांगल ''पण तुम्हाला हिंदू धर्मातली सर्व माणसं वाईट असं का वाटतं? असाही प्रश्न उपस्थित करून गांधी विनोबांबद्दलचा गैरसमज या कथेत सांगितला आहे.

ही कथा चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेत सवर्ण आणि दलित संघर्षाचे चित्रण असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना दिलेल्या स्वत्वाची जाणीव, प्रचलित व्यवस्थेला नकार देऊन आपण माणूस आहोत, हा मानवतावादी दृष्टिकोन व्यक्त करणारी कथा आहे.

### ४४. दांड्यावरला बारकू!

'दांड्यावरला बारकू!' (२८ डिसेंबर १९५९) ही लीलाधर हेगडे यांची कथा प्रकाशित झाली आहे. बारकू हा कोकणातील एक दांड्यावरच्या घरातील थोरला मुलगा. समुद्रापासून आत वसलेल्या गावांना दांडे आहेत. दांडा म्हणजे बंदर, इथे ताजी मासळी, जहाजाने भरभरून

येते. बारकू मासे पकडायचा आणि घराचा उदरनिर्वाह करायचा. घरात तो थोरला होता, त्याला पाच भावंडे आणि आईचे निधन झाले. वडिलांचा ॲक्सिडेंटमध्ये एक पाय गेला. मग घरची सगळी जबाबदारी बारकूवर पडली.

बारकू तसा हुशार, समजदार मुलगा होता. तो शाळेत जात असे. परंतु अचानक एक दिवस शाळा बंद करतो. तो गावातील मंदिरात दिवा लावण्याचे काम करतो. शिवाय दिवसभर समुद्रावर मासेमारी करण्यासाठी जातो. शाळेतील मास्तर बारकूची चौकशी करतात, तेव्हा त्यांना फार दु:ख होते. त्याच्या भयाण दारिद्र्याची चिंता वाटते, बिचारा बारकू!

मास्तर दररोज दारू पिलेल्या लोकांना गावात पाहत असत. पण बारक्या ह्या लक्ष्मणरेषेवर उभा असेल याची कल्पना त्यांना नव्हती. परिस्थितीमुळे माणूस किती बदलून जातो, बारक्याने चव पाहण्यासाठी जर सहज बाटली तोंडाला लावली तर त्याचा काय दोष, बारकू माझा चांगला विद्यार्थी आहे. मोठ्यांचा आदर तो करतो. दारूची बाटली हातात असताना बारक्या जोपर्यंत लाजतो, तोपर्यंत त्याला सुधारता येईल. म्हणजे अजून बारकूला सुधारण्यास संधी आहे. असे त्यांना वाटते.

या कथेतील 'बारकू' हा कोकणातील दारिद्र्यात जगणारा विद्यार्थी असून, त्याला कौटुंबिक परिस्थितीमुळे शिक्षण सोडून कुटुंबासाठी काम करावे लागते. पण नको त्या वयात हातात पैसा आल्यावर त्यांची व्यसनाकडे वाटचाल सुरू होते. पण शिक्षकांना पाहिल्यावर त्यांच्याबद्दलचा आदर व्यक्त होतो. प्रस्तुत कथेमधून परिस्थिती माणसाला हतबल बनवत असते. पण माणसाने त्यावर स्वार व्हायला हवे, ही शिकवण मिळते.

**४५. सोनी आणि बनी** :

'मुलांच्या मेळाव्यात' 'सोनी आणि बनी' (२० फेब्रुवारी १९६०) ही शालिनी स्नेहवर्धन यांची सोनी आणि बनी या दोन बहिणींची ही कथा प्रकाशित झाली आहे. सोनीचे वडील शेती करीत असतात. त्यांच्या शेतावर त्यांचे खूप प्रेम असते. अतिशय मेहनतीने ते मशागत करीत असत. काही दिवसांनी त्यांच्या सुखात भर पडली. त्याला एक मुलगी झाली. तिचे नाव त्याने 'सोनी' ठेवले. 'सोनी' लहानपणापासूनच अत्यंत हुशार मुलगी होती. काही दिवसांनी तिची आई मरण पावते. तो शेतकरी दुसरे लग्न करतो. तिला मुलगी होते. तिचे नाव 'बनी' ठेवतो. या दोन बहिणींची ही कथा आहे. शालिनी स्नेहवर्धन या लेखिकेने या कथेत दोन्ही मुलींच्या गुण–

दोषांचे वर्णन केलेले आहे. समाजातील अनेक लोकांच्या अंगी असलेले दोष दूर व्हावेत म्हणून या कथेतून एक चांगुलपणाचे दर्शन घडविले आहे.

या कथेतील शेतकऱ्याचे म्हणजेच सोनीच्या वडिलांचे निधन होते. त्याच्या निधनानंतर सोनीला पोरके वाटू लागते. 'राजाने मारले आणि पावसाने झोडले तर जावे कुठे' म्हणतात ना तसेच सोनीचे झाले. प्रेमळ बाप मेला आणि नवी आई पाण्यात पाहू लागली. याचे तिला खूप वाईट वाटत असे. कोणाजवळ तरी मन मोकळे करावे तिला वाटत असे. आई उपाशी ठेवी. हिडीसफिडीस करी. दिवसभर राबवून घेई. बनीला मात्र कुरवाळून, गोड कौतुक करी. ''[३९]

अशीच खूप वर्षे गेली. सोनी स्वभावाने कष्टाळू आणि मायाळू होती. आईने तिचे हाल केले, छळ केला. तरी ती आईची आज्ञा मानत असे. सावत्र आईने सांगितलेली सगळी कामे नीटनेटकी करीत असे. बनीचा स्वभाव चांगला नव्हता, ती सारखी त्रास देत असे; पण सोनी कधीच तिच्याविषयी घृणा करत नसे. बनीचा तिरस्कार करावा, असे तिच्या मनात कधी आले नाही.

लेखिकेने या कथेतून चांगुलपणाचे धडे दिलेले आहेत. सोनीच्या स्वभावाच्या अगदी उलट बनीचा स्वभाव होता. एक दिवस आईने दोघींना मासे, खेकडे आणायला सांगितले. तेव्हा सोनी टोपले भरून मासे घेऊन येते. तेवढ्यात बनी तिने शोधलेले मासे मी आणले असे आईला सांगून बक्षीसही मिळविते. सोनीच्या अगोदर आपण मोठे काम केले असा देखावा करते.

बनीचा कामचुकारपणा व आळशीपणा या कथेत दिसून येतो. तिच्यामुळे सोनीला नेहमी बोलणे ऐकावे लागते. सोनी एकांतात बसून अत्यंत दुःखी होऊन ढसाढसा रडते. इतक्यात तिला भगवंताने दर्शन दिले. भगवंत तिच्या पाठीवरून हात फिरवून रडण्याचे कारण विचारतात. तेव्हा ती आपले दुःख, हालअपेष्टा भगवंताला सांगते. भगवंत तिला वर देऊन तिचे दुःख निवारण करतो.

या कथेतून कपटपणा करणाऱ्याचे कधीच भले होत नाही. चांगुलपणाचा कधी नाश होत नाही. चांगुलपणा अंगी असल्यावर साक्षात भगवंतही पुढे येऊन उभे राहतील. कष्टात, दुःखात ते सोबत, साथ देतील. सगळे कष्ट दूर करतील, शेवटी चांगुलपणाचाच विजय होतो, हे लेखिकेने दाखवून दिले आहे. अंगी चांगुलपणा असल्यामुळे ईश्वर तिच्या मदतीला धावून येतात. असे वर्णन या कथेत आलेले आहे.

'चांगुलपणा' हा माणसाचा खरा दागिना असून, प्रामाणिक व्यक्तीच्या पाठीमागे ईश्वर असतो. तो त्याला सर्वतोपरी मदत करत असतो हा संदेश दिला आहे. या कथेतून श्रमप्रतिष्ठा या मूल्याचा वेध घेतलेला आहे.

**४६. क्षणगंधा :**

'क्षणगंधा' (५ मार्च १९६०) ही केशव मेश्राम यांची कथा प्रकाशित झालेली आहे. या कथेत 'सुधा'च्या जीवनाची वाताहत रेखाटली आहे. या कथेतील मन:स्थितीचा आढावा घेऊन साप्ताहिक सुटी कशा पद्धतीने घ्यायची याचा विचार करते.

कितीतरी दिवसांनी नवा पोषाख करून बाहेर पडावा म्हटले की, दारात त्याचे काका येतात आणि मला निरखून पाहतात. कदाचित त्यांना वाटले असेल, म्हणून तर याला घरची आठवण येत नसेल, कुणाबद्दल जवळीक वाटत नाही. एकटा जीव आणि सदाशिव असा नाद लागलाय याला. असे अंतर्मन त्याला खुणावत असते. ही कथा दोघांच्या संवादातून उलगडते.

ऑफिसातून घरी जात असताना लोकलच्या प्रवासातले क्षण इथे टिपलेले आहेत. गाडीने प्रवास करताना मनातले भाव येथे प्रकट होतात. पण संस्कारी मनाच्या अभावित बंडावर शरीर मात करते. लाचारीत जगण्याची सवय झालेल्या शरीराचा ज्योतीचा हा प्रकाश नवा होता. माझ्याच हाताकडे मी काहीशा अभिमानाने, लज्जेने आणि संतापाने पाहतो. स्वत:ला न जुमानणारी तीच आंच अगदी अनुभूत होती. आसमंतातून एक विलक्षण धुंद हळूहळू लहरत जाते. अशा प्रकारे लेखकाने या कथेत 'क्षणगंधा' म्हणजेच क्षणाक्षणांचे बारकावे टिपलेले आहेत. सुधाच्या जीवनातील ओढाताण, तिला वाटणारे परकेपणाचे व जीवनाबद्दलचे विलक्षण चित्र या कथेत रेखाटलेले आहे.

सुधाला मी तिच्या लहानपणापासून पाहतो आहे. आईच्या वेडसर स्वभावामुळे बापाचा मुलगा होऊन वाढलेली एकुलती एक पोर ती! चांगलीच उफाड्याची झाली आहे आता. कधीमधी सहानुभूती दाखवायची, साऱ्या जगाबद्दल फळाफुलांच्या अज्ञात व्यथेबद्दल... बदलणाऱ्या कालचक्रांत पोरांसाठी यात्रा करणारा बापच एकदम बदलतो आणि एक दिवस दुसरें लग्न करून मोकळा होतो! तेव्हा कसलाही नियम, आडवा येत नाही की, कायदा कडमडत नाही.

तिथेही सुधाला काही कमी नसते. पण हा बदल तिच्या मनाला पेलत नाही. रस शोषलेल्या आंब्यासारखी ती खंगत जाते. पिकून गळणाऱ्या पपईसारखी क्षीण आणि खोटे खोटे हसते. कुणीतरी मग तिला सहानुभूती दाखवितात. तिलाच मी आता पाहतो आहे. नव्या साडीत गुंडाळलेल्या कागदी लगद्याच्या बाहुलीत व तिच्यात विलक्षण साम्य वाटते! तिचा तो मनस्ताप दूर करता येत नाही. रंगीत साड्या, बापाचा मोठा थोरला धंदा, नवी समंजस आई किंवा आजूबाजूचे बुभुक्षित धुंद डोळे.... ती नुसतीच हसते. हातातील मोगऱ्याची कळी–क्षण दोन क्षण कुरवाळते आणि झपाटल्यासारखी कुस्करून भिरकावून देते. ती चुरगळलेली कळी माझ्याच दारासमोर येऊन पडते.''[४०]

या कथेतील सुधा आईच्या वेडसर स्वभावामुळे बापाचा मुलगा होऊन वाढलेली मुलगी असते. बाप दुसरा विवाह करतो. तेव्हा तिची मन:स्थिती पार बदलून जाते. तिथे तिला काही कमी नसते; पण हा वडिलांत झालेला बदल तिला पेलत नाही. तिच्या मनाला त्रास होतो तिची मानसिक स्थिती बदलते. स्वत:कडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून जातो. तिच्याबद्दल वाटणारी सहानुभूती लेखक येथे रेखाटतात. लेखक म्हणतो, सुधा म्हणजे चुरगळलेली कळी. माझ्याच दारासमोर येऊन पडते.

या कथेतील नायिका सुधा ही वडिलांच्या दुसऱ्या लग्नामुळे मानसिकदृष्ट्या हतबल झालेली आहे. वयात आलेल्या मुलीच्या लग्नाचा विचार करण्यापेक्षा वडील स्वत:चे लग्न करतात. ही जाणीव सुधाला होते, तेव्हा ती आतून पूर्णपणे उद्ध्वस्त होऊन जाते. ही कथा वाचताना बाळूताई खरे यांच्या 'कळ्यांचे नि:श्वास' या पुस्तकाची आठवण होते.

**'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झालेल्या कथांची वैशिष्ट्ये :**

१. लोककथांचा अनुवाद आणि बालवाचकांवर नैतिकतेचे संस्कार घडविले.

२. भावी पिढीवर वीरता, देशप्रेमाचे संसकार घडविणाऱ्या वीर कथा प्रकाशित करण्यात आल्या.

३. विशिष्ट हेतूने मुलांसाठी आशयपूर्ण अनुवादित कथा, वास्तव कथा, विज्ञान कथा या कथांमधून मुलांचे मनोरंजन केले.

४. या सर्व कथा अभिरुचिपूर्ण व मनोरंजक असल्यामुळे संस्कारमूल्य वाढवणाऱ्या कथा आहेत.

५. बालवयात उत्तम संस्कार, चारित्र्यसंवर्धन, वैज्ञानिक दृष्टिकोन, अंधश्रद्धा निर्मूलन, शौर्य व धाडसाचे संस्कार करणाऱ्या कथा 'साधना'तून प्रकाशित झाल्या.

६. आजची लहान मुले उद्याचे नागरिक असतात त्या दृष्टीने त्यांच्यावर निसर्ग संवर्धन व पर्यावरणाचे संस्कार घडावेत. या उद्देशाने बालसाहित्याची निर्मिती करण्यात आली.

७. माणूस म्हणून सौजन्यशीलता, सहकार्य, सहिष्णुता, मैत्री यामुळे समाजात मोकळेपणाने वागण्याचे संस्कार, सर्वांनी मिळून मिसळून वागण्याची सवय व मदत करण्याची वृत्ती वाढविण्याच्या दृष्टीने आलेल्या कथा महत्त्वाच्या आहेत.

८. अनुवादित लोककथा, परिकथा, दैवतकथा, पौराणिक कथा, सामाजिक कथा, वैज्ञानिक कथा, जाती निर्मूलनाचा संदेश देणाऱ्या कथा, चरित्र, व्यसनमुक्ती आदी विषयांवर 'साधना' साप्ताहिकातून कथालेखन आलेले दिसून येते.

ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालावधीत 'साधना' साप्ताहिकात साधनेच्या कथा, मुलांच्या मेळाव्यात, इतर कथालेखनातून बालसाहित्य लेखनास प्रारंभ झाला. 'साधना' साप्ताहिकाच्या दिनांक १५ ऑगस्ट १९४८च्या पहिल्याच अंकात मुलांसाठी पान राखून 'साधना'च्या बालविभागाचे बीजारोपण केले. मोठ्यांच्या नियतकालिकांत लहानग्यांची लुडबुड नको अशी 'साधना' साप्ताहिकाच्या जन्माच्या वेळी असणाऱ्या नियतकालिकांची मानसिकता असतानाही सानेगुरुजींनी बाल विभाग सुरू केला होता. 'साधना'च्या संपादकीयमध्ये 'साधना' साप्ताहिकाबद्दलची आपली भूमिका मांडताना. सानेगुरुजी म्हणतात, ''आपण मुलांच्या संगतीत रमू ती आपल्याला गोष्टी–गमती सांगतील. आपण त्यांना सांगू''[४१]

उपरोक्त संदर्भावरून मुलांशी बोलतांना नैतिक दृष्टिक़ोन व तत्त्वज्ञान गोष्टी रूपाने सांगावे हा आंतरिक दृष्टिकोन दिसून येतो. मुलांना आपल्या जीवनातील गमती–गोष्टी सांगताना त्यांच्यावर न डाफरता त्या गमती आपण ऐकून घ्यायला हव्यात. त्यांच्या अनुभवाबद्दल त्यांना लिहायला प्रोत्साहन द्यावे, ही जाणीव यातून दिसून येते.

'साधना'च्या पहिल्या अंकात 'बालविभाग' वेगळा दिलेला नाही. कदाचित सुरुवातीला 'साधना' साप्ताहिकाची वाटचाल अतिशय खडतर असल्यामुळे बाल विभागाकडे म्हणावे तितके लक्ष देता आले नाही. पण सानेगुरुजींनी जाणीवपूर्वक लेखन केले होते. 'साधना'च्या पहिल्या अंकात सेवादलाचा थोर वीर हुतात्मा कमलाकर दांडेकरच्या बलिदानाची हकिगत, बापूजींची

एक गोष्ट, मुलगा गुरू झाला, तर तारील कोण आता? ही कणकवलीच्या हरिजन छात्रालयातील रामचंद्र जाधव यांची कविता. यातून मुलांवर देशभक्तीचे संस्कार व्हावेत, तसेच मुलांना लिहिण्यास प्रोत्साहन देणे. हा दृष्टिकोन दिसून येतो. पण 'साधना'च्या दुसऱ्या अंकापासून मात्र मुलांसाठी असलेल्या मजकुराला 'मुलांच्या मेळाव्यात' असे सदर दिसून येते. यात अनेक नामांकित लेखकांनी लेखन केले आहे. जयवंत दळवी, ना. ग. गोरे यांचे शुभास पत्र, यदुनाथ थत्ते यांनी मुलांसाठी नाटकुले लिहिलेले आहे. दुर्गा भागवतांचेही सहकार्य गुरुजींना मिळाले होते. तर कधी–कधी विविध प्रकारच्या उपक्रमांची माहिती देऊन मुलांना वाचनालय काढण्याचे प्रोत्साहन दिले. विज्ञान मंडळाबरोबरच सेवा दलाबद्दलची प्रश्नोत्तरेही एका अंकात दिली आहेत. पण प्रत्येक अंकात सानेगुरुजींना 'मुलांच्या मेळाव्यात' हे सदर प्रकाशित करता आले नाही. 'बापूजींच्या गोड गोष्टी' हे सानेगुरुजींचे बालवाङ्मय निर्माण झाले. यातूनच चांगल्या साहित्यकृतीचे इंग्रजीतून मराठीत अनुवाद झाले. सानेगुरुजींच्या निधनानंतर विश्वस्तांची बैठक होऊन 'साधना' साप्ताहिक चालू ठेवायचे, पण त्यात बालविभाग असलाच पाहिजे असे बंधन संपादकांनी पाळले नाही. पण यदुनाथ थत्ते यांच्या संपादनाखाली बालविभागाकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. ते स्वत:बरोबरच अपल्या अवतीभवती असणाऱ्या सहकाऱ्यांवर जबाबदारी सोपवून देत. आबाबेन देशपांडे, यशवंत चौधरी, सुधा नारकर, सय्यद मुनीर, दिलीप भंडारे यांना ही जबाबदारी सोपविली. यदुनाथ थत्ते यांची जडणघडण राष्ट्र सेवा दलातून झालेली असल्यामुळे त्यांनी 'साधना'च्या माध्यमातून बालचळवळीचे उपक्रम अमलात आणले. 'साधना' कुमार विशेषांक, 'साधना' बालकुमार शिबिरे, बालबोहापीठ या संस्थेच्या सहकार्यातून एक वर्ष त्यांनी मुलांसाठी खास मासिक पुरवणी काढली. वेगवेगळ्या वयोगटांतील मुलांसाठी असणाऱ्या लेखनासंदर्भात त्यांचा दृष्टिकोन ''शिशुबाल, किशोर आणि कुमार वेगवेगळ्या प्रकारचा मजकूर मिळावा. शिशुगटासाठी मोठा आणि ठळक टाइप असावा. मजकूरही लहान आणि अगदी सोपा असावा. त्याला भरपूर गोड चित्रांची जोड असावी हे तत्त्व 'साधना'च्या बालकुमार विशेषांकातून पाळलेले आहे.''[४२]

उपरोक्त संदर्भावरून शिशुगटांसाठी लेखन व टाइप कसा असावा, याची स्पष्ट कल्पना त्यांनी दिली होती. 'साधना' साप्ताहिकातून मुलांच्या मेळाव्यात, साधनेच्या कथा, कथा या शीर्षकांतर्गत ना. ग. गोरे, दुर्गा भागवत, सानेगुरुजी, काकासाहेब कालेलकर, मंगेश पाडगावकर,

महादेवशास्त्री जोशी, वामन चोरघडे, प्रेमा कंटक, सुधा नरवणे, गो. नी. दांडेकर, ललिता भावे, शंकर सारडा, आनंदीबाई शिर्के, शकुंतला बोरगावकर, केशव मेश्राम, देविदास, बागूल, राजा मंगळवेढेकर, लीलाधर हेगडे, कुसुमावती देशपांडे, वि. भ. अत्रे, यदुनाथ थत्ते, गोपीनाथ तळवळकर, शिरूभाऊ लिमये, रा. भि. जोशी, प्रा. ना. म. जोशी, आ. ना. पेडणेकर, दि. के. बेडेकर, भा. रा. भागवत, पं. महादेवशास्त्री जोशी, शं. द. जावडेकर, श्री जहूरब, दुर्गेश शुक्ल, बी. बी. कुलकर्णी, यमू कुंभारे, शशिकांत अकोलकर, वा. सु. देशपांडे, प्रभाकर बेंद्रे, श्रीधर रानडे, कमल चौधरी, लीला मुजुमदार, अच्युत घोसपूरकर, विजयकुमार शिवलकर, विजय कुलकर्णी, शुभा गोरे, कु. सुरोज वायंगणकर, विद्या अनंत नारळकर, श्री. रा. टिळेकर, मधुकर केचे, श्री. के. नारखेडे, कमल मराठे, दिवाकर, पु. ज. बुवा, अशोक शहाणे, सुनंदा पतके. यांसारख्या लेखकांच्या कथा प्रकाशित झाल्या. यांपैकी काही मान्यवर लेखक झाल्याचे आपणास दिसून येते. एकंदरीत 'साधना' साप्ताहिकातून बालकथांच्या माध्यमातून विविध विषयांवर लेखन झाल्याचे दिसते. या कथांमधून तुळशीचे लग्न, घायपाताचा जन्म, मच्छीराज, राम आणि लक्ष्मण, पांडवांची कथा या दुर्गा भागवत यांच्या कथा; मुंग्या, जादूची अंगठी, काही पक्षी, नकाशे, न्यायाधीशाचा निवाडा, थोर चित्रकार, शिस्त आणि सत्य, मनूताईचा प्रवास, अपराध आणि शिक्षा, नवी गोष्ट पण जुना हत्ती, एका तिबिटाची गोष्ट, आंब्याचा मोहर, वाघाची शिकार, दुर्गापूजेचा महोत्सव यांसारख्या वैविध्यपूर्ण विषयावर कथालेखन आलेले दिसते.

'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झालेल्या कथांतून संवेदनशीलता, श्रमप्रतिष्ठा, स्त्री–पुरुष समानता, सर्वधर्मसमभाव, राष्ट्रीय एकात्मता, वक्तशीरपणा, हजरजबाबीपणा ही मूल्ये जोपासलेली होती. या प्रकरणात 'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झालेल्या निवडक लेखकांच्या कथांचा अभ्यास केला आहे.

## ४.३१ कादंबरी :

सानेगुरुजी यांची 'साधना' व बा. भ. बोरकर यांची बाराबास या दोन कादंबऱ्या १९४८ ते १९६० या कालखंडात 'साधना'तून क्रमश: प्रकाशित झालेल्या असून, एक बंगाली व दुसरी स्वीडिश भाषेतील कादंबरी आहे. त्याचा अनुवाद 'साधना'च्या वाचकांसाठी करून दिला आहे.

## १. ‘साधना’ :

‘साधना’ ही रवींद्रनाथ टागोर यांची मूळ बंगाली कादंबरी आहे. सानेगुरुजींना रवींद्रनाथ टागोर व त्यांच्या साहित्याविषयी अभिरुची होती. यामुळे ‘साधना’ साप्ताहिकात प्रकाशित होण्यापूर्वीच १८ वर्षे अगोदर त्यांनी ‘साधना’ या कादंबरीचा मराठी अनुवाद केला होता. पण काही अडचणींमुळे त्यांचे हे अनुवादित पुस्तक प्रकाशित होऊ शकले नाही. खरे तर सानेगुरुजींनी सुरू केलेल्या साप्ताहिकास ‘साधना’ हे नावही त्यांना या कादंबरीवरूनच सुचले आहे.

‘साधना’ कादंबरीच्या बंगाली एकूण २२ आवृत्त्या प्रकाशित झालेल्या आहेत. यावरून ‘साधना’ कादंबरीचे वेगळेपण लक्षात येते. या कादंबरीत एकूण आठ प्रकरणे आहेत. दिनांक २७ मे १९४९ ते २४ सप्टेंबर १९४९ या कालावधीत ‘साधना’ साप्ताहिकातून पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा स्वरूपात ही कादंबरी क्रमशः प्रकाशित झालेली आहे. या संदर्भात सानेगुरुजींनी ‘साधना’ ही रवींद्रनाथ टागोर यांची कादंबरी ‘साधना’ साप्ताहिकातून क्रमशः प्रकाशित होणार असल्याचे निवेदन दिनांक २७ मे १९४९ रोजी केलेले आहे.

या कादंबरीत व्यक्ती आणि विश्व, आत्म्याची अनुभूती, पापाचा प्रश्न, व्यक्तीचा प्रश्न, कर्मरूपाने साक्षात्कार, अनंताचा साक्षात्कार, सौंदर्य रूपाने साक्षात्कार या प्रकरणात त्यांचा समावेश केला आहे.

या कादंबरीत संस्कृतीचा विचार त्यांनी मांडला असून, भारतीय आणि पाश्चिमात्य संस्कृतीत मूलतः भेद आहे. भारतीय संस्कृतीत ऋषीला विशेष महत्त्व आहे. त्यांनी अद्वैती विचार मांडले; तर ख्रिस्त, बुद्ध यांनीही या विचाराला महत्त्व दिले असे ते मानतात. भारतीय संस्कृतीत अद्वैतासाठी आत्मिक ज्ञानाची उपासना केली जाते. म्हणूनच रवींद्रनाथ टागोर आत्मिक ज्ञान व आत्मिक आनंद देणाऱ्या व्यक्ती आणि विश्व यांच्या संबंधाकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोन व्यक्त करतात, तर आत्म्याची अनुभूती या प्रकरणात प्रेमाने माणूस सर्वात्मकता अनुभवतो, तर अहंकार हा मोक्षाच्या मार्गातील अडथळा असून अविद्या, अज्ञान यांपासून मुक्ती म्हणजे मोक्ष असे विचार ते मांडतात. यातून ते व्यक्ती वैयक्तिक सुखात रमतो तेव्हा स्वतःपुरते पाहतो; पण तो विश्वकल्याणाचा विचार करतो, तेव्हा तो सर्वांचा असतो. येथे वैयक्तिक कल्याणापेक्षा विश्वकल्याणाचा विचार ते व्यक्त करतात. मानवी दुःखाचे कारण वासना आहे.

यातून त्याला बाहेर पडता येत नाही. म्हणून तो परमात्म्याशी समरस झाला. मानवजातीवर व भारतभूमीवर प्रेम करणाऱ्या परमेश्वराला ते मानतात, तर पाश्चात्त्यांना परमेश्वर हा विचार मान्य नाही. भारतीय संस्कृतीत परमेश्वराला महत्त्व आहे. तर 'पापाचा प्रश्न' या प्रकरणात ते पाप म्हणजे अपूर्णता, अज्ञान; अज्ञानावर मात केली की, ज्ञानाचा प्रकाश प्राप्त होईल. वात्सल्य, सहानुभूती, प्रेम, कृतज्ञता, सुंदरता यांनी पापावर विजय मिळविता येतो. आपण स्वार्थीपणाने वागतो, परंतु नैतिक भूमिकेचा स्वीकार करताना जीवनातील सुख–दुःख आपण सहज विसरतो. 'व्यक्तीचा प्रश्न' या प्रकरणात व्यक्तीचे विशिष्टत्व आणि विश्वात्मक रूप ते व्यक्त करतात. स्वतःचे विशिष्टत्व प्रकट करूनच आपण जगाचे होतो. म्हणून आपले विशिष्टत्व प्रकट करून विश्वसंगीताचा आपण स्वीकार केला, तर तात्त्विक इच्छा व सामाजिक इच्छा यांचा समन्वय साधता येतो. व्यक्तीजवळील सामाजिक तत्त्वे हे मानवी विकासाचे महत्त्वाचे साधन आहे. व्यक्तीचे प्रश्न सोडविण्यासाठी सामाजिक घटकांचा विचार करावाचा लागतो, तर 'कर्मरूपाने साक्षात्कारात' कर्म हे विकासाचे साधन आहे. मनातील कर्म व बाह्यकर्म यांचा सहकार असल्याशिवाय आनंद, प्रेम समाधान वाटत नाही. आंतरिक व बाह्य कर्माने जीवनात आनंदाची निर्मिती होते. पाश्चात्त्य देशांत कर्मावर भर आहे. पण भारतीय संस्कृती आंतरिक कर्माला महत्त्व देते. मानव जातीचा इतिहास कर्मातून विकासाकडे जाण्याचा आहे. कर्म हेच मुक्तीचे साधन ते मानतात. कर्माच्या माध्यमातून स्वतःच्या शक्तीचा, भावनांचा प्रत्यक्ष साक्षात्कार करून घेतल्याशिवाय समाधान मिळत नाही.

रवींद्रनाथ टागोर यांच्यावर तत्त्वज्ञानाचा प्रभाव जाणवतो. तसेच आंतरबाह्य व्यक्तिमत्त्वाला महत्त्व देऊन विश्वकल्याणाचा विचार ते मांडतात. खरेतर संतांनी केलेले कार्यही समतेचा, समानतेचा, विश्वात्मकतेचा, जातीपातीच्या बंधनाचा विचार न करता सकारात्मक झुकलेला दिसतो. बौद्ध, लोकायत, कबीर त्यांचे विचारही मानव कल्याणाचा विचार करणारे आहेत. हाच धागा रवींद्रनाथ टागोर यांच्या 'साधना' कादंबरीत अधोरेखित झाला आहे.

**२. बाराबास :**

पार लँगरव्हिस्ट यांच्या 'बाराबास' या नोबेल पारितोषिक मिळालेल्या स्वीडिश कादंबरीचा बा. भ. बोरकर यांनी अनुवाद केला. दिनांक ७ जून १९५१ ते १६ जुलै १९५२ या कालावधीत 'साधना' साप्ताहिकात नियमित अनुवाद प्रकाशित झाला आहे. ही १३२ पानांची

मूळ कादंबरी आहे. या कादंबरीतील नायक हा कोणी महापुरुष नसून एक दरोडेखोर आहे. त्याच्या जीवनाचे मार्मिक चित्रण कादंबरीत आलेले आहे. या कादंबरीचा नायक 'बाराबास' हा खुनी डाकू आहे. ज्या दिवशी येशूला फाशी दिली. त्याच दिवशी रोमन सण असल्याने फाशीची सजा झालेल्या एका कैद्याला माफी दिली होती. तेव्हा लोकांनी येशू ख्रिस्ताऐवजी बाराबासला फाशी मिळावी, अशी मागणी करतात. येथे कथेला सुरुवात होते. येशूचे बलिदान बाराबास डोळ्यांनी पाहतो. येशू ख्रिस्ताच्या जीवनाबद्दल तो निर्णय घेऊ शकत नाही. ईश्वराचा पुत्र फाशी जातो. ही गोष्ट बाराबासला चमत्कारिक वाटते. पण त्याला ख्रिश्चनांबद्दल एक प्रकारचे आकर्षण वाटते. ओठ फाटलेल्या मुलीचे बलिदान तो पाहतो तेव्हा त्याचे मन दरोडेखोरीतून उडते. गुलाम म्हणून राहत असताना त्याची साहाक नावाच्या गुलामाशी मैत्री होती. साहाकला ख्रिश्चन धर्ममतांचा अभिमान असतो. त्याच्या गळ्यात असणाऱ्या गुलामाच्या बिल्ल्यावर पाठीमागे तो येशू ख्रिस्त ही अक्षरे कोरून घेतो. नित्य मार खात तो प्रार्थना करतो. शेवटी ख्रिश्चन धर्मासाठी तो प्राणत्याग करतो. त्याच्या प्राणत्यागाचा बाराबासच्या जीवनावर खोल परिणाम होतो. साहाकच्या मृत्यूनंतर बारबासला एकाकी वाटू लागते. एकंदरीतच माणसाच्या आयुष्यात वेगवेगळ्या वळणांवर भेटलेली माणसे व घडलेल्या घटनांचा सकारात्मक परिणाम होतो. पण दरोडेखोर असणाऱ्या या नायकाला आयुष्याच्या शेवटी एकाकीपणाची जाणीव होते. त्याचबरोबर जन्मतःच कुणी चोर वा दरोडेखोर नसतो. त्याला परिस्थिती तसे वर्तन करायला भाग पाडत असते. परिस्थितीच वाल्याचा वाल्मीकी बनवत असते. माणूस हा संस्कारप्रिय प्राणी आहे. त्याला बऱ्या–वाइटाची जाण असतेच. त्याच्यातल्या सहजप्रवृत्तीही त्याला बाबी सुचवत असतात. आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब नकळतपणे आपल्यावर पडते आणि त्यातून सकारात्मकतेकडे वळणारा हा नायक आहे.

## ४.३२ नाटक :

'साधना' साप्ताहिकातून सानेगुरुजीलिखित 'नवमंगल प्रभात' या मूळ बंगाली नाटकाच्या आधारे लिहिलेले 'नवमंगल प्रभात' हे नाटक ७ मे १९४९ ते २८ मे १९४९ या कालावधीत क्रमशः प्रसिद्ध झाले होते. या नाटकातून जमीनदार व शेतकरी यांच्यातील संघर्षाचे चित्रण आले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या स्वातंत्र्याकडून शेतकऱ्यांच्या अर्थात सर्वसामान्य माणसांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी नवतरुण पिढीने सामाजिक बदल स्वीकारले.

समाजातील प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या मालकीची जमीन, सरकारी यंत्रणेतील भ्रष्टाचार, भ्रष्टाचाराला खतपाणी घालणारे पोलीस अधिकारी, मुनीमजी, जमीनदार, गोपाळराव, रावसाहेब यांसारख्या व्यक्तिरेखा या नाटकात आहेत. शोषित समाजातील सर्व जाती–धर्मांच्या लोकांनी एकत्र येऊन बंडाची भाषा बोलणारे शेतकरी, शशांक, शशांकची आई, प्रवीर, प्रभा, रहीम, पाटील, अंमलदार या व्यक्तिरेखा आहेत. प्रचलित समाजव्यवस्थेला धक्के देऊन सामाजिक प्रबोधन करून जमीनदार व गोपाळराव यांचे विचार, मत परिवर्तन घडवून आणतात. या नाटकातील शशांकची आई ही भारतमातेचे प्रतीक असून, या नाटकातील इतर व्यक्तिरेखा/पात्र ही भारतातील विविधतेचे दर्शन घडवितात. भारतातील राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविण्यासाठी प्रांतभेद, जातिभेद, भाषाभेद विसरून एकत्र येणे आवश्यक आहे. भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी १९४२च्या चले जाव चळवळीत सहभागी झालेल्या लोकांच्या आहुतीमुळेच भारत आज स्वातंत्र्याची गोड फळे चाखू लागला आहे. यासाठी राष्ट्रसेवा दलाने नव विचारांचा स्वयंस्फूर्त स्वीकार केला. मुंबईचे कामगार, समाजवादी पक्ष, गुजराती/मराठी प्रांतभेद न करता इतर जातीय पुढाऱ्यांचे न ऐकता, काँग्रेसलाही दूर करून सोशॅलिस्ट पार्टी गरिबांची पार्टी म्हणून आपले नेतृत्व निर्माण करीत आहे. एवढेच नाही, तर भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर महात्मा गांधीजींनी आपल्या प्राणाची आहुती दिली. त्याची जाणीव येथील हिंदू, मुसलमान, शीख, ख्रिस्ती, पारशी यांना व्हावी. कारण ही भारतमातेची लेकरे आहेत. ही भारतमाता म्हणजे जगाचे प्रतीक आहे. 'सर्वांना एकत्र नांदविणे म्हणजे धर्म' अशी धर्माची साधी व्याख्या सानेगुरुजी करतात.

नाटकाच्या शेवटी लेखक अर्थात सानेगुरुजी म्हणतात, ''भारताला भांडवलशाही किंवा हुकूमशाहीची गरज नाही; तर व्यक्तीला शक्य तितके स्वातंत्र्य देणारा समाजवाद हे भारताचे ध्येय. महात्मा गांधीजींच्या या भूमीत रक्तपात न होता श्री. जयप्रकाशांसारखे धीरोदात्त नेतृत्व मिळाले. तर नक्कीच विजयी होऊ. हा आशावाद ते व्यक्त करतात. भारतात जर नवसमाजाची स्थापना झाली. तर वर्गहीन समाजाची निर्मिती होईल. या समाजात सारे श्रम करणारे, ज्ञान–विज्ञानाचे उपासक, कलेचे अभ्यासक असून, तेच खऱ्या अर्थाने मानव संस्कृतीचा विकास घडवतील. अशा या विशाल संस्कृतीचे दृश्य त्यांच्या दृष्टीस पडते. नाटकाच्या अखेरीस ते म्हणतात, ''वेडे! अरे, लाखोंची साधना फुकट जाईल? भारताची भक्ती। ती आता कोणीही

हिरावू शकणार नाही. कारण ही मुक्ती ना एका वर्गाची, ना एका जातीची; ना एका प्रांताची, ना एका धर्माची. ही मुक्ती ३० कोटी भारतीयांची आहे. आलेले स्वातंत्र्य सर्वांच्या मालकीचे; ते सारे मिळून सांभाळतील. मला तर आशा वाटत आहे आणि ती अमर आशा तुम्हाला देऊन मी जात आहे. हा रहीम, हे पाटील, हा संतू, सारी श्रमणारी जनता माझ्या या बाजूला आणि इकडे प्रभा, तू प्रवीर, जमीनदारांची शिकली–सवरलेली तुम्ही मुले, येथे तुम्ही सारी एकत्र आला आहात आणि तुमच्या या प्रेमळ मेळाव्यातच माझे स्वप्न मला फलद्रूप झालेले दिसत आहे. येथे हिंदू आहेत मुसलमान आहेत, शोषित आहेत आणि शोषण करणारी आणि सर्वांच्या मध्ये माझी प्रेममयी राजराजेश्वरी आई। जणू भारतमातेचे भव्य प्रतीक माझ्या आईच्या रूपाने मला दिसत आहे आणि तिची सारी लेकरे भेद विसरून, द्वेष विसरून, समता स्थापायाला जणू एकत्र आले आहेत. ती पाहा भविष्याची हाक मला ऐकू येत आहे. ती नवमंगल प्रभात.''[४३]

उपरोक्त संदर्भातून आपणास 'स्थापण्या समता शांती ठेवूनी शुद्ध साधना, करिता साधना त्यांना ठेवो उत्स्फूर्त साधना.' 'साधना' साप्ताहिकाचे 'ब्रीद' या नाटकाच्या अखेरीस आठवण येते.

सामाजिकदृष्ट्या समता स्थापण्यासाठी आपआपसांतील वैरभाव विसरून आपण सर्व या भारतमातेची लेकरे आहोत, ही भूमिका घेऊन समाजपरिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहे. त्यासाठी शिक्षित पिढीने पारंपरिक विचाराला नकार दिला आहे. कसेल त्याची जमीन, विनोबा भावे यांनी या कालखंडात राबविलेल्या भूदान चळवळीचाही या नाटकातून विचार मांडला आहे. नाशिक जिल्ह्यातील भाऊसाहेब हिरे यांनी कूळ कायद्याचा प्रश्न ज्या पद्धतीने हाताळला तशाच प्रश्नांची चर्चा या नाटकातून झालेली दिसते. सानेगुरुजींनी लिहिलेले हे तीन अंकी नाटक असून, या नाटकातील प्रमुख पात्रे शशांक, शशांकची आई, प्रभा, प्रवीर ही असून या नाटकातील इतर व्यक्तिरेखा जमीनदार, गोपाळराव, पाटील, रहीम, फौजदार, अंमलदार ही आहेत. पहिल्या अंकात एकूण चार प्रवेश, दुसऱ्या अंकात चार प्रवेश व तिसऱ्या अंकात पाच प्रवेश आलेले आहेत. या नाटकातील शशांक हे पात्र येथील बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करते. सामाजिक प्रश्न मार्गी लावण्यासाठी तो प्रसंगी तुरुंगात जातो. पण सर्वसामान्य माणसाला त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीवही करून देतो. या अन्यायातून बाहेर पडण्यासाठी प्रभा व प्रवीर या व्यक्तिरेखा समाजवादी विचार मांडतात व आपल्या

भूमिकेवर ठाम राहून गोपाळराव व जमीनदार यांचे मतपरिवर्तन घडवून आणतात. शशांकची आई ही उदात्त विचारांची, पण अन्यायाची जाणीव असणारी सधन कुटुंबातील विधवा स्त्री असून, मानवतेच्या हक्कासाठी शशांकच्या पाठीशी ठामपणे उभी राहते. फौजदार, शेतकरी, रहीम, अंमलदार, मुनीम या व्यक्तिरेखा नाटकाची गरज म्हणून या नाटकात आलेल्या आहेत.

## ४.३३ 'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झालेले पत्रलेखन :

'साधना' साप्ताहिकातून ना. ग. गोरे यांचे शुभास पत्र, सानेगुरूजी यांचे सुंदर पत्रे (सुधास पत्र) दादासाहेब मावळकरांची प्रवास पत्रे, साखळकर गुरुजींचे पत्र, संजीस पत्रे या शीर्षकाखाली प्रकाशित झालेली आहेत.

### १. श्री. साखळकर गुरुजी व प्रभाकर यांची सुंदरपत्रे :

श्री. साखळकर गुरुजी व प्रभाकर यांच्यातील पत्रव्यवहार आपल्या पुत्राला पाठविलेली पत्रे आहेत. ही पत्र म्हणजे पिता–पुत्र यांचा सुंदर सांस्कृतिक पत्रव्यवहार असून, असे पत्रलेखन आपल्याकडे उपलब्ध नाही. साखळकर गुरुजी प्रभाकरला पत्र लिहीत आणि प्रभाकरही वडिलांना तुरुंगातून उत्तर पाठवी. त्याची उत्तरेही सरस व रमणीय आहेत. ही पत्रे 'साधना' साप्ताहिकात प्रकाशित झाली. पुढे पत्रे पुस्तकरूपाने प्रकाशित होणार असून, पुस्तकास श्री. नानासाहेब गोरे यांची प्रस्तावना मिळणार आहे, असे 'साधना'चे संपादक सानेगुरुजी यांनी ११ सप्टेंबर १९४८ ला प्रकाशित झालेल्या 'सुंदर पत्रे' या सदरात स्पष्ट केलेले आहे.

११ सप्टेंबर १९४८ ला 'सुंदर पत्रे' या सदरात साखळकर गुरुजींनी आपल्या मुलाला अर्थात प्रभाकरास लिहिलेल्या या पत्राची सुरुवात वंदे मातरम्, राजापूर दिनांक ७/८/१९४४ सोमवार रात्रौ चि. भाई यास या मायन्याने होऊन पत्राच्या आशयात गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर यांचा स्मृतिदिन, श्री. आरोग्यानंद भारती (डॉ. बापू गोखले), चि. अक्का तेंडुलकर, पू. अप्पासाहेब यांची माहिती येते. या विषयाच्या अनुषंगाने त्यांचे विचारही आले आहेत. साखळकर गुरुजींनी लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त दिलेल्या भाषणाची माहिती सांगून श्रावण महिन्यातील व्रतवैकल्याची माहिती देताना 'मंगळागौर' या सणाबद्दल अक्का तेंडुलकर यांच्या सांगण्यावरून 'मंगळागौरीची पूजा व महिलांचे कर्तव्य' या विषयावर त्यांनी संसार आणि देशकार्याचे व्रत सहज साध्य करता येईल, या विषयांवर मार्गदर्शन केले. रोज रात्री प्रार्थनेनंतर लहान मुलांना गोष्टी सांगणे, या विषयावर पत्रातून लेखन केलेले दिसून येते. याच पत्रात

धर्माबद्दलचे विचार मांडताना पू. अप्पासाहेब लिहितात, ‘परमेश्वर एकच आहे; शनि–राहूसारखे ग्रह यांना देवत्वाचा बिलकूल अधिकार नाही. ते घरी येताना दिसले; तर जप, दान वगैरे काही न करता त्यांना काठ्यांनी, मुसळ्यांनी झोडपून काढा. यात हिंसा नाही का होत? मी काहीसे विनोदाने विचारले, ते मग पाहू असे झटकन उत्तर देऊन त्यांनी आपली सरबत्ती चालू केली. यावरून धर्माच्या नावावर चाललेल्या या बाह्य अवडंबराची त्यांना किती चीड आहे, हे स्पष्ट दिसून आले. खरेच धर्माच्या शेतात भरारलेले अनेक विधरान उपटून काढणे किती अगत्याचे झाले म्हणूनच राजकारणाइतकेच धर्मकारण व समाजकारण आज निकडीचे झाले आहे.’’[४४]

यावरून अप्पासाहेबांचे, धर्म, राजकारण या विषयांच्या मताबरोबरच धर्माच्या नावाखाली चाललेल्या अवडंबरावर त्यांनी कडाडून हल्ला चढविला आहे, तर ९ ऑक्टोबर १९४८च्या ‘सुंदर पत्रे’ या सदरात आलेल्या सौ. आते पत्र हे प्रभाकरने तुरुंगातून लिहिलेले पत्र आहे. हे पत्र २ ऑक्टोबर १९४३ला नाशिक रोड सेंट्रल प्रिझन येथून लिहिलेले असून पत्राच्या सुरुवातीला ‘वंदे मातरम्’ या शब्दाने सुरुवात केली आहे. हे त्यांनी लिहिलेले पहिले पत्र असून, यातून पुरुष आणि स्त्रिया यांच्या स्वभावातील बारकावे, दुसऱ्यांच्या आनंदात सुख मानणारी स्त्री, त्यांची कर्तव्यतत्परता, मुलांप्रती नवऱ्याप्रती तिच्या असणाऱ्या भावना व्यक्त केल्या आहेत. तुरुंगात विरंगुळ्याचे एक साधन म्हणजे पत्र. या पत्रांतून आनंद, समाधान मिळते. या पत्रांत त्यांनी स्त्रिया व पुरुष यांच्यातील मूलभूत फरक अधोरेखित केला आहे. ‘आठ दहा दिवस एकही पत्र मिळालं नाही की, इथला माणूस बेचैन होतो. मग बायका वर्षानुवर्षे एका छोट्याशा घरट्यांत जणू स्वत:ला कोंडून घेतात. त्या कोणत्या शक्तीच्या जोरावर? पुरुषाच्या अंत:करणात सहसा न तरंगणारा असा कोणता उत्कट, उन्माद स्त्रियांच्या रोमारोमांत खिळलेला असतो की, ज्याच्या जोरावर त्या एक प्रकारच्या जिवंत समाधीतही हसतमुख राहतात कोणास ठाऊक?’’[४५]

यावरून निसर्गातच स्त्री–पुरुष यांच्या स्वभावातील भिन्नता तत्त्वाचे बारकावे यात टिपलेले असून, स्त्री पुरुषापेक्षा कणखर असते, हे जणू लेखकाला पत्राच्या माध्यमातून सांगायचे आहे.

साखळकर गुरुजी आणि त्यांचा मुलगा प्रभाकर यांनी लिहिलेली काही पत्रे सप्टेंबर १९४८ ते ऑक्टोबर १९४८ या कालावधीत 'साधना' साप्ताहिकातील 'सुंदर पत्रे' या सदरात प्रकाशित झालेली आहेत.

## २. सानेगुरुजी यांनी सुधाला लिहिलेली सुंदर पत्रे :

'सुंदर पत्रे' या सदरात सानेगुरुजी यांनी साधनेच्या ५२ आठवड्यांची ५२ पत्रे येणार असल्याचे मत व्यक्त केले आहे.' या पत्रांतून निसर्ग दिसेल. मानव येईल, गंमत येईल.''[४६]

दिनांक ११ जून १९४९ ते १० जून १९५० या कालावधीत सानेगुरुजींनी सुधाला लिहिलेली पत्रे 'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित करण्यात आली आहेत. पहिल्याच पत्राची सुरुवात पहिले पत्र, जयहिंद, दिनांक २२ मे १९४९ चि. प्रिय सुहास प्रेम आशीर्वाद अशी सुरुवात आली असून, पत्राचा शेवट तुझा अण्णा अशी होते. या पत्रात दर आठवड्याला पत्र पाठविण्यास सुधा अण्णांना सांगते. त्यावरून अण्णा सुधाला पत्र पाठवून आपली खुशाली कळवितात. त्याचबरोबर आपल्या अवतीभवतीच्या घडामोडीही पत्रलेखकाने कळविल्या आहेत. त्यात सुधा परीक्षेत फार अभ्यास न करता पास होते. सायकल चालविण्यास शिकते. गोदावरी बाळंत झाली का?, त्याची चौकशी करतात. तिची कामाबद्दलची निष्ठा ते व्यक्त करतात. पाऊस पंधरा-दिवस आधीच येतो, त्याची विचारपूस करतात. शेतात घाम गाळणे, मृग, रोहिणी नक्षत्रांची माहिती, पावसाळ्याच्या दिवसांत महिलांच्या जबाबदारीची माहिती, खेड्यातील ऐक्याचे चित्र, वसंत ऋतूत झाडांना नवी पालवी फुटणे, कोकिळेचे ओरडणे, वातावरणातील उकाड्यामुळे सापाचे फिरणे, पावसाळ्यात या सरपटणाऱ्या प्राण्यांच्या बिळात पाणी गेल्यामुळे होणारी अडचण, पावसाळ्यात घराबाहेर पडताना सावध बाहेर पडण्याची सूचना, उन्हाळ्यात झाडांना पान नाही. पण वेगवेगळ्या रंगांची, आकारांची असंख्य फुले आपल्या दृष्टीस पडतात. चाफा, बकुळ, सोनचाफा या निसर्गातील वैभवाची माहिती दिली आहे. याशिवाय जीवनोपयोगी वस्तूंची निर्मिती या कालखंडात कशी केली जाते, याची माहितीही या लेखात आलेली आहे. याचे वर्णन करताना ते लिहितात, ''गोवे, कारवार इकडे झापाच्या घोंगडीची खोळ डोक्यावर घेऊन मग पावसात कामाला जातात. रत्नागिरी, कुलाबा जिल्ह्यांत इरली, लहानपणी आजोबांबरोबर मीही इरली विणीत असे. बांबूचा सांगाडा करून मिळाला की पळसाची, धामची वगैरे पाने घालून इरले शिवायचे. काही लोक किती नक्षीदार करतात. सुधा लहान लहान

वस्तूही कलात्मक करायला आम्हाला शिकायचे आहे. जपानी लोक साधे मडके, साधी कपबशी, साधी चटई, साधा पंखा या साध्या साध्या वस्तूही सुंदर नि सुबक करतील. आपली कला श्रीमंती वस्तूंत आहे. मोठी मंदिरे, ताजमहाल, हिऱ्या–सोन्याचे दागिने यांत कला आहे. परंतु लहानशी झोपडीही कलात्मक बांधीन, लहान मडके तेही सुंदर असेल. बांबूचा पंखा परंतु तोही कलात्मक करीन ही दृष्टी नाही. नवभारतात कलेचे हे व्यापक सर्जन व्हायला हवे आहे. कलेची दृष्टी घेऊन सर्वत्र उभे राहिले पाहिजे.''[४७]

यातून लेखकाचा आजूबाजूच्या कलात्मक वस्तूंकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यातील बारकावे, कलेविषयीची आस्था, तिचे संवर्धन करून हा वारसा पुढील पिढीकडे हस्तांतरित करण्याचा विचार ते अतिशय समर्पक शब्दांत मांडतात.

दिनांक ९ जुलै १९४९च्या सुंदर पत्रात लहान मुलांना नावीन्याची आवड असते. ते सातत्याने नवीन शब्द शिकून व्यवहारात वापरतात. तसेच पावसाळ्याचे दिवस सुरू होऊनही पाऊस पडत नाही, तेव्हा शेतकऱ्यांची होणारी उलघाल. पाऊस नाही म्हणून काम नाही. पावसाळ्यात जळणासाठी लाकूड नाही. घरात शिजवायला अन्न नाही, म्हणून वणवण ओले भारे घेऊन फिरणाऱ्या बायका दिसतात. इतकेच नाही तर ग्रामोद्योगीचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनविले पाहिजे. गांधीजींच्या खादीचे, सूतकताईचे काम करू लागले; तर निश्चितच त्याचा फायदा होईल. ग्रामोद्योग व यंत्रोद्योग जपानी लोकांनीच करावे. आपल्याकडे पावसाला देव म्हणण्याची प्रथा दिसून येते. तसेच कालिदासाच्या मेघदूताची आठवण होते. ''वृक्षांनो, पल्लवांवर प्रेम असूनही जी तोडीत नसे ती शकुंतला आज सासरी जात आहे. तिला आशीर्वाद द्या.'' आषाढाचा पहिला दिवस, पावसात भिजल्यावर अंगावरचे घामोळे जातात. म्हणून गोविंद भटजींचा वामन अंगणात नाचत होता. पावसाळ्यात कोकणातील घरात साप प्रवेश करतात. साप मारण्याच्या पद्धतीची माहिती देतात. भागवत धर्माची पताका घेऊन पंढरपूरला संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत निवृत्तीनाथांची पालखी येते; तर सज्जनगडावरून समर्थांच्या संप्रदायाला धारकरी म्हणतात. हे दोन्ही संप्रदाय एकमेकांना पूरक आहेत. वारकरी संप्रदायाचे व समस्त महाराष्ट्रीयन जनसंघटनेचा मुका अध्यक्ष म्हणजे पंढरपूरचा विठोबा. या विठोबाला भेटायला येणारे भक्तही आपले दु:ख विठोबापाशीच व्यक्त करतात. या विठ्ठलाच्या चरणीलीन होणारी सर्व संतमंडळी मानवतेचा संदेश देतात. ''नवीन निष्ठा द्यायची असेल, तर ती त्यागानेच

देता येईल. पंढरपूरला एकदा एक वेश्या कन्या आली. बादशहाचे तिच्यावर प्रेम. ती म्हणाली, ''पांडुरंगाला भेटून येते'' आणि देवाच्या चरणावर डोकं ठेवते! असा त्याग पंढरपूरला ओतला गेला. यातून कान्होपात्राची ईश्वरभक्ती ते मुलांवर रुजवितात. परंपरा उगीच नाही सुरू होत. कुत्र्यासही तूप देऊ पाहणारे नामदेव, कोठारे लुटणारे दामाजी, विष्णुमय जगत पाहणारे संत तुकाराम ते शांतिसागर एकनाथ आणि ती ज्ञानवैराग्याची मूर्ती नामदेव, सर्वांची पुण्याई पंढरपूरला ओतलेले लाखो लोक तेथे जातात. त्यांच्या श्रद्धेला हसू नका. तुम्ही त्यांच्यात मिसळा, नवीन विचार द्या; परंतु ते मानवधर्माचे. मारामारीचे, कत्तलीचे नका देऊ. संतांनी मानवधर्म दिला म्हणून ग्यानबा–तुकाराम हीच महाराष्ट्राची दैवते राहिली. हेच राष्ट्रपुरुष म्हणून महाराष्ट्र ओळखतो. कारण त्यांचा संदेश सकळ मानवांना सुखी करण्यासाठी होता.''[४८]

उपरोक्त संदर्भातून संतांचे कार्य, संतांची शिकवण, समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, जात–पात, मानवधर्म या संबंधीचे विवेचन असून, या पत्रात आषाढ महिन्यातील बारकावे लेखक टिपतात.

तर १८ जून १९४९ च्या पत्रात विद्यार्थ्यांनी परीक्षेत नापास झाल्यावर आत्महत्या करणे हे योग्य नाही. याउलट परीक्षेत नापास झाल्यावर त्याच्यातील कौशल्यविकासावर भर देऊन जीवनोपयोगी शिक्षण द्यावे. इतकेच नाही तर 'नापास' म्हणून बघण्यापेक्षा सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा. खिलाडूवृत्तीचा स्वीकार करावा. वाई येथील गंगेच्या उत्सवाच्या निमित्ताने त्यांना जगन्नाथ पंडितांची आठवण येते. या प्रसंगी गंगा भगीरथाने पृथ्वीवर आणली. तिच्या काठी असणाऱ्या ऋषींनी गंगास्तोत्र लिहिले. या निमित्ताने आलेली ही आठवण  गंगालहरी, पीयूषलहरी हे जगन्नाथ पंडिताने लिहिलेल्या स्तोत्रांमुळे संस्कृत भाषा सुंदर आहे. हे समजते. पंडित, अकबर शहाजहान यांच्या समकालीन. अकबराने आपल्या मुलीवर कविता करण्यास सांगितले. जगन्नाथाने लगेच कविता केली. त्याला मागणं मागा असं म्हटल्यावर जगन्नाथाने 'ही मुलगी मला द्या' आणि जगन्नाथाने मुसलमान मुलीशी विवाह केला. म्हणून समाजाने बहिष्कार टाकला. जग्रनाथ पंडित शेवटी गंगेच्या तीरावर तंबू ठोकून राहू लागला. अशा या जगन्नाथाला हिंदू धर्मात मान नव्हता. मुसलमान धर्मातही मान नव्हता. त्यांनी गंगालहरी स्तोत्र लिहिले. त्यांनीच साहित्यशास्त्रावर रसगंगाधर नावाचा ग्रंथ लिहिला. एवढेच नाही तर, ते संस्कृतचे महत्त्व अधोरेखित करतात. मृग नक्षत्राच्या निमित्ताने पावसाळ्यात भिजलेली जांभळे, करवंदे, अळू ही

फळे बाधतात हे आयुर्वेदाचे ज्ञान ते देतात. त्याचप्रमाणे घराच्या आजूबाजूला वेगवेगळ्या फळबिया लावून त्यांना शेणखताचा वापर करावा. याचा अर्थ सेंद्रिय पद्धतीने शेतीला प्रोत्साहन देण्याचे ते काम करीत होते. उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष असते. झाडांना पाणी मिळावे म्हणून गळती लावली जाते. यातून पाण्याचा अल्प वापर करण्याचे तंत्र ते शिकवितात. तसेच तगर, मोगरा या फुलांतील बारकावेही ते टिपतात. दिनांक १६ जुलै १९४९च्या पत्रात सानेगुरुजी ऑगस्ट महिन्यातील बारकावे टिपतात. वृक्षारोपण दिन सर्वत्र पाळण्याचा ते आग्रह धरतात. एखादा विचार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असते. जसे झाड लावल्यानंतर त्याची निगा राखावी लागते. तसाच एखादा विचार पेरल्यावर त्यांची वारंवार उजळणीही महत्त्वाची असते. झाडांवर कावळ्याचे घरटे, चिमणी, साळुंखीचे घरटे यांतील बारकावे ते टिपतात. लहान मुले पक्ष्यांची घरटी पळवितात. पण ही गोष्ट पैगंबरला अजिबात आवडत नाही. सलीम अली यांचे पक्षी निरीक्षण जसे आपणास माहीत आहे, तसेच के. के. मेनन आणि वाय. के. मेनन हे दोन राजकैदी पण. के. के. मेनन यांचा पक्ष्यांचा अभ्यास होता. हिवाळ्यात अनेक पक्षी देशांतर करतात. अडुळसा ही औषधी वनस्पती; पण मर्क नावाच्या कंपनीने अडुळशाच्या पानांपासून खोकल्याचे औषध करून जगभर पाठविली. घरातील वडीलधाऱ्या व्यक्तीने लहान मुलांशी कसे वागावे, या संदर्भात ते लिहितात, ''अरुणा काय म्हणते? ती पपीच्या पाठीवर बसून तिचा घोडा घोडा करते की नाही? आता खूप बोलते होय ना?'' 'थांब हो, खरंच' हे शब्द मोठ्या ठसक्यात बोलते म्हणून ते लिहिलेस. परंतु तिला भीती नका शिकवू बाऊ येईल. नीज, असे नका म्हणू. दुसरे काही म्हणा, लहान मुलांना भीती घालू नये, तसेच त्यांना रागे भरू नये. थोडे रडू दिले तर चालेल. लहान मूल या अफाट जगात येऊन उभे राहते! ते प्रेम, माया, सहानुभूती यांचे भुकलेले असते. लहान मुलाला कोणी बोलले, कोणी मारले तर त्याला काय बरे वाटत असेल? एवढासा मी लहान जीव? या जगात आलो का हे मला बोलतात, मारतात? ''[४९]

यावरून सानेगुरुजी यांच्या मनात मुलांवर संस्कार करताना त्यांची नाजूक कोमल मने दुखावणार नाहीत, याची काळजी घ्यावी. हेच जणू त्यांना या पत्रातून सुचवायचे आहे.

दिनांक २८ जानेवारी १९५०च्या सुंदर पत्रात गुजरातमधील पतंग उडविण्याची प्रथा, पुणे, बडोदा, गुजरात या ठिकाणी पतंग उडविण्याची प्रथा आहे. कुठे संक्रांतीला, तर कोठे

नवरात्रीत. जपानमध्ये तर जणू राष्ट्रीय खेळ. बेंजामिन फ्रँकलिनने आकाशातील वीज पतंगाच्या द्वारेच अनुभवली. माणसाच्या जीवनात ज्याप्रमाणे आधार हवा, निष्ठा हवी; तरच तो उंच भरारी मारू शकतो. पतंगालाही दोरीचा आधार हवा असतो, तरच तो उंच आकाशात झेपावतो.

दिनांक २६ जानेवारी १९५०ला भारताची नवी राज्यघटना अमलात येणार असून, भारत स्वतंत्र लोकसत्ताक राष्ट्र म्हणून घोषित करणार होते. आजपर्यंत राजे–महाराजे यांची सत्ता देशात होती. पण आता ३५ कोटी जनतेचे राज्य येणार आहे, याचे वर्णन ते करतात, आज देश पूर्णपणे स्वतंत्र झाला असून, भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी १८५७चे स्वातंत्र्ययुद्ध, वंगभंगाची चळवळ, गदर चळवळ, होमरुल लीग चळवळ, असहकार चळवळ, मुळशीचा सत्याग्रह व बार्डोलीचा लढा, तीस–बत्तीस सालचे लढे, चले जाव लढा, नेताजींचा आझाद हिंदू सेनेमार्फतचा भव्य संग्राम, नाविकांचे बंड हे सर्व भारतीयांना तीर्थक्षेत्र आहेत. लहान मुला–मुलींची बलिदाने, महात्मा गांधीजींचे भारतीय स्वातंत्र्याच्या, समाजसुधारणेच्या, शिक्षणाच्या, स्वदेशीच्या चळवळीतील योगदान आपण विसरता कामा नये. स्वतंत्र भारतातील मुलांची जबाबदारी ते अधोरेखित करताना लिहितात, 'तुम्ही आता स्वतंत्र राष्ट्रातील मुले. तुमच्यावर मोठी जबाबदारी आहे. नवीन राष्ट्र बसवायचे आहे, नवीन मन नसेल तर नवीन राष्ट्र कसे होईल? आपण नव्या कालखंडात जात आहोत. जेजे जुने झाले, निरुपयोगी झाले, जे संकुचित आहे, क्षुद्र आहे ते ते तुम्ही दूर भिरकावून दिले पाहिजे.'[५०]

वरील संदर्भावरून भावी पिढीकडून असलेल्या अपेक्षा ते व्यक्त करतात. उद्याच्या भारताचे भविष्य हे मुलांच्या हाती आहे. हेच जणू त्यांना सांगायचे आहे. इतकेच नाही तर या देशात पैगंबर, विवेकानंद, नेताजी, महात्मा गांधीजी यांचेही योगदान महत्त्वाचे आहे. साहित्याच्या क्षेत्रात राम गणेश गडकरी त्यांची नाटके व कविता आपल्याला खूप काही सांगून जातात. याच लेखात ते सुधाला निसर्गातील बदलाप्रमाणे शेतातील काजूच्या झाडाला आलेली फुले, त्यामुळे शिमग्याच्या महिन्यात पिकलेले काजू खाण्याची संधी उपलब्ध होईल. याचबरोबर पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी हजारो झाडे लावली पाहिजेत. नाहीतर येणारी पिढी आळशी बनेल. वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन यांसारख्या उपक्रमात मुलांनी सहभागी होण्याचे आवाहन ते करतात. मोठ्या माणसांनी सांगितलेली कामे करण्याची सवय असावी. इतकेच नाही तर आपल्यामधील वेगवेगळ्या कलाकौशल्याला वाव दिला जावा. दिनांक १ एप्रिल १९५० च्या

सुंदर पत्रात सानेगुरुजींनी सुधाला ब्राह्मण समाजात होणाऱ्या मुंजीचे महत्त्व सांगून त्यावर होणाऱ्या अनावश्यक खर्चाला कात्री लावून पायबंद घातला पाहिजे. या पैशांचा उपयोग शैक्षणिक कार्यासाठी व्हावा म्हणून महाराष्ट्र विद्यापीठास जर पैसे दिले; तर एक लक्ष रुपये मिळतील. विवेकानंदाच्या शिष्या भगिनी निवेदिता नेहमी म्हणत, ''हिंदुस्थानला अनाठायी दिडकी खर्चायचा अधिकार नाही. क्षण फुकट दवडायचा अधिकार नाही.'' याच शब्दांत पैशाचे महत्त्व ते विशद करतात. भारत ज्ञानोपासना करणारा व्हावा. प्राचीन काळी आश्रम व्यवस्था होती. येथे शिक्षणासाठी येणारा विद्यार्थी हा राजाचा मुलगा की रंकाचा, सर्वांना समान वागणूक होती. त्याचप्रमाणे विद्याग्रहण केल्यावर आपापल्या ऐपतीप्रमाणे गुरूला दक्षिणा देण्याची पद्धती होती. तीच आजच्या काळातही असावी, असा विचार ते मांडतात. रामनवमी, हनुमान जयंती, यांसारखे उत्सव साजरे करण्याची पद्धती व त्यातून ध्येय व ध्येयासाठी धडपडणारा जीव निर्माण व्हावा, हा दृष्टिकोन ते व्यक्त करतात. जीवनात मार्कांच्या मागे न लागता परमोच्च शिखर गाठण्याची धडपड करावी. जैन धर्माची स्थापना करणारे महावीर व बुद्ध समकालीन, पण दोघांनी आपल्याला मिळालेल्या सुखाचा त्याग करून अहिंसेचा महान संदेश जगाला दिला. चैत्र महिन्यातील चैत्रगौर, आंब्याची डाळ, पन्हे, कलिंगड, हरभारे व भुईमुगाच्या दाण्यांनी ओटी भरण्याची पद्धत, नारळाची खिरापत, गाणी म्हणून चैत्रगौर किंवा वसंतोत्सव साजरा केला जातो. हे महिलांचे संमेलनच होय. वसंत ऋतूचे वैभव रानावनात हिंडून समजून वर्डस्वर्थ कवी म्हणतो ''The World is too much with us'' माणसाने स्वच्छंदी असावे. पण रोजच्या जीवनात छोट्या छोट्या गोष्टींत अडकून पडल्यामुळे आपल्याला जीवनाचा आनंद नीट घेता येत नाही. तर ८ एप्रिल १९५० च्या अंकात सानेगुरुजी त्यांच्या बालपणातील आठवणी सुधाला सांगतात. या वर्षी पालगडला रामनवमीचा उत्साह नव्हता. ही प्रगती की पुच्छगती. त्या वेळी कथा, कीर्तन, नाटक, मेळा, गोफ यात्रा म्हणजे गावात केवढे चैतन्य होते. लहानपणी नाटकात काम केल्याचे सांगून गावात एकाच नावाचे व आडनावाचे अनेक लोक असल्यामुळे गोरा विष्णू, काळा विष्णू, बाबाजी विष्णू अशी नामाभिधाने होती, तर कोकणात फणसाचे विविध पदार्थ बनविले जातात उदा. उकडगरे, फणसाचे पापड, तर आंबा, आंब्याचा मोसम वैशाखातच सुरू होतो. अक्षय तृतीयेला आंबा पिकतो. लहानपणी आंबे गोळा करण्यासाठी मांडवावर चढणे, मांडवावरून पडणे इ. उपद्व्यापही त्यांनी केले. एवढेच नाहीतर अण्णा भांडकुदळ होते. इतर

भावंडे व अण्णा एका बाजूला, अनेक झाडे परसात असूनही आंबे पडले की ते गोळा करण्याची स्पर्धा लागायची. याच दिवसांत रामफळ व पपनस व लवाचे फळ. लवाचे फळ म्हणजे गुलाबी भगवे, आंबट गोड लागते. ते ३५ वर्षे खाल्ले नाही याचाच अर्थ लवाचे फळ नामशेष होत आहे, हे सांगून त्याच्या संवर्धनाची गरज व्यक्त करतात. तसेच लहान मुलांना काही ना काही देण्याची वृत्ती घरातील वडीलधाऱ्यांजवळ असली पाहिजे. ते म्हणतात, ''मुलांना रिक्त हस्ते भेटायला जाणे म्हणजे अरसिकपणाचे लक्षण होय''– तर विविध आजारांमध्ये लसीकरणानंतरही मृत्यू होतो. हे बर्नार्ड शॉसारखा विश्वविख्यात पंडित टोचाटोचीच्या विरुद्ध होते. तर महात्माजी निसर्गोपचार बरा असे म्हणत. इतकेच नाहीतर एखाद्याला पडसे जरी आले, तरी डोस पिणारे लोक आहेत. याच पत्रात त्यांच्या बालपणातील पीतांबरभाईचे व्यक्तिमत्त्व ते अल्प शब्दांत साकारतात. जुनी माणसं करारी पण प्रेमळ होती, हेही सांगण्यास ते विसरत नाहीत. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय ऐक्याची भावना निर्माण करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी कला संवर्धनाची गरज व्यक्त करतात. महान शिक्षणशास्त्रज्ञ त्रिजूभाई, रवींद्रनाथ मुलांबरोबर नाटकात काम करायचे, शाळेतील निवडणुकांचाही ते आवर्जून उल्लेख करतात. कारण यातून विद्यार्थ्यांना निवडणुकांची माहिती मिळते. अशा छोट्या छोट्या गोष्टींतून विद्यार्थ्यांना समाजात वागण्याची दिशा मिळते.

हरिभाऊ आपटेंची उषःकाल, 'पण लक्षात कोण घेतो' ही पुस्तके वाचावीत. लोकमान्य टिळक, हरिभाऊ यांना पुस्तकांचे वेड होते. तसेच ती व्यवस्थितही ठेवता आली पाहिजेत. या मोठ्या लोकांकडे नीटनेटकेपणाचा गुण होता. तसाच साने गुरुजींच्या आईकडेही होता. आई त्यांना म्हणे, तू व्यवस्थितपणाची उपासना कर. सारे काम स्वच्छ व नीटनेटके करावे. अव्यवस्थितपणा हा आपला राष्ट्रीय दुर्गुण आहे. तो घालवला पाहिजे. व्यवस्थितपणा म्हणजे सुंदरता. कोणतेही काम वेळच्या वेळी करणे, कोणतीही वस्तू नीट जागेवर ठेवणे, पैशांचा व्यवस्थित हिशेब ठेवणे, दिलेल्या शब्दाप्रमाणे वागणे, तिकीट रांगेत नीट उभे राहून घेणे, रांगेत उभे राहून बसमध्ये शिरणे, शेकडो गोष्टींमुळे व्यवस्थितपणाची, नीटनेटकेपणाची सवय अंगीकारली, तर ती आयुष्यभर उपयुक्त ठरते. याच लेखात शिमग्याच्या सणाची माहिती येते. रंगपंचमी हा लहानपणीचा खेळ तर शिमग्याच्या सणाला साखरेच्या माळा खाऊ घालण्याची प्रथा मुंबई–पुण्याकडे आहे. पण कोकणात तशी प्रथा नाही. रामनवमीला गावात साखरेची

दुकाने येत. यात साखरेच्या विविध वस्तू असत. तशीच पद्धती गुढी पाडव्याला देशावर आहे. होळीत नारळ टाकण्याची प्रथा, त्यामुळे कधी कधी आजूबाजूचा परिसर पेटत असे, तर सुधाचा वाढदिवस १८ मार्चला आहे. त्यांनी तिच्यासाठी 'झरणी' पाठवली आहे, तर करंजांच्या बियांपासून तेल काढून त्याचा उपयोग दिव्यांसाठी करतात. इतकेच नाहीतर खरजेवर, गुरांच्या किवणांवर ते वापरल्यावर जखम बरी होती हे पारंपरिक ज्ञान ते सहज उलगडतात. तर ३ जून १९५० च्या 'सुंदर पत्र' या लेखात सानेगुरुजी सुधाला धारवाडची सफर घडवून आणतात. हुबळी, उटकमंड, मर्कारा या शब्दांची उत्पत्ती सांगतात. कन्नड साहित्यिकांत कवी बेंद्रे यांचे चरित्र सांगून त्यांच्या लघुकथा कन्नड भाषेत लोकप्रिय आहेत. येथील हवामान थंडगार आहे. पण उन्हाळ्यात येथे पाण्याचे फारच दुर्भिक्ष आहे. म्हणून पाण्याची व्यवस्था तेथील नगरपालिकेने करावी. पाणी, गटारे, रस्ते यांचे जाळे निर्माण झाले, तर शहराचा विकास झपाट्याने होईल. हेच सांगत असताना बाळ्याकाकांची आठवण त्यांना होते. ते सहजसुंदर रीतीने बाळ्याकाकाचे व्यक्तिचित्र रेखाटतात. बाळ्याकाकांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे वरून फणसासारखे काटेरी; पण आतून आंब्यासारखे गोड होते, तर भगीरथीबाईंनी 'वनिता-सेवा समाज' ही संस्था १९२८ साली स्थापन करून ४० मुलींच्या शिक्षणाची सोय सातवीपर्यंत केली. येथे मुलींना जीवनोपयोगी शिक्षण देऊन स्वावलंबनाचे धडे गिरवतात. त्यांनी या पत्रात कृष्णेच्या डोहात सुसरीचा वावर असल्याचेही नमूद केले आहे. आजही या बातम्या वर्तमानपत्रात येतात. यावरून वर्तमान परिस्थितीचे त्यांचे निरीक्षण व्यक्त होते. तसेच साने गुरुजींना आपल्या मित्रांच्या अपेक्षा पुऱ्या करता येत नाही. यांसारखे दुःख नाही. ही खंतही ते या पत्रात अधोरेखित करतात. जणू त्यांनी भविष्याचा वेधच या वाक्यातून घेतला आहे. तर १० जून १९५०च्या 'सुंदर पत्रे' या सदरात सानेगुरुजी बाळू तात्यांचे निधन, त्याच वेळी बयोआतेला स्वतःच्या गरिबीत आपल्या आश्रयाला ठेवून बहिणीला व तिच्या मुलांना आधार देणारा बाळूतात्या त्यांना आठवतात. कर्नाटकातील भ्रमंतीचे ते वर्णन करताना गदगचे, भीष्माच्या पादुकांचे स्थान, त्रिकुटेश्वराच्या भोवतालचे आवार, तर वीरनारायण मंदिरातील एका खांबाजवळ बसून कुमार व्यास नावाच्या कन्नड कवीने आपले कन्नड भारत रचिले. येथे ते संत ज्ञानेश्वरांनी जसे पैस खांबाला टेकून ओव्या रचल्या, तसेच हा कुमार व्यासाचा खांब, धारवाड, गदग, हुबळी, महाकवी बेंद्रे, अरविंद पंथी, म्हैसूर, श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराची ५७ फूट

उंच मूर्ती, कर्नाटकातील काही भाग सुपीक, तर काही दुष्काळी आहे. दुष्काळावर उपाययोजना करण्याचे ते ठरवतात. आचार्य भागवत, नानासाहेब गोरेंच्या शुभा यांचीही आठवण ते या लेखात काढतात. या पत्राचा शेवट करताना ते लिहितात, ''सुधा, मी तुला जवळजवळ गेले वर्षभर दर आठवड्यास पत्र लिहीत आहे, परंतु हे आजचे हे शेवटचे साप्ताहिक पत्र, आता तुला मी केव्हा तरी अधूनमधून लिहीन. परंतु आता बंधन नको.''[५१]

यातून त्यांना कुठेतरी आपल्या आयुष्याचा शेवट सुचवायचा आहे असे वाटते. एकूण ५२ पत्रे व्हायची. परंतु बेचाळीसच झाली. ही पत्रे पुस्तक रूपाने प्रकाशित व्हावीत म्हणून 'साधना' साप्ताहिकातील ही सुंदर पत्रे तीन भागांत प्रकाशित झालेली आहेत. एवढेच नव्हे; तर या पत्रांमुळे त्यांनी आनंद उपभोगला, कधी उचंबळलो, गहिवरलो. कधी सृष्टीत रमलो, कधी गतस्मृतीत रमलो. तुझ्यामुळे मला हे सुख लाभले. म्हणून तुला सारे श्रेय असे म्हणतात. त्यांच्या सुंदर पत्रांचे श्रेय ते आपली पुतणी सुधाला देतात.

सानेगुरुजींनी सुधाला लिहिलेल्या पत्रवाङ्मयात प्रामुख्याने कोकणातील निसर्ग, निसर्गरम्य वातावरण, कोकणी बोलीभाषा, जुने सण–उत्सव, खेळांचे चित्रण, व्यक्तिचित्रण, सहज सुंदर व ओघवती भाषाशैली आहे. याशिवाय साने गुरुजींची भ्रमंती, विविध विषयांवरील वाचन, चिंतन, मनन, भेटलेल्या व्यक्ती, भाषांतरित साहित्य, प्राचीन हिंदू संस्कृती, झाडांची, फुलांची, फळांची, प्राण्यांची माहिती, हिंदू संस्कृती यांचीही माहिती मिळते. ही सुंदर पत्रे वाचत असताना सहज एखाद्या घटनेचा, पुस्तकाचा, लेखकाचा संदर्भ सांगून जातात. त्यामुळे हे पत्रलेखन अधिक वाचनीय झाले आहे. ह्या पत्रांतून बालसुलभ वृत्ती, शैशवास जपणारे व त्या गुणांची जोपासना करणारे सानेगुरुजी व सुधा यांच्यातील पत्रसंवादातून वाचकांना जाणवते.

### ३. ना. ग. गोरे यांनी शुभास लिहिलेली पत्रे :

'मुलांच्या मेळाव्यात' या सदरात दिनांक १ जानेवारी १९४९ला शुभास पत्र– लेखक ना. ग. गोरे अहमदाबाद दिनांक १३/९/१९४८ च्या पत्राची सुरुवात 'शुभाताई– भावनगरहून ९ तारखेला मी तुला जे पत्र लिहिले' या वाक्याने होते. ना. ग. गोरे यांनी कन्या शुभास या पत्रातून अहमदाबाद परिसराचे वर्णन केले आहे. कच्छ, सौराष्ट्र, श्रीकृष्णाची सोन्याची द्वारका, सौराष्ट्राच्या पश्चिमेस, गझनीच्या महंमदाने फोडलेले सौराष्ट्राचे सोमनाथ मंदिर येथे सर्वसामान्य माणूस मागासलेला असून जातिभेद पाळला जातो. इकडील लोकांच्या पोषाखांबद्दल ते

लिहितात, ''इकडच्या शेतकरी, धनगर, रजपूत वगैरे लोकांचे पोषाख मोठे गमतीदार झोंकदार व लफ्फेदार असतात! पुरुष अंगात जाकिटासारखा कपडा घालतात. पण त्याला खाली परकरासारखा चुणीचा घेरा लावलेला असतो. रजपुतांच्या डोक्यावर रंगीबेरंगी शिडकावाचे साफे बांधलेले असतात. हे पाहिले की, मला आपल्या परसांतल्या गुलबक्षीच्या फुलांचीच आठवण होई! धनगर बायका घरीच कातलेल्या लोकरीच्या कांबळ्यासारख्या साड्या नेसतात! उन्हाळा असो नाहीतर थंडी त्यात बदल नाही. एवढे अवजड वस्त्र त्यांना कसे आवरते देव जाणे! पण त्या लोकरीच्या वस्त्रावर कशिदाकाम मात्र असे भरगच्च नि सुबक केलले असते की पाहत राहावे. काही बायकांच्या डोईवरच्या पदरावर आरसे भरलेले कशिदाकाम पाहून तर मी चकित होऊन गेलो. डोक्यापासून खालपर्यंत सुटलेल्या पदरावरच्या काठांतले आरशांचे भरतकाम उन्हात लकाकले की मला नक्षत्र माळेची आठवण व्हावयाची! इकडचे शेतकरी स्त्रीपुरुष चांगले उंच व कणखर दिसले. सातारा, कोल्हापूरकडील माणसेच आपण पाहत आहोत की काय असाही मला भास झाला. मातीची चिलीम, फलाटावर बसलेले बायका-पुरुष अगदी मोकळेपणाने पिताना पाहून मी मनात म्हटले- पृथ्वीच्या पाठीवर दुसऱ्या कोठल्या देशांत आहे आणि हिंदुस्थानात नाही अशी एकदेखील गोष्ट किंवा चाल असेल की काय शंका आहे.''[५२]

यावरून सौराष्ट्रामधील शेतकरी, धनगर, व रजपूत यांच्या पेहरावातील बारकावे टिपून स्त्री-पुरुष समानता येथे नांदते हे लेखक या पत्रातून मुलीला कळवितात. तर १८ मार्च १९५० च्या 'सुंदर पत्रे' या सदरात साधनेतील नेहमीच्या पत्राऐवजी या वेळेस श्री नानासाहेब गोरे यांनी लिहिलेले हे अतिसुंदर पत्र देण्यात आले आहे. या पत्रात मुंबई ते दिल्ली प्रवासातील अनुभवांबरोबर दिल्लीतील विविध ठिकाणांचे दर्शनही लेखकाने घडविले आहे. लेखकाला लहान मुलाप्रमाणे कोळशाचे इंजिन पाहण्याची हौस. कोळशाचे इंजिन व विजेचे इंजिन यातील फरक सांगितला आहे. पुणे-मुंबई प्रवासातील अनुभवाचे वर्णन करताना 'कशासाठी पोटासाठी खंडाळ्याच्या घाटासाठी' हे गाणे त्यांना आठवते. प्रवासातील निसर्ग, शेती, अफूची फुले, पळसाच्या फुलांच्या गर्द कोयऱ्या यांचे दर्शन घडते. तर दिल्लीत रेल्वे पोहचल्यावर श्री शंकरराव देव, मामासाहेब देवगिरीकर, भाऊसाहेब हिरे यांची भेट होते. दिल्लीतील भ्रमंतीत त्यांना बादशाही थाटांचे रस्ते, फुटपाथ यांची तुलना ते जंगलीमहाराज रस्त्याशी तर दिल्ली दरवाजाची तुलना करताना त्यांना शनिवारवाडा आठवतो. शनिवारवाड्यापेक्षाही मोठा आहे इतकेच नाही,

तर दिल्लीतील वास्तव्यात त्यांना गांधीजींची चिता ज्या ठिकाणी रचली त्या राजघाटापासून राजेंद्रप्रसादापर्यंतची अनेक दृश्ये त्यांच्या नजरेसमोर उभी राहिली. तसेच येथील वास्तव्यात महाराष्ट्रीयन माणसे, त्यांची मुले सहज हिंदी भाषा बोलतात याचेही त्यांना आश्चर्य वाटते.

'पाऊस आला' हे ना. ग. गोरे यांनी शुभास लिहिलेले पत्र असून, ते कोकणात गेले असताना अचानक वातावरण बदल होतो आणि आकाश निळ्याशार ढगांनी भरून जाते. पावसाळ्याचे ढग नसतानाही पावसाळी वातावरण तयार होते. म्हणून कोकणातील पावसाला कोकणाचे वैभव असे मानतात. हिंदुस्थानातील पहिल्या पावसाचा मान कोकणालाच मिळतो, असे लेखक म्हणतात.

मानवाची दृष्टी ही निसर्गाने दिलेली सुंदर देणगी आहे. या दृष्टीने निसर्गाला आपल्यात सामावून घेत असतो. निसर्गाची सुंदरता न्याहाळीत असतो आणि प्रत्येकाला निसर्गाची अत्यंत ओढ असते. निसर्गाचे महत्त्व लेखक त्यांच्या दृष्टिकोनातून आपल्याला समजावून सांगत असतो. वारा, पाऊस, सावली माणसाच्या मनाला प्रफुल्लित करतात. यातून निसर्गाच्या सौंदर्याची प्रचिती होत असते. निसर्ग आपल्याला आनंद, समाधान देऊन जातो. उन्हाळ्याच्या शेवटच्या दिवसांत जमीन तापून निघते. रानमाळ पूर्णपणे भाजते आणि त्या भाजणाऱ्या, भेगा पडलेल्या जमिनीला पाण्याची गरज असते. जमिनीला पडलेल्या भेगा आ वासून उभ्या राहतात.

आभाळात ढग दाटून आल्यानंतर त्या पावसाला जशी जमिनीची ओढ असते. तसेच मानवाला पावसाची ओढ असते. मृगनक्षत्रात पडलेला पहिला पाऊस हा आनंददायक आणि आल्हाददायक असतो. जमिनीत पडलेल्या पावसाच्या थेंबांनी जमीन तृप्त होते आणि त्या मातीच्या सुगंधाने मन प्रफुल्लित होते.

संवेदनशील मनाने निसर्गाचा घेतलेल्या आस्वादाचे चित्रण करताना ते लिहितात– ''दोन–तीनचा सुमार असेल, एकाएकी वारे उठले, टोपलीचे झाकण उघडताच फणा काढून नाग बाहेर यावा. तसा वारा फुस्कारत बाहेर पडला आणि बेगुमान वाहू लागला. माडा पोफळींना कळेना की आपले माथे कोणत्या दिशेला झुकवावे. आंब्यांच्या फांद्या करकरूं लागल्या आणि अजूनहि कोठे कोठे चिकटून राहिलेली गेल्या हंगामातली वठलेली पाने आंब्या–फणसावरून खळाखळ गळू लागली. वर मेघांची प्रचंड दंगल सुरू झाली आणि अंमळशाने ताशाच्या चामड्यावर काठी तडतडावी तसे पावसाचे टपोरे थेंब पानावर, कौलांवर, जमिनीवर तडतडू

लागले. धरित्रीच्या पोटात जणू या क्षणाचीच वाट पाहत जे जे सुगंध होते ते उचंबळून वर आले आणि त्या सुगंधांनी नाकपुड्या भरून जाताच गोठ्यांतली गुरे आनंदून जाऊन 'हम्बे' करून ओरडू लागली, दाव्याला ओढ घेऊ लागली, हुंकारू लागली. जणू तो म्हणत होता ''आला! पाऊस आला!''[५३]

प्रस्तुत लेखातून निसर्गात झालेल्या बदलाचे चित्रण केलेले आहे. या अशा ललित लेखनातून निसर्गाकडे बघण्याची दृष्टी बदलून जाते. पावसाचे सौंदर्य इतक्या सहजतेने आणि सौंदर्यरूपी मनाने लक्ष वेधून घेतलेले दिसते. ना. ग. गोरे यांनी पावसाची संकल्पना सुंदर रीतीने, सौंदर्यात्मक पद्धतीने स्पष्टपणे उलगडून दाखवली आहे.

या पत्रात लेखकांनी निसर्गातील सुंदरता अचूकपणे टिपलेली आहे. आभाळात जसे निळेशार ढग डोलताना दिसतात, जसे टोपलीचे झाकण उघडताच फणा काढून बाहेर यावा तसा वारा फुस्कारत बाहेर पडला आणि बेगुमान वारा वाहू लागला. यातून शब्दांची सहजसुंदर गुंफण करतात.

लेखक कोकणातल्या पावसाचे अनुभव सांगताना म्हणतात– पावसाची जोराची सर आल्यानंतर आंब्याच्या फांद्यांचा करकर असा आवाज येताच निसर्गातील एक वेगळ्याच संगीताची लय सुरू झाली. या आंब्याच्या पानांची सळसळ आणि फणसांची पाने खळाखळा गळू लागली. लेखक या ललित पत्रातून पावसाचे मर्म जाणून घेण्याचा प्रयत्न करतात, पाऊस जेव्हा जमिनीवर पडतो तेव्हा ताशाच्या चामड्यावर काठी तडतडावी, तसे पावसाचे टपोरे थेंब जमिनीवर पडू लागले. तेव्हा धरित्री आपल्या पोटात पाणी सामावून घेऊ लागली. जणूकाही धरित्री या क्षणांचीच वाट पाहू लागली.

ना. ग. गोरे यांनी 'पाऊस आला' या पत्रातून निसर्गाचे आणि पावसामुळे बदलेल्या वातावरणाचे चित्रण रेखाटलेले आहे. या दोन–तीन पत्रांतून आपणास ना. ग. गोरे यांची लेखनशैली, परिसराचे वर्णन, बारकावे, सौंदर्य टिपण्याचा त्यांचा दृष्टिकोन, निसर्ग–व्यक्तिचित्रण या लेखनातून सहज निदर्शनास येतो.

### ४. श्री. दादासाहेब मावळकरांची प्रवासपत्रे :

श्री. दादासाहेब मावळकर पार्लमेंटरी परिषदेस परदेशात जातात. या निमित्ताने दिनांक ६ नोव्हेंबर १९४८ ते दिनांक २२ जानेवारी १९४९ या कालावधीत लिहिलेली सर्व पत्रे साधनेत

प्रकाशित झाली. त्यांच्या पत्नीची सौ. मावळकरांची तीन पत्रेही 'साधना'त प्रकाशित करण्यात आली आहेत. त्यांची पत्नी, घरी मुलांसाठी निराळी पत्र पाठवीत नसत. या पत्रावरच त्या आपली सही करून 'मम' असे म्हणत. परंतु मुलांच्या हट्टाखातर त्यांनी मुलांना तीन पत्रे लिहिली आहेत. त्यांच्या ह्या पत्रांचा यामध्ये आढावा घेण्यात आला आहे. दिनांक ६ नोव्हेंबर १९४८ च्या दादासाहेबांच्या प्रवासपत्रात स्वित्झर्लंड येथील धीरूभाई व मधुरीबेन (हिंदी वकील) यांच्याबरोबरच्या स्वित्झर्लंडमधील प्रवासात त्यांना स्वच्छता, टापटीप, मेहनत व प्रामाणिकपणा या गोष्टी जाणवल्या. यानंतर 'Bears park' बेअर्स पार्क या ठिकाणी असणारी अस्वले, रोझ गार्डन येथील घड्याळाचा व्यवसाय, पार्लमेंट हाउसचे दर्शन, जीनिव्हा, अमेरिकन एक्स्प्रेस नावाची टूरिंग एजन्सी यांचा आढावा घेऊन या प्रवासात स्विस शेतकरी, त्यांचे पोशाख, पट्टे पाहून कौतुक वाटले. येथील शेतकरी गोभक्त असून येथे गाईच्या दुधापासून लोणी, क्रीम या वस्तू बनविल्या जातात. येथील डोंगराचा नयनमनोहर देखावा पाहिला. तीनमजली होस्टेल पाहिले. या प्रवासात त्यांनी स्वित्झर्लंडमधील वेगवेगळ्या ठिकाणांना भेटी देऊन तेथील वैशिष्ट्ये, वेगळेपणा याची माहिती या प्रवास पत्रात आलेली आहे. दिनांक २० नोव्हेंबर १९४९चे पत्र बर्निंग हॉम ग्रेड हॉटेल येथून लिहिले आहे. या पत्रात बेकेलाइट येथील कारखाने, कॉन्व्हेन्ट्री येथील कारखाने, दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने ते जमीनदोस्त केले. येथील प्रवासात अर्ल ऑफ वॉरविक हा किल्ला पाहिला. त्यांचे संवर्धन कसे केले जाते याची माहिती ते देतात. खऱ्या अर्थाने दादासाहेब मावळकरांची पत्रे म्हणजे ऐतिहासिक भेटीतील, प्रवासातील अनुभवकथन आहे असे वाटते.

अशाप्रकारे पत्रलेखन या शीर्षकाखाली आलेल्या सर्व पत्रांतून वाचकांना निर्मळ असा आनंद मिळतो. निसर्गचित्र, चित्रमयशैली, छोटी–छोटी वाक्यरचना, प्रादेशिक बोली, पर्यावरण संवर्धन, ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन, भारत व भारताबाहेरील ठिकाणांची माहिती, मानवी स्वभावाचे विविध पैलू यांच्या अभ्यासाबरोबरच हिंदू धर्म, संस्कृतीचे बारकावेही या पत्रात टिपलेले आहेत. नक्कीच ही पत्रे वाचकांना उद्‌बोधक ठरतील.

## ४.३४ आंतरभारती–प्रांतभारती :

''मी जीवनाचा नम्र उपासक आहे, जीवनात जे जे सुंदर आणि मंगल आहे. ते अधिक सुंदर करण्यासाठी मी सदैव तत्पर आहे, असे म्हणणारे सानेगुरुजी मुळात शरीर पुरुषाचे, पण

हृदय मात्र स्त्रीचे असे होते. अशा हृदयाने, विचाराने जगाकडे, समाजाकडे पाहणारे सानेगुरुजी समाजाचे होणारे अध:पतन पाहून व्यथित झाले. 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' म्हणत एक वेगळे पसायदान सृष्टीला मागू लागले. यातून सगळा समाज एकसंध व्हावा. जात, धर्म, स्पृश्य–अस्पृश्यता, भेदाभेद गळून पडावेत आणि एकसंध निरोगी समाजाचा उदय व्हावा. ज्यात प्रेम, त्याग, समर्पण, राष्ट्रप्रेम, राष्ट्रगीत, समता, स्वातंत्र्य ही मूल्ये रुजवावीत अशा अनेक भावना घेऊन सानेगुरुजी जगत होते. हा सगळा देश एक असून एकसंध राहण्यासाठी ते सतत प्रयत्नशील होते. यातूनच त्यांची प्रांतभारती किंवा आंतरभारती ही संकल्पना उदयाला आलेली दिसते. यामधून माणसाचा प्रवास माणसापासून माणसापर्यंत व्हावा. हे हृदयीचे त्या हृदयी सुख–दु:ख कळावे आणि प्रेम हे मूल्ये शाश्वत असून, ते टिकविण्याची वाढविण्याची जबाबदारी समाजातील प्रत्येक व्यक्तीची आहे. गांधीजींचा वारसदार म्हणून जेव्हा आपण सानेगुरुजींकडे पाहतो तेव्हा अहिंसा हे मूल्य साने गुरुजींच्याही ठायी होते हे दिसून येते. अखंड भारत या दृष्टीनेही प्रांतभारती व आंतरभारतीचा विचार सानेगुरुजींनी केला असावा. असेही कधी कधी वाटते. या संदर्भात वसंत बापट यांनी साने गुरुजींचे आंतरभारतीविषयीचे मत पुढील शब्दांत मांडले आहे,'' 'आपल्या समाजाचे कोणत्याही कारणाने तुकडे पडू नयेत. आपणास शेवटी विश्वात्मकतेकडे जावयाचे आहे.' असे ते म्हणत. जातीयता जशी वाईट तशी प्रांतीयताही आपणास मारक ठरेल, ही त्यांची खात्री. सन १९३० सालापासूनच सर्व प्रांतांतील सांस्कृतिक एकता व्हावी, सर्व भाषा भगिनींनी सलोख्याने नांदावे, एकमेकांत देवाणघेवाण करावी, प्रांतीय विद्वेष नाहीसा व्हावा यासाठी झटण्याचे त्यांनी ठरविले होते. भाषावार प्रांतरचनेवर मिषाने संकुचित प्रांतीयता बोकाळू लागली हे पाहताच गुरुजींनी प्रांतभारती किंवा आंतरभारतीची कल्पना समाजासमोर मांडली.''[५४]

उपरोक्त संदर्भावरून सानेगुरुजींना आंतरभारतीची कल्पना कशी सुचली ह्याचे विवेचन वसंत बापट यांच्या वरील विवेचनातून येते, दिनांक १५ ऑगस्ट १९४८ला 'साधना' साप्ताहिकाच्या स्वरूपासंदर्भात सानेगुरुजी लिहितात, 'निरनिराळ्या भाषांतील मौल्यवान प्रकार येथे प्रेमाने ओळख करून देण्यात येईल. देशातील नि जगातील नाना संस्कृतीचे रंग नि गंध तुम्हाला दाखवण्यात येईल. नाना धर्मांतील सुंदरता, उदात्तता यांची भेट होईल.'[५५]

या स्वरूपावरून 'साधना'तून प्रांतभारती व आंतरभारती विषयाची स्पष्ट कल्पना सानेगुरुजींनी करून दिली होती. आचार्य भागवत आंतरभारतीच्या कार्याचे तीन भागांत विभाजन असावे असे म्हणतात. या संदर्भात ते लिहितात, ''महाराष्ट्रांतल्या प्रमुख अशा ८ ते १० ठिकाणी आंतरभारती मंडळे निर्माण करून त्यामध्ये भारतीय भाषांपैकी २/३ भाषांचा तरी अभ्यास करण्याची व्यवस्था करता येईल. महाराष्ट्रीय साहित्यप्रेमी मंडळीत भारतीय भाषा जाणणारे लोक आहेत. त्यांचे सहकार्य मिळवून भाषा अध्ययनाला उत्तेजन देता येईल. काही खास व्यक्तींची निवड करून विशिष्ट भारतीय भाषांचा विशेष अभ्यास करण्यासाठी परप्रांतात पाठविण्याचेही काम करावे लागेल. अशा रीतीने महाराष्ट्रांत भिन्न-भिन्न भारतीय भाषा उत्तम जाणणारे, त्या-त्या भाषा शिकवू शकणारे, त्या भाषांतून मराठीत व मराठीतून त्या-त्या भाषांत निवडक साहित्याचा अनुवाद करू शकणारे असे समर्थ कार्यकर्ते तयार करणे.''[५६]

भारतीय भाषेतील प्राचीन व अर्वाचीन निवडक साहित्याचा अनुवाद करून आंतरभारती प्रकाशन सुरू करावे. आंतरभारतीच्या मदतीने विविध भागांतील भिन्न भाषिक साहित्यिकांचे साहित्य मराठीत आणणे व मराठीतील साहित्य अन्य भाषांत अनुवाद करून परस्परांमध्ये स्नेहभाव वाढीस लागावा, हे आंतरभारतीचे कार्य असेल, असे स्पष्ट मत आचार्य स. ज. भागवत मांडतात.

सानेगुरुजींनी रवींद्रनाथांच्या विश्वभारतीपासून प्रेरणा घेतली असून, विश्व आणि भारत यांच्या परस्पर सहकार्याने चालविलेली संस्था म्हणजे विश्वभारती. ''आंतरराष्ट्रीय स्नेहभाव निर्माण करण्यासाठी जशी विश्वभारती, तशीच भारतातील प्रांतांना परस्पर स्नेहभाव निर्माण करणारी प्रांतभारती, असा गुरुजींचा आशय होता. पण सानेगुरुजींनी अखेरच्या लेखात प्रांतभारतीऐवजी आंतरभारती हा शब्द वापरला. आंतरभारती हा शब्द वापरण्यामागे साने गुरुजींचा दृष्टिकोन भारतातील अंतर्गत, राज्य, लोक यांच्यात परस्पर स्नेहभाव निर्माण करणारी संस्था ती आंतरभारती''[५७]

उपरोक्त संदर्भावरून असे निदर्शनास येते की, सानेगुरुजींना आंतरभारतीची कल्पना रवींद्रनाथ टागोरांच्या विश्वभारती या संकल्पनेतून मिळाली होती. आंतरराष्ट्रीय स्नेहभाव निर्माण करणारी जशी विश्वभारती होती. तशीच भारतातील विविध प्रांतांतील स्नेहभाव निर्माण करणारी ती आंतरभारती अथवा प्रांतभारती या सारखी संस्था निर्माण केली. भाषिक आदानप्रदान

घडवून आणण्याची कल्पना १९३० साली त्रिचन्नापल्ली येथील तुरुंगात असताना त्यांना सुचली व 'साधना' साप्ताहिकाच्या पहिल्याच अंकात त्यांना ही कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याची संधी या 'साधना' साप्ताहिकाच्या निमित्ताने वाचकांना उपलब्ध करून दिली.

**४.३४.१ आंतरभारतीची आजची स्थिती** :

सानेगुरुजी १९३० साली त्रिचनापल्ली तुरुंगात असताना त्यांचा भाषातज्ज्ञांशी संबंध आला. अनेक भाषांचे वैभव जाणून घेण्यासाठी प्रांतिक भेद मिटवून आपण सारे एक आहोत. ही जाणीव निर्माण होण्यासाठी सर्वांना सर्व भाषा यायला हव्यात. पण अशी कोणतीही संस्था कार्यरत नव्हती. त्यातून त्यांना आंतरभारती/प्रांतभारती ही कल्पना सुचली. त्यांच्या मृत्युपश्चात ही जबाबदारी यदुनाथ थत्ते यांनी स्वीकारली. सध्या सदाविजय आर्य हे जबाबदारी पार पाडत आहेत. सानेगुरुजींनी अस्पृश्यांना पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून उपोषण केले होते. हे उपोषण १० मे रोजी यशस्वी झाले. देशातील वेगवेगळ्या प्रांतांतील संस्कृतीची ओळख व्हावी. तेथील जीवनपद्धती जाणून घ्यावी. या उद्देशाने १० मे रोजी आंतरभारतीची राष्ट्रीय बैठक आयोजित केली जाते. या दिवसाचे औचित्य साधून भारतातील एका राज्यात पर्यटन आयोजित करतात. आजपर्यंत हा आंतरभारती दिवस मध्य प्रदेश, आसाम, कर्नाटक, गोवा, गुजरात, उत्तर प्रदेश, केरळ या ठिकाणी राष्ट्रीय बैठकीचे आयोजन करून साजरा करण्यात आला. आंतरभारतीमध्ये आज धर्म, जात, पंथ, लिंग, भाषा व आर्थिक यांतील भेद मिटवून आम्ही सारे भारतीय आहोत, या भावनेने राष्ट्रीय पातळीवर एकत्र येऊन काम करतात. यात श्रमसंस्कार, छावणी, बाल आनंद महोत्सव, युवक स्नेहमिलन, गुजरात शिक्षण, संदर्शन यात्रा, प्रकृती परिचय, सागर परिचय, हिमालय परिचय, सायकल यात्रा, युवक नेतृत्व शिबिर, रक्त सहयोग विद्यालय प्रकल्प, कथाकथन, भाषा परिचय वर्ग, हिंदी, मासिक, विवाह (आंतरजातीय, आंतरप्रांतीय, आंतरधर्मीय) गांधीजींची १५० वी जयंती असे आंतरभारतीचे कार्यक्रम राबविले आहेत. या उपक्रमात सहभागी होण्याची इच्छा असणाऱ्यांनी १०००/– रुपये देऊन आजीवन सदस्यत्व स्वीकारता येते. या उपक्रमात आंतरभारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष सदाविजय आर्य यांचे योगदान अमूल्य आहे.

### ४.३४.२ आंतरभारती या सदराखाली प्रकाशित झालेले साहित्य :

'साधना' साप्ताहिकातून ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालावधीत प्रकाशित झालेले 'विश्वभारती' आणि 'आंतरभारती' या शीर्षकाखाली पुढील लेखन आलेले दिसून येते. आचार्य काकासाहेब कालेलकर– पायेचलार पथ (लिपिका) रवींद्र मनन– काकासाहेब कालेलकर (क्रमशः) (१४ जुलै १९५१), रवींद्र मनन (१७ मार्च, १४ जुलै, १५ सप्टेंबर आणि १३ ऑक्टोबर १९५१), कानडी वाङ्मयाचा परिचय– गो. श्री. सोहोनी (१३ ऑक्टोबर १९५१), श्रीपाद जोशी, मराठी भाषेत उर्दूचे शब्द (१५ डिसेंबर १९५१), तेलगू काव्यप्रवाह व दृष्टिक्षेप श्री. कामाक्षीराव (२ फेब्रुवारी १९५२), कन्नड वैष्णव संतांचे कार्य (१२ एप्रिल १९५२), भारतीय भाषांची वैशिष्ट्ये (२४ मे १९५२), तेलगू भाषा समितीचे कार्य (१४ जून १९५२), गुजराती साहित्यातील कथाप्रवाह श्री. गुलाबदार बोकूर (१० जानेवारी १९५३), इक्बालदर्शन उर्दू काव्यातील उपवन– श्रीपाद जोशी (२१ ऑगस्ट १९५४), उर्दु काव्यातील संकेत श्री. नारायण केळकर (२ जुलै १९५५), गीतांजलीचे मूलसूत्र (११ जानेवारी १९५८), शंकर सारडा– रशियाचा एक श्रेष्ठ कादंबरीकार– फिओडोर डोस्टोयेव्हस्की (२५ जानेवारी १९५८), रवींद्रनाथाची जीवनदेवता (५ जुलै १९५८), रवींद्रकाव्यांत मेघदूत (२ ऑगस्ट १९५८), अरविंद ताटके– प्रसिद्ध क्रिकेटपटू जिम लेकर, श्रीकांत गोगटे– प्रसिद्ध वंग कवी– श्री. मोहितलाल मुजुमदार (२५ ऑक्टोबर १९५८), आनंदीबाई शिर्के– गुजरातचे कथा वैभव (२९ नोव्हेंबर १९५८), चिनी वाङ्मय मैंग– महान चिनी कादंबरी– साने गुरुजी (४ जुलै १९५९), वंगकवी सत्येंद्रनाथ दत्त (१६ जानेवारी १९६०), राजा मंगळवेढेकर– आंतरभारतीची कार्य योजना (३० जानेवारी १९६०) इत्यादींचे लेख प्रकाशित झालले आहेत.

दिनांक २८ ऑक्टोबर, १८ नोव्हेंबर १९५० च्या 'साधना' साप्ताहिकात इक्बालदर्शन १ व २ हे लेख श्रीपाद जोशी यांनी लिहिलेले असून, या लेखात कवी डॉ. मुहंमद शेख इक्बाल यांनी 'इक्बाल' या टोपण नावाने लेखन केले. इंग्रजी, फारसी, अरबी या भाषेचे व्यासंगी लेखक यांनी सुरुवातीच्या काळात राष्ट्रीय पदे रचली. 'सारे जहाँसे अच्छा, हिंदोस्ताँ हमारा' हे त्यांचे सुपरिचित गीत अशा या मुहमंद शेख यांचा जन्म पंजाबमधील सियालकोट येथे १८७५ मध्ये झाला. त्यांच्या इक्बालदर्शन या लेखात मेरा वतन, नया शिवाला, एक मकडा, औक्खी, एक पहाड और गिलहरी या गीतांचा परिचय श्रीपाद जोशी यांनी लेखात करून दिला आहे.

‘साधना’ साप्ताहिकातून त्यांचे तीन लेखांक दिले. मुलांसाठी लिहिलेल्या कवितांपैकी दोन कविता दिल्या आहेत. काव्यातून छोट्या छोट्या उद्‌बोधक कथा लिहिण्यात ते कुशल होते व दुसऱ्या लेखांकांत राष्ट्रप्रेमाच्या कविता आल्या आहेत. त्यांच्या ‘एक मकडा और मक्खी’ या कवितेत कोळी आणि मख्खी यांच्यातील संवादाच्या माध्यमातून कोळी आपल्या गोड–गोड बोलण्याने मक्खीला आपल्या जाळ्यात अडकवतो. घरबसल्या कित्येक दिवसांचा उपाशी असणारा कोळी आपल्या वाक्‌चातुर्याने मक्खीला आपल्या जाळ्यात अडकवितो आणि आपला कार्यभाग साधतो. अशा वृत्तीची माणस समाजात आपल्याला पावलोपावली भेटतात. त्यांच्या गोड बोलण्याला बळी न पडण्याचा सल्ला या कवितेतून दिला आहे. या संदर्भात कवी म्हणतो ‘‘भूखा था कोई रोजसे अब हाथ जो आयी। आराम से घर बैठके मक्खी को उडाया’’[५८]

‘नया शिवाला’ या गीतात ते ब्राह्मण, पूजाअर्चा, धर्मोपदेशक यांच्याकडे काणाडोळा करून देव मूर्तीत आहे. परंतु कवीच्या मते देव देवळात नसून मातृभूमीचा प्रत्येक कण म्हणजे देवता आहे. हे सांगताना कवी लिहितात–

‘हर सुबह उठके गाये मंतर वह मीठे मीठे
सारे पुजा–रियों को मध पीतकी पिला दे
शक्तीनी शांतिमी भगतोंके गीतमें है
धरती के बासियोंकी मुक्ती प्रीतमें है।’[५९]

हे सांगत असताना कवी म्हणतात, पहाटे उठून मंत्र आळवून सर्व पुजाऱ्यांना प्रीतीची सुधा पाजू आणि या पृथ्वीतलावर सुख शांती नांदो इतकेच नाही तर या लोकांची मुक्ती जर करायची असेल प्रेम दिले पाहिजे. हा संदेश कवी देतो.

तर ‘रवींद्र मनन’ ही ‘साधना’ साप्ताहिकात दिनांक १७ मार्च, १४ जुलै व १३ ऑक्टोबर १९५१ ला काकासाहेब कालेलकरांनी लिहिलेले रवींद्रनाथांच्या काव्याचे भाषांतर आहे. काकासाहेब कालेलकर ‘रवींद्र मनन’ नावाचा मराठीत संग्रह करीत असून, रवींद्रनाथांच्या गीताचा अनुवाद त्यांनी ‘साधना’साठी दिलेला आहे. त्यांचे रवींद्र मनन साधनेतून क्रमशः प्रसिद्ध व्हावे. ही संपादकांची इच्छा आहे. हिंदीतील लेखन ‘मंगल प्रभात’ या मासिकात प्रसिद्ध होत असून ‘साधना’साठी त्यांनी मराठीतून लिहिले आहे.

दिनांक १३ ऑक्टोबर १९५१ च्या 'साधना' साप्ताहिकात 'कानडी वाङ्‌मयाचा परिचय' या लेखात गो. श्री. सोहोनी यांनी महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे दैवत 'विठ्ठल' म्हणजे कानडी–मराठीचा संगम आहे असे इतिहास सांगतो असे म्हणत कर्नाटक व महाराष्ट्रातील सामाजिक घटनांचे ते प्रतिबिंब आहे. प्रस्तुत लेखात प्राचीन साहित्य, कन्नडचे लोकसाहित्य, आधुनिक वाङ्‌मय, नाट्यवाङ्‌मय, काव्य, कादंबरी वाङ्‌मयाचा इतिहास सांगितलेला असून, आधुनिक वाङ्‌मयात इतर प्रांतांप्रमाणे प्रतिबिंब उमटले आहे. कर्नाटकालाही ब्रिटिश राजवटीचे चटके बसू लागले. राजकीय जनजागृतीचे एक नवे दर्शन घडू लागले. कन्नड भाषिक विभागाची विभागणी मद्रास, म्हैसूर, मुंबई प्रांती झाली. यातील कन्नड गीतांची प्रगती होऊ लागली. अशा या कन्नड साहित्य भाषाशास्त्र, टीकाशास्त्र, व्युत्पत्तिशास्त्र यांच्याबाबतीत ही कन्नड वाङ्‌मय मराठीप्रमाणेच समृद्ध आहे तर मराठीसारखे हॅम्लेट रक्तासी या नावाने कु. वे. पुट्टप्पा यांनी रूपांतर करून कन्नड भाषेचा पाश्चिमात्य साहित्याचा संपर्क घडवून आणला. कन्नड साहित्य संस्थांनी कन्नड भाषेतील निवडक साहित्य हिंदी व मराठी भाषेत अनुवाद करून सीमा भाषा व राष्ट्रभाषा यांच्यात एकमेकांविषयी सद्‌भाव निर्माण करण्याची गरज व्यक्त केली आहे.

तर 'मराठी भाषेत उर्दूचे शब्द' दिनांक १५ डिसेंबर १९५१ च्या श्रीपाद जोशी यांच्या लेखात मराठीत आलेल्या विशेषनामे व उर्दू म्हणी यातून निदर्शनास येते.

विशेषनाम–दौलती, हैबती, फकिरा, फत्तेसिंग, दफ्तरदार, किल्लेदार, पोतदार, गुलाब, हिम्मतसिंग, बाजीराव इतकेच नाहीतर म्हणीतूनही उर्दू शब्द आलेले आहेत. आधी जाते अक्कल मग जाते भांडवल, चोर तर चोर आणि वर शिरजोर, एकनूर आदमी दसनूर कपडा, हाजीर तो वजीर इ. असे अनेक शब्द उर्दूतून मराठीत आलेले असून, आज ते शब्द मराठीतीलच असल्याचे आपणास जाणवते. असे हजारो उर्दू शब्द मराठीत बेमलूमपणे आले आहेत.

२५ जानेवारी १९५८ च्या 'साधना' साप्ताहिकात शंकर सारडा यांनी रशियाचा एक श्रेष्ठ कादंबरीकार फिओडोर डोस्टोयेव्हस्की यांचा अल्प परिचय करून दिला. फिओडोर डोस्टोयेव्हस्की यांचा जन्म १८२१ मध्ये मास्कोत झाला. त्यांना शेक्सपिअर, डिकन्स, शिलर, ह्यू गो यांच्या साहित्य वाचनाची आवड होती. वडिलांच्या इच्छेखातर त्यांनी पीटबर्गच्या मिलिटरी इंजिनिअरिंगमध्ये प्रवेश मिळविला. पुढे युद्ध खात्यात इंजिनिअरिंग विभागात नोकरी मिळाली. पण तेथे मन रमले नाही. त्यांना वाङ्‌मयीन क्षेत्रात आपले नाव कमवायचे होते.

त्यांच्यावर गोगोल यांच्या साहित्याचा प्रभाव होता. सन १८४६ मध्ये त्यांची ‘पूअर फोक’ (गरीब जनता) नावाची कादंबरी प्रकाशित झाली. दिनांक १६ नोव्हेंबर १८४९ मध्ये त्याला क्रांतिकारक कटाबद्दल दोषी धरण्यात आले व फाशीची शिक्षा देण्यात आली. पण झारचा खलिता २२ डिसेंबरला मिळाला व त्याची फाशी रद्द करण्यात आली. त्याला आठ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा होऊन सैबेरियात ठेवण्यात आले. डोस्टोयेव्हस्कीला या तुरुंगातच गुन्हेगारांच्या जगाची खरी ओळख झाली. या काळातील चिंतन, सुख–दुःखे, वासना विकार यांचे स्वरूप समजले. मानसिक, शारीरिक यातना भोगल्या. यातूनच त्याच्या साहित्याचा जन्म झाला. ‘दि हाउस ऑफ डेथ, अंकल्स ड्रीम’, दि फ्रेंड ऑफ द फॅमिली, क्राइम ॲण्ड पनिशमेंट, दि ब्रदर्स करामझाव्ह यांसारख्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. डोस्टोयेव्हस्कीचे प्रेम अलेक्झांडर इसायेव्ह या एका सामान्य अधिकाऱ्याच्या बायकोवर बसले. त्याने तिच्याशी १८५६ मध्ये विवाह केला. हा विवाह यशस्वी झाला नाही. पण त्या दोघांतील प्रेम कायम राहिले. त्यांच्या जर्मनी, फ्रान्स, स्वित्झर्लंड, इटली या देशांतील प्रवासावरून ‘कइंटर नोट्स ऑन समर इंप्रेशन्स’ हे प्रवासवर्णन लिहिले. तसेच ‘Vremya’ या वृत्तपत्राचे संपादन त्यांनी केले. दि गॅम्बलर, दि इडियट, दि इंटरनल हजबंड या कादंबऱ्याही त्याने लिहिल्या. अशा या थोर रशियन साहित्यिकाच्या चरित्राचा आढावा घेऊन त्यांच्यातील झालेल्या परिवर्तनामुळे साहित्यिक म्हणून जगाला माहीत झाला.

तर दिनांक ५ एप्रिल १९५८ च्या ‘साधना’ साप्ताहिकात ‘भारततीर्थ’ ही रवींद्रनाथांची कविता आली असून, आचार्य स. ज. भागवत यांनी या कवितेचा परिचय करून दिला आहे. १९१० मध्ये बंगाली गीतांजलीत ही कविता संग्रहित केली आहे.

श्रीकांत गोगटे यांनी ‘रवींद्रनाथांची जीवनदेवता’ (५ जुलै १९५८) ही कविता ‘शोनारतरी’ व ‘चित्रा’ या काव्यसंग्रहात समाविष्ट असून, जीवनदेवता ही कवी कल्पना आहे. एवढेच नाहीतर भारतीय तत्त्वज्ञानातील अंशरूप जीवाला पूर्णरूप परमात्मा या तत्त्वाशी विशेषतः वैष्णवांच्या भेदाभेद दर्शनाशी या कल्पनेचे साम्य आढळते. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातही या कल्पनेला पुष्टी देणारे आधार आहेत. विज्ञानातही याला पुष्टी मिळू शकते. डार्विनच्या उत्क्रांती तत्त्वाप्रमाणे प्रत्येक जीवकोशाला स्वतंत्र व्यक्तित्व असते. म्हणजेच मानवामध्ये अनेक व्यक्तित्वांचा समावेश झालेला असतो. आपले युगानुयुगांचे जीवन विश्वाच्या अभिव्यक्तीच्या

अनेक स्तरांतून प्रवाहित होत आहे. रवींद्रनाथांचा अनुभव म्हणजे जीवन, जीवनातील भिन्नता व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात झालेला बदल हा बदल सृजनशील जीवन देवता होय. असे विचार श्रीकांत गोगटे यांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या 'जीवनदेवता' या विषयावरील विवेचनात केले आहे. याशिवाय श्रीकांत गोगटे यांनी गीतांजलीचे मूलसूत्र, रवींद्रांचे वर्षागान हे लेख लिहून रवींद्रनाथांच्या काव्यावर प्रकाश टाकला आहे. त्यातून रवींद्रनाथांचे व्यक्तिमत्त्व व त्यांच्या वैचारिकतेवर भाष्य केले आहे.

'रवींद्रकाव्यात मेघदूत' (२ ऑगस्ट १९५८) या लेखात श्रीकांत गोगटे यांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्यावर कालिदासाच्या मेघदूताचा प्रभाव आहे, हे सांगताना रवींद्रनाथांना कालिदासांचे मेघदूत वाचून सुचलेली दीर्घ कविता म्हणजे 'मानसी' काव्यसंग्रहातील 'मेघदूत' ही कविता होय. या कवितेत कवी म्हणतात, पवित्र आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी तू मेघदूताची रचना केली. या धीरगंभीर संगीतात भावनांचे व विरहजनांचे दुःख एकवटले आहे. या मेघातून बरसणारे पाणी म्हणजे अश्रू होय, अशी कल्पना कवी 'रवींद्रकाव्यात मेघदूत'मध्ये करतात.

दिनांक २५ ऑक्टोबर १९५८ च्या 'साधना' साप्ताहिकाच्या अंकात प्रसिद्ध बंग कवी श्री. मोहितलाल मुजुमदार यांचा परिचय श्रीकांत गोगटे यांनी परिचय करून दिला आहे. हे रवींद्रनाथांच्या समकालीन असून, आधुनिक वंगकाव्यात बुद्धिवादाचा व देहवादाचा प्रथम पुरस्कार करणारे मोहनलाल मुजुमदार यांचा १८८९ मध्ये कांचरापाडा येथे जन्म झाला. ईश्वरचंद्र गुप्त व देवेंद्रनाथाचे ते नातेवाईक होते. घरच्या गरिबीमुळे त्यांना पुढील शिक्षण घेता आले नाही. सन १९२९ मध्ये त्यांनी ढाक्का विश्वविद्यालयात बंगालीचे १४ वर्षे अध्यापन केले. त्यांनी विपुल काव्यनिर्मिती केली. सन १९१० साली 'काव्यसाधना' या पत्रिकेतून लेखनास सुरुवात केली. स्वप्नपसारी, विस्मरणी, स्मरगरल हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. त्यांच्या काव्यावर भारतीय व पाश्चिमात्य कवींचा प्रभाव आहे, तर सत्येंद्रनाथांना ते गुरुस्थानी मानत. त्यांच्या 'स्वप्नपसारी' या काव्यग्रंथात ते म्हणतात–

'जीवन मधुर! मरण निष्ठुर
ताहारे दलियो पाय
जतो दिन आले मोहेर

मदिरा धरणीर पेयालाय'[६०]

उपरोक्त संदर्भान्वये लेखकाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट करताना जीवन मधुर असून मृत्यू निष्ठुर आहे. पण जोपर्यंत या धरणीच्या पेल्यात मोहाची मदिरा भरलेली आहे तोपर्यंत मी निष्ठुर मृत्यूला पदनत करीन, मृत्यूवर विजय मिळवीन, अशा शब्दांत जीवन आणि मरण यातील अंतर ते सांगून जातात.

'साधना' साप्ताहिकात २० डिसेंबर १९५८ व ११ एप्रिल १९५९ रोजी 'विश्वभारती' या सदरात 'चिनी वाङ्मय' या शीर्षकाने सानेगुरुजींनी लिहिलेला चिनी संस्कृती या अप्रकाशित ग्रंथातील एक प्रकरण देण्यात आले आहे. या प्रकरणात त्यांनी चिनी संस्कृतीत लेखनाला महत्त्व होते, तर राजदरबारी ग्रंथाला महत्त्व होते. सुई घराण्यातील राजाजवळ ३ लक्ष ७० हजार ग्रंथ होते. वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन मिळावे म्हणून चीनमध्ये ग्रंथालयाला प्रोत्साहन दिले जाते. या ग्रंथालयात प्रामुख्याने चार प्रकारचे साहित्य उपलब्ध होते. (१) कन्फ्युशियस वगैरेंचे धार्मिक वाङ्मय, (२) ऐतिहासिक काव्य, (३) तात्त्विक वाङ्मय, (४) सर्व संग्रह इत्यादी' या प्रकारात वर्गीकरण करून ठेवले आहे.

तर २९ नोव्हेंबर १९५८ च्या 'गुजरातचे कथावैभव' या लेखात सौ. आनंदीबाई शिर्के यांनी श्री. नानक मेघाणी व श्री. महेंद्र मेघाणी या दोन भावांनी 'गुजरातनी वार्तासमृद्धी' नावाची कथासंग्रह माला सुरू केली. त्यात सुप्रसिद्ध लेखकांच्या कथा प्रकाशित झालेल्या असून गुजराती भाषेप्रमाणेच मराठी, बंगाली, हिंदी या निवडक भाषांतील लघुकथा संग्रह प्रकाशित होणार होता. या पाठीमागे लेखकाचा हेतू बहुजन समाजात वाचनाची आवड निर्माण व्हावी हा होता. लेखकाच्या मते, ''निव्वळ मनोरंजन एवढेच कथालेखनाचे कार्य नसून प्रत्यक्ष जीवनाशी ज्याचा संबंध पोहचतो त्या जीवांस समस्यांच्या चित्रीकरणाचे महत्त्व व मोल अधिक आहे. हे लेखकांनी लक्षात ठेवायला हवे. माणसाचे सुख-दुःख, भावभावना, इच्छा, आकांक्षा, विचार, विकार, असमाधान यांना वाचा फोडणाऱ्या व मार्गदर्शन करणाऱ्या वाङ्मयाची बहुजन समाजाला आज अधिक गरज आहे.''[६१]

या लेखात दोन महत्त्वाच्या कथा आल्या आहेत. त्या म्हणजे 'जमीनदार' ही श्रीसुंदरम यांची कथा. मुलाच्या लग्नासाठी, बापाचा दिवस किंवा शेतीची सुधारणा या कारणांनी एखादा सधन शेतकरी एकदा का सावकाराचा उंबरठा चढला की, सावकाराचा मृत्युपाश त्याच्या

गळ्यात पडून हळूहळू कसा आवळला जातो. या चक्रात पाहता पाहता सधन शेतकऱ्याचा गरीब मजूर होऊन भिकेस लागतो, याचे चित्रण आले आहे. तर 'सौभाग्यवती' या कथेत 'स्त्री' ही मालकीची वस्तू आहे. अशा पुरुषी मानसिकतेला धक्का देणारी ही कथा असून स्त्रियांच्या नाजूक व मूक कुचंबणेला एका खेडुत स्त्रीकडून वाचा फोडली आहे. पुरुष लेखकाने लिहिलेली गोष्ट इतक्या सहृदयतेने व संयमाने लिहिली आहे. ती कथा एखाद्या स्त्रीने लिहिलेली असावी इतके हे वास्तव चित्रण आले आहे. 'गुजरातचे कथावैभव' या लेखाच्या माध्यमातून गुजरातमधील कथा लेखकांचे लेखन जीवनातील विविध प्रसंगी कसे वागावे याचे मार्गदर्शन करते; वास्तव परिस्थितीचे भान वाचकांमध्ये निर्माण करते.

प्रस्तुत विवेचनावरून साधनेतून वेळोवेळी 'आंतरभारती' या सदरातून परभाषेतील साहित्याचा होणारा परिचय, गुजराती–कानडी प्रदेश, लोकसाहित्य, रवींद्रनाथांची पुण्यतिथी, त्यांचे साहित्य यांची आपल्याला जशी ओळख झाली, तशीच साने गुरुजींना आंतरभारतीची कल्पना सुचली, तेव्हा भारतात भाषावार प्रांतरचना होणार हे जवळजवळ निश्चित झाले होते. भाषावार प्रांतरचना, द्विभाषिक मुंबई राज्य ही विसर्जित झाली. या सर्व कालाखंडात प्रांतोप्रांतीच्या लोकमानसात सीमाप्रश्न, आर्थिक प्रश्न, राज्यकारभारविषयक प्रश्न या प्रश्नांवर निर्माण झालेला प्रक्षोभ माजलेला होता. अशा वेळी गुरुजींना आंतरभारतीची गरज वाटत होती, हे विशेष आहे.

तर ११ एप्रिल १९५९ रोजी 'चिनी कादंबरी वाङ्मय' या सदरात 'शूह हू' या क्रांतिकारक कादंबरीचा परिचय करून दिला. ही कादंबरी कुआन युंगने यांची आहे. 'ऑलमेन आर ब्रदर्स' या नावाने तिचे इंग्रजी भाषांतर प्रकाशित झालेले आहे. कुआन यंगने लिहिलेली ही कादंबरी असून, ही 'शिहभवान' या टोपणनावाने त्यांनी प्रसिद्ध केली. या कादंबरीत एकूण ७० प्रकरणे असून, १५ व्या शतकात ही कादंबरी लोकभाषेत लिहिली आहे. या कादंबरीत मुंग–चि–आंगच्या एकशे आठ साथीदारांची गोष्ट सांगितली आहे. तर अनुकरणात्मक कादंबरीत सतराव्या शतकांतील 'चिंग पिंग वै' ही कादंबरी प्रसिद्ध आहे. बँग–शि–चेन या कादंबरीचा लेखक असावा. तो या काळातील लोकप्रिय लेखक होता. 'शुह हू' या कादंबरीतील तेवीस–चोवीस व पंचवीस या प्रकरणांचा विस्तार म्हणजे 'चिंग पिंग वै' ही कादंबरी होय.

या कादंबरीत प्रथमच चिनी वाङ्मयात स्त्री पात्रांना पुरुष पात्रांप्रमाणे स्वतंत्र स्थान व महत्त्व दिले आहे. या कादंबरीत गृहजीवन आले असून एका सुखी, शांत अशा मध्यमवर्गीय कुटुंबाचे चित्रण आहे. वेगवेगळ्या स्वभावाच्या छोट्या कुटुंबातील व्यक्तींच्या संघर्षाचे चित्रण आहे.

आंतरभारतीचे काम संस्कार घडविणे आहे. भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी झगडलेली पिढी आहे. समग्र भारताची, संस्कृती, एकसंध देशाची ओळख या पिढ्यांना झालेली आहे. पण प्रश्न उद्याच्या पिढीचा आहे. त्यासाठी शाळेतून मातृभाषेव्यतिरिक्त एक–दोन भाषा शिकविण्याची सोय झाली, तर विद्यार्थी आकर्षित होतील. याचा फायदा विद्यार्थ्यांना व्हावा. या संदर्भात रावसाहेब पटवर्धन दिनांक ३० जानेवारी १९६० च्या 'आंतरभारतीची कार्य योजना' या लेखात लिहितात, ''आज एकत्वाची भावना देशांतून नष्ट होऊ लागली आहे. भाषावार प्रांतरचनेनंतर परस्पर सामंजस्य कमी होऊ लागले आहे. त्या–त्या प्रांतांतील प्रादेशिक भाषांना महत्त्व तर जरूर आहेच. पण हे महत्त्वदेखील भारत जोवर एकसंध राहील तोवरच आहे. भारताची एकता टिकली, तरच प्रादेशिक भाषांचेही वैभव टिकेल, तरच भारताच्या स्वातंत्र्यालाही अर्थ राहील. आज तोंडाने देशाच्या ऐक्याविषयी बोलले जाते. पण प्रत्यक्ष आचार मात्र भिन्न घडतो आहे. तत्त्व आणि व्यवहार यांत फरक पडत आहे.''[६२]

यावरून आपल्याला आंतरभारती/प्रांतभारती या संदर्भात लेखकाची भारतीय भाषांबाबतच्या भूमिकेबरोबरच संबंध भारत एकसंध राहावा, ही प्रामाणिक भूमिका दिसून येते.

सन १९३० साली त्रिचन्नापल्लीच्या तुरुंगात असताना सानेगुरुजींना प्रांतभारतीची कल्पना सुचली. दिनांक १५ ऑगस्ट १९४८ च्या 'साधना' साप्ताहिकाच्या पहिल्याच अंकात ते भारतातील त्या त्या प्रांतातील नवनिर्मितीची, साहित्याची महाराष्ट्रीय वाचकांना ओळख करून देण्याचा विचार मांडतात. प्रांतभारती म्हणजे 'साधना'ने सुरू केलेली नवभारताची उपासना आहे असे ते म्हणतात. या माध्यमातून त्यांनी 'साधना'च्या वाचकांना गुजराती, बंगाली, तमीळ, कन्नड, उर्दू भाषेतील साहित्यिकांच्या परिचयाबरोबरच काव्याचा, भाषेचा, लोकसाहित्याचा परिचय करून दिला. एवढेच नाही, तर सान गुरुजींच्या पश्चात 'साधना' साप्ताहिकाच्या संपादकांनीही अर्थात आचार्य स. ज. भागवत, पु. ह. पटवर्धन, आचार्य शं. द. जावडेकर यांच्या संपादकीय कालखंडातही आंतरभारतीला महत्त्व दिले होते. आंतरभारतीच्या कार्याची

रूपरेषा, कार्यपद्धती, आंतरभारतीच्या माध्यमातून जीवनाचा विकास साध्य करणे. ज्ञानाची सुरुवात विविधतेतून होते. याची त्यांना जाणीव होती. रवींद्रनाथ टागोरांनी विश्वभारतीची कल्पना मांडली. तर सानेगुरुजींनी व्यवहार्यतेची मर्यादा ओळखून आंतरभारतीच्या रूपाने तिचे पुनरुज्जीवन केले. जीवनाचा अभ्यास मानवतेच्या पायावर आंतरभारतीला अपेक्षित आहे. जगातील सर्व राष्ट्रे झपाट्याने जवळ येत आहेत. त्यांच्यातील अंतर कमी होत आहे. याचाच अर्थ कोणताच प्रश्न आज अंतर्गत नाही. फक्त शरीराने जवळ येऊन उपयोग नाही; तर मनाने जवळ यावे, यासाठी विश्वभारतीचे कार्य आहे. राष्ट्रीयत्वाचा, प्रांतीयतेचा अभिमान टाकून अखिल मानवतेची भूमिका घेऊन प्रांतीय आहोत; पण भारतीयही आहोत, याचाच अर्थ आपण मनुष्य आहोत ही आंतरभारतीय त्रिसूत्री आहे.

साने गुरुजींना अपेक्षित असलेल्या आंतरभारतीच्या कार्याला त्यांनी सुरुवात केली व पुढील काळातही संपादकांनी या भूमिकेचा स्वीकार केलेला दिसतो.

## ४.३५ 'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झालेले समीक्षण/परीक्षण :

सन ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडात 'साधना' साप्ताहिकातून कविता, कथा, कादंबरी, नाटक, पत्रलेखन इ. विषयांवर समीक्षण, परीक्षण, पुस्तक परिचय या शीर्षकाखाली प्रकाशित झाले. विविध विषयांवरील पुस्तके व चित्रपटसमीक्षा प्रकाशित करून वाचकांना विचारसंपन्न करण्यात 'साधना'ने महत्त्वाची भूमिका बजावली. यातील निवडक साहित्यप्रकाराचा थोडक्यात आढावा–

### १. कवितासंग्रह समीक्षा :

'जीवनसरिता' (७ जुलै १९५१) ह्या श्री. द. गो. पाळंदे यांच्या काव्यसंग्रहाचे परीक्षण प्रा. मंगेश पाडगावकर यांनी केले असून, तत्त्वचिंतन हे त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य परीक्षकाने नोंदविले आहे. एकंदरीत लेखकाचे हे पहिलेच पुस्तक असून, काव्यलेखनाचा प्रयत्न चांगला आहे.

वसंत बापट यांनी मंगेश पाडगावकर यांच्या 'धारानृत्य' (२१ जुलै १९५१) या काव्यसंग्रहाचे समीक्षण केले आहे. सलाम, जिप्सी, तुझे गीत गाण्यासाठी व धारानृत्य हे कवी मंगेश पाडगावकर यांचे काव्यसंग्रह होत. त्यांच्या 'धारानृत्य' या कवितासंग्रहाला आचार्य स. ज. भागवत यांनी प्रस्तावना लिहिली आहे. त्यांनी पाडगावकरांच्या काव्याचे सम्यक दर्शन घडविले

आहे. 'केशवसुतांपासून कुसुमाग्रजांपर्यंत अर्वाचीन मराठी काव्यात मानवतावादाचा जो एक विचार दिसतो तो पाडगावकरांच्या कवितेत दिसून येतो. पाडगावकरांची शैली सहज आणि नाजूक आहे. काव्यात सगेयता व लयबद्धता असून, त्यांची कविता विश्वात्मकतेचा अनुभव देते. वसंत बापट, पाडगावकरांच्या कवितेकडे मानवतावादी दृष्टिकोनातून पाहतात.

'बालकवींची कविता' (१६ मे १९५३) या पुस्तकाचा परिचय मंगेश पाडगावकर यांनी करून दिला आहे. त्यांची मराठीतील निसर्गकवी म्हणून ओळख असून, १९०७ साली जळगाव येथे पहिले कविसंमेलन झाले. या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांनी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांना 'बालकवी' ही पदवी दिली. अशा या बालकवींच्या काव्याची ओळख करून देताना बालकवींच्या कवितेतील निसर्ग आणि प्रेमभावना ही वैशिष्ट्ये नोंदविली. बालकवी हे मंगेश पाडगावकरांचे आवडते कवी होते. माणसाच्या वयावर त्याच्या आवडी–निवडी बदलतात. त्या पाठीमागे भिन्न भिन्न कारणे असतात. बालकवीनुसार काव्यातील शब्दसौंदर्य, नादसौंदर्य, सूचकता, ध्वनिसूचकता जेवढे व्यक्त होतात तेवढे अव्यक्त असतात. त्यांच्या काव्यातील अपूर्व सूचकता अनुकरणात आणणे अवघड आहे. निसर्गसौंदर्य हे बालकवींच्या कवितांचे वैशिष्ट्य. या कवितेत निरागसता, निसर्गाचे चित्रण, विशेषणे आणि प्रतीके बोलकी आहेत. त्यांच्या कवितेत रूपसौंदर्याचे वर्णन हे असेच वाटते. पण त्यांच्या कवितेत मानव सुखी होण्यासाठी समाजरचना बदलली पाहिजे असे त्यांना वाटते. म्हणून सामाजिक आशयाचा संकेत देणारी कविता त्यांनी लिहिली आहे. पण बालकवी हेच खरे सामाजिक कवी आहेत, असेही वाटते. कारण समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी मानसिक बदल घडवून आणला पाहिजे. नेमके हेच काम त्यांच्या कवितेने केले. जीवनात बदल घडवून आणल्याशिवाय माणूस बदलणार नाही. मानवी मनाच्या नव्या स्तरावरून त्याची जाणीव जशी तीव्र होईल तसतशी बालकवींची कविता लोकांना अधिक कळू लागेल, असे प्रस्तुत लेखात मंगेश पाडगावकर म्हणतात.

कवी माधव ज्यूलियन यांच्या 'स्वप्नलहरी' (२ जानेवारी १९५४) या पुस्तकाचे समीक्षण प्रा. जगन्नाथ महाजन यांनी केले असून, 'स्वप्नलहरी' या कवितासंग्रहाला कवी गिरीश ऊर्फ के. के. कानिटकर यांनी प्रस्तावना दिली. यांचा नामोल्लेख प्रणयपंढरीचा वारकरी असा केला जातो, त्यांनी गझल व रुबई हे काव्यप्रकार फारसीतून मराठीत आणले. माधव त्र्यंबक पटवर्धन अर्थात माधव ज्यूलियन यांच्या 'छंदोरचना' या ग्रंथासाठी मुंबई विद्यापीठाने डिसेंबर

१९३८ रोजी त्यांना डी.लिट. ही पदवी प्रदान केली. 'स्वप्नलहरी' या काव्यसंग्रहाचे समीक्षक प्रा. जगन्नाथ महाजन हे होत. ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत कवी गिरीशांनी माधव ज्यूलियन यांचे जीवन आणि काव्य यासंबंधीचा आढावा घेऊन कवितेविषयी संदर्भ दिले. माधव ज्यूलियन यांच्यावर कवी चंद्रशेखर आणि भा. रा. तांबे या कवींचा प्रभाव आहे. या संग्रहातील त्यांच्या कविता स्वतंत्र प्रतिभेचा वारसा सांगणाऱ्या आहेत. त्यांच्या प्रेमकाव्यात प्रसन्नतेपेक्षा विषण्णतेचे सूर अधिक आहे. हसता हसता कविता गंभीर रूप धारण करते. यात यौवनात पदार्पण करणाऱ्या स्त्रीचे काल्पनिक वा प्रत्यक्षातील भावमय वर्णन आले असून, या कवितासंग्रहात माधवरावांच्या राष्ट्रीय व सामाजिक कवितांना महत्त्व आहे. समाजातील सर्व तऱ्हेचा अन्याय नष्ट व्हावा, या भावनेतून त्यांची राष्ट्रीय वृत्ती निर्माण झाली. पण काही ठिकाणी उपदेशात्मकता, नीतिचर्चा, वर्णनात्मकता हे काही दोष या संग्रहात आहेत. एवढेच नाही; तर काही ठिकाणी त्यांच्यातील बालभावनाही जागृत होतात. तर कुठे सोज्ज्वळ आणि निरामय भावनांचा विलास दिसून येतो. हा कवितासंग्रह वाचकांना अंतर्मुख करणारा आहे.

ग. दि. माडगूळकर यांनी लिहिलेल्या 'गीत रामायण'ची (५ एप्रिल १९५८) ओळख अणुभा सेनगुप्ता यांनी करून दिली आहे. या रचनांना असे संबोधतात, की या रामायणात येणाऱ्या व्यक्तिरेखा खुज्या असूनही सूक्ष्मपणे पाहिल्यास ही एक नवनिर्मिती आहे. गीत रामायणात 'राम' नाही. रामाच्या आसपासची इतर माणसेही अर्थातच गैरहजर आहेत. पण लोकांना मोहित केले ते रामायणातील कवनांच्या चालीने. एकंदरीत पुस्तकाबद्दल सांगायचे म्हणजे छपाईची सुबकता नाही. पण सरकारी खर्चाने छापलेल्या या पुस्तकाचे मूल्यदेखील सर्वसामान्य माणसाला परवडण्यासारखे नाही. खरे तर वाल्मीकी रामायणाने विश्वदर्शन घडविले. पण ग. दि. माडगूळकरांचे रामायण मात्र ते घडवू शकले नाही. याचा अर्थ त्या रामायणात साहित्यमूल्य नाही असे नाही. एक स्वतंत्र कवी म्हणून त्यांची प्रसिद्धी या निमित्ताने झाली.

## २. **काव्यसमीक्षा :**

'नवकाव्याचे स्वरूप' या लेखात कविवर्य वा. रा. कांत यांनी मराठवाडा साहित्य परिषदेच्या काव्यशाखा संमेलनाच्या अध्यक्षपदावरून नवकाव्यासंदर्भात मांडलेली भूमिका या लेखात प्रतिबिंबित झालेली असून, 'साधना' साप्ताहिकांच्या वाचकांसाठी दिनांक २३ मे १९५३ च्या अंकात प्रकाशित केली आहे. या भाषणात तत्कालीन काव्यांत दोन प्रवाह असून,

कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, वा. रा. कांत यांचा एक प्रवाह व मर्ढेकर, भावे, करंदीकर यांचा दुसरा प्रवाह आहे. या लेखात लेखकाने बा. सी. मर्ढेकर, य. द. भावे, विंदा करंदीकर यांच्याबद्दलचे चिंतन मांडले आहे. वा. रा. कांत यांनी नवकाव्यासंदर्भात विचार मांडले. नवकाव्याचा हा संप्रदाय अत्याधुनिक आहे. आशय व आविष्कार यांचे नवकवी प्रवर्तक आहेत. नवकाव्यात नावीन्य आहे, नवकाव्याची विफलता व तुच्छता हे वैशिष्ट्य. अभद्र प्रतिमा, अशा प्रतिमांचे संकट हे दुसरे वैशिष्ट्य, समाजवाद, राजकीय विचार प्रणालीचा प्रचार हे तिसरे वैशिष्ट्य होय. श्री. मर्ढेकर व य. द. भावे यांचे काव्य पहिल्या दोन प्रकारच्या वैशिष्ट्यांचे प्रतिनिधित्व करतात. तर शरद्चंद्र मुक्तिबोध व विंदा करंदीकर यांच्या काव्यात तिसऱ्या प्रकारचे वैशिष्ट्य अधिक प्रमाणात दिसते. नवकाव्य हे मनमोहक तंत्राला, अतिवास्तववादाला आणि राजकीय विचार प्रणालीच्या प्रचाराला शरण गेले आहे. नवकाव्य राजकीय मतप्रणाली आणि अतिवास्तववाद या लेखनतंत्रात दुभंगले आहे, असा विचार लेखकाने मांडला आहे. नवकाव्यातील विफलता, निराशा जगाच्या प्रत्येक कालखंडात मानवीजातीला जाणवत आहे. निराशा व विफलता हे काव्याचा विषय आहेत. नवकविता वास्तववादाच्या आहारी गेल्यामुळे विकृत, निराश व दुर्बोध बनली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपातील पराभूत व हताश सैनिकांच्या मनात त्यांची दारुण वंचना करणाऱ्या संस्कृतीविषयी अटी व तिरस्कार यातून अतिवास्तववादी संप्रदायाचा जन्म झाला. असा विचार नवकाव्याच्या संदर्भात कविवर्य वा. रा. कांत यांनी मांडला आहे.

दिनांक ३ एप्रिल १९५४ च्या 'साधना' साप्ताहिकात 'माझ्या काव्याची भूमिका' या विषयावर कवी मंगेश पाडगावकर यांनी केलेले विवेचन आहे. वयाच्या नवव्या–दहाव्या वर्षांपासूनच ते काव्यलेखन करू लागले. काव्यलेखन हे त्यांचे कधीही न सुटणारे व्यसन झाले. त्यांच्या काव्यलेखनाचे विषय निसर्ग आणि प्रेम आहेत. कारण त्यांचे बालपण कोकणातील वेंगुर्ल्यात गेले. तेथील निसर्ग हाच त्यांच्या चिंतनाचा विषय आहे. साहजिकच त्यांच्या लेखनात निसर्गातील प्रतिमा अपरिहार्यपणे अनुभूतीचे माध्यम बनतात. त्यांच्या अनुभवांचा सहज असा सुसंवाद निसर्गाशी साधला जातो. त्यांच्या अनेक कवितेतील निसर्ग, कवितेतील चित्र उभे करीत नाही. तसा लेखकाचा हेतूही नाही; पण कवितेतल्या निसर्ग प्रतिमांचा परिणाम मूड निर्माण करतो.

'आजची मराठी कविता' हा दिनांक २२ जानेवारी १९५५ च्या 'साधना' साप्ताहिकात प्रकाशित झालेला प्रा. वा. ल. कुलकर्णी यांचा लेख आहे. या लेखात वा.ल. कुलकर्णी यांनी तत्कालीन मराठी कवितांबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन व्यक्त केला. लेखकाने त्यांच्या संग्रही असलेल्या जुन्या मासिकातील कवितेसंबंधीचे विवेचन वाचले. ह्या कवितांना केवळ संकेत म्हणून शीर्षके येतात. कालची व आजची कविता वाचताना वर्णनात्मक, स्पष्टीकरणात्मक व निवेदनात्मक अशी शैली दिसून येते, तर काव्यनिर्मितीची प्रक्रिया, आत्मप्रकटीकरणाला महत्त्व देते. हा लेख म्हणजे मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या दादर येथील चौदाव्या समारंभाच्या अध्यक्ष पदावरून केलेले भाषण आहे. श्री. जगन्नाथ महाजन यांनी 'साधना' साप्ताहिकाच्या वाचकांसाठी हा लेख पाठविला आहे.

दिनांक २६ मार्च १९५५ च्या 'साधना' साप्ताहिकात 'कला आणि स्वातंत्र्य' या विषयावर श्री. अ. ना. देशपांडे यांनी साहित्य परिषदेच्या व्याख्यानमालेत विचार मांडले. या व्याख्यानाचा पूर्वार्ध 'नवभारत' या मासिकात प्रसिद्ध झाला. कलावंतांचे स्वातंत्र्य म्हणजे सामाजिकतेपासून स्वातंत्र्य असा अर्थ अभिप्रेत आहे. समाजाचे ऋण आपल्याला कलेच्या माध्यमातून फेडले पाहिजे. कलामूल्यांचे निकष लावणारे वा. ल. कुलकर्णी हे टीकाकार आहेत. तर अ. ना. देशपांडे सामाजिक जाणीव हे एक महत्त्वाचे कलामूल्ये मानतात. 'आत्मनिष्ठा आणि संवाद ही मूल्ये फक्त कलेच्याच क्षेत्रात प्रमाणभूत ठरतात आणि जीवनाच्या इतर क्षेत्रात मात्र ती कवडीमोल वाटतात, असे वा. ल. कुलकर्णी म्हणतात. मानसशास्त्राच्या आधारे एखाद्या साहित्यिकाच्या अनुभवसृष्टींचे पृथक्करण केले जाते. तर मार्क्सवादी टीकाकार सामाजिकता हेच सर्वश्रेष्ठ कलामूल्य मान्य करतात. वर्ग विग्रहाच्या सिद्धान्ताला पोषक अशी जी मूल्ये तीच मूल्ये सामाजिक. त्या मूल्यांचा प्रचार करणारी कला, हीच खरी कला, अशी ठाम भूमिका मांडली आहे. मानवी अनुभवविश्वाच्या शोधांमध्ये विविधता अभिप्रेत आहे. एकंदरीत अ. ना. देशपांडे कलेच्या स्वातंत्र्याविषयी विचार मांडताना तात्त्विक भूमिका स्पष्ट करतात. जीवन, समाज आणि मार्क्सवादी भूमिकेतून कला स्वातंत्र्याचा विचार मांडला आहे.

दिनांक ९ ऑगस्ट १९५८ च्या 'साधना' साप्ताहिकात 'नवी समीक्षा : कांही विचार' या विषयावर रा. ग. जाधव यांचे विवेचन आले आहे. या लेखात ते आत्मशोधन ही वाङ्मयाची प्रवृत्ती पूर्वी नव्हती पण आज आहे. ज्या अर्थाने साहित्य परिवर्तनशील आहे. त्याच अर्थाने

समीक्षकही परिवर्तनशील आहे. असा विचार मांडताना समीक्षा विषयाचे नावीन्य व अपूर्वत्व ही नव्या टीकेचे वैशिष्ट्य आहेत. कलानिर्मितीचे स्वरूप, कलेचा आशय, अभिव्यक्ती यांचा संबंध सौंदर्यशास्त्र आणि कला यातील नवीन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करते. परभाषीय निवेदन शैलीनेही अर्थाभिव्यक्ती स्पष्ट होत नाही. तेव्हा समीक्षकाने परभाषेत विचार करावयाला हरकत नाही. परभाषेतील भौतिक विचार आपल्या भाषेत आणावेत, ही तात्पुरती सोय जरी असली, तरी त्याला समानार्थी शब्द वापरले जावेत, असाही विचार ते मांडतात. आत्मशोधनपर नवीन समीक्षेत दुर्बोधता आहे. पण, रिचर्डस यांची समीक्षापद्धती मानसशास्त्राच्या गुंतावळ्यात सापडूनही दुर्बोध ठरत नाही. आजच्या समीक्षेविषयी विचार मांडताना कलावंत व टीकाकार हे समाजातील अधिक संवेदनक्षम घटक आहेत असे ते म्हणतात. भौतिक प्रगतीमुळे आज कलेत विभ्रांत, तर दुसऱ्या बाजूने शास्त्रीय उपपत्तींनी कलाक्षेत्रात प्रवेश केला आहे. आजच्या समीक्षेबाबत, तिच्या वाटचालीबद्दल ते अडचणी निर्माण झाल्याचे मत व्यक्त करतात.

'साधना' साप्ताहिकात काव्याच्या निर्मिती प्रक्रियेच्या संदर्भात प्रा. वा. ल. कुलकर्णी, मंगेश पाडगावकर, वा. रा. कांत, रा. ग. जाधव, अ. ना. देशपांडे यांनी मांडलेले विचार आले असून, काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेत झालेले बदल, संप्रदाय, आत्मशोधनाची प्रक्रिया, निर्मितीचे स्वातंत्र्य या अंगाने विचार मांडला आहे.

### ३. **कथासंग्रह समीक्षा :**

'साधना' साप्ताहिकातून ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालावधीत प्रकाशित झालेल्या कथासंग्रहाचे परीक्षण प्रकाशित झालेले आहे. या कथालेखकांमध्ये गंगाधर गाडगीळ यांचा 'कबुतरे', वामन चोरघडे यांचा 'नागवेल', व्यंकटेश माडगूळकर यांचे 'जांभळाचे दिवस', द. मा. मिरासदार यांचे 'बापाची पेंड', मनोहर तल्हार यांचे 'बुढीचं खाटलं', सदानंद रेगे यांचा 'चांदणे', प्रफुल्ल दत्त यांचा 'डोळ्यांची निरंजने', 'प्रेमपत्र' हे यमुना शेवडे, गो. रा. दोडके यांचा 'जन्म' यांसारख्या काही कथासंग्रहाचा परिचय प्रस्तुत कालखंडात देण्यात आला आहे.

दिनांक ११ एप्रिल १९५३ च्या 'साधना' साप्ताहिकात गंगाधर गाडगीळ यांच्या 'कबुतरे' या कथासंग्रहाची समीक्षा प्रा. वसंत दावतर यांनी केली आहे. प्रस्तुत समीक्षेत त्यांनी कथालेखक गंगाधर गाडगीळ यांच्या कथेचा आढावा घेतल्याशिवाय मराठी कथा वाङ्मयाचा इतिहास परिपूर्ण होणार नाही. त्यामुळे आधुनिक कालखंडातील एक नामवंत कथाकार म्हणून

त्यांच्या कथा वाचकांना परिचित आहेत. त्यांच्या या कथासंग्रहात कबुतरे, श्यामचे गुपित, वारा भरलेले शिड, माझी आजी, मृत्यूतील संजीवन, बिनचेहऱ्याची संध्याकाळ या कथांचा समावेश आहे. गाडगीळांच्या कथांतून वाचकांना बालवृत्तीतील धसमुसळेपणा, मार्दव यांचे चित्रण घडते.

दिनांक ८ फेब्रुवारी १९५८ 'साधना' साप्ताहिकात वामन चोरघडे यांच्या 'नागवेल' या कथासंग्रहाचा परिचय करून दिला आहे. या कथासंग्रहात एकूण दहा कथा आहेत. प्रस्तुत कथालेखनात विदर्भातले चित्रण येते. कारण त्यांचा जन्मच खेड्यातील. ते ब्राह्मण समाजात जन्माला आले असले; तरी आजूबाजूला असलेले गोंड, गोवारी, कुणबी लोकांमुळे त्यांना जीवनात गोंडाच्या स्त्रियांचे प्रेमच अधिक मिळाले. पुढे शहरी वातावरणातही हे बालपणीचे संस्कार त्यांच्यावर असलेले दिसून येतात. त्यांच्या प्रस्तुत कथासंग्रहात खेड्यातील वातावरणाच्या संस्काराचे चित्रण. घरट्याबाहेर, भागाबुढीच्या मताने, दुवा, चार अध्याय, दुर्बिण या कथांतूनही रेखाटले आहे. 'घरट्याबाहेर' या कथेत सुनांच्या एकत्र प्रवासातील संभाषण आहे, तर 'भागाबुढीच्या मताने' या कथेत आपल्या गावाला परतलेल्या स्त्रिया एका झाडाखाली इतर सोबतिणीची वाट पाहत गप्पा मारतात. या गप्पा वेगवेगळ्या विषयांवर आहेत. तर 'दुवा' या कथेतील विवाहित रत्नी बारा तेरा वर्षांच्या नायकाच्या शरीराशी आणि मनाशी खेळते. नायकाला वर्ष-सहा महिन्यांनी वाड्यात पोहोचविते. त्याप्रसंगी ती म्हणते, 'मालकीणबाई, छोटा मालक आता तुमच्या जातीचा राहिला नाही. या चंदनाच्या झाडाची रोज सांजच्या प्रहरी दीष्ठ काढीत जा पाचदहा वर्षानं याचं लगीन झालं म्हणजे तुमच्या साऱ्याचा अन् नव्या मालकिणीचाही दुवा घेईन मी.''[६३]

प्रस्तुत संदर्भावरून आपल्याला विवाहित स्त्रीच्या मानसिकतेचे जसे दर्शन घडते तसे १२ ते १३ वर्षांच्या मुलाच्या भावभावनांचे चित्रण ती करते. त्यातील गूढ वाचकाच्या लक्षात येते. 'शासन' या कथेत दोन छोट्या मुलांचे भावविश्व, तर 'दुर्बिण'मध्ये शहरातील संस्कारांचे महत्त्व व चोरी या कथेत दोन कारकुनांच्या हॉटेलातील गप्पांतून आर्थिक चणचण असतानाही सद्सदविवेक बुद्धीने वागण्याची दिशा देते. तर शहरी जीवनाचे चित्रण चार अध्याय, लक्ष्मणरेषा, बळी या कथांतून घडते. वामन चोरघडे यांचे साहित्य वास्तवाचे भान देते. नागवेलीने मराठी लघुकथेला एक वेगळेच वळण दिले आहे, हे वाचकांच्या लक्षात येते.

'जांभळाचे दिवस' या व्यंकटेश माडगूळकरांच्या कथासंग्रहाचा परिचय दिनांक ८ फेब्रुवारी १९५८ च्या अंकातच करून दिला आहे. या कथासंग्रहात एकूण दहा कथा आहेत. व्यंकटेश माडगूळकरांची ओळख म्हणजे माणदेशी माणसे व बनगरवाडी या कलाकृतीची निर्मिती करणारे लेखक हीच आहे. 'जांभळाचे दिवस' या कथासंग्रहातील 'अनवाणी', 'सकाळची पाहुणी' या कथा वाचनीय आहेत; तर 'शाळा तपासणी' व 'बाई' या कथा शहरी व खेडूत संस्कृतीचे जीवनाचे दर्शन घडविते. तर 'सायकल' ही कथा विसाव्या शतकातील तांत्रिक प्रगतीनंतरही दुबळ्या राहिलेल्या माणसांच्या शकुन-अपशकुनाचे प्रतिबिंब घडविते. 'जांभळाचे दिवस' या कथेत पौगंडावस्थेत भेटलेल्या चमनच्या सहवासातील जांभळाचे दिवस कसे गेले याचे चित्रण आहे. एकूण आधी प्रकाशित झालेल्या 'बनगरवाडी' व 'माणदेशी माणसं' एवढा हा कथासंग्रह परिणामकारक नाही, याची खंत व्यक्त केली आहे. तर याच अंकात 'वास्तू' हा वसंत वऱ्हाडपांडे यांच्या अकरा कथांचा पहिला संग्रह असून, या कथा १९४८ ते १९५४ या कालखंडातील आहेत. या संग्रहातील 'निळ्या डोळ्यांची कथा' या कथेतील नायिकेला ती वांझ म्हणून तिला नांदावयाला तयार नसणारा पती, तर 'मधला दुवा' या कथेतील अल्फा आपल्या नवऱ्यापासून सोडवणूक करून एकाकी जीवन जगते, तर 'पिंजरा' या कथेतील मुलाला दत्तक देताना आईची होणारी कालवाकालव व बालमनाला होणारा क्लेश रेखाटला आहे. या तीन कथा मातृत्वाची जाणीव करून देणाऱ्या आहेत. या कथासंग्रहातील 'वास्तू' ह्या कथेत एका जुनाट वाड्यात नवीन संस्कृतीने भारावलेल्या आपल्या छोट्या मालक आणि मालकिणीची देवघरातील महादेवाच्या भंगलेल्या मूर्तीला विनवू लागतात. हा वाडा भयंकर अशा वादळात जमिनीला तडे पडून आजवर उभं असलेलं. इनामदाराचं नाव जगवण्याची धडपड करतो. हा वाडा मातीत विलीन होऊ दे. वसंतराव वऱ्हाडपांडे यांची ही कथा स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण आहे. असे समीक्षकाला वाटते. तर २३ ऑगस्ट १९५८ च्या 'साधना' साप्ताहिकात 'बापाची पेंड' या द. मा. मिरासदार यांच्या कथासंग्रहाचा परिचय जयंत लेले यांनी करून दिला. या कथा १९५३ ते १९५६ या काळात मौज, सत्यकथा या नियतकालिकांतून प्रकाशित झालेल्या असून, 'बापाची पेंड' या कथेत बापाने पेडेंत दडवून ठेवलेली अफू पेंड समजून आपल्या मास्तरांना खाऊ घालणारा भायगुड्यांचा दिवटा आपल्या गुणी जीवनाचा परिचय करून देतो. त्याच वेळी अफू खाणाऱ्यांचा गोंधळ सुरू होतो. याशिवाय 'व्यंकूची शिकवणी' या कथेत व्यंकूकडून

इष्काचे आंबट–गोड धडे घेणारे कोवळ्या वयाचे मास्तर जेव्हा त्याची विद्या त्याच्यावरच उलटतात तेव्हा विनोदनिर्मिती होते. ‘कळस’ व ‘माझी पहिली चोरी’ या कथांचा समावेश या कथासंग्रहात झालेला असून या कथासंग्रहात भावदर्शन, स्वभावदर्शन नाही, आत्मनिष्ठाही नाही, पण संभाषण, सूचक स्वभावदर्शनाच्या छटा आहेत. या कथा दीर्घकाळ वाचकांच्या मनाला स्पर्श न करता सहज सरकत जाते. यातून त्यांचे हे पुस्तक वाचकांचे मनोरंजन करते. तर २३ मे १९५९च्या ‘साधना’ साप्ताहिकात वसंत पळशीकर यांनी सदानंद रेगे यांच्या ‘चांदणे’ या कथासंग्रहाचा परिचय करून दिला आहे. चांदणे या कथासंग्रहात ‘सीझरचे रक्त’, ‘बदली गोष्ट’, ‘प्रतिष्ठा‘, ‘अश्वमेघाचा घोडा’, ‘दरोडा’, ‘मिशा,’ वेतन, बातमी थडग्यांचा आक्रोश’, ‘चांदणे’, ‘रेनकोट’, ‘सुनो मोरे पपीपरा’ या कथा आल्या असून, रेनकोट व सुनो मोरे पपीपरा या कथांची सुरुवात काव्यात्म आहे.

‘साधना’ साप्ताहिकातून पुस्तक परिचय या सदरात आलेल्या निवडक कथासंग्रहाचा आढावा या प्रकारात घेतला आहे. यातून समीक्षकांचा पुस्तकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यक्त होतो. समीक्षा वाचून वाचकांना कथासंग्रह वाचनास प्रोत्साहन मिळते.

### ४. **कादंबरी समीक्षा** :

सन १९४८ ते १९६० या कालखंडात कादंबरी समीक्षा प्रकाशित झाली आहे. यातून कादंबरी, कादंबरीची वैशिष्ट्ये, बारकावे समीक्षकांनी टिपलेले आहेत.

वि. वा. हडप यांनी लिहिलेली ‘कादंबरीमय अँगलशाही’ ही समीक्षा दिनांक २० ऑक्टोबर १९५१ रोजी ‘साधना’ साप्ताहिकात प्रसिद्ध झाली. वि. वा. हडप यांची गणना विपुल लेखन करणारे लेखक म्हणून जशी आहे, तसेच विचित्र लेखन करणारे लेखक म्हणूनही प्रसिद्ध आहेत. त्यांनी लिहिलेल्या ‘कादंबरीमय अँगलशाही’ या नावावरून असे लक्षात येते की, भारतातील ब्रिटिश आमदानीचा इतिहास या कादंबरीत आलेला असावा. परंतु या कादंबरीच्या पहिल्याच भागातील प्रस्तावनेत ते म्हणतात, ‘‘गांधी युगाच्या आरंभापावेतोचा इतिहास अद्यावत धरला आहे.’’ त्यांच्या कादंबरीत भारतमाते ऊठ– या पहिल्या कादंबरीत गांधीजींच्या आदेशावरून देशप्रेमाने प्रेरित झालेल्या मुक्त शिपायाची कथा आहे. यामध्ये परकीयांशी सामना देणारी काँग्रेस पोखरत आहे, हे चित्र लेखकाने रेखाटले आहे. तर भारतमातेची हाक– या कादंबरीत भारतमातेचा शाप, भारतमाता वनवासी, भारतमातेचे दिव्य, भारतमाता की जय, या

वि. वा. हडप यांच्या कादंबऱ्यांतून साम्यवादी दृष्टिकोनातून व्यक्त झाला आहे. या सहा कादंबऱ्यांतून साम्यवाद आणि कॉंग्रेस यांच्या दृष्टिकोनातून व्यक्त होतो. तर श्री. ना. पेंडसे यांच्या 'गारंबीचा बापू'ची समीक्षा वसंत दावतर यांनी केली. ती दिनांक १० मे १९५२ रोजी प्रकाशित झाली. धीरोदात्त व जोमदार जीवनाचे चित्रण आहे. गारंबीने ज्याचा सतत अव्हेर केला, तिरस्कार केला. पण अखेर नाइलाजाने का होईना मिळवलेल्या पैशामुळे व कर्तृत्वामुळे ज्याच्या जीवनाची दखल गारंबीला घ्यावी लागली. त्या बापू सामंताच्या बेछूट व स्वच्छंदी; पण स्वाभिमानी मनाचे, इमान राखणाऱ्या जीवनाचे दर्शन 'गारंबीचा बापू' या कादंबरीत येते. या कादंबरीत बापूच्या जीवनाच्या अवतीभोवती राधा, विठोबा, दिनकर आदी पात्रांचे शब्दचित्र पेंडसे यांनी रेखाटले आहे. या कादंबरीची प्रमुख वैशिष्ट्ये 'प्रभावी निवेदन, सहज स्वाभाविक संवादलेखन आणि जिवंत प्रादेशिक वातावरण' या प्रादेशिक वातावरणात इरसाल शिव्या, तर कधी सहज साधारण युक्तीने तर कधी क्रियापदांचा विशिष्ट रूपाने भोवतालच्या निसर्गाला सजीव केले आहे हे होय.''[६४]

शहरी जीवनापासून दूर असलेल्या जीवनाचे विविध पैलू या कादंबरीत आलेले असल्यामुळे मराठी कादंबरीच्या भांडारात आणखीन एक भर पडेल, असे म्हटले तर वावगे ठरू नये. हे समीक्षण वाचत असताना वाचकांना गारंबीचा बापू वाचण्याची मनोमन इच्छा निर्माण होते. लेखकाची भाषाशैली, त्याचे संवाद, निवेदन पद्धती, पात्र चित्र यांची माहिती छोट्या छोट्या प्रसंगांतून समीक्षकाने करून दिली, तर 'साधना' साप्ताहिकात श्री. गो. नी. दांडेकर यांच्या 'शितू' या कादंबरीचे समीक्षण प्रा. वसंत दावतार यांनी दिनांक ३ जुलै १९५४ रोजी करून दिले आहे. गो. नी. दांडेकर यांची 'शितू' ही कादंबरी प्रथम सत्यकथेमधून क्रमश: प्रसिद्ध झाली. टीकाकारांच्या मार्गदर्शनातून शितूचे प्रत्यक्ष लेखन झाले. शितू ही एक हृदयस्पर्शी कथा असल्याचा निर्वाळा मौज प्रकाशनच्या जाहिरातीतून दिला. नेपथ्यरचना, शितू कादंबरीतून कोकणचे, कोकणच्या खाडी काठाचे, बंदराचे, घर, वाटा, दुकान, भांडण यांचे चित्रण आले आहे. इतकेच नाही तर इथल्या निसर्गप्रमाणे माणसंही त्यांच्या हालचाली, त्यांचे रीतीरिवाज, मासळी खाताना गळ्यातील माळ देवासमोर टांगून ठेवणारे वारकरी, थोड्याशा वेगळेपणे वेडसरपणे वागणाऱ्या माणसाला सिद्धपुरुष समजून लौकिक दु:खाच्या निवारणासाठी त्याच्या मागे लागणारे. याचबरोबर गावकरी जनावर म्हणजे साप, मंदिरातल्या दगडाला चिकटून

असलेली कालवे, कोकमाची झाडे किंवा कोकमी असले खास शब्दप्रयोग मांगवलेत, जल्ला फलला, दाकाव, येताव अशी क्रियापदाची रूपे 'ड'बद्दल 'र'चा वापर (उदा. यातून दिरकी तोरु) मना (म्हणजे मला), मांगा (म्हणजे मागे) असली काही रूपे; यातून दक्षिण कोकणाचे नव्हे; तर बाणकोटी असल्याचे निरीक्षण नोंदवतात. शितू कादंबरीच्या उत्तर भागात शितूच्या अंतर्मुखतेचे चित्रण इतके भरीव झाले नाही. त्यात रंग भरले गेले नाहीत. विसू व शितू यांचे संवाद केतकीच्या वनातून परतताना विसूने केतकीच्या कणसातले एक पिवळेधमक नाजूक पान काढले आणि ते शितूच्या वेणीत खोवून, तो म्हणाला, किती छान दिसतेस, तू फूल का घालीत नाहीस अंबाड्यात? या वेळी शितूची मुद्रा खरकन उतरली व ती मला हे पान काढून टाकीत म्हणाली ''मी घालायची नाहीत फुले'' विसूने कारण विचारता, ''माझे नवरे मेले ना? मी घोखाई आहे.''[६५] असे उत्तर तिने दिले. या प्रसंगातून विधवा स्त्रीच्या जीवनातील बारकावे ते टिपतात.

समीक्षकाने या कादंबरीचे समीक्षण करतांना कादंबरीतील नेपथ्य, भाषाशैली, पात्र चित्रण, कादंबरीतील सकस, तसेच त्यातील विनाकारण आलेल्या प्रसंगांचे चित्रण केलेले आहे. उदाहरणार्थ– 'मांजराच्या गळ्यात घंटा बांधणे' याऐवजी 'बोक्याच्या गळ्यात घंटा बांधणे.' या कादंबरीच्या सुरुवातीलाच विसू आणि शितू यांच्याबाबतीत श्रीकृष्ण–द्रौपदीच्या नात्याचा दृष्टान्त लेखकाने वापरलेला आहे. नको तेथे दांडेकरांच्या पुराणप्रिय पिंडाने शितू कादंबरीचा बाज बिघडला आहे असे वाटते. असे असले तरी, ही कादंबरी वाचकांनी मुळातून वाचावी अशी जाणीव समीक्षेत लेखक करून देतात.

शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या नव्या धर्तीची कादंबरी क्षिप्रा हिचा परिचय प्रा. वसंत दावतार दिनांक ९ ऑक्टोबर १९५४ 'साधना' साप्ताहिकात वाचकांना करून देतात. क्षिप्रा या कादंबरीत कौटुंबिक जीवनचित्र आकर्षक पद्धतीने मांडले आहे. हरी नारायण आपटे, वामन मल्हार जोशी यांची भावक्षमता आणि नंतर मुक्तीबरोबर जीवन अनुभूतीचा वारसा असलेली परंपरा सांभाळण्याचे काम फार तुरळकपणे होत असलेल्या काळात क्षिप्राचे मनोभावे स्वागत व्हावे. प्रा. कुसुमावती देशपांडे व प्रा. वा. ल. कुलकर्णी या दोन समीक्षकांनी क्षिप्राला सुलक्षणी व प्रत्येकाने मान्य करावी, इतकी चित्रायकुशलता व आशयघनता या कादंबरीत आलेली आहे. 'विशू' हा या कादंबरीतील नायक कल्पिलेला असला, तरी त्याच्या व्यक्तिरेखा निर्मिणाऱ्या

आणि वाढविणाऱ्या या कादंबरीतील प्रत्येक व्यक्तीचा जीवनपट सारखाच आणि विशूइतकेच महत्त्वपूर्ण आणि प्रमुख स्थान आहे. हे या कादंबरीचे वेगळेपण. या कादंबरीतील कथा, प्रदेश, कथावस्तू आणि स्वभाव यांचा समतोल आहे. प्रत्येक वेळी व्यक्ती वेगळी असली, तरीही तिचे स्वतंत्र अस्तित्व मुक्तिबोध व्यवच्छेदकपणे मांडतात. या कादंबरीत प्रत्येक व्यक्तीला महत्त्वपूर्ण स्थान असून, चित्रणात ठोकळेबाजपणा नाही. बापू आणि रमाबाई यांचे चित्रण, कलात्मकतेची साक्ष देते. सुमीचे अबोल व्यक्तित्व, त्याचबरोबर कादंबरीतील उणिवा, विसंगतीपूर्ण प्रसंग, याबद्दल स्पष्ट मते मांडलेली दिसून येतात.

प्रा. राजाध्यक्ष म. वी. यांनी 'साधना' साप्ताहिकात दिनांक १५ जानेवारी १९५३ रोजी 'मृद्‌गंध' व 'पासंग' या दोन पुस्तकांचे समीक्षण केले आहे. त्यातील पहिला 'मृद्‌गंध' हे विंदा करंदीकरांचा कवितासंग्रह, तत्पूर्वी विंदा करंदीकर यांचा स्वेदगंगा हा पहिला कवितासंग्रह होय. प्रकाशित कवितासंग्रहावर रविकिरण मंडळातील माधव ज्यूलियन यांची छाप दिसून येते. तसेच 'मृद्‌गंध' या कवितासंग्रहावर दिसून येत नाही. यात मातीचा वास आणि रंग आहे. तशी आकाशाची निळी ओढ, स्वप्नही आहेत. ही स्वप्न मातीच्या वैभवाची आहेत तसेच आकाशाला गवसणी घालण्याचीही आहेत. या कवितासंग्रहात अशाच वेळी, मातीचे महाभारत, मृण्मयी मुक्ती, ती जनता अमर आहे, यांसारख्या कवितांतून आर्थिक आणि सामाजिक अन्यायाबद्दल चीड व्यक्त झालेली असून, बाजारी संस्कृतीचे चित्रण आले आहे. या संदर्भात ते लिहितात, ''प्रभावी विज्ञानेही ठरतात. नपुंसक. मानवी बुद्धीला लागते स्वीकारावे. पोटाचे दास्य आणि प्रतिभा बनते रखेली'' करंदीकरांची काव्यमय भाषा कधी धुंद करते, तर कधी साधीसुधी बोलीभाषा भेटीला येते. कधी उपयोगासाठी तर कधी बेडरपणे गंभीर भावनेसाठी. बोली भाषेतील जोम आणि सजगपणा यांनी ती भावना जिवंत होते आणि गद्याला काव्याची झळाळी चढते. रत्नागिरीतील कोकणी भाषेचा करंदीकरांनी चपखल उपयोग केला आहे. हात राखून प्रादेशिक देणे. पिस रोवण्यासाठी, मिरवण्यासाठी नव्हे, करंदीकरांचे काव्य म्हणजे समाजाच्या सुख–दुःखाचे काव्य. जातिभेद, वर्णाश्रमधर्म ते मानत नाहीत. 'पासंग' हा कुसुमावती देशपांडे यांचा लेखकसंग्रह होय. यातील 'भारतातील कला आणि मध्यम वर्ग' या लेखात त्या म्हणतात, ''आजपर्यंतचे जीवन आपल्या उच्च व मध्यम वर्गाच्या तालाने चाललेले असेल. उद्याचे जीवन प्रचंड व मर्यादित अशा बहुजन समाजाच्या तालाने चालणार आहे.''[६६] मोजकेच पण मोलाच्या

लिहिणाऱ्या म्हणून कुसुमावतींची ख्याती आहे. उसनवारी, गैरलागू विद्वत्तेचा पसारा, शाब्दिक पाल्हाळ आणि सूक्ष्म व्यासंग, सूक्ष्मता उकलून दाखवू शकणारी भाषेची कळ, पण मधूनच संस्कृत शब्दांची लहर त्यांच्या लेखनात दिसून येते.

श्रीपाद जोशी यांची 'विस्कटलेलं घरटं' ही कादंबरी १८ मे १९५७ मध्ये प्रकाशित झाली. यदुनाथ थत्ते यांनी समीक्षण केले. 'विस्कटलेलं घरटं' ही श्रीपाद जोशी यांची दुसरी कादंबरी होय. तर 'सुरंगा' ही पहिली कादंबरी होय. साज कादंबरीचा, पण अंतरंग गंभीर आहे. समस्यात्मक कादंबरीमध्ये गणना होईल असे कादंबरीचे स्वरूप आहे. या कादंबरीतील समस्या विक्राळ स्वरूपात उभी केली आहे. जोशी म्हणतात, ''महाराष्ट्रातला ब्राह्म-ब्राह्मणेतर वाद हे एक नाजूक दुखणे असून भलत्याच अवघड जागी ते झालेले आहे. यामुळे त्याच्या संबंधी जरी आम्ही आपापसांत बेकारपणे बोलत आणि कृती करीत असलो तरी जाहीरपणे तटस्थ वृत्तीने तिची चिरफाड करावी हे आपल्यापैकी बहुतेकांना आवडत तरी नाही किंवा गैरसोयीचे तरी वाटते,''[६७] असे मत व्यक्त करतात.

तर जातीची व्याख्या करताना ते लिहितात, 'लाख प्रयत्न करूनही जी जात नाही' ती जात. महाराष्ट्र ही संतांची भूमी असून, साधुसंतांनी जातीला वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात स्थान दिले नाही तर 'पायाची वहाण पायी बरी' या म्हणीप्रमाणे या कादंबरीत इंग्रजांचे आगमन, त्यांचे सत्ता स्थापन करणे, जाती अंताचा फक्त बागूलबुवा, जातीय निवाडा आणि स्वतंत्र मतदारसंघ, जातीय वादाचा बुरखा, दक्षिण महाराष्ट्रातील जातीयवाद, शहरांतील जातीयवाद ही या कादंबरीची पार्श्वभूमी त्यांनी निवडली असून, देशात कोकणाच्या सरहद्दीवरील कोल्हापूरजवळील उसगांव या गावात ब्राह्मण-ब्राह्मणेतर आणि हरिजन हे तीन समाज श्रीपाद जोशी यांनी कादंबरीत रेखाटला आहे. महाराष्ट्रातील जातीयवादाची चर्चा तटस्थ आणि निर्भीडपणे ते करतात. हरिजन बाळ आणि ब्राह्मण बिंदू माधव वडेर यांच्या चरित्राभोवती ही कादंबरी गुंफली असून, सामाजिकदृष्ट्या प्रक्षोभक कादंबरी लेखनात त्यांना यश आले. या कादंबरीचा विषय आंतरजातीय विवाह आहे. सन १९२२ ते १९५७ हा कादंबरीचा कालपट असून या काळात ग्रामजीवनातील बदल अधोरेखित केले आहेत. पण काही ठिकाणी हानी झाली. महाराष्ट्रातील जातीयवादाचे स्वरूप समजून घेण्याची इच्छा असलेल्यांनी ही कादंबरी वाचावी, असा मोलाचा सल्ला समीक्षक देतात. 'माचीवरल्या बुधाच्या निमित्ताने' दिनांक २९

मार्च १९५८ मध्ये 'साधना' साप्ताहिकात गोविंद जोशी यांनी समीक्षा केलेली आहे. 'माचीवरला बुधा' ही गो. नी. दांडेकरांची वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी असून, ही त्यांची ११ वी कादंबरी आहे. व्यक्तिचित्रणाला चित्रित करण्याकरिता या कादंबरीत निसर्ग चित्रित केलेला नाही. नागरी जीवनाचे पाश गळून बुधा माचीवर धाव घेतो. माचीवर आल्यावर झोपडी बांधल्यानंतर कोंबडी कापणारा बुधा निसर्गाच्या सान्निध्यात आल्यावर वैचारिक परिवर्तन होते. हे माचीवर जखमी सरड्याला त्याच्या बिळापर्यंत पोहोचविणाऱ्या संवेदनशील बुधाचे चित्र, मानव आणि निसर्ग यांच्यातील वृत्तीचे दर्शन घडविते. ''त्याच वेळी खंडाळ्याच्या अंगाने आठ-दहा ढगही तरंगत लोणावळ्यावर आले, पण ते काही लोणावळ्यावर थांबले नाहीत. पुढे चालते झाले. असे ते लिहितात. ढग हे गाडीप्रमाणे कधीच थांबणार नाहीत.''[६८] यातून बुधाचे संवेदनशील व्यक्तिमत्त्व दिसून येते.

निसर्गातील प्राण्यांचे बारकावे समीक्षकाने टिपले आहेत. ते सजीव होऊन आपल्या नजरेसमोर चित्रमय जगत उभे करते, तसेच झाडझुडपांची वर्णनेही अप्रतिम रेखाटली आहेत. निसर्ग फळत-फुलत आपले निरामय जीवन सहाही ऋतूंतून आविष्कृत करीत आहे. बुधाच्या पूर्वजांची राख होणे, निसर्गाच्या सान्निध्यात बुधाच्या जीवनात पोकळी निर्माण केली आहे. बुधाने कुत्र्याला लाथा मारणे, जीवलग कुत्र्याचा बिबट्याने घास घेणे, बुधाच्या अंत:करणाचा या कुत्र्याच्या मरणाने निघालेला लचका कुत्र्याची समाधी बांधूनही भरून न येणारा असा आहे. समीक्षकाने कादंबरीतील टिपलेले बारकावे बुधाची मानसिकता, चित्रमय शैली, निसर्गातील बारकावे, प्राणिसृष्टीशी एकरूप झालेला बुधा आपल्याला या कादंबरीत भेटतो.

तर 'साधना' साप्ताहिकात दिनांक ११ जून १९५५ रोजी लिलीचे फूल ही गंगाधर गाडगीळ यांच्या कादंबरीचे- समीक्षण माधव आचवल यांनी केले आहे. या कादंबरीत मुकुंद आणि नीला जीवनाच्या एका वळणावर भेटतात. ही त्यांच्या जीवनातील प्रीतीची कथा पूर्णत्वास जाऊ शकत नाही. पण या कादंबरीतील स्त्री-पुरुष संबंधाच्या अनेक पातळ्यांचे दर्शन होते. ही कादंबरी एक दिवस वाचकांच्या मनावर परिणाम साधते. कलात्मकदृष्ट्या सूचकतेची जाणीव असूनही काही ठिकाणी कादंबरी रहस्यकथेकडे झुकलेली दिसून येते. कलाकृती, ललितकला कृतीचे लिहिणे हे सध्याच्या चवीचे वर्णन करण्यासारखे आहे असे माधव आचवल यांना वाटते. पण तरीही ही कादंबरी आवडणे, न आवडणे हे प्रत्येकाच्या चवीवर अवलंबून आहे, असे माधव

आचवल म्हणतात. दिनांक ९ जुलै १९५५ च्या ‘साधना’ साप्ताहिकात गो. नी. दांडेकर यांच्या ‘पडघवली’ या कादंबरीचे समीक्षण आले आहे.

कोसळणाऱ्या ग्रामजीवनाचे भयानक स्वरूप या कादंबरीतून समीक्षक दुर्गा भागवत यांनी मांडले आहे. याच काळात ‘सत्यकथेत’ पडघवली क्रमाने प्रसिद्ध होत होती. बहुसंख्य वाचक तिला प्रादेशिक कादंबरी मानतात, पण गो. नी. दांडेकर यांची ‘पडघवली’ ही कादंबरी नाही, तर एका नष्ट होऊ घातलेल्या खेड्याचे चित्र आहे असे त्या म्हणतात. याचा अर्थ खेडी ही मरगळ असलेल्या आजच्या खेड्याचे प्रतिनिधिक प्रतिनिधित्व आहे.

ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडातील प्रकाशित झालेल्या ‘साधना’ साप्ताहिकाच्या माध्यमातून नामवंत लेखकांच्या कादंबरीचे समीक्षण, कादंबरीतील आशय व विषय, भाषाशैली, वैशिष्ट्ये व वेगळेपण यांची वाचकांना ओळख करून दिली आहे व त्या त्या साहित्यकृतीचे बारकावे टिपले आहेत.

**५. नाटक परिचय आणि समीक्षा :**

‘साधना’ साप्ताहिकातून १९४८ ते १९६० या कालावधीत प्रकाशित झालेल्या नाटकांची नाट्यसमीक्षा अथवा परिचय करून देण्यात आला आहे.

‘तुका म्हणे आता’ हे पु. ल. देशपांडे यांचे नाटक ‘साधना’ साप्ताहिकात दिनांक १६ जुलै १९४९ रोजी प्रकाशित झाले आहे. या नाटकात तुकारामांची गाथा ब्रह्मवृंदाने इंद्रायणीत बुडवल्यावर संत तुकाराममहाराज उपवास करीत बसले व अखेर ईश्वरकृपेने अभंग शाबूत स्थितीत इंद्रायणीत तरंगत आले, ही मूळची कल्पना आहे. या कल्पनेकडे पु. ल. अधिक बुद्धिवादी दृष्टिकोनातून पाहतात. संत तुकारामांचे बोल रानगवताप्रमाणे महाराष्ट्रात रानोमाळ रुजले होते. त्यांच्या चोपड्यांचा नाश केला, तर जनतेच्या ध्यानीमनी कोरलेले अभंग इंद्रायणीच्या डोहात नव्हे; तर लोकांच्या मनात रेंगाळत राहिले. हे सत्य या नाटकाची मध्यवर्ती कल्पना आहे. या नाटकाचे प्रयोग खेड्यापाड्यांत करावे, म्हणजे बहुजन समाजाची अंधश्रद्धा झाडून टाकता येईल, हे वास्तव मांडणारे नाटक आहे. या नाटकातील गीते ग. दि. माडगूळकर यांनी लिहिली.

‘सुंदर मी होणार’ (२४ मे १९५८) या पु. ल. देशपांडे यांच्या नाटकाचे समीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी हे होय. हे नाटक ‘द बॅरेट्स ऑफ विम्पोल स्ट्रीट’ या रुडाल्फ बेसिएच्या

नाटकावर आधारित आहे. श्री. गंगाधर गाडगीळ यांच्या पाच नाटिकांचे– समीक्षण डॉ. म. ग्रामोपाध्याय यांनी दिनांक ९ जानेवारी १९५९ रोजी प्रकाशित केले आहे.

गो. नी. दांडेकर यांच्या 'शितू–संसार' या नाटकांची समीक्षा अशोक शहाणे यांनी दिनांक २६ मार्च १९६० रोजी 'साधना' साप्ताहिकात केली आहे. गो. नी. दांडेकर यांच्या शितू कादंबरीचे हे नाट्य रूपांतर होय.

दिनांक ५ डिसेंबर १९५९च्या 'साधना' साप्ताहिकात श्री. मो. स. साठे यांचे 'पुरुषोत्तम' या नाटकाची समीक्षा राजा मंगळवेढेकर यांनी केली आहे. खेड्यातील गावगुंडी आणि दहशतवाद या ग्रामीण जीवनाला बरबाद करणाऱ्या प्रवृत्तीवर हे नाटक आहे. या नाटकात भाऊ मास्तर व बेचाळीसच्या चळवळीत क्रांतिवीर बनलेला गावगुंड संभा माने या दोन प्रमुख व्यक्तिरेखाभोवती फिरणारे हे नाटक आहे. हे नाटक आजच्या ग्रामजीवनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या रांजणवाडी या ठिकाणी घडते. या नाटकातील भाऊ मास्तर हे गावाच्या भलाईसाठी तळमळणारे, उद्याच्या पिढीसाठी खस्ता खाणारे, गावाला निर्भयता शिकविणारे आणि सत्यासाठी मृत्यूला मान तुकविणारे भाऊ मास्तर आहेत. तर खुनामागून खून करून गावाचे राजेपण प्रस्थापित करणारा संभाजी माने आहे. या नाटकातील संभाजी ही संघर्ष करणारी व्यक्तिरेखा आहे. अज्ञान, दारिद्य्र, भीती, यात पिचत असलेल्या ग्रामीण समाजातून आलेली ही व्यक्तिरेखा आहे. खेड्यातील गुंडगिरीला तोंड देणारे भाऊ मास्तर गावाच्या भल्यासाठी धडपडत आहेत, तर गावातील निकम मास्तर गाव सोडून जातात तेव्हा ते म्हणतात, आज तुम्ही रांजणवाडी सोडाल, पण दुसऱ्या गावी हाच अनुभव येणार नाही कशावरून? याचाच अर्थ घाबरून पळून जाण्यात अर्थ नाही. तर खेड्यातच राहून प्रश्न सोडविले पाहिजेत. तिसरा अंक हा नाटकातला उत्कट बिंदू आहे. भाऊ मास्तराला संभाजी खांबाला बांधून त्याना धमकी देतो. ही दोन्ही पात्रे या नाटकातील जिद्दी पात्र आहेत. याच अंकात मास्तरांचे विद्यार्थी पोलीस आल्याची अफवा पसरवितात आणि संभाजी घाबरून स्वत:वर गोळी मारून घेतो. हे सांगताना समीक्षक आजच्या खेड्यातील परिस्थिती खरंच अशी आहे का? हेही तपासून पाहतो. ठरावीक चाकोरीबाहेर एक नवीन ग्रामीण नाटक आहे. हे 'पुरुषोत्तम' नाटक रंगभूमीवर यशस्वी होईल. इतकेच नाही तर सुटसुटीतपणा, संवाद, सुभाषिते आणि विनोदी प्रसंगांमुळे हे नाटक प्रेक्षकांना भावते.

'शितू' हे नाटक कादंबरीला प्रामाणिक राहिले आहे. शरदचंद्री लिखाणाची कोकणी नक्कल वाटते, शितू नाटकातून कादंबरीतील संवाद जसेच्या तसे ठेवून निवेदनात्मक भागाचा प्रयोगात्मक उपयोग करून केलेले नाटक आहे. काल्पनिक व्यक्तिरेखा रंगमंचावर प्रत्यक्ष येऊ शकलेल्या नाहीत, हे या नाटकाचे अपयश. तसेच नाटकाचे प्रयोगमूल्ये दिग्दर्शकावर अवलंबून असते, या संबंधी समीक्षक़ाचे निरीक्षण दिसून येते. नाटकाचे एकत्रित परिणाम हे नाटकाच्या सादरीकरणातून जाणवत नाही. अंक सुटे वाटतात. शिवाय नेपथ्याचा विचार केला तर रंगमंचावर उगीच वस्तूंची गर्दी असल्याचे जाणवते. पण या नाटकातील 'शितू' गंगेच्या स्नानासाठी जातो पण वरून रंगमंच येतो. तेव्हा रंगमंचावर कोणीही नाही पण सपाट उभी राहिल्यामुळे तो प्रसंग अविस्मरणीय झाला आहे. नाटकाच्या सुरुवातीला नाटकातील भूमिकांच्या स्लाइड दाखविल्यामुळे या नाटकातील नवीन कल्पना लक्षात येतात.

'संसार' हे सौ. मुक्ताबाई दीक्षित यांचे अपरिचित अशा दुसऱ्या शतकातील बौद्ध धर्माच्या ऱ्हासाच्या पार्श्वभूमीवर प्रेम म्हणजे स्त्री–पुरुष प्रेम आणि धर्म यांच्यामधील संघर्षाबाबत एक प्रबंध असल्याचे जाणवते. पण शेवटी प्रेमाने धर्मावर विजय मिळविता येतो, हा आशावाद या नाटकातून आला आहे. खरे तर हा वैचारिक प्रबंध जाणवतो. बौद्धिक चर्चांना उधाण येते. नाटकातील कलाकार तोलामोलाचे नाहीत, हेही लक्षात येते. पात्र आणि त्यांच्या हालचाली यांचा एकसूत्रीपणा जाणवत नाही.

### ६. **पत्रलेखन/ पुस्तक परिचय** :

ना. ग. गोरे यांच्या 'करवंदे' या पुस्तकाचा परिचय. 'साधना' साप्ताहिकात दिनांक ५ फेब्रुवारी १९५५ रोजी करून दिला. हे पुस्तक चित्रशाळा प्रकाशन, पुणे यांनी छापलेले आहे. मुलांनी स्वत: शोधक व्हावे. करवंदीच्या जाळीत काट्याकुटांतून करवंदे काढताना टोचणाऱ्या काट्याकडे लक्ष न देता कधी तुरट, कधी गोड करवंदे टिपण्यास उद्युक्त व्हावे. त्यासाठी आंबट–गोड करवंदाचा द्रोण स्वत:प्रमाणेच ना. ग. गोरे यांनी शुभाच्या हातात मुलांना वाटण्यासाठी दिलेला आहे. मुलांनीही मिटक्या मारीत तो फस्त केला आहे. करवंदे म्हणजे भारतीय परंपरेप्रमाणे इंद्र फळे. इंद्राने अमृताची चूळ वळवाच्या पावसाच्या रूपाने टाकावी आणि मग ही फळे धरावी तसे गोऱ्यांनी धडावर बागायती कलम करून अधिक टपोरी आणि रुचकर फळे निर्माण केली आहेत. पण हे करत असताना करवंदाच्या चिकाचे कुठेही वर्णन येत नाही.

पत्रातील विषयांची विविधता म्हणजे हे पुस्तक होय. पत्रातील विषयांची विविधता विमान प्रवासाच्या मौजेपासून सुरू होते. दिल्लीचे मनोज्ञ दर्शन, रत्नागिरीच्या पावसाचे सुंदर अनुभव, नागफणीचे वर्णन, मणिपूर आणि ब्रह्मदेशातील कितीतरी गोष्टी, फक्त प्रवासवर्णनात स्थळदर्शनातून निसर्ग शोभित करते. त्याचबरोबर 'बालवाडीचा माळी' नावाचे पत्र त्यांनी रेखाटले आहे, यात सानेगुरुजींचे चित्रण. नेहरूंनी इंदिरा हिस पत्र लिहून या साहित्य प्रकाराची सुरुवात केली. त्यातून स्फूर्ती घेऊन सानेगुरुजी, श्री. ना. ग. गोरे यांनी पत्रे लिहिली. नेहरूंनी इंदिरेस, सानेगुरुजींनी सुधाला, ना. ग. गोरे यांनी शुभास पत्र लिहिण्याचा प्रपंच केला आहे. मराठीत पत्र लिहिण्याची परंपरा ही जुनी आहे. हरिभाऊ आपटे, काशीबाई कानिटकर, कमळाबाई किवे यांच्या काळातील काही भाषांतरित स्वतंत्र अशी गोविंदरावांची मुलास पत्रे, सगुणाबाईची मुलीस पत्रे, इंदिरेस पत्रे ही प्रसिद्ध आहेत. यात उपदेश आहे. या संदर्भात दुर्गाबाईंना असे वाटते जिवंत भावनेच्या गहिऱ्या छटांनी रंगवलेले समवेदनांनी अंकुरित झालेले व्यक्तिदर्शन घडविणारे पत्र वाङ्मय हवे असले; तरी ते जुने साचे झुगारून देण्याची वेळ आता आली आहे, असे त्यांचे मत आहे. या संदर्भात कुमार व प्रौढ वाङ्मयाचा भेद ठेवून चालणार नाही. असे त्या म्हणतात.

प्रफुल्ल दत्त यांच्या 'डोळ्यांची निरांजने' ह्या पुस्तकाचा दिनांक २३ ऑगस्ट १९५८ च्या अंकात परिचय करून देण्यात आला आहे. खानदेशातील एक अस्पृश्य शिक्षक आपल्या स्पृश्य विद्यार्थ्याला पत्र पाठवितात. त्याच्या उच्च शिक्षणाच्या काळातील ही पत्रे आहेत. विद्यार्थ्यांच्या मनाच्या जडणघडणीत गुरूचा महत्त्वाचा वाटा असतो हा दृष्टिकोन दिसून येतो. पण या पत्रांमध्ये लेखकाने कवी यशवंत, केशवसुत, तुकोबा, सानेगुरुजी, शिवाजी महाराज यांच्याविषयीचा आदर व्यक्त करण्यासाठी वापरलेल्या क्लृप्त्यांमुळे पत्र वाङ्मयाच्या भाषेत प्रसन्नता वाटत नाही. या पत्रात्मक पुस्तकामुळे वाचकास नेहरूंनी लिहिलेल्या 'इंदिरेस पत्र'ची आठवण नक्कीच येते. सानेगुरुजींनी सुधास लिहिलेली सुंदर पत्रे, ना. ग. गोरे यांची शुभास पत्रे या पत्रात्मक साहित्यावरून कदाचित लेखकास ही पत्र लिहिण्याची कल्पना सुचली असावी, असे वाटते.

## ४.३६ 'साधना'तून प्रकाशित झालेली इतर पुस्तकांची समीक्षा/परिचय :

### १. **आशियामुळे ही समृद्धी** :

दिनांक २१ जुलै १९५० च्या 'साधना' साप्ताहिकात 'आशियामुळे ही समृद्धी' या पुस्तकाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा दोन भागांत परीक्षण आले आहे. मूळ इंग्रजी 'रिचर बाय एशिया' या पुस्तकाचे भाषांतर 'आशियामुळे ही समृद्धी' या नावाने आले आहे. एडमंड टेलर या अमेरिकेमधील वृत्तपत्र लेखकाने १९४२ साली लॉर्ड माउंटबॅटन यांच्या नेतृत्वाखाली आशियात युद्ध आघाडी उघडण्यात आली. या दरम्यान आशिया खंडातील भ्रमंतीत हिंदुस्थानात ते अधिक काळ होते. या दरम्यान त्यांनी नोंदविलेली मते म्हणजे हे पुस्तक होय. पूर्व व पश्चिम यांच्यात सलोखा निर्माण होऊन जागतिक शांतता प्रस्थापित होईल. काळा किंवा गोरा हा वर्णभेद न करता मानव ही एकच जात असून, सर्व जगात एकच कुटुंब आहे. हा विचारबुद्धीला पटला; पण आचरणात आणू शकले नाही. तीन वर्षांच्या आशियाच्या भ्रमंतीत एडमंड टेलर यांना एकाच गोष्टीचा ध्यास होता. तो म्हणजे मानवजातीच्या ऐक्याचा साक्षात्कार. राजकारण आणि मानसशास्त्र समजल्याशिवाय मनुष्यमात्रांच्या जडणघडणीत आर्थिक, सामाजिक व राजकीय घटनांचे ज्ञान प्राप्त झाल्याशिवाय आत्मज्ञान प्राप्त होत नाही. विज्ञानाने प्रगती साधली, पण मानवी जीवनातील भीती नाहीशी झाली नाही. स्वसंरक्षण मानवाच्या धडपडीचे मूळ आहे. आशिया खंडातील प्रवासामध्ये 'सत्य व आभास' समजत नाही. हेच मुळी मानवी जीवनातील समस्या सोडविण्यात अडचण आहे, असे एडमंड टेलर यांना वाटते.

### २. **विज्ञानप्रगती व मानवाचे भवितव्य** :

दिनांक १ जानेवारी १९५३ रोजी 'विज्ञान प्रगती व मानवाचे भवितव्य' हे 'इम्पॅक्ट ऑफ सायन्स ऑन सोसायटी' या पुस्तकाचे लेखक बर्ट्राड रसेल आहे. यांचे समीक्षण श्री. वसंत नारगोळकर यांनी केले. व्यक्तिस्वातंत्र्याचा व लोकशाहीचा उदो उदो करणारी; परंतु श्रमाविना मरण्याचे स्वातंत्र्य देणारी भांडवलशाही व व्यक्तिस्वातंत्र्याची पूर्णपणे गळचेपी करून समाजात आर्थिक समता प्रस्थापित करू पाहणारी एकपक्षीय हुकूमशाही यांनी विज्ञानाचा घातक उपयोग करण्याचे कार्य चालू ठेवल्यामुळे जगावर आज ही आपत्ती कोसळली आहे व जगापुढे जी समस्या उभी राहिली आहे तिचे रसेल यांनी मार्मिक व मूलग्राही विश्लेषण केले आहे.

### ३. अणुशक्तीचे रहस्य :

दिनांक ९ एप्रिल १९५३ च्या 'साधना' साप्ताहिकात' अणुशक्तीचे रहस्य' या पुस्तकात गॉर्डन डीन यांनी अणुशक्ती, तिचे कार्य इत्यादींबद्दल अमेरिकी जनतेला स्पष्ट कल्पना यावी या उद्देशाने 'रिपोर्ट ऑन ॲटम' हे पुस्तक लिहिले. हे पुस्तक अमेरिकी वाचकांसाठी असल्याने हिरोशिमा व नागासकीवर अणुबाँब टाकल्यानंतर अणुशक्तीच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियंत्रणासंबंधी अमेरिकेत प्रश्न निर्माण झाले. या पुस्तकाचा उद्देश सामान्य माणसांना अणूची ओळख व्हावी हा आहे.

### ४. संशोधन लेखसंग्रह :

साहित्य संशोधनाचा आदर्श ग्रंथ 'संशोधन लेखसंग्रह' या ह. ना. मेने यांच्या पुस्तकाचा रामचंद्र ढेरे यांनी दिनांक ५ एप्रिल १९५४ च्या अंकात परामर्श घेतला आहे. त्यांनी महानुभावीय वाङ्मयाचे संशोधन केले. महात्मा चक्रधर, चक्रधरप्रणीत महानुभाव, पंथ आणि चक्रधरकालीन महाराष्ट्र यांचे हृदयंगम दर्शन घडविणारा लीळाचरित्र, चक्रधरसिद्धान्त सूत्रे, दृष्टान्तपाठ, चक्रधरोक्त सूत्रपाठ, नित्यदिनी लीला, आचारस्थळ आणि लक्ष्मण रत्नाकर इ. ग्रंथांवर प्रकाश टाकला आहे. महानुभव सांप्रदायिक साहित्याची तुलना केवळ चैतन्य संप्रदायाशीच करता येईल. या लेखसंग्रहात विवेचनासाठी घेतलेल्या आठ ग्रंथांत नरेंद्राचे रुक्मिणी स्वयंवर, गोपाळ कवीचे रुक्मिणी स्वयंवर, सह्याद्रीवर्णन आणि हाय ग्रीवाचार्याचा गद्यराज हे काव्यग्रंथ, स्थानपोथी हा चक्रधरांचा संचारांतील सुस्पष्ट स्थळांचा परिचय देणारा ग्रंथ पारमांड्ल्य आम्नायांतील अन्वयस्थळ व वृद्धाचार आणि कृष्ण मुनीचे अन्वयस्थळ या महानुभावीय ग्रंथकारांच्या साहित्यकृतींचा स्थूल इतिहास सांगणारे ग्रंथ आणि प्रश्नार्णव हा चक्रधरांच्या विवेचन पद्धतीचे शास्त्रीय स्वरूप विशद करणारा ग्रंथ होय.

### ५. गव्हर्न्मेंट ऑफ पार्लमेंट :

'साधना' साप्ताहिकात २ जुलै १९५४ मध्ये हर्बर्ट मॉरिसन यांनी 'गव्हर्न्मेंट ऑफ पार्लमेंट' या पुस्तकात सरकार पार्लमेंट यांच्या परस्परसंबंधाचे विवेचन केले आहे. राज्य कारभाराची यंत्रणा तज्ज्ञ लोक सांभाळत असले, तरी पार्लमेंटरी संस्थांचे यश–अपयश हे राजकीय नेते अर्थात मंत्री यांच्यावर अवलंबून असते. मंत्रिमंडळापुढे कोणता प्रश्न न्यायचा आणि कोणता निर्णय मंत्र्यानी घ्यावा, हा संपूर्ण निर्णय घेताना प्रश्नाचे स्वरूप, सरकारी

धोरणाचे महत्त्व, देशात उमटणारी प्रतिक्रिया या गोष्टींचा विचारपूर्वक निर्णय त्यांना घ्यावा लागतो. जगातील अनेक लोकशाही राष्ट्रांच्या राज्यघटना अर्थात ब्रिटनची राज्यघटना आदर्श मानून तयार केली आहे. इंग्लंड हे पार्लमेंटरी लोकशाहीचे माहेरघर आहे. या पुस्तकात पार्लमेंटरी लोकशाहीच्या महत्त्वाच्या प्रश्नांचे विवेचन मॉरिसन यांना पार्लमेंटच्या कामातून आलेल्या अनुभवांच्या आधारे लिहिले आहे. या पुस्तकाचे रोहित दवे यांनी केलेले रूपांतर म्हणजे 'सरकार व पार्लमेंट' हे पुस्तक होय.

## ६. **समाईक मालकीचा नवा प्रयोग** :

या क्लेअर इचेंट बीशॉप Clair Hulchet Bishop या स्त्रीची All Things Common 'समाईक मालकी' या पुस्तकात 'समाईक प्रयोगाची सविस्तर माहिती 'साधना साप्ताहिकाच्या' २४ ऑगस्ट १९५४ च्या अंकात प्रकाशित झाली आहे. या पुस्तकात पश्चिम युरोपमध्ये समाईक कुटुंबव्यवस्था मान्य करून समाईक शेती व कारखाने चालविण्याचे व नवीन समाजपद्धती अस्तित्वात आणण्याचे प्रयोग चालू आहेत. या प्रयोगामध्ये नफा मिळविणे हा हेतू नसून एकत्र काम करून स्वतःचे व समाजाचे हित साधणे ही प्रेरणा आहे. वस्तूंच्या निर्मितीपेक्षा माणसा–माणसांत जिव्हाळ्याचे संबंध निर्माण व्हावे, हे या मागील उद्दिष्ट आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात स्वित्झर्लंड, फ्रान्स, बेल्जियम व हॉलंडमध्ये कम्युनिटीज अॅट वर्क (communities at work) हा नवीन प्रयोग सुरू झाला आहे. पंचायतीचा कारभार लोकशाही पद्धतीने चालविणे, स्वयंपूर्णता, स्वायत्ता, विकेंद्रित समाज निर्माण करून वर्गविहिन, शोषणरहित समाज स्थापन व्हावा, असाच प्रयोग भारतात विनोबा भावे यांनी पवनार या ठिकाणी कांचनमुक्तीचा प्रयोग करून 'पूर्ण ग्रामीण रोजगार' देणाऱ्या व्यवस्थेचा बेडची आश्रमात प्रयोग केला. भूदान चळवळीत साठ गावांनी आपली समग्र जमीन दान दिली. या गावांतील जमिनीचे वाटप करताना प्रत्येक गावात नवीन समाजव्यवस्था उभी करावी लागली. यांत्रिकीकरणाच्या मर्यादा, विद्युत शक्तीवर चालणारे ग्रामीण धंदे, सहकारी व सामुदायिक शेती, शिक्षण, आरोग्य, ग्रामपंचायत, खेडी व शहरे ही परस्परपूरक बनून आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी उपयुक्त व्हावे. युरोप खंडात औद्योगिक प्रगतीने माणसांचे राहणीमान उंचावले आहे. पण तरीही समाईक कुटुंब व्यवस्थेचे प्रयोग येथे होतात. हे भारतातील भूदान चळवळीशी मिळते जुळते आहे. आजही बाबा आमटे यांच्या आनंदवनात सामूहिक स्वयंपाकघर, समूह शेती हे

यशस्वीरीत्या राबविले जातात. या देशाच्या प्रगतीचे मूळ सामूहिक शेतात आहे, ही जाणीव या पुस्तकाच्या रूपाने वाचकांना होते.

**७. स्वातंत्र्य आणि समाजकल्याण :**

'साधना' साप्ताहिकात दिनांक १९ फेब्रुवारी १९५५ रोजी स्नेहवर्धन यांनी लिहिलेल्या ग्रंथाचा परिचय करून दिला आहे. लोकशाही मार्गाने शोषणविरहित समाज निर्माण करता येतो. स्वातंत्र्य सांभाळून भाकरी मिळविता येते. असा विचार मांडणारा हा ग्रंथ असून, या ग्रंथात शोषणविरहित समाजनिर्मितीच्या प्रयोगासाठी उत्तर युरोपमधील डेन्मार्क, फिनलँड, नॉर्वे, स्वीडन आणि आइसलँड ही पाच राष्ट्रे सहभागी झाली. स्वीडन व भारत या देशातील शास्त्रज्ञ, समाज कार्यकर्ते व मुत्सद्दी यांनी एकत्र येऊन अणुऊर्जेच्या संघटक सामर्थ्याचे मूल्यमापन व होणाऱ्या परिणामांसंबंधी अहवाल तयार करून अमेरिका व रशिया या देशांतील अणुगोलकांच्या वापराबाबत जागृती निर्माण करावी. सामान्य जनता, राजकारणी व मुत्सद्दी यांना जागतिक शांततेसाठी आवाहन करून मानवी अस्तित्वाला धोका निर्माण होऊ नये म्हणून हा ग्रंथ राष्ट्रांच्या सामाजिक कार्य सचिवालय यांनी तयार केला आहे. या ग्रंथात ११ प्रकरणे असून, या पुस्तकात कौटुंबिक कल्याण, गृहनिर्माण, आरोग्य व सामाजिक शाश्वती, सामाजिक सहकार्य आणि सामाजिक दृष्टिकोन यांचे विवेचन आले आहे. या ग्रंथात उत्तर युरोपामधील राष्ट्रांच्या प्रगतीसाठी केलेला प्रयत्न या विषयावर विवेचन आले आहे.

**८. चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान :**

'साधना' साप्ताहिकाच्या दिनांक २९ ऑगस्ट १९५९ च्या प्रा. सदाशिव आठवले यांच्या 'चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान' या पुस्तकात वेदान्तादि भारतीय दर्शनावर व संतांच्या धर्मचिंतनावर अन्याय करणारा असून, चार्वाकाचे मूलग्राही व सर्वंकष विवेचन मराठी भाषेत आहे.

**९. नक्षत्र लोक :**

'नक्षत्र लोक' हे पुस्तक पं. महादेवशास्त्री जोशी यांनी लिहिले आहे. यात सर्व नक्षत्रांच्या, ताऱ्यांच्या कथा सांगितल्या आहेत. या पुस्तकात सुंदर नकाशे छापले असून, एकाच ताऱ्याला अनेकांनी कोणकोणती नावे दिली व का दिले त्यांची मनोरंजक माहिती या पुस्तकात करून दिली आहे. संस्कृत वाङ्मयाबरोबरच पाश्चिमात्य वाङ्मयात ह्या ताऱ्यासंबंधी काय

म्हटले आहे, त्याचाही उल्लेख आहे. हे पुस्तक एकदा हातात घेतले म्हणजे केव्हा एकदा रात्र होते आणि आपण ही ताऱ्यांची दुनिया पाहतो, अशी विलक्षण ओढ लागते.

**१०. परजीवित रक्षण–यज्ञ** :

वीर बापूराव गायधनी यांच्या जीवनावर आधारित 'परजीवित रक्षण–यज्ञ' या नावाचे पुस्तक छापले आहे. यात बापूरावांचे रोमहर्षक चरित्र आले आहे. या चरित्र लेखनातून सर्वांना बापूरावांविषयीची माहिती सहजपणे समजते. ही कथा मुलांना वीरत्वाचे महत्त्व सांगून परोपकारी बनण्याचे स्वप्न दाखविते.

अशा विविध विषयांवरती 'साधना' साप्ताहिकातून पुस्तक परीक्षणे प्रकाशित झाली होती.

## ४.३७ 'साधना' : साप्ताहिकातील इतर लेखन :

दिनांक १५ ऑगस्ट १९५४च्या 'साधना' साप्ताहिकात 'सोळाव्या–सतराव्या शतकांत–विदेशी पाद्री मराठी का शिकले?' या विषयावर अं. का. प्रियोळकर यांनी लिहिलेल्या लेखात विदेशी पाद्री मराठी भाषा का शिकले, कुब्जविहार ह्या गोवे सरकारचे जनरल सेक्रेटरींनी १८५६ साली गोव्याच्या पोर्तुगीज नॉर्मल स्कूलमधील भाषणात पोर्तुगीजांनी देशी भाषा कशा नष्ट केल्या, हे सांगताना ते म्हणतात, 'मुलुखगिरीच्या पहिल्या भडिमारासरशी हिंदू देवळे मोडण्यात आली. हिंदू धर्माची प्रत्येक चीजवस्तू धुळीला मिळविली गेली आणि मूर्तिपूजेचे प्रतिपादन आत असेल या संशयावरून देशी भाषेतील एकजात सर्व ग्रंथ भस्मसात करण्यात आले. ''[६९]

यावरून पोर्तुगीजांनी देवळे, हिंदू धर्म व ग्रंथ त्या काळी कशा पद्धतीने नष्ट केले गेले, याची माहिती वाचकांना या लेखातून जशी मिळते, तसेच देशी भाषांतील ग्रंथांना आगीच्या भक्ष्यस्थानी त्यांनी कशा पद्धतीने लोटले, हेही यावरून लक्षात येते. पण हेच पाद्री देशी भाषेत ग्रंथनिर्मिती का करू लागले, याचे विवेचनही त्यांनी केले आहे.

'साधना' साप्ताहिकाच्या दिनांक ७ जुलै १९५६च्या अंकात 'कालिदासाच्या सहवासांत' या रामचंद्र ढेरे यांच्या लेखातून कालिदास दिनानिमित्त आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी कालिदासासंबंधीचे विवेचन केले आहे. कालिदास सौंदर्याचा योगी होता. सौंदर्य हेच त्याचे जीवन. संपूर्ण सृष्टी त्याला सौंदर्याने भारलेली दिसे. त्यांच्या विवेचनात कधी श्रावणाच्या कोवळ्या उन्हात पंख निथळीत बसलेल्या पाखराच्या डोळ्यातील लाघव येई, तर कधी

आकाशाला गवसणी घालणारे गरुडाच्या दृष्टीतील सौंदर्याचे चित्रण येते. त्यांच्या लेखनातून निसर्ग आणि मानवी मन यातील सुसंवाद येतो. त्यांच्या काव्यात निसर्गाच्या भावप्रतिमा येतात. त्याचा निसर्गाशी संवाद  मीपणा विसरून जाण्यास उपयुक्त ठरतो. यातून कवी कालिदासाला आषाढ घनांची दाटी दिसताच नवसृजनाची चाहूल लागते.

'सुंदर आहे माझी वासना
सुंदर जशी
आषाढ घनांची प्रभक्त गर्जना'७०

या शब्दांत तो श्रावणातील नवसृजनाचा विचार मांडतो. वसंत, ग्रीष्म, शरद या ऋतूंचे वर्णन तो करतो; पण त्याचबरोबर वर्षाऋतूमुळे निसर्गातील बदलाचेही चित्रण तो करतो. यातून कालिदासाने लिहिलेले मेघदूत या काव्याचा आस्वाद घेतला आहे. कालिदासाच्या सहवासाने निसर्गातील चराचर सृष्टीतील बदलाचे चित्रण या लेखात आले आहे.

दिनांक ३ ऑक्टोबर १९५९ च्या 'साधना' साप्ताहिकात 'मराठी संतांच्या समतेचे स्वरूप' या विषयावर प्रा. गं. बा. सरदार यांचा लेख प्रकाशित झालेला आहे. या लेखात प्रा. गं. बा. सरदारांनी बहुजन समाजाच्या संकुचित वर्ग जीवनाला संतांनी वैचारिक व भावनात्मक अधिष्ठान मिळवून दिले. दया, क्षमा, शांती, सत्यनिष्ठा, समृद्धी, सहिष्णुतेचा पुरस्कार संतांनी केला. युरोपमध्ये धार्मिक, राजकीय, आर्थिक या क्रमाने समतेचा स्वीकार केला गेला. तर भारतात तेराव्या शतकात समाजात विविध जाती, धर्म, रूढी, परंपरांमध्ये समाज विखुरलेला होता. अशा या समाजात चैतन्य ओतण्याचे काम भागवत धर्माच्या पताकाखाली संत ज्ञानेश्वरांपासून अठरापगड जातींतील संतांनी समाज एकत्र आणून केले.

या काळातील ग्रंथनिर्मिती मराठी भाषेत झाल्यामुळे साहजिकच सर्वसामान्य जनतेपर्यंत धर्माचे तत्त्वज्ञान पोहोचले. विज्ञानपूर्व काळात धर्म भावना ही सर्वंकष होती. त्यामुळे नीति मूल्ये, समाजधर्म, साहित्य, अर्थकारण यांशी त्याची सांगड घातली होती. ज्या ज्या संप्रदायांनी जातिव्यवस्थेवर हल्ला केला. ते ते पंथ जातिनिर्मूलनाच्या कार्यात अपयशी ठरले आहेत. त्यामुळे मराठी संतांच्या वाङ्मयात आपणास व्यावसायिक जीवन हे साधन बनविल्यामुळे आपोआपच समता निर्माण झाली, असा विचार प्रा. गं. बा. सरदार यांनी या लेखाच्या माध्यमातून मांडला आहे.

## ४.३८ चित्रपट समीक्षा :

'पोस्टातील मुलगी' या चित्रपटाची समीक्षा जगन्नाथ महाजन यांनी दिनांक १० जुलै १९५४ च्या 'साधना'च्या अंकात केलेली आहे. या चित्रपटाची पटकथा ग. दि. माडगूळकर यांनी लिहिलेली आहे. या चित्रपटाच्या कथेत आजच्या मध्यमवर्गीय जीवनाच्या एका विदारक बाजूवर प्रकाश टाकला आहे. या कथेतील नायिका स्वत:च्या आशा–आकांक्षा मारून वडिलांच्या संसाराचा गाडा ओढण्यासाठी दिवसभर कारकुनी करीत आहे. या मुलीच्या भवितव्यात फक्त अंधकारच आहे. नोकरी करणारी मुलगी लग्नाच्या वयाची झालेली असून, कौटुंबिक परिस्थितीमुळे स्वत:च्या लग्नाचा विचार करत नाही. आई, वडील, भाऊ आणि बहीण यांच्या सुखामुळे ती तिच्या आयुष्याचा विचार करत नाही. वडिलांवर चोरीचा आरोप होतो. तेव्हा ती पोस्टाचे बाराशे रुपये देऊन तिच्या वडिलांवरचे बालंट निस्तारते. पण पोस्टाचे पैसे परत करता येत नाहीत म्हणून तिला तुरुंगवास भोगावा लागतो. शिक्षा संपवून घरी आल्यावर घरातील चित्र पालटते. पूर्वीचे जीवन व तुरुंगवासानंतर आयुष्य यात खूपच बदल झाला आहे. शेवटी ती घर सोडून जाते. यातून भावनेपेक्षा कर्तव्याला अधिक महत्त्व दिलेले दिसून येते.

काबुलीवाला ही मूळकथा व चित्रपट या विषयावर अशोक शहाणे यांनी दिनांक १५ फेब्रुवारी १९५८च्या 'साधना' साप्ताहिकात आपले विवेचन केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात 'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झालेल्या कविता, कथा, कादंबरी, नाटक, सुंदर पत्रे, आंतरभारती, पुस्तक परीक्षण, समीक्षण, परिचय, चित्रपट समीक्षा व इतर लेखन या साहित्यप्रकारांचा अभ्यास करण्यात आला आहे. हा अभ्यास करत असताना 'साधना' साप्ताहिकाने फक्त वैचारिक प्रबोधन केले असे नाही, तर 'साधना' साप्ताहिकातून दर्जेदार साहित्य प्रकाशित होत होते. पुढच्या काळात अनेक नामवंत लेखक– उदा. दुर्गा भागवत, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, ना. ग. गोरे, बा. भ. बोरकर, गो. नी. दांडेकर, कुसुम पटवर्धन, सदानंद रेगे, प्रभाकर पाध्ये, अनंत कानिटकर, वि. स. खांडेकर, मालतीबाई बेडेकर, गोपीनाथ तळवलकर, काकासाहेब कालेलकर, श्रीपाद जोशी, शांता शेळके, अरविंद कुलकर्णी, शंकर सारडा, रा. ग. जाधव, लक्ष्मणशास्त्री जोशी, शंकरराव खरात, रवींद्र पिंगे, आत्माराम भेंडे, अ. का. प्रियोळकर, श्रीराम लागू, पु. ल. देशपांडे, के. नारखेडे, वा. रा. सोनार, अशोक शहाणे, मधुकर केचे, मीरा बोरगावकर, शं. द. जावडेकर, दि. के. बेडेकर, भा. रा. भागवत,

लिलाधर हेगडे, शिरूभाऊ लिमये, रमा बखले, वामन चोरघडे, राजा मंगळवेढेकर, कुसुमावती देशपांडे, आनंदीबाई शिर्के, सुधा नरवणे, प्रेमा कंटक, आरती प्रभू यांसारख्या कितीतरी नवोदित लेखकांचे साहित्य प्रस्तुत काळात 'साधना'तून प्रकाशित होत होते. 'साधना' साप्ताहिकाने ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळात महत्त्वपूर्ण साहित्यप्रकारांना प्रकाशित करून नवसमाज निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या विचारांचे भरणपोषण केले. या साप्ताहिकाने विचाराचे संस्कार दिलेली, स्वातंत्र्योतर काळातील पिढी घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसून येते.

# संदर्भ टीपा


१. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, राजघाट – यशवंत हडप, दिनांक ४ ऑक्टोबर १९५२, पृ. क्र. ३.

२. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, हरवले मन– मंगेश पाडगावकर, दिनांक १९ एप्रिल १९५२, पृ. क्र. ५.

३. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, वर्षारंभ अंक, कसे काय अन् कोठे चुकले– मंगेश पाडगावकर, दिनांक १५ ऑगस्ट १९५३, पृ. क्र. २६.

४. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, आइनस्टाइन– विंदा करंदीकर, दिनांक २३ एप्रिल १९५५, पृ. क्र. १.

५. तत्रैव, दिनांक २३ एप्रिल १९५५, पृ. क्र. १.

६. लवाटे सुनीलकुमार, सात समंध मानेवार, दै. महाराष्ट्र टाइम्स.कॉम, दिनांक १२ मे २०१७.

७. पटवर्धन पु. ह. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, पोरसवदा होतीस तू– बा. सी. मर्ढेकर, दिनांक २४ मार्च १९५६, पृ. क्र. १.

८. पटवर्धन पु. ह. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, चेटूक– सदानंद रेगे, दिनांक २१ एप्रिल १९५६, पृ. क्र. ४.

९. पटवर्धन पु. ह. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, भोवळ– चंद्रकांत कुलकर्णी, दिनांक १६ जून १९५६, पृ. क्र. ५.

१०. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, उणीव– माणिक गोडघाटे, दिनांक २९ मार्च १९५८, पृ. क्र. ७.

११. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, उल्का– मनोहर तल्हार, दिनांक १२ जुलै १९५८, पृ. क्र. ५.

१२. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, विरह– समरसेन, दिनांक ३ जानेवारी १९५९, पृ. क्र. ४.

१३. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, स्पर्श– अरविंद कुलकर्णी, दिनांक ३ जानेवारी १९५९, पृ. क्र. ४.

१४. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, झोप- समरसेन, दिनांक ३ जानेवारी १९५९, पृ. क्र. ८.

१५. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, पलीकडली वाट उमलते- मंगेश पाडगावकर, दिनांक ३ मे १९५९, पृ. क्र. ६.

१६. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, पंख फुटण्याआधीच- लक्ष्मीकांत तांबोळी, दिनांक २३ मे १९५९, पृ. क्र. ४.

१७. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, तुळशीचे लग्न- दुर्गा भागवत, दिनाक १ मार्च १९५१, पृ. क्र. ४.

१८. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, पुष्पवाहन- दुर्गा भागवत, दिनांक ५ जानेवारी १९५२, पृ. क्र. ४.

१९. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, संपत्तीदान- प्रा. वामन चोरघडे, दिनांक १७ जुलै १९५४, पृ. क्र. ७.

२०. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, गजराबाईला न्याय मिळाला- दुर्गा भागवत, दिनांक ७ ऑगस्ट १९५४.

२१. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, सिद्धिकूर- दुर्गा भागवत (बंजारी कथा), दिनांक २ ऑक्टोबर, १९५४, पृ. क्र. ४.

२२. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, मच्छीराज- दुर्गा भागवत, दिनांक २७ नोव्हेंबर १९५४, पृ. क्र. ४.

२३. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, राम आणि लक्ष्मण- दुर्गा भागवत, दिनांक १८ डिसेंबर १९५४, पृ. क्र. ४.

२४. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, सुदामा- दुर्गा भागवत, दिनांक ५ मार्च १९५५, पृ. क्र. ४.

२५. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), 'साधना' साप्ताहिक, हिमालयाची हाक- प्रेमा कंटक, दिनांक ७ मे १९५५, पृ. क्र. ८.

२६. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, माती- दामोदर सीताराम देसाई, दिनांक २१ सप्टेंबर १९५७, पृ. क्र. ५.

२७. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, वाघोबा आणि हरिण– श्री. रा. टिळेकर (फ्रेंच कांगोतील लोककथा), दिनांक ४ जानेवारी १९५८, पृ. क्र. ९.

२८. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, ऐक, भूमिमाते तुझी कहाणी– सौ. कमल मराठे, दिनांक २६ मार्च १९५८, पृ. क्र. ९.

२९. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, आजीची गोष्ट– दिवाकर, दिनांक २६ एप्रिल १९५८, पृ. क्र. १०.

३०. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, कर्णाचे गाऱ्हाणे– खुशालजी चौधरी, दिनांक ५ जुलै १९५८, पृ. क्र. ७.

३१. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, खोडकर चंदू– शकुंतला बोरगावकर, दिनांक ९ ऑगस्ट १९५८, पृ. क्र. ९.

३२. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, दुष्ट शेतकरी– सुनंदा पतके, दिनांक २३ ऑगस्ट १९५८, पृ. क्र. ९.

३३. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, शिस्त आणि सत्य– श्री. शिरूभाऊ लिमये यांच्या तोंडून ऐकलेली गांधीजींची आठवण, दिनांक ४ ऑक्टोबर १९५८, पृ. क्र. ९.

३४. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, नमी नि कमी– रमा बखले, दिनांक ११ ऑक्टोबर १९५८, पृ. क्र. १०.

३५. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, पऱ्यांची राणी– शकुंतला बोरगावकर, दिनांक १८ ऑक्टोबर १९५८, पृ. क्र. ४.

३६. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मंतरलेली पहाट– गोविंद देशपांडे, दिनांक १४ फेब्रुवारी १९५९, पृ. क्र. ११.

३७. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, पृथ्वी प्रदक्षिणा करशील तू– के. नारखेडे, दिनांक ९ मे १९५९, पृ. क्र. ९.

३८. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, पांघरुण– राजा मंगळवेढेकर, दिनांक ७ नोव्हेंबर १९५९, पृ. क्र. ४.

३९. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, सोनी आणि बनी– शालिनी स्नेहवर्धन, दिनांक २० फेब्रुवारी १९६०, पृ. क्र. ६.

४०. थत्ते यदुनाथ (संपा.), 'साधना' साप्ताहिक, क्षणगंधा– केशव मेश्राम, दिनांक ५ मार्च १९६०, पृ. क्र. ४.

४१. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, दिनांक १५ ऑगस्ट १९४८, संपादकीय पृ. क्र. १.

४२. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.), हीरकमहोत्सवी निवडक साधना, खंड ८, साधना प्रकाशन, प्र. आ., जून २००७, 'साधना' चा बालविभाग सरिता पदकी, पृ. क्र. ५५.

४३. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, नवमंगल प्रभात, दिनांक २८ मे १९४९, पृ. क्र. १०

४४. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक; सुंदर पत्रे, दिनांक ११ सप्टेंबर १९४८, पृ. क्र. ६.

४५. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, सुंदर पत्रे, दिनांक ९ ऑक्टोबर १९४८, पृ. क्र. ७.

४६. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, सुंदर पत्रे, दिनांक ११ जून १९४९, पृ. क्र. ११.

४७. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, सुंदर पत्रे, दिनांक २२ मे १९४९, पृ. क्र. ११.

४८. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, सुंदर पत्रे, दिनांक ९ जुलै १९४९, पृ. क्र. ९.

४९. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, सुंदर पत्रे, दिनांक १६ जुलै, १९४९, पृ. क्र. ११.

५०. सानेगुरुजी (संपा.), 'साधना' साप्ताहिक, सुंदर पत्रे, दिनांक २८ जानेवारी १९५०, पृ. क्र. १०.

५१. सानेगुरुजी (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, सुंदर पत्रे, दिनांक १० जून १९५०, पृ. क्र. १०.

५२. सानेगुरुजी (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, शुभास पत्र– ना. ग. गोरे, दिनांक १ जानेवारी १९४९, पृ. क्र. १०.

५३. जावडेकर शं. द., पटवर्धन पु. ह. (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, मुलांच्या मेळाव्यात, पाऊस आला – ना. ग. गोरे, दिनांक ३० जून १९५१, पृ. क्र. १०.

५४. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, आंतरभारती– वसंत बापट, १५ ऑगस्ट १९५०, पृ. क्र. २१.

५५. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.), हीरकमहोत्सवी निवडक साधना, खंड २, साधना प्रकाशन, प्र. आ., जून २००७, आद्य संपादकीय निवेदन, सानेगुरुजी, १५ ऑगस्ट १९४८, पृ. क्र. १२.

५६. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), ‘‘साधना’’ साप्ताहिक, आंतरभारतीच्या कामाची रूपरेषा– आचार्य भागवत स. ज., दिनांक ११ जून १९५१, पृ. क्र. ४.

५७. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.), हीरकमहोत्सवी निवडक ‘साधना’, खंड ४, साधना प्रकाशन, प्र. आ., जून २००७, आंतरभारतीच्या कार्याला आरंभ, आचार्य स. ज. भागवत, पृ. क्र. ४.

५८. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, इक्बाल दर्शन, दिनांक २८ ऑक्टोबर १९५०, पृ. क्र. १०.

५९. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, इक्बाल दर्शन–२, नया शिवाला– श्रीपाद जोशी, दिनांक १८ नोव्हेंबर १९५०, पृ. क्र. ९.

६०. थत्ते यदुनाथ (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, प्रसिद्ध वंगीय कवी श्री मोहितलाल मुजुमदार– श्रीकांत गोगटे, दिनांक २५ ऑक्टोबर १९५८, पृ. क्र. ७.

६१. थत्ते यदुनाथ (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, गुजरातचे कथा वैभव– सौ. आनंदीबाई शिर्के, दिनांक २९ नोव्हेंबर १९५८, पृ. क्र. ७.

६२. थत्ते यदुनाथ (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, आंतरभारतीची कार्ययोजना– रावसाहेब पटवर्धन, दिनांक ३० जानेवारी १९६०, पृ. क्र. २.

६३. थत्ते यदुनाथ (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, नागवेल–वामन चोरघडे, ८ फेब्रुवारी १९५८, पृ. क्र. ६.

६४. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, श्री. ना. पेंडसे– गारंबीचा बापू– वसंत दावतर, दिनांक १० मे १९५२, पृ. क्र. ७.

६५. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, गो. नी. दांडेकर यांची शितू– वसंत दावतार, दिनांक ३ जुलै १९५४, पृ. क्र. ७.

६६. पटवर्धन पु. ह. (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, मृद्‌गंध– प्रा. राजाध्यक्ष म. वी., दिनांक १५ जानेवारी १९५५, पृ. क्र. ७.

६७. थत्ते यदुनाथ (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, श्रीपाद जोशी– विस्कटलेलं घरटं, समीक्षक यदुनाथ थत्ते, दिनांक १८ मे १९५७, पृ. क्र. ९.

६८. थत्ते यदुनाथ (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, माचीवरला बुधा– गो. नी. दांडेकर, समीक्षक गोविंद जोशी, दिनांक २१ मार्च १९५८, पृ. क्र. ७.

६९. पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द. (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, विदेशी पाद्री मराठी का शिकले– अ. का. प्रियोळकर, दिनांक १५ ऑगस्ट १९५४, पृ. क्र. २१.


७०. पटवर्धन पु. ह. (संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, कालिदासाच्या सहवासात– रा. चिं. ढेरे, दिनांक ७ जुलै, १९५६, पृ. क्र. ३.

## ई) 'साधना' : दिवाळी अंक व विशेषांक :

ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळात प्रकाशित झालेले 'साधना' साप्ताहिक वर्षनिहाय व संख्येनिहाय पुढीलप्रमाणे आहेत.


संशोधन कालखंडात वर्षनिहाय एकूण किती 'साधना' साप्ताहिकाचे अंक प्रकाशित झाले. यांचा संख्यात्मक आढावा घेतला असताना वर्षनिहाय ही संख्या पुढीलप्रमाणे आहे. यामध्ये 'साधना'ने प्रकाशित केलेले दिवाळी अंक, विशेषांक, सेवा पथक अंक, महात्मा गांधी स्मृतिदिन विशेषांक, राष्ट्रसेवा दल दिन विशेषांक, महात्मा गांधी स्मृतिदिन विशेषांक, सानेगुरुजी श्रद्धांजली विशेषांक, साने गुरुजी स्मृतिदिन विशेषांक– गोमंतक विशेषांक, विनोबा जयंती विशेषांक, बुद्ध विशेषांक, प्रजासत्ताक दिन विशेषांक, अण्णासाहेब सहस्रबुद्धे विशेषांक इत्यादींचा समावेश आहे. त्यामुळे प्रतिवर्षी ५२ 'साधना'चे अंक प्रकाशित झाले असून संशोधन कालखंडातील शेवटी म्हणजे ऑगस्ट १९५९ ते मे १९६० या कालखंडात ४२ अंक प्रकाशित झाले आहेत. त्याची सविस्तर आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष | 'साधना' साप्ताहिक | वर्षभरातील एकूण संख्या | एकूण |
|---|---|---|---|
| १५ ऑगस्ट १९४८–४९ | 'साधना' | ५२ | ५२ × ११<br>= ५७२ + ४२<br>एकूण सा.अं. ६१४ |
| १५ ऑगस्ट १९४९–५० | 'साधना' | ५२ | |
| १५ ऑगस्ट १९५०–५१ | 'साधना' | ५२ | |
| १५ ऑगस्ट १९५१–५२ | 'साधना' | ५२ | |
| १५ ऑगस्ट १९५२–५३ | 'साधना' | ५२ | |
| १५ ऑगस्ट १९५३–५४ | 'साधना' | ५२ | |
| १५ ऑगस्ट १९५४–५५ | 'साधना' | ५२ | |
| १५ ऑगस्ट १९५५–५६ | 'साधना' | ५२ | |
| १५ ऑगस्ट १९५६–५७ | 'साधना' | ५२ | |
| १५ ऑगस्ट १९५७–५८ | 'साधना' | ५२ | |
| १५ ऑगस्ट १९५८–५९ | 'साधना' | ५२ | |
| १५ ऑगस्ट १९५९ ते मे १९६० | 'साधना' | ४२ | |




खालील स्तंभालेखामध्ये 'साधना' साप्ताहिकाने प्रकाशित केलेले एकूण लेख, संपादकीय लेख, दिवाळी अंक, विशेषांक व कुमार विशेषांक संख्येनिहाय आलेख मांडलेला आहे.

| एकूण अंक | संपादकीय लेख | दिवाळी अंक | विशेषांक | कुमार विशेषांक |
|---|---|---|---|---|
| ६१४ | ६०२ | ०९ | १९ | ०३ |



## ४.३९ ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळामध्ये प्रकाशित झालेले विशेषांक :

प्रस्तुत संशोधन कालखंडामध्ये 'साधना' साप्ताहिकाने विविध विषयांवरील विशेषांक प्रकाशित केले असून, यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, व्यक्तिविशिष्ट, विविध चळवळीवर प्रकाश टाकणारे वर्षारंभ तर काही व्यक्तीविशेष असे विशेषांक प्रकाशित केले. त्यात राष्ट्रसेवा दल संपा. सानेगुरुजी (२५ डिसेंबर १९४८) महात्मा गांधी स्मृतिदिन, संपा. सानेगुरुजी (१९ जानेवारी १९४९) स्वातंत्र्यदिन विशेषांक संपा. सानेगुरुजी (१६ ऑगस्ट १९४९) राष्ट्रसेवा दल विशेषांक संपा. सानेगुरुजी (२४ डिसेंबर १९४९), सानेगुरुजी श्रद्धांजली (१७ जून १९५०), सानेगुरुजी स्मृतिदिन अंक संपा. रावसाहेब पटवर्धन व शं. द. जावडेकर (१५ ऑगस्ट १९५०), साने गुरुजी सेवा पथक संपा. रावसाहेब पटवर्धन/शं. द. जावडेकर (११ जून १९५१), वर्षारंभ विशेषांक संपा. रावसाहेब पटवर्धन/शं. द. जावडेकर (१५ ऑगस्ट १९५२ आणि १९५३) वर्षारंभ विशेषांक– गोमंतक विशेषांक संपा. रावसाहेब पटवर्धन/शं. द. जावडेकर (१५ ऑगस्ट १९५४), विनोबा जयंती विशेषांक संपा. पु. ह. पटवर्धन/ शं. द. जावडेकर (१० ऑगस्ट १९५५), बुद्ध विशेषांक संपा. दुर्गा भागवत (२४ मे १९५६), राष्ट्रसेवा दल दिन विशेषांक संपा. पु. ह. पटवर्धन (२८ डिसेंबर १९५६), प्रजासत्ताक दिन विशेषांक संपा. यदुनाथ थत्ते (२६ जाने. १९५७), अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे विशेषांक– संपा. यदुनाथ थत्ते (५ ऑक्टोबर १९५७), महिला जीवन विशेषांक संपा. दुर्गा भागवत (१८ एप्रिल १९५८), लोकशाही समाजवाद संपा. मधू दंडवते (१५ ऑगस्ट १९५९), अस्पृश्यता निवारण संपा. यदुनाथ थत्ते (२४ डिसेंबर १९५९), महाराष्ट्र राज्य स्थापना विशेषांक संपादक यदुनाथ थत्ते (२७ एप्रिल १९६०) असे संशोधन कालखंडामध्ये एकूण एकोणिस विविध विषयावरील विशेषांक प्रकाशित झाले. याशिवाय स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिन विशेषांक याही विशेषांकाचा समावेश यात करावा लागेल. 'साधना'चा प्रतिवर्षीचा वर्धापनदिन विशेषांक महत्त्वाचा आहे.

## ४.४० ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळामध्ये 'साधना' साप्ताहिकात प्रकाशित झालेले विशेषांक :

महात्मा गांधी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रपित्याला श्रद्धांजली विशेषांकाचे प्रकाशन दिनांक २९ जानेवारी १९४९ रोजी साने गुरुजी यांच्या संपादकत्वाखाली करण्यात आले होते. या विशेषांकात बापू की याद, बापूंची गोष्ट, बा आणि बापू गांधीजी आणि शिक्षण, बापूजी आणि

गोसेवा, अहिंसा आणि जातीय ऐक्य, महात्माजी आणि त्यांची 'साधना'– श्री. गं. भ. ग्रामोपाध्याय, बापूजींचे ऋण– आचार्य जावडेकर, गांधींना जिवंत ठेवायचे आहे– रवी पंडित, धन्य जीवन धन्य मृत्यू– अप्पासाहेब पटवर्धन, स्वातंत्र्याच्या वाढदिवशी कविता, महात्मा गांधींबरोबर प्रवास, महात्माजींच्या सामर्थ्याचा उगम, गांधीजींचा जीवनविकास, महात्माजींचे कार्य या लेखांचा समावेश व अमरज्योत– इंद्रराव पवार, बापूजींची शिकवण– एन. ए. पवार, विश्व प्रलय– मधुकर वि. पै यांच्या कवितांचा समावेश आहे. या अंकात महात्मा गांधीच्या जीवनाविषयी सर्वांगीण विचार आहे.

'साधना' साप्ताहिकाच्या दिनांक १५ ऑगस्ट १९४९ वर्धापनदिन विशेषांकांचे संपादक सानेगुरुजी होते. या अंकात मुंबई नगरपालिका व समाजवादी पक्ष, स्वातंत्र्याची दोन वर्षे आणि भारतीय समाजवादाची विशेषता या विषयावर अच्युत पटवर्धन यांचा लेख, अन्नधान्य वाढीची समस्या अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, रशियन हुकूमशाही एक पक्षीय हुकूमशाही व समाजवाद– मधू लिमये, गोकुळाष्टमी ही ना. ग. गोरे यांची कथा, ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट स्वातंत्र्य संग्रामाचा आढावा, तर यदुनाथ थत्ते यांनी चौधरी मोहंमद शफी यांचे चरित्र लिहिले आहे. मानवतेची चोरी– सोपानदेव चौधरी, दख्खनची राणी ही वसंत बापट यांची कविता व धडपडणारी मुले ही सानेगुरुजींची कथा या अंकात प्रकाशित झाली आहे.

सानेगुरूजी यांनी दिनांक २४ डिसेंबर १९४९ चा 'राष्ट्रसेवा दल विशेषांक' संपादित केला. या अंकात स्त्रीविषयक चळवळीतील पुरुषांची भूमिका हा अनुसया लिमये यांचा लेख असून या अंकात राष्ट्रसेवा दल आणि समाजवादी पक्ष आचार्य जावडेकर, सेवादल कार्य क्रांतिकारी स्वरुपाचे आहे काय? याविषयावर एस. एम. जोशी यांचा लेख, समाजपरिवर्तनाचे स्वरुप– अच्युत पटवर्धन, अल्पवयीन विद्यार्थी व राजकारण– साने गुरुजीं तर सेवा दलाचे सेनापती वसंत बापट यांनी लेख लिहिला असून साने गुरुजींच्या सुंदर पत्राचा या अंकात समावेश करण्यात आला आहे.

दिनांक १७ जून १९५० रोजी प्रकाशित झालेल्या 'साधना' साप्ताहिकाच्या या अंकात सानेगुरुजींच्या निधनानंतर साप्ताहिक 'साधना'मधून सानेगुरुजींविषयी लेखन प्रकाशित झाले असून यामध्ये सानेगुरुजींच्या निधनानंतर विविध मान्यवरांनी दिलेली आदरांजली म्हणून या अंकाला विशेष महत्त्व प्राप्त होते. 'मांगल्याचा नंदादीप मालवला' या रावसाहेब पटवर्धन यांच्या

लेखातून सानेगुरुजींविषयीचा जिव्हाळा व्यक्त झालेला आहे, तत्कालीन प्रकाशित होत असणाऱ्या फ्री प्रेस जर्नल, लोकसत्ता, तरुण भारत (नागपूर), चिकित्सक (बेळगाव), जन्मभूमी (गुजरात), जनशक्ती, भारत, मौज, लोकमान्य, नवशक्ती, नवभारत या महाराष्ट्रातील विविध पत्रांनी सानेगुरुजींनी दिलेल्या श्रद्धांजलीचा मजकूर छापण्यात आलेला असून आचार्य जावडेकर यांचा महाराष्ट्राचे आदर्श गुरुजी गेले हा लेख असून, ही उणीव संघटितपणे भरून काढूया, असे म्हणत एस. एम. जोशी यांनी सानेगुरुजींविषयीचा जिव्हाळा व्यक्त केला आहे. तर एवढ्या तातडीने का गेलास? या विषयावर सानेगुरुजींचे बालमित्र डॉ. रामभाऊ जोशी यांचा लेख आहे. अशा विविध लेखातून सानेगुरुजींविषयीचा आदर, प्रेम, जिव्हाळा व्यक्त करणाऱ्या लेखांचा समावेश या अंकात करण्यात आला आहे.

सानेगुरुजी सेवा पथक विशेषांकाचे दिनांक ११ जून १९५१ च्या अंकाचे संपादन पु. ह. पटवर्धन व शं. द. जावडेकर यांनी केलेले असून 'गुरुजींची मनीषा' या विषयावर साने गुरुजींचा लेख आलेला आहे. साने गुरुजींची स्फूर्ती, तुला नव्या जगाची आन– ही वसंत बापट यांची कविता, आंतरभारतीच्या कामाची रूपरेषा या विषयावर आचार्य भागवत यांचे पत्र, सेवापथक हीच श्रद्धांजली हा एस. एम. जोशी यांचा लेख, गुरुजींचे जिवंत स्मारक शं. द. जावडेकर यांचा लेख, गुरुजींच्या साहित्याची आंतरिक प्रवृत्ती– प्रभाकर पाध्ये, मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र– आचार्य प्र. के. अत्रे इत्यादी लेखांचा समावेश या विशेषांकात करण्यात आले आहे.

दिनांक १५ ऑगस्ट १९५४ चा 'विशेषांक गोमंतक' विशेषांक असून या विशेषांकाचे संपादन पु. ह. पटवर्धन व शं. द. जावडेकर यांनी केलेले आहे. या अंकात साम्राज्यशाहीचे अवशेष टिकणार नाही, हे संपादकीय निवेदन असून भावनांचे गोवे– पुरुषोत्तम लाड, शांतादुर्गा बा. भ. बोरकर यांची कविता गोव्यातील संगीत आणि संगीतकार– केशवराव भोळे, सेंट फ्रान्सिस झेवियरचे गोवे– ना. ग. गोरे, सोळाव्या सतराव्या शतकात विदेशी पाद्री मराठी का शिकले? या विषयावर अभ्यासपूर्ण लेखाचे लेखन अ. का. प्रियोळकर यांनी केले. गोव्याची स्वातंत्र्य 'साधना' या लेखात प्रियदर्शनी यांनी गोव्यातील स्वातंत्र्यसंग्रामाचा पूर्वइतिहास मांडला आहे. गोव्यातील कवी, संगीतकार व मराठी भाषेचे महत्त्व विशद करणाऱ्या लेखांचा समावेश या अंकात करण्यात आलेला आहे.

दिनांक २६ जानेवारी १९५७ चा ‘प्रजासत्ताक दिन’ विशेषांकाचे संपादन यदुनाथ थत्ते यांनी केले आहे. या अंकात मतदारांना आव्हान, समाजवादाच्या स्थापनेच्या दृष्टीने काही विचार, बाल मित्रांशी गुजगोष्टी– भा. रा. भागवत आदि यांच्या लेखांचा समावेश करण्यात आला आहे.

ऑगस्ट १९५९ चा ‘लोकशाही समाजवादी’ विशेषांकाचे आतिथी संपादक मधु दंडवते यांनी केलेले असून संपादक मंडळात वसंत बापट, यदुनाथ थत्ते, सदानंद वर्दे, दुर्गा भागवत यांचा समावेश करण्यात आला आहे. तर २ डिसेंबर १९५९ रोजी ‘अस्पृश्यता निवारण’ या विषयावरील विशेषांकाचे संपादन यदुनाथ थत्ते यांनी केलेले असून, या अंकात सामाजिक सुधारणाची अक्षम्य अपेक्षा, पूज्य साने गुरुजींचे स्मरण– सेनापती बापट, ‘अस्पृश्यतेचे माहेरघर भारतीय खेडी’– ॲड. शंकरराव खरात आदी लेखांचा समावेश आहे. दिनांक २७ एप्रिल १९६० रोजी यदुनाथ थत्ते यांनी संपादिक केलेला ‘महाराष्ट्र राज्य स्थापना’ विशेषांक प्रकाशित करण्यात आलेला असून या अंकात महाराष्ट्र राज्याची प्रस्थापना, नवमहाराष्ट्राच्या कारभार यंत्रणेबाबत यशवंतराव चव्हाण यांची मुलाखत, महाराष्ट्र धर्म– विनोबा, महाराष्ट्राची संस्कृती– सानेगुरुजी, आता कामाला लागा– विठ्ठलराव घाटे, महाराष्ट्राला उद्‌बोधन– जयप्रकाश नारायण, मंगल घडीचा संकल्प या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ यांच्या लेखांचा समावेश आहे. ती तृष्णा– ही दुर्गा भागवत यांची कथा तर धन्य मराठा देश– मंगेश पाडगावकर व इशारा– प्रा. ह. रा. बेंद्रे यांच्या कविता आहेत. या विशेषांकात यशवंतराव चव्हाण यांची मुलाखत असून महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्र कसा असेल याची रूपरेषा या अंकातून दिलेली आहे.

‘साधना’चे विशेषांक म्हणजे वाचकांसाठीची पर्वणीच म्हणावी लागेल. ‘साधना’ प्रकाशित करण्याचे साने गुरुजींचे हेतू या देशासाठी निष्ठावान माणसे तयार करणे होता. सुरुवातीपासूनच ‘साधना’ साप्ताहिकाचे संपादन असो की, लेखक, वितरक ही सर्व मंडळी अशा ध्येयाने प्रेरित झालेली होती. सेवाभाव हे मूल्य त्यांच्या जगण्यात होते. आजही ‘साधना’ परिवार हे मूल्य जतन करत वाटचाल करताना दिसते. ‘साधना’ साप्ताहिकाची सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक, ओळखही या विशेषांकामधून होते. त्या–त्या काळचे महत्त्वाचे विषय या विशेषांकाने वाचकांसमोर आणले आहेत. म्हणूनच ‘साधना’ साप्ताहिकाच्या

विशेषांकाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. विशिष्ट एखादा विषय असो की, एखादी घटना त्या अनुषंगाने अभ्यासपूर्ण मांडणी करून वाचकांना दिशा देण्याचे काम या विशेषांकांनी केलेले आहे. यातला बुद्ध विशेषांक, अस्पृश्यता निवारण, राष्ट्रसेवा दल, विनोबाजींच्या जयंती विशेषांक इत्यादी विशेषांकामधून वैश्विक विचारांची पेरणी करत आहिंसा, त्याग, बंधुता, समता या मूल्यांची पेरणी करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. 'साधना' विशेषांकाचे वैशिष्ट्ये म्हणजे अतिथी संपादक लोकशाही समाजवाद हा दिनांक १५ ऑगस्ट १९५९ चा विशेषांक मधू दंडवते यांनी संपादित केला. तर दिनांक १८ एप्रिल १९५८ चा महिला जीवन विशेषांकाचे संपादन दुर्गा भागवत यांनी केले होते. या विशेषांकातून स्त्रीजीवन व लोकशाही समाजवादाचा दृष्टिकोन अतिथी संपादकांचा दिसून येतो.

खरंतर 'साधनाचा' साप्ताहिकाचे प्रकाशन महात्मा गांधींच्या वधानंतरच्या परिस्थितीत झालेला असून वरचेवर खालावत जाणाऱ्या मानवीमूल्यांना पुन्हा एकदा जिवंत करत सभोवतालचा परिसर मंगलमय करण्याचे ध्येय उराशी बाळगलेले साने गुरुजी आणि त्यांची साधना आजही उदार अशा जीवनमूल्यांची पेरणी अविरतपणे करताना दिसते.

## ४.४१ ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालावधीत प्रकाशित झालेले दिवाळी अंक:

'साधना' साप्ताहिकाचे दिवाळी अंक २७ ऑक्टोबर १९५१ पासून प्रकाशित होत होते. या पहिल्या दिवाळी अंकाचे संपादक शं. द. जावडेकर आणि पु. ह. पटवर्धन होते. या दिवाळी अंकामध्ये संपादक आपली भूमिका मांडताना, 'दिवाळी आणि दिवाळी अंक' या संपादकीयामध्ये म्हणतात. ''साधनाने यंदा मोठ्या शर्थीने दीपावली विशेषांक काढला आहे. 'साधना'जवळ साधने तुटपुंजी, पण वाचकांना भरपूर साहित्य देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. दिवाळी अंकातही आपले म्हणूनही एक वैशिष्ट्य निर्माण करावे अशी इच्छा होती. पण संकल्प व सिद्धी यांचे जमणे दुरापास्त असते. आज ना उद्या वाचकांची याहून सख्त सेवा बजावण्याची आमची उमेद आहे.''[१]

यावरून दिवाळी अंक प्रकाशित करण्यामागचा हेतू स्पष्ट होतो. या दिवाळी अंकाचे स्वरूप पाहता यात कथा, कविता, लेख, विनोद इत्यादींचा समावेश आहे. अंकातील मजकूर वाचनीय आहे. समाज, साहित्य, निवडणुका इत्यादी विषयांचा समोवश यामध्ये केला आहे. तर कुटुंबनियोजन या लेखामध्ये पु. ह. पटवर्धन यांनी कुटुंब नियोजनाचा दीर्घकाळानंतर

लोकसंख्येवर परिणाम व्हावा, अशी अपेक्षा असली तरीही तत्कालिक हेतू मातांचे व संततींचे आरोग्य सुधारावे हाच आहे. राष्ट्राचा जीवन दर्जा वाढविण्याचे पहिले पाऊल म्हणजे कुटुंब नियोजन होय. या लेखात व्यक्त केला आहे. वाळवंटातील कारुण्य निर्झर या साने गुरुजींच्या इस्लामी संस्कृती या अप्रकाशित ग्रंथामधून घेतलेल्या लेखाने या दिवाळी अंकाची सुरुवात होते.

या अंकात कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, संजीवनी यांच्या कवितांचा समावेश असून औटघटका– जयवंत दळवी, सुनंदा तू वाचवलस मला– अग्निहोत्री, पिलंभट स्वर्गाला कसे गेले– प्र. के. अत्रे, पृथ्वी आणि स्वर्ग– वि. स. खांडेकर, दरोडा– सदानंद रेगे, निरक्षराचा प्रश्न– बा. भ. बोरकर, आदिवासींची प्रेमगीते या विषयावर दुर्गा भागवत यांनी लिहिले आहे. धुमकुडीया– ना. ग. गोरे यांच्या लेखातून धुमकुडीया म्हणजे एक लांबलचक झोपडी त्यात शेकोटी असून या ठिकाणी खेळ, शिकार, नृत्याचे प्रशिक्षण दिले जाते. यात इत्यादींची माहिती मिळते. हा दिवाळी अंक म्हणजे वाचकांना पर्वणीच होती या अंकातून ललित लेखन व माहितीपर लेख यांचा मिलाफ साधला आहे.

दिनांक १९ ऑक्टोबर १९५७ रोजी प्रकाशित झालेल्या दिवाळी अंकाचे संपादक वसंत बापट, यदुनाथ थत्ते, सदानंद वर्दे, दुर्गा भागवत आहेत. या विशेषांकात ‘पणतीसारखी पणती फुलपाखरे’ या सानेगुरुजी यांच्या लेखाने दिवाळी अंकाची सुरुवात होते. यामध्ये चिनगारी– एस. एम. जोशी, गबाची म्हैस विते– गो. नी. दांडेकर, आदल्या रात्री– ना. ग. गोरे, एक नवे सौंदर्य वाचक विधान– पु. ल. देशपांडे, भडका–मधुकर केचे, डायरी हरवली व सापडली– न. वि. गाडगीळ, पूर्णविराम– ग. प्र. प्रधान यांचे लेख असून बार्टर रसेल यांचे तत्त्वदर्शन या मे. पु. रेगे यांच्या लेखातून पाश्चात्त्य कलावंत, विचारवंत व त्यांच्या कलाकृती याविषयी माहिती मिळते. ‘मुलांसाठी मेवा’ या सदराखाली मी नाही जा– संजीवनी, फ्लू फ्लू फ्लू– भा. रा. भागवत, सशाची शाळा– श्री. बा. रानडे, चांदोबाच्या निळ्या घरी– बाबा मोहोड इत्यादींच्या कविता व कथा प्रकाशित झाल्या आहेत. ‘काव्य विभागात’ बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज, इंदिरा, अरविंद वामन कुलकर्णी, पद्मा, संजीवनी, शंकर रमाणी, वसंत बापट, राजा मंगळवेढेकर, विंदा करंदीकर, आरती प्रभू, द. भि. कुलकर्णी, वसंत सबनीस, रमेश तेंडुलकर, रमाकांत दळवी आदी लेखकांच्या कवितांचा समावेश आहे. या दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ एम.

वाय. कुलकर्णी यांनी तयार केलेले असून आतील चित्रे सुधाकर खासगीवाले यांच्या कल्पनेतून साकारलेली आहेत.

दिनांक १० नोव्हेबर १९५८ रोजी 'साधना'चा दिवाळी अंक प्रकाशित झाला. या अंकाचे संपादक वसंत बापट, यदुनाथ थत्ते, सदानंद वर्दे, दुर्गा भागवत हे असून 'दीपावली विशेषांक' असे नामकरण करण्यात आलेले आहे. या अंकाचे एम. वाय. कुलकर्णी यांनी मुखपृष्ठ तयार केले असून, आतील चित्रे सुधाकर खासगीवाले यांची आहेत. या अंकाची सुरुवात 'शरद स्तोत्र' या सानेगुरुजी लिखित 'चिनी संस्कृती' या पुस्तकातील हस्तलिखितातून घेतले आहे. 'शरद स्तोत्र' यात 'शरद ऋतूचे' वर्णन आले आहे. वसंत– शिशिर, ग्रीष्म– हेमंत या ऋतूंपेक्षा शरद ऋतूचे वेगळेपण टिपले आहे. याच वेळी दिवाळी सण येतो म्हणून या सणाचे औचित्य साधून या लेखाचा समावेश केला आहे. या अंकात 'नेहरूंची उलटी खूण' हे संपादकीय आहे. 'मुंबईच्या द्विभाषिक राज्याचा जन्मच मुळी अपशकुनी आहे?' हा दादा धर्माधिकारी यांच्या निवेदनाचा घोषवारा दिला असून, इतर भाषिक राज्यांप्रमाणे मराठी व गुजराती भाषांसाठी देखील अलग अलग राज्यांची योजना सरकारने केली पाहिजे. हा विचार मांडला आहे. पुरुष आणि पिशव्या– गो. वि. करंदीकर, एक प्रवास– मंगेश पत्की, प्रकाशाची पावले– गो. नी. दांडेकर, गिधाड– उद्धव शेळके या लेखांचा समावेश असून हमीद दलवाई यांची 'तोल' ही कथा प्रकाशित झाली आहे. 'मुलांसाठी मेवा' या सदरात 'कुमार मित्रांनो' हे संपादकीय असून कोकरु आणि डोकरु– भा. रा. भागवत, दोन भाऊ– दुर्गा भागवत, उंदीर मामाची आई– राजा मंगळवेढेकर हे मुलांसाठी आलेले लेख आहेत. काव्य विभागात 'उमा' ही वसंत बापट यांची सांगीतिका आलेली असून कर्दळ– सदानंद रेगे, साज– इंदिरा, कोंबडा– अनिल अशा रेषारंगांमध्ये– विंदा करंदीकर, आजच का?– पद्मा या कवींच्या कवितांचा समावेश आहे.

दिनांक १७ ऑक्टोबर १९५९ रोजी दिवाळी विशेषांक प्रकाशित झाला. या अंकांचे संपादकीय 'सूफी पंथाचा उदय' हे सानेगुरुजी यांच्या 'इस्लामी संस्कृती' या अप्रकाशित ग्रंथातून घेतलेले आहे. या अंकात वसंत बापट यांचे 'शेवटी भेटलेले पहिले गाव' हा लेख असून श्रीनगर व श्रीनगरच्या परिसराचे वर्णन आहे. पहलगावची हॉटेल्स, रम्य परिसराचे वर्णन या लेखात आलेले असून 'भंगलेले मराठी मन सांधेल कसे?' या विषयावर परिसंवाद आहे. या विषयाच्या अनुषंगाने संयुक्त महाराष्ट्राच्या घटक राज्याचे मराठी माणसाचे स्वप्न साकार

होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. प्रशासकीय विभागात विभागलेला मराठी समाज आता एकत्र येणार; परंतु मध्यंतरीच्या काळात निर्माण झालेला दुरावा आता नाहीसा करून एकसंध मराठी समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने विचारवंतांनी केलेले विचारमंथन आहे. या परिसंवादात आचार्य दादा धर्माधिकारी, गं. त्र्यं. माडखोलकर, प्रा. श्री. के. क्षीरसागर, अनंतराव भालेराव, बा. भ. बोरकर, प्रा. गं. बा. सरदार, खुशाल चौधरी व एस. एम. जोशी यांचा सहभाग आलेला आहे. तर ना. ग. गोरे यांच्या 'स्मृतिकन्या' या दैनंदिनीमध्ये अग्वादच्या तुरुंगातील दैनंदिनीची काही पाने आलेली असून यात डिसेंबर १९५५ ते ११ ऑगस्ट १९५६ चा काळ या लेखात मांडला आहे. 'नाटक झाले जन्माचे' हे पु. ल. देशपांडे यांचे एक सहज नाट्य आले आहे. या अंकात इंदिरा, कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, वसंत बापट, दिलीप चित्रे, आरती प्रभू, विठ्ठलराव घाटे इत्यादींच्या कविता समाविष्ट केल्या आहेत. 'ही व्यथा' ही जी. ए. कुलकर्णी यांची कथा, सुंदर पान सुंदर वृक्ष ही दि. के. बेडेकर यांची कथा, साने गुरुजींचे आंतरभारतीचे स्वप्न 'आंतरभारती कथा पंचक' या शीर्षकांतर्गत 'साधना'च्या दिवाळी अंकात उर्दू, कन्नड, मल्याळम, बंगाली, गुजराती या भाषेतील साहित्य प्रकाशित झाले आहे.

## ४.४२ 'साधना' दिवाळी अंकाचे महत्त्व व वेगळेपण :

'साधना'चे दिवाळी अंक १९५१ पासून सुरू असून सुरुवातीपासून 'साधना'चे दिवाळी अंक अंतर्बाह्य देखणे, दर्जेदार, कलात्मक ठेवण्याच्या उद्देशाने उत्तरोत्तर प्रगती झालेली दिसून येते. मुखपृष्ठ, सजावट, छायाचित्र मांडणी यात बदल होत गेले तसे मुद्रणाचा दर्जा, कागदाची प्रत, सजावट, दुर्मिळ छायाचित्रे अशा अनेक गोष्टींमुळे 'साधना'चे दिवाळी अंक आकर्षक झालेले दिसतात. या अंकांच्या निर्मितीमध्ये एम. वाय. कुलकर्णी, सुधाकर खाजगीवाले यांचा महत्त्वाचा वाटा होता. मुखपृष्ठाची रचना कलात्मक असून विचारांचे सामर्थ्य मुखपृष्ठावरून येते. 'साधना'ने अवतीभोवती घडणाऱ्या राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नांकडे लक्ष वेधले. वैचारिक परिसंवादांमध्ये समकालीन परिस्थितीत एकाच विषयाकडे पाहण्याचा व्यक्तीपरत्वे दृष्टिकोन भिन्न भिन्न दिसतो. दिनांक १७ ऑक्टोबर १९५९च्या 'साधना' दिवाळी अंकात भंगलेले मराठी मन कसे सांधेल? या विषयावर परिसंवादाचे आयोजन करून संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे स्वप्न दृष्टीच्या टप्प्यात आले असताना एकसंध मराठी समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने या दिवाळी अंकातून विचारमंथन केले. 'साधना' साप्ताहिकाची मूळ बैठक

वैचारिक असूनही ‘साधना’तून चिंतनपर साहित्याची निर्मिती होत होती. सांगीतिका, कविता, परिसंवाद, लेख, कथा व मुलांसाठी स्वतंत्र विभाग या गोष्टी संशोधन कालखंडातील ‘साधना’ दिवाळी अंकात आढळून आल्या, तर आंतरभारती सदरातून विविध भाषांतील साहित्य प्रकाशित केल्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव प्रगल्भ झाली. ‘साधना’ साप्ताहिकाच्या दिवाळी अंकातून प्रकाशित झालेले साहित्य, वाचक व मुलांसाठी आवश्यक होते.

प्रस्तुत संशोधन कालखंडामध्ये ‘साधना’चे एकूण नऊ दिवाळी अंक प्रकाशित झाले. ‘साधना’चे वेगळेपण आणि वैशिष्ट्यपूर्ण कार्य म्हणजे ‘साधना’ साप्ताहिकाने मुलांसाठी बालकुमार विशेषांक प्रकाशित केले असून प्रस्तुत संशोधन कालखंडामध्ये एकूण तीन अंक दिनांक ११ जून १९५८, १९५९, १९६० या वर्षी प्रकाशित केले असून याचे संपादन वसंत बापट, यदुनाथ थत्ते, सदानंद वर्दे आणि दुर्गा भागवत यांनी केले. या अंकांचा हेतू बालकुमारांच्या मनावर संस्कार करत चांगले नागरिक घडविण्याची प्रक्रिया करणे हा होता. मुलांच्या कलागुणांचा विकास करत. त्यांचा सर्वांगीण विकास करणे, त्यांच्यामध्ये देशप्रेम, सत्य, अहिंसा, समता, स्वातंत्र्य या मूल्यांची रुजवणूक करणे ह्या बाबी दिसून येतात. या अंकात बालकुमारांच्या कथा, कविता, नाटक, विनोद व चित्रकला इत्यादींवर भर दिला होता. मुलांमध्ये स्पर्धा लावून विजेत्या स्पर्धकाचे मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन कौतुक केले जात होते. त्यामुळे या स्पर्धेत अधिकाधिक मुले सहभाग घेत होती. यामुळे अंकासाठी उपलब्ध झालेल्या साहित्याचे परीक्षकांकडून परीक्षण करून निवडक साहित्याचे प्रकाशन केले जात होते.

‘साधना’ साप्ताहिकाने बालकुमारांसाठी वेगळे विशेषांक प्रकाशित करणे. हे तत्कालीन परिस्थितीत अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असे कार्य आहे. नंतरच्या काळात बालसाहित्य विभाग समृद्ध करावा, त्याचे किती महत्त्व आहे हे असे वाटणे याचे श्रेय ‘साधना’ साप्ताहिकाकडे जाते.

वाचकांची सामाजिक, सांस्कृतिक अभिरुची, वृद्धिंगत करण्याच्या कार्यात ‘साधना’चे कार्य व वेगळेपण महत्त्वाचे आहे.

# संदर्भ टीप


१. पटवर्धन पु. ह./जावडेकर शं. द., संपा. ‘साधना’ दिवाळी विशेषांक, दिनांक २७ ऑक्टोबर १९५१, पृ.क्र.३

## प्रकरण ५

# उपसंहार

''साधना साप्ताहिक : वाङ्मयीन अभ्यास (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०)'' हा या संशोधनाचा मुख्य विषय असून, सानेगुरुजी यांनी 'साधना' साप्ताहिकाची सुरुवात ऑगस्ट १९४८ रोजी केली. मे १९६० हा स्वतंत्र महाराष्ट्राच्या आंदोलनाचा अंतिम टप्पा म्हणजेच स्वतंत्र महाराष्ट्राच्या अधिकृत निर्मितीचा काळ होय. या संशोधनाचा मुख्य कालखंड असून 'साधना' साप्ताहिकाच्या या बारा वर्षांच्या वाटचालीत 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेल्या वाङ्मयाचा अभ्यास व साधना साप्ताहिकाचे वाङ्मयीन कार्य आणि योगदान अभ्यासणे, हा या संशोधनाचा मुख्य हेतू आहे. 'साधना' साप्ताहिक हे समाजवादी विचारांचे आहे असे मानणारा मोठा वर्ग महाराष्ट्रात आहे. किंबहुना 'साधना' साप्ताहिकाला समाजवाद्यांचे मुखपत्र, असेही म्हटले जाते. त्या काळाचा विचार करता 'साधना' साप्ताहिकाच्या समकालीन मौज, विविध वृत्त, तुतारी, वसुंधरा, चित्रा, प्रगती, संजीवनी, प्रतिभा, नवयुग, जनवाणी, विवेक, झंकार अशी अनेक नियतकालिके प्रकाशित होत होती. वरील नियतकालिकांपेक्षा साधना साप्ताहिकातून पुरोगामी विचार, विज्ञाननिष्ठा, नवोदित लेखकांच्या साहित्याला संधी देऊन नवविचार वाचकांपर्यंत पोहोचविले. १९४५ नंतर मराठी साहित्यात निर्माण झालेल्या विविध नवकवींचे, लेखकांचे साहित्य प्रकाशित केले. उदा. कवी ग्रेस यांची कविता १९५८ पासून साधना साप्ताहिकात प्रकाशित होती. सानेगुरुजींनी साधनापूर्वी 'कर्तव्य'सारखे सायंदैनिक सुरू केले होते. ते फार काळ चालले नाही. सानेगुरुजी म्हटले, की 'श्यामची आई' एवढेच त्यांचे कार्य डोळ्यांसमोर येते; पण त्यांचे एवढेच कार्य मर्यादित नाही. त्यांनी अनेक पातळ्यांवर काम केले. ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींची हत्या झाली आणि त्याचे पडसाद सर्वदूर उमटले. महाराष्ट्रात खूप संघर्ष झाला. इ.स.१९३० पासून थेट विविध चळवळींच्या

माध्यमातून समाजात वावरणारे सानेगुरुजींचे अनेक पैलू आहेत. एक कार्यकर्ता, विचारवंत, पत्रकार, संपादक, चरित्रकार, अभ्यासक, संशोधक, कवी अशा विविध भूमिका ते पार पाडतात. मातृहृदयी असलेल्या सानेगुरुजींवर महात्मा गांधींच्या हत्येचा परिणाम खोलवर झाला, समाजात उद्‌भवलेला जातीय संघर्ष त्यांना व्यथित करत होता. महात्मा गांधींच्या विचारांचा हा अनुयायी अशा परिस्थितीत स्वस्थ बसणे शक्य नव्हते. महत्प्रयासाने भारताला मिळालेले स्वातंत्र्य, या स्वातंत्र्यासाठी हजारोंनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले होते. हजारो घरे उद्‌ध्वस्त झाली होती.

दीडशे वर्षांच्या इंग्रजांच्या पारतंत्र्यामधून हा देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्याच्या या संघर्षमय काळात सर्व जातिधर्माचे लोक एकवटले होते. पण स्वातंत्र्यानंतर पुन्हा जात, वर्ग, धर्म संघर्ष डोके वर काढत होता. याची परिणती महात्मा गांधींच्या हत्येने पुढे आली होती. स्वातंत्र्याच्या सुखमय निद्रेमधून जागे होण्याआधीच महात्मा गांधींचा खून होणे, हे विषण्ण करणारे होते. अशा परिस्थितीत सानेगुरुजींसारखा एक सेवक, कार्यकर्ता चिंतन करू लागला. उपाय शोधू लागला. यातीलच एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे 'साधना' साप्ताहिकाची सुरुवात होय. प्रचंड प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी साधनाची सुरुवात केली. कारण त्यांना हे माहीत होते, की समाजातील वाढत चाललेली तेढ आणि सामाजिक विषमता नष्ट होणे आवश्यक आहे. परंतु ही तेवढीच अवघड प्रक्रिया आहे. हजारो वर्षांपासून भारतात जात–धर्म, स्पृश्य–अस्पृश्य, विषमता मूळ धरून आहेत. याचे उच्चाटन करणे स्वातंत्र्य मिळविण्यापेक्षाही अवघड काम होते. सानेगुरुजींना याची निश्चितच जाण होती. या सर्व परिस्थितीला बदलणे सोपे नव्हते. महात्मा गांधींच्या हत्येनंतर मोठ्या प्रमाणात जाळपोळ झाली. माणूस माणसाचा शत्रू झाला आणि 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' म्हणणाऱ्या सानेगुरुजींनी समाजाला शहाणे करण्याच्या हेतूने 'साधना' साप्ताहिकाची सुरुवात केली. ते पहिल्याच साप्ताहिकाच्या अंकामध्ये आपली भूमिका स्पष्ट करताना म्हणतात, 'मी जीवनाचा नम्र उपासक आहे. या जीवनात जे जे मंगल आहे, ते

अधिक मंगल अधिक चांगले करण्यासाठी मी धडपडत आहे.' या भावनेमधून सानेगुरुजी 'साधना' साप्ताहिकाकडे पाहताना दिसतात.

'साधना' साप्ताहिकाने सातत्याने समता, बंधुता, वैश्विकता, विज्ञानवाद, स्वातंत्र्य, आदी मूल्ये रुजविण्याचे कार्य केलेले आहे. आजतागायत साधना साप्ताहिक याच हेतूने कार्यरत असलेले दिसते. किंबहुना आज माध्यमांच्या पडझडीच्या आणि अविश्वासार्हतेच्या काळात काही बोटांवर मोजण्याइतकीच साप्ताहिके नि:पक्षपातीपणे समाजहितासाठी, समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, वंचितांचे प्रश्न व्यवस्थेसमोर मांडण्यासाठी काम करतात. त्यात 'साधना' साप्ताहिकाचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. 'साधना' साप्ताहिक आजही विचार पेरण्याचे, रुजविण्याचे काम करत आहे.

प्रस्तुत संशोधनाचा कालखंड : ऑगस्ट १९४८ ते मे १९६० असा असून या काळातील 'साधना' साप्ताहिकातील वाङ्मयाचा अभ्यास करणे. यासाठी प्रस्तुत संशोधन प्रबंधाची एकूण पाच प्रकरणांत मांडणी केली असून हाती आलेल्या निष्कर्षांची नोंद केली आहे.

प्रकरण पहिले प्रस्तावना. प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाचे प्रास्ताविक, विषय निवडीचे प्रयोजन, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, व्याप्ती व मर्यादा, वाङ्मयीन नियतकालिक संज्ञा, वाङ्मयीन नियतकालिकाची उद्दिष्टे, महत्त्व, कार्य आणि वाङ्मयीन नियतकालिक परंपरेचा आढावा घेतला आहे. मराठी भाषेतील वाङ्मयीन नियतकालिकांचा उगम, साधना साप्ताहिकाच्या समकालीन साप्ताहिक व पाक्षिकांचा संक्षिप्त आढावा घेतला. प्रस्तुत संशोधन करत असताना प्रामुख्याने उद्दिष्टांना आणि गृहीतकांना समोर ठेवत संदर्भ साधनांच्या आणि 'साधना' साप्ताहिकाच्या आधारे आवश्यक तेथे संदर्भ देत स्पष्टीकरण केले आहे. या संशोधन प्रबंधाच्या मांडणीमध्ये 'साधना' साप्ताहिकाचा अभ्यास, संशोधन काळाचा विचार करता 'साधना' साप्ताहिकाचा आरंभाचा काळ असल्याने या काळातील साधना साप्ताहिकाचे

अंक सॉफ्ट कॉपीमध्ये उपलब्ध होते त्याची स्पष्टता तपासत पडताळून पाहत प्रस्तुत प्रबंधाची मांडणी केली आहे.

प्रकरण दुसरे पूर्वसंशोधनाचा आढावा हे आहे. 'साधना' साप्ताहिक : वाङ्मयीन अभ्यास (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०) या विषयावर 'साधना' साप्ताहिकावर यापूर्वी कोणकोणते संशोधन महाराष्ट्रातील इतर विद्यापीठामध्ये झाले आहे का? ते तपासले असून प्रस्तुत संशोधन विषयावर कोणत्याही विद्यापीठामध्ये यापूर्वी संशोधन झाल्याचे आढळून आलेले नाही.

प्रकरण तिसरे संशोधनपद्धती हे आहे. प्रस्तुत संशोधनासाठी कोणकोणत्या संशोधन पद्धती वापरल्या आहेत. याचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. हे संशोधन पूर्णत्वास नेण्यासाठी ग्रंथालयीन संशोधन पद्धती, ऐतिहासिक संशोधन पद्धती आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धती वापरल्या असून आवश्यक तेथे संदर्भ देत शेवटी संदर्भ सूची दिलेली आहे. प्रस्तुत संशोधन विषय हा (कालखंड ऑगस्ट १९४८ ते मे १९६०) या काळातील असून, प्रस्तुत काळातील 'साधना' साप्ताहिकाचे अंक स्कॅन केलेले उपलब्ध असल्यामुळे अभ्यासण्यासाठी मर्यादा आणि अडथळे येत होते. प्रस्तुत संशोधन हे अधिकात अधिक वस्तुनिष्ठ करण्याचा प्रयत्न केला असून आवश्यक तेथे संदर्भ जोडले आहेत.

प्रकरण चौथे माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन हे आहे. माहितीचे संकलन करत असताना प्रस्तुत संशोधन कालखंडातील साधना साप्ताहिकाचे अंक जीर्ण व डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाले असून हा स्वातंत्र्यानंतरचा अत्यंत दुर्मीळ व महत्त्वाचा दस्तऐवज असल्याने त्याचा अभ्यास होणे गरजेचे वाटले. डिजिटल स्वरूपात उपलब्ध असलेले बरेच अंकही वाचनयोग्य नव्हते, त्यामुळे संकलित केलेल्या माहितीचे अर्थनिर्वचन व विश्लेषण करण्यात अडचणी येत होत्या. म्हणून साधना साप्ताहिकाच्या निवडक अंकांचा (वाचन योग्य) अभ्यास प्रस्तुत संशोधनात केलेला आहे. या प्रकरणात एकूण सहा विभाग

केलेले आहेत ते खालीलप्रमाणे–

**४–अ) साधना साप्ताहिकाचे संपादक आणि संपादन :**

प्रस्तुत संशोधन कालखंडातील साधना साप्ताहिकाचे संपादकीय, साधना साप्ताहिकातील संपादकीयाचे स्वरूप, साधना साप्ताहिकातील संपादकीयाची भाषा, साधना साप्ताहिकाचे स्वरूप व अंतरंग असून साधना साप्ताहिकाचा उदय व वाटचाल ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळातील साधनाचे संपादक, ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळातील साधना साप्ताहिकातील संपादकीयेचे स्वरूप आणि समारोप इत्यादींवर प्रकाश टाकला असून, प्रस्तुत संशोधन काळातील साधनाचे आणि साधना साप्ताहिकातील निवडक संपादकीय लेखांचा अभ्यास येथे केला आहे. प्रस्तुत प्रकरणात साधना साप्ताहिकातील संपादकीय लेखांवर प्रकाश टाकत असताना साधनाने विविध विषय आपल्या संपादकीय लेखामध्ये हाताळलेले दिसून आले. देश विदेशातील महत्त्वाचे प्रश्न, साहित्य, समाज, संस्कृती इत्यादींवर साधनाने प्रकाश टाकत वाचकांसमोर आपली भूमिका मांडलेली आहे.

साधना साप्ताहिकाने सातत्याने समाजाचे मनोबल विकसित करत समाजमनाला आकार देण्याचे कार्य केलेले दिसून येते, विचार पेरणे हे खूप अवघड काम असते हजारो वर्षांपासून वैचारिक पारतंत्र्यात जगणारा इथला बहुजन समाज, वेद, उपनिषद, पाप–पुण्य यात गुरफटलेला होता. जन्म–पुनर्जन्माच्या साच्यात त्याचे जगणे बंदिस्त होते. या वैदिक तत्त्वज्ञानाला पर्याय देणारा गौतम बुद्ध, लोकायत इत्यादींची मांडणी समजणे अवघड होते. अशा परिस्थितीत हजारो वर्षांपासूनची डोक्यात भिनलेली वेद प्रामाण्यवादी विचारधारा नाकारत समतेचा मार्ग पत्करणे इतके सहज व सोपे नव्हते. याची किमान पातळीवर चर्चा झाली पाहिजे आणि या नंतरचा समतेचा टप्पा गाठता येण्यासाठी विविध विषय वाचकांसमोर ठेवण्याचे आणि वाचकांची मानसिकता बदलण्याचे काम साधना साप्ताहिकाने केलेले आहे. याचा सविस्तर आढावा प्रस्तुत प्रकरणामध्ये घेतला आहे.

**४–ब) साधना साप्ताहिकाचे स्वरूप व अंतरंग :**

प्रस्तुत प्रकरणात साधना साप्ताहिकाचे स्वरूप व अंतरंग यांचा सविस्तर आढावा घेतला आहे. 'साधना' साप्ताहिकाचा उदय व वाटचाल, साधनाचे संपादक, ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडातील साधनेचे स्वरूप, वैचारिक लेखन, कथालेखन, ललितनिबंध, ललितलेख, साहित्य समीक्षा, स्वरूप यामध्ये नवकाव्य, प्राचीन, मध्ययुगीन, संस्कृत, संत, ख्रिश्चन संत, लोकनाट्य इ. प्राचीन, संस्कृत, मध्ययुगीन संतसाहित्य, लोकसाहित्य, संगीत–नृत्य, विज्ञान, साहित्य, रसग्रहण, पुस्तक परीक्षण, पुस्तक परिचय, समीक्षा–कविता, कादंबरी, कथासंग्रह, प्रवासवर्णन समीक्षा, चरित्र समीक्षा, चित्रपट समीक्षक, नाटक समीक्षा, विज्ञान समीक्षा, वैचारिक समीक्षा, अनुवादीत रूपांतरित साहित्य, प्रवास वर्णन देशांतर्गत प्रवासवर्णन, परदेश प्रवासवर्णन, चरित्र, व्यक्तिचित्र, शिक्षण क्षेत्र, विज्ञान, परदेशी साहित्यिक, धार्मिक, साहित्यिक लेख, राजकारण, समाजकारण, सामाजिक, खेळ, अरण्य, आंतरभारती, प्रांतभारती, कविता व पत्रलेखन, सानेगुरुजींची सुंदरपत्रे इ. प्रकारचे लेखन, साधना साप्ताहिकातून प्रकाशित झाले होते. याचा अभ्यास करून वैशिष्ट्ये वेगळेपण आणि महत्त्व प्रतिपादित केले आहे.

**४–क) साधना साप्ताहिकातील वैचारिक लेखन :**

प्रस्तुत विभागात वैचारिक लेखनाची ओळख आणि आढावा घेतला आहे. प्रास्ताविक, वैचारिक साहित्य संकल्पना व स्वरूप, वैचारिक साहित्याच्या प्रेरणा, वैचारिक साहित्य परंपरा वैचारिक साहित्याचे वेगळेपण, साधना साप्ताहिकातील वैचारिक साहित्य, साधना साप्ताहिकातील शैक्षणिक लेख, साधना साप्ताहिकातील स्त्रीविषयक लेख, साधना साप्ताहिकातील सामाजिक लेख, साधना साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले धार्मिक लेख इत्यादींचा आढावा घेतला आहे.

**४–ड) साधना साप्ताहिकातील ललित लेखन** :

प्रस्तुत विभागात साधना साप्ताहिकातील ललित लेखन हे असून यामध्ये ललित लेखन संज्ञा संकल्पना, ललित लेखनाचे स्वरूप, वैशिष्ट्ये, वेगळेपण, ललित लेखनाची परंपरा, साधना साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले ललित लेखन, साधना साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले चरित्र लेखन, साधना साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले प्रवासवर्णन इत्यादींचा आढावा घेतला असून आवश्यक तेथे संदर्भ जोडले आहेत.

**४–इ) साधना साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले इतर वाङ्मय प्रकार** :

प्रस्तुत विभागामध्ये संशोधन कालखंडातील म्हणजे ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळात 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेल्या निवडक कथा, कविता, कादंबरी वाङ्मय, नाट्य वाङ्मय, समीक्षा लेखन, पुस्तक परीक्षण, पत्रलेखन, आंतरभारती या सदरातील लेखन इत्यादींचा आढावा घेतला असून या संशोधनाचा मुख्य विषय किंवा गाभा म्हणावा लागेल. प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन कालखंडात साधनाची वाङ्मयीन कामगिरी तपासणे हा मुख्य हेतू सिद्धीस नेण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये मराठी वाङ्मयातील प्रमुख वाङ्मय प्रकारांचा आढावा घेत साधनामधून प्रकाशित झालेल्या विविध वाङ्मय प्रकारातील साहित्याचे विश्लेषण केले आहे. आवश्यक तेथे संदर्भ दिलेले आहेत.

**४–ई) साधना साप्ताहिकाचे दिवाळी अंक आणि विशेषांक** :

प्रस्तुत प्रकरणात साधना साप्ताहिकात ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या काळात प्रकाशित झालेल्या साप्ताहिकांचा वर्षनिहाय, संख्येनिहाय आढावा घेतला आहे. साधना साप्ताहिकाचे विशेषांक व दिवाळी अंकांचा धावता आढावा घेतला आहे.

प्रकरण पाचवे प्रस्तुत संशोधन प्रबंधाचे 'उपसंहार' हे असून या प्रकरणात प्रस्तुत संशोधन प्रबंधाची प्रकरणनिहाय सारांशाने मांडणी केली आहे. प्रस्तुत प्रबंधाची मांडणी एकूण सहा प्रकरणांत केली असून, या सहा प्रकरणाचा थोडक्यात आढावा घेत हाती

आलेले निष्कर्ष नोंदविले आहेत. साधना साप्ताहिकाचा वाङ्मयीन अभ्यास करत असताना, त्याचे वाङ्मयीनदृष्ट्या मूल्यमापन करत असताना 'साधना' साप्ताहिक ज्या काळात उदयास आले त्या काळाची सांस्कृतिक पार्श्वभूमी पाहता साधनाचे कार्य निश्चितच मोठे आहे. आज साधना साप्ताहिकाने ७२ वर्षे पूर्ण केली आहेत. एवढे प्रदीर्घ काळ (काही अपवाद वगळता) अविरत चालणारे साप्ताहिक महाराष्ट्रात अगदी थोडेच असतील. आजतागायत साधना साप्ताहिक सुरू आहे. याचे कारण साधना साप्ताहिकाची मौलिक आणि महत्त्वपूर्ण कामगिरी होय. प्रस्तुत संशोधनाचा मुख्य विषय हा साधनाची वाङ्मयीन कामगिरी तपासणे असून अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे नोंदविलेले आहेत.

१) साधना साप्ताहिकाने वाङ्मयीन अभिरुची वृद्धिंगत केली. साधना साप्ताहिकाने दर्जेदार वाङ्मय प्रकाराचे प्रकाशन करून नवोदित लेखकांना लिहिण्याचे प्रोत्साहन दिले. साधनाच्या सुरुवातीपासूनच मंगेश पाडगावकर, सरिता पदकी, राजा मंगळवेढेकर, वसंत बापट, दुर्गा भागवत, द. भि. कुलकर्णी, कवी ग्रेस (माणिक गोडघाटे) अशा अनेक कवी, लेखकांनी, समीक्षकांनी साधना साप्ताहिकातून आपले लेखन प्रकाशित केले. एका अर्थाने ही साधनाची वाङ्मय सेवा आणि वाङ्मयीन कामगिरी होय, कारण 'साधना साप्ताहिकाने मोठा वाचकवर्ग निर्माण केला. त्यांच्या जिज्ञासातृप्तीसाठी वेगवेगळे वाङ्मय प्रकार प्रकाशित केले. याचाच अर्थ नवोदित लेखकांना प्रोत्साहन देऊन वाचकांची अभिरुची वृद्धिंगत करणे हे महत्त्वाचे कार्य साधना साप्ताहिकाने केले.

२) वाङ्मयीन अभिरुची वृद्धिंगत करण्याच्या संदर्भात साधनाने दर्जेदार कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, प्रवासवर्णन, पत्रलेखन आदी सर्वच वाङ्मय प्रकार प्रकाशित करून वाचकांची अभिरुची वृद्धिंगत केली.

३) साधना साप्ताहिकाचा हेतू हा ढासळत चाललेली सामाजिक परिस्थिती सुधारणे

हा होता. महात्मा गांधीजींची हत्या आणि त्यानंतर महाराष्ट्रात निर्माण झालेली परिस्थिती भयावह होती. या परिस्थितीतून मार्ग काढायचा असेल, तर येथील सामान्य माणूसही साक्षर झाला पाहिजे. यासाठी त्याला स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, राष्ट्रप्रेम, विज्ञानवादी दृष्टिकोन समजणे आवश्यक आहे. यासाठी विविध प्रकारचे वैचारिक लेख साधनामधून प्रकाशित केले. यात सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक विषयांवरील लेखातून साधनाने वैचारिक जडणघडण केली. म्हणूनच सामाजिक जडणघडणीमध्ये साधना साप्ताहिकाचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे.

४) साधना साप्ताहिकाने देशाच्या पहिल्या वर्धापन दिनापासून वैचारिक स्वातंत्र्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करून वैचारिक साहित्य साधनातून प्रकाशित केले. साहित्याची जीवनाशी बांधीलकी असणाऱ्या लेखनाचा समावेश साधनात केला.

५) साने गुरुजींनी लहान मुलांचे मनोरंजन करणे, त्यांना मूल्य शिक्षण देणे आणि भावी भारताचा सक्षम नागरिक घडविणे यावर विशेष भर दिला. यासाठी 'साधना' साप्ताहिकामधून त्यांनी लहान मुलांसाठी विशेष लेखमाला चालविली. अशी लहान मुलांसाठी लेखमाला चालविणारे 'साधना' हे मराठी भाषेतील पहिले नियतकालिक होय.

६) 'साधना' साप्ताहिकाने सलगपणे एक वर्षभर लहान मुलांसाठी विशेष पुरवणी प्रकाशित केली होती. त्यात वेगवेगळ्या वयोगटातील मुलांसाठी विभागणी करत शिशू, बाल, किशोर आणि कुमार असे विभाग करून लेखन प्रकाशित केले.

७) ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालावधीमध्ये प्रकाशित झालेल्या साधना साप्ताहिकातील वाङ्मय प्रकारांचा अभ्यास केला असता साधनाचे वाङ्मयीन कार्य स्पष्ट होत असून साधना केवळ समाजवाद्यांचे मुखपत्र आहे, असे म्हणणे एकांगीपणाचे ठरेल म्हणून साधना साप्ताहिकाला वाङ्मयीन नियतकालिकही

म्हणणे आवश्यक आहे.

८) साधना साप्ताहिकाने प्रकाशित केलेले मराठी वाङ्मय आणि त्यातून तयार झालेल्या लेखक, वाचकांच्या पिढ्यांमधून साधनाचे वाङ्मयीन योगदान स्पष्ट होत असून साधना हे मराठी भाषेतील वाङ्मयीन नियतकालिक आहे हे स्पष्ट होते. म्हणजेच लहान मुलांना केंद्रस्थानी ठेवून साहित्य प्रकाशन करणे आणि त्याची वर्षानुवर्षे मालिका चालविणे ही साधनाची वाङ्मयीन कामगिरी व वेगळेपण होय.

९) कसे जगावे, याची आचारसंहिता म्हणजे सानेगुरुजींची सुधास लिहिलेली सुंदर पत्रे होत. यातील समाजदर्शन, शिक्षण आणि संस्कार, भाषावैभव महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर या पत्रांतून राष्ट्रप्रेम, संस्कृती, कला, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व राष्ट्रीय एकात्मता इत्यादींची शिकवण दिलेली आहे. पत्रलेखनामधून आलेले पर्यावरणाविषयीचे विचार मोलाचे असून साधना साप्ताहिकाने वृक्षसंवर्धन, पर्यावरण संवर्धन अशा विविध उपक्रमांमधून सामाजिक सहभागासाठी संदेश दिलेला आहे. हा संदेश आजच्या काळाशी तंतोतंत जुळणार आहे. त्यामधून साधनाचे सामाजिक भान दिसून येते.

१०) वाङ्मयीन नियतकालिकाचा सामाजिक जडणघडणीमध्ये मोठा वाटा असून माणसाच्या आरोग्यदायी वाटचालीसाठी त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. आदिमानवापासून ते आजच्या प्रगतशील मानवाच्या यशस्वी वाटचालीचा इतिहास नियतकालिकांनी जतन केलला आहे. या कालखंडातील नियतकालिकांनी वाचकांची अभिरुची जोपासली आणि वृद्धिंगत केली.

११) कथा, कविता, नाटक, कादंबरी असे विविध साहित्यप्रकार प्रकाशित करून रंजनाबरोबरच प्रबोधनाच्या क्षेत्रातही नियतकालिकांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. मराठी साहित्याच्या जडणघडणीत नियतकालिकांची भूमिका महत्त्वाची आहे. साधना साप्ताहिकानेही हे कार्य आजतागायत सुरू ठेवलेले आहे.

१२) १९६० नंतरच्या विविध वाङ्मय प्रवाहांना आणि चळवळींना बळ देण्याचे कार्य नियतकालिकांनी केले. त्यांनी साहित्याचे संवर्धन करत नवोदित लेखकांचा आत्मविश्वास वाढविला. उदा. कवी माणिक गोडघाटे (ग्रेस), वसंत बापट, दुर्गा भागवत, सदानंद रेगे, मंगेश पाडगावकर आदी नवोदित लेखकांचा आत्मविश्वास वाढवला.

१३) महाराष्ट्रामध्ये नियतकालिकांचे समाजसुधारकांची, विचारवंतांची, कवीची एक मोठी परंपरा निर्माण केली. या परंपरेमध्ये नियकालिकांचे मोठे योगदान आहे.

१४) साधना साप्ताहिकाने सातत्याने शिक्षण, आरोग्य, समता, स्वातंत्र्य, बंधुता, देशप्रेम आदी मूल्ये रुजवत अंधश्रद्धा व अनिष्ट चालीरीतींवर आघात केले आणि वंचितांना मुख्य प्रवाहात आणणारे लेखन प्रकाशित केले.

१५) ‘प्रांतभारती आंतरभारती’ या शीर्षकाखाली प्रकाशित झालेल्या लेखांतून भारतातील प्रांतबंधूची ओळख करून देणे. विविध संस्कृतीचे रंग दाखविणे. विविध धर्मातील सुंदरता, उदात्तता यांचा परिचय करून देणे, शेतकरी कामगारांचे प्रश्न समजून घेणे, लहान मुलांच्या जगात रमणे, राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव इ. बाबी साधना साप्ताहिकात प्रकर्षाने जाणवतात.

१६) स्त्रीवादाच्या संदर्भात साधना साप्ताहिक आपली भूमिका मांडते. त्यात स्त्रीस्वातंत्र्याच्या संकल्पनेपर्यंत पोहोचायचे असेल तर तिच्या जाणिवांचा विकास व्हायला हवा. त्याशिवाय सक्षमीकरणाच्या दिशेने पाऊल टाकता येणार नाही. ही भूमिका मांडत स्त्री प्रश्नासंबंधी विचार मांडणारे अनेक लेख साधना साप्ताहिकातून प्रकाशित झाले.

१७) ललित गद्यामध्ये आठवणी, अनुभव, निसर्गातील विविध विषयावरील लेख, चिंतनशील लेख, साहित्यपर लेख, प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रणे इ. चा समावेश असून साधना साप्ताहिकामधून सलगपणे हे लेखन प्रकाशित झाले आहे.

१८) ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालावधीमध्ये अनेक दर्जेदार कविता प्रकाशित झाल्या यामधून नवोदितांना लिहिण्याचे बळ आणि वाचकाची अभिरुची वृद्धिंगत करण्याचे काम साधना साप्ताहिकाने केले. एकूणच मराठी वाङ्मयाच्या जडणघडणीत साधना साप्ताहिकाची कामगिरी आणि योगदान महत्त्वपूर्ण आहे.

१९) साधना साप्ताहिकाने प्रस्तुत कालखंडात पाश्चात्त्य साहित्यिक विचारवंत यांचा परिचय मराठी वाचकांना करून दिला. उदा. जॉर्ज बर्नाड शॉ, होमर, स्टिफन स्पेंडर, आनंद पंचम, लियाम, ओपॅलहर्ट आदींची ओळख साधनामुळे झाली.

२०) साधना दिवाळी अंकातून माहितीपर लेख व ललित लेख यांचा सुंदर मिलाफ साधला.

प्रस्तुत संशोधनात अत्यंत तटस्थपणे साधना साप्ताहिकाचे वाङ्मयीन योगदान अभ्यासले असून अभ्यासाअंती उपरोक्त निष्कर्ष हाती आले आहेत.

## संशोधनाची पुढची दिशा :

'साधना' साप्ताहिकाचा वाङ्मयीन अभ्यास करत असताना साधना साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले साहित्य आणि इतर लेखन यावर स्वतंत्र अभ्यास होणे गरजेचे वाटते. खरेतर साधना साप्ताहिकाची निर्मितीच समाजशिक्षणासाठी झालेली दिसते. साधना साप्ताहिकाच्या पहिल्याच अंकामध्ये ही भूमिका सानेगुरुजी स्पष्ट करतात. महत्प्रयासाने भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि स्वातंत्र्याच्या साखर झोपेत असतानाच महात्मा गांधीजींचा खून होणे, ही जगाला धक्का देणारी घटना घडली. अहिंसेच्या पुजाऱ्याची हत्या ही घटना मानवी मन हेलावणारी होती. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील परिस्थिती आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील परिस्थिती या सर्वांकडे सानेगुरुजींसारखा संवेदनशील लेखक उघड्या डोळ्यांनी पाहू लागला. पत्रकार, कवी, संपादक, लेखक विचारवंत सामाजिक चळवळीतील कार्यकर्ता असे अनेक पैलू सानेगुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाचे

दिसतात. त्यातच एक शिक्षक जो समाजाला दिशा देणारा, सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करणारा, गुंता सोडविण्यासाठी झटणारा 'मी जीवनाचा नम्र उपासक आहे' असे म्हणणाऱ्या सानेगुरुजी यांनी विविध प्रकारचे लेखन केले. तसेच प्रकाशितही केले. 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले अग्रलेख हा स्वतंत्र अभ्यासविषय आहे. 'साधना' साप्ताहिकातील प्रकाशित झालेल्या अग्रलेखाचा राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक अभ्यास, साधना साप्ताहिकातील वैचारिक लेखन, 'साधना' साप्ताहिकातील अनुवादीत लेखन, साधना साप्ताहिकातून प्रकाशित झालेले विविध चळवळींवरचे लिखाण 'साधना' साप्ताहिकामधून प्रकाशित झालेले पत्रलेखन, बालवाङ्मय, इत्यादींचा स्वतंत्र अभ्यास करता येण्यासारखे महत्त्वाचे अभ्यासविषय आहेत. समाज शहाणा करावयाचा असेल तर येथील लहान मुलांना शहाणे करायला हवे. यासाठी स्वतंत्र लेखन, स्वतंत्र शिबिरे घ्यायला हवी. मूल्यांची रुजवणूक ही अत्यंत महत्त्वाची असून लहान मुलांमध्ये ती पेरणे आवश्यक आहे. हे काम शाळा, महाविद्यालयाने आणि समाजानेही करायला हवे. याची जाणीव साधना साप्ताहिकामधून होते. 'माणूस घडविणे महत्त्वाचे आहे तरच समाज घडेल' ही जाणीवही साधना साप्ताहिक करून देते. शिवाय साधना साप्ताहिकातून प्रकाशित झालेले आणि आजही प्रकाशित होत असलेले साहित्य समाज उन्नतीसाठीच आहे. हे मान्य करावेच लागेल.

**संशोधनाचे पुढील विषय** :

- साधना साप्ताहिकातून प्रकाशित झालेले अग्रलेख.
- साधना साप्ताहिकातील अग्रलेखाचा सामाजिक, राजकीय, धार्मिक दृष्टिकोनातून अभ्यास.
- 'साधना'तील वैचारिक लेखन.
- 'साधना'तील बालवाङ्मयाचा अभ्यास.

- ‘साधना’ साप्ताहिक : दिवाळी अंक एक अभ्यास.
- ‘साधना’ साप्ताहिकातील विशेषांकांचा अभ्यास.

आदी विषयांबरोबरच इतर विषयांच्या अनुषंगाने साधना साप्ताहिकाचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यास होणे गरजेचे वाटते.

# संदर्भ सूची


१. करंदीकर विंदा, परंपरा आणि नवता, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ., १९६७.

२. कानडे रामचंद्र गोविंद, मराठी नियतकालिकांचा इतिहास– १८३२ ते १९३७, कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई–२, प्र.आ., १९३८.

३. काळे भगवान, महाराष्ट्रातील समाजकारण कालचे व आजचे, संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज (लेख).

४. कुलकर्णी व. दि., मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास, खंड–१, विद्या प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९८७.

५. कुलकर्णी वा. ल., साहित्य आणि समीक्षा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ., १९६३.

६. कांचोळे दा. धों., सामाजिक संशोधन पद्धती, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्र. आ., १९९३.

७. खैरनार दिलीप, संशोधन पद्धती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्र.आ., २०००.

८. घाटोळे रा.ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, सातवी आवृत्ती.

९. चौघुले वि. शं., लघुनिबंध ते मुक्तगद्य, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्र.आ., २००२.

१०. जोशी लक्ष्मणशास्त्री (तर्कतीर्थ), मराठी विश्वकोश खंड ०८, म.रा.सा.सं.मं. मुंबई, प्र.आ., १९७९.

११. त्रिभुवन शैलेश (डॉ.), उत्तम कांबळे यांची आत्मकथने आणि चिकित्सा, डायमंड पब्लिकेशन, पुणे प्रथमावृत्ती, २०१०.

१२. डांगळे अर्जुन, दलित साहित्य : एक अभ्यास, सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती.

१३. नीलम धुरी, संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ., २००१.

१४. निर्मळे हरिश्चंद्र, दलितांची नियतकालिके, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ., १९८७.

१५. पाटील मृणालिनी, (संपा.), समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह, विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ., १९८५.

१६. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.) हीरकमहोत्सवी निवडक 'साधना', खंड १, 'साधना'तील साने गुरुजी, साधना प्रकाशन, पुणे, प्र. आ., जून २००७.

१७. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.) हीरकमहोत्सवी निवडक साधना, खंड २, ‘साधना’तील निवडक संपादकीय, साधना प्रकाशन, पुणे, प्र.आ., जून २००७.

१८. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.) हीरकमहोत्सवी निवडक साधना, खंड ३, लोकशाही समाजवाद, साधना प्रकाशन, पुणे, प्र. आ., जून २००७.

१९. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.) हीरकमहोत्सवी निवडक साधना, खंड ४, चळवळी व आंदोलने, साधना प्रकाशन, पुणे, प्र.आ., जून २००७.

२०. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.) हीरकमहोत्सवी निवडक साधना, खंड ५, राजकीय व आर्थिक, साधना प्रकाशन, पुणे, प्र.आ., जून २००७.

२१. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.) हीरकमहोत्सवी निवडक साधना, खंड ६, सामाजिक व सांस्कृतिक, साधना प्रकाशन, पुणे, प्र.आ., जून २००७.

२२. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.) हीरकमहोत्सवी निवडक साधना, खंड ७, ललित व मननीय, साधना प्रकाशन, पुणे, प्र.आ., जून २००७.

२३. प्रधान ग. प्र., जाधव रा. ग. (संपा.) हीरकमहोत्सवी निवडक साधना, खंड ८, वेध: साधना पत्रकारितेचा, साधना प्रकाशन, पुणे, प्र.आ., जून २००७.

२४. भोसले शिवाजीराव, यज्ञप्रश्न, ओम अक्षरब्रह्म प्रकाशन.

२५. मंगळवेढेकर राजा, महाराष्ट्राचे शिल्पकार साने गुरुजी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वि.आ., जानेवारी २००५.

२६. मोरे सदानंद, प्रबोधनपर वैचारिक वाङ्मय, य.च.म.मु. विद्यापीठ नाशिक, सहावी आवृत्ती, २००७.

२७. रेगे मे. पु., विवेकवाद विज्ञान आणि श्रद्धा, शब्दश्री प्रकाशन.

२८. राजाध्यक्ष विजया (समन्वयक संपा.), मराठी वाङ्मयकोश खंड–४, संज्ञा– समीक्षा, समन्वयक संपादक, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र. आ., २००२.

२९. राजाध्यक्ष विजया (संपा.) समन्वयक, मराठी वाङ्मयकोश खंड–४, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई–२, प्र.आ., २००२.

३०. लेले रा. के., मराठी वृत्तपत्राचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, द्वि.आ., २००४.

३१. वज्हारे बी. एस., सामाजिक संशोधन पद्धती, पिंपळापुरे पब्लिकेशन, गडचिरोली, प्र.आ., २०११.

३२. वाघमारे जनार्दन, समाजपरिवर्तनाच्या दिशा, सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९.

३३. शहा मु. ब., संपादक : कार्ये आणि जबाबदारी, प्रकाशक डॉ. राजेंद्र कंकरिया कुलसचिव यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्र. आ., २०००.

३४. शहा मु. ब., महाराष्ट्राचे शिल्पकार यदुनाथ थत्ते, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ., मार्च २००४.

३५. शेणोलीकर ह. श्री., संज्ञाकोश, मराठी विश्वकोश, पुणे, महाराष्ट्र मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ १९९९, खंड १६ वा, मुंबई १९९९.

३६. शेलार सुधाकर, वैचारिक साहित्याचे संशोधन, शब्दश्री प्रकाशन, पुणे, २६ ऑगस्ट २०१३.

३७. सरदार गं. बा., अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका, मॉडर्न बुक डेपो, पुणे–३०, प्रथमावृत्ती, १९३७.

३८. 'साधना' दिवाळी विशेषांक संपा. पु. ह. पटवर्धन/शं. द. जावडेकर, १९५१, पृ.क्र.३.

३९. सुरवाडे मनोहर (डॉ.), समकालीन दलित कथा–एक अभ्यास, अन्वय प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, २००८.

४०. सूर्यवंशी नानासाहेब, अक्षर वाङ्मय एप्रिल–मे–जून २०१५, वर्ष पाचवे, अंक चौथा.

**नियतकालिक सूची** :

'साधना' साप्ताहिकातील १९४८ ते १९६० संपादकनिहाय सूची–

**सानेगुरुजी (संपादक)** :

| | | |
|---|---|---|
| दिनांक १५ ऑगस्ट १९४८, | ११ सप्टेंबर १९४८, | ९ ऑक्टोबर १९४८, |
| १ जानेवारी १९४९, | २२ मे १९४९, | २८ मे १९४९, |
| ११ जून १९४९, | ९ जुलै १९४९, | १६ जुलै १९४९, |
| १४ डिसेंबर १९४९, | २८ जानेवारी १९५०, | ४ मार्च १९५०, |
| १ एप्रिल १९५०, | १५ एप्रिल १९५०, | २२ एप्रिल १९५०, |
| १० जून १९५०. | | |

**पटवर्धन पु. ह., जावडेकर शं. द.** :

| | | |
|---|---|---|
| दिनांक २४ जून १९५०, | १ जुलै १९५०, | २२ जुलै १९५०, |
| १५ ऑगस्ट १९५०, | २६ ऑगस्ट १९५०, | ७ ऑक्टोबर १९५०, |
| २८ ऑक्टोबर १९५०, | २३ डिसेंबर १९५०, | ११ नोव्हेंबर, १९५०, |
| १८ नोव्हेंबर १९५०, | १ मार्च १९५१, | २९ मार्च १९५१, |
| ५ मे १९५१, | ११ जून १९५१, | ३० जून १९५१, |
| २५ ऑगस्ट १९५१, | १५ सप्टेंबर १९५१, | २४ नोव्हेंबर १९५१, |
| १ डिसेंबर १९५१, | १५ डिसेंबर १९५१, | ०५ जानेवारी १९५२, |
| २९ मार्च १९५२ | १९ एप्रिल १९५२, | १० मे १९५२, |
| ४ ऑक्टोबर १९५२, | १४ फेब्रुवारी १९५३, | २१ फेब्रुवारी १९५३, |
| १४ मार्च १९५३, | ४ एप्रिल १९५३, | २३ मे सप्टेंबर १९५३, |
| ३० मे १९५३, | १३ जून १९५३, | २० जून १९५३, |
| १४ जुलै १९५३, | २५ जुलै १९५३, | १ ऑगस्ट १९५३, |
| १५ ऑगस्ट १९५३ | ५ सप्टेंबर १९५३, | २४ नोव्हेंबर १९५३, |
| ५ डिसेंबर १९५३, | १२ डिसेंबर १९५३, | २ जानेवारी १९५४, |
| १२ जून १९५४, | ३ जुलै १९५४, | १७ जुलै १९५४, |
| ७ ऑगस्ट १९५४, | १५ ऑगस्ट १९५४, | २ ऑक्टोबर, १९५४, |
| २७ नोव्हेंबर १९५४, | १८ डिसेंबर १९५४, | १५ जानेवारी १९५५, |
| ५ मार्च १९५५, | १९ मार्च १९५५, | २३ एप्रिल १९५५, |
| ७ मे १९५५, | १० डिसेंबर १९५५, | २५ फेब्रुवारी १९५६, |
| २४ मार्च १९५६, | १४ एप्रिल १९५६, | १६ जून १९५६, |
| ७ जुलै १९५६, | १४ जुलै १९५६, | १५ ऑगस्ट १९५६, |
| २१ जुलै १९५५, | ०५ मार्च १९५५, | १ जुलै १९५५. |

**यदुनाथ थत्ते** :

| | | |
|---|---|---|
| दिनांक २४ डिसेंबर १९५६, | १८ मे १९५७, | २१ सप्टेंबर १९५७, |
| ४ जानेवारी १९५८, | ८ फेब्रुवारी १९५८, | २२ मार्च १९५८, |

| | | |
|---|---|---|
| २९ मार्च १९५८, | १५ एप्रिल १९५८, | २६ एप्रिल १९५८, |
| ५ जुलै १९५८, | १२ जुलै १९५८, | ९ ऑगस्ट १९५८, |
| २३ ऑगस्ट १९५८, | ४ ऑक्टोबर १९५८, | ११ ऑक्टोबर १९५८ |
| १८ ऑक्टोबर १९५८, | २५ ऑक्टोबर १९५८, | २९ नोव्हेंबर १९५८, |
| ६ जानेवारी १९५९, | १४ फेब्रुवारी १९५९, | ३ मे १९५९, |
| ९ मे १९५९, | २३ मे १९५९, | ४ जुलै १९५९, |
| २१ ऑगस्ट १९५९, | ०५ सप्टेंबर १९५९, | १२ सप्टेंबर १९५९, |
| ७ नोव्हेंबर १९५९, | ८ डिसेंबर १९५९, | ३० जानेवारी १९६०, |
| २० फेब्रुवारी १९६०, | ५ मार्च १९६०, | १६ एप्रिल १९६०, |
| २७ एप्रिल १९६०, | २७ एप्रिल १९६०. | |

**डॉ. नरेंद्र दाभोलकर** :

दिनांक १९ मार्च २०११, एप्रिल २००९.

**डॉ. विनोद शिरसाठ** :

दिनांक १७ ऑगस्ट २०१९.

दैनिक महाराष्ट्र टाइम्स डॉट कॉम, दिनांक १२ मे २०१७.

# परिशिष्टे

१) संदर्भ सूची

२) नियतकालिक सूची

३) ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालावधीतील संपादकांचा परिचय

४) आलेख (‘साधना’ साप्ताहिकाचे वाङ्मयीन योगदान/कामगिरी दर्शविणारा स्तंभालेख)

५) ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडातील निवडक मुखपृष्ठे

## 'साधना' साप्ताहिकाच्या ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडातील संपादक व सहसंपादकांचा परिचय :

### १. सानेगुरुजी यांचा परिचय :

| | | |
|---|---|---|
| नाव | : | पांडुरंग सदाशिव साने अर्थात सानेगुरुजी |
| जन्म-मृत्यू | : | जन्म दिनांक २४ डिसेंबर १८९९ रोजी पालगड.<br>मृत्यू दिनांक ११ जून १९५० रोजी मुंबई. |
| वडील | : | सदाशिव नारायण साने. वडवली गावचे खोत. दिनांक १५ नोव्हेंबर १९२४ रोजी मृत्यू. |
| आई | : | यशोदाबाई परचुरे. पुढे यशोदाबाई सदाशिव साने. दिनांक २ नोव्हेंबर १९१७ रोजी मृत्यू. |
| गुरुजींची भावंडे | : | गजानन यांचे निधन १३ फेब्रुवारी १९४६, चंद्रा (सौ. लक्ष्मीबाई भिडे) व लहानपणीच वारलेली बहीण मीना यशवंत, पुरुषोत्तम व सदानंद, सदानंदचे पुण्यात प्लेगने निधन (१९१६). |

**गुरुजींची पत्रकारिता :**

१) दिनांक १९ जुलै १९२७ ते २९ एप्रिल १९३० या काळात हस्तलिखित स्वरूपातील 'छात्रालय' दैनिकाचे संपादक.

२) दिनांक ९ नोव्हेंबर ते एप्रिल १९३० छापील स्वरूपाच्या 'विद्यार्थी' मासिकाचे संपादक.

३) दिनांक ६ एप्रिल १९३८ ते १८ मार्च १९४० 'काँग्रेस' साप्ताहिकाचे संपादक व लेखन.

४) सन १९४७ ला प्रकाश मोहाडीकर व इतरांनी सुरू केलेल्या 'प्रदीप' मासिकाचे संपादन काही काळ साने गुरुजींनी केले.

५) दिनांक ११ फेब्रुवारी १९४८ गांधीजींच्या हत्येचे प्रायश्चित्त म्हणून एकवीस दिवस उपोषण या काळात 'कर्तव्य' सायंदैनिक सुरू केले. चार महिने प्रकाशित झाले.

६) दिनांक १५ ऑगस्ट १९४८ रोजी 'साधना' साप्ताहिकाची स्थापना केली. यामध्ये बापूजींच्या गोड गोष्टी व पुतणी सुधा हिला लिहिलेली 'सुंदर पत्रे' प्रकाशित केली.

७) शिक्षण : १९२४ साली एम. ए. उत्तीर्ण

८) टोपण नावे- बालपणातील घरगुती नाव पंढरीनाथ. राम जोशी व इतर मित्रांनी सेनानी, राम, देव व स्कंद ही नावे दिली. अंमळनेरच्या शाळेत छात्रालय प्रमुख पदामुळे 'छात्रानंद'

हे नाव प्राप्त झाले. नाशिक कारागृहात आपटेगुरुजी व इतरांनी ‘सानेगुरुजी’ हे नाव दिले. तर १९४६ साली पुणे येथे संपन्न झालेल्या साहित्य संमेलनात ‘कुमारांचे गांधी’ म्हणून ओळख. पण ‘सानेगुरुजी’ या नावाने ओळख.

## सानेगुरुजींचे साहित्य :

**आत्मकथनपर कादंबरी कविता** :

(१) श्यामची आई (२) श्याम (३) जीवनकलह अर्थात श्याम, खंड–२ (धडपडणारा श्याम) (४) जीवनविकास अर्थात श्याम खंड–३ (१) खानदेश स्तोत्र (२) पत्री

**नाटक** :

(१) ते आपले घर (२) निळा पक्षी (३) अस्पृश्योद्धार (४) मंगल प्रभात

**कादंबरी / पत्रे** :

(१) धडपडणारी मुले, खंड १ व २ (२) पुनर्जन्म (३) सती (४) आस्तिक (५) क्रांती (६) गोड शेवट (७) रामाचा शेला (८) संध्या (९) नवा प्रयोग (१०) चित्रकार रंगा (११) तीन मुले (१२) कालिमातेची मुले (१३) दीनबंधू (१४) दिगंबरराय (१५) सुंदर पत्रे (भाग १ ते ३) (१६) श्यामची पत्रे

**वैचारिक लेख, निबंध इत्यादी** :

| | |
|---|---|
| (१) भारतीय संस्कृती | (२) सोन्या मारुती? |
| (३) गोड निबंध (भाग १ ते ३) | (४) कर्तव्याची हाक |
| (५) स्वातंत्र्याचा अर्थ | (६) समाजवाद हा एकच मार्ग |
| (७) भारतीय नारी | (८) माझी दैवते |
| (९) जीवनाचे शिल्पकार | (१०) गीता–हृदय |
| (११) कुमारांपुढील कार्य | (१२) मंदिर–प्रवेश |

**कथा** :

(१) विश्राम (२) सोनसाखळी (३) मुलांसाठी फुले (४) अमोल गोष्टी (५) दारूबंदीच्या कथा (६) साक्षरतेच्या कथा (७) सुंदर कथा (८) श्रमणारी लक्ष्मी (९) त्रिवेणी (शबरी) (१०) कावळे (११) जनी (१२) मोरी गाय (१३) जयंता (१४) शुक्री (१५) कलिंगडाच्या साली (१२ ते १५ या ४ गोष्टी ‘श्रमणारी लक्ष्मी’ या पुस्तकातील आहेत.)

**चरित्र :**

(१) नामदार गोखले-चरित्र (२) ईश्वरचंद्र विद्यासागर (३) इतिहासाचार्य राजवाडे

(४) शिशिरकुमार घोष (५) रवींद्रनाथ टागोर (६) बेंजामिन फ्रँकलिन (७) जीवन प्रकाशन

(८) गोष्टीरूप गांधीजी (९) विनोबा भावे (गोष्टीरूप विनोबाजी) (१०) देशबंधू दास

(११) स्वप्न आणि सत्य (वैचारिक लेख) (१२) हिमालयाची शिखरे (चरित्रात्मक निबंध)

(१३) चंद्रभागेच्या वाळवंटी (संत चरित्रे) (१४) गुरुजींचे उपदेश

**'गोड गोष्टी' मालेतील १० पुस्तके :**

(१) विविध गोष्टी (२) मनूबाबा (३) फुलांचा प्रयोग व नदी शेवटी सागराला मिळेल (४) दु:खी

(५) सोराब नि रुस्तुम (६) बेबी सरोजा (७) करुणादेवी (८) यती का पती? (९) चित्रा नि चारू

**'आवडत्या गोष्टी' मालेतील ६ भाग :**

(१) आपण सारे भाऊ (२) गोप्या (३) दुर्दैवी (४) मिरी (५) स्वर्गीय ठेवा (६) नवजीवन

**सानेगुरुजींची जीवनगाथा :**

(१) श्रीशिवराय (२) महात्मा गौतम बुद्ध (३) बापूजींच्या गोड गोष्टी (भाग १ ते ६)

(४) आपले नेहरू (५) लोकमान्य टिळक (६) भगवान श्रीकृष्ण संक्षिप्त साहित्य

(७) इस्लामी संस्कृती (१) आस्तिक (कादंबरी) (खंड १ : मुहम्मद पैगंबर चरित्र)

(८) महात्मा गांधी दर्शन (जावडेकरांची व्याख्याने) (९) अमळनेरकर सखाराम महाराजांचे चरित्र

**संक्षिप्त साहित्य :**

(१) आस्तिक (कादंबरी) (२) क्रांती (कादंबरी) (३) तीन मुले (कादंबरी) (४) पत्री (कविता)

(५) भारतीय संस्कृती (निबंध)

**संपादित :**

(१) स्त्री जीवन (भाग १ व २)

**सानेगुरुजींची चरित्रे :**

(१) सानेगुरुजी (ओझरते दर्शन) : आपटेगुरुजी

(२) सानेगुरुजी (एक जीवनदर्शन) : वामन चोरघडे

(३) सानेगुरुजी (जीवन-परिचय): यदुनाथ थत्ते

(४) सानेगुरुजी (सुलभ जीवनपरिचय) : शीलभद्र

(५) सानेगुरुजी : त्र्यं. ग. बापट

(६) सानेगुरुजींची जीवनसाधना : वसंत बापट

(७) आधुनिक संत सानेगुरुजी : रामभाऊ भोगे

(८) आधुनिक संत सानेगुरुजी : राजा मंगळवेढेकर

(९) भले भले हे सानेगुरुजी : पु. पां. गोखले

(१०) मुलांची मायमाउली : वि.स. गवाणकर

**अनुवादित :**

(१) खेड्यात जाऊन काय कराल? (२) राष्ट्रधर्म (३) स्वदेशी समाज

(४) कला म्हणजे काय? (५) समाजधर्म (६) कला आणि इतर निबंध

(७) कल्की अथवा संस्कृती भवितव्य (८) राष्ट्रीय हिंदू धर्म (९) ॲमिलची चिंतनिका

स्मृती : संपादन इत्यादी (१०) कुरल (११) मानवजातीची कथा (१२) दिल्ली डायरी

(१३) ना खंत ना खेद (१४) साधना

**स्मृति : संपादन इत्यादी**

(१) मृगाजिन : ब. ग. कुलकर्णी

(२) स्मृतिसुगंध : (विविध लेखक)

(३) असा होता सेनानी! : डॉ. रामभाऊ जोशी

(४) ऑगस्ट क्रांतीचे आचार्य : हरिकृष्ण देसाई

(५) सानेगुरुजींचे जीवन-प्रसंग : गोंधळेकर प्रभू

(६) सानेगुरुजी : व्यक्ती आणि वाङ्मय (विविध लेखक)

(७) मातृधर्मी सानेगुरुजी : पु. ल. देशपांडे

(८) मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी- सानेगुरुजी : प्र. के. अत्रे

(९) साने गुरुजी स्मृतिशलाका- (विविध लेखक)

**गुरुजींचे संपादित साहित्य :**

(१) कमल फुले (गोष्टी)

(२) मेंग चियांग आणि इतर कथा

(३) गुरुजींच्या गोष्टी

**२. आचार्य शं. द. जावडेकर यांचा परिचय :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नाव | : | आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर |
| २) | जन्म व मृत्यू | : | जन्म– कोल्हापूर येथे २६ सप्टेंबर १८९४<br>मृत्यू– १० डिसेंबर १९५५ |
| ३) | शिक्षण | : | बी.ए. फिलॉसॉफी, फर्ग्युसन कॉलेज, पुणे |

४) मराठी लेखक, गांधीवादी तत्त्वचिंतक, लोकशाही, समाजवाद, अर्थशास्त्र या विषयावर लेखन, राष्ट्र सेवा दलाचे व गांधीवादाचे कट्टर पुरस्कर्ते.

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | अध्यक्ष | : | १९४९ ला पुण्यात भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष |
| ६) | लेखन | : | आधुनिक भारत, गांधीवाद, जवाहरलाल नेहरू, लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी, लोकशाही, हिंदू–मुसलमान ऐक्य, सत्याग्रही समाजवाद इत्यादी पुस्तकांचे लेखन |
| ७) | संपादक | : | ‘साधना’ साप्ताहिकाचे संपादक– १९५० ते १९५२<br>‘नवशक्ती’ आणि ‘लोकशक्ती’चे संपादक |
| ८) | प्रभाव | : | गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व महात्मा गांधी या तिघांबरोबरच मार्क्सला ते गुरू मानत. |

**३. पु. ह. पटवर्धन/ अर्थात रावसाहेब पटवर्धन यांचा परिचय :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नाव | : | पुरुषोत्तम हरिभाऊ पटवर्धन |
| २) | जन्म व मृत्यू | : | जन्म– अहमदनगर येथे १५ जुलै १९०३.<br>मृत्यू– २८ ऑगस्ट १९६९. |
| ३) | संपादक | : | सन १९५० ते १९५६ या कालखंडात ‘साधना’ साप्ताहिकाचे संपादक त्यांचे वडील हरिभाऊ व सेनापती बापट हे सहअध्यायी होते. वडील – लोकमान्य टिळक आणि डॉ. ॲनी बेझंट यांच्या होमरुल लीगचे काम करीत. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | त्यांनी मुलांवर देशभक्तीचे संस्कार केले. 'संघशक्ती' नावाचे साप्ताहिक नगरमध्ये सुरू केले. |
| ४) | शिक्षण | : | अहमदनगर येथे शालेय शिक्षण तर उच्च शिक्षण बनारस विश्वविद्यालयात घेतले. तत्त्वज्ञान विषयात पदवीधर, इतिहास, राजकारण, अर्थशास्त्र हे त्यांच्या अभ्यासाचे विषय. |
| ५) | सहभाग | : | सन १९२२ मध्ये महात्मा गांधीच्या सत्याग्रह आंदोलनात सहभाग १९३०, १९३२, १९३९ व १९४२ च्या आंदोलनात कारावास भोगला. |
| ६) | गांधी विचारांचा व नेहरूंचा प्रभाव | : | खादी व ग्रामोद्योग, अस्पृश्यता निर्मूलन, हिंदू–मुस्लिम ऐक्य व दारूबंदी ही गांधीजींची चतु:सूत्री मान्य. रावसाहेब पटवर्धन यांनी काँग्रेस संघटनेचे कार्य निष्ठेने केले. |

**४. यदुनाथ थत्ते यांचा परिचय :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नाव | : | यदुनाथ दत्तात्रय थत्ते |
| २) | जन्म व मृत्यू | : | जन्म– येवला, नाशिक येथे ५ ऑक्टोबर १९२२<br>मृत्यू– १० मे १९९८ |
| ३) | शिक्षण | : | – |
| ४) | प्रभाव | : | भारतीय स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार, उत्कृष्ट लेखक व संपादक, मराठी साहित्यिक, सानेगुरुजींचा प्रभाव, भारत छोडो आंदोलनातील सहभागामुळे सहा महिने कारावास, चले जाव चळवळीत सहभाग. |
| ५) | संपादक | : | सन १९५६ ते १९८२ पर्यंत 'साधना' साप्ताहिकाचे संपादक 'साधना' साप्ताहिकाला वैचारिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. |
| ६) | लेखन | : | आटपाटनगर होते, (बालकादंबरी) आपला वारसा |

(चरित्रसंग्रह) चिरंतन प्रकाश देणारी ज्योत– महात्मा गांधी (व्यक्तिचित्रण बालसाहित्य), पुढे व्हा (भाग १ ते ३ माहितीपर), भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर (चरित्र), यशाची वाटचाल (माहितीपट), रेश्मा (बालसाहित्य), समर्थ व्हा, संपन्न व्हा (उपदेशपर) सानेगुरुजी (चरित्र) सानेगुरुजी : जीवन–परिचय (व्यक्ती चित्रण), स्वातंत्र्य गीते (संपादित).

७) सामाजिक कार्य : बाबा आमटे– भारत जोडो यात्रा, साने गुरुजी कथामाला, प्रेस कौन्सिलचे अध्यक्ष, सुधारकाग्रणी गोपाळ गणेश आगरकर सुवर्णपदकप्राप्त लेखक, राष्ट्र सेवा दलासाठी योगदान, साने गुरुजींचे शिष्य यदुनाथ थत्ते, सानेगुरुजी व आचार्य विनोबा भावे यांचे विचार आचरणात आणले.

**६. दुर्गा भागवत यांचा परिचय :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नाव | : | दुर्गा नारायण भागवत (‘साधना’ साप्ताहिकाच्या सहसंपादक) |
| २) | जन्म–मृत्यू | : | १० फेब्रुवारी १९१० (इंदूर, मध्य प्रदेश), ७ मे २००२ (मुंबई) |
| ३) | प्रसिद्ध साहित्यकृती | : | ऋतुचक्र पैस, डूब, बाणभट्टाची कादंबरी, जातक कथा (अनुवाद) थोरो या अमेरिकन विचारवंत वॉल्डनकाठी विचारविहार (अनुवाद) रवींद्रनाथ टागोरांच्या गीतांजलीचा संस्कृत अनुवाद इ. |
| ४) | छंद | : | संशोधन व साहित्याची आवड होती. पण पाकशास्त्रात पारंगत असून विणकाम, भरतकाम उत्तम करीत. |
| ५) | शिक्षण | : | सन १९२७ मॅट्रिक उत्तीर्ण, १९३२ मध्ये बी.ए.–इंग्रजी व संस्कृत हे विषय घेऊन सेंट झेविअर्स महाविद्यालय, मुंबई येथून १९३५ मध्ये एम.ए. (इंडियन कल्चरल हिस्टरी) अर्ली बुद्धिस्ट ज्युरिसप्रूडन्स या विषयावर प्रबंधलेखन पीएच. डी. – सिंथेसिस ऑफ हिंदू ॲण्ड ट्रायबल कल्चर्स ऑफ सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ऑफ इंडिया या विषयावर संशोधन पर प्रबंध सादर केला नाही. |

६)	पुरस्कार	:	सन १९७१ मध्ये ‘पैस’ या पुस्तकास साहित्य अकादमी पुरस्कार, तर आणीबाणीच्या निषेधार्थ इंदिराबाईंनी दिलेला पद्मश्री सन्मान, तसेच ज्ञानपीठ पुरस्कार नाकारला.

७)	भाषा– फ्रेंच, जर्मन, इंग्रजी, संस्कृत, पाली या भाषा अवगत होत्या.

८)	लेखन– लोकसाहित्य, बालसाहित्य, बौद्धसाहित्य, कथा, चरित्र, ललित संशोधनपर, समीक्षात्मक वैचारिक लेखन यांचा समावेश होतो.

९)	नोकरी– त्यांनी पुण्यातील गोखले इन्स्टिटयूटमध्ये दोन वर्षे समाजशास्त्र विभागप्रमुख म्हणून काम केले.

**७. मंगेश पाडगावकर यांचा परिचय :**

१)	नाव	:	मंगेश केशव पाडगावकर

२)	जन्म–मृत्यू	:	१० मार्च १९२९ (वेंगुर्ला), ३० डिसेंबर २०१५ (मुंबई) महाराष्ट्र

३)	प्रसिद्ध साहित्य :	सलाम, धारानृत्य, जिप्सी, सलाम, तुझे गीत गाण्यासाठी हे निवडक काव्यसंग्रह

४)	पुरस्कार	:	‘सलाम’ या कवितासंग्रहाला १९८० साली साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला. महाराष्ट्रभूषण पुरस्कार, पद्मभूषण पुरस्कार

५)	शिक्षण	:	मुंबई विद्यापीठातून मराठी व संस्कृतमध्ये एम.ए.

६)	अनुवादित	:	थॉमस पेन– राजनैतिक निबंध, बायबलचा अनुवाद

कमला सुब्रह्मण्यम– मूळ इंग्रजी महाभारताचा कथारूप महाभारत दोन खंडांत अनुवाद. मीरा, कबीर आणि सूरदास यांच्या निवडक पदांचा अनुवाद. ज्युलिअस सीझर, रोमिओ आणि ज्युलिएट, दि टेम्पेस्ट (वादळ) या शेक्सपिअरच्या तीन नाटकांचा अनुवाद. जे कृष्णमूर्ती यांचे Educational and Significance of Life या पुस्तकाचा ‘शिक्षण आणि जीवन दर्शन’ या नावाने अनुवाद

७)	लेखन : निबंध, कथा, कविता, कादंबरी, नाटक, इतिहास, चरित्र, आत्मचरित्र अशा विषयांवर २५ हून अधिक पुस्तके.

**८. वसंत बापट यांचा परिचय :**

| | | |
|---|---|---|
| १) नाव | : | विश्वनाथ वामन बापट ऊर्फ वसंत बापट |
| २) जन्म व मृत्यू | : | दिनांक २५ जुलै १९२२ (कराड)– १७ सप्टेंबर २००२ (पुणे) |
| ३) शिक्षण | : | सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे |
| ४) नोकरी | : | नॅशनल कॉलेज, वांद्रे आणि रामनारायण रुईया कॉलेज, मुंबई येथे मराठी व संस्कृत विषयाचे अध्यापन. |
| ५) प्रभाव | : | राष्ट्र सेवा दल आणि सानेगुरुजींचे सहवासाचे संस्कार झाले. १९४२ च्या चले जाव चळवळीत सहभाग १९४३ ते १९४५ या कालावधीत तुरुंगवास. |
| ६) काव्यसंग्रह | : | बिजली, दिशा, सकीना, मानसी |
| ७) बालकविता संग्रह | : | परीच्या राज्यात फुलराणीच्या कविता, तर बालगोविंद हे बालनाट्य, चंगामंगा, फिरकी इत्यादी. |
| ८) नियतकालिक संपादक | : | 'साधना' साप्ताहिकाचे सहसंपादक. १९८३ ते १९८८ या कालावधीत संपादक |

९) सन १९९९ मध्ये मुंबई येथील ७२ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

१०) युगोस्लाव्हियातील आंतरराष्ट्रीय कविसंमेलनात भारताचे अधिकृत प्रतिनिधी

११) सन १९७४– मुंबई विद्यापीठातील गुरुदेव रवींद्रनाथ टागोर अध्यापनाचे प्राध्यापक

१२) दिल्लीच्या साहित्य अकादमीचे सदस्यपद भूषविले, विंदा करंदीकर, वसंत बापट, मंगेश पाडगावकर या त्रयींनी ४० वर्षे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात काव्यवाचनाचे कार्यक्रम केले.

१३) 'येशील येशील येशील राणी पहाटे पहाटे येशील' हे लोकप्रिय चित्रपट गीत आहे.


**९. सदानंद वर्दे यांचा परिचय :**

सन १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत सहभाग! तुरुंगवासाची शिक्षा– ऑर्थर रोड तुरुंग मुंबई, राष्ट्र सेवा दलात सहभाग, सदानंद वर्दे हे अर्थशास्त्राचे विद्यार्थी होते. बी.ए. प्रथम वर्गात उत्तीर्ण झाल्यावर वांद्रा येथील नॅशनल कॉलेजमध्ये अर्थशास्त्र विषयाचे अध्यापक म्हणून काम, तसेच 'साधना' साप्ताहिकाचे सहसंपादक पदही त्यांनी भूषविले.

## 'साधना' साप्ताहिकातून प्रकाशित झालेले वाङ्मय प्रकार

| वाङ्मय प्रकार | संख्या |
|---|---|
| संपादकीय/ अग्रलेख | ६०२ |
| वैचारिक | ६६ |
| ललितगद्य | ७९ |
| चरित्र | ९१ |
| प्रवासवर्णन | ४८ |
| कविता | २२८ |
| नाटक | १ |
| कादंबरी | २ |
| पुस्तक परीक्षण | १७३ |
| पत्रलेखन | ५६ |
| स्त्री | २९ |
| पुरुष | १२५ |
| विशेषांक | १९ |
| दिवाळी अंक | ०९ |
| कुमार अंक | ०३ |

### आलेख ('साधना' साप्ताहिकाचे वाङ्मयीन योगदान/कामगिरी दर्शविणारा स्तंभालेख)



## ऑगस्ट १९४८ ते मे १९६० या कालखंडातील निवडक मुखपृष्ठे


साधनेचें तिसऱ्या वर्षांत पदार्पण


आधुनिक भारताचे भाग्यविधाते

१५ ऑगस्ट १९४८


साधनेचें तिसऱ्या वर्षांत पदार्पण

आधुनिक भारताचे भाग्यविधाते

१५ ऑगस्ट १९५०



साधना

संपादक : साने गुरुजी

वर्ष ४, अंक ४५ ] शनिवार १७ जून १९५० [ पाने ८. कि. १ आणे

**१७ जून १९५०**



साधना

संस्थापक : साने गुरुजी

संपादक

पु. ह. पटवर्धन  धं. द. आवंडकर

वर्ष २, अंक ४६ ] शनिवार २४ जून १९५० [ पाने १२. कि. ३ आणे

संपादकीय निवेदन

गुरुजींची साधना महाराष्ट्राची होवो !

साने गुरुजी स्मारक योजना

आचार्य भागवतांचें ' आन्तर–भारती ' संबंधी निवेदन

**२४ जून १९५०**


साधना
संस्थापक : साने गुरुजी
वर्ष ९, अंक ३ ] शनिवार ता. २५ ऑगस्ट १९५६ [ पानें १२, किंमत ४ आणे
घायलकी गत घायल जाने
प्रमाणें मांडण


**२५ ऑगस्ट १९५६**